# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक ०७-१२-१९९८ ते २४-०३-१९९९**

**रजि. क्र. ०९**

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०५-१२-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त शनिवार दि. ५ डिसेंबर ९८ रोजी मा. सभापती श्री. जयवंत ओक यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. तिचे इतिवृत्त. मा. सभापती यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक झाली. बैठकीची सुरुवात "वंदेमातरम् " गिताने दुपारी ४.०० वाजता झाली. बैठकीस स. स. सभासद व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स.श्री. प्रभाकर सिताराम विधाते | सभासद |
| २) | सं. स. श्री. म.अ. रऊफ म. अ. माबुद | --//-- |
| ३) | स. स. श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ४) | स. स. श्री गौतम लांडगे | --//-- |
| ५) | स. स. गांगवे बन्सी तुळशिराम | --//-- |
| ६) | स. स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ७) | स. स. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ८) | स. स. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ९) | स. स. श्री. बचाटे राजकुमार (मामा) | --//-- |
| १०) | स. स. श्री. विश्वाशेद्दीन पि. खुदबोद्दीन | --//-- |
| ११) | स. स. श्री. स. अ. एकबालोद्दीन स. भो. कुतूबुद्दीन | --//-- |

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील टपऱ्याबाबत जो निर्णय घेण्यात येत आहेत. त्याबाबत न्याय मिळणे आवश्यक आहे. सन १९९५ ला टपरी कमिटीने शहरातील विविध भागाचा टपऱ्याचा सर्व्हे करुन जो निर्णय दिलेला आहे. त्यानुसार कार्यवाही होत नाही. ज्या शहरातील काही टपऱ्यांना परवानगी दिलेली आहे मात्र पैसे भरीत नाही तर काही टपऱ्या अनधिकृत आहेत ते रेगुलर करणे करिता महानगरपालिकेकडे रितसर मागणी करीत आहेत. त्याचाही या सर्व्हे मध्ये नोंद घेण्यात आली आहे. त्यांना रेगुलर करावे परंतु प्रशासनामार्फत जे अनधिकृत टपऱ्या हटविण्याचे जे धोरण होते त्यामध्ये सर्व्हे करण्यात आल्याची नोंद आहे. त्याच्याही टपऱ्या हटविण्यात आलेल्या आहेत व ज्या विनापरवानगी टपऱ्या बसलेल्या आहते. त्यांना काहीही केलेले नाही.

**मा. सभापती :** मागील सर्वसाधारण सभेमध्ये याबाबत निर्णय झालेला आहे. सर्वसाधारण सभेने टपरी समिती बरखास्त करुन दहा-बारा दिवसांत टपऱ्यांच्या बाबतीत प्रशासनाने कार्यवाही करावयाचे मा. महापौर यांनी आदेशित केलेले आहे. संबंधित प्रस्तावावर आता या ठिकाणी चर्चा करणे योग्य नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** ज्या २२ टपरीधारकांना परवानगी दिलेली आहे. त्यांचे बाबतीत काय निर्णय झाला? टपरीधारकांना योग्यरित्या परवानगी देऊन पैसे वसुल केल्यास महानगरपालिकाला आर्थिक लाभ होऊ शकतो.

**मा. सभापती :** सर्वसाधारण सभेने २२ टपरीधारकांच्या बाबतीत स्थगिती दिलेली आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी, श्री. म. अ. रऊफ :** पशुधन विभागात रिसवान अहमदखाँन क. लिपीक यांना मागील सभापतीच्या काळात ४ महिण्याच्या काळातील पगाराबाबत निर्णय दिलेला होता. त्याबाबत प्रशासनाने अद्यापही कार्यवाही केलेली नाही.

**पशुधन विकास अधिकारी :** याबाबत अहवाल अस्था -१ कडे पाठविलेला आहे.

**मा. सभापती :** १) रिसवान अहमदखाँन क. लिपीक पशुधन विभागात कार्यरत असतांना त्याचा ४ महिण्यचाचा पगार स्थगित ठेवलेला होता. त्याबाबत प्रशासनाने त्यांच्या हजेऱ्यांचे कागदपत्रे तपासणी करुन संबंधितास ४ महिण्याचा पगार तातडीने अदा करावा.

२) टपऱ्यांच्या बाबतीत सर्वसाधारण सभेने जो निर्णय दिलेला आहे. त्यानुसार १०-१२ दिवसांत टपऱ्यांबाबत निर्णय घेऊन तातडीने कार्यवाही व्हावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** शहरातील बिल्डर्स लोकांचे जे अनधिकृत घरे व मोठमोठे बिल्डींग आहेत. त्यांचेवर अगोदर कार्यवाही करावी. गरिब लोकांना प्रशासनाने त्रास देवू नये. पार्कीन चा वापर बदलण्यात येत आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** श्री. मुळे नावांच्या ग्रहस्थचे अनधिकृत घर प्रशासनाने पाडलेले आहे. प्रशासनातर्फे पुर्णपणे कार्यवाही होत आहे. जे काही मोठमोठे बिल्डर्सचे अनधिकृत घरे असतील त्यांचेही घरे पाडण्यात येतील नुसते अनधिकृत टपऱ्याच हटविणार नाही.

**श्री. विश्वारोद्दीन :** शहरातील एकंदर परवानगी दाखल टपऱ्या आहेत. त्या किती आहेत. व त्यांचे वार्षिक भाडे वसुल केल्या जाते काय ? सध्या किती टपरी धारकांचे भाडे थकबाकी आहे याची सविस्तर माहिती द्यावी.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** ५५% वसुली झाली. त्यातुन रु. ४४,७५,०००/- वसुली करण्यात आली. थकबाकीदाराना नियमाप्रमाणे नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

**श्री. विखारोद्दीन :** झोन निहाय एकुण टपऱ्या किती आहेत. त्यांची वसूली किती व थकबाकी किती अशी माहिती द्यावी.

**मा. सभापती :** किती टपऱ्यांना परवानगी दिली कितींना नोटीसा दिल्या, वसुली किती झाली. झोननिहाय माहिती पूढील बैठकीत द्यावी. व ८ दिवसांत पैसे भरले नाही तर जप्तीची कार्यवाही करावी.

**श्री. स. अ. अली मिरा सलामी :** पुढील बैठकीच्या वेळी रजिस्टर मागवावे १२ ते १५ टपऱ्यांना परवानगी दिलेली आहे. अनधिकृत बांधकामाबाबत मोठ्या इमारती संबंधी काय कार्यवाही केली. स्थगिती आणली. त्यावर काय कार्यवाही झाली. इतर आरक्षणाच्या बाबतीत काय कार्यवाही झाली. ज्या लोकांना बांधकाम परवानगी दिली जाते. त्याची जागेवर चेकिंग होत नाही. मागील ३ वर्षात किती भोगवटा प्रमाणपत्र दिले.

**श्री. स. अ. एकबोद्दीन :** आपली प्रापर्टी कोठे कोठे आहे. रविवारी हजर राहावयाचे आहे. एका जागेसाठी कोर्ट कमिशनर येणार आहे. उद्या १० वाजता तेथे संबंधितांनी हजर राहावे.

**मा. सभापती :** संबंधितानी कागदपत्रासह हजर राहावे.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** राजाबाजार पोलीस चौकी बाबत रस्ता रुंदिकरणात इमारत महानगरपालिकाने बांधुन द्यावयाची आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग बांधण्यचास तयार नाही. पोलीस चौकी बांधुन द्यावी.

**मा. सहा. संचालक नगररचना :** बांधुन कोणी द्यावे. हा प्रश्न आहे. आपण आपली जागा दिली त्यांनी बांधून घ्यावे.

**श्री. गौतम लांडगे :** सदरील मालमत्ता रस्ता रुंदीकरणात गेल्याने संबंधित मालमत्ता धारकांस योग्य तो मोबदला नियमाप्रमाणे दिलेला असेल त्याचप्रमाणे पोलीस चौकीसाठी दोन रुम्स बांधकाम करुन देणे बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पोलीस कार्यालयातर्फे होणे गरजेचे आहे. व तसा पत्रव्यवहार करावा. महानगरपालिकाने बांधुन द्यावयाचे झल्यास शासकिय अनुदानातून खर्च करावा.

**मा. सभापती :** स. स. गौतम लांडगे यांनी सुचना केल्याप्रमाणे शहर अभियंता यांनी पत्रव्यवहार करावा.

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील ज्या नविन घर बांधकाम परवानगी घेतल्यानंतर व बांधकाम झाल्यानंतर कम्पलेशन प्रमाणपत्र एकुण मंजुरीच्या किती लोकांनी घेतली व किती लोकांनी घेतली नाही. यामध्ये परवानगी घेऊनही अनाधिकृत बांधकामे ज्यांनी केलेली आहेत. त्यांचेवर किती लोकांवर दंड लावून वसूली केली या बाबतची सविस्तर माहिती द्यावी.

**मा. सभापती :** या बाबतची संबंधीत अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**सहा. संचालक नगररचना :** सध्या या प्रकरणा त सर्व्हे चालु आहे. त्यांनतर सविस्तर माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती : सविस्तर माहिती देण्यात यावी.**

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** महानगरपालिकाच्या मालकीच्या व खुल्या जागा ज्या शहरात आहे. त्यावर अतिक्रमणे होऊ नयेत म्हणुन तातडीने तार फेन्सींग व महानगरपालिकाचा बोर्ड लावावा. स. स. नगररचना व प्रशासकीय अधिकारी यांनी सर्व्हे पूर्ण करुन चार्ट तयार करावा.

**मा. सभापती :** शहर अभियंता व सहा. संचालक नगररचना यांनी मालमत्ता विभागाअंतर्गत कार्यवाही करावी. व सर्व महानगरपालिकाच्या खूल्या जागेवर अतिक्रमण होऊ नयेत म्हणुन तातडीने नोटीस बोर्ड लावून तार फेन्सींग करावे व अतिक्रमणे कुठे झालेले असल्यास ते काढुन टाकण्याची कार्यवाही करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** रंगारगल्ली भागातील जो रस्ता रुंदीकरणात काम झालेले आहेत. त्या कामाचे संपुर्ण पैसे संबंधित गुत्तेदारास अदा केलेले ओहत . असे समजते. वास्तविक पाहता तेथील बरेचसे कामे व्हावयाचे आहेत.

**मा. सहा. संचालक नगररचना:** ५ मिळकती संबंधी न्यायालयात प्रकरण चालु आहे. चेक तयार होतो. ताबा घेतला नाही.

**मा. सभापती :** रस्ता रुंदीकरण झाल्यानंतर तेथिल डांबरीकरण व खडीकरण करण्याचे कामास तातडीने मंजूरी दिलेली आहे व काम करुन त्याचे पैसे अदा केलेले आहेत. ज्यांचे काम शिल्लक असतील तर त्यांचे तेवढे पैसे थांबवुन ठेवण्यात यावे असे आदेशित करण्यात येईल.

**विषय क्र.३४०/१ :**

दिनांक ११.११.९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. प्रभाकर विधाते :** मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ मध्ये महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील असलेले वाहन तळाच्या समोर एका व्यक्तींने गॅरेज उभारुन

घरगुती नळ कनेक्शन घेतलेले आहे. त्या संदर्भात माहिती विचारणा केली असता पुढील बैठकीत देण्यात येईल असे सांगीतले होते. त्याप्रमाणे माहिती द्यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उपअभियंता पापू-१ :** संबंधित व्यक्तींने या ठिकाणी नगरपरिषद काळातील नगराध्यक्ष असतांना ११.१२.७४ ला वर्कशॉपसाठी लिजवर जागा घेतलेली आहे व त्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार त्यांनी नळ कनेक्शन घेतलेले आहे.

**मा. सभापती :** मुख्याधिकारी यांनी दि. ११.१२.७४ ला वर्कशॉप साठी लिजवर जागा दिलेली आहे. मालमत्ता अधिकारी यांनी उपअभियंता पापू-२ यांचेकडुन सदरची संचिका घेऊन किती वर्षाच्या लिजसाठी जागा दिलेली आहे. त्यांचीही माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** डॉ. बाबासोहब आंबेडकर संशोधन केंद्र येथे आवश्यक लागणारे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. जेणे करुन उद्‌घाटन होण्यापूर्वी सर्व साहित्य असावे. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे जानेवारी-९९ मध्ये उद्‌घाटन करावयाचे असुन तशी तयारी करणे आवश्यक आहे. त्यासाठी लागणारे आवश्यक ते साहित्य खरेदी शहर अभियंता यांना करावयाचे आहे. त्यासाठी शॉर्टटेंडर ३-३ दिवसांचे काढुन कार्यवाही करावी. व कामे तातडीने व्हावेत.

**श्री. गौतम लांडगे :** त्याचप्रमाणे या सेंटरसाठी लागणारा कर्मचारी वर्ग त्य ठिकाणी नाही. याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. अन्यथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र सुरु करणे शक्य होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**मा. सभापती :** अत्यंत चांगला मुद्दा उपस्थित करण्यात आला. कारण जानेवारी -९९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे उद्‌घाटन होणार आहे. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी पुराणवस्तु संग्रहालय व मौलाना अब्दूल कलाम आझाद संशोधन केंद्रही सुरु होणार आहे. त्यासाठी आवश्यक लागणारा कर्मचारी वर्ग प्रशासनाने तातडीने भरावा. त्यासाठी आकृतीबंध प्रस्तावाची वाट पाहण्याची आवश्यकता नसावी. व आकृतीबंधाचा काहिही संबंध नाही.

**श्री. म. अ. रऊफ :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ वर मटन मार्केटचे काम ९६ चे आहे काम करण्याचे आदेशाबाबत विचारणा केली होती. त्याबाबत काय झाले.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उपअभियंता (बां.) :** संबंधित ठिकाणी स्थळ पाहणी करण्यात येईल.

**श्री. म. अ. रऊफ :** ज्या जागेची पाहणी करावयाची आहे. ती जागा कार्यवाही वादग्रस्त आहे. याबाबत प्रशासनातर्फे काहीही कार्यवाही होत नाही. शिवाय संबंधित संचिका हरविलेली आहे. असे वाटते कारण ती कार्यालयात आढळुन येत नाही. त्यापेक्षा दुसरी जागा पाहणी करुन कार्यवाही व्हावी. कारण गेली दोन वर्षापासुनची कार्यवाही व्हावयास पाहिजे होती ती होत नाही.

**मा. सभापती :** जर जागेचा वाद असेल व कोर्ट प्रकरण असल्यास प्रशासनाने पाहणी करावी नसता स. स. शी. प्रत्यक्षात चर्चा करुन दुसऱ्या जागेबाबत विचार होऊन काम तातडीने करण्याची कार्यवाही करावी. त्याचबरोबर मी प्रशासनातील अधिकारी वर्गांना विनंती करतो की, स. स. जे प्रश्न विचारतात व कामे करुन घेण्याबाबत वारंवार विचारणा करतात. त्याबाबत संबंधित कोणत्याही विभागाच्या विभाग प्रमुखांनी स. स.च्या प्रश्नास होय

किंवा नाही असे उत्तर २-३ दिवसांतच द्यावे. इतिवृत्त येईल व वाचल्यानंतर पुन्हा दहा पंधरा दिवस लागतात अशी वेळ काढुपणा करु नये.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** रु. २५,०००/- टेंडरचे काम स्वेच्छा निधीतील तातडीने व्हावे. कामे करण्यात अडचणी येतात.

**मा. सभापती :** टेंडरचे काम ए-१ चे नोटीस बोर्डावर लावुन तातडीने स्वेच्छा निधीतील काम व्हावे.

**श्री. विश्वारोद्दीन, श्री. स. अली मिरा सलामी, श्री. स. अ. रऊफ, श्री स. अ. एकबालोद्दीन :** स. स. चे स्वेच्छा निधीतील कामे करीत असतांना ए-१ चे कामे करण्यास गुत्तेदार अडचणी आणतात व त्यामुळे बरीचशी कामे चांगल्या प्रकारची होत नाही. बोगस होतात. त्या सर्वाची कामांची चौकशी व्हावयास पाहिजे बरीचशी कामे ६७ (३) चा वापर करुन तातडीने कामे प्रशासनाने करावे. तसे मंदिर/मस्जीद भागातील कामे आहेत ती तातडीने व्हावेत.

**मा. सभापती :** काही स. स. नी सुचना केल्याप्रमाणे अशी मंदिर/मस्जीद च्या जवळील काही तातडीची कामे असल्यास तशी स्वेच्छा निधीची प्रकरणाबाबत धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेत घ्यावी लागेल. गुत्तेदाराकडुन ए-१ च्या कामाबाबत कामे समाधानकारक न आढळल्यास व तक्रारी आल्यास तशी चौकशी करुन संबंधीत गुत्तेदारास ब्लॅाक लिस्ट मध्ये नांव टाकण्यात येईल.

**श्री. म. अ. रऊफ :** पान क्र. १९ विषय क्र. ३३८/१९ स्थगित होता. मंजुर करण्यात यावे.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** सदर मिळकत धारकांचे नांवाचा उल्लेख नाही. त्याचा उल्लेख करुन मंजुर करावे.

**मा. सहा. संचालक :** सदर मिळकत धारक मोंहमद शाकेर पिता. अ. अजिम आहेत.

**अति. शहर अभियंता :** जो भाग उपलब्ध झालेला आहे. तेथे काम करण्यात आले आहे.

**मा. सभापती :** विषय क्र. ३३८/१९ हा विषय मागील सभेत स्थगित ठेवलेला होता. तो मंजूर करण्यांत येतो. सदरील जमिन मालक रस्ता रुंदी करणासाठी सहकार्य करत आहे. जमिनीचा मोबदला तातडीने द्यावेत. त्यांची अडवणुक होऊ नये.

**ठराव :**

दि. ११.११.९८ च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला ठराव क्र. ३३८/१९ ऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुनाबाजार रस्ता व औरंगपुरा भाजी मार्केट ते नेहरुभवन या रस्त्यात बाधीत होणाऱ्या न. भू. क्र. ३३३१ च्या एकुण बाधीत क्षेत्र ५८.५४ चौ. मी. क्षेत्राचे शीघ्र सिध्द गणकाद्वारे निश्चित करण्यात आलेले मुल्यांकन रु. ४,२१,४८८/- मिळकतधारक श्री. मो. शाकेर पि. अ. अजित अ. पा. क. अब्दुल अजिम पि. अ. हमीद व २) श्री. शे. वजीर शे. घासी ह्यांना करण्यास, तसेच खरेदीखतासाठी लागणाऱ्या एकुण रक्कम पैकी ५०% रक्कम मनपाने व ५०% रक्कम मिळकत धारकांने खर्च करावयाचे मान्य केल्यानुसार निम्मी रक्कम रु. २१,०५०/- वजा जाता रक्कम रु. ४,००,४३८/- मिळकतधारकास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच खरेदीसाठी लागणारी रु. ४२,१००/- शाखा अभियंता श्री. डी. डी. काळेले ह्यांना अग्रीम म्हणुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वरील दुरुस्तीसह दि. ११.११.९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.३४१/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. देवानगरी येथे सांस्कृतिक सभागृह बांधावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन १९९७-९८ चे जिल्हा

दरसुची नुसार रक्कम रुपये ५,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. १६.१०.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षाअंतर्गत करण्यांत येईल. तरी उपरोक्त अंदाजपत्रक रक्कम रुपये ५,४०,०००/- प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. देवानगरी येथे सांस्कृतिक सभागृह बांधण्याचे कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. ५,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४२/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वरद गणेश मंदीर समर्थनगर ते वीरसावरकर चौक सिल्लेखाना चौक रस्ता दुभाजकावर लोखंडीग्रील बसविणेच्या कामासाठी सन ९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ६,४६,३८७/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च शासकीय अनुदान " सन १९९६-९७ च्या चार कोटी अनुदानातुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वरद गणेश मंदीर समर्थनगर ते वीर सावरकर चौक सिल्लेखाना चौक रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ६,४६,३८७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ३४३/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरमियॉ दर्गा येथील प्रस्तावित रेल्वे लेव्हल क्रॉसिंग करिता रस्त्याचे खडीकरण (भाग-अ) करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,६४,१३१/- चे तयार करण्यांत आले असुन सदरील खर्च सन १९९८-९९ च्या "नविन खडी रस्ते" मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरमियॉ दर्गा येथील प्रस्तावित रेल्वे लेव्हल क्रॉसिंग करिता रस्त्याचे खडीकरण (भाग-अ) करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,६४,१३१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४४/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सिल्लेखाना चौक ते चापडी मार्गे बंजारा कॉलनी रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे डी.एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ६,८६,२३३/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "शासकिय अनुदान " सन ९६-

९७ च्या चार कोटी अनुदानातुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या प्रमाणे सिल्लेखाना चौक ते लक्ष्मणचावडी मार्गे बंजारा कॉलनी रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ६,८६,२३३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानु मते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४५/६ :**

चिकलठाणा येथील अस्तित्वात असलेल्या जलकुभांला संरक्षित भिंत बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १,७५,३७२/- चे तयार करण्यांत आलेले असुन सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. या कामावर होणारा खर्च सन १९९८-९९ या वर्षातील देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकातील तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे.

तरी चिकलठाणा येथील जलकुभांवर संरक्षित भिंत बांधण्याचे कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. १,७५,३७२/- ला मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील अस्तित्वात असलेल्या जलकुभांला संरक्षित भिंत बांधण्याच्या कामारिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,७५,३७२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४६/७ :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घाटी जयभिम नगर (स्लम) गुलाबवाडी परिसरात आदेश झोपडपट्टी योजनेअंतर्गत दर्शनी विटाची भिंत बांधणे बाबत कामारिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वर्ष ३६,०७,९००/- चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "आदर्श झोपडपट्टी" या शिर्षकातुन करण्यांत येईल.

सदरील कामाचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु. ३०,६१,३५०/- चे होते परंतु सदरील भाग मुळ अंदाज पत्रकात एका दरवाजाची तरतुद होती परंतु नागरीक तसेच स. नगरसेवकांनी दोन दरवाजे बसविण्याची मागणी केली तसेच मुळ प्रस्तावात झोपडीच्या फरशीखाली कॉक्रीट तळाची तरतुद नव्हती. परंतु ते आवश्यक असल्यामुळे त्याचाही समावेश सदर सुधारीत अंदाजपत्रकात करण्यांत आला आहे. या प्रमाणे आवश्यकता असल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २०.१०.९८ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. करिता सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारीत अंदाजपत्रकातील वाढीव खर्चाची रक्कम रु. ५,४६,५५०/- या मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर तसेच वाढीव काम मुळ कंत्राटदार मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कं. यांचेकडुन निविदाच्या मुळ मंजुर दराने करणेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. घाटी जयभीम नगर (स्लम) गुलाबवाडी परिसरात आदर्श परिसरात आदर्श झोपडपट्टी योजने अंतर्गत दर्शनी विटाची भिंत बांधणे्च्या कामामध्ये एका ऐवजी दोन दरवाजे बसविणे, तसेच फरशीखाली कॉक्रीट तळाची तरतुद केल्याने सुधारित अंदाजपत्रक र. रु.३६,०७,९००/-च्या अंदाजपत्रकास तसेच र. रु. ५,४६,५५०/- चे वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन निविदाच्या मुळ मंजुर दराने करुन घेण्यास सर्वानमुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४७/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयामध्ये प्रसंग परीचयाकरीता ध्वनी व प्रकाश झोत व्यवथा करणेच्या कामासाठी मा. बाबासाहेब पुरंदरे यांनी दि. ६.११.९८ च्या पत्राद्वारे कळविलेले आहे.

श्रीमंत छत्रपती शिवाजी महराज पुराणवस्तु संग्रहालयात छत्रपतीच्या जीवनावरील पाच प्रसंगाचे म्युरल्स तयार करण्यांत आले असुन आणखी दोन प्रसंग तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. सदरील कामाची मा. बाबासाहेब पुरंदरे यांचे सोबत संग्रहालयाच्या सर्वोच्च समितीचय सभासदांनी तसेच मा. खासदार श्री. प्रदीपकुमार जैस्वाल यांनी प्रत्यक्ष स्थळावर या प्रसंगाची पाहाणी केली असता सुचित केले की, निर्जीव म्युरल्सवर प्रकाश झोत टाकुन त्या बद्दल माहिती द्यावयाचे ध्वनी क्षेपन केल्यास या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज बद्दल अधिक ज्ञान मिळू शकेल. सदरील काम हे बाबासाहेब पुरंदरे यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनी सुचविलेल्या तज्ञांकडुन करुन घ्यावयाचे ठरले आहे.

सदरच्या प्रयोगाकरिता प्रकल्पाची, कल्पना योजना व स्वरुप खालील प्रमाणे राहिल.

१) हा प्रयोग २५ मिनिटाचा असेल.
२) या प्रयोगाचे लेखन (स्क्रॅप्ट) बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिले असुन यातील निवेदन व संवाद त्यांचे स्वतःच्या आवाजा असतील.
३) या प्रयोगात अन्य काही नामवंत कलाकार बोलतील, वागतील.
४) ध्वनीमुदंन संपुर्णपणे वेस्टर्ण आऊटडोअर रेकॉर्डींग स्टुडीयो या जगप्रसिध्द स्टुडीयोत श्री. उदय चित्र व विख्यात कलाकार दिग्दर्शक श्री. मंगेश तेंडुलकर यांच्या तंत्र शुध्द नेतृत्वाखाली होईल.
५) या प्रयोगाचे संपुर्ण नियोजन स्वतः बाबासाहेब पुरंदरे करणार आहे हे सर्व काम मुंबई येथे होईल.
६) संपुर्ण ध्वनी मुद्रनकरण्यासाठी सलग चार दिवस (प्रत्येक दिवशी चार तास) लागतील.
७) ध्वनी मुद्रनाचा खर्च स्टुडीयो, भाडयास सुमारे अंदाजे रक्कम रु. ५०,००० येईल.
८) कलावंत अभिनेते व अभिनेत्री यांचे एकुण मानधन रक्कम रु. २०,०००/- असेल.
९) श्री. मंगेश तेंडुलकर यांचे मानधन प्रवास, निवास व भोजन खर्चासहित रक्कम रु. १०,०००/- असेल.
१०) पुणे ते मुंबई, मुंबई पुणे ते औरंगाबाद हा प्रवास खर्च महानगरपालिकेस द्यावा लागेल.

११) तीन व्यक्तींचा औरंगाबाद येथील वास्तव्याचा खर्च महानगरपालिकेस धावा लागेल.
१२) या प्रयोगासाठी मोनो रेकॉडींग करण्यांत येणार असुन त्या करीता लागणारे रेकॉडप्लेअर व ध्वनी क्षेपक यंत्र महानगरपालिकेने खरेदी करावयाचे आहे. त्याच प्रमाणे प्रकाश व्यवस्थ्ेकरीता लागणारी साधवे (दिवे, वायर,शेडस इ. बाबी) महानगरपालिकेने खरेदी करावयाचे आहे.

उपरोक्त सर्व प्रक्रीयेकरिता या प्रकल्पांस अंदाजे रक्कम रु. २,५०,०००/- लाख पर्यंत खर्च अपेक्षित आहे. या अडीच लाखामध्ये मा. बाबासाहेब पुरंदरे यांचे लेखनाचे व निवेदन मानधन धरलेले नाही. हा विषय मा. बाबासाहेब पुरंदरे यांनी महानगरपालिकेवर सोडलेला आहे. तसेच या बाबत त्यांची व्यक्तीगत कोणतीही अट नाही.

तरी वरील बाबींचा विचार करता संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांना छत्रपतीच्या जीवनावरील आलेख समजावा म्हणुन प्रकल्प उभारणे संयुक्तीक वाटत असल्याने मंजुरी करिता विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात छत्रपतींच्या जीवनावरील प्रसंगाचे बनविण्यात आलेल्या म्युरल्सवर प्रकाश झोत टाकुन त्याबद्दल माहिती देण्याकरिता ध्वनीक्षेपन व प्रकाश व्यवस्था मा. बाबासाहेब पुरंदरे यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनी सुचविलेल्या तज्ञाकडुन प्रस्तावात दर्शविलेल्याप्रमाणे काम करुन घेण्याकरीता येणाऱ्या अंदाजे खर्च रक्कम रु. २,५०,०००/- (अडीच लक्ष) ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४८/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ॲम्बेसिडर कारसाठी लागणाऱ्या स्पेअरपार्टस खरेदी करण्यासाठी वार्षिक करार करण्याकरिता जा. क्र. मनपा/मुलेप/३६/९८ दि. १४.०७.९८ प्रमाणे विविध वर्तमानपत्रात निविदा सुचना देवून निविदा मागविली असता एक कोरी निविदा विक्री झाली व एक दरासह प्राप्त निविदा मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद याची असुन त्यांनी भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्राईजलिस्टचे दर |
| १) | सी. एस. टी. | : | ४% |
| २) | ट्रान्स्टपोर्टेशन | : | ५% |
| ३) | जकात | : | २ १/२% |
| ४) | विमा | : | १ १/२% |
| ५) | एम.एस.टी. | : | १०% |
| | एकुण | : | २३% |

महानगरपालिकेकडे एकुण ८ ॲम्बेसिडर कार, कॉन्टेसा कार आहेत. या वाहनावर वर्षभरात अंदाजे १.५ लाख खर्च लागेल असे अंदाजीत केले आहे. तरी मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद यांचे दर वार्षिक करार करण्यासाठी मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र. ३४९/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महापालिकेच्या विविध वाहनाच्या ॲटो इलेक्ट्रीकल्सच्या कामासाठी लागणारे स्पेअर पार्ट पुरवठा करण्यासाठी व जॉबवर्कच्या कामासाठी जा. क्र. मनपा/मुलेअ/३६/९८दिनांक १४.७.९८ प्रमाणे विविध वर्तमान पत्रातुन निविदा सुचना देवून निविदा मागविण्यात आल्या असता तीन कोऱ्या निविदा विक्री झाल्या तीन निविदा दरासह प्राप्त झाल्या प्राप्त निविदा मध्ये विविध एजन्सीज ने भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | ॲटो इलेक्ट्रीकल्स साठी जॉब वर्क दर | लुकास टीव्हीएस एसपीआर पार्टचे दर | लिसपार्टसाठी दर |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे. युनायटेड इलेक्ट्रो डिझेल औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दरपेक्षा १७% ने कमी | एमआरपी प्राईज लिस्ट पेक्षा ८% ने कमी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% |
| ०२. | मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हिसेस औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% ने कमी | एमआरपी प्राईजलिस्ट १०.५% ने कमी | अंदाजपत्रकिय दरापेक्षा १०% ने कमी |
| ०३. | मे. विकास ट्रेडर्स औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% ने कमी | एमआरपी प्राईललिस्ट प्रमाणे | अंदाजपत्रकीय दरप्रमाणे |

वरिलप्रमाणे फक्त जॉबवर्कचे दर मे. युनायटेड इलेक्ट्रो डिझेल औरंगाबाद यांचे कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरपेक्षा १७% ने कमी असे आहेत परंतु हे काम अत्यअल्प आहे व पार्टस जॉबवर्क एकाच एजन्सीजकडुन करुन घेणे सोईस्कर असते व मे चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हिसेस औरंगाबाद हे जॉबवर्क त्याच कमी दरात म्हणजेच अंदाजपत्रकिय दरापेक्षा १७% ने कमी मध्ये करुन देण्यांस तयार आहेत. त्यामुळे वरील दर्शविलेल्या प्रमाणे मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हिसेस औरंगाबाद यांचे सर्व ॲटमसाठी दर कमी होताततरी त्याच्याशी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात वार्षिक करार करण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध वाहनाच्या ॲटो इलेक्ट्रीकल्सच्या कामाकरिता लागणारे स्पेअर पार्टस पुरवठा करण्यासाठी व जॉबवर्कच्या

कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक सर्वात कमी दर स्पेअर पार्टसकरीता एम.आर.पी. प्राईजलिस्टपेक्षा १०.५% ने कमी (लुकास टी.व्ही.एस. एसपीआर पार्टसाठी) व लिस पार्टसाठी अं. प. दरापेक्षा १०% ने कमी चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हिसेस औरंगाबाद यांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. जॉबवर्कसाठी मे. युनायटेड इलेक्ट्रो. डिझेल, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी आहेत. परंतु हे काम अत्यलप असल्याने दोन्ही कामे एका एजन्सी कडुन करुन घेणे सोयीचे असल्याने व मे. चाणक्य ॲटो इले. ॲन्ड डिझेल सर्व्हीसेस, औरंगाबाद हे अंदाजपत्रक दरापेक्षा १७% कमी दराने काम करण्यास तयार असल्याने दोन्ही कामाकरिता मे. चाणक्य इले. ॲन्ड डिझेल सर्व्हीसेस औरंगाबाद याचेंशी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात वार्षिक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ३५०/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विविध वाहनांसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या वाहनांच्या विविध आकाराचे टायर्स हॉट व कोल्ड दोन्ही पध्दतीने रिट्रेडिंग करुन घेण्याच्या कामासाठी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात करार करण्यासाठी जा.क्र./मनपा/मुलेअ/३६/९८ दिनांक १४.७.९८ प्रमाणे विविध वर्तमान पत्रात निविदा सुचना देवुन निविदा मागविली असता ८ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व ६ निविदा दरासह प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा मध्ये विविध एजन्सीजने भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

**१) मे. भगवानदास इंडस्ट्रीज, औरंगाबाद.**

अ) हॉट रिमोलडींग साठी वापरण्यात येणारा बेल्टची कंपनी : एस.आर.एफ.
ब) कोलट रिमोडींगसाठी वापरण्यात येणारा बेलटची कंपनी एस.आर.एफ.

| अ. क्र. | टायर साईज | कोल्ड रिट्रेडींगचे दर | हॉटरिटेडिंगचे दर | कट रिपेअर चे दर १" २" ३" ४" |
|---|---|---|---|---|
| ०१. | ५.९०X१५ | ५००.०० | ४००.०० | ९०-१७० |
| ०२. | ५.६० X१३१५५० एसआर-१३ | ४५०.०० | ४००.०० | ९०-१७० |
| ०३. | ५६५ X१२ | ४२५.०० | ४००.०० | ९०-१७० |
| ०४. | १७५.७० एसआर-१३ | ५५०.०० | -- | ९०-१७० |
| ०५. | ४.५० X१२ | ४२५.०० | ४००.०० | ९०-१७० |
| ०६. | ६०० X१६ | ७५०.०० | ६००.०० | ९०-१७०-२५० |
| ०७. | १९५ एसआर-१३ | ६०० | -- | ९०-१७० |
| ०८. | एफ-७८ X१५ | ८५०.०० | -- | ९०-१७०-२५० |
| ०९. | ७.५० X१६ | ९५०.०० | ८००.०० | ९०-१७०-२५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | ९.०० X२० | १४००.०० | १२५०.०० | ९०-१७०-३५० |
| ११. | १००० X२० | १५००.०० | १३५०.०० | ९०-१७० |
| १२. | ६०० X१६ | ७००.०० | ६००.०० | ९०-१७० |
| १३. | १२ X ४X२८ | - | २६००.०० | ९०-१७०-२५०-३५० |
| १४. | ७०० X१५ | ८७५.०० | ८००.०० | ९०-१७०-२५० |

**२ ) मे. पॅरागॉन टायर्स औरंगाबाद**

अ) हाट रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणारा बेल्टची कंपनी :एम.आर.एफ.

ब) कोल्ड रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणारा बेल्टची कंपनी : एम.आर.एफ.

| अ. क्र. | टायर साईज | कोल्ड रिट्रेडींगचे दर | हॉटरिटेडिंगचे दर | कट रिपेअर चे दर १" २" ३" ४" |
|---|---|---|---|---|
| ०१. | ५.९०X१५ | ६२५.०० | ४९५.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| ०२. | ५.६० X१३१५५० एसआर-१३ | ६२५.०० | - | ९०-१५०-२५०-४०० |
| ०३. | ५६५ X१२ | ४२५.०० | ४२५.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| ०४. | १७५.७० एसआर-१३ | ८२५.०० | - | ९०-१५०-२५०-४०० |
| ०५. | ४.५० X१२ | ४९५.०० | ४२५.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| ०६. | ६०० X१६ | ८५०.०० | ६५०.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| ०७. | १९५ एसआर-१३ | ९००.०० | -- | ९०-१५०-२५०-४०० |
| ०८. | एफ-७८ X१५ | ९००.०० | ८००.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| ०९. | ७.५० X१६ | १०१५.०० | ८५०.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| १०. | ९.०० X२० | १९१०.०० | १५००.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| ११. | १००० X२० | २०२०.०० | १६००.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| १२. | ६०० X१६ | ८५०.०० | ६५०.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| १३. | १२ X ४X२८ | - | २८००.०० | ९०-१५०-२५०-४०० |
| १४. | ७०० X१५ | ९००.०० | ७५०.०० | ९०-१५०-२५०-४०० |

**३) मे. मारुती टायर्स औरंगाबाद .**

अ) हॉट रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणारा बेल्टची कंपनी : येलजी

ब) कोल्ड रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणारा बेल्टची कंपनी : एम.आर.एफ.

| अ. क्र. | टायर साईज | कोल्ड रिट्रेडींगचे दर | हॉटरिटेडिंगचे दर | कट रिपेअर चे दर १" २" ३" ४" |
|---|---|---|---|---|
| ०१. | ५.९०X१५ | ६२५.०० | ५५०.०० | १२५-२२५-३००-४०० |
| ०२. | ५.६० X१३१५५० एसआर-१३ | ६२६.०० | ५५०.०० | १२५-२२५-३००-४०० |
| ०३. | ५६५ X१२ | ६००.०० | ५२५.०० | १२५-२२५-३००-४०० |
| ०४. | १७५.७० एसआर-१३ | ८५०.०० | - | १२५-२२५-३००-४०० |
| ०५. | ४.५० X१२ | ६००.०० | ५२५.०० | १२५-२२५-३००-४०० |
| ०६. | ६०० X१६ | ७५०.०० | ६२५.०० | १२५-२२५-३००-४०० |
| ०७. | १९५ एसआर-१३ | ९००.०० | -- | १२५-२२५-३००-४०० |
| ०८. | एफ-७८ X१५ | ९००.०० | ८५०.०० | १२५-२२५-३००-४०० |
| ०९. | ७.५० X१६ | १०५०.०० | ८५०.०० | १२५-२२५-३००-४०० |
| १०. | ९०० X२० | १९००.०० | १५००.०० | १२५-२२५-३००-४०० |
| ११. | १००० X२० | २०००.०० | १६००.०० | १२५-२२५-३००-४०० |
| १२. | ६०० X१६ | ७००.०० | ६००.०० | १२५-२२५-३००-४०० |
| १३. | १२ X ४X२८ | - | ३०००.०० | १२५-२२५-३००-४०० |
| १४. | ७०० X१५ | ९००.०० | ७००.०० | १२५-२२५-३००-४०० |

**४) मे. नाथ कोल्ड रिट्रेडींग औरंगाबाद**

अ) हॉट रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणाऱ्या बेल्टची कंपनी : इंडोग
ब) कोल्ड रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणाऱ्या बेल्टची कंपनी

| अ. क्र. | टायर साईज | कोल्ड रिट्रेडींगचे दर | हॉटरिटेडिंगचे दर | कट रिपेअर चे दर १" २" ३" ४" |
|---|---|---|---|---|
| ०१. | ५.९०X१५ | ५५०.०० | - | १००-२०० - - |
| ०२. | ५.६० X१३१५५० एसआर-१३ | ५२५.०० | - | १००-२०० - - |
| ०३. | ५६५ X१२ | ६००.०० | - | १००-२०० - - |
| ०४. | १७५.७० एसआर-१३ | ७००.०० | - | १००-२०० - - |
| ०५. | ४.५० X१२ | ५००.०० | - | १००-२०० - - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६. | ६०० X१६ | ८००.०० | ६००.०० | १००-२०० - - |
| ०७. | १९५ एसआर-१३ | ९००.०० | - | १००-२०० - - |
| ०८. | एफ-७८ X१५ | ९००.०० | - | १००-२०० - - |
| ०९. | ७.५० X१६ | १०००.०० | ८५०.०० | १००-२००-३००-४०० |
| १०. | ९०० X२० | १६५०.०० | - | १००-२००-३००-४०० |
| ११. | १००० X२० | १७५०.०० | - | १००-२००-३००-४०० |
| १२. | ६०० X१६ | ८००.०० | ६००.०० | १००-२०० - - |
| १३. | १२ X ४X२८ | - | २६००.०० | १००-२००-३००-४०० |
| १४. | ७०० X१५ | ९७५.०० | ७००.०० | १००-२००-३०० - |

**५) मे कविक टायर सर्व्हिस औरंगाबाद**

अ) हॉट रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणारा बेल्टची कंपनी :
ब) कोल्ड रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणारा बेल्टची कंपनी :

| अ. क्र. | टायर साईज | कोल्ड रिट्रेडींगचे दर | हॉटरिटेडिंगचे दर | कट रिपेअर चे दर १" २" ३" ४" |
|---|---|---|---|---|
| ०१. | ५.९०X१५ | - | ५१५.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ०२. | ५.६० X१३१५५० एसआर-१३ | - | ५०५.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ०३. | ५६५ X१२ | - | ४६०.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ०४. | १७५.७० एसआर-१३ | - | ६७५.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ०५. | ४.५० X१२ | - | ४६०.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ०६. | ६०० X१६ | - | ६३५.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ०७. | १९५ एसआर-१३ | - | ८५०.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ०८. | एफ-७८ X१५ | - | ७४५.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ०९. | ७.५० X१६ | - | ८६५.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| १०. | ९०० X२० | - | १४२५.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| ११. | १००० X२० | - | १५३०.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| १२. | ६०० X१६ | - | ६३५.०० | ८५-१७०-२५५-३४५ |
| १३. | १२ X ४X२८ | - | ३१००.०० | ८५-१७०-२५५-३४५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | ७०० X१५ | - | ६५०.०० | ८५-१७०-२५५-३४५ |

**६) मे. हिमालया टायर सर्व्हिस औरंगाबाद**

अ) हॉट रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणाऱ्या बेलटची कंपनी : टीव्हीएस२मिडास

ब) कोल्ड रिमोल्डींगसाठी वापरण्यात येणाऱ्या बेलटीची कंपनी :

| **अ. क्र.** | **टायर साईज** | **कोल्ड रिट्रेडींगचे दर** | **हॉटरिटेडिंगचे दर** | **कट रिपेअर चे दर १" २" ३" ४"** |
|---|---|---|---|---|
| ०१. | ५.९०X१५ | ६५०.०० | ५७५.०० | १००-२००-३००-३७५ |
| ०२. | ५.६० X१३१५५० एसआर-१३ | ६५०.० | ५७५.०० | १००-२००-३००-३७५ |
| ०३. | ५६५ X१२ | ६००.०० | ५२५.०० | १००-२००-३००-३७५ |
| ०४. | १७५.७० एसआर-१३ | ७६०.०० | - | - - - - |
| ०५. | ४.५० X१२ | ६००.०० | ५२५.०० | १००-२००-३००-३७५ |
| ०६. | ६०० X१६ | ७७५.०० | ७००.०० | - - - - |
| ०७. | १९५ एसआर-१३ | ८७५.०० | - | - - - - |
| ०८. | एफ-७८ X१५ | ९७५.०० | - | - - - - |
| ०९. | ७.५० X१६ | १०५०.०० | ८७५.०० | १००-२००-३००-३७५ |
| १०. | ९०० X२० | १९००.०० | १४५०.०० | १००-२००-३००-३७५ |
| ११. | १००० X२० | २०५०.०० | १५५०.०० | १००-२००-३००-३७५ |
| १२. | ६०० X१६ | ७५०.०० | ७००.०० | १००-२००-३००-३७५ |
| १३. | १२ X ४X२८ | ३०००.०० | ३०००.०० | १००-२००-३००-३७५ |
| १४. | ७०० X१५ | ९००.०० | ७२५.०० | १००-२००-३००-३७५ |

प्राप्त निविदामध्ये खालील प्रकारच्या टायर साईजसाठी मे. भगवानदास इडस्ट्रीज औरंगाबाद यांचे दर कमी असुन ते खालील प्रमाणे ओहत.

| **अ. क्र.** | **टायर साईज** | **कोल्ड रिट्रेडींगचे दर** | **हॉटरिटेडिंगचे दर** | **कट रिपेअर चे दर १" २" ३" ४"** |
|---|---|---|---|---|
| ०१. | ५.९०X१५ | ५००.०० | ४००.०० | ९०-१७० - - |
| ०२. | ६.६० X१३/१५५० एसआर-१३ | ४५०.०० | ४००.०० | ९०-१७० - - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३. | ५.६५ X१२ | ४२५.०० | ४००.०० | ९०-१७० - - |
| ०४ | १७५.७ एसआर X१३ | ६००.०० | - | ९०-१७० - - |
| ०५. | ४.५० X१२ | ४२५.०० | ४००.०० | ९०-१७० - - |
| ०६. | १९३एसआर-१३ | ६००.०० | - | ९०-१७० २५० - |
| ०७. | ७.५० X१६ | ९५०.०० | ८००.०० | ९०-१७० २५० - |
| ०८. | ९.०० X२० | १४००.०० | १२५०.०० | ९०-१७० २५० ३५० |
| ०९. | एफ-७८ X१५ | ८५०.०० | - | ९०-१७० २५० - |
| १०. | १००० X२० | १५००.०० | १३५०.०० | ९०-१७० - - |

उर्वरीत खालील प्रकारच्या टायरसाईजसाठी रिट्रेडिंग करण्यासाठी मे. भगवानदास इंडस्ट्रीज औरंगाबाद २) मे. मारुती टायर्स औरंगाबाद ३) मे. नाथ कोल्ड रिट्रेडर्स औरंगाबाद यांचे दर सारखे असुन ते खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | टायर साईज | कोल्ड रिट्रेडींगचे दर | हॉटरिटेडिंगचे दर |
|---|---|---|---|
| ०१. | ६.०० X१६ | ७५०/- | ६००/- |
| ०२. | ६.००X१६ (टिटीएफ) | ७००/- | ६००/- |
| ०३. | १२ X ४X२८ | - | २६००/- |

वरील प्रमाणेच सारखे दर असल्यामुळे संबंधित एजन्सीजना लेखी पत्र देवुन आणखी दर कमी करण्या बाबत कळविले असता मे. भगवानदास इंडस्ट्रीज औरंगाबाद यांनी बीआय/एमएस ९८-९९/१७८/ दि. ८.९.९८ प्रमाणे लेखी पत्र देवुन दर कमी केले असुन ते खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | टायर साईज | कोल्ड रिट्रेडींगचे दर | हॉटरिटेडिंगचे दर | कट रिपेअर चे दर १" २" ३" ४" |
|---|---|---|---|---|
| ०१. | ६.०० X१६ | ७४०/- | ५९०/- | ९०-१७०-२५०- |
| ०२. | ६.००X१६ (टिटीएफ) | ६९०/- | ५९०/- | ९०-१७० - - |
| ०३. | १२ X ४X२८ | - | २५९०/- | ९०-१७०-२५०-३५० |

तसेच ७.०० X१५ या टायरसाईजसाठी हॉट रिमोल्डींग करीता मे. क्विक टायर्स सर्व्हिस औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असुन ते खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | टायर साईज | हॉटरिटेडिंगचे दर | कट रिपेअर चे दर १" २" ३" ४" |
|---|---|---|---|
| ०१. | ७.०० X१५ | ६५०/- | ८५-१७०-२५०-३४५ |

एकाच एजन्सीकडुन वार्षिक करार करुन घेणे योग्य असल्यामुळे मे. भगवानदास इंडस्ट्री. औरंगाबाद यांना विचारणा केली असता त्यांनी वरील प्रमाणेच्या ७.०० X१५ या टायरच्या हॉट रिमोल्डींगसाठी सर्वात कमी दरात काम करुन देण्यास तयार असुन तसे त्यांनी बीआय/एमसीए/९८-९९/दि. ०९.०९.९८ प्रमाणेच्या पत्राद्वारे लेखी कळविले आहे. अशा प्रकारे सर्व टायरसाईजसाठी मे. भगवानदास इंडस्ट्रीज औरंगाबाद यांचे दर कमी असल्यामुळे सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात एक वर्षासाठी वार्षिक करार करण्यास मंजुरी मिळावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध वाहनांसाठी लागणाऱ्या विविध आकाराचे टायर्स हॉट व कोल्ड या दोन्ही पध्दतीने रिट्रेडींग करुन घेण्याच्या कामाकरिता सन १९९८-९९ या वर्षासाठी वार्षिक करार करण्याकरिता मे. भगवानदास इंडस्ट्रिज औरंगाबाद यांचे अ. क्र. १ ते १० च्या साईजच्या टायर्सकरिता प्राप्त सर्वात कमी दरास तसेच उर्वरीत प्रकारच्या टायर साईजसाठी रिट्रेडींगचे दर एकाच एजन्सींकडुन वार्षिक करार करुन घेणे योग्य असल्यामुळे मे. भगवानदास इंडस्ट्रीज औरंगाबाद यांचे कडुन सर्व प्रकारच्या टायर साईजकरीता एक वर्षासाठी वार्षिक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५१/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विविध वाहनांसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात करार करण्यासाठी जा.क्र./मनपा/मुलेअ/३६/९८ दिनांक १४.०७.९८ प्रमाणे विविध वर्तमान पत्रात निविदा सुचना देवुन निविदा मागविल्या असता एकुण ७ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व ६ निविदा दरासह प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा मध्ये निविदा एजन्सीजने भरलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**१) मे. एनर्जी बॅटरी औरंगाबाद. (एनर्जी मेक बॅटरी)**

| अ.क्र. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| ०१. | ६ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | प्रतिनग | - | - |
| ०२. | १२ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | --//-- | - | - |
| ०३. | १२ व्होल्ट X ११ प्लेट | --//-- | २९७६.०० | १२ महिने |
| ०४. | १२ व्होल्ट X १३ प्लेट | --//-- | ३४३२.०० | --//-- |
| ०५. | १२ व्होल्ट X १५ प्लेट | --//-- | ३६४५.०० | --//-- |
| ०६. | १२ व्होल्ट X १७ प्लेट | --//-- | ४५६०.०० | --//-- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०७. | १२ व्होल्ट X १९ प्लेट | --//-- | ५०४०.०० | --//-- |
| ०८. | १२ व्होल्ट X २१ प्लेट | --//-- | ५४७०.०० | --//-- |
| ०९. | १२ व्होल्ट X २५ प्लेट | --//-- | ५७०४.०० | --//-- |

**२. मे. हेस्पा ॲक्यूम्यूलेटर्स ॲक्सेसरीलज ("सुरज" मेक बॅटरीज) ॲन्ड केमिकल्स औरंगाबाद**

| अ.क्र. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| ०१. | ६ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | प्रतिनग | ५६७.०० | १८ महिने |
| ०२. | १२ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | --//-- | ९४०.०० | --//-- |
| ०३. | १२ व्होल्ट X ११ प्लेट | --//-- | ३६१०.०० | --//-- |
| ०४. | १२ व्होल्ट X १३ प्लेट | --//-- | ४१५०.०० | --//-- |
| ०५. | १२ व्होल्ट X १५ प्लेट | --//-- | ४३९८.०० | --//-- |
| ०६. | १२ व्होल्ट X १७ प्लेट | --//-- | ४७५०.०० | --//-- |
| ०७. | १२ व्होल्ट X १९ प्लेट | --//-- | ५५००.०० | --//-- |
| ०८. | १२ व्होल्ट X २१ प्लेट | --//-- | ६७१४.०० | --//-- |
| ०९. | १२ व्होल्ट X २५ प्लेट | --//-- | ७४०८.०० | --//-- |

**३. मे. ए. के. ॲटो सर्व्हिस सेंटर औरंगाबाद (एकसाईड मेक बॅटरीज)**

| अ.क्र. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| ०१. | ६ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | प्रतिनग | ६७९.०० | १२ महिने |
| ०२. | १२ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | --//-- | ६३९.०० | ६ महिने |
| ०३. | १२ व्होल्ट X ११ प्लेट | --//-- | ४२५९.०० | १२ महिने |
| ०४. | १२ व्होल्ट X १३ प्लेट | --//-- | ४४३०.०० | १८ महिने |
| ०५. | १२ व्होल्ट X १५ प्लेट | --//-- | ५७४८.०० | १२ महिने |
| ०६. | १२ व्होल्ट X १७ प्लेट | --//-- | ६९६८.०० | १२ महिने |
| ०७. | १२ व्होल्ट X १९ प्लेट | --//-- | ७१७८.०० | १२ महिने |
| ०८. | १२ व्होल्ट X २१ प्लेट | --//-- | ४२७३.०० | १८ महिने |
| ०९. | १२ व्होल्ट X २५ प्लेट | --//-- | ८१५३.०० | १२ महिने |

**४. मे. शेख बॅटरी औरंगाबाद (शेक्ती मेक बॅटरी )**

| अ.क्र. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| ०१. | ६ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | प्रतिनग | - | - |
| ०२. | १२ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | --//-- | - | - |
| ०३. | १२ व्होल्ट X ११ प्लेट | --//-- | २१९५.०० | - |
| ०४. | १२ व्होल्ट X १३ प्लेट | --//-- | २२९०.०० | १३ महिने |
| ०५. | १२ व्होल्ट X १५ प्लेट | --//-- | २५००.०० | --//-- |
| ०६. | १२ व्होल्ट X १७ प्लेट | --//-- | २६७०.०० | --//-- |
| ०७. | १२ व्होल्ट X १९ प्लेट | --//-- | ३०४०.०० | --//-- |
| ०८. | १२ व्होल्ट X २१ प्लेट | --//-- | ३२१०.०० | --//-- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०९. | १२ व्होल्ट X २५ प्लेट | --//-- | ३६५०.०० | --//-- |

**५. मे. संदिप इंडस्ट्रीज औरंगाबाद (मास्कट, पेससेंटर)**

| अ.क्र. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| ०१. | ६ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | प्रतिनग | ४३१.०० (मास्कट) - (पेससिटर) | १ वर्षे |
| ०२. | १२ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | --//-- | ७६६.०० (मास्कट) -(पेससिटर) | --//-- |
| ०३. | १२ व्होल्ट X ११ प्लेट | --//-- | २२५३.०० (मास्कट) ३५४०.००(पेससिटर) | --//-- |
| ०४. | १२ व्होल्ट X १३ प्लेट | --//-- | २४५८ (मास्कट) ३७६२.०० (पेससिटर) | --//-- |
| ०५. | १२ व्होल्ट X १५ प्लेट | --//-- | २६५८.०० (मास्कट) ४५०५.०० (पेससेटर) | --//-- |
| ०६. | १२ व्होल्ट X १७ प्लेट | --//-- | २८६९.०० (मास्कट) ५१२६.०० (पेससेटर) | --//-- |
| ०७. | १२ व्होल्ट X १९ प्लेट | --//-- | ३२६९.०० (मास्कट) ५३५५.०० (पेससेटर) | --//-- |
| ०८. | १२ व्होल्ट X २१ प्लेट | --//-- | ३३६९.०० (मास्कट) ५८०६.०० (पेससेटर) | --//-- |
| ०९. | १२ व्होल्ट X २५ प्लेट | --//-- | ३५५२.०० (मास्कट) ६८६९.०० (पेससेटर) | --//-- |

**६. जे. जे. एजन्सीज औरंगाबाद**

| अ.क्र. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| ०१. | ६ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | प्रतिनग | ६७०.०० (एकसाईड) - | १ वर्षे |
| ०२. | १२ व्होल्ट X १४ ॲम्पीअर | --//-- | १५४१.०० (एकसाईड) - | --//-- |
| ०३. | १२ व्होल्ट X ११ प्लेट | --//-- | ३२४४.०० (एकसाईड) पीपी ३९५४.०० (-//-) ब्लॅक | --//-- |
| ०४. | १२ व्होल्ट X १३ प्लेट | --//-- | ४०९६.०० (-/-) पीपी -/- ४१८४.०० (-/-) ब्लॅक | --//-- |
| ०५. | १२ व्होल्ट X १५ प्लेट | --//-- | ३३७०.०० (-/-) पीपी ५१५०.०० (-/-) ब्लॅक | --//-- |
| ०६. | १२ व्होल्ट X १७ प्लेट | --//-- | ५०९४.०० (-/-) पीपी ६०८९.०० (-/-) ब्लॅक | --//-- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०७. | १२ व्होल्ट X १९ प्लेट | --//-- | ५८४०.०० (-/-) पीपी ६७३०.०० (-/-) ब्लॅक | --//-- |
| ०८. | १२ व्होल्ट X २१ प्लेट | --//-- | ७४७५.०० (-/-) पीपी | --//-- |
| ०९. | १२ व्होल्ट X २५ प्लेट | --//-- | ७८५०.०० (-/-) ब्लॅक | --//-- |

एनर्जी बॅटरी, शक्ती बॅटरी, मॉस्कट बॅटरी, या बॅटरीजचे दर कमी आहेत. परंतु या प्रकारच्या बॅटरीज वापरण्याचा आपणांस अनुभव नाही. शिवाय त्यांची वॉरंटी फक्त १२ महिन्याची आहे. त्यामुळे एकसाईड व सुरज या दोन कंपन्यांच्या बॅटरीज गॅरंटी १८ महिने आहे व एकसाईडची १२ आहे व या दोन्ही चांगल्या प्रतीच्या बॅटरीज आहेत व त्यांची सर्व्हिसपण चांगली आहे. गतवर्षी पण "सूरज" कंपनीच्या बॅटरीजचे टेंडर मंजूर झाले होते. त्यांची सर्व्हिस व बॅटरीची क्वालिटी चांगली आहे. त्यामुळे दर जास्त असले तरी चालेल परंतु प्रतीच्या बॅटरी खरेदी केल्यास वाहन चांगल्याप्रकारे चालते त्यांची ॲटो इलेक्ट्रीक सिस्टीम चांगल्या प्रकारे काम करते हे तांत्रिकदृष्टया विचार खालील दर्शविल्याप्रमाणे विविध प्रकारच्या बॅटरीजसाठी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात वार्षिक करार करण्यांस मंजूरी मिळावी.

**अ) मेव्हेस्पा ॲक्युम्युलेटर्स,**

याचें "सुरज" कंपनीच्या बॅटरीसाठीचे दर खालील ६ प्रकारच्या बॅटरीजसाठी कमी असुन ते खालील नमुद केल्याप्रमाणे आहेत. सन १९९७-९८ मध्ये या बॅटरीजसाठी वार्षिक करार केला होता व या बॅटरीजचा अनुभव चांगला आहे. सर्व्हिस पण चांगली आहे.

| अ. क्र. | बॅटरीचा प्रकार | किमंत | गॅरंटी |
|---|---|---|---|
| १. | ६ व्होल्ट १४ ॲम्पीअर | ५६७.०० | १८ महिने |
| २. | १२ व्होल्ट १४ ॲम्पीअर | ९४०.०० | --//-- |
| ३. | १२ व्होल्ट १७ प्लेट | ४७५०.०० | --//-- |
| ४. | १२ व्होल्ट १९ प्लेट | ५५००.०० | --//-- |
| ५. | १२ व्होल्ट २१ प्लेट | ६७१४.०० | --//-- |
| ६. | १२ व्होल्ट २५ प्लेट | ७४०८.०० | --//-- |

**ब) मे. जे. जे. एजन्सीज औरंगाबाद.**

हे एस. एफ एकसाईड बॅटरीजचे अधिकृत विक्रेते आहेत त्यांचे दर खालील प्रमाणे. ३ प्रकारच्या बॅटरीजसाठी कमी आहेत.

| अ. क्र. | बॅटरीचा प्रकार | किमंत | गॅरंटी |
|---|---|---|---|
| १. | १२ व्होल्ट ११ प्लेट | ३२४४/- | १२ महिने |
| २. | १२ व्होल्ट १३ प्लेट | ४०९६/- (बंद बॅटरी पीपी) | --//-- |
| ३. | १२ व्होल्ट १५ प्लेट | ३३७०/- (बंद बॅटरी पीपी ) | --//-- |

तरी वरील प्रमाणे एकसाईड व सुरज कंपनीच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी व सन १९९८-९९ या वर्षात एक वर्षासाठी करार करण्यासाठी स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध वाहनांसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी बॅटरीज वापरण्याचा अनुभव व वॉरंटी याचा विचार करता "सुरज" कंपनीच्या बॅटरीजकरीता मे. व्हेस्पा ॲक्युम्युलेर्टस ॲक्सेसरीज ॲन्ड केमिकल्स, औरंगाबाद यांचे नांवासमोरी अ. क्र. १ ते ६ च्या बॅटरीजचे दरास तसेच "एक्साईड" बॅटरीजकरीता मे. जे. जे. एजन्सीज, औरंगाबाद यांचे नावांसमोर अ. क्र. १ ते३ च्या बॅटरीजकरीता सन १९९८-९९ या वर्षात एक वर्षासाठी खरेदी करार करण्यास व त्यांनी दिलेल्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५२/१३**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. -१ अंतर्गत वार्ड क्र. "क" येथे हजेरी सेंटर बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त यांनी दि. २६.१०.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा दहावा वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानातून ५०% व विकास इमारती शाळा, दवाखाने या लेखाशिर्षातुन ५०% असा करण्यात येईल तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १,५०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. १ अंतर्गत वाड क्र. "क" येथे हजेरी सेंटर बांधण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५३/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी येथील कब्रस्तान विकसीत करणेबाबतचे अंदाजपत्रक सन ९७-९८ चे जिल्हा दर सुचीनुसार रक्कम रु. ४,९३,५३०/- चे तयार करण्यांत आले असुन सदर काम हे १० वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानापैकी प्राप्त रक्कमेतुन ५०% व ५०% महानगरपालिका फंडातून तीन नविन उद्याने या लेखा शिर्षातुन प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकिय मान्यता घेण्यात आली आहे. सबब वरील प्रस्ताव स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील कब्रस्तान विकसीत करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ४,९३,५३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५४/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. २ अंतर्गत वार्ड "क" सार्वजनिक शौचालय जनता बाजार येथे हजेरी सेंटर बांधण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. ३०.१०.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा दहाव्या वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानातून ५०% व विकास इमारती शाळा-दवाखाने या लेखाशिर्षातुन ५०% असा करण्यांत येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. १,५०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. २ अंतर्गत वार्ड "क" सार्वजनिक शौचालय जनता बाजार येथे हजेरी सेंटर बांधण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५५/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. २ अंतर्गत वार्ड क्र. "ब" भाजी मंडई परिसरात हजेरी सेंटर बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसुची र. रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २६.१०.९८ ला मान्यता दिलली आहे.

सदरील कामाचा खर्च हा दहाव्या वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानातुन ५०% व विकास इमारती शाळा-दवाखाने या लेखाशिर्षकातुन ५०% असा करण्यांत येईल. करिता अंदाजपत्रक र. रु. १,५०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. २ अंतर्गत वार्ड "ब" भाजी मंडई परिसरात हजेरी सेंटर बांधण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५६/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. ३ अंतर्गत वार्ड "क" गुलशन महल येथील पंचायत समितीसमोर दर्गाच्या बाजुला सर्कलमध्ये हजेरी सेंटर बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २६.१०.९८ ला मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च दहाव्या वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानातुन ५०% व विकास इमारती-शाळा दवाखाने या लेखाशिषातुन ५०% असा करण्यांत येईल.
तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र. रु. १,५०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ३ अंतर्गत वार्ड "क" गुलशन महल येथील पंचायत समितीसमोर दर्गाच्या बाजूला सर्कलमध्ये हजेरी सेंटर बांधण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५७/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. ३ अंतर्गत वार्ड "अ" मोतीकारंजा ते अभिनयच्या मेन रोडवर महानगरपालिकेच्या शाळेच्या कंपौडमध्ये नाल्यालगत पूर्व बाजूस हजेरी सेंटर बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हा दरसुची सन ९७-९८ नुसार र. रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २६.१०.९८ ला मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा दहाव्या वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानातुन ५०% व विकास इमारती शाळा-दवाखाने या लेखाशिर्षातून ५०% असा करण्यांत येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. १,५०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ३ अंतर्गत वार्ड "अ" मोतीकारंजा ते अभिनयच्या मेन रोडवर महानगरपालिकेच्या शाळेच्या कंपोडमध्ये नाल्यालगत पुर्व बाजुस हजेरी सेंटर बांधण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५८/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. ६ अंतर्गत पद्मपुरा शास्त्रीचौक सिग्नलजवळ हजेरी सेंटर बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २६.१०.९८ ला मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा दहाव्या वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानातुन ५०% व विकास इमारती शाळा दवाखाने या लेखा शिर्षातुन ५० % असा करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ६ अंतर्गत पद्मपुरा शास्त्रीचौक सिग्नलजवळ हजेरी सेंटर बांधण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५९/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. ६ अंतर्गत ओपन स्पेसमध्ये हजेरी सेंटर बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त महोदयांनी दि. २६.१०.९८ अन्वये मान्यता दिलेले आहे. सदरील कामाचा खर्च हा दहाव्या वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानातुन ५०% व विकास इमारती-शाळा दवाखाने या लेखा शिर्षातुन ५०% असा करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ६ अंतर्गत ओपन स्पेसमध्ये हजेरी सेंटर बांधण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६०/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वि. क्र. ५ अंतर्गत हजेरी सेंटर बांधण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २६.१०.९८ ला मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा दहाव्या वित्त आयोगाकडुन प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन ५०% व विकास इमारती शाळा-दवाखाने या लेखाशिर्षातून ५०% असा करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ५ अंतर्गत हजेरी सेंटर बांधण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. ४ अंतर्गत गारखेडा पोलीस स्टेशनजवळ हजेरी सेंटर बांधण्याकरता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. १,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २६.१०.९८ ला मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा दहाव्या वित्त आयोगाकडुन प्राप्त अनुदानातुन ५०% व विकास इमारती शाळा-दवाखाने या लेखा शिर्षातुन ५०% असा करण्यात येईल. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ४ अंतर्गत गारखेडा पोलीस स्टेशनजवळ हजेरी सेंटर बांधण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६२/२३ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर केला की, मो. बायजीपुरा इंदिरानगर येथील महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधण्याचे कामाकरिता रक्कम रु. ८,२४,९१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले त्यास मा. आयुक्तांनी दि. २२.१२.९७ अन्वये मान्यता दिली होती. सदरील कामाचे अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १३

निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. उपरोक्त ३ निविदाधारकांपैकी निविदेसोबत आवश्यक असणारी अनामत रक्कम भरलेली होती.

करिता उपरोक्त तिन्ही निविदाधारकांना मा. आयुक्त महोदय यांचे दि. ३०.७.९७ च्या आदेशान्वये चर्चेस बोलावण्यांत आले दि. ७.८.९७ रोजी मा. आयुक्त महोदय यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार तिन्ही निविदा रद्द करुन फेरनिविदा काढणे बाबत मा. आयुक्तांनी दि. २०.८.९७ रोजी आदेशित केले होते.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना क्र. जा. क्र. मनपा/लेखा/नि/६१/९७ दि. २३.९.९७ अन्वये फेरनिविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा विक्री झाल्या परंतु स्किकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकही निविदा दर भरुन प्राप्त झाली नाही. करिता मा. आयुक्त महोदय यांनी दि. २०.११.९७ रोजी फेरनिविदा काढणेस्तव आदेशित केले.

सदरील कामास्तव सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार सुधारित अंदाजपत्रक र. रु. ८,६२,०००/- चे तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २०.३.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने ठराव क्र. ५४९/१९ दि. २६.३.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र. मनपा/लेखा/नि/३७/९८ दि. २८.७.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १७ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. १८.८.९८ उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १) | मे. हायवे कंन्सट्रक्शन | ३.२४% जास्त |
| २) | ए. एम. फारुकी | १०.६% जास्त |
| ३) | न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन | ८.१६% जास्त |

तुलनात्मक सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रक दरापेक्षा ३.२४% जास्त दराची मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झालेली होती. त्यास मा. आयुक्तांनी दि. १९.९.९८ रोजी अंदाजपत्रपक दरापेक्षा ५% कमी दराने मान्यता दिलेली होती. त्यानुसार संबंधित गुत्तेदाराकडुन मंजुर दरानुसार म्हणजेच दरापेक्षा ५% कमी दराने काम करणे बाबत लेखी संम्मती मागीतली असता गुत्तेदाराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने काम करण्यास परवडत नाही. त्याचे निविदेच्या दराबाबत फेरविचार करण्यांत यावा. अशी विनंती केली असता दि. १३.१०.९८ रोजी मा. आयुक्त महोदय यांनी ७ दिवसांची अल्प निविदा करुन फेर दर मागवावे असे आदेशित केलेले होते. परंतु उपरोक्त कामासाठी आतापर्यंत तीन वेळेस निविदा मागविल्या असल्या कारणाने मा. आयुक्त महोदय यांनी दि. २०.१०.९८ चौथ्यांदा निविदा नको. अंदाजपत्रकीय दराने मान्यतेस्तव स्थायी समितीसमोर सादर करणेस्तव सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा इंदिरानगर येथील महानगरपालिका प्राथमिक शाळेवर पहिला मजला बांधण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १२ फुलेनगर आंबेडकर नगर येथे मंगल कार्यालय बांधण्याचे कामासाठी र. रु. १०,००,०००/- चे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असता मा. आयुक्तांनी २६.१०.९८ अन्वये मान्यता दिली असुन मा. स्थायी समितीने ठराव क्र. ५६१/३० दिनांक २६.३.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी जा. क्र. मनपा/लेख/नि/९७/९८ दि. २२.७.९८ अन्वये निविदा मागविल्या असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १० निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. १८.८.९८ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १) | सफवान कंन्स्ट्रक्शन | ४.९५% जास्त दराने |
| २) | कुलवंतसिंग | ९.९% जास्त दराने |

तुलनात्मक सर्वात कमी व अंदाजपत्रकिय दरापेक्षा ४.९५% जास्त दराची मे. सफवान कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झालेली आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकिय दराने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सफवान कंन्स्ट्रक्शन यांची ४.९५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकिय दराने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सफवान कंन्स्ट्रक्शन यांची ४.९५% जास्त दराऐवजी मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १२ फुलेनगर आंबेडकरनगर येथे मंगल कार्यालय बांधण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. सफवान कंन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९५% जास्त दराऐवजी अंदाज पत्रकिय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६४/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा येथे फरशी व खांडकी बसविणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ६,१२,०००/- तयार करण्यांत आले असुन सदरील खर्च १९९८-९९ च्या भांडवली रस्ते (खांडकी) या लेखाशिर्षकातुन करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा येथे फरशी व खांडकी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. ६,१२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६५/२६ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, नारळीबाग मुख्य रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. २,३६,७९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सदरील खर्च "नविन सोडीयम व्हेपर बसविणे " या लेखा शिर्षाखाली करण्यांत येईल. करिता रक्कम रुपये २,३६,७९५/- चे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारळीबाग मुख्य रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. २,३६,७९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६६/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात २५ के. व्ही. जे. क्षमतेचा जनरेटर सेट बसविण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९७-९८च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २,५६,८६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयासाठी ठेवण्यांत आलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी रक्कम रु. २,५६,८६७/- चे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात २५ के.व्ही. अे. क्षमतेचा जनरेटर सेट बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. २,५६,८६७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६७/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानुरा येथे रुंद करण्याकरिता खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,२१,७००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरील खर्च सन १९९७-९८ च्या भांडवली रस्ते (खडीरस्ते) मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन प्रस्तावित केले आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा येथे खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ३,२१,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६८/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, चंपा मस्जिद चौक ते गुलशन महल रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. २,३८,२३०/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान " सन १९९६-९७ च्या चार कोटी अनुदानातुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चंपा मस्जिद चौक ते गुलशन महल रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. २,३८,२३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६९/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरात विविध चौकात वाहतुन नियंत्रीत करण्यासाठी बसविण्यांत आलेल्या स्वयंचलित वाहतुन संकेताकांची देखभाल व दुरुस्तीचा वार्षिक करार करण्यासाठी र. रु. २,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

मागील वर्षी मे. न्युकलीऑनिक्स, पुणे यांच्याशी एकुण वीस चौकातील वाहतुन संकेताकांकचा देखभाल व दुरुस्ती वार्षिक करार प्रतिचौक रु. १२,०००/- या दराने करण्यांत आला होता, त्या वर्षात मे. न्यकलीऑनिक्स यांनी वाहतुक संकेतांकाची देखभाल व दुरुस्ती करण्याची तयारी दर्शविलेली आहे,

तरी मे. न्युकलीऑनिक्स पुणे यांचा मागील तीन वर्षाचा अनुभव पाहता यावर्षीची वार्षिक देखभाल व दुरुस्तीचा त्यांच्याकडुन मागील वर्षाच्याच दराने म्हणजेच रक्कम रु. १२,०००/- प्रतिचौक या दराने एकुण विस चौकासाठी र. रु. २,४०,०००/- मध्ये करुन घेण्याचे मंजुरीस्तव प्रस्तवा सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध चौकात वाहतुन नियंत्रीत करण्यासाठी बसविण्यांत आलेल्या स्वयंचलित वाहतुक संकेतांकाची देखभाल व दुरुस्तीकरिता वार्षिक करार करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. २,४०,०००/- ला तसेच सदरील काम प्रति चौक रु. १२,०००/- या पूर्वीच्या मान्य दराने मे. न्युकलीऑनिक्स, पुणे यांचेकडुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७०/३१ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. इंदिरानगर स्लम वार्ड-२४ मध्ये खांडकी दुरुस्त करणे व सिमेंट कॉंक्रट रोड तयार करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुची नुसार रु. २,३३,०००/- चे

अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "देखभाल व दुरुस्ती" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरचा अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २०.११.९८ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रु. २,३३,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दशर्विल्याप्रमाणे मो. इंदिरानगर स्लम वार्ड क्र. २४ मध्ये खांडकी दुरुस्त करणे व सिमेंट करण्यांत आलेल्या र. रु. २,३३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७१/३२ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्तावात सादर केला की, प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रुपये ५,६८,९००/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली. त्याला मा. आयुक्तांनी दि. २५.७.९८ रोजी प्रशासकिय मान्यता प्रधान केली तसेच दिनांक ३०.०७.९८ रोजी संपन्न झालेली स्थायी समितीची विषय क्र. १४४/१८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता कोऱ्या निविदा अंतिम तारखे पर्यंत एकुण (१२) बारा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी फक्त (५) पाच मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. ३१.१०.९८ रोजी उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. के. बी. पाथ्रीकर | अंदाजपत्रकिय दरापेक्षा | ०.५१ % कमी |
| २) श्री. डी. अजितसिंग | --//-- | ७.७०% जास्त |
| ३) श्री. रे कन्स्ट्रक्शन | --//-- | ९.००% जास्त |
| ४) श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | --//-- | ११.००% जास्त |
| ५) श्री. मो. अहमद सिद्दीकी | --//-- | २३.००% जास्त |

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५१% कमी दराची निविदा श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा आहे. करीता श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाज पत्रकिय दरपेक्षा ०.५१% कमी दराची श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारोस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७२/३३ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, लायन्स क्लब मुकूंदवाडी येथे १/२ गोलाकार गटार बांधणे व जून्या गटारीची दुरुस्ती करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ४,६४,०३६/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९६-९७ अनुसार तयार करण्यांत आली असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २६.०६.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली तसेच स्थायी समितीचा विषय क्र. १२३/९८ दि. ३०.०७.९८ मिळाल्या नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १४.०९.९८ पर्यंत एकुण (२५) पंचविस कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी २८.०९.९८ ला फक्त (१०) दहा मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि. ३१.१०.९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघउण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. एस. बी. चव्हाण | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | ४२% कमी |
| २) | श्री. बी. आर. आंनद | --//-- | ३५.९९ % कमी |
| ३) | श्री. परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | --//-- | ३४.९९ % कमी |
| ४) | श्री. आनंद बिल्र्डस | --//-- | ३४.०३ % कमी |
| ५) | श्री. न्यु स्टार कंन्सट्रक्शन | --//-- | ३३.७६ % कमी |
| ६) | श्री. बबन हिवाळे | --//-- | ३२.५६ % कमी |
| ७) | श्री. डी. के. कंन्स्ट्रक्शन | --//-- | २८.५० % कमी |
| ८) | श्री. एस. बी. डेहाडे | --//-- | २७.०० % कमी |
| ९) | श्री. स. सईदउल्ला हुसोनि | --//-- | २४.०० % कमी |
| १०) | श्री. सचिन संचेती | --//-- | ७.०१ % कमी |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकिय दरापेक्षा ४२% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** ४२% कमी दराची निविदा मंजुर केल्यास त्या कामाची क्वॉलिटी बरोबर राही काय ?

**मा. सभापती :** संबंधित गुत्तेदार ४२% कमी दराचे अंदाजपत्रक आलेले आहे तेव्हा कामाची क्वॉलिटी व्यवस्थीत राहिल काय ? याची गॅरंटी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी घ्यावी तरच मंजुरी देता येईल. याबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार होता कामा नये.

**कार्य. अभियंता (स्लम) :** सदरील काम करुन घेता येईल परंतु त्यासाठी कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** स्पेशल स्टाफ देवुन देखरेख करता येईल.

**मा. सभापती :** ठाणे महानगरपालिकेत ४५% कमी दराचे निविदा प्राप्त झाल्या होत्या व पुन्हा रिकॉल करुन मागविल्या असता ५% जादा दराचे प्राप्त झाले याबाबत चौकशी झाली यामध्ये संबंधीत सभापती व अधिकारी यांचेकडुन पैसे वसुल करण्याचे निर्णय झाला होता तसे होऊ नये याची खबरदारी घ्यावी. त्यापेक्षा काम व्यवस्थित होईल काय याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी. त्या ठिकाणी कनिष्ठ अभियंता कामाची पाहणी करण्याकरिता ठेवावे व संबंधीत गुत्तेदारास क्वॉलिटी देणे बाबत सक्त ताकिद देण्यांत यावी. व

प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो. त्याचप्रमाणे ४२%, ४५% कमी दराने काम करणारे गुत्तेदाराबाबत सर्वसाधारण सभेमध्ये त्यांच्यावर देखरेख ठेवणेसाठी कामे चांगले होतात काय यासाठी पाच-सहा स.स. ची समिती नेमावी व त्यावर कार्यकारी अभियंता हे नियंत्रण ठेवतील.

**श्री. स. अली मिरा सलामी :** कल्याण डोबिंवली, नवि मुंबई महानगरपालिकेने असा निर्णय घेतलेला आहे की. १५% कमी दराचे असल्यासच मंजुरी द्यावी असे आहे. त्याप्रमाणे या महानगरपालिकेतही अशाच प्रकारे निर्णय घ्यावा व जे गुत्तेदार याबाबत ऐकत नसतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** कल्याण डोबिंवली महानगरपालिकेमध्ये जसे १५% कमी दराचे निविदा भरणाऱ्या गुत्तेदारासच मंजुरी द्यावी. असा निर्णय महानगरपालिकेने द्यावा याबाबत मा. आयुक्त मुख्य लेखाधिकारी यांनी चर्चा करुन निर्णय घेणे बाबत सर्वसाधारण सभेत ठेवावा. तोपर्यंत सदरील विषय क्र. ३३ मंजुर करण्यांत येतो.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** ऐन वेळच्या प्रस्तावात माझ्या वार्डातील एकही प्रस्ताव नाही. त्यामुळे मी निषेध करुन सभात्याग करतो.
(स.स. श्री. स. अ. एकबालोद्दीन सभागृहाबाहेर जातात.)

**मा. सभापती :** मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लायन्स कल्ब मुकूंदवाडी येथे अर्ध गोलाकारगटार बांधणे व जुन्या गटारीची दुरुस्ती करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्तमक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ४२% कमी दराची श्री. एस. बी. चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७३/३४ :**

कार्यकारी अभियंता सल्म यांनी दुरुस्ती प्रस्ताव सादर केला आहे की, नक्षत्रवाडी गांव येथे अर्ध गोलाकार गटार बांधणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ३,५२,०००/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दर सुचि १९९६-९७ नुसार तयार करण्यांत आली होती. त्यास मा. आयुक्तांनी दि. ११.११.९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली व नियमानुसार निविदा मागविण्यांत आल्या व प्राप्त निविदापैकी श्री. सुखविरसिंग यांची निविदा सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकिय दरापेक्षा २८.५% कमीची असल्याने स्थायी समितीत मंजुरीसाठी ठेवण्यांत आल्याचा प्रस्ताव क्रं. ३८/१७ दिनांक १०.०६.९८ अन्वये मंजुरी मिळाली व श्री. सुखविरसिंग यांना सदर कामाचे कार्यदेश क्रं. मनपा/स्लम/३३१/९८ दि. ३०.०६.९८ ला देण्यांत आला. सदर काम सुरु करतांना असे आढळलेली अस्तीत्वात असलेल्या व रस्त्याच्या सेंटर पासुन ४० फुट लांबीवर असलेल्या कच्चा नालीमध्ये प्रस्तावात प्रस्तावित केल्याप्रमाणे काम सुरु केले असता सार्वजनिक बांधकाम विभाग यांची उपअभियता यांनी सदर नालीचे बांधकाम ४० फुट अंतरावर बांधण्यास हरकत घेतली व सदर गटाराचे काम रोडच्या सेंटर पासुन ५० फुट अंतर सोडुन करण्यांत यावे असे सुचविले. सदर काम ५० फुट अंतरावर करण्याकरिता त्या ठिकाणी उतार मिळविणे व आवश्यक असलेली गटारची बेड लेव्हल व ग्राऊंड लेव्हल मध्ये साधारण ३ फुट ते ५ फुट इतकी उंची गटाराची दगडी बांधकाम करणे जरुरी आहे. करिता रस्त्याच्या सेंटर ५० फुट अंतरावर गटार बांधणे व त्यावर स्लॅब टाकणे जरुरी असल्या कारणाने सुधारित अंदाजपत्रक रु. ४,१७,४५०/- (व

अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक रु. ५२,२००/- अंदाजपत्रक दराने करुन घेणे) असे एकुण ४,६९,६५०/- तयार करण्यांत आले व सदर काम गुत्तेदार श्री. सुखबिरसिंग यांचे निविदाचे दर २८.५०% अंदाजपत्रक दरापेक्षा कमी असल्याने सदर काम गुत्तेदार श्री. सुखबीरसिंग यांचेकडुन करुन घेणे व तसेच सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,६९,६५०/- ला मान्यता देणे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी गांव येथे अर्धगोलाकार गटार बांधण्याच्या कामामध्ये ४० फुट अंतराऐवजी रोडच्या सेंटरपासुन ५० फुट अंतर सोडुन काम करण्यामुळे कामात बदल झाल्याने बेड लेव्हल व ग्राऊंड लेव्हलमध्ये दगडी गटारीचे बांधकामामुळे या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक (र. रु. ४,१७,४५०+५२,२००/-) एकुण र. रु. ४,६९,६५०/- ला तसेच सदरील वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार श्री. सुखबीरसिंग यांचेकडुन मंजुर निविदा दर म्हणजेच अंदाजपत्रक दरापेक्षा २८.५०%कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७४/३५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विविध प्रकारच्या इलेक्ट्रीक मोटार रिवायडींगच्या कामासाठी या वर्षात अंदाज ३.०० लाख खर्च येईल वर्ष १९९८-९९ या आर्थिक वर्षात मोटार रिवायडींग कामासाठी व वार्षिक करार करण्यासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता एकुण सहा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या आहेत एकुण ४९ प्रकारच्या मोटार रिवायडींगच्या कामासाठी आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. काकडे इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअरींग वर्कस औरंगाबाद | - | सर्व ४९ ॲटमचे दर कमी आहेत |
| २) | मे. चेतन इंटरप्रायजेस औरंगाबाद | - | सर्व ॲटमध्ये दर अधिक दराने आहे. |
| ३) | मे. रवि इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद | - | ॲटम क्र. अ (२) ब (५,७) चे दर कमी आहे. |
| ४) | मे. लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद | - | ॲटम क्र. ब(१,४,९,१३), ई (४,६) फ (ब) चे दर कमी आहेत. |

तुलनात्मक दृष्टया मे. काकडे इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअरिंग वर्क्स औरंगाबाद यांचे मोटार रिवायडींग साठी सर्व ॲटमचे दर कमी आहे. तरी मे. काकडे इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअरींग वर्क्स औरंगाबाद यांची कमी दराची निविदा स्विकृतीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध प्रकारच्या इलेक्ट्रीक मोटार रिवायडींगच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची मे. काकडे इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इंजिनिअरींग वर्क्स औरंगाबाद याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७५/३६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोतीकांरजा, जाफरगेट येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक

रक्कम रु. ९,४४,०००/- ला स्थायी समितीने दि. १०.०७.९८ च्या सभेमध्ये ठराव क्र. ५९/१७ ने मंजुरी मिळालेली होती. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण १९ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी ७ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तूलनात्मक तपशील खालीलप्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | मो. सोहेल सिद्दीकी | - | ४०.९२% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| २) | श्री. शेख शरीफ | - | ३६% | --//-- |
| ३) | श्री. मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | - | ३५.५५% | --//-- |
| ४) | श्री. राणा कन्स्ट्रक्शन | - | ३२% | --//-- |
| ५) | श्री. नंदकुमार घोडले | - | ३०% | --//-- |
| ६) | श्री. कुलवंतसिंग | - | ३०.८६% | --//-- |
| ७) | श्री. एस. ए. नवाब | - | ३.३% | जास्तीच्या दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकिय दरापेक्षा ४०.९२% कमी दराची निविदा मो. सोहेल सिद्दीकी यांची आहे. कामाच्या दर्जा बाबत विशेष दक्षता घेण्यात येईल. सदरील निविदेस मा. आयुक्तांनी दि. ०७.११.९८ ला मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा जाफरगेट येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणे्च्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०.९२% कमी दराची मो. सोहेल सिद्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७६/३७ :**

मुख्यलेखा अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका ह्द्दीत ठिकठिकाणी आरसीसी कचरा कुंडया देणे आहे. त्यास्तव वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करण्यांत आल्या, एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाधारकांनी भरलेले दरानुसार तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आरसीसी कचराकुंडी | ७००एमएम | - रु ८९०.०० |
| २) | --//-- | ८०० एमएम | - रु. ९९०/- |

वरीलप्रमाणे सर्वात कमी आलेले दर मे. एम.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांचे आहेत. संबंधितानी नमुने देखील जमा केलेले आहे. एकुण कचराकुंडया खालीलप्रमाणे खरेदी करणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) ७०० एमएम - १५० नग | -८९०/- | रु. १,३३,५००/- |
| २) ८००एमएम - २०० नग | -९९०/- | रु. १,९८,०००/- |
| | | ----------------------- |
| | **एकुण :** | **रु. ३,३१,५००/-** |

वरीलप्रमाणे एकुण खर्च रु. ३,३१,५००/- चे येणाऱ्या खर्च प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीत ठिकठिकाणी आर.सी.सी. कचरा कुंडया ठेवण्याकरीता कचराकुंडया खरेदीस्तव मागविण्यात आलेल्या निविदा नुसार प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराची मे. एम.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांची खालील दराची निविदा स्विकारणेस तसेच सदरील कामाकरीता येणाऱ्या एकुण र. रु. ३,३१,५००/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) ७००एमएम (कचराकुंडी) -प्रति नग रु. ८९०/-
२) ८०० एमएम (कचराकुंडी) -प्रति नग रु. ९९०/-

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७७/३८ :**

मुख्यलेखा अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका कार्यालयातील कायमस्वरुपी सर्व चतुर्थश्रेणी स्त्री कामगार तसेच आरोग्य केंद्रातील पारिचारीका/नर्सेस यांना मकर संक्रातीपुर्वी दरवर्षीप्रमाणे गणवेषाचे अनुषंगाने साडी/शर्टसलवार ओढणी कापड तसेच ब्लाऊज पिसेसचे वाटप करणे आहे. करिता वर्तमानपत्रात निविदा प्रसिद्ध करण्यांत येवुन निविदा दरपत्रके मागविण्यात आली एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त निविदा व नमुन्याच्या अनुषंगाने साडया शर्टसलवार पसंतीसाठी विभागीय कार्यालयातील स्त्री कामगारांनी तसेच कामगार नेत्यांना उपआयुक्त (म.) यांचे दालनात बोलविण्यांत आले. पसंत साहित्यावर संबंधिताच्या स्वाक्षऱ्या घेण्सयात आल्या पसंत साहित्याचे प्राप्त दरात वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांनी मे. अरमान यांचे प्रतिनिधीस बोलावुन खालीलप्रमाणे दर अंतिम केलेले आहेत.

१) मनिषासाठी रु. ४५५/- प्रतिनग ऐवजी रु. ४३५ प्रतिनग
२) रिंकुसाठी रु. ३८८/- प्रतिनग ऐवजी रु. ३७५/- प्रतिनग
३) प्रियंका ब्लॉऊज पिससाठी रु. २४/- ऐवजी रु. २०/- प्रतिनग
४) शर्ट सलवार ७ मी. प्रत्येकी रु. ३६०/- ऐवजी रु. ३५०/- प्रतिनग
५) ओढणी कापड२.५ मी. प्रत्येकी रु. ७४/- ऐवजी ७०/-

वरील प्रमाणे साडयासाठी प्राप्त दर ८ मीटर (मनिषा व रिंकु साडीसाठी ) व ५ मिटर साडीचे रिंकुचे दर असल्याने प्रतिमिटरचे दर काढुन खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेले आहे. एकुण खर्च खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | साडी ८ मिटर रंगीत मनिषा | ३४७ नग | रु. ४३५/- | = १,५०,९४५/- |
| २) | साडी ८ मिटर रंगीत रिंकु | ३४७ नग | रु. ३७५/- | = १,३०,१२५/- |
| ३) | साडी रंगीत ५ मिटर रिंकु | ३५ नग | रु. २९७/- | = १०,३९५/- |
| ४) | साडी रंगीत ५ मिटर मनिषा | ३५ गन | रु. २७२/- | = ९,५२०/- |
| ५) | साडी ८ मिटर पांढरा मनिषा | ७० नग | रु. ४३५/- | = ३०,४५०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६) | साडी ५ मिटर पांढरा मनिषा | १४० गन | रु. २७२/- | = ३८,०८०/- |
| ७) | साडी मनिषा ५ मिटर पांढरा पुर्ण प्लेन | ६० नग | रु. २७२/- | = १६,३२०/- |
| ८) | ब्लॉऊज मिसेस ८० सेमी प्रत्येकी रंगीत व पांढरे | १०३४ नग | रु.२०/- | = २०,६८०/- |
| ९) | शर्ट सलवार कापड (७मी) मार्बल पॉलिस्टर | १४६ नग | रु.३५०/- | = ५१,१००/- |
| १०) | ओढणी कापड (२.५ मीटर) | १४६ नग | रु.७०/- | = १०,२२०/- |
| | | | **एकुण खर्च रु.** | **४,६७,८३५/-** |

वरीलप्रमाणे एकुण खर्च रु. ४,६७,८३५/- च्या खर्चास तसेच संबंधितांनी पसंत केलेले साहित्य तसेच डिझाईन व रंग खरेदीस जे की पसंत केलेल्या साडयांचे रंग व डिझाईन तसेच पांढरी साडीमध्ये मनिषा साडी तसेच शर्ट सलवार मध्ये दोन रंगात साहित्य देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका कार्यालयातील कायमस्वरुपी सर्व चतुर्थश्रेणी स्त्री कामगार तसेच आरोग्य केंद्रातील पारिचारीका/नर्सेस/ यांना मकर संक्रांतीपुर्वी दरवर्षी गणवेश वाटपाचे अनुषंगाने साडी/शर्टसलवार, ओढणी कापड तसेच ब्लॉऊज पिसेसचे वाटप करण्याकरीता मागविण्यात आलेल्या निविदा तसेच कापडाचे कामगार संघटनांनी पसंत केलेल्या नमुन्यानुसार निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार खालील दराने मे. अरमान क्लॉथ स्टोअर्स , औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करण्ययास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | साडी ८ मिटर रंगीत मनिषा | ३४७ नग | रु. ४३५/- | = १,५०,९४५/- |
| २) | साडी ८ मिटर रंगीत रिंकु | ३४७ नग | रु. ३७५/- | = १,३०,१२५/- |
| ३) | साडी रंगीत ५ मिटर रिंकु | ३५ नग | रु. २९७/- | = १०,३९५/- |
| ४) | साडी रंगीत ५ मिटर मनिषा | ३५ गन | रु. २७२/- | = ९,५२०/- |
| ५) | साडी ८ मिटर पांढरा मनिषा | ७० नग | रु. ४३५/- | = ३०,४५०/- |
| ६) | साडी ५ मिटर पांढरा मनिषा | १४० गन | रु. २७२/- | = ३८,०८०/- |
| ७) | साडी मनिषा ५ मिटर पांढरा पुर्ण प्लेन | ६० नग | रु. २७२/- | = १६,३२०/- |
| ८) | ब्लॉऊज मिसेस ८० सेमी प्रत्येकी रंगीत व पांढरे | १०३४ नग | रु.२०/- | = २०,६८०/- |
| ९) | शर्ट सलवार कापड (७मी) मार्बल पॉलिस्टर | १४६ नग | रु.३५०/- | = ५१,१००/- |
| १०) | ओढणी कापड (२.५ मीटर) | १४६ नग | रु.७०/- | = १०,२२०/- |

| | |
|---|---|
| **एकुण खर्च रु.** | **४,६७,८३५/-** |

याकरीता येणाऱ्या एकुण र. रु. ४,६७,८३५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७८/३९ :**

पशुधन विकास अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयात सन १९९८-९९ या एका वित्तीय वर्षाकरीता बीफ, ल्युसर्नघास, शाळु बाटुक, शाळु कडबा, मासोळी, पशुपक्षी खाद्य, भाजीपाला व फळफळावळ, ब्रेड व किराणा (किरकोळ) यांच्या निविदा मागविण्यांत आल्या प्राप्त झालेल्या निविदा धारकांचे नांव व त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

**१)** **बीफ :** बीफ करीता (१०) कोऱ्या निविदा पत्रकाची विक्री झाली पैकी (८) आठ निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या.

| **अ. क्र.** | **निविदाधारकांचे नांव** | **हड्डीसहित प्रति किलो रु. पै.** | **हड्डी विरहीत प्रति किलो रु. पै.** |
|---|---|---|---|
| १) | श्री. फरोजखॉन अ. रहेमान खॉन औरंगाबाद | ९.०० | १०.०० |
| २) | श्री. मोहम्मद अनिस मो. हनिफ, औरंगाबाद | १२.२५ | २०.०० |
| ३) | श्री. अब्दुल हमीद शे. हनीफ | १३.५० | २०.०० |
| ४) | श्री. मो. इसा मो. शरीफ | १६.०० | २०.०० |
| ५) | श्री. शेख समद शे. सत्तार | १६.०० | १८.०० |
| ६) | श्री. शेख सलीम शेख चाँद | १७.६५ | २२.६० |
| ७) | श्री. मुसा अ. करीत | १७.४० | ४५.०० |
| ८) | श्री. मो. खुर्शीद शे. अ. रहिम | १९.०० | २१.०० |

तुलनात्मकदृष्टया श्री. फरोजखॉन अ. रहमान खॉन, औरंगाबाद यांचे हड्डीसहीत दर प्रतिकिलो रु. ९.०० व हड्डी विरहीत दर प्रतिकिलो १०.०० मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**२)** **मासोळी :** मासोळीकरिता (३) कोरे निविदा पत्रकाची विक्री झाली असुन (३) निविदा पुरवठाधारकांकडुन प्राप्त झाल्या.

| **अ. क्र.** | **निविदाधारकांचे नांव** | **प्रतिकिलो रु.** | | |
|---|---|---|---|---|
| | | **कटला** | **राहु** | **मिरगळ** |
| १) | श्री. मुमताज अहेमद औरंगाबाद | ५७.५० | ५७.५० | ५७.५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) | श्री. लालचंद गुंगले | ६०.५० | ६०.५० | ६०.५० |
| ३) | श्री. शेख मजहर | ६२.५० | ६२.५० | ६२.५० |

तुलनात्मक दृष्टीने श्री. मुमताज अहमद, बारुदनगर नाला, औरंगाबाद यांचे कटला, राहु व मिरगळ मासोळीचे दर प्रतिकिलो रु. ५७.५० मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**३) ल्युसर्नघास :** ल्युसर्नघासाकरिता (७) कोरे निविदांची विक्री झाली असुन पैकी (६) सहा निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नांव | प्रतिकिलो रु. |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक नंदलाल मोदी | १.०० |
| २) | श्री. जनार्दन कोंडाजी शेळके | १.६५ |
| ३) | श्री. रियोजोद्दीन युसूफद्दीन | १.७० |
| ४) | श्री. चेअरमन, प्रभात सहकारी ग्राहक संस्था औरंगाबाद | १.८० |
| ५) | श्री. संतराम बंडुजी नवपुते चिकलठाणा | १.९५ |
| ६) | श्री. शेख रशिद शेख शहाबुद्दीन जांभळी (पैठण) | २.५० |

तुलनात्मकदृष्टया श्री. अशोक नंदलालजी मोदी यांचे दर सर्वात कमी प्रतिकिलो रु. १.०० मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**४) शाळु कडबा व कडबा बाटूक :**

यासाठी (३) तीन कोऱ्या निविदा धारकांकडुन विक्री झाली. पैकी (३) तीन निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नांव | शाळु कडबा प्रति टन रु. | शाळू बाटूक |
|---|---|---|---|
| १) | श्री. महमद सईद उद्दान सादत, औरंगाबाद | ३११०.०० | ४५००.०० |
| २) | श्री. जनार्धन कोंडाजी शेळके, अब्दूलमंडी | ३२५०.०० | ४१५०.०० |
| ३) | श्री. शेख इसाक शेख फकीर महमंद रा. जांभळी ता. पैठण | ३६००.०० | ४५००.०० |

तुलनात्मक दृष्टीने शाळु ज्वारी, कडबा सर्वात कमी श्री. महमंद सईद उद्दीन सादत, औरंगाबाद यांचे दर रु. ३२१०.०० प्रति टन तसेच शाळु ज्वारी बाटूकसाठी सर्वात कमी श्री. जनार्धन शेळके रा. अब्दीमंडी यांचे दर प्रतिटन रुपये ४१५०.०० मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**५) पशुखाद्य व कोंबडी खाद्य :** यासाठी (२) दोन कोऱ्या निविदा पत्रकांची अमृत/गोदरेज. विक्री झाली पैकी (१) निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाली. गोदरेज पशुखाद्य व कोंबडी खाद्यासाठी कोणीही निविदा भरली नाही.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नांव | पशुखाद्य प्रति क्विंटल रु. | पक्षी खाद्य |
|---|---|---|---|
| १. | मे. सन एन्टरप्रायझेस, करीता श्री. एस. एम. सामग, औरंगाबाद | ६२५.०० | ८६०.०० |

तुलनात्मक दृष्टीने एक निविदा प्राप्त झाली. मागील वर्षाचे तुलनात्मक या वर्षाचे नाव कमी असल्याने मंजुर करण्यांस हरकत नाही. विचारार्थ सादर.

**६) ब्रेड :**

ब्रेडसाठी (३) कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली. पैकी (३) तीन निविदा धारकांकडुन प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | निविदा धारकांचे नांव | २०० ग्रॅम प्रतिपुडा रु. | २५० ग्रॅम प्रतिपुडा रु. |
|---|---|---|---|
| १) | मे. एलोरा बेकरी, औरंगाबाद | ३.४० | ४.०० |
| २) | सवेरा बेकरी, औरंगाबाद | ४.०० | ४.५० |
| ३) | लकी बेकरी, औरंगाबाद | ४.२० | ४.७० |

तुलनात्मक दृष्टीने मेसर्स एलोरा, जुनाबाजार, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी २०० ग्रॅम प्रतिपुडा रु. ३.४० व २५० ग्रॅम ४.०० मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**७) किराणा पदार्थ :**

किराणा पदार्थासाठी (३) कोऱ्या निविदांची विक्री झाली. पैकी (३) निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | मालाचे वर्णन | चेअरमन प्रभात सह. ग्राह. संस्था | साहस ग्राहक सह. संस्था, औरंगाबाद | श्री. जनार्धन शेळके अब्दीमंडी |
|---|---|---|---|---|
| १) | हरभरे | १६.०० | १४.५० | १४.०० |
| २) | मका | ७.०० | ५.९० | ४.०० |
| ३) | मुगदाळ | १७.०० | २४.९० | २६.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४) | तांदुळ | ९.९० | ९.७५ | १०.०० |
| ५) | फुटाणे | २२.०० | १५.९० | २५.०० |
| ६) | शेंगदाणे | २२.८० | २४.९० | २६.०० |
| ७) | गहु | ७.९० | ७.५० | - |
| ८) | निरमा पावडर | २०.०० | १८.०० | १७.०० |
| ९) | लाईफबॉय सोप | ७.९० | ७.५० | ८.०० |
| १०) | रिन सोप | ८.५० | ८.९० | १०.०० |
| ११) | शेंग पेंड | ३०.०० | १२.४० | ११.०० |
| १२) | लकस सोप | ९.५० | ६.७५ | ९.०० |
| १३) | गुळ | १२.९५ | ११.९० | १४.०० |
| १४) | गोडतेल | ४८.०० | ४५.०० | ४६.०० |
| १५) | माचीस | ४.०० | ४.०० | ४.०० |
| १६) | साखर | १४.०० | १४.०० | १६.०० |
| १७) | कॉफी | ३२०.०० | १४०.०० | १२०.०० |

तुलनात्म्क दृष्टीने ॲटम नं. १,२,८,११ व १७ श्री. जनार्दन शेळके यांचे दर कमी आहेत तर ॲटम नं. ३,६,१० व १६ यांचे सर्वात कमी दर चअरमन प्रभात सहकारी ग्राहक संस्था, औरंगाबाद यांचे आहेत, तसेच ॲटम ४, ५, ९, १२, १३, १४ व १६ यांचे सर्वात कमी दर साहस ग्रा. सं. यांना फक्त मे/९८ मध्ये माल पुरवठा केला नंतर जुन ९८ पासुन पुरवठा बंद केला. पुरवठा संबंधी विचारणा केली असता काही उत्तर देण्यांत आले नाही. म्हणुन दुसऱ्या क्रमांकाचे कमी दरात ॲटम क्र. ४,५,९ व १३ व १५ हे प्रभात ग्रा. संस्था यांच्याकडुन व ॲटम क्र. १२ व १४ श्री. जर्नादन शेळके यांच्याकडुन विचारणा केली असता श्री. जनार्दन शेळके हे सर्वात कमी दर पुरविण्यांत तयार नसल्यामुळे प्रभात ग्रा. सं. संस्था देण्यास तयार असल्याने हे सर्व ॲटम क्र. प्रभात स. संस्था यांना देण्यास मंजुरी व्हावी. प्रस्ताव विचारास्तव सादर.

**८) ऊस व  गजराज गवत :**

यासाठी (२) कोऱ्या निविदांची विक्री झाली पैकी (२) निविदा पत्रके पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या. गजराज गवतांसाठी दोन्ही निविदा धारकांनी दर निविदेमध्ये नमुद केले नाही.

१) श्री. जनार्धन शेळके - ऊस प्रतिटन रु. १४००/-
२) श्री. सईद  उद्दीन सादत - ऊस प्रतिटन रु. १४७०/-

तुलनात्मक दृष्टीतुन श्री. जनार्धन शेळके यांचे सर्वात कमी दर रु. १४००/- प्रतिटन मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**९) फळफळावळ व भाजीपाला :** फळफळावळ व भाजीपालासाठी (२) दोन कोरे निविदा विक्री झाली पैकी (२) निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | मालाचे नांव | श्री. शे. राजु शे.रहेमान प्रति किलो /डझन | श्री. प्रभाकर वि. पवार प्रति किलो / डझन |
|---|---|---|---|
| १) | केळी | ८.०० | ८.०० |
| २) | मोसंबी | १३.०० | १८.०० |
| ३) | चिकु | २०.०० | ८.०० |
| ४) | पिकलेले टोमॅटो | ८.०० | १०.०० |
| ५) | बटाटे | १२.०० | ६.०० |
| ६) | काकडी | १०.०० | १०.०० |
| ७) | गाजर | १४.०० | ३.०० |
| ८) | वांगी | १२.०० | ६.०० |
| ९) | कोबी | १३.०० | ६.०० |
| १०) | फुलावर कोबी | १३.०० | ५.०० |
| ११) | पालक भाजी | ३.०० | १.०० |

तुलनात्मक दृष्टीने ॲटम नं. १ व ६ यांचे दर दोन्ही निविदा धारकांचे समान आहेत. तसेच ॲटन नं. १ व ४ मालाचे कमी दर श्री. शेख राजु शे. रहेमान यांचे आहेत. तसेच ॲटम नं. ३, ५, ७, ८, ९, १०, ११ या मालाचे दर कमी श्री. प्रभाकर यांचे आहेत. तसेच ॲटम नं. १ व ६ श्री. प्रभाकर पवार यांचे मंजुर व्हावे. परंतु शे. राजु यांनी पुरवठा करण्यास नकार दिल्यामुळे श्री. प्रभाकर यांच्याकडुन ॲटम क्र. १ ते ११ हे सर्वात कमी दर प्रमाणे प्रभाकर पवार यांना मंजुरी देण्यास हरकत नाही.

आचारसंहिता मुळे मा. आयुक्त यांनी प्राणी संग्रहालयाचे प्राण्यांचे खाद्याची गरज लक्षात घेता विशेष अधिकाराचा वापर करुन सन १९९८-९९ चे निविदा मधील वरील प्रमाणे सर्वात कमी दर असलेले निविदा धारकांचे दर दि. ०१.०५.९८ ते ३०.०६.९८ (२ महिने) करीता मंजुर केले आहे. तरी १९९८-९९ वर्षाचे निविदाचे सर्वात कमी दर असलेले निविदा धारकांचे दर दि. ३१.०३.९९ पर्यंत मंजुरीस्तव सादर.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अ. रऊफ** :प्राणी संग्रहालयात काही दिवसापूर्वी वाघ मृत पावलेला होता तो कोणत्या कारणाने मृत पावला याची सभागृहाला माहिती नाही.

**मा. सभापती** : प्राणी संग्रहाल्यातील वाघ हा मृत पावला तो कोणत्या कारणासाठी मृत पावला याची साधी कल्पनाही पदाधिकारी किंवा प्रशासनास नव्हती. याबाबतचे मुळ कारण काय ? प्राण्यांना कोणत्या प्रकारचे खाद्य पुरविल्या

जाते. हे पाहणे आवश्यक आहे. त्यासाठी याबाबत उपआयुक्त (म.) यांनी प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना व्यवस्थित योग्यरित्या बिफ (मांस) पुरवठा केला जातो काय व प्रतिदिन किती खाद्यपूरवठा होतो, वाघ मृत पावला याचे कारण काय याबाबतची चौकशी करुन पुढील बैठकीत अहवाल द्यावा.

**श्री. स. अली मिरा सलामी :** वाघांना खन्नी मटन पुरविल्या जाते.

**श्री. गौतम लांडगे :** सदरील प्रस्ताव एवढया कालावधीनंतर स्थायी समितीसमोर का आला. आतापर्यंत मंजुरी का घेतलेली नाही.

**श्री. म. अ. रऊफ, श्री. विश्वारोद्दीन :** सन ९८-९९ या वर्षाकरिता निविदा मागवून प्रस्ताव यापूर्वीच मंजूर करावयास पाहिजे होता परंतु आचारसंहिता आल्याने तीन तीन महिन्याचे प्रशासकीय मान्यतेने प्रस्तावातील दरान्वये खर्च करण्यात येत आहे. यासाठी सभागृहाची मंजुरी घेणे आवश्यक नाही काय ?

**श्री. गौतम लांडगे :** प्रशासनाने त्यांच्या स्तरावर मंजुरी देऊन खर्च करीत आहेत. आचारसंहिता संपून आता बराच कालावधी लोटलेला आहे. आणि आता सदरील प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीस्तव येण्याचे कारण काय ? आणि बिफ (मांस) रु. ९/- प्रतिकिलो प्राण्यांना देण्यात येतात व बाहेरील मार्केट मध्ये तेच बिफ रु. ३०/- प्रतिकिलो विकल्या जाते यात फार मोठी तफावत आहे. एक तर प्रस्ताव स्थगित ठेवा व नामंजुर करावा असे माझे मत आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** मटणाची किंमत बरोबर नाही. रु. ९/- प्रतिकिलो प्रमाणे योग्य दर्जाचे बीफ (मांस) मिळणेसाठी मटणाचा दर्जा पाहणे आवश्यक आहे. पूर्वी मागविलेले टेंडर आहे रिकॉल करावे.

**पशुधन विकास अधिकारी :** वाघ मरण पावला त्याचा पुरवठा होणाऱ्या बिफ (मांस) याचा काहीही संबंध येत नाही. ते इतर आजाराने मरण पावले. आजरापणांत त्यांचे प्रादेशिक स्थरावरील तज्ञ डॉक्टर कडुन व मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय यांचे सल्ला घेऊन औषधापचार करण्यात आले.

**मा. सभापती :** बाहेरील मार्केटमध्ये बिफ मटन रु. ३०/- किलो आहे. येथील प्राण्यांना आपण फक्त रु. ९ /- किलोचे पुरवठा करतो. संबंधित गुत्तेदाराला परवडणारे आहे काय ? त्यासाठी काय कारण आहे. एवढया कमी किमंतीत मांस पुरवठा करण्याचे कारण काय असावे याची माहिती संबंधीत अधिकारी यांनी द्यावी.

**पशुधन विकास अधिकारी :** इतर कुणीही निविदाधारक आपसांतील त्यांच्या हेव्यादाव्याने प्रस्तावातील दर भरलेले आहे व ते पुरवठा करतात. याची तशी तपासणी केल्या जाते. दररोज २३४ किलो बिफ मटन प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना दिल्या जाते.

**मा. सभापती :** दैनंदिन २३४ किलो प्रतिदिन बिफ मटन प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना दिल्या जाते व त्याबाबत इतर महानगरपालिकेत मुंबई/पुणे वगैरे ठिकाणी प्राण्यांना कोणत्याप्रकारे मांस पुरविल्या जाते याबाबतची माहिती घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही व्हावयास पाहिजे रु. ९/- किलोचचे बिफ मटन पुरवठा प्राण्यांना करणे परवडणारे नाही. ते मग तपासणी कोण करणार यासाठी उपआयुक्त (म.) यांची प्राणी संग्रहालयात प्रत्यक्षात जाऊन तपासणी करीत जावे व तसा अहवाल घेणे आवश्यक आहे. तेव्हा सदरील बिफ (मांस) ची निविदा रिकॉल करुन ३ दिवसाचे शॉट टेंडर काढुन कार्यवाही करावी व

प्राण्यांच्या बिफ मासांबाबतची संपुर्ण माहिती पुढील बैठकीत उपआयुक्त (म.) यांनी सादर करावी.

**श्री. गौतम लांडगे :** गेले वर्षभरापासुन पशुधन विकास अधिकारी यांनी निविदा मागविली त्यावेळी समितीची मंजूरी घेतलेली नाही. केवळ प्रशासकीय स्वरुपांत त्यांनी त्यांच्या अधिकारात दोन - दोन महिन्याने संबंधित निविदा धारकांकडुन पुरवठा करुन खर्च केलेले आहेत. व आता आठ महिन्याने सदरील प्रस्ताव स्थायी समिती समोर येत आहे. हे योग्य आहे काय ? याचाच अर्थ प्रशासनाला स्थायी समितीची मंजुरीची आवश्यकता नाही. असे दिसुन येते. एवढे असुनही स्थायी समितीला विचारार्थ न घेता मंजूरी देणार का ? जर देत असाल तर यास माझा विरोध आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** गेले आठ महिण्यापासुन स्थायी समितीची मंजूरी न घेता प्रस्ताव आज का ठेवण्यात आला. आजपर्यंत स्थायी समितीच्या मंजूरीची आवश्यकता प्रशासनाला नव्हती का ? (याचवेळी पशुधन विकास अधिकारी यांनी संबंधीत संचिका मा. सभापती यांना दाखविली.)

**मा. सभापती :** मागील वर्षीचे व ल्युसन घासाचे दर काय होते याच वर्षी कमी जास्त दर का येते याची शहानिशा करणे आवश्यक आहे. याबाबत वाघांना व इतर प्राण्यांना चांगल्या प्रकारे मांस व इतर खाद्यपदार्थ पुरवठा व्हावा हाच मुख्य उद्देश आमचा आहे. परंतु पशुधन विकास अधिकारी यांनी पदाधिकारी व प्रशासनाला अंधारात ठेवून कार्यवाही करणे ठिक नाही. व हा कसा कधी मृत पावला याची आम्हाला कल्पनाही नव्हती. जेव्हा वर्तमान पत्रात बातमी आली त्यावेळेस आम्हाला कळाले याचे नेमके कारण काय ?

**पशुधन विकास अधिकारी :** नुकतेच मा. केंद्रिय वने व पर्यावरण मंत्री प्राणी संग्रहालयात येऊन गेले त्यांनी तेथिल प्राणी संग्रहाल्याची प्रशंसा केली त्यांचे समवेत राज्याचे मा. वने व पर्यावरण मंत्रीही होते. त्यांना कल्पना होती.

**मा. सभापती :** वाघ मृत का झाला ? व प्राण्यांना खन्नी देतात काय ? किंवा बिफ मटन तसेच इतर महानगरपालिकेतील याबाबत काय परिस्थिती आहे. याबाबतची संपूर्ण चौकशी उप आयुक्त (म.) यांनी करावी. बीफ (मांस) बाबतचा प्रस्ताव रिकॉल करावा व दुसऱ्या प्रस्तावाबाबत स. सदस्यांचे काय मत आहे ते मांडावे.

**श्री. गौतम लांडगे :** वारंवार माझे एवढेच मत मांडावयाचे आहे की, आचारसंहिता संपल्यानंतर प्रशासकीय रित्या प्रस्ताव स्थायी समितीच्या सभा झालेल्या असतांनाही आजपर्यंतच्या कालावधीत प्रस्ताव मांडण्यात का आला नाही. एवढा उशीर होण्याचे हेतू काय आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान संबंधित अधिकाऱ्यांनी केले आहे. याबाबतची चौकशी होणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** सदरील प्रस्तावातील बीफ (मांस) या प्रस्ताव रिकॉल करण्यांत येतो. व इतर सर्व प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो. रिकॉल प्रस्ताव शॉर्टटेंडर काढुन कार्यवाही करावी. यास स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयात सन १९९८-९९ या वित्तीय वर्षाकरीता बीफ, ल्युसर्नघास, शाळु कडबा, शाळु बाटुक कडबा, मासोळी,

पशुपती खाद्य, भाजीपाला व फळफळावळ, ब्रेड व किराणा (किरकोळ) इ. करिता मागविण्यांत आलेल्या निविदा नुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) बीफ मांस पुरवठ्या करीता तसेच खन्नी मांस पुरवठ्या करीता त्वरीत व पुनर्निविदा मागविण्यात याव्यात. बीफ मांस व खन्नी मांस यापैकी प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना जे योग्य असेल ते मांस पुरवठ्याचा निर्णय घेण्यात यावा.

२) मासोळी करीता प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक श्री. मुमताज अहमद बारुदनगर नाला, औरंगाबाद यांचे कटला, राहु व मिरगळ मासोळीचे प्रति किलो रु. ५७.५० या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) ल्युसर्नघास करीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे प्रति किलो रु . १.०० या दराच्या श्री. अशोक नंदलालजी मोदी यांचे निविदास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

४) शाळु कडबा व कडबा बाटुक करीता सर्वात कमी दराची म्हणजे रु. ३२१०/- प्रति टन या श्री. महंमद सईफद्दीन सादत, औरंगाबाद यांची निविदा सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

५) पशुखाद्य व कोंबडी खाद्य यासाठी पशुखाद्यासाठी प्रति क्विंटल रु. ६२५/- व पक्षी खाद्यासाठी प्रति क्विंटल रु. ८६०/- या मे. सन एन्टरप्रायझेस करीता श्री. एस. एम. सामग, औरंगाबाद यांचे निविदास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

६) ब्रेड साठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच २०० ग्रॅमचा प्रतिपुडा रु. ३.४० व २५० ग्रॅमचा प्रतिपुडा रु. ४.०० या मे. एलोरा बेकरी, जुना बाजार, औरंगाबाद यांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

७) किराणा पदार्थासाठी खालीलप्रमाणे निविदाधारकांच्या नांवा समोरील ॲटम क्रमांकास मंजुरी देण्यांत येते. श्री. जनार्दन शेळके - ॲटम क्र. १,२,८,११ व १७ चेअरमन, प्रभात सह. ग्राहक संस्था, औरंगाबाद, ॲटम क्र. ३, ६, १० व १६ चेअरमन, साहस ग्राहक संस्था, औरंगाबाद ॲटम क्र. ४, ५, ९, १२, १३, १४ व १६ साहस ग्राहक संस्थेने जुन नंतर पुरवठा बंद केल्यामुळे ॲटम क्र. ४, ५, ९, १३ व १५ हे प्रभात ग्राहक संस्थेकडुन व ॲटम क्र. १२ व १४ श्री. जनार्दन शेळके यांच्याकडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

८) ऊस व गजराज गवत यासाठी तुलनात्मक कमी व र. रु. १४००/- प्रति टन या दराची श्री. जनार्दन शेळके यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

९) फळफळावर व भाजीपाला या करीता ॲटम क्र. १ ते ११ हे सर्वात कमी दराचे श्री. प्रभाकर पवार यांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय :</u>

**विषय क्र. ३७९/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा, लक्ष्मी कॉलनी भागातील अंतर्गत रस्त्यावर रिमेटलिंग व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९७-९८ च्या सा. बां. खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ९,७०,८४५/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च ९८-९९ च्या "नविन डांबरी रस्ते" या लेखा शिर्षकातुन करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा, लक्ष्मीनगर भागातील अंतर्गत रस्त्यावर रिमेटलिंग व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,७०,८४५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८०/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कल्पतरु हौ. सो. गारखेडा येथे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. मध्ये अंदाजपत्रक रक्कम रु. ४,५१,९००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च सन १९९८-९९ च्या "नविन डांबरी रस्ते" मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतुदी मधुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कल्पतरु हौ. सोसायटी गारखेडा येथे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,५१,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८१/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला गारखेडा येथील सर्व्हे नं. २०१ जमिनी मधुन जाणारा १५ मिटर विकास योजना रस्त्याचे खडीकरण व साईड ड्रेन करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ७,७२,२७१/- चे तयार करण्यांत आले असुन सदरील खर्च सन १९९८-९९ च्या भांडवली रस्ते "नविन खडी रस्ते" मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतुदी मधुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गारखेडा येथील स. नं. २०१ जमिनी मधुन जाणाऱ्या १५ मिटर विकास योजना रस्त्याचे खडीकरण व साईड ड्रेन करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ७,७२,२७१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८२/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हमिद कॉलनी व लगतच्या वसाहती मध्ये खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ६,९०,४१०/- चे तयार करण्यांत आले. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हमिद कॉलनी व लगतच्या वसाहती मध्ये खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,९०,४१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८३/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रशिदमामू कॉलनी जवळ रफ शहाबाद फरशीचे काम करणेसाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,५३,९८५/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "नविन खांडकी रस्ते" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रशिदमामु कॉलनी जवळ रफ शहाबाद फरशीचे काम करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,५३,९८५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८४/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, कैसर कॉलनी भागात डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ७,८०,४००/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षा अंतर्गत सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी भागात डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ७,८०,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८५/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, शहागंज भाजीमंडी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३,४८,५००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "पुर्नडांबरीकरण " या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज भाजी मंडी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,४८,५००/- च्या अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८६/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करित आहे की, नेहरुनगर अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ८,८४,३००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "नविन डांबरीकरण रस्ते" या लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ८,८४,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८७/९ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिल्कमिल कॉलनी येथील आरोग्य केंद्राजवळ पथ दिव्या करीता विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ४,०४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च व्यापारी संकुले व उर्वरीत इमारती या लेखाशिर्षा खाली करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रु. ४,०४,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्ममिल कॉलनी येथील आरोग्य केंद्राजवळ पथ दिव्या करीता विद्युतीकरणाचे काम करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,०४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८८/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोकणवाडी चौक प्रस्तावित नविन वाहतूक बेटाच्या बाजुला खडी रस्ता तयार करणेसाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि. एस. आर. दराने रक्कम रुपये ३,४२,१०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास दि. ३०.७.९८ च्या स्थायी समिती सभेच्या विषय क्र. ११२/७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेस (१९) एकोणीस निविदा पत्रके विक्री झाल्या त्यापैकी निविदा पत्रके स्विकृततीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (८) आठ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. विपुल कंन्स्ट्रक्शन | ४४.८५% | कमी दराने |
| २) | श्री. सुखबिरसिंग | ४१% | --//-- |
| ३) | मे. आकाश कंन्स्ट्रक्शन | ४०.४१% | --//-- |
| ४) | मे. एस.एच. असोसिएट्स | २७% | --//-- |
| ५) | मे. संधु कंन्स्ट्रक्शन | २२% | --//-- |
| ६) | श्री. एन. बी. पाटील | २७% | --//-- |
| ७) | श्री. एस. एम. शेख | ३७.८६% | --//-- |
| ८) | श्री. नंदकुमार घोडले | ३५.३५% | --//-- |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४४.८५% कमी दराने मे. विपुल कंन्स्ट्रक्शन यांची निविदा पत्रक आहे.

तरी सदरील कामा करिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ३,४२,१०५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे. विपुल कंन्स्ट्र. यांच्याकडुन ४४.८५% कमी दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी चौक प्रस्तावित नविन वाहतुक बेटाच्या बाजुला खडीरस्ता तयार करणे् करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४४.८५% कमी दराची मे. विपूल कंन्स्ट्रकशन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८९/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पंचवटी हॉटेल ते कोकणवाडी चौक या रस्त्यास पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ९८४९००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा पत्रक मागविण्यात आली असता निविदा पत्रक स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण बारा कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सात निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्र. | ११.९३% | जास्त दर |
| २. | श्री. के. बी. पाथ्रीकर | १९.००% | --//-- |
| ३. | मे. आदिनाथ कंन्सट्रकशन | १९.००% | --//-- |
| ४. | श्री. डि. अजितसिंग | २०.००% | --//-- |
| ५. | मे. मंजूला कंन्स्ट्र. | १९.००% | --//-- |
| ६. | मंजूला कंन्स्ट्र. | २०.००% | --//-- |
| ७. | श्री. डि. एस. जग्गी | २१.००% | --//-- |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मॉस्कॉट कंन्स्ट्र. यांचे निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९३ टक्के जास्त आहे. तरी मॉस्कॉट कंन्स्ट्र. यांच्याकडुन सदरील काम अंदाज पत्रकीय दरापेक्षा अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचवटी हॉटेल ते कोकणवाडी चौक या रस्त्यास पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा मे. मास्कॉट कंन्स्ट्रकशन यांची असली तरी उक्त काम संबंधिताकडुन अंदाज पत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९०/१२ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कटकटगेट येथील प्रभाग क्र. २८ मधील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी सन ९७-९८

सालची महाराष्ट्र जिवन प्राधीकरण विभागाची दरसूची नुसार रक्कम रु. ५,५१,१००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले ओह. सदर कामाचा खर्च हा भांडवली काम (पा.पु.) च्या आर्थिक तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकटगेट येथील प्रभाग क्र. २८ मधील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ५,५१,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९१/१३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गणेश कॉलनी व आलमगीर कॉलनी येथील अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन बदलुन २५० मी.मी. व्यासाची व ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे करीता अंदाजपत्रक रक्कम रु. ५,७२,०८६/- चे तयार करण्यात आले असुन सदरील काम हे लेखा शिर्षक देखभाल व दुरुस्ती ९८-९९ यातुन प्रस्तावित केलेले आहे. सदरील अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन ९७-९८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. ३०.९.९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गणेश कॉलनी येथील अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन बदलुन २५०मी.मी. व्यासाची व ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. लाईन टाकणे करीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,७२,०८६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९२/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल येथील मातंग समाजाच्या स्मशान भूमिस संरक्षित भिंत व बर्निंग शेड बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सा. बां. विभागाचे जिल्हा दरसूची सन ९७-९८ च्या अन्वये रक्कम रु. २,८५,९००/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त यांनी सुधारीत अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करुन देणेचे अटीवर प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील मातंग समाजाच्या स्मशान भूमिस संरक्षित भिंत व बर्निंग शेड बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,८५,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९३/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एन-६ सिडको येथील ख्रिश्चन स्मशान भुमित सुविधा पुरविणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९७-९८ चे सा. बां. विभागाचे

दरसुची अन्वये रक्कम रु. ३,९६,८००/- चे तयार करण्यात येऊन त्यास मा. आयुक्तांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सुधारीत अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करुन देणेच्या अटीवर घेणेत आली.

वरील प्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-६ सिडको येथील ख्रिश्चन स्मशान भुमित सुविधा पुरविणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु . ३,९६,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९४/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. पालनगर वार्ड क्र. ४ येथे उद्यान विकसीत करणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९६-९७ चे दर सुची नुसार रक्कम रु. १,८६,५००/- चे तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.

सबब वरील प्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. पालनगर वार्ड क्र. ४ येथे उद्यान विकसित करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १,८६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९५/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक ते महावीर चौक या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराने र.रु. ६,३७,७७०/- व डांबरीकरण र. रु. ३७,०३,८८६/- एकुण रु. ४५,५८,७४०/- चे अंदाजपत्रक सर्वसाधारण सभा दि. १६.७.९८ चे विषय क्र. २९/९ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेस (१७) निविदा पत्रके विक्री झाल्या, पैकी स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा पत्रके भरुन प्राप्त झाली असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. डी. एस. जग्गी | १५% | कमी |
| २) | मे. पाटील कंन्स्ट्रकशन | ५% | जास्त |
| ३) | श्री. नंदकुमार घोडले | ६% | जास्त |
| ४) | श्री. पी. एम. चोरडीया | ७% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.१५% कमी दराची श्री. डी. एस. जग्गी यांची निविदा आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक ते महावरी चौक या रस्तयाचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मक कमी व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराची श्री. डी. एस. जग्गी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९६/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्रमांक १, २, ३, ४, ५ व ६ मधील रस्त्यांवर गतिरोधक साईन बोर्ड ट्राफिक ट्रीप्सचे काम करणे करीत दि. १९.०८.९८ च्या सर्वसाधारण सभा विषय क्र. ६०/५ अन्वये अं. प. र. रु. २४,७४,५५०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/बा.१/५००/९८/ दि. १३.११.९८ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण सहा निविदा विक्री झाल्या पैकी स्विकारणेच्या अंतिम तारखेस एकुण ४ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. एफ.के. इन्टरप्राईजेस | ०५.९१% | कमी दराने |
| २. | म. एम.एस.एस.आय.डी.डी.सी. | ०४.९६% | कमी |
| ३. | मे. कॉसमिक | ०५. % | जास्त |
| ४. | श्री. सलिम पटेल | २०% | जास्त दराने |

तुलनात्मक सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ५.९१% कमी दराने मे. एफ.के. इंटरप्रायजेस यांची निविदा आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. १, २, ३, ४, ५, व ६ मधील रस्त्यावर गतिरोधक साईन बोर्ड, ट्राफिक स्ट्रीप्सचे काम करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ५.९१% कमी दराची मे. एफ. के. इंटरप्राईजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९७/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, क्रांतीचौक विनायकराव पाटील चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्याचे डांबरीकरण करणे करीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ६४,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सोळा कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिमतारखे पर्यंत एकुण अकरा निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | ०.०१% कमी |
| २. | श्री. नंदकुमार घोडले | ५.५१% जास्त |
| ३. | श्री. पी.एम. चोरडिया | ७.७७% जास्त |
| ४. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्रकशन | ९.००% जास्त |
| ५. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रकशन | ३.८३% जास्त |
| ६. | मे. पाटील कंन्स्ट्रकशन | ४.५१% जास्त |
| ७. | मो. अहमद सिद्दीकी | ७.७७% जास्त |
| ८. | मे. रे. कंन्स्ट्रकशन | ७.००% जास्त |
| ९. | ए. सी. कोठारी | ४.७६% जास्त |

१०. डी. एस. जग्गी १५.००% जास्त
११. प्रकाश व्ही. पाटील ५.५०% जास्त

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी मे. डी. अजितसिंग यांचे निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.०१% कमी आहेत. करीता प्रस्ताव मंजरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक विनायकराव पाटील चौक ते रेल्वे स्टेशन रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक सर्वात कमी व अंदाज पत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९८/२० :**

कार्यकारी अभियंता, स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात शहाबाद फरशी गल्लयामध्ये बसविणे करीता अं. प. र. रु. ९,९८,०००/- सा. बां. विभागाचे दर सूची ९५-९६ नुसार तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. २५.०७.९८ ला प्रशासकीय मान्यता प्रदान केली. तसेच दि. ३०.७.९८ रोजी संपन्न झ ालेलया स्थायी समिती ठराव क्र. १४१/१५ अन्वये मंजुरी मिळाल्यांनतर रितसर कार्यालयीन प्रगट निविदा सुचना क्र. लेखा/नि/५१/९८ दि. ३.९.९८ अन्वये मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत (२१) एकवीस निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत (३) तीन मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि. ३१.१०.९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१) मे. फाईव्हस्टार कंन्स्ट्रकशन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी
२) मे. अजय कंन्स्ट्रकशन --//-- ७.५०% जास्त
३) श्री. एस. ए. नवाब ६.५०% जास्त (इ.एम.डी. जोडला नाही.)

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.०१% कमी दराची मे. फाईव्हस्टार कंन्स्ट्रकशन यांची निविदा मंजुरीस्तव पाठविण्यात आली असता मा. आयुक्तांना दिलेले दर असमाधनकारक वाटले म्हणुन संबंधित ठेकेदारास वाटाघाटीस बोलाविण्यात आले व वाटाघाटीत अं. प. दरापेक्षा २% कमी दराने मा. आयुक्तांनी मान्यता दिली. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिनानगर स्लम भागात शहाबाद फरशी गल्ल्यामध्ये बसविणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदील काम ते फाईव्ह स्टार कंन्स्ट्रकशन यांचेकडुन अं. प. दरापेक्षा २% दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९९/२१ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नगरसेवक स्वेच्छा निधीतुन १९९८-९९ या वर्षात बेरोजगार युवक/युवतींना तात्रिंक प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रातुन जाहिर निविदा प्रकाशित करण्यात आली होती.

तीन चाकी व चारचाकी वाहन चालक प्रशिक्षण तसेच शिवणकाम प्रशिक्षणाचे दर जास्त वाटल्यामुळे संस्थांच्या प्रतिनिधींना दि. २९.१०.९८ रोजी मा. आयुक्तांच्या दालनात वाटाघाटीसाठी पाचारण करण्यात आले. निविदा भरणाऱ्या एजन्सीने तुलनात्मक दरपत्रक व निकष सोबत जोडले आहे. वाटाघाटीत चारचाकी प्रशिक्षणाचे दर रु. १४५०/- प्रति प्रशिक्षणार्थी व तीनचाकी वाहन चालक प्रशिक्षणाचे दर रु. ९००/- प्रति प्रशिक्षणार्थी मान्य करण्यात आले आहेत. नियम अटी व निकषांची पूर्तता करणाऱ्या व निविदा भरणाऱ्या खालील स्थानिक एजन्सीजना १) सिलेक्ट मोटार ड्रायव्हींग स्कुल, २) नोबेल मोटर ड्रायव्हिंग स्कुल, ३) बॉम्बे मोटार ट्रेनिंग स्कुल, ४) परफेक्ट मोटर ड्रायव्हिंग स्कुल, ५) डिसेंट मोटार ड्रायव्हिंग स्कुल यांना प्रशिक्षणार्थी मान्य दरात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी. तसेच शिवणकामाचे गतवर्षीचे दर रु. २७०/- प्रति प्रशिक्षणार्थी या वर्षासाठीचे प्राप्त सर्वात कमी दर डी.टी.पी. रु. २१९८/-, फंडामेंटल कॉम्प्युटर रु. १९९०/-, ब्युटीपार्लर रु. २६००/- या प्रमाणे दर मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहेत.

## संगणक व डी.टी.पी. प्रशिक्षण नियम अटीव निकष :

१) संस्था शासन मान्य असणे जरुरीचे आहे.
२) प्रशिक्षणासाठी जागा किमान ४०० स्वे, फु. असावी.
३) संगणकाची संख्या किमान ५/६ असावी.
४) एकाचवेळी किमान २०/२५ प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण देण्याची क्षमता असावी.
५) प्रशिक्षणसाठी प्रशिक्षक ४/५ असावेत.
६) प्रशिक्षक बी.एस्सी./ एम.एस्सी. कॅम्प्युटर असावेत.
७) प्रति दिन प्रात्यक्षीक दोन तास व थेअरी १ तास बंधनकारक राहील.
८) संस्थेकडे दुरध्वनी व्यवस्था असावी.
९) प्रशिक्षणार्थी हजेरी व मासीक अहवाल प्रति माहे सादर करावा लागेल.
१०) प्रशिक्षणार्थी कडुन प्रशिक्षण कालावधीत कोणतेही नुकसान झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणर नाही.
११) प्रशिक्षण कालावधी ६ महिण्याचा असेल.
१२) ज्या संस्थेची निवड मनपा मार्फत करण्यात येईल त्या संस्थेने करारनामा रु. १०/- च्या बॉन्ड पेपरवर करुन द्यावा लागेल.
१३) निश्चित केलेले दर, प्रशिक्षणार्थी पुर्वी आगाऊ रक्कम म्हणुन म्हणुन मिळणार नाही.
१४) प्रशिक्षणार्थीची परिक्षा घेऊन उत्तीर्ण प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र देण्यात यावे.
१५) प्रकल्प विभागामार्फत पाठविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणार्थीनाच प्रशिक्षण देण्यात यावे.
१६) सदर प्रशिक्षण संस्था व प्रशिक्षणार्थी हे मनपा हद्दीतील असावेत.
१७) प्रशिक्षण पुर्ण झाल्यांनतर प्रमाणपत्राची सत्यप्रत कायाल्यात सादर करणे बंधनकारक राहील.

## रिक्षा चालक व चारचाकी वाहन चालक नियम व अटी व निकष :

१) संस्था शासन मान्य असणे बंधनकारक आहे.
२) सदर संस्थेकडे स्वतःच्या मालकीच्या दोन रिक्षा व चारचाकी वाहन किमान ४ असणे आवश्यक आहे.

३) संस्थेकडे किमान ४ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
४) प्रतिदीन प्रति प्रशिक्षणर्थीस ७ कि.मी. अथवा ३० मिनिटे प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.
५) प्रशिक्षण संपल्यानंतर संस्थेने स्वखर्चाने प्रशिक्षणार्थीना परवाना मिळून देणे आवश्यक राहील.
६) प्रशिक्षण देते वेळी अपघात या नुकसान झाल्यास मनपा जबाबदार राहणार नाही.
७) प्रशिक्षणार्थीच्या सह्या व मासीक हजेरी कार्यालयात सादर केल्या शिवाय देयक अदा करता येणार नाही.
८) ज्या प्रशिक्षणार्थीना प्रकल्प विभागामार्फत पाठविण्यात येईल त्यांनाच प्रशिक्षण देण्यात यावे.

## <u>ब्युटी पार्लर व शिवणकला प्रशिक्षणाच्या नियम व अटी :</u>

| अ. क्र. | संस्था | निकष | प्रशिक्षण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पात्र/ अपात्र | चार चाकी वाहनधारक प्रशिक्षण (१) महिना दर रु. | तीन चाकी वाहन चालक प्रशिक्षण (१) महिना दर. रु. | शिवण काम प्रशिक्षण (३ महिने) दर रु. | संगणक प्रशिक्षण (६ महिने) दर रु. | डी.टी.पी. प्रशिक्षण (६ महिने ) दर रु. | ब्युटी पार्लर कोर्स (६ महिने) दर रु. |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| १. | मेत्ता मोटार ड्रायव्हींग स्कुल, समतानगर, औरंगाबाद | अपात्र | १६५०/- | ११००/- | - | - | - | - |
| २. | लक्की मोटार ड्रायव्हिंग स्कुल, किराडपुरा, औरंगाबाद | अपात्र | १८५०/- | १२७५/- | - | - | - | - |
| ३. | परफेक्ट मोटार ड्रायव्हींग स्कुल, सिल्कमिल कॉलनी, औरंगाबाद | पात्र | १८१०/- | १२२०/- | - | - | - | - |
| ४. | नोबल मोटार ड्रायव्हींग स्कुल देवडी बाजार, औरंगाबाद | पात्र | १८५०/- | १२७५ | - | - | - | - |
| ५. | महराष्ट्र मोटार ड्रायव्हिंग स्कुल खुल्ताबाद, औरंगाबाद | अपात्र | १८५०/- | १२७५ | - | - | - | - |
| ६. | सिलेक्ट मोटार ड्रायव्हिंग स्कुल, प्रज्ञानगर, औरंगाबाद | पात्र | १८५०/- | १२७५/- | - | - | - | - |
| ७. | डिसेंट मोटार ड्रायव्हींग स्कुल, पैठणगेट, औ"बाद | पात्र | १८५०/- | १२७५/- | - | - | - | - |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | बॉम्बे मोटार ड्रायव्हिंग ट्रेनिंग स्कुल, भडकलगेट, औरंगाबाद | पात्र | १८५०/- | १२७५ | - | - | - | - |
| ९. | इन्स्टिटयुट मॅनेजमेंट ऑफ प्रोफेशनल स्टडी गारखेडा, औरंगाबाद | शासन मान्य आहे. | - | - | - | ३५००/- | ३०००/- | - |
| १०. | सिध्दांत कॉम्प्युटर प्रज्ञानगर औरंगाबाद | --//- | - | - | - | ३३००/- | - | - |
| ११. | सोनल कॉम्प्युटर, औरंगपुरा, औरंगाबाद | --//-- | - | - | - | २५००/- | ३०००/- | - |
| १२. | मथुरा कॉम्प्युटर, औरंगपुरा, औरंगाबाद | अभ्यासक्रम शासनमान्य नाही. परंतु संस्था एस.एस.आय. नोदणीकृत आहे. | - | - | - | १९९०/- | २१९८/- | - |
| १३. | कॉम्प्युटर कंप्सेट | शासन मान्य आहे | - | - | - | २५००/- | २७००/- | - |
| १४. | संपदा कॉम्प्युटर, सावरकर नगर | --//-- | - | - | - | २४५०/- | २६५०/- | - |
| १५. | यश कॉम्प्युटर ज्योतीनगर | --//-- | - | - | - | २३५०/- | ३०००/- | - |
| १६. | आकांक्षा कॉम्प्युटर, रामनगर | --//-- | - | - | - | २३५०/- | २७००/- | - |
| १७. | कोरल इन्स्टीट्युट, हिमायतबाग | --//-- | - | - | - | २५००/- | - | - |
| १८. | कॉम्प्युटर लॅब, सिडको | --//-- | - | - | - | २५००/- | २५/- | - |
| १९. | गोल्डन टेक्नीकल इन्स्टिटयुट समी कॉलनी औरंगाबद | --//-- | - | - | २९०/- | - | - | - |
| २०. | आईना ब्युटी पार्लर ॲण्ड ट्रेनिंग संस्था औंरगाबद | --//-- | - | - | - | - | - | २६००/- |

**संवाद :**

**मा. सभापती :** मथुरा कॉम्प्युटर यांनाही देण्यात यावा.

**प्रकल्प संचालक :** ड्रायव्हींग साठी जे अपात्र स्कुल ठरविलेले आहे. त्यांचेकडे अटीशर्तीनुसार चार-चार गाडया असावेत. परंतु नंतर संबंधितांनी गाडया उपलब्ध असल्याचे पत्र दिलेले आहे. तसेच मथुरा कॉम्प्युटर बाबत शासनमान्य नाहीत. परंतु एस.एस.आय. युनीट आहे.

**मा. सभापती :** १) मेत्ता ड्रायव्हींग स्कुल २) मथुरा कॉम्प्युटर यांना घेण्यात यावा टेंडर भरलेल्या पैकीच देण्यात यावे. मथुरा कॉम्प्युटरला गेल्यावर्षी ज्या धर्तीवर मंजुरी दिली त्याच धरतीवर मंजुरी देण्यांत येते. व महानगरपालिकेच्या अटी व शर्ती पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगरसेवक स्वेच्छा निधीतुन १९९८-९९ या वर्षात बेरोजगार युवक/युवतींना तांत्रिक प्रशिक्षण देण्याकरिता मागाविण्यात आलेल्या दरपत्रपैकी तीन चाकी/ चार चाकी वाहन चालक प्रशिक्षण तसेच शिवणकाम प्रशिक्षणाचे दराबाबत झ ालेल्या वाटाघाटीनुसार चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षणाचे दर रु. १४५०/- प्रति प्रशिक्षणार्थी व तीन चाकी वाहन चालक प्रशिक्षणाचे दर ९००/- प्रति प्रशिक्षणार्थी या दरास मान्यता देण्यात येते. तसेच शिवणकलाचे गतवर्षीचे दर रु. २७०/- प्रति प्रशिक्षणार्थी या वर्षासाठीचे प्राप्त सर्वात कमी दरास आणि डी.टी.पी. कोर्सकरीता रु. २१९८/- प्रति प्रशिक्षणार्थी तसेच फंडामेंटल कॉम्प्युटर रु. १९९०/- प्रति प्रशिक्षणार्थी या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संगणक प्रशिक्षणासाठी प्राप्त निविदाधारकांपैकी मे. मथुरा कॉम्प्युटर्स या संस्थेस मागील वर्षी ज्या धर्तीवर प्रशिक्षणार्थी देण्यांत आले त्याच धर्तीवर उपरोक्त दराने प्रशिक्षणास मान्यता देण्यात येते. ब्युटी पार्लर करिता रु. २६००/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. ज्यांना प्रशिक्षणाकरीता निविदा भरलेल्या आहेत अशांनाच प्रशिक्षणार्थी देण्यात यावेत. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४००/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विविध वाहनांचे टायर्स खराब असल्यामुळे ते वारंवार पंक्चर होतात व त्यामुळे कामावर परिणाम होतो. एकुण ५६ नग विविध आकाराच्या टायर /टयुब/फ्लॅप करीता रुपये ४,०२,८००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. व टायर खरेदी करीता जा.क्र./२१००/९८ दि. ०९.१०.९८ नुसार निविदा सुचना दैनिक अजिंठा व औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात देण्यात येवुन विविध उत्पादक कंपन्या व अधिकृत विक्रेते यांच्या कडुन मोहरबंद निविदा पत्रके मागविली असता एकुण २ कोरी निविदापत्रके विक्री झाली व दोन दरासह प्राप्त झाले. त्यांचे आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

**१) मे. मार्लमोरो शॉप औरंगाबाद**

| अ. क्र. | टायर साईज | नग | दर | रक्कम | कंपनी |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ७.५०X १६ (१६पीपी )फ्रंट | १६ | ४८००/- | ७६,८००/- | गुडईयर |
| ०२. | ७.५० X १६ (१६पीआर) (रिअर) | १६ | ५४००/- | ८६,४००/- | --//- |
| ०३. | ९०० X २० (१६ पीआर) (फ्रंट) | ४ | ९०८०/- | ३६,३२०/- | --//- |
| ०४. | ९०० X २० (१६पीआर)(रिअर) | २० | ९७७५/- | १,९५,५००/- | --//-- |

**२) मे. ए. सी. एल. टायर्स, औरंगाबाद**

| अ. क्र. | टायर साईज | नग | दर | रक्कम | कंपनी |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ७.५०X १६ (१६पीपी )फ्रंट | १६ | ४७००/- | ७५,२००/- | अपोलो |
| ०२. | ७.५० X १६ (१६पीआर) (रिअर) | १६ | ५५००/- | ८८,०००/- | --//- |
| ०३. | ९०० X २० (१६ पीआर) (फ्रंट) | ४ | ९१००/- | ३६,४००/- | --//- |
| ०४. | ९०० X २० (१६पीआर) (रिअर) | २० | ९८५०/- | १,९७,०००/- | --//-- |

अ. क्र. १ करीता मे. ए.सी.एल. टायर्स औरंगाबाद यांचे दर कमी आहेत व अ. क्र. २, ३, ४ करीता मे. मार्लमोरो शॉप औरंगाबाद यांचे दर कमी आहेत. दोन्ही एजन्सीजला मा. आयुक्त यांनी वाटाघाटीस बोलावले असता दि. १.१२.९८ रोजी त्यांनी निम्नलिखीत दरात टायर/ट्युब/फ्लेप पुरवठा करण्याचे मान्य केले आहे. व त्यांचे दर खालील दर्शविल्याप्रमाणे कमी दराचे आहेत.

**१) मे. एस. सी. एल. टायर्स औरंगाबाद**

| अ. क्र. | टायर साईज | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | ७.५०X १६ (फ्रंट) अपोलो कंपनी | १६ | ४६५०/- | ७४,४००/- |

**२) मे. मार्लबोरो शॉप औरंगाबाद**

| अ. क्र. | टायर साईज | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | ७.५०X १६ (रिअर) (टायर / ट्युब/फ्लॅप) गुडईयर कंपनी | १६ | ५३५०.०० | ८५,६००.०० |
| ०२. | ९०० X २० (१६ प्ले फ्रंट) (टायर/ट्युब/फ्लॅप) | ४ | ९०८०.०० | ३६,२००.०० |
| ०३. | ९०० X २० (१६ पीआर) | २० | ९७५०.०० | १,९५,००.०० |

सदरील नमुद केलेले दर ४५ दिवसांसाठी सिमीत आहेत. व पेमेंट अगेन्स्ट डेलिव्हरी अशी अट मा. आयुक्तांनी मान्य केली आहे. एकुण ५६ नग टायर/ट्युब/फ्लॅप खरेदी करण्यासाठी रुपये ३,९१,२००.०० खर्च येणार आहे. या खर्चास तसेच वाटाघाटीनंतर आलेल्या वर दर्शविलेल्या ज्या त्या एजन्सीच्या कमी दरात टायर/ट्युब/फ्लॅप खरेदी करण्यास मंजुरी मिळाली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध वाहनांचे टायर्स/टयुब/फ्लॅप करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे ॲटमकरीता झालेल्या

वाटाघाटीत ठरल्यानुसार खालील एजन्सीजच्या नांवासमोर दर्शविलेल्या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**१) मे. ए.सी. एल. टायर्स, औरंगाबाद**

| अ. क्र. | टायर साईज | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | ७.५०X १६ (फ्रंट) अपोलो कंपनी | १६ | ४६५०/- | ७४,४००/- |

**२) मे. मार्लबोरो शॉप औरंगाबाद**

| अ. क्र. | टायर साईज | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | ७.५०X १६ (रिअर) (टायर / ट्युब/फ्लॅप) गुडईयर कंपनी | १६ | ५३५०.०० | ८५,६००.०० |
| ०२. | ९०० X २० (१६ प्ले फ्रंट) (टायर/ट्युब/फ्लॅप) | ४ | ९०५०.०० | ३६,२००.०० |
| ०३. | ९०० X २० (१६ प्ले रिअर) | २० | ९७५०.०० | १,९५,००.०० |

वरीलप्रमाणे एकुण ५६ नग टायर/ट्युब/फ्लॅप खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये ३,९१,२००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन मण मन " या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती,
स्थायी समिती, महानगरपालिका,
औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

## दिनांक २४.१२.९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

**गुरुवार दि. २४.१२.९८ रोजी मा. सभापती श्री. जयवंत (बंडु) ओक यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त.**

**मा. सभापती यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक झाली. बैठकीची सुरुवात "वंदेमातरम्" गीताने दुपारी ४.०० वाजता झाली. बैठकीस अधिकारी वर्ग व स. स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | सभासद |
| २) | स. स. श्री. म. अ. रऊफ म. अ. माबुद | --//-- |
| ३) | स. स. श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ४) | स. स. श्री. संजय जोशी | --//-- |
| ५) | स. स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ६) | स. स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ७) | स. स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| ८) | स. स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ९) | स. स. श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| १०) | स. स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ११) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर | --//-- |
| १२) | स. स. श्री. राजकुमार बचाटे (मामा) | --//-- |
| १३) | स. स. श्री. विखारोद्दीन पी. खुदबोद्दीन | --//-- |
| १४) | स. स. श्री. स. अ. एकबालोद्दीन स. मो. कुतुबूद्दीन | --//-- |

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** माजी उपमहापौर श्री. मुजिब आलमशाहखॉन यांच्यावर खुनी हल्ला झाला. त्याबाबतचा निषेध ठराव सभागृहात व्हावा.

**श्री. राजकुमार बचाटे :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे माजी उपमहापौर श्री. मुजिब आलमशाखॉन यांच्यावर खुनी व प्राणघातक हल्ल्याचा निषेध ठराव मंजुर करण्यात येतो.

**श्री. स. अली मिरा सलामी :** महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी दि. १५.१२.९८ रोजी सामुदायिक रजा आंदोलन पुकारले होते. त्या संदर्भात प्रशासनाने त्यांच्या संघटने समवेत चर्चा करुन एकंदर १४ मागण्या मंजुर केल्या त्या मागण्याची सविस्तर माहिती सभागृहात द्यावी आणि ज्या मागण्या प्रशासनाने चर्चा करुन सोडविल्या व आश्वासन दिलेले आहे. ज्यावेळेस संघटनेचे कार्यकर्ते उपोषणास बसलेले होते. त्यावेळी प्रशासनाने ५ व्या वेतन आयोगाच्या संदर्भात अंमलबजावणीसाठी तारीख निश्चित केली आहे. तेव्हा महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन किती बोजा पडेल

याबाबतची पडताळणी करुन आश्वासन दिले आहे. का ? याबाबतची सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** संघटनेने केलेल्या प्रमुख मागण्यापैकी दैनिक वेतनावरील लोकांचा पगार वाढवणे, ५ व्या वेतन आयोगाची तातडीने अंमलबजावणी करावी व आगाऊ रक्कम कर्मचाऱ्यांना अदा करावी ही मागणी होती. त्यापैकी दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायम करणे, दैनिक वेतनाचा दर वाढविणे, कर्मचाऱ्यांना गणवेश व बुट/चप्पल वाटप करणे, या व इतर मागण्यांवर चर्चा झाली. त्याचप्रमाणे मा. आयुक्त यांनी ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणीस्तव प्रशासनाकडील एकुण किती आर्थिक बोजा पडेल याबाबतची पडताळणी करुन सविस्तर अहवाल सादर करणार आहे. शासनाकडील ५ व्या आयोगाची जी. आर. (गॅझेट) अद्यापही प्राप्त झालेले नाही. गॅझेट बाबत महापालिकेचा खासदुत पाठवुन मागविण्यात येईल व शासनाचे मार्गदर्शन घ्यावे लागणार आहे. ५ वा वेतन आयोग लागु करावयाचा झाल्यास प्रशासनास १ कोटी ८२ लाखाचा आर्थिक खर्च येणार असुन यासाठी सर्व साधारण सभेसमोर विचारार्थ ठेवून मंजूरी घ्यावी लागेल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना यापूर्वी गणेवश /चप्पल/बुट/रेनकोट इ. आतापर्यंत दिलेले नव्हते काय? किती वर्षापासुन कर्मचाऱ्यांना दिलेले नाही. तशी तरतुद केलेली होती काय ? याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.):** जे दैनिक वेतनावरील कर्मचारी आहेत व ज्यांनी गेली दहा वर्षापासुन काम करीत आहेत त्यांना गणवेश/चप्पल/बुट /गरम कपडे इ. देणे बाबत एकुण प्रशासनास किती खर्च येईल याची सविस्तर माहिती घे्त आहोत.

**श्री. गौतम लांडगे :** ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी बाबत मा. महापौर यांच्याकडे जी बैठक झाली तीत एका संघटनेशी चर्चा करीत असतांना शासनाने अद्याप गॅझ ेट (जी.आर.) पाठविला नसल्याने अंमलबजावणी सध्या करता येणार नाही असे सांगीतले व त्याच दिवशी दुसऱ्या संघटनेशी चर्चा करतांना ५ व्या वेतन आयोग लागु करणेचे अश्वासन दिले गेले हे कोणत्या कारणाने, याबाबत प्रशासनाचा हेतु स्पष्ट करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** शासकीय मुद्रनाल्य यांचेकडे जी. आर. च्या प्रति आलेल्या होत्या त्यांचेकडील प्रत आणली. मात्र नगरविकास विभाग मंत्रालयाकडुन ५ व्या वेतन आयोग लागु करणेचे जी, आर. आद्यापही प्राप्त झाले नाही. या संदर्भात शासनाकडे विशेष दुता मार्फत पाठवुन प्रत आणुन याबाबत आर्थिक खर्च किती येईल याचा सविस्तर अहवाल सर्व साधारण सभेसमोर मंजुरीस्तव ठेवुन निर्णय घ्यावा लागेल.

**श्री. गौतम लांडगे :** प्रशासनाने वेगवेगळया संघटनाशी वेगवेगळी चर्चा करुन आपसांत दुजाभाव करु नये. एका संघटनेशी ५ व्या वेतन आयोग लागु करणे बाबत सांय. ७.०० चर्चा करता व एका संघटनेशी जी. आर. ची प्रत आल्यानंतर अमंलबजावणी करण्यात येईल असे अश्वासन देता ही बाब बरोबर नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** १ ल्या दिवशी ज्या वेळी संघटना व पदाधिकाऱ्या समवेत बैठक झालेली होती त्या दिवशी शासनाकडुन जी. आर. आलेला नाही असे सांगीतले होते.

**श्री. गौतम लांडगे :** शासनाकडुन ५ वा वेतन आयोग लागु करणेबाबत जी. आर. आल्यानंतर सर्वसाधारण सभेसमोर निर्णय घ्यावयाचा आहे. असे असतांना प्रशासनाने

दि. ११.०१.९९ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत विचारार्थ ठेवुन मंजुरीनंतर ५ वा वेतन आयोग लागु करणेत येईल असे का सांगितले.

**उपआयुक्त (प्र.) :** ५ वा वेतन आयोग लागू करणेसाठीचा गॅझेट ३८० पानी पुस्तीका शासकीय मुद्रणालय येथून दि. २४.११९८ रोजी आणली. त्यानुसार सविस्तर अहवालावर चर्चा करणेसाठी दि. ११.०१.९९ रोजी सर्वसाधारण सभेसमोर ठेवुन मंजुरी घ्यावी लागेल.

**श्री. संजय जोशी :** कोणता तरी एकच निर्णय घ्यावा एक तर शासनाची अधिकृतरित्या विभागाकडुन प्रत मागवावी नाही तर शासकीय मुद्रणालयाची प्रत आहे. त्यप्रमाणे चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**उपआयुक्त (प्र.) :** महापालिका प्रशासनाने विशेष दूतामार्फत ५ व्या वेतन आयोगाचा गॅझेट (पुस्तीका) मागविण्यात येत असुन त्यानंतर सविस्तर अहवाल चर्चेसाठी सर्वसाधारण सभेसमोर ठेवून मंजुरी घेण्यात येईल.

**श्री. नरसिंग ढगे :** प्रशासनातील विद्युत विभाग हा अतिशय निष्क्रीय असून शहरातील बऱ्याच भागातील लाईट बाबत तक्रारी वाढत आहेत. यासाठी विद्युत विभागातील विद्युत पर्यवेक्षकाच्या जागा सन १९९० पासुन रिक्त आहेत या जागा प्रशासन तातडीने का भरीत नाही.

**श्री. संजय जोशी :** सत्य परिस्थिती काय आहे. सन १९९० पासुन विद्युत विभागात पर्यवेक्षकांच्या जागा रिक्त असुनही प्रशासन कार्यवाही का करीत नाही. या संदर्भात शहरातील बऱ्याच भागात लाईटची अगदी दयनीय अवस्था झालेली आहे. यासाठी लागल्यास प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करावी.

**उपआयुक्त (प्र .) :** याबाबत पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे :** विद्युत लाईनमन यांच्या ज्येष्ठाता यादीतुन नियमाप्रमाणे विद्युत पर्यवेक्षकाची पदे भरावीत अशी त्यांची मागणी आहे.

**मा. सभापती :** याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल आणि नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. जेणेकरुन शहरातील विद्युत बाबत तक्रारी येणार नाही.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** जुन्या शहरी भागात लाईटचे कामे फार कमी करतात व वाढते शहर व नविन भागासाठी लाईट विभाग तातडीने कामे करतात असे दिसुन येते. ज्याज्या वेळी आम्ही लाईटच्या तक्रारी घेऊन जातो व मागणी करतो त्या त्या वेळेस साहित्य पुरवठा उपलब्ध नाही असे सांगितले जाते.

**विद्युत अभियंता -१ :** स. सदस्याची ज्या तक्रारी केल्या आहेत त्या दोन दिवसाआधीच्या आहेत त्या मागण्या आजच पुर्ण करण्यांत येत आहेत.

**मा. सभापती :** ठिक आहे. स. सदस्याचे वार्डातील कामे तातडीने व आजच पुर्ण करावे.

**श्री. श. अ. एकबालोद्दीन :** विद्युत -२ विभागातील काही रेटलिस्ट चे कामे तयार केलेले असुन संबंधित गुत्तेदाराने साहित्य दिलेले नाही. त्यामुळे त्याचे देयक अदा करु नये.

**श्री. नरसिंग ढगे :** स्वेच्छा निधीचे पत्र ३१ डिसेंबर पूर्वी या म्हणतात. मात्र संबंधित पत्र विभागास प्राप्त होत नाही.

**मा. सभापती :** कोणत्याही स. सदस्यांनी स्वेच्छा निधीचे पत्र कामासंबंधात दिलेले असल्यास त्याबाबत ४० दिवसांत कार्यवाही पूर्ण व्हावयास पाहीजे. नाहीतर संबंधितावर कार्यवाही करणेत येईल.

**श्री. म. अ. रऊफ :** स्वेच्छा निधीतील कामाच्या बाबतीत मा. आयुक्त यांनी ६७(३) (सी) चा वापर करुन तातडीने मंजुरी द्यावी. परंतु तसे होत नाही सदस्यांना अनेक वेळा विचारणा करावी लागते. माझ्या वार्डातील जावेद हसनखॉन यांच्या घरासमोर ड्रेनेज लाईन फुटुन सारखी वाहते. त्यामुळे दुर्गंधी येते याबाबत संबंधित विभागास चेकअप काढणेच्या सुचना देऊनही कोणतीही कार्यवाही करीत नाही. सध्या रमजानचा महिना असल्याने याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी. परंतु प्रशासन गंभीरतेने दखल घेत नाही.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.) :** याबाबतची निविदा काढलेली आहे. तातडीने काम सुरु करण्यात येईल. ३ दिवसांची नोटीस काढलेली आहे.

**श्री. म. अ. रऊफ :** संबंधीत अधिकारी हे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नाही फक्त गोलमोल उत्तरे देतात. याकामाबाबत सध्या जे उपलब्ध गुत्तेदार आहेत त्याचेकडुन ६७(३) (सी) चा अधिकाराचा वापर करुन काम सुरु करावे. याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव मंजुर झालेला आहे.

**मा. सभापती :** आतापर्यंत किती कामे ६७ (३) (क) प्रमाणे झाले त्याची माहिती द्यावी.

**श्री. म. अ. रऊफ :** माझ्या वार्डातील गेली ४ महिन्यापासुन तातडीची कामे स्वेच्छा निधीतील होती ती अद्यापही झालेली नाहीत सध्या रमजान महिना आहे. तातडीने कामे व्हावीत.

**श्री. गौतम लांडगे :** स. सदस्याच्या मागणीनुसार रमजान महिण्यामध्ये त्यांच्या वार्डातील कामे तातडीने चालु करावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पू) :** १५० व्यासाची लाईन जूनी असल्याने ती वारंवार चोकअप होते. त्यापेक्षा नविन लाईन टाकण्यात येईल.

**मा. सभापती :** सोमवारला टेंडर ओपन करावे व मंगळवार रोजी प्रत्यक्षात काम सुरु करावे. ३ दिवसांची शॉटटेंडर काढुन कार्यवाही होत आहे.

**श्री. मा. अ. रऊफ :** सभागृहात झालेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही होत नाही. माझ्या वार्डात जेटिंग मशीन येत नाही. वारंवार नागरीक येऊन मला विचारणा करतात.

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील बिफ/ मटन बाबत ज्यांना पोलीस विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे त्यांना नियमाप्रमाणे लायसेंस देण्यात यावे. परंतु गेल्या वर्ष भरापासुन दिल्या गेलेले नाही याचे कारण काय ? लायसन्स दिल्याने महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होईल.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** जे जुने लायसेंस आहत त्यांनाच नुतनीकरण करुन दिल्या जाते व परवानगी दिल्या जाते. ज्यांनी पोलीस विभागाकडुन नविन दुकानासाठी नाहरकत प्रमाणपत्र आणलेले असतील त्याचे बाबतीत प्रशासनामार्फत पाहणी करुन नियम व अटी शर्तीनुसार मार्च ९९ नंतर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** गेल्या ३ वर्षापासुन शहरात अनेक ठिकाणी अनाधिकृत रित्या दुकाने थाटलेली आहेत व त्यांनी पोलीस विभागामार्फत नाहरकत प्रमाणपत्र आणलेले आहेत. त्यांना लायसेन्स देऊन अधिकृत करावे. जेणे करुन महापालिकेला आर्थिक लाभ होईल. याबाबत प्रशासनाने दखल घ्यावी.

**श्री. संजय जोशी :** याबाबत संपुर्ण शहरात सर्व्हे करावा की शहरातील जी अधिकृत मटन/बिफ दुकाने आहेत त्यांनी नियमाप्रमाणे जाळण लावुन व्यवहार करतात काय? कित्येक ठिकाणी मटन/बिफ दुकाने उघडयावरच असतात त्यामुळे बाहेरील माशा त्याठिकाणी व तेथील माशा बाहेर घोघांवतांना

दिसतात. त्यामुळे आरोग्यावर परिणाम होऊ शकतो याची प्रशासनाने काळजी घ्यावी. कुणालाही व कोठेही परवानगी देवू नये.

**श्री. गौतम लांडगे :** शहरात बऱ्याच अनाधिकृत बिफ/मटन दुकाने आहेत. त्यापेक्षा नवीन दुकानांना ज्या भागात खरोखरच आवश्यकता आहे. त्याना अधिकृतरित्या देणे बाबत पाहणी करुन नियम व अटीच्या अधीन राहुन पोलीस विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र आल्यानंतर लायसेंस देवून कार्यवाही करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सर्वे झालेला आहे. ज्या दुकान धारकांनी पोलीस विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र आणलेल असेल त्यांना नियमाप्रमाणे देण्यात यावे.

**मा. सभापती :** शहरातील बिफ/मटन/मच्छी दुकानदारांना किती अधिकृतरित्या लायसेंस दिलेले आहेत व किती फिस वसुल होते. पुढच्या बैठकीच्या वेळी माहिती द्यावी. त्याचप्रमाणे अनाधिकृतरित्या किती दुकाने आहेत. त्या सर्व दुकानदारांची प्रत्यक्षात पाहणी करुन त्यांना लायसेंस देवून परवानगी देता येऊ शकते काय याबाबतीत वर्तमानपत्रात स्थानिक जाहिरात देवून महापालिकेच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करावी व जी दुकाने अधिकृत असुनही दुकानांना जाळया बसवून विक्री करीत नाही त्यांना तसेच अनाधिकृतरित्या जे मटन/बिफ/मच्छी दुकाने चालवितात त्यांचे साहित्य थापा मारुन जप्त करण्याची कार्यवाही करावी व पुढच्या बैठकीत चार्टसहित माहिती द्यावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** लायसेंस देणे बाबतची आवश्यकता आहे काय ? याची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे आजुबाजुचे लोकांचे नाहरकत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे काय ?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** नविन लायसेंस देत असतांना संबंधित दुकानदाराचा अर्ज ज्या ठिकाणी दुकान टाकावयाचे आहे त्या भागातील घर मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र त्यांनी महापालिकाचा सध्य स्थितीपर्यंत भरलेले संपुर्ण मालमत्ताकर व पाणीपट्टी तसेच त्या झोनमधील स्वच्छता निरीक्षकांकरवी प्रत्यक्षात पाहणी करुन अहवाल व नंतर पोलीस विभागाकडील नाहरकत प्रमाणपत्र आल्यानंतर महापालिकेच्या अटी व शर्तीनुसार परवानगी देवून लायसेंस फिस वसुल करुन दिल्या जाते.

**मा. सभापती :** या संदर्भात पुढील बैठकीत सविस्तर माहिती द्यावी स्थानिक सर्वमान पत्रात जाहिरात द्यावी व ज्यांनी पोलीस विभागाकडुन नाहरकत प्रमाणपत्र आणले त्याचे बाबतीत महापालिकेच्या नियमाने जे अटी व शर्ती पुर्ण करतील त्याचेच बाबतीत लायसेंसव देणेची कार्यवाही व्हावी.

**श्री. म. आ. रऊफ :** माझ्या वार्डातील एका कामाच्या बाबतीत संबंधीत कनिष्ठ अभियंता यांना एम. बी. मिळत नाही. हरवली म्हणुन सांगतात त्यामुळे संबंधीत गुत्तेदाराचे देयक मिळु शकत नाही याबाबत कार्यवाही व्हावी.

**शहर अभियंता :** याबाबत शहानिशाह करण्यात येईल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** किराणाचावडी ते अभिनय टॉकिज दरम्यान जो रस्ता रुंदीकरण झालेला आहे. त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पोलीस चौकीचे काय अद्यापही पूर्ण होत नाही. त्यामुळे काम थांबलेले आहे. पत्रव्यवहार करुनही कार्यवाही होत नाही.

**अति. शहर अभियंता :** या भागातील कामाच्या संदर्भात टेंडर कॉल झालेला आहे. पोलीस चौकीच्या भाग काढलेला नाही.

**श्री. किशोर तुळशीर बागवाले :** रस्ता रुंदीकरणाने पोलीस चौकी हलविण्यात आलेली नाही. पोलीस चौकीसाठी दोन रुम्स बांधुन देण्यात यावे व सदरील खर्च महापालिकेने करावा.

**मा. सभापती :** प्रशासनातर्फे तातडीने याबाबत कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** शहानुरमिया दर्गाजवळुन सातारा रोडकडे जाण्यासाठी रेल्वे क्रास करण्यासाठी गेट बांधणेच्या कामासाठी मागील वर्षी महापालिकेने रु. ९.०० लाख दिलेले होते. त्यानंतर पुन्हा आता रेल्वेच्या मागणीनुसार पुन्हा रु. ३१.०० लाखाचा डीडी सिंकदराबाद येथे महापालिकेने खास व्यक्तीसोबत पाठविला म्हणजे एकंदरीत रु. ४०.०० लाखाचा धनादेश रेल्वे विभागाकडे पाठविले असता तो त्यांनी स्विकारलेला नाही व कामही हाती घेतलेले नाही. रेल्वे विभाग महापालिकेत सहकार्य करीत नाही. त्यामुळे नागरीकांना जाण्या-येण्या करतांना अतिशय त्रास होतो.

**अति. शहर अभियंता :** बिड बायपास येथील रेल्वे कामाचे बाबतीत महापालिकेने प्रथमता रु. ९.०० लाखाचे अंदाजपत्रक दिले परंतु ते अपुरे असल्याचे सांगितल्याने पुन्हा ३१.०० लाखाचे अंदाजपत्रक बनवुन डीडी घेऊन सिकंदराबादला खास व्यक्तीमार्फत पाठविण्यात आले परंतु तो रेल्वे विभागाने स्विकारला नाही व उलट मेटेनन्स व गेटमनचा मासिक पगारासहीत मागणी केली.

**श्री. संजय जोशी :** अशा प्रकारे रेल्वे प्रशासनाचे धोरण कुठेही अस्तित्वात नाही. काम रेल्वेचे व खर्च मात्र महापालिकेचा हे योग्य नाही. रेल्वे क्रॉसींगच्या कामासाठी रेल्वे मेंटेनन्स चा खर्च व रेल्वे गेटमनचा पगार हा महापालिकेत कसा काय देणार ? म्हणजे रेल्वे प्रशासन महापालिकाचे हर्रासमेंट करीत आहे. अशा प्रकारची असहकार्याची भुमिका रेल्वे प्रशासनाची असल्यास रेल्वेकडे औरंगाबाद महापालिकेची मालमत्ताकर व पाणीपट्टी किती थकित आहे. याबाबत तातडीने नोटीस पाठवून वसुली करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सध्या केंद्रात यूतीचे राज्य असुन रेल्वेमंत्री यांना भेटुन सविस्तर माहिती द्यावी. सहकार्य करणेस चर्चा करावी.

**मा. सभापती :** रेल्वे प्रशासनाकडे मालमत्ता कर व पाणीपट्टी किती थकित आहे याबाबतीत तातडीने नोटीस पाठवुन कार्यवाही महापालिका प्रशासनाने करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** माझ्या वार्डात मटन मार्केट होऊन दोन वर्ष झाले परंतु तेथील अर्धवट राहिलेले काम तसेच आहे.

**शहर अभियंता :** संचिका आहेत ती सादर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कार्यवाही होण्यास उशिर लागेल.

**मा. सभापती :** प्रकरण न्यायप्रविष्ठ असेल तर संबंधित अधिकारी यांनी स्टे व्हॅकेट करुन पुढील कार्यवाही करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** पैठण रस्त्यावरील रेल्वे उड्डाण पुलाचे काम चालु असतांना अचानक बंद करण्यात आले. या कामास ९६ ला मंजुरी मिळाली आहे. श्री. रशिद खॉन (मामु) हे महापौर असतांना सदर कामास मंजूरी आली असुन अद्याप काम पुर्ण झाले नाही. न्यायलयाचा कोर्ट कमीशनरचा रिपोर्ट आल्यानंतरही ९ महिण्यापासुन काम बंद आहेत. याचा खुलासा करावा. कामाबाबत महापौरांनी पत्र दिले आहे. त्याचाही खुलासा झाला. या कामाबाबत काम

सुरु करावे किंवा बंद करावे एक निर्णय घेण्यात यावा किती वेळा हया प्रकरणात विचारणा करावी.

**मा. सभापती :** बऱ्याचशा नागरिकांनी प्रशासनाकडे तक्रारी दिलेल्या आहेत. काहीचे मत आहे काही नागरीकांचे. त्यामुळे पालकमंत्री, मा. आयुक्त, मी स्वतः आपण या बैठकीत उपस्थित होतो.

**श्री. स. अली मिरा सलामी :** उड्डान पुल होण्याबाबत हमालवाडीमध्ये ५० लक्ष खर्च होऊन दोन वर्ष काम स्थगित असुन आता पर्यंत याचे किती व्याज मिळाले असते.

**श्री. विश्वारोद्दीन :** हमालवाडी या नावाने हा माझा वार्ड क्र. ६३ असुन सर्व पुलाच्या अंतर्गत भाग त्यात आलेला असुन सिल्कमिल हमालवाडा येथील बरेचशे नागरीक मा. प्रशासनाकडे आलेले होते. नागरिंकासोबत चर्चा होऊन खुप दिवस झालेले असतांना काही निर्णय झालेला नाही.

**मा. सभापती :** अधिवेशन संपल्यानंतर २-३ तारखेला बैठक घेवुन निर्णय घेता येईल.

**श्री. राजकुमार बचाटे :** महानगरपालिकेच्या माध्यमातुन १५०० पोलवर २ तारा ओढण्यात आलेल्या आहेत तिसरी तार ओढण्यासाठी प्रशासन एम.एस.ई.बी.सी. संपर्क साधत असुन तशा प्रकारची कार्यवाही होणार आहे काय ? खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** महापालिकेला एम.एस.ई.बी. शी संपर्क करण्याची आवश्कता नाही. सदर पोलवरील विद्युत लाईनचे काम महापालिकेला स्वतःच करावे लागणार आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :** तिसरी तार एम.एस.ई.बी. ने ओढल्यानंतर नागरिक अनधिकृत लाईन कनेक्शन घेऊन व्यवसाय करतील स्ट्रट लाईनसाठी दोन तारा असतात.

**मा. सभापती :** १५०० पोल वर दोन-दोन तारा ओढण्यात आलेल्या आहेत. महापालिकेने एम.एस.ई.बी. ला ना हरकत प्रमाणपत्र द्यावे. प्रशासनाने याबाबत योग्य कार्यवाही करावी. तिसरी तार ओढण्यासाठी काय कार्यवाही करता येईल या करीता प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** आम्ही पोल खरेदी करणार नाही असे एम.एस.ई.बी. चे म्हणणे आहे.

**अति. शहर अभियंता :** १५०० पोल वरील जी लाईन टाकण्यात आली ती फक्त स्ट्रट लाईन तारा ओढण्यात आलेल्या आहेत. तिसरी तार ओढण्यासाठी परवानगी देता येत नसुन ज्या ज्या ठिकाणी अत्यावश्यक आहे. त्याच ठिकाणी कार्यवाही होऊ शकते.

**श्री. गौतम लांडगे :** झोन क्र. ५ मधील विभागीय अधिकारी श्री. गायकवाड हे त्यांच्या कार्यालयात स. ८.३० ते सा. पर्यंत कधीच उपस्थित नसतात ज्यावेळेस बी.पी.एल. चा सर्व्हे चालु होता त्यावेळेस संबंधित अधिकारी यांनी तीन वेळा आश्वासने दिली परंतु आले नाही. सुरत पॅटर्न वेळेस झोनल कमिशनर होते त्यावेळेस मुकूंदवाडी या सारख्या प्रभागात कधी देखरेख केलेली नाहीत. दोन दिवसापुर्वी एक कनिष्ठ लिपीक कोणत्यातरी विभागातुन बदली होऊन त्या झोन कार्यालयात कामावर हजर होण्यासाठी आलेले होते. संबंधित अधिकारी जागेवर नसल्यामुळे त्या लिपीकास दोन दिवस कामावर रुजू करुन घेण्यात आले नाही. बी.पी.एल. चा गठ्ठा प्रकल्प संचालक यांच्या लिपीकाने विभाग कार्यालयात पाठविला असता श्री. गायकवाड यांनी सांगितले की, तो गठ्ठा जाळुन टाका, तिकडेच फेकुन द्या असे असभ्य बोलणे योग्य नसुन संबंधिताची बदली करावी. किंवा त्यांच्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** संबंधित झोन अधिकारी यांच्यावर प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी.

**विषय क्र. ४०१/१ :**

दिनांक ५.१२.९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ३६ विषय क्र. ३७८/३९ च्या अनुषंगाने पृष्ठ क्र. ४३ वर उद्यानातील प्राण्यांसाठी बिफ मांस खन्नी मांस याबाबतचा निर्णय घेण्यात यावा असे ठरले होते स. सदस्यांनी मत मांडावे.

**श्री. संजय जोशी :** उद्यानातील वाघाचा मृत्यू झालेला आहे. त्या वाघाची नखे व कातडे कोठे याचा खुलासा करुन पोस्ट मॉर्टम (पी.एम.) कोणी केले. याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** या बाबत मा. उपआयुक्त चौकशी करतील व सभागृहाला अहवाल सादर करतील.

**पशुधन विकास अधिकारी :** सदर प्राण्यांचे पोस्ट मॉर्टम करण्यासाठी तज्ञ व्यक्तींचा सल्लानुसार करण्यात आलेले आहे. नखे व कातडे सुरक्षित ठेवण्यात आलेले आहे.

**मा. आयुक्त :** मागील बैठकीत सिध्दार्थ उद्यानातील प्राण्यांसाठी बिफ/ मटन ९ रु. प्रमाणे असलेलेचा प्रस्ताव डावलुन पुन्हा :दर पत्रके मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचा फेर विचार करण्यात यावा ९ रु. प्रमाणे मिळणारे बिफ मिळते तर प्रस्ताव प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. सिध्दार्थ उद्यानात प्राण्यांना उपाशी ठेवु शकत नाही. आयुक्तांच्या अधिकारात कमी दराची निविदाधारकांकडुन घेण्यात येते. प्राण्यांसाठी खन्नीचे मटन घ्यावयाचे असेल तर १५ रु. प्रमाणे मिळेल.

**मा. सभापती :** प्राण्यांना चांगले खाद्य मिळावे हा उद्देश समोर ठेवून खन्नी मटन १५/- प्रमाणे घेण्यात यावे. त्यास मान्यता देण्यात येते.

**पशुधन अधिकारी :** सद्याचे निविदाधारक रु. ९/- प्र. किलो प्रमाणे बिफ (मांस) पुरवठा करीत आहे. त्यांनी रु. १५/- प्र. किलो प्रमाणे खन्नी बीफ देण्यांच्या लेखी संमती दिली आहे.

**श्री. गौतम लांडगे :** प्राण्यांसाठी निविदापत्रात उसाचा भाव १४५०/- एवढा जास्त भावाने कसा घेतला इतर कोठेही जास्तीचा भाव नाही.

**पशुधन विकास अधिकारी :** ५० किलो ऊस दररोज लागते. त्यांची किंमत रु ७०/- होते. सर्व सिझन मध्ये पुरवठा करावा लागतो एकुण २,०००/- हजार रुपयाचा ऊस दर महिनयाला लागते.

**मा. सभापती :** वरील प्रमाणे मंजुरी देण्यांत येते . तसेच विषय क्र. ३९९/२१ मध्ये स. नगरसेवक यांच्या स्वेच्छानिधी मधुन बेरोजगार लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी मागविण्यांत आलेल्या दरामध्ये महाराष्ट्र मोटार ड्रायव्हींग स्कुल यांच्या नांवासमोर रकान्यात नं. २ मध्ये अपात्र असे दर्शविण्यांत आले तरी प्रत्यक्षात संबंधित संस्थेकडे चार वाहने असल्यामुळे महाराष्ट्र ड्रायव्हींग स्कुल खुलताबाद यांचेकडे प्रति प्रशिक्षणार्थी रु. १४५०/- प्रमाणे प्रशिक्षणार्थी पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. अशी दुरुस्ती करणेत येते.

**ठराव :**

दि. ५.१२.९८ चे इतिवृत्त कायम करतांना सभागृहात झालेल्या चर्चेनुसार
१) ठराव क्र. ३७८/३९ मध्ये अ. क्र. १ अन्वये बीफ तसेच खन्नी मांस पुरवठा करिता पुन्हा निविदा मागविण्यांत यावे व यापैकी संग्रहालयातील प्राण्यांना जे मांस योग्य असल्याचा पुरवठा करण्यांत यावा असा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी सभागृहातील चर्चेनुसार सिध्दार्थ उद्यानातील प्राण्यांना सन ९८-९९ वर्षाकरिता बीफ पुरवठाधारकाकडुन त्यांना दिलेल्या लेखी संमतीनुसार प्रति किलो रु. १५/- या प्रमाणे खन्नी बीफ पुरवठा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
२) महाराष्ट्र ड्रायव्हींग स्कुल खुलताबाद यांच्याकडे चार वाहने असल्यामुळे नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन बेरोजगारस प्रशिक्षण देणेसाठी पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अशी वाढ ठराव क्र. ३९९/२१ मध्ये करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वरिल दुरुस्ती व वाढ यासह दि. ५.१२.९८रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४०२/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, अंजली टॉकीज ते नेहरुभवन या रस्त्यावरील विद्युतीकरणाचे विस्तारीत कामाचे रक्कम रु. १,८६,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च "विद्युत देखभाल व दुरुस्ती " या लेखा शिर्षामधुन करण्यांत येईल.

करिता र. रु. १,८६,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अंजली टॉकीज ते नेहरुभवन या रस्त्यावरील विद्युतीकरणाचे विस्तारीत कामासाठी र. रु. १,८६,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०३/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, कोतवालपुरा व भोईवाडा विभाग क्र, २ मधील मोहल्लयातील गल्लयात शहाबादी फरशी बसविणेच्या कामासाठी दिनांक २०.०६.९८ च्या स्थायी समिती सभा ठराव क्र. ६७/२५ अन्वये अंदाजपत्रक र. रु. ९,८६,२११/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४१/९८ दि. ७.८.९८ चे निविदासुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण १७ (सतरा) निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण २ (दोन) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुखबीर सिंग चंडोक | २८.५०% कमी दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | १३.१०% कमी दराने |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा २८.५०% कमी दराची श्री. सुखबीरसिंग चंडोक यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** शहाबाद फरशी बसविणे बाबतचे कमी जास्त दराने अंदाजपत्रक आलेले आहेत. जे कमी दराने आहे ते विषय मंजुर करावे जे जास्त दराचे आहेत. त्यांचे फेर निविदा मागविण्यांत यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** विषय क्र. ३ व ४ मधील कमी दराने अंदाजपत्रक आहे ते मंजुर करण्यांत यावे.

**मा. आयुक्त :** शासकीय अनुदानातील ८ कोटीपैकी १ कोटी झोन ३, ४ साठी अरुंद गल्लीमध्ये फरशी बसविण्याच्या कामासाठी खर्च करण्यास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. फरशी मटेरियल हे महापालिका मार्फत खरेदी करण्यांत येणार आहे.

**श्री. विश्वारोद्दीन :** ज्या ठिकाणी खंडकी नाही त्या ठिकाणी फरशी बसविण्यांत यावी.

**मा. सभापती** : ज्या ठिकाणी आवश्यकता आहे तसेच ५ फुटाच्या आत जो रस्ता असेल त्या ठिकाणी फरशी बसविण्यात येईल. याबरोबर विषय क्र. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ च्या कामासाठी पुन्हा निविदा मागविण्यांत यावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४०४/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग २ अंतर्गत मिलकॉर्नर, नारळीबाग, नागेश्वरवाडी, पैठणगेट व इतर मोहल्लयातील गल्लयांत शहाबाद फरशी बसविणे च्या कामसाठी दि. २६.०६.९८ च्या स्थायी समिती ठराव क्र. ६८/२६ अन्वये अंदाजपत्रक र. रु. ९,९३,२५५/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदासुचना क्र. मनपा/लेखा/नि/४१/९८ दि. ७.८.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण १९ (एकोणाविस) निविदा विक्री झाल्या. पैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण ५ (पाच) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्ही. जी. स्वामी | ३६.०९ % कमी दराने |
| २. | श्री. आर. बी. चव्हाण | १८.१ % कमी दराने |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | १५.८६ % कमी |
| ४. | मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन | १५.०७ % कमी |
| ५. | मे. श्रीराम कंन्स्ट्रक्शन | ०७ % कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं. प. दरापेक्षा ३६.०९% कमी दराची श्री. व्ही. जी. स्वामी यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर कामा करीता पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४०५/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव दिला की, विभाग क्र. ३ मधील भवानी नगर भागात अंतर्गत मोहल्लयातील रस्त्यावर शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,३२,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१६) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ३ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. एस. ए. नवाब | ०३.३०% | जास्त दराने |
| २) | श्री. अब्दुल सलाम | ०६ % | जास्त दराने |
| ३) | मे. एस. एच. आसोसिएट्स | ०७ % | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. एस. ए. नवाब यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०३.३०% जास्त आहेत. परंतु मा. आयुक्तांनी दरापेक्षा १% कमी कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामा करिता पुन्हा दरपत्रक मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४०६/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विभाग क्र. ३ मधील गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी, काचीवाडा येथील अंतर्गत मोहल्लयात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामसाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१८) निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त ३ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मोना कंन्स्ट्रकशन | ०.०२% | कमी दराने |
| २. | मे. ए. आर. कंन्स्ट्रकशन | ०५% | जास्त दराने |
| ३. | श्री. राजेंद्र वर्दे | ०८% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. मोना कंन्स्ट्रकशन कं . यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०२% कमी आहेत. परंतु मा. आयुक्तांनी सदरील काम ०.०२% कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास मान्यता दिली आहे.

तरी मे. मोना कंन्स्ट्रकशन यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४०७/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विभाग क्र. ३ अंतर्गत मकसुद कॉलनी, करीम कॉलनी, मुजीब कॉलनी अंतर्गत मोहल्लयात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ९,९३,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत २१ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त (०२) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एम. जे. कंन्स्ट्रकशन | ०.०१% कमी दराने |
| २) | श्री. कुलवंतसिंग | ०.२% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापेकी मे. एम. जे. कंन्स्ट्रकशन यांचे निविदा दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०१% कमी आहेत. परंतु मा. आयुक्तांनी सदरील काम ०.०१% कमी दराऐवजी अंदाजपत्रक दरोपक्षा १% कमी दराने करुन घेण्यास मान्यता दिली आहे.

तरी मे एम. जे. कंन्स्ट्रकशन यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रक दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४०८/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विभाग क्र. ३ अंतर्गत दादाकॉलनी, आजम कॉलनी, नेहरुनगर येथील अंतर्गत रस्त्यावर शहाबाद फरशी बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ९,५६,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१६) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. एस. चंद्रपॉल | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | श्री. एस. एम. मंडोर | ०६.००% जास्त दराने |
| ३) | श्री. एस. ए. नवाब | ०८.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. एस. चंद्रपॉल यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने आहेत. परंतु मा. आयुक्त यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास मान्यता दिली आहे.

तरी मे. एस. चंद्रपॉल यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४०९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विभाग क्र. १ मधील प्रगतीकॉलनी, शांतीपुरा, बेगमपुरा अंतर्गत मोहल्लयातील गल्लयात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ९,११,२००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१६) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत यापैकी फक्त (२) कोरी निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | ०.०१% कमी दराने |
| २) | मे. रस्सी कन्स्ट्रक्शन | ०.५ % जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% टक्के कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास मान्यता दिली आहे.

तरी मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४१०/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांन प्रस्ताव दिला की, विभाग क्र. ३ मधील शहाबाजार चाऊस कॉलनी, बारी कॉलनी अंतर्गत मोहल्लयातील रस्त्यावर शहाबाद फरशीबसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ९,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१५) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त (२) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | मे. आकाश कंन्स्ट्रक्शन | ०५% जास्त दराने |

वरिल प्राप्त निविदापत्रकापैकी मे. बसरा कंन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदापत्रकीय दराने आहेत परंतु मा. आयुक्त यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास मान्यता दिली आहे.

तरी मे. बसरा कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेलल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४११/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विभाग क्र. २ मधील औरंगपुरा बोहेरी कठडा अंतर्गत मोहल्लयातील रस्त्यावर शहाबाद फरशीबसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ७,८१,७२२/- या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण (१३) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त (३) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. शेख शरीफ | ०.०५% | कमी दराने |
| २) | श्री. एस. एम. मंडोरे | २.००% | जास्त दराने |
| ३) | मे. सुंदर कंन्स्ट्रक्शन | ५.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. शेख शरीफ यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी आहेत. परंतु मा. आयुक्त यांनी सदरील काम ०.०५% कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास मान्यता दिली आहे.

तरी श्री. शेख शरीफ यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०१% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा दरपत्रक मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४१२/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विभाग क्र.१ मधील जयसिंगपुरा, मुर्गीनाला, लोटाकांरजा, बुढीलेन अंतर्गत मोहल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ८,४७,२८४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाला आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त (२) निविदापत्रके दरभरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | मे. | शहा कंन्स्ट्रक्शन कं. | ०.०५% | कमी दराने |
| २) | मे. | हायवे कंन्स्ट्रक्शन | २०% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. शहा कंन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी आहेत. परंतु मा. आयुक्त यांनी सदरील काम ०.०५% कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास मान्यता दिली आहेत.

तरी मे. शहा कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० %कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामा करिता पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४१३/१३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि. ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्लीगेट ते मकाईगेट पर्यंत ४५० मी.मी. व्यासाची एम. एस. जलवाहिनी टाकावयाची आहे त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन ९७-९८ च्या दरसूचीनुसार र. रु. ३८,७०,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत येवुन त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ७७/९८ जी की, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिद्धीस देण्यांत येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण एकवीस (२१) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणे या नियोजीत तारखेस एकुण सात (७) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या निविदा हया खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स. अथार अली | १७.७१% कमी |
| २) | ए. जी. कोठारी | ११.५% कमी |
| ३) | मे. खर्डीकर | १८.६०% कमी |
| ४) | श्री. शेख मसूद | २५.८५% कमी |
| ५) | श्री. डी. अजितसींग | अंदाजपत्रकीय दर |
| ६) | व्ही. आर. महाजन | २१.७६८%कमी |
| ७) | श्री. एस. पी. बोर्डे | ३.४ % कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. शेख मसुद यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.८५% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. शेख मसुद यांनी अंदाजपत्रकिय दरापेक्षा २५.८५% कमी दाराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर. सदरील खर्च शासकीय अनुदानातुन केला जाईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेट ते मकईगेट पर्यंत ४५० मीमी व्यासाची एस.एस. जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकचे दरापेक्षा २५.८५% कमी दराच्या श्री. शेख मसुद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१४/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कीख मो. चिकलठाणा येथे सभागृह बांधणेसाठी र. रु . ११,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. १५.०७.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरील काम मा. ना. श्री. हरीभाऊ बागडे मंत्री महोदय द्वारा व मा. आ. श्री. शालीग्रामजी बसैये यांचे निधीतुन स्थानिक विकास कार्यक्रम ९८-९९ अंतर्गत करण्यांत येणार आहे. सदरील कामास्तव आदेश क्र. ४७४ दि. १.७.९८ अंतर्गत जिल्हा अधिकारी कार्यालया मार्फत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. (रु. ११ लाख पैकी रु. १ (एक) लाख महानगरपालिका फंडातुन मान्यता देणे आवश्यक आहे.)

त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/४१/९८ दि. ७.८.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २७ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम

तारखेपर्यंत एकुण ११ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २.९.९८ रोजी उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मो. अहमद सिद्दीकी | ८.२०% | कमी दराने |
| २) | भगवान लांडगे | ११.२% | --//-- |
| ३) | एन. व्ही. पाठक | १२.५८% | --//-- |
| ४) | सु. रा. काकडे | ९.५१% | --//-- |
| ५) | सुजात अली हाश्मी | ११% | --//-- |
| ६) | आर. बी. साळवे | ७.८६% | --//-- |
| ७) | विनय खैरनार | ११% | --//-- |
| ८) | परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | १५.३३% | --//-- |
| ९) | विपुल कंन्स्ट्रक्शन | १५.५७% | --//-- |
| १०) | मुबारक पठाण | १६.०२% | --//-- |
| ११) | व्ही. जी. स्वामी | १६.९९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दराची निविदा दर श्री. व्ही. जी. स्वामी यांचे प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार श्री. व्ही. जी. स्वमी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दराचे निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथे सभागृह बांधण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६.९९% कमी दराच्या श्री. व्ही. जी. स्वामी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१५/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ५६ काबरा उद्यान येथे पाण्याचा हौद वॉचमेन निवासस्थान तयार करणे पुर्वेकडील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे रंगरंगोटी करणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन ९७-९८ चे दर सुची नुसार र. रु. २,००,१००/- चे तयार करण्यांत आले असुन सदर कामाचा खर्च नवीन उद्यान या तरतुदी अंतर्गत प्रस्तावीत आहे. सदर कामासाठी मा. आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब वरीलप्रमाणे कामाचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५६ काबरा उद्यान येथे पाण्याचा होद, वॉचमन निवास पुर्वेकडील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे, रंगरंगोटी करणे इ. कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,००,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>ऐनवेळचे विषय :</u>**

**विषय क्र. ४१६/१ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या शाळेच्या काही इमारती भाडयाने घेण्यात आलेल्या आहेत. या खाजगी इमारतीचे भाडे भाडे

समितीच्या दि. १०.११.९८ च्या बैठकीत शाळा निहाय याप्रमाणे भाडे निश्चिती करण्यांत आलेली आहे.

१) प्राथमिक शाळा वाल्मी

वाल्मी प्रशासनाने विनंती केल्याप्रमाणे शाळा सुरु करण्यांत आल्यामुळे वाल्मी प्रशासनास कोणत्याही प्रकारचे भाडे देण्यांत येऊ नये.

२) कैसर कॉलनी

श्रीमती नसीम बानो यांच्या मालकीची इमारत शाळेसाठी भाडयाने घेतलेली असुन त्या करिता द.म. १८४०/- (कराशिवाय) किंवा रु. २८००/- करासहीत निश्चित करण्यांत आले.

३) हनुमान नगर

श्री. शिंदे यांच्या मालकीची इमारत शाळेसाठी भाडयाने घेतलेली असुन त्याकरीता दरमहा रु . १६००/- (कराशिवाय) किंवा २४००/- (करासह) निश्चित करण्यांत आले.

४) विठ्ठलनगर

पुर्वीच्या ९३२/- रु. दरमहा भाडयात १०००/- रुपये (कर वगळून) भाडे निश्चित करण्यांत आले.

५) पुर्वीच्या ५५०/- दरमहा भाडयात ८००/- (करासहित) भाडे निश्चित करण्यांत आले.

सदर बाबीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या सभेपुढे मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भाडे समिती निश्चित केलेल्या भाडयानुसार महानगरपालिकेच्या शाळेसाठी खालील खाजगी इमारती भाडयाने घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) प्राथमिक शाळा वाल्मी

वाल्मी प्रशासनाने विनंती केल्याप्रमाणे शाळा सुरु करण्यांत आल्यामुळे वाल्मी प्रशासनास कोणतयाही प्रकारचे भाडे देण्यांत येऊ नये.

२) कैसर कॉलनी

श्रीमती नसीम बानो यांच्या मालकीची इमारती शाळेसाठी भाडयाने घेतलेली असुन त्याकरीता द.म. रु. १८४०/- (कराशिवाय) किंवा २८००/- करासहित निश्चित करण्यांत येते.

३) हनुमाननगर

श्री. शिन्दे यांच्या मालकीची इमारत शाळेसाठी भाडयाने घेतलेली असुन त्याकरिता दरमहा रु. १६००/- (कराशिवाय) किंवा २४००/- (करासहित) निश्चित करण्यात येते.

४) विठ्ठलनगर

पुर्वीच्या ९३२/- रु. दरमहा भाडयात १०००/- रुपये (करवगळुन) भाडे निश्चित करण्यात येते.

५) पुर्वीच्या ५५०/- दरमहा भाडयात ८००/- (करासहित) भाडे निश्चित करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रेयनगर ते सहकारनगर या रस्त्यावर ह्युम पाईप कलव्हर्ट बांधणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक

बांधकाम खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,३७,३४५/- चे तयार करण्यांत आले असुन सदरील खर्च सन १९९८-९९ च्या "नविन खडी रस्ते " या लेखा शिर्षकातन करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रेयनगर ते सहकारनगर या रस्त्यावर ह्युम पाईप कल्व्हर्ट बाधंणे या कामासाठी रक्कम रुपये ४,३७,३४५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१८/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, न्यु नंदनवन कॉलनी, पदम्पानी सोसायटी, भुजबळनगर येथ्रील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक ९.१०.९८ च्या स्थायी समितीमध्ये ठराव क्र. २७७/२० अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ६,०१,४९२/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना/मनपा/लेखा/नि/८१/९८ दिनांक १३.११.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१२) बारा निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | डी. जग्गी | ०.१५% कमी दराने |
| २) | श्री. मो. अहमद सिद्दीकी | ०५.% जास्त दराने |
| ३) | श्री. एच. ए. पालेना | ०७.% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकांचे दरापेक्षा ०.१५% कमी दराचे श्री. डी. एस. जग्गी यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** विषय क्र. २ ते १० मध्ये डांबरीकरण करण्याबाबतचे असुन सर्व अंदाजपत्रके जास्त दराने आलेले आहे. पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे. एक वर्षापासुनसर्व निविदा २० ते २२% कमी दराने येतात. कोणत्या वर्षाचे किती व कसे टेंडर यावयास पाहिजे काहीही ताळमेळ लागत नाही. मागील २-३ वर्षाचे डी.एस. दराचे निविदा कमी जास्त दराने येतात.

**अति. शहर अभियंता :** गुत्तेदाराने टेंडर भरलेले आहे. मागील वर्षीच्या डी.एस. आर. प्रमाणे अंदाजपत्रक दर्शविलेले आहे. नविन डी. एस. आर. प्रमाणे १% किंवा अंदाजपत्रकीय दराने केलेले आहेत.

**श्री. संजय जोशी :** सर्व जास्तीच्या दराचे निविदा आहे पुर्न:निविदा मागविण्यांत यावे.

**श्री. गौतम लांडगे :** जुन मध्ये २०.२२% कमी दराने अंदाजपत्रक आलेले आहे. ९६-९७, ९७-९८ च्या डी.एस.आर. दराची तुलना केली असता १.१% दराने कमी येते. फरशीप्रमाणेच डांबरीकरण अंदाजपत्रक आलेली आहे. सर्वच्या सर्व रिकॉल करावे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी येत असुन पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावी.

**मा. सभापती :** ३, ४, ५, ६, ७, ८ रिकॉल करण्यांत येतात.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा निविदा मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४१९/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, पहाडसिंगपुरा कला को. हॉ. व लायब्ररिन सोसायटी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक ९.१०.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २७२/२६ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ४,३०,११९/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/८१/९८ दिनांक १३.११.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१४) चौदा निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेचया नियोजीत तारखेस (०४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. के. बी. पाथ्रीकर | ४.५१% | जास्त दराने |
| २) | श्री. एच. ए. पालेजा | १०% | जास्त दराने |
| ३) | श्री. मो. अहमद सिद्दीकी | १५% | जास्त दराने |
| ४) | श्री. ए. सी. कोठारी | १६% | जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टयासाठी कमी व अंदाजपत्रकाचे दरोपक्षा ०४.५० जास्त दराने श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा असुन त्यांनी दिलेल्या दराऐवजी म्हणजे ४.५१% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करणेसाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाबाबत पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२०/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रेटीपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ४,२६,७००/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास दि. ९.१०.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २५९/१३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८३/९८ दिनांक १३.११.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता एकुण विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (११) तेरा निविदा विक्री झाल्या त्यापेकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण (०४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. ए. सी. कोठारी | २.९० % | जास्त दराने |
| २) | श्री. मो. अहमद सिद्दीकी | ०५ % | जास्त दराने |
| ३) | श्री. के. बी. पाथ्रीकर | ०६ % | जास्त दराने |

४) श्री. डी. एस. जग्गी १२ % जास्त दराने

तुलनात्मक कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २.९०% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकिय दराने सदरील कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. ए. सी. कोठारी यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाबाबत पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२१/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सिटीचौक ते किलेअर्क पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये ८,०१,९६२/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास दिनांक १६.१०.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २९६/४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/८१/९८ दिनांक १३.११.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१४) चौदा निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण (०४) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. ए. सी. कोठारी | १५% | जास्त दराने |
| २) | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | १५% | --//-- |
| ३) | मो. अहमद सिद्दीकी | १०% | --//-- |
| ४) | श्री. एच. ए. पालेजा | ११% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकियचे दरापेक्षा ०५% जास्त दराने मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा असुन त्यांनी निविदेत दिलेले दर ०५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करणेस्तव प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाबाबत पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२२/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, दादाकॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक १९.८.९८ च्या सर्व साधारण सभेमध्ये विषय क्र. ६२/३ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. १३,२५,०००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र, मनपा/लेखा/नि/५७/९८ दिनांक २२.९.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण सात निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस

(०६) सह निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. मॉस्कट कंन्स्ट्रक्शन कं. | १७% जास्त दराने |
| २) | मे. रे. कंन्स्ट्रक्शन कं. | २०% जास्त दराने |
| ३) | श्री. के. बी. पाथ्रीकर | २२% जास्त दराने |
| ४) | श्री. ए. सी. कोठारी | २२.०१% जास्त दराने |
| ५) | श्री. एम. ए. सिद्दीकी | २२% जास्त दराने |
| ६) | श्री. चॉदराम आशान्ना | २५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त दराने मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा आहे.

सदरचे कामासाठी सन १९९६-९७ व १९९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे केली असता सदरील काम १९९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे केली असता सदरील काम १९९७-९८ च्या दरसुचीनुसार १.१% कमी दराने येते.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त दराने मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा मंजुर करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाबाबत पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२३/८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सिध्दार्थनगर भागात डांबरी रस्ते तयार करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ११,३९,३९२/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद दरसुचि १९९७-९८ नुसार तयार करण्यांत आली असुन मा. आयुक्तांनी दि. २१.७.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली तसेच सर्व साधारण सभेचा विषय क्र. ६९/१० दि. १९.८.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १४.९.९८ पर्यंत एकुण १३ (तेरा) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी फक्त ६ (सहा) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि. ३१.१०.९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांना दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. डि. अजितसिंग | ४.९ % | जास्त अ. प. दरापेक्षा |
| २) | मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | ५.५ % | --//-- |
| ३) | श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ६.० % | --//-- |
| ४) | श्री. के. बी. पाथ्रीकर | ९.० % | --//-- |
| ५) | श्री. रे. कंन्स्ट्रक्शन | १५.० % | --//-- |
| ६) | श्री. मो. अहमद सिद्दीकी | २०.२२ % | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कम व अंदाजपत्रकिय दरापेक्षा ४.९% जास्त दराची श्री. डि. अजितसिंग यांची निविदा आहे. मा. आयुक्तांनी ४.९% जास्त ऐवजी अं. प. दराने मान्यता दिली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाबाबत पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२४/९ :**

कार्यकारी अभियंता सल्म यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्सुल गावं स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाचे अंदाजपत्रक रु. १४,२६,६३०/- या. मा. आयुक्त साहेब यांनी दि. ७.११.९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली व दि. १९.१२.९६ रोजी स्थायी समितीत प्रस्ताव क्र. १६८/नुसार मंजुर करण्यांत आला होता.

तद्नंतर मंजुर एजन्सी व्यंक्टेश कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.७८७% कमी दराने काम करुन घेण्यात आले काम प्रगतीपथावर असतांना व मंजुर नकाशा प्रमाणे डांबरीकरण मुळ काम पुर्ण करण्यांत आल्यानंतर येथील नागरीकांनी आग्रही मागणी तथा वार्डाच्या स. नगरसेविका व विद्यमान महापौर यांची विनंती वरुन मंजुर नकाशा व्यतिरिक्त वेदविदया प्रतिष्ठाण शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम करीत असलेली एजन्सीजकडुन काम करुन घेण्यात आले. वेदविदया प्रतिष्ठान शाळा ही येथील नागरिकांचे धार्मिक तसेच सामाजिक भावनेशी निगडीत असल्याने रस्ता जादा वापर आहे. मात्र पावसाळयात या रस्त्याची अवस्था खराब झाल्याने नागरिकांना त्रास होत असल्याने तसेच त्यावेळी निवडणुक अचार संहिता लागु होणार असल्याने नविन काम हाती घेण्यास विलंब झाला असता. एजन्सीचे दर १३.७८७% कमी दराचे असल्याने निविदा दर वगळता कामाचा खर्च हा रुपये १४,१०,९८७% येत असल्याने जो की मंजुर अंजदाजपत्रक रक्कमेच्या आत येतो.

वरील कारणाने कामाचा एकुण खर्च रुपये १६,३२,६२९/- म्हणजेच रु. २,०५,९९९/- अतिरिक्त झाला आहे. एजन्सीस मंजुर रक्कमेच्या हद्दीपर्यंत देयक अदा करण्यांत आले आहे. अंदाजपत्रकाचे दर हे सन ९५-९६ चे आहेत सन ९७-९८ दर सुचीचे तुलनेत हे दर कमी असल्याने व एजन्सी कमी दराने असल्याने तसेच निर्देशित केलेले काम गरजेचे असल्याने वाढीव काम करुन घेण्यात आले आहे. तरी वाढीव कामाचे खर्च रु. २,०५,९९९/- कार्योततर मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील नागरिक व संबंधीत नगरसेविका व विद्यमान महापौर यांची आग्रह मागणी विचारात घेता हर्सुल गांव स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या मुळ कामा व्यतिरक्त वेदविद्या प्रतिष्ठाण शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरणाचे वाढीव कामासाठी रक्कम रु. २,०५,९९९/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२५/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, जयसिंगपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक ९.१०.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २६३/१७ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ३,८९,०६३/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८१/९८ दिनांक १३.११.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत

तारखेस एकुण (१२) बारा निविदा विक्री आल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण (०३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. के. बी. पाथ्रीकर | ०४.११% | जास्त दराने |
| २) | श्री. ए. सी. कोठारी | १०% | जास्त दराने |
| ३) | श्री. मोहमद अहमद सिद्दीकी | १५% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०४.११% जास्त दराने श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा असुन त्यांनी निविदेत दिलेल्या ०४.११% जास्त दराच्या ऐवजी अंदाजपत्रकीय दराने सदरील कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. के.बी. पाथ्रीकर यांची निविदा वर प्रशासकीय केल्यानुसार मंजुर करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाबाबत पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२६/११ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि. ) यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला कोतवालपुरा येथे साईशंकर बंगल्यापासुन समर्थनगर नाला जंक्शनपर्यंत ८०० मीमी व्यासाची आर. सी. सी. पाईपची भूमिगत गटार बांधणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाच्या सन ९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय र. रु. १४,१८,०००/- ला सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता एकुण पंचवीस (२५) कोऱ्या निविदा, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत विक्री झाल्या. स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण दोन (२) निविदा दर भरुन सिलंबद प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१) श्री. नंदकुमार घोडले अ. प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराने

२) श्री. ए. व्ही. पिसोळकर अ. प. दरापेक्षा १५.००२% जास्त दराने

वरिलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. नंदकुमार घोडले यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची आहे.

संबंधित गुत्तेदारास दर वाटाघाटीसाठी बोलावले असता संबंधित गुत्तेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने करण्यास तयार आहे. अशा संमती दिला आहे. तरी मा. आयुक्तांनी संबंधीत अं. प. दरापेक्षा २% जास्त दरास दि. १५.१२.९८ ला मान्यता दिली आहे.

सबब सदर कामासाठी वाटाघाटी अंतीचा दर म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची श्री. नंदकुमार घोडले यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोतलवालपुरा येथे साईशंकर बंगल्यापासुन समर्थनगर नाला जंक्शनपर्यंत ८०० मीमी व्यासाची आरसीसी पाईपची भुमिगत गटार बांधण्याच्या कामासाठी निविदाधारक गुत्तेदाराबरोबर झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% जास्त दराने सदरील गुत्तेदार श्री. नंदकुमार घोडले यांचेकडुन करुन घेण्याचे मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२७/१२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल गांव येथील जलकुंभ भरण्यासाठी १५० मीमी व्यासाची डी. आय. के. ९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. २५,४३,१०९/- एवढयाचे तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समिती ठराव क्र. २४८/-१ दि. ९.१०.९८ अन्वये मंजुरी घेण्यांत आली आहे. कार्यालयीन निविदा सुचना क्र. ७९/९८ जी की, दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दहा (१०) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण सहा (६) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जी. आर. घोडले | ५.५५% | कमी |
| २) | मे. परफेक्ट कंन्स्ट्रकशन | २५.२५% | जास्त |
| ३) | मे. खर्डीकर कंन्स्ट्रक्शन | ३% | कमी |
| ४) | ए. व्ही. पिसोळकर | ५% | कमी |
| ५) | मे. सोहेल सिद्दीकी | ३०.५०% | जास्त |
| ६) | मे. आर. आर. कंन्स्ट्रक्शन | ३७.५० | जास्त |

वरिलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. जी. आर. घोडले यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रक दरापेक्षा ५.५५% कमी असा दर दिलेला आहे. सदर खर्च शासकीय अनुदानातुन केला जाईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे हर्सुलगांव येथील जलकुंभ भरण्यासाठी १५० मीमी व्यासाची डी.आ.के. ९ जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५.५५% कमी दराच्या श्री. जी. आर. घोडले यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२८/१३ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव साद केला की, नारेगांव येथे शहाबाद फरशी बसविणेकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. ६,५१,५०८/- सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसुची ९७-९८ अनुसार तयार करण्यांत आली असुन मा. आयुक्तांनी दि. ८.८.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असुन स्थायी समितीच्या विषय क्र. १८०/२५ दि. ९.१०.९८ रोजी मंजुरी मिळाल्यांनतर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १३.११.८ पर्यंत १२ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या अंतिम दि. ३०.११.९८ रोजी उपस्थित ठेकेदारांनी उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. शे. शरीफ | अंदापजत्रकीय दरापेक्षा | ०.१% | कमी |
| २) | चौधरी कंन्स्ट्रक्शन | --//-- | २% | जास्त |
| ३) | एम. व्ही. पिसोळकर | --//-- | ५% | जास्त |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा श्री. शेख शरीफ यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेंल्या चर्चेनुसार प्रस्तुत कामाकरिता पुन्हा दरपत्रके मागविण्यांत यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४२९/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, शिख युवक सेवासंघ औरंगाबाद यांनी अर्ज दवुन विनंती केली आहे की, औरंगाबाद शहरातील उस्मानपुरा येथील गोपाल टी सेंटर समोरील चौकांचे सौदयीकरण करुन त्यामध्ये गुरु गोविंदसिंग यांचे स्मारक उभारण्यांत यावे.

सदर प्रकरणी मा. आयुक्त यांचे दालनात शिख युवक सेवासंघ औरंगाबाद यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली असता, सदरील चौकाचे सौदर्यीकरण व त्यामध्ये गुरु गोविंदसिंग यांचे स्मारक उभरणीचे काम सदरील संघटनेने स्वखर्चाने करण्याची तयारी दर्शविली आहें.

सदरील चौकाचे सौदर्यीकरण व स्मारक उभारणेसाठी शिख युवक संघटना यांना खालील अटी बंधनकारक राहील.

१) विकसीत करण्यांत येणाऱ्या वाहतुक बेटामुळे वाहतुकीस कुठलाही अडथळा होणार नाही याची जबाबदारी सदरील संघटनेची राहील.

२) प्रत्यक्ष काम सुरु करण्यापुर्वी सदर कामाचे नकाशे व डिझाईन यास मा. पोलीस आयुक्त यांचे ना हरकत प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी सदरील संघटनेचीच राहील.

तरी वरील अटीस अधिन राहुन शिख युवक सेवा संघ यांना उस्मानपुरा येथील गोपाल टी सेंटर समोरील चौकाचे सौदर्यीकरण व त्यामध्ये गुरु गोविंदसिंग यांचे स्मारक उभारणे बाबत परवानगी देणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** सचिव यांनी प्रस्ताव वाचुन दाखवाववा (मा. सचिव प्रस्ताव वाचुन दाखवतात).

**श्री. गौतम लांडगे :** महानगरपालिका तर्फे शहरात शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, मौलाना अबुल कलाम अझाद संशोधन केंद्र बांधण्यात आले त्याचप्रमाणे गुरु गोविंदसिंग यांचे स्मारक महानगरपालिकेतर्फे उभारण्यात यावे.

**श्री. विधाते प्रभाकर :** या संदर्भात शिख युवक सेवा संघटनेचे नागरीक मा. आयुक्तांना भेटण्यासाठी आलेले होते प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. आयुक्त :** उस्मानपुरा गोपाळ टी सेंटर जवळ स्मारक उभारण्यासाठी जागा उपलब्ध असुन शिख सेवा संघटना हे स्मारक उभारण्यासाठी मंजुरी मागत आहे. या संदर्भात माजी महापौर श्री. गजानन बारवाल, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. विधाते यांनी या बाबत चर्चा करुन कुठल्याही भागात गुरु गोविंदसिंग यांचे स्मारक महानगरपालिका तर्फे उभारावे असे म्हणणे मांडले.

**श्री. गौतम लांडगे :** ज्या प्रस्तावात दुरुस्ती करुन शिख युवा संघटना यांना हे काम न देता महानगरपालिकेच्या माध्यमातुन हे स्मारक उभारण्यांत यावे अशी कार्यवाही प्रशासनाने करावी.

**मा. आयुक्त :** हा चौक शिख सेवा संघ यांचे माध्यमातुन विकसित करण्याबाबत माझ्या दालनात स. स. श्री. ओबेरॉय, श्री. बारवाल, श्री. विधाते, श्री. जैस्वाल यांचेसह चर्चा झाली. यात कोणतीही कटूता राहु नये म्हणुन ते महानगरपालिकेतर्फे करण्यांत यावे.

**मा. सभापती :** गुरु गोविंदसिंग यांचे स्मारक शिख युवा संघटना यांच्या तर्फे न बांधण्यात यावे अशी दुरुस्ती करण्यांत येऊन प्रस्ताव स्विकृतीसह मंजुर करण्यांत येते.

**श्री. संजय जोशी :** उद्या गुरु गोविंदसिंग यांची जयंती साजरी होत असुन सदर जागेवर भुमिपुजन करुन स्मारक उभारण्याच्या कामाची कार्यवाही करावी येत्या एप्रिल पर्यंत संपुर्णताः हे काम पुर्ण होऊ शकते. शिख संघाचे गुरु, महापालिका पदाधिकारी, अधिकारी यांच्या समवेत उद्याच कार्यक्रमांचे आयोजन करावे.

**मा. आयुक्त :** शिख सेवा युवक संघाने जो नकाशा दिला त्याच नकाशाप्रमाणे काम व्हावे.

**मा. सभापती :** गुरु गोविंदसिंग यांच्या स्मारक उभारण्याच्या भूमीपुजनाचा कार्यक्रमासाठी प्रशासनामार्फत शिख संघाचे गुरु यांना एक लेखी पत्र देऊन कळविले उद्या सायंकाळी ६.०० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावांचे संदर्भाने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे ज्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर, मॉलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्याबाबत कार्यवाही करण्यांत आली आहे त्याचप्रमाणे उस्मानपुरा येथील गोपाल टी सेंटर समोरील चौकात शिख युवा संघटनेच्या नकाशाप्रमाणे महानगरपालितर्फे गुरु गोविंदसिंग यांचे स्मारक उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३०/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भारत माता मंदीर, गुरुकूंज कॉलनी येथे संरक्षित भिंत बांधणे व इतर उर्वरीत कामे करणेचे अंदाजपत्रक रक्कम रु. ९.९० लक्षचे खालील प्रमाणे एकत्रीत रित्या सादर केले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संरक्षितभिंत व गेट - | ३.९० लक्ष | अंदाजपत्रक रक्कम |
| २) | पुतळयाभोवती मार्बल जाळी लाल ग्रेनाईट - | १.५० लक्ष | अंदाजपत्रक (अंदाजे) |
| ३) | साईट डेव्हलप्मेंट ओटा व छत्र | १.३० | --//-- |
| ४) | विद्युतीकरण | ३.२० लक्ष | --//-- |
| | | ------------------------------ | |
| | | एकुण : ९.९० लक्षचे | |

वरील प्रमाणे उर्वरीत कामे करणे बाबत एकत्रीत अंदाजपत्रक प्रस्तावीत करण्यात आले असुन सदर कामचा खर्च क्रिडासंकुल बांधकाम या तरतुदी अंतर्गत.

**संवाद :**

**श्री. विश्वारोद्दीन :** भारतमाता मंदीर कोठे आहे कोणी बांधले.

**शहर अभियंता :** सदर कामास मंजुरी मिळालेली असुन वाढीव कामासाठी हे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

**श्री. विश्वारोद्दीन :** विद्युत लाईटची कामे करण्यास बजेट नाही असे सांगण्यात येते सदर वाढीव प्रस्ताव येतो याचा खुलासा करावा.

**शहर अभियंता :**हे दुसऱ्या विभागाचे बजेट आहे.

**मा. आयुक्त :** प्रस्तावामध्ये मंदीराचा उल्लेख केला म्हणजे मंदीरासाठी सदर काम आहेत असा त्याचा अर्थ होत या ठिकाणी गैर समज करुन घेवू नये मंदीर मस्जीद असा वाद नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी, श्री. म. अ. रऊफ :** विद्युत लाईनचे काम करण्यास बजेट नाही म्हणता नवीन वाढीव प्रस्ताव कसे येतात याचा खुलासा करावा.

**श्री. विश्वारोद्दीन :** आम्ही ज्यावेळेस विद्युत कामाची मागणी करतो. त्यावेळी बजेट नसते. आमच्यासाठी असे होत नाही आमच्या मागणीकडे का लक्ष देत नाही.

**अति. शहर अभियंता :** स्ट्रिट लाईटची कामे करण्यास बजेट नाहीत. सदर काम भांडवली इमारती यातुन वळती करुन घेवुन विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी प्रस्तावित आहे.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यांत येते.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** माझ्या स्वेच्छा निधीतील संपुर्ण बजेट संपलेले असुन आत्यावश्यक ठिकाणी लाईटची कामे करण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारतमाता मंदीर गॅलरी येथे संरक्षित भिंत बांधणे व इतर प्रस्तावातील अ. क्र. १ ते ४ पर्यंतची कामे करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये ९.९०,०००/- च्या एकत्रित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३१/१६ :**

श्री. भरत जानराव देवकर, इमारत निरीक्षक महानगरपालिका औरंगाबाद यांच्या निलंबन आदेश रद्द करण्याबाबतच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**सवांद :**

**मा. सभापती :** यापुर्वी असे अपील मंजुर झालेले आहे. त्या धर्तीवर हे अपील मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

१) महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम नुसार ४८ तासापेक्षा जास्त कालावधीत पोलीस कस्टडीत होते. संबंधितांवर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधुन अद्याप सिध्द व्हावयाचे आहे.
२) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असुन कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातुनच देण्यांत येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यास निलंबीत ठेवुन ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.
३) उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायलयीन निर्णयाच्या अधिन राहुन रद्द करण्यांत येते. तसेच निलंबन काळ हा न्यायलयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहीत धरण्यांत यावा. संबंधितास कामावर रुजु करण्यांचे आदेश द्यावेत. प्रस्तावात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३२/१७ :**

दिनांक ३.१२.९७ ते २०.२.९८ पर्यंत केलेल्या कामाबद्दल वेतन मिळणेबाबत श्री. कैलास नवले लघुटंकलेखक यांच्या दि. ७.१२.९८ च्या अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव :**

श्री. कैलास नवले हे मिटींग विभागध्ये लघुटंक लेखक म्हणुन काम करित आहेत. प्रस्तावात दर्शविल्यानुसार दि. ३.१२.९७ ते २०.२.९८ या ८० दिवसांचे कार्यालयीन आदेश नसल्यामुळे श्री. नवले यांना या कालावधीचे वेतन देण्यांत आलेले नाही. त्यांच्या अर्जानुसार त्यांनी वरील कालावधीत पुढील मुदतवाढ मिळेल या आशेवर कार्यालयात काम केल्याचे दिसुन येत असल्याने श्री. नवले, लघुटंकलेखक यांना उपरोक्त ८० दिवसांचे वेतन नियमानुसार देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वेधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय :</u>

**विषय क्र. ४३३/१८ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्यूरो यांनी श्री. शेख मुनीर शेख चाँद, दुय्यम आवेक्षक व अ. नसीर अ. अजीज, पाणी पुरवठा मजुर, झोन क्र. २ मनपा औरंगाबाद यांचे विरुद्ध न्यालयात खटला दाखल करण्यासाठी परवानगी मागितली आहे. संबंध प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती :** मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्यूरो यांनी श्री. शेख मुनीर चाँद दुय्यम आवेक्षक व अ. नसीर अजीज, पाणी पूरवठा मजूर, झोन क्र. २ मनपा औंरगाबाद यांचे विरुध्द न्यायलयात खटला दाखल करण्यासाठी परवानगीस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा. सभापती |
| महानगरपालिका औरंगाबाद. | स्थायी समिती, |
| | महानगरपालिका, औंरगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## दिनांक ८.१.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

**शुक्रवार दि. ८.१.९९ रोजी मा. सभापती श्री. जयवंत (बंडु) ओक यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न तिचे इतिवृत्त. बैठकीची सुरुवात "वंदेमात्‌रम" या गिताने दुपारी ४.०० वाजता झाली. बैठकीस अधिकारी वर्ग व खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २) स. स. श्री. म. अ. रऊफ म. अ. माबुद | --//-- |
| ३) स. स. श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ४) स. स. श्री. संजय जोशी | --//-- |
| ५) स. स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ६) स. स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ७) स. स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| ८) स. स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ९) स. स. श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| १०) स. स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ११) स. स. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| १२) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर | --//-- |
| १३) स. स. श्री राजकुमार बचाटे (मामा) | --//-- |
| १४) स. स. श्री. विश्वारोद्दीन वि. खुदबोद्दीन | --//-- |
| १५) स.स. श्री. स. अ. एकबालोद्दीन स. मो. कुतूबुद्दीन | --//-- |

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** मुंबई येथील सहयाद्री विद्या मंदीर येथील शालेय विद्यार्थ्याच्या सहल बसला पैठण-औरंगाबाद रस्त्यावर अपघात होऊन त्या काही विद्यार्थी तसेच शहरातील मजुराचा मृत्यु झाला त्या निमित्त त्यांना सभागृहात ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत येते. (याच वेळी सभागृहात ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहुन शालेय विद्यार्थी तसेच मजुर यांचे मृत्यु बद्दल श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्री. संजय जोशी :** औरंगाबाद महानगरपालिकेचे प्राणी संग्रहालय इतर महाराष्ट्रातील प्राणी संग्रहालयापेक्षा अतिशय सुंदर असे असुन येथे बाहेरील देशी विदेशी लोक भेट देण्यासाठी येतात. चांगले प्राणी संग्रहालय आहे असे नाव भरभराटीवर असतांना प्राणी संग्रहालयातील एकुण तीन वाघ मृत्युमुखी पडले. पिवळया रंगाचा शेरु वाघाचा मृत्यु संदर्भात प्रशासनामार्फत या बैठकीत खुलासा करणार होते. त्यातच दुसरे आणखी दोन पांढऱ्या वाघाचा मृत्यु झाले. याबाबत शहरात वेगवेगळी चर्चा होत असुन याचे नेमके कारण काय खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी हे वाघीनी रक्त तपासणीचे कार्यवाही करण्याचे काम करत असुन मा. उपआयुक्त (म.) हे खुलासा करतील.

**उपआयुक्त (म.) :** सिध्दार्थ उद्यानातील पिवळया वाघाचा मृत्यु दि. १.९.९८ रोजी झ ालेला असुन मागील महिण्यात २ १/२ महिन्याचा पांढरा बछडा मृत्युमुखी पडला. पिवळा व दोन पांढऱ्या वाघाचा मृत्यु झाला त्यापैकी एक पांढरा बछडा आवारात खेळता खेळता अचानक मृत्यु पावला प्रशासनामार्फत डॉ. रझवी यांनी पोस्ट मॉर्टम दुसऱ्या दिवशी १०.३० वा. केले पशु वैद्यकीय अधिकारी यांनी तोस्कोलॉजी, पॅथॉलॉजी, बल्ड सॅन्टीरा ई. चे ३ नमुने तपासणीसाठी पाठवले याच दिवशी दुसऱ्या पांढऱ्या अडीच वर्षाच्या बहादुर नावाचा वाघाचा मृत्यू झाला यावेळी मा. आयुक्त तसेच पशुवैद्यकीय सहसंचालक त्याठिकाणी उपस्थित होते. सदर मृत वाघाची तपासणी केली असता युरीया वाढला त्यामुळे वाघाची शरीरातील किडणी खराब झाल्याचे निष्पन्न झाले. तपाणणीसाठी मुंबईहुन, डॉ. समद परभणीहुन डॉक्टरांना पाचारण करण्यात आले होते. झु. सजेशन असुन त्यास अतिरिक्त सॅनीटॅकशन हे महत्त्वाचे म्हणुन वाढ करावी लागणार आहे. संपूर्ण अहवाल लॅबरटरीज टेस्ट नुसार कळविण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** वाघाच्या किडण्या खराब झालेल्या आहेत. परभणी, मुंबई येथील तज्ञ डॉक्टरांना तपासणीसाठी पाचारण करण्यात आले औरंगाबाद तज्ञ डॉक्टरांचा तुर्त सल्ला का घेण्यात आला नाही तसेच पोस्ट मार्टम् करतांना पूर्ण गुप्तता पाळली गेली काय? खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** औरंगाबाद पशुवैद्यकीय दवाखान्यातील तज्ञ डॉ. श्री. डोईफोडे, श्री, भालेराव तसेच डॉ. भुजबळ यांनाही तपासणीसाठी बोलावण्यात आलेले होते. डॉ. समद हे परभणीला मेडीसीन विभागाचे तज्ञ म्हणुन सेवेत होते. त्यांना या अगोदर अशाचा घटनामध्ये सिध्दार्थ उद्यान बोलवण्यात आले होते. त्यांना याबाबत चांगल्या प्रकारे अनुभव आहे. तसेच आपल्या शहरातील सर्व तज्ञ डॉक्टर्स होते.

**श्री. संजय जोशी :** एखादया व्यक्तींचा अपघात झाल्यावर पोलीस विभागाकडुन गुप्तता पाळली जाते. तशा प्रकारची गुप्तता पाळली गेली नाही. त्यास बंद करुन मा. आयुक्त, उपआयुक्त यांच्या सहया घेतल्या गेलेल्या नाही.

**श्री. गौतम लांडगे :** तिनच महिन्यापुर्वी पिवळाय रंगाच्या वाघाचा मृत्यू झाला त्याची चौकशी चालु असतानांच मागील आठवडयात दोन पांढऱ्या वाघाचा अचानक मृत्यू होतो तीन महिन्यात तीन वाघ मरतात या प्राण्यांना खुले आम खेळण्यांसाठी सोडतात त्या जागेवर व परीसरात साफसफाई नाही काय ? जे सर्पदंशाने वाघाचा मृत्यू झालेला आहे असे वृत्तपत्रात बातमी छापुन आलेली आहे. याक डे प्रशासनाचे लक्ष असावे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी सभागृहाम आलेले नाहीत माहिती घेऊन यापैकी दोन वाघ हे आजारी आहेत त्यांचे उपचार चालु आहे माहिती घेऊन पोस्ट मार्टमचा अहवाल येईल. त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**श्री. संजय जोशी :** मागील वाघाच्या बाबत सभागृहात चर्चा होऊन अद्याप अहवाल दिलेला नाही. माझा असा आरोप आहे की, कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे प्राणी संग्रहालयातील प्राणी मृत्यूमुखी पडतात.

**श्री. गौतम लांडगे, श्री. प्रभाकर विधाते :**काही दिवसानंतर प्राणी संग्रहालयात एकही वाघ दिसणार नाही. अशी वेळ येऊ नये करीता संबंधीत अधिकारी यांना बोलावून सविस्तर खुलासा घ्यावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांना खुलासा करण्यासाठी बोलवलेले आहेत पर्यंत दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयात शहरातील संग्राहक श्री. रमेश मोतीलाल ऋणवाल या व्यक्तीकडे शिवकालीन जुन्या एकुण १५५१ नाणी आहेत त्या नाणी संग्रहालयात ठेवण्यासाठी देण्यास कबुल असुन श्री. लामतुरे यांना ज्या अटी व शर्तीनुसार मान्य केले त्याचप्रमाणे यांनाही मान्यता द्यावी. डॉ. पूरवार यांनी देण्याचे कबूल केलेले आहे.

**मा. सभापती :** जुन्या नाणी आहेत, विना मुल्य संबधित व्यक्तीं त्या नाणी देण्यास तयार असेल तर घेण्यास हरकत नसावी.

**अति. शहर अभियता :** सर्वोच्च समिती म्युझियमचे डॉ. पूरवार यांनी जया दालनात नाणी ठेवल्या आहेत त्याच्या व्यतिरिक्त श्री. ऋणवाल यांच्याकडे नाही असतील त्याची तपासणी करुन घेण्यास हरकत नसावी.

**मा. सभापती :** श्री. ऋणवाल हे विनामुल्य नाणी देत आहेत. श्री. लामतुरे यांच्या कराරप्रमाणे नाणी घेण्याची कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे, श्री, प्रभाकर विधाते :**सर्वोच्च समितीकडे जी नाणी नसतील ती नाणी श्री. ऋणवाल यांच्याकडुन घेण्यास नसावी.

**मा. सभापती :** छत्रपती शिवजी महाराज वस्तु संग्रहालयातील ५ नंबरच्या दालनात एकुण १५५१ नाणी ठेवण्यास प्राधान्य देण्यात यावे. तसेच श्री. ऋणवाल हे विना मुल्य या नाणी संग्रहालयात ठेवण्यासाठी देत आहेत. मान्यता देण्यात येऊन संबंधीत अधिकारी यांनी सर्वोच्च समिती बाहेर समोर ठेवण्यात यावे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सध्या विनामुल्य नाणी देणार (नंतर) भविष्यात नाणी ठेवलेल्या जागेवर नाव देण्याची मागणी करणार असे होता कामा नये.

**मा. सभापती :** संबंधीताकडुन नाणी घेऊन श्री. लामतुरे यांच्या ज्या अटी शर्तीनुसार परवानगी दिली त्याप्रमाणे संबंधीत अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** दि. २६ जानेवारी ९९ रोजी माझ्या वार्डातील दवाखान्याचे उद्‌घाटन समारंभ आयोजित केलेला असुन त्या दवाखान्याच्या अनुषंगाने सर्व सोयी उपलब्ध आहेत काय? खुलासा करा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** स. सदस्य यांच्या वार्डातील सिल्कमिल येथील दवाखान्याचे काम ७५% झालेले असुन ड्रेनेज लाईनचे लांब अंतर आहे. येत्या २६ तारखेपर्यंत पूर्ण करण्यांत येईल.

**श्री. विश्वारोद्दीन ;** ड्रेनेज लाईनचे काम करण्याबाबतचे अंदाजपत्रक अद्यापर्यंत तयार नाहीत. तसेच विद्युत लाईटची किती काम पूर्ण केले यांचा खुलासा करावा.

**शहर अभियंता :** ड्रेनेज लाईनचे काम करण्यासाठी मुळ निविदेमध्ये तरतुद केलेली असुन त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**उपअभियंता (वि.) :** सिल्कमिल येथील दवाखान्यातील विद्युत लाईनची सर्व कामे येत्या २६ तारखेपर्यंत पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. लांडगे गौतम :** मारतीचे संपूर्ण काम होते नंतर विद्युत लाईनचे कामे केली जातात. ज्यावेळी टप्प्या टप्प्याने इमारतीची कामे होते त्याचवेळी विद्युत लाईनची ही कामे व्हावयास पाहिजे. आपसांत समन्वय ठेवणे आवश्यक आहे. जे की, बांधकाम झाल्यानंतर विद्युत लाईनचे काम करतेवेळी प्लॅस्टर, कलर निघणार नाही.

**मा. सभापती :** यापुढे इमारत बांधकाम, वाचनालय असो, दवाखाना असो यांचे काम पूर्ण झाल्यावर विद्युतचे टेंडर काढण्यात येते. इमारतीचे कामाबरोबरच विद्युतची कामे व्हावे याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** उद्घाटन करावयाचे असल्यास दवाखान्यामध्ये डॉ. (कर्मचारी), फर्निचर, इ. सर्व बाबींची पुर्तता होईल काय खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** कटकट गेट येथील दवाखाना तसेच सिल्कमिल येथील दवाखान्यासाठी कर्मचाऱ्यांच्या मुलाखती घेतलेल्या असुन त्यात प्रथमतः कटकट येथील दवाखान्यामध्ये कर्मचारी वर्ग द्यावा लागेल तसेच इतर सर्व साहित्याची पूर्तता केली जाईल. फक्त एक्स-रे मागवावयाचा असुन तसे आदेश दिलेले आहेत. थोडा वेळ लागेल बाकी इतर सर्व साहित्याची पूर्तता केली जाईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** सदर दवाखान्यात एक्स-रे असणे आवश्यक असुन, एक-एक वस्तु न आणता एकदम मागणी करावी ८ महिण्याचे संपूर्ण काम असतांना २ वर्षापासुन काम चालु आहे. उद्घाटन समारंभ हा कमीत कमी ३ तासाचा असावयास पाहिजे त्यामध्ये १ तास सत्कार समारंभ करता येईल १० ते १५ मिनिटाचा कार्यक्रम आयोजित करु नये.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सदर दवाखान्याचे काम शासकीय अनुदानातुन करण्यात आलेले असुन उद्घाटन करावयास हरकत नसावी. माझ्या वार्डामध्ये शॉपींग सेंटर कामे बंद आहेत किती दुकाने आहेत बऱ्याच नागरीकांनी ॲडव्हान्स दिलेले पैसे होते परत घेतलेले आहे. खूलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** सध्या माझ्याक डे माहिती नाहीत तशी लेखी स्वरुपात माझेकडे काही प्राप्त झालेले नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** लोकांच्या तक्रारी आलेल्या आहेत की पैसे परत करावे याचे कारण काय? शॅापींग सेंटर समोर भुषण अग्रवाल, इमारत, गार्डन युज कमर्शीयलचे काम थांबवले. अग्रवाल याचा नातेवाईक यांनी कोर्टातुन स्थगिती आणुन त्यासमोर म.न.पा. ने दुसऱ्या इमारत बांधकामाला परवानगी दिली. मिळकत धारकांनी केसेस केलेल्या आहेत. शॅापींग सेंटरचे उद्घाटन केल्यानंरत संबंधीत व्यक्तीला जाण्यायेण्यासाठी रस्ता नाही. याबाबत खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी स. सदस्यांना उद्याच संपुर्णता माहिती द्यावी.

**श्री. स. अली. मिरा सलामी :** महानगरपालिकेने परवानगी दिली त्या वेळेस पाहावयास पाहिजे होते समोरची जागा महानगरपालिकेने घ्यावी. लोकांनी अर्ज केलेले आहेतच डिपॉझिट परत न देत त्या ठिकाणी शॉपींग सेंटर करुन संबंधीत अर्जदारांचा विचार करावा जो प्रॉपर्टी व्होलडरच्या नावाने त्या जागेवर बोर्ड लावलेला असुन काही जागेवर टपऱ्या बसवलेल्या आहेत. नियमाने कार्यवाही व्हावयास पाहिजे. विद्युत लाईनचे टेंडर निघालेले आहे याचाही खुलासा करावा.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी तेथील पूर्ण माहिति घेऊन स. सदस्यांना कळवावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** आठ महिने झाले तरी माझ्या वार्डातील विद्युत व्यवस्थेबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही.

**उपअभियंता (वि.) :** बजेट नव्हते, स. सदस्य यांच्या वार्डात शॉपींग सेंटर समोर ३ सेट (दिवे) लावण्या बाबतची कार्यवाही तात्काळ करण्यांत येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** संबंधीत अधिकारी यांनी मला तशा प्रकारची लेखी सुचना द्यावयास पाहिजे होती ४ दिवसापूर्वी विचारणा केली असता संचिका माहिती नाही. अशी उत्तरे देतात. सभागृहात तात्पुरते गोलमोल उत्तरे देतात प्रत्यक्षात काहीही कार्यवाही संबंधीत अधिकारी करत नाही.

**मा. सभापती :** स.सदस्य यांनी ताबडतोब विद्युत व्यवस्थेबाबत पत्र द्यावे. संबंधित अधिकारी यांनी त्या पत्राच्या अनुषंगाने ३ सेट लावण्याबाबतची कार्यवाही करावी. स. सदस्यांनी पत्र दिल्यानंतर त्या त्या कामा संदर्भात काय उपाययोजना तात्काळ करता येईल ती करावी याबाबत सभागृहात त्या त्या संबंधीत अधिकाऱ्यांना वारंवार सांगण्यात येऊनही कार्यवाही होत नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** संबंधीत अधिकारी त्या जागेवर येऊन, पोल वगैरे लावावे लागतील ज्या नाही त्या समस्याची जाणीव करुन देतात. सदर इमारत तयार झाल्यावर विद्युत कामसाठी बजेट असते काय?

**मा. सभापती :** सदर ठिकाणी अंडर ग्राऊंड मजल्याचे बांधकाम झालेले असुन थ्रीसेट दिवे लावण्याची संबंधीत अधिकारी यांनी कार्यवाही करावी. यापूढे कुण्याही स. सदस्यांचे पत्र प्राप्त झाल्यांनतर तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** सिल्कमिल येथील दवाखान्या बाबत विचारलेल्या प्रश्नाचा खूलासा करावा. दवाखाना अंतर्गत येणारे ड्रेनेजच्या काम पुर्ण करण्यात यावे. तसेच विद्युत (लाईट) फर्नीचर, कर्मचारी वर्ग इ. सर्व बाबींची विचार करुनच तेथील दवाखान्याचे येत्या २६ तारखेला उद्‌घाटनाचा कार्यक्रम आयोजीत करावा.

**अति. शहर अभियंता :** ड्रेनेज लाईनचे काम लवकरच पूर्ण करण्यात येईल इतर सर्व बाबींची ९०% पूर्तता केलेली आहेत.

**श्री. विश्ररोद्दीन :** दवाखान्यातील येत्या २६ जानेवारी पर्यंत लाईटची व्यवस्था होईल काय ? संबंधीत अधिकारी यांना विचारणा करावी.

**मा. सभापती :** संबंधीत विद्युत विभागातील अधिकारी यांनी सदर दवाखान्यातील पाहणी करुन विद्युत व्यवस्थे बाबत कार्यवाही करावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** दवाखान्यातील विद्युत व्यवस्थेबाबत संबंधीत अधिकारी यांनी काही कार्यवाही केलेलीच नसेल तर त्या ठिकाणी जाऊन काय पाहणी करणार आहेत.

**श्री. गौतम लांडगे :** दवाखान्यासाठी लागणारे फर्नीचर, विद्युत व्यवस्था, इतर अर्धवट कामे येत्या २६ तारखेपर्यत पूर्ण करण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी येत्या २६ तारखेपर्यंत लाईट , फर्नीचर, ड्रेनेज इ. सुविधा करुन देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** संत एकनाथ रंग मंदिर २ फेब्रूवारी ते ४ मार्च या कालावधीसाठी कुणीतरी के. बाबा नामक असलेल्या व्यक्तीने एक महिण्यासाठी बुक केले परंतु सदर व्यक्तीने एकही पैसा न भरता बुक कसे करु दिले यामुळे

महानगरपालिकेला मिळू पाहणारा आर्थिक नुकसान पोहचत आहे याबाबत खुलासा करावा.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** या संदर्भात संचिका चालवण्यात आली रु. ६५,०००/- चे उत्पन्न मिळेल. ६ तारखेला पत्र पाठविले होते २ दिवसात रु. २०,०००/- भरावे म्हणुन त्यांनी पैसे भरले नाही आज बुकींग करता येईल.

**श्री. संजय जोशी :** नियमावलीमध्ये अशी तरतुद आहेत की, कुठल्या व्यक्तींकडुन ॲडव्हास रक्कम घेतल्या देण्यात येऊ नये. त्यातल्या त्यात शहरातील नागरीकांना अगोदर प्राधान्य देण्यात यावे तसेच के बाबा जादुगार यांचे खेळ (शो) बाहेर गावी गेले असल्याने बुक केलेल्या कालावधीमध्ये इतरांना संत एकनाथ मंदीर भाडयाने देता आले नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असुन संबंधित अधिकारी यांनी जाणीव पूर्वक लक्ष देऊन यापुढे असे होणार नाही याची काळजी घ्यावी. ॲडव्हान्स भरल्याशिवाय बुकींग करु नये.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांना सुचित करतो की, यापुढे डिपॉझिट न घेता कुण्याही व्यक्तींला संत एकनाथ मंदीर देण्यात येऊ नये १०००/- रु. पहिल्यांदा ॲडव्हांस तसेच शहरातील नागरीकांना पहिल्यांदा प्राधान्य दयावे नंतर इतराचा विचार करावा. यापूढे असे होता कामा नये यांची दक्षता घ्यावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** महापालिकेने नव्यानेच घेतलेले जेटींग मशीन चालु आहे की, बंद यांचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** जेटींग मशीन कालपर्यंत चालु होती पाईपचे दोन तुकडे झाल्यायाने काल बंद होती. उद्या स. सदस्य यांच्या वार्डामध्ये पाठवण्यात येईल जयसिंगपुरा येथे काम चालु असल्यायने मशीन देण्यात वेळ लागलेला आहे.

**श्री. नरसिंग ढगे :** उल्कानगरी येथील नागरीक १००% बेटरमेंट चार्जेस भरतात. ३ ते ४ महिण्यापासुन पाण्याची समस्या निर्माण होते कमी दाबाने पाणी येते. पाणीपुरवठा अधिकारी यांना सुचना केली होती. कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले परंतु प्रत्यक्षात काहीही कार्यवाही झाली नाही.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.) :** सदर भागात पाहणी करुन स. सदस्य यांना माहिती दिलेली आहेत.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी सुचना केल्याप्रमाणे उल्कानगरी येथील रहिवासी १००% बेटरमेंट चार्जेस अदा करतात त्या भागात कमी दाबाने पाणी येणार नाही. याची दक्षता संबंधीत अधिकारी यांनी घ्यावी. तसेच स. सदस्य यांनी तक्रार दिल्यानंतर लवकरात लवकर कशा पद्धतीने कार्यवाही करता येईल तशी त्याबाबत कार्यवाही संबंधीत अधिकारी यांनी तात्काळ केली पाहिजे.

**श्री. नरसिंग ढगे :** उल्कानगरी येथील भागास काही प्रमाणात विश्वभारती कॉलनी व काही प्रमाणात गारखेडा या भागाकडुन पाणी पुरवठा होतो.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.) :** विश्वभारती कॉलनी कडुन उल्कानगरी भागात पाणी पुरवठा कमी दाबाने येत असेल तर तशी कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** स. सदस्यांच्या तक्रारी तसेच शहराचा वाढता व्याप नवनवीन होणाऱ्या वस्त्या यामुळे पाण्याची समस्या उद्भवत आहेत. ज्या ठिकाणी नागरीक १००% बेटरमेंट चार्जेस भरतात त्या भागात नागरीकांना जलकुंभ बांधुन त्या द्वारे पाणी पुरवठा करण्याच्या व्यवस्था करण्यांत यावी.

**कार्यकारी अभियंता :** जय विश्वभारती कॉलनी येथील पाण्याच्या टाकीमधुन पुंडलीकनगर या भागात पाणी पूरवठा केला जातो त्यामुळे नवीन योजना नुसार जलवाहीनी टाकल्यानंतर पुंडलीकनगर येथील नागरीकांना पाणी पुरवठा नविन पाईपलाईन द्वारे करण्यांत येईल त्यांनतरच विश्वभारती कॉलनी येथील पाणीपुरवठा योग्य प्रमाणात होईल.

**श्री. नरसिंग ढगे :** महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा पाईपद्वारे पुरवठा होत नसेल तर सदर भागात टँकर द्वारे पाणी पुरवठा करावा. लोकांच्या घरातील हौदात पाणी टँकरने भरण्यात यावे.

**मा. सभापती :** उल्कानगरी येथील भागात पाणी पुरवठा कमी दाबाने होत असेल तर त्या भागातील जलकुंभ (टॉकीजमध्ये) टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची कार्यवाही संबंधीत अधिकारी यांनी करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** मालमत्तेबाबत चौकशी होऊन वसुली होत आहेत टपरी बाबतचे भाडे वसुली होत नाही. झोनवाईज माहिती घेऊन वसुली करुन माहिती सभागृहात द्यावी. रहिवास्यांना त्रास होणार नाहीत याची महानगरपालिकेने प्रशासनाने काळजी घ्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी कराची दर महिन्याला किती वसुली झोन वाईज होते. याबाबतची सविस्तर माहिती संबंधित अधिकारी यांनी सभागृहाला द्यावी. अशा प्रकारचा ठराव मंजुर झालेला असतांना आतापर्यंत एकही वेळेस संबंधीत अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. प्रशासनाने टक्केवारी नुसार माहिती द्यावी.

**श्री. रविंद्र इंगळे :** चंद्रनगर हौऊसींग सोसायटी मधील पाणीपुरवठयाच्या संदर्भात स्वेच्छा निधीतुन काम करण्यात यावे. या संदर्भात पत्र दिलेले होते. नियमाने ४५ दिवसांत कार्यवाही व्हावयास पाहिजे परंतु ९० दिवस संचिके संदर्भात चौकशी केली असता सर्वसाधारण सभेची त्या कामासाठी मंजुरी घ्यावी असे अधिकारी यांच्याकडुन सांगण्यात येते. पाण्याच्या समस्या बाबत प्रश्न असुनही संचिका सर्वसाधारण मागील बैठकीत सभागृहात चर्चा होऊन सर्वसाधारण सभेने असा निर्णय घेतला की कोणत्याही सोसायटीने सेल्फ डेव्हपमेंट करपोस हवे. सदर संदर्भात संचिका मंजुरीसाठी पाठवलेली आहे.

**मा. सभापती :** कार्यवाही का करण्यात आली नाही याबाबत खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.) :** सिडको भागातील गृहनिर्माण संस्थेने स्वतः डेव्हलमेंटची कामे करावायस पाहिजे. स्वेच्छा निधीतुन अशा प्रकारची कामे करण्याबाबतचा निर्णय मागच्या बैठकीत झालेला आहे. स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे यांच्या ही वार्डात अशी प्रकारचे काम करण्याबाबत सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली होती. त्यानुसार काम केलेले होते. त्याच पध्दतीने स. सदस्य यांच्या वार्डातील चंद्रनगर येथील पाण्याच्या संदर्भातील काम मंजुरी मिळाल्यांनतर करता येईल.

**श्री. संजय जोशी :** पाणी पूरवठा करण्याचे काम महानगरपालिकाकडे आहेत पाण्याचय संदर्भातील समस्या तात्काळ स. सदस्यांनी पत्र दिल्यावर व्हावयास पाहिजे.

**मा. सभापती :** स. सदस्य यांच्या वार्डातील पाण्याच्या समस्या बाबत सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन (६७) (क) प्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी वसुली बाबत झोनवाईज खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** मालमत्ता कर गेल्या वर्षी पेक्षा या चालू आर्थिक वर्षात डिसेंबर पर्यंत १ कोटी ८९ लक्ष जास्तीची वसुली झालेली असुन डिसेंबर अखेर एकुण १३ कोटी उद्दिष्टापैकी ४ कोटी १३ लक्ष ४० हजार इतकी वसुली झालेली असुन टक्केवारी नुसार २७% वसुली झालेली आहेत. त्याचप्रमाणे पाणीपट्टी वसुलीचे १५ कोटीचे उद्दिष्टाच्या प्रमाणात झालेली आहेत. झोन वाईज विचार केल्यास डिसेंबर ९८ अखेर ......

| | मालमत्ता कर | पाणी पुरवठा कर |
|---|---|---|
| झोन क्र. १ | रु. ५३.५४ लक्ष | रु. २८.१९ लक्ष |
| झोन क्र. २ | रु. ६८.२२ लक्ष | रु. २३.१२ लक्ष |
| झोन क्र. ३ | रु. ७३.१९ लक्ष | रु. ३५.७५ लक्ष |
| झोन क्र. ४ | रु. ०१.०४ कोटी | रु. ५०.०४ लक्ष |
| झोन क्र. ५ | रु. ५६.०५ लक्ष | रु. ०३.९१ लक्ष |
| झोन क्र. ६ | रु. ५३.८९ लक्ष | रु. १७.३५ लक्ष |
| झोन क्र. ७ | रु. ०१.८३ लक्ष | रु. ७७.७८ लक्ष |

एकुण पाणी पुरवठा कर २.३६ कोटी तसेच मालमत्ता कर वसुली ४.१३ कोटी साधारणातः वसुली झालेली आहे.

**श्री. संजय जोशी :** प्रमाणकानुसार झोन क्र. ४ ची वसुली झालेली नसुन दर्शवलेली टक्केवारी चूकीची पध्दतीने दाखविलेली आहे. यापैकी फक्त १० ते १५ % वसूली झालेली असुन मागील २९ कोटी रु. वसुली झालेली नाही. वर्षाभरामध्ये कितीतरी मालमत्तेत वाढ झाली आहे कम्पलेशनसाठी महानगरपालिकेकडे लोक येतात. आकडेवारी फुगवून सांगण्यात येत आहे. २७% वसुली नसुन १५% आहे. अतिशय तोडक्या प्रमाणात खुलासा केला आहे.

**उपआयुक्त (म.) :** अर्थसंकल्पामध्ये मालमत्ताकर १५ कोटीचे उद्दिष्ट असुन त्यापैकी डिसे. ४ कोटी १३ लाख वसुली झालेली असुन डिसे. ९८ पर्यंत वसुलीचे प्रमाण १५ ते १७ % झालेले आहेत.

**श्री. संजय जोशी :** मागील थकबाकीपैकी किती वसुली झाली याचा खुलासा करावा. ती वसुल करणार नाही काय?

**श्री. गौतम लांडगे:** मागील वर्षाची थकबाकी किती आहे. उद्दिष्ट कितीचे होते. चालू आर्थिक वर्षात किती वसुली झाली, उद्दिष्ट किती.

**श्री. प्रभाकर विधाते :** ठरवलेले आहेत? गेल्या वर्षाच्या तुलनेत चालु वर्षी किती वसूली व्हावयास पाहिजे याचा विचार करता २७% वसुली झाली म्हणजे जास्त नाही. म्हणावे तसेच कौतुक नाही.

**श्री. संजय जोशी :** कमी प्रमाणात वसुली झाल्यास विकास कामाच्या महापालिका काय योजना राबवणार ? ज्या झोनची वसुली जास्त होते त्या झोनच्या अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात यावा. अधिकारी यांनी सभागृहात योग्य खुलासा करावयास पाहिजे. सभागृहाची दिशाभूल करु नये.

**श्री. गौतम लांडगे :** सभागृहात झालेल्या निर्णयाप्रमाणे दर महिण्याची वसूली बाबत मा. सभापती यांना संबंधीत अधिकारी माहिती देतात का?

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांच्याकडुन हे वसुली बाबत माहिती दिल्या जाते.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** १) माझ्या वार्डातील दवाखान्याचे उद्‌घाटन होणार होते. आतापर्यंत झालेले नाही.
२) कब्रस्तान बाबत मागील दोन वर्षात काहीही कार्यवाही झाली नाही.
३) स्पोर्ट बाबत टेंडर व कोटेशन बाबत कार्यवाही झाली नाही.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**वैद्यकीय अधिकारी :** दवाखान्याचे उद्‌घाटन २६ जानेवारीला होणार असुन तोपर्यंत तेथील सुवीधाची पूर्तता करण्यात येईल.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी येत्या २६ तारखेपर्यंत तेथील काम पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** आदर्श कब्रस्तानसाठी संचिका तयार करुन वक्फ बोर्डकडे पाठवावी.

**शहर अभियंता :** वक्फ बोर्डकडे ट्रान्सफर करण्या संदर्भात पत्र दिलेले आहे. मनपाने सदर (भुखंड) मालमत्ता महापालिकेकडे हस्तांतरण करण्या बाबत कार्यवाही चालु असुन वक्फ बोर्डाची नाहरकत प्रमाणपत्र आल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** वक्फ बोर्डला पून्हा पत्र देऊन, त्या पत्राच्या अनुशंगाने स. सदस्य पाठपुरावा करतील. स्पोर्टस् बाबत संबंधीत अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**शिक्षणाधिकारी :** टेंडर कॉल केलेले नाही. लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** ताबडतोब टेंडर कॉल काढण्यात यावे. तात्काळ काम होण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच पशुधन विकास अधिकारी यांनी वाघाच्या मृत्यू बाबत माहिती द्यावी.

**पशुधन विकास अधिकारी :** सिध्दार्थ उद्यानातील शेरु नावाचा पिवळा वाघ २८ तारखेला चांगल्या अवस्थेत असतांना अचानक मंद स्थितीत दिसला, रोजचे ऑब्झारवेशन असते. एकुण ६ दिवस (टेंटमेंट) पाणी, जेवण, संडास मुत्र यात बदल दिसल्या तर उपचार करण्यात येतो. २८ तारखेला शेरु डल दिसल्याने त्यास पिंजऱ्यात स्थलांतर केले. रक्त, लघवी तपासणी केली काहीही दोष मिळाले नाही. सतत ६ दिवस तपासणी करण्याचे काम चालु असतांना दि. १ तारखेला दुपारी ३.०० वा. मृत्यू झाला. त्यानंतर पोर्टमार्टम केले, त्यास तपासणी साठी पुण्याहून तज्ञ डॉक्टरांना पाचारण करुन तपासणी केली असता काही दोष आढळुन आलेला नाही. ज्यावेळेस कोणत्याही प्राण्याची रित्याप्रमाणे पाणी, संडास, लघवी, जेवण इ. सर्व बाबतीत वेगळेपणा दिसुन आल्यासच औषधोपचार व इतर तपासणी करण्यात येऊन कार्यवाही करावी लागते. तसेच दोन पांढऱ्या वाघापैकी एक ११ महिण्याचा वाघ (बछडा) खेळता खेळता मृत्यू झालेला आहे. २५ डिसेंबर रोजी ४ ते ५ वाजेच्या दरम्यान चांगल्या अवस्थेत असतांना सांय. ६.०० वा. (बिफ) मांस देण्यासाठी कर्मचारी गेले असता ५ वाघापैकी (पिंजऱ्यातुन) ४ वाघ बाहेर आले एक न आल्यामुळे कर्मचारी पाहणी करावयास गेल्याने मृत अवस्थेत दिसून आल्याने दरम्यान दु. ५.०० ते ६.०० वा. या एक तसाच्या सुमारास त्या वाघाचा मृत्यू कशामुळे झाला हे समजले नाही सदर प्रेत

पोस्टमार्टमसाठी देण्यात आलेले असुन अदयापपर्यंत रिर्पोट आलेला नाही. त्याप्रमाणे दि. २७ तारखेला बहादुर नावाचा पांढरा वाघ सकाळी ७.०० वा. मंद अवस्थेत दिसुन आला. त्याचेकडुन प्रतिसाद मिळत नव्हते. त्यानंतर उपआयुक्त (म.) यांना कळविले. रक्त काढुन तपासणी साठी मुळे पॅथॉलॉजी (खडकेश्वर) यांच्याकडे दिले असता तपासणी अंती वाघाच्या किडणी खराब झाल्याचे निष्पन्न झाले. वाघाचे रक्त उपलब्ध राहत नाही. नंतर डॉ. भोदकर सहाय्यक संचालक पशुसंवर्धन यांनाही बोलावण्यात आले. किडनी खराब होऊन त्याचा मृत्यू झालेला आहे असे दिसून येते. एका दिवसापूर्वी हा वाघ नार्मल अवस्थेत होता. अशाच प्रकारे मागील शुक्रवारी शाम नावाचा एका वाघाचा हालचाली योग्य न दिसल्याने त्याला पकडून इंन्जेक्शन देण्यात आले अधिक तपासणीसाठी डॉ. समद, डॉ. मुळे यांना बोलावण्यात येऊन २-३ वेळा तपासणी केली १३% ग्लुकोज असल्याचे निष्पन्न केले. ३ दिवस रक्त तपासणी केले. तपासणी केल्यांनतर ६ तासाच्या आत प्राण्याची तब्बयेत न सुधारण्यास पुन्हा फेर तपासणी करण्यात येते. सदर शाम नावाच्या वाघाची तपासणी केल्यानंतर ६ तासाच्या आत म्हणजेच दु. ४ ते ५ वा. दरम्यान चांगल्या स्थितीत असल्याचे दिसुन आले. मृत्यू झालेल्या वाघाचा पोस्टमार्टमचा रिर्पोट येईपर्यंत नेमका कशामुळे मृत्यू झाला हे सांगता येणार नाही.

**श्री. संजय जोशी :** श्री. स. अली मिरा सलामी : निष्कृष्ट दर्जाचे बीफ (मांस) दिल्याने वाघाचा मृत्यू झालेला असुन किडणी खराब झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे असे उत्तर देणे चूकीचे आहे.

**पशुधन विकास अधिकारी :** या अगोदर ही कए अस्वल मृत्यू झालेला असुन प्राण्यांवर योग्य त्यावेळी त्याच्या हालचाली मध्ये नविन (बदल) दिसुन आल्यास तात्काळ तपासणीची कार्यवाही केली जाते.

**श्री. म. अ. रऊफ :** प्राण्यांना स्वस्त व अयोग्य बिफ (मांस) खाण्यास दिल्याने मृत्यू झालेला असून अधिकारी यांनी याकडे लक्ष द्यावे. तसेच प्रशासनाने चौकशी करुन याबाबत दखल घ्यावी.

**श्री. संजय जोशी :** वाघाना अन्न योग्य वेळी व व्यवस्थित न मिळाल्याने वाघाचा मृत्यू झालेला असुन संबंधीत अधिकारी हे याबाबतीत योग्य लक्ष देत नसुन दूदैवाने प्राणी मृत्यूमुखी पडतात.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, प्राण्यांना ९/- रु. किलोचे (बिफ) मांस निष्कृष्ठ दर्जाचे असुन लायक नाही. याबाबत संबंधीत अधिकारी यांनी ९/- रु. प्रमाण् घेण्यात येणारे (बिफ) मांस योग्य आहेत काय ? बाजारभावाप्रमाणे याच (मांस) चे ३५/- रु. प्रति किलो भाव आहे.

**श्री. संजय जोशी :** प्राण्यांच्या संपुर्णतः हालचाली बंद होतात. मृत्यूच्या दाढेत प्राणी जातात. त्यावेळेस संबंधीत अधिकारी इतर डॉक्टराच्या सल्ल्यानुसार तपासणी करतात. त्यामुळे प्रांण्यावर योग्य वेळी औषधोपचार न होता प्राणी मृत्यूमुखी पडतात सुरवातीस तज्ञ डॉक्टरांना घेऊन औषधोपचार केल्यास प्राणी मृत्यू होणार नाही.

**पशुधन विकास अधिकारी :** एका वाघाचा मृत्यू खेळता-खेळता झालेला असून तात्काळ कार्यवाही डॉक्टर काय करणार आहेत.

**श्री. गौतम लांडगे :** सिध्दार्थ उद्यानातील तीन महिण्यात ३ वाघ मृत्यू पावतात. सध्या ही दोन वाघाची तब्येत बरोबर नाही असे समजते. उदयानात प्राणी बघण्यासाठी फॉरेन व इतर मोठमोठया राष्ट्रातुन लोक येतात महानगरपालिकेचे कर्मचारी प्रशिक्षण घेऊन येतात. प्राण्याच्या हालचाली व इतर परिस्थिती पाहुन योग्य कार्यवाही व्हावयास पाहिजे. संबंधित अधिकारी याकडे अजिबात लक्ष नसुन ? वाघ मरतो दुसरा मरतो, तीसरा मरतो असे असतांना डॉक्टरांनी काय कार्यवाही केली. पोस्ट मार्टम करतांना काहीही दोष दिसुन आलेले नाही असे अधिकारी सभागृहात खुलासा करतात. सर्व सोयी सवलती उपलब्ध असतांना वाघाचा मृत्यू होतो व येणाऱ्या पोस्ट मार्टमच्या अहवालावर निर्णय घेणार काय ? निष्कृष्ठ दर्जाचे अन्न (मांस) बीफ देण्यांत येत असेल तर संबंधित अधिकारी यांनी काळजी दयावयास पाहिजे.

**श्री. प्रभाकर विधाते :** एका वाघाचा मृत्यू संर्पदशाने झाला, दुसऱ्याचा किडणी खराब असेल असे सांगीतल्या जाते. शवविच्छेदनाचे रिपोर्ट आल्यानंतर कळेल अशी वेगवेगळी उत्तरे सभागृहात मिळतात. संबंधीत अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्यामुळे वाघाचा मृत्युंशी सामोरे जावे लागते. अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** कोणताही प्राणी कोणत्याही आजाराने पछाडलेला असेल तरी १०% ग्लुकोज त्याच्या शरीरात असतेच अशा परिस्थितीत संबंधीत अधिकारी यांनी लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही योग्य वेळी का केलेली नाही यांचा खुलासा करावा.

**श्री. म. अ. रऊफ :** पोस्टमार्टमचा अहवाल सादर झाल्यावर चर्चा करावी.

**श्री. संजय जोशी :** वृत्तपत्रात एक वाघ सर्पदंशाने मृत्यू व दूसरा किडणी खराब झाल्यानें मृत्यू झाला असे छापुन आले. मनपातील कुणीतरी कर्मचारी यांच्या तोडुंन निघाल्यायनेच वृत्तपत्रात ही बातमी येऊ शकते. संबंधीत अधिकारी प्राण्यांच्या देखरेखी बाबत जबाबदारी स्विकारणार नाही काय ?

**मा. सभापती :** एक वाघ किडणीमुळे मृत्यू दुसरा सर्पदंशाने मृत्यू होतो असे वृत्तपत्रात छापुन येते यास जबाबदार कोण? नेहमी उलटसुलट बातम्या वृत्तपत्रात छापुन येतात.

**पशुधन विकास अधिकारी :** एका वाघाच्या शेपटीवर जखम झालेली होती त्यामुळे सर्पदंश झालेला असावा असा प्राथमिक अंदाज होता. १९८४ पासुन या प्राणी संग्रहाल्यामध्ये बरेचशे प्राणी लहानचे मोठे केलेले आहेत. १ जोडप्यापासुन मुलांना दुध पाजुन मोठे केले आहे. आपल्या मुलांप्रमाणेच काळजी घेण्यात आलेली आहे. प्राण्यांना ९/- रु. किलोचे बीफ (मांस) हे चांगल्याप्रतीचे असुन त्यामुळे वाघाचा मृत्यू झाला असावा असे वाटत नाही. जास्त भावाचे बिफ (मांस) घ्यावयाचे असेल तर सभागृहाने निर्णय घेण्यास हरकत नाही. सध्या जे प्राणी आहेत त्यांना ९/- रु. किलोचे बिफ देण्यांत ये ते प्राणी चांगल्या अवस्थेत आहेत.

**श्री. संजय जोशी :** रिपोर्ट पाठवितांना पूर्णत : गुप्तता पाळलेली नाहीत ?

**श्री. प्रभाकर विधाते, श्री. म. अ. रऊफ :** एकाच वेळी ३ वाघ मरतात त्या प्राण्यांच्या रोगाची साथ वगैरे आलेली आहे काय चौकशी करावी.

**पशुधन विकास अधिकारी :** ज्या पद्धतीने औषधोपचार, तसेच तपासणी करावयाची ती काटेकोर तसेच तात्काळ केलेली आहे कुठल्याही प्राण्यांवर दूर्लक्ष होणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

**श्री. स. अली. मिरा सलामी :** वाघांना देण्यात येणारे बीफ (मांस) चांगल्या दर्जाचे आहेत, काही स. सदस्यांनी मत व्यक्त केले चांगल्या दर्जाचे मांस देत नाही. ज्या वेळेस प्राण्यांना अन्न (मांस) खाण्यासाठी देतात त्याची तपासणी व्हावयास पाहिजे. जास्त कालावधीचे असेल त्याचे विष होऊ शकते. सर्पदंश झाला अशी शंका व्यक्त केली वृत्तपत्रात तशा प्रकारची बातमी छापुन येते. कितपत सतय आहे.

**श्री. विधाते प्रभाकर :** ज्यांच्याकडुन बीफ (मांस) पुरवठा होतो. त्या व इतरांचे आपआपसातील वाद असल्यास भेसळ होण्याची शक्यता टाळता येत नाही.

**उपआयुक्त (म.) :** सिध्दार्थ उद्यानातील ३ महिण्यापूर्वी शेरु नावाचा पिवळा वाघाचा मृत्यू झ ाला त्या अगोदर महानगरपालिकेतील डॉ. रझवी पशुधन विकास अधिकारी हे स्वतः तज्ञ डॉक्टरर्सच्या सल्लानुसार १५ दिवस तपासणी करत होते. पशुसंवर्धन सह संचालक हे स्वतः तपासणीसाठी बोलावण्यात आले होते. रक्त, लघवी तपासणी केलेली आहे. तपासणी चालु असतांनाच सदर संचिकेमध्ये तपासणी बाबतचे शेरे ठेवलेले असुन या कालावधीत ११ महिण्याचा पीळू नावाचा वाघ अचानग खेळता खेळता मृत्यू झालेने कुणालाही तपासणी साठी बोलावण्यात आले नाही. सदर वाघाच्या शेपटीला जखम असल्याने सर्पदंश असल्याचे शंका आहे. पोस्ट मार्टम करण्यास तपासणीसाठी देण्यांत आले. त्या नंतर बहादुर नावाचा वाघ जिवंत असतांना एक दिवस अगोदर मंद अवस्थेत दिसल्याने रक्त तपासणीसाठी घेऊन तपासणी अहवाल येईपर्यंत सदर वाघाचा मृत्यू झाला. तपासणी अहवाल सदर वाघाचा मृत्यू किडणी खराब झाल्यामूळे मृत्यू झालेला आहे. असे निष्पन्न झाले परंतु संपूर्ण माहिती पोस्ट मार्टमसची अहवाल आल्यानंतर देण्यात येईल. सध्या दोन वाघाची तातडीने औषधोपचार चालु असुन ट्राईम प्रोटोझोन, १०५ डीग्री सेल्सीअस होते. रेव्हिका ही पांढऱ्या वाघाची बहीण सध्या १०० डीग्री सेल्सीअस नॉरमल असुन दुसऱ्या दिवशी पासुन खाणेपिणे सुरु केलेले आहे. प्राण्यांमध्ये घरगुती व वन्य (डोमॅस्टीक वाईल्ड) प्राण्यांचे प्रकार असुन घरगुती पाळीव जनावरांना दररोज हाताळु शकतो परंतु वन्य प्राण्यांना दररोज हाताळणे शक्य नाही. वन्य प्राण्यांना दररोज हाताळल्याने क्षमता कमी होते. शिवाय त्यांच्यातील जंगलीपणा (वाईल्ड) कमी होतो. गाय, म्हैस इ. चे सॅम्पल पाठवले तर त्यात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाघाचे पोस्ट मार्टमस् हे राज्य शासनाच्या अधिकारी यांच्याकडे देण्यात आले असुन त्यांनी त्यांच्या पद्धतीने (सिस्टीम) प्रमाणे केलेले आहे. पोस्ट मार्टमचा अहवाल आल्यानंतरच निश्चित काय दोष होता हे समजु शकेल पांढऱ्या वाघाच्या संदर्भात निश्चित काय झाले व कोण यात प्रकरणात दोषी आहे. याबाबत संपुर्णतः काळजी घेतलेली आहे. सह संचालक पशु संवर्धन हे चौकशी अहवाल देणार आहे. कृपया केलेला खुलासा मान्य करावा.

**श्री. म. आ. रऊफ :** पृष्ठ क्र. ६ वर एका गुत्तेदाराचे काम केल्याबद्दलचे देयक मिळालेले नाही. संबंधीत यांना विचारणा केली असता ठेकेदार यांना एम. बी.

हरवलेली आहे, काय कार्यवाही करावयाची ती करावी. अशी उत्तरे मिळतात.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.) :** संबंधित शाखा अभियंता एम. एम. खान, तसेच उपअभियंता अफसरखॉन माझ्या विभाग मधून बदलीवर गेलेले असुन अदयापपर्यंत त्यांनी बिल दिलेले नाही.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी संबंधीत उपअभियंता यांना नोटीस देऊन पूढील कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** एम. बी. मिळत नसल तर संबंधितांना निलंबन आदेश काढावें.

**श्री. विश्वारोद्दीन :** पृष्ठ ७ वर उड्डान पूलाचे काम नसुन फुट ओव्हर ब्रीजचे काम करावयाचे आहे. मागील बैठकीत या कामाबाबत येत्या २ तारखेला बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आले आतापर्यंत ३.५ लाख रुपये खर्च झालेले असुन काल संबंधीत रेल्वे खात्याचे जनरल मॅनेजर आले त्यांनी सांगीतले. आम्ही सदर फुट ओव्हर ब्रीजच्या बाजूला कॅबीन करण्यास तयार होतो परंतु त्यांचा झालेला खर्च महानगरपालिके ला दयावा असे ठरले असतांना महानगरपालिकेने पत्र दिले की, येत्या २ तारखेला महापालिका बैठक होणार आहे. सदर बैठक कुणाच्या समवेत होणार होती खुलासा करावा.

**मा. सभापती :** मा. महापौर व माझ्याकडे सदरील भागातील नागरींकाचे पत्र आलेले असुन त्यात हमालवाडी येथील नागरीक आहेत. त्या पत्राच्या अनुषंगाने येत्या ११ तारखेला मा. महापौर , मा. आयुक्त, मा. माजी खासदार श्री. जैस्वाल, मा. पालकमंत्री तसेच तेथील नागरीक यांच्या समवेत बैठक घेऊन निर्णय घेता येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** दि. १८.८.९८ रोजी निवेदन घेऊन नागरीक आलेले होते. या कामाबाबत कोर्ट कमिशनरचा रिपोर्ट आहे की होणारे काम योग्य होत आहेत. न्यायालयाची यास स्थगिती नाही. या संदर्भात माजी महापौर यांनी काम चालू करण्याबाबत मा. आयुक्त यांना पत्र दि. १९.१२.९८ रोजी दिलेले आहे. अदयापपर्यंत काम सुरु झालेले नाही.

**श्री. म. अ. रऊफ :** शहराचे पालकमंत्री यांची वेळ घेऊन मा. प्रशासन, मा. महापौर, मा. खासदार व इतर स. सदस्य यांच्या समवेत बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावा.

**मा. सभापती :** येत्या ११ तारखेला सर्व मान्यवरा समवेत तसेच सिल्कमिल कॉलनीतील येथील नागरीक यांचे समवेत चर्चा करुन सदर कामाबाबत निर्णय घेण्यात येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** या ठिकाणी महापालिकेने आतापर्यंत ३.५ लक्ष रुपये खर्च केलेले असुन अशाच पध्दतीचे छावणी येथे एका विकास कामावर २.५ लक्ष रुपये खर्च केले. सदर काम बंद होण्याच्या अगोदरचा बैठकीत निर्णय घेण्याचा होता काम बंद करुन बैठका घेऊन निर्णय घेणे चूकीचे असुन काम कशामुळे बंद पडले ज्या ठिकाणी विकास कामे चालु असते ते प्रशासन बंद पाडते याचा योग्य खुलासा करावा.

**श्री. विकास जैन :** माझ्या वार्डात वाचनाल्याचे उद्‌घाटन समारंभ कार्यक्रम येत्या २६ जाने. ९९ रोजी आयोजीत केलेला असुन वाचनाल्यात सर्व साहित्याची पूर्तता केलेली आहे काय, फर्निचर तसेच पुस्तक नाहीत स. सदस्य विश्वासात न

घेता कार्यक्रम आयोजित कुणाच्या म्हणण्यानुसार ठेवण्यात आला खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** वाचानाल्यासाठी पूस्तकाची मागणी केलेली असुन येत्या २६ तारखेपूर्वी पुस्तकाची व्यवस्था करण्यात येईल. तसेच फर्नीचर हे वेगवेगळया डीझाईन मापे घेऊन मागणी करण्यात येणार आहेत.

**श्री. म. अ. रऊफ :** माझ्या वार्डातील वाचनाल्यात ७ महिण्यानंतर पुस्तकाची पुर्तता करण्यात आली होती.

**श्री. जैन विकास :** एका वाचनाल्यातुन फर्निचर उचलायचे दुसऱ्या ठिकाणी ठेवायचे असे प्रकार घडतात.

**श्री. स. अली मिरा सलामी :** कोणत्या प्रकारचे फर्नीचर घेणार सागवानी की इतर लाकडाचे खुलासा करावा.

**श्री. विकास जैन :** "गेम" च्या बाबतचा खुलासा करावा तसेच बॅडमिंटनसाठी विद्युत व्यवस्थेबाबतही खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** गेमच्या बाबतही कार्यवाही करण्यात आलेली असुन येत्या २६ जाने. ९९ पर्यंत कॅरम, टेबल टेनिस इ. बाबतची पूर्ण पुर्तता करण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे :** वाचानाल्याच्या ठिकाणी कोणत्याही साहित्याची व्यवस्था नसतांना संबंधित अधिकारी हे यापुढे टेंडर काढण्याची कार्यवाही करुन साहित्याची पूर्तता करणार आहेत. असे वाटते.

**अति. शहर अभियंता :** सध्या वाचनाल्याचे काम चालु असुन विद्युत व्यवस्थेची सुविधा नाही झाली तरी इतर सर्व कामाबाबतची साहित्याची पूर्तता करण्यात येईल.

**श्री. विकास जैन :** २६ तारखेला पूर्ण साहित्याची पूर्तता केली नाही तर उपोषणाला बसेल याची नोंद घ्यावी सदर वाचनाल्यास (गेट) दरवाजा बसवणार नाही काय ? कधी बसवणार नुसते उद्‌घाटन करुन चालणार नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी येत्या २६ तारखेपर्यंत (गेट) दरवाजा बसविण्याची कार्यवाही करावी. विद्युत व्यवस्थेबाबत ही तात्काळ कार्यवाही करावी.

**विषय क्र. ४३४/१ :**

दिनांक २४.१२.९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. रविंद्र इंगळे :** मागील बैठकीत शहाबाद फरशी व डांबरीकरण शासकीय अनुदानातुन विकास करणेचे विषय स्थगित ठेवण्यात आले होते. मंजुर करावयाचे किंवा कसे अधिकारी यांच्याकडुन खुलासा करावा.

**श्री. गौतम लांडगे :** मागील विषयाला स्थगिती देण्यासंदर्भात चर्चा करण्यात येऊ नये. कारण सभेस मा. आयुक्तासह सर्व अधिकारी उपस्थित असतांना त्याच वेळसे खुलासा घ्यावयसा पाहिजे होता. कोणताही निर्णय घेऊ नये.

**मा. सभापती :** जास्तीच्या दराने निविदा दर पत्रके आले असल्याने पुन्हा दर पत्रके मागविण्याचे निर्णय झालेला होता. अधिकारी यांनी यांवर खुलासा करावा.

**मुख्यलेखा अधिकारी :** पृष्ठ क्र. १९ वर संबंधित अधिकारी यांनी खुलासा केलेलाच आहे. सदर प्रस्ताव अंदाजपत्रक ९६-९७ सालच्या दरसुची नुसार दर्शविलेले

आहे.उ त्यामुळे ते मंजुर करण्यास हरकत नसावी. पुर्न निविदा मागविण्यासारखा वाद नाही.

**श्री. म. अ. रऊफ :** शहाबाद फरशी तसेच डांबरीकरण कामे ही विकासाची कामे असुन मंजुर करावे.

**श्री. गौतम लांडगे :** मागील २ ते ३ वर्षात जी डांबरीकरणाची प्रस्ताव १८%, २०% अंदाजपत्रकांपेक्षा कमी दराने येत असत १२ ते १५ निविदा विक्री होतात व २ ते ३ निविदाचे दर भरुन प्राप्त होतात. त्यातील काहीचे अंदाजपत्रकीय दराने दर्शविलेल्या आहेत. मागील बैठकीत सभागृहाची संम्मती असतांना पुन्हा तेच प्रस्ताव मंजुर करण्याची निर्णय सभागृह घेत आहे. त्यावेळी मुख्यलेखा परिक्षक यांनी असा खुलासा केला की, थोडे बहुत प्रमाणात जास्तीचे दर पत्रके भरण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** एक ही निविदा जास्तीची नाही. संबंधित अधिकारी यांचे मत घेतले पुन्हा सदर विषयावर विचारा करावा असे कळविलेल आहे. २०-२०% ने जास्तीचे आलेले असुन अंदाजपत्रकीय रक्कम ९६-९७ च्या डी.एस.आर. प्रमाणे सर्व जास्तीचे असुन अंदाजपत्रकीय दराने मंजुर करण्यास हरकत असावी निर्णय घ्यावा.

**श्री. म. अ. रऊफ :** यापुर्वी किती जास्तीच्या दराचे निविदा भरुन आलेले प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले आहेत.

**मा. सभापती :** गेल्या ७ ते ८ महिण्यामध्ये जास्तीच्या टेंडरमध्ये कामे केलेली नाहीत.

**मुख्यलेखा अधिकारी :** काही वेळा १५ ते २० निविदा विक्री होतात २ ते ३ निविदा दरपत्रके भरुन येतात. अशा वेळेस ३ ते ४ % नी जास्तीची दरपत्रके आल्यास मा. आयुक्तांकडे तडजोडीसाठी सर्वांना बोलविण्यात येऊन १% कमी दराने करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. १ ऑक्टो. ९८ पासुनचे ९८-९९ च्या डि.एस.आर. चा विचार केल्यास ३% कमी दराने अंदाजपत्रक आहे. सर्व प्रस्ताव मंजूर करावे.

**मुख्यलेखा परिक्षक :** मागील सर्व फरशी व डांबरीकरण प्रस्तावा संदर्भातील संचिकेची तपासणी केली असता ९६-९७ च्या आधारित १० कामे फरशी बसविण्याचे असुन फरशी पुरवठा महानगरपालिकेमार्फत देणार असून फक्त लेबर चार्जेस (मजुरी) खर्च दर्शविलेला असुन १० पैकी ८ निविदातील कामे १% कमी दराने मंजुरी देण्यात आलेली आहेत. मागील बैठकीत ही मंजुरी करण्याची विनंती केलेली आहे. डांबरीकरणाचे प्रस्ताव सन ९७-९८ व ९८-९९ च्या दरसुचीप्रमाणे विचार केल्यास ८% कमी दर येतो. डांबरीकरणाची कामाचे दर जास्त असुन तडजोड करुन अंदाजपत्रकीय दराच्या १% कमी दराचे आज देण्यात येते. यात स्पर्धा दिसून येत नाही. परंतु नुकसान नाही.

**श्री. गौतम लांडगे :** टेंडर बिला मध्ये देण्यात येते. याबाबत स्पर्धा दिसुन येत नाही. पुर्नःनिविदा मागवावी. मुख्यलेखा परिक्षक यांनी अभिप्राय दिला आहे. पुन्हा मुख्य लेखा अधिकारी यांचे अभिप्रायची गरज नाही. असे माझे मत आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** फरशी पुरवठा महानगरपालिका करणार, "लेबर चार्जेस" फरशी बसवण्याकरिता निविदा मागवलेल्या आहेत. फरशीचे सर्व प्रस्ताव मंजुर करुन डांबरीकरण कामाचे प्रस्ताव पुन्हा निविदा मागविण्यात यावे.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** फरशी कोणत्या साईजची मागविण्यात येणार आहे.

**अति. शहर अभियंता :** ४० ते ५० एम.एम. जाडीची मागविण्यात येणार आहे.

**मा. सभापती :** दिनांक २४.१२.९८ च्या सभेत रस्त्याचे डांबरीकरण आणि शहाबाद फरशी बसविण्याबाबत मागविण्यात आलेल्या निविदा प्रकरणी याकासाठी पून्हा निविदा मागविण्यात याव्यात असा निर्णय झालेला आहे. तथापी सभागृहाने इतिवृत्त मंजुर करतांना सदर प्रस्ताव मंजुर करावे किंवा नाही याबाबत मत प्रदर्शन करावे अशी सुचना मांडली असता उपस्थित सर्व सभासंदापैकी श्री. स. अ. एकबालोद्दीन, श्री. गौतम लांडगे, श्री. विश्वारोद्दीन, श्री. स. अली मिरा सलामी या व्यतिरिक्त सर्व स. सदस्यांनी हात वर करत मंजुर करण्यास संमती दिली आहे. या बाबींचा विचार करता दिनांक २४.१२.९८ च्या सभेतील विषय क्र. ४०३, ४०४, ४०५, ४०६, ४०७, ४०८, ४०९, ४१०, ४११, ४१२, तसेच ऐनवेळचे ठराव क्र, ४१८, ४१९, ४२०, ४२१, ४२२, ४२३, ४२५, ४२८ मंजूर करण्यात येते.

**ठराव १)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४०३/३ अन्वये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी कोतवालपुरा व भोईवाडा विभाग क्र. २ मधील मोहल्लयातील गल्लयांत शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.५०% कमी दराची श्री. सुखबीरसिंग चंडोक निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. २)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४०४/४ अन्व्ये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. २ अंतर्गत मिलकॉनर, नारळीबाग, नागेश्वरवाडी, पैठणगेट व इतर मोहल्लयातील गल्लयात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.०९% कमी दराची श्री. व्ही. जी. स्वामी याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ३**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४०५/५ अन्वये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. ३ मधील भवानीनगर भागात अंतर्गत मोहल्लयातील रस्त्यावर शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांच्या झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. एस. ए. नवाब यांचेकडुन अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. ४)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र, ४०६/६ अन्वये फरशी बसविण्यांच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. ३ मधील गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी, काचीवाडा येथील अंतर्गत मोहल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. मोना कन्स्ट्रक्शन यांचेकडून

अंदाजपत्रकीय दरोपक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. ५)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र, ४०७/७ अन्वये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी वि. क्र. ३ अंतर्गत मोहल्लयात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. एम. जे. कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रक दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. ६)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४०८/८ अन्वये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. ३ अंतर्गत दादा कॉलनी, आजम कॉलनी, अजम कॉलनी, नेहरुनगर येथील अंतर्गत रस्त्यावर शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील कामे मे. एस. चंद्रपाल यांचेकडुन अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. ७)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसर ठराव क्र. ४०९/९ अन्वये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. १ मधील प्रगती कॉलनी, शांतीपुरा, बेगमपूरा अंतर्गत मोहल्लयातील गल्लयात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. कर्म्फर्ट कंन्स्ट्रक्शन कं. यांचेकडुन अं. प. दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ८)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र, ४१०/१० अन्वये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्यचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. ३ मधील शहाबाजार, चाऊसकॉलनी, बारी कॉलनी अंतर्गत मोहल्लातील रस्त्यावर शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारंकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. बसरा कंन्स्ट्रक्शन कं. यांचेकडुन अं. प. दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ९)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४११/११ अन्वये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. २ मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. २ मधील औरंगपुरा, बोहरी कठडा अंतर्गत मोहल्लयातील रस्त्यावर शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार

सदरील काम श्री. शेख शरीफ यांचे कडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. १०)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४१२/१२ अन्वये फरशी बसविण्याच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी विभाग क्र. १ मधील औरंगपुरा, मुर्गीनाला, लोटाकांरजा, बुढ्ढीलेन अंतर्गत मोहल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. शहा कंन्स्ट्रक्शन कं. यांचेकडुन अं. प. दरापेक्षा १.००% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. ११)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४१८/३ (ऐनवेळचे विषय ) अन्वये डांबरीकरण करणेच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी न्यु नंदनवन कॉलनी, पद्मपाणी सोसायटी, भुजबळ नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ०.१५% कमी दराची श्री. डी. एस. जग्गी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. १२)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४१९/४ (ऐनवेळचे विषय) अन्वये डांबरीकरण करणेच्या कामाकरिता पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी पहाडसिंगपूरा कला को -ऑप हौसिंग व लायब्ररीयन सोसायटी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. के. बी. पाथ्रीकर यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते

**ठराव क्र. १३)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र ४२०/५ (ऐनवेळचे विषय) अन्वये डांबरीकरणाच्या कामाकरिता पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी रेंगटीपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. ए. सी. कोठारी यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. १४)**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४२१/६ (ऐनवेळचे विषय) अन्वये डांबरीकरणाच्या कामाकरिता पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्या ऐवजी सिटीचोक ते किलेअर्क पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरीक काम मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रकशन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १५)**
सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४२२/७ (ऐनवेळचे विषय ) अन्वये डांबरीकरणाच्या कामाकरिता पुर्ननिविदा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी दादाकॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण कामासाठी प्राप्त झालेला निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. १६)**
सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४२३/८ (ऐनवेळचे विषय) अन्वये डांबरीकरण करणाचे कामाकरिता पुर्ननिविदा मागविल्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी सिध्दार्थ नगर भागात डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. डी. अजितसिंग यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. १७)**
सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४२५/१० (ऐनवेळचे विषय) अन्यवे डांबरीकरण करणेच्या कामासाठी पुर्ननिविदा मागविण्यांचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी जयसिंगपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. के. बी. पाथ्रीकर यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. १८)**
सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र. ४२८/१३ (ऐनवेळचे विषय ) अन्वये फरशी बसविणेच्या कामाकरिता पुर्ननिविदा मागविण्याचा निर्णय झालेला आहे. त्याऐवजी नारेगांव येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. शेख शरीफ याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मजुंरी देण्यात येते.

वरील दुरुस्तीसह दिनांक २४.१२.९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. ४३५/२ अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जालाननगर येथील उद्यानातील विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार र. रु. १,९१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "नविन उद्याने " या लेखाशिर्ष खाली करण्यांत येईल. तरी र. रु. १,९१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "नविन उद्याने " या लेखाशिर्ष खाली करण्यांत येईल. तरी र. रु. १,९१,०००/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालाननगर येथील उद्यानात विद्युतीकरण करण्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,९१,०००/- च्या अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३६/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, क्रांतीचौक ते महाविर चौक या रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ६,३७,७७०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १७ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त ६ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गायत्री कंन्स्ट्रक्शन | ४५.०५% | कमी |
| २) | के. बी. पाथ्रीकर | ३२% | कमी |
| ३) | आकाश कंन्स्ट्रक्शन | ३७.३७% | कमी |
| ४) | कुलवंतसिंग | ३३.८६% | कमी |
| ५) | हयात कंन्स्ट्रक्शन | ३६.०८% | कमी |
| ६) | एस. एच. असोसएट्स | २२% | कमी |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४५.०५% कमी दराची निविदा गायत्री कंन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** प्रस्तावात ४५.०५ कमी निविदा असल्याचे दर्शविण्यात आल आहे खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** संबंधित ठेकेदाराला पत्र दिलेले असुन कमी दराने काम करण्यास परवडते काय याबाबत खुलासा मागविलेला आहे.

**मा. सभापती :** साहित्य (मटेरियल) चांगल्या दर्जाचे वापरत असेल तर काम देण्यांस हरकत नसावी. प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्याप्रमाणे क्रांतीचौक ते महावरी चौक या रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४५.०५% कमी दराची गायत्री कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३७/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रंगारगल्ली येथे दगडी गटार बांधणेच्याकामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ५,३०,०००/- चे तयार करण्यांत आले असुन तयास दि. ३०.०७.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये ठराव क्र. ११४/९ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४६/९८ दि. १८.०८.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण १९ निविदा विक्री झाल्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण ८ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. महिंन्द्र | ३२.१० % कमी |
| २) | श्री. ए. व्ही. घुगरे | २३.७२ % कमी |
| ३) | मे. विपुल कंन्स्ट्रक्शन | २२.०५ % कमी |
| ४) | श्री. मो. सलीम | २१.१० % कमी |
| ५) | श्री. राम कंन्स्ट्रक्शन | १७.०० % कमी |
| ६) | मे. एस. एच. असोसिएट्स | ११.०० % कमी |
| ७) | मे. संध कंन्स्ट्रक्शन | १२.०० % कमी |
| ८) | मे. परफेक्ट कंन्स्ट्रक्शन कं. | २०.२३ % कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३२.१०% कमी दराने मे. महिंन्द्र कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** या प्रस्तावात ही ३२.१०% कमी दराचे दरपत्रक आहे. याबाबत संबंधित विभागाने खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** संबंधीत ठेकेदाराला पत्र पाठवुन काम चांगल्या प्रतीचे झाले पाहिजे. असे कळविण्यात आलेले आहे.

**मा. सभापती :** ठीक आहे. विषय क्र. ४ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रंगारगल्ली येथे दगडी गटार बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.१०% कमी दराची मे. महिंन्द्र कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३८/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्सुल येथे शाळा बांधण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ३८,५१,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्त महोदय यांनी दि. १७.०८.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार अंदाजपत्रक मान्यतेस्तव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवले असता ठराव क्र. ८८/३ दि. १९.०८.९८ अन्वये सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि. ७७/९८ दि. २८.१०.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २८ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १० दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २६.११.९८ रोजी उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मकदृष्टया तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शेख समद | १५.८६ % कमी |
| २) | हायवे कंन्स्ट्रक्शन | १७.९९ % कमी |
| ३) | सुजाता अली हाश्मी | १३.१० % कमी |
| ४) | एलोरा कंन्स्ट्रक्शन | ०७.०२ % कमी |
| ५) | डी. अजितसिंग | ०१.०५ % कमी |
| ६) | संतार कंन्स्ट्रक्शन | १२.९१ % कमी |
| ७) | जी. आर. घोडले | ०८.९९ % कमी |
| ८) | मॅट्रीक्स कंन्स्ट्रक्शन | २१.८९ % कमी |
| ९) | एस. के. कंन्स्ट्रक्शन | २१.०० % कमी |
| १०) | ए. एस. कुरेशी ॲण्ड कं. | १३.०४ % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्णजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८९% कमी दराची निविदा मे. मॅट्रीक्स कंन्स्ट्रक्शन यांची आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. १.१२.९८ ला मान्यता दिलेले आहे. तरी प्रस्ताव मंजुरी तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हुर्सल येथे शाळा बांधण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८९% कमी दराची मे. मॅट्रीक्स कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४३९/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. २१ येथे सिडको एन-६ मनपा प्राथमिक शाळा परिसरात सभागृह बांधण्याचे कामासाठी सां.बा. विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचिनुसार र. रु. ३,०६,१८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले त्यास मा. आयुक्तांनी दि. २८.०६.९८ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने ठराव क्र. १०१/२ दि. १०.०७.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/५१/९८ दि. ०३.०९.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण (२६) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (६) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३१.०६.९८ रोजी उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. बी. देहाडे | ७.२५ % कमी |
| २) | श्री. व्ही. व्ही. पेड्डी | १८.०० % कमी |
| ३) | श्री. एस. ए. नवाब | १६.१६ % कमी |
| ४) | श्री. मो. सलाउद्दीन | १२.८६ % कमी |
| ५) | श्री. एस. जी. भालेराव | १४.७७ % कमी |
| ६) | श्री. सुजात अली हाश्मी | १३.८६ % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराचे निविदा दर श्री. व्ही. व्ही. पेड्डी यांचे प्राप्त झालेले आहेत. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २७.११.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २१ येथे सिडको एन-६ मनपा शाळा परिसरात सभागृह बांधण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची श्री. व्ही. व्ही. पेड्डी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४०/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रोजेबाग येथे प्राथमिक शाळा बांधण्यासाठी सा. बां. विभागचे सन ९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये १०,३८,५५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ६.६.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तसेच मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ३४/१४ दि. १६.७.९८ च्या नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/५१/९८ दि. ३.९.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिमतारखे पर्यंत एकुण (२७) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण (पाच) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक ३१.१०.९८ रोजी उघडण्यात आल्या, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मॅट्रीक्स कंन्स्ट्रक्शन | ७.८८ % कमी |
| २. | परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | १७.३६ % कमी |
| ३. | काझी नुर मोहियोद्दीन | १८.९९ % कमी |
| ४. | नंदकुमार घोडले | ७.७८६ % कमी |
| ५. | सोहेल सिद्दीकी | ४.९९ % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९% कमी दराचे निविदा दर श्री. काझी नुर मोहियोद्दीन यांचे प्राप्त झालेले आहेत. त्यास मा. आयुक्त महोदयांनी दि. १४.१२.९८ ला मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोजेबाग येथे प्राथमिक शाळा बांधण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १८.९९% कमी दराची श्री. काझी नुर मोहियोद्दीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४१/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रीनिकेतन कॉलनी येथे वाचनालय बांधण्यासाठी सा. बां. विभागाचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुची नुसार र. रु. ९,८५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्तांनी रेखांकना अंतर्गत सभासदांची आवश्यक ती एन. ओ. सी. घेऊन मगच कार्यादेश द्यावा या अटीवर दि. २५.६.९८ रोजी मान्यता दिलेली आहे. मा. स्थायी समितीने ठराव क्र. ८३/४१ दि. २६.०६.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/५७/९७ दि. २२.९.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण १६ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण ५ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | राजेंद्र वर्दे | १९.९९ % कमी |
| २) | नंदकुमार घोडले | ९.९९९ % कमी |
| ३) | काझी नुर मोहियोद्दीन | १४.७८६ % कमी |
| ४) | मुबारक पठाण | १८.५७८ % कमी |
| ५) | ए. आर. कंन्स्ट्रक्शन | १३.८६ % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा १९.९९% कमी दराची निविदा श्री. राजेंद्र वर्दे यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा. आयुक्त महोदयांनी दि. १४.१२.९८ ला मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीनिकेतन कॉलनी येथे वाचनालय बांधण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १९.९९% कमी दराची श्री. राजेंद्र वर्दे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४२/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागेश्वरवाडी येथील प्राथमिक शाळेच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व मोकळया जागेवर अभ्यासिका बांधण्यासाठी सा. बां. विभागाचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ७,५३,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २१.७.९८ रोजी मान्यता दिलेली आहे, तसेच मा. स्थायी समितीने ठराव क्र, १४५/१९ दि. ३०.७.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र./मनपा/लेखा/नि/५१/९८ दि. ३.६.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदाविक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१५) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ५ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. ३१.०६.९८ रोजी उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | १४.३३ % कमी |
| २. | सुंदर कंन्स्ट्रक्शन | १६.९९ % कमी |
| ३. | आनंद बिर्ल्डस | १३.३ % कमी |
| ४. | कुलवंत सिंग | १२.७० % कमी |
| ५. | श्रीराम कंन्स्ट्रक्शन | ७.०० % जास्त |

तुलनात्म्कदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा १६.९९% कमी दराचे निविदा दर सुंदर कंन्स्ट्रक्शन यांचे प्राप्त झालेले आहेत, त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. १४.१२.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** संबंधित ठेकेदार चांगल्या (दर्जाचे) प्रतीचे काम करतो काय याची खात्री करुन या कामावर देखरेखीसाठी कर्मचारी ठेवण्यांत यावा.

**श्री. गौतम लांडगे :** जबाबदारीने काम करुन घ्यावयास कुणी तयार नाही. चांगले काम करतील असे सभागृहात अधिकारी आश्वासने देतात.

**श्री. विकास जैन :** संचिका मंजुरीला जातात. त्यावेळेस संबंधित ठेकेदारांनी योग्य काम करुन देण्या बाबत ताकिद दिली पाहिजे.

**मा. सभापती :** ज्या गुत्तेदारांनी चांगल्या (दर्जाचे) प्रतीचे काम केले नसेल, योग्य मटेरियल वापरले नसेल त्या गुत्तेदारांचे नाव काळया यादीत समाविष्ट करावे. प्रस्तावास मंजरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावाद दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी येथील प्राथमिक शाळेच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व मोकळाय जागेवर अभ्यासिका बांधण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १६.९९ कमी दराची सुंदर कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४३/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मंथन को. ऑप. हौ. सोसा. न्यु श्रेयनगर मधील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणेकरिता अंदाजपत्रक र. रु. ४,९९,०००/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती सभा दि. १५.९.९८ चे अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि. १५.९.९८ ठराव क्र. २३५/११ अन्वये मान्यता घेण्यात येऊन कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९८/७९ दि.३०.१०.९८ प्रसिध्द करुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्री दिनांक १३.११.९८ पर्यंत दहा निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम दि. ३०.११.९८ पर्यंत पाच निविदा दर भरुन प्राप्त झ ाल्या, त्याखालील प्रमाणे्

| | | |
|---|---|---|
| १. | जी. आर. घोडेले | अ. प. दरापेक्षा ३०% कमी |
| २. | एस. एच. असोसिएट्स | २७.०० % कमी |
| ३. | कुलवंतसिंग | २४.९० % कमी |
| ४. | आंनद बिल्डर्स | २३.०३ % कमी |
| ५. | राजेंद्र वर्दे | २१.०३ % कमी |

प्राप्त निविदापैकी तुलनात्कदृष्टया सर्वात की म्हणजेच अं. प. दरापेक्षा ३०% कमी दराची निविदा श्री. जी. आर. घोडले यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंथन को-ऑप. हौ. सोसायटी, न्यु श्रेयनगर मधील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३०% कमी दराची श्री. जी. आर. घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४४/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोतीवाला नगर येथे मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणेच्या कामाकरिता रक्कम रु. ९,३०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दिनांक २८.०८.९८ ठराव क्र. १९८/४३ अन्वये मान्यता घेणेत येऊन कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९८/७९ दि. ३०.१०.९८ अन्वये प्रसिध्द करुन बी-१ नमुन्यात निविदा मागविली असता कोरे निविदा विक्री दि. १३.११.९८ पर्यंत १९ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारीख दि. ३०.११.९८ पर्यंत ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | कुलवंतसिंग | ४.९९ % जास्त दराने |
| २) | शेख मसुद | १० % जास्त दराने |
| ३) | आनंद बिल्डर्स | १४ % जास्त दराने |

या अनुषंगाने प्राप्त दरात तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा आहे. दि. २३.१२.९८ रोजी मा. आयुक्तांनी त्यांचे दालनामध्ये दराबाबत गुत्तेदारासोबत वाटाघाटी होऊन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने काम करण्यास मा. आयुक्तांनी व गुत्तेदार यांनी संमती दिलेली आहे.

सबब वरील प्रमाणे श्री कुलवंतसिंग यांचेकडुन अं. प. २% कमी दराने सदरील काम करुन घेणेस्तव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीवाला नगर येथे मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. कुलवंतीसिंग यांचे कडुन अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४५/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲम्युसमेंट पार्क येथील टप्पा क्र. ३ चे काम करणे बाबतचे र. रु. ४,९६,३५०/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीसभा दि. २८.८.९८ ठराव क्र. १८९/३४ अन्वये मान्यता घेण्यात येऊन कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९८/७९ दि. ३०.१०.९८ अन्वये प्रसिध्द करुन बि-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्री दि. १३.११.९८ पर्यंत आठ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीचा अंतिम दि. ३०.११.९८ पर्यंत तिन निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | कुलवंतसिग | २०.१०% कमी |
| २) | मुबारक पठाण | १६.०९% कमी |
| ३) | मो. सोहेल सिद्दीकी | ८.०० % कमी |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲम्युसमेंट पार्क येथील टप्पा क्र. ३ चे काम करणे करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २०.१०% कमी दराची श्री कुलवंतसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४६/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वित्तीय वर्ष सन १९९९ ते २००० या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर हे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये म.न.पा. ने दिनांक २०.०२.१९९९ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे.

त्या प्रमाणे सन १९९९-२००० या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे् दर प्रस्तावित आहेत. खालील दर हे कर योग्य मुल्यांवर आकरले जातील.

| अ. क्र. | कराचे नांव | सन ९८-९९ चे दर करयोग्य मुल्य दर | | सन ९९-२००० चे प्रस्तावित दर करयोग्य मुल्य दर | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | | |
| | | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०,००० | २४% | १००१ ते १०,००० | २४% |
| | | १०,००१ ते २०,००० | २५% | १०,००१ ते २०,००० | २५% |
| | | २०,००१ ते ५०,००० | २७% | २०,००१ ते ५०,००० | ३०% |
| | | ५०,००१ ते १००००० | २८% | ५०,००१ ते १००००० | ३३% |
| | | १,००,००० ते पुढे | २९% | १,००,००० ते पुढे | ३५% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | | | |
| | अ) निवासी वापर<br>ब) निवासेत्तर वापर | --//--<br>--//-- | ३%<br>६% | --//--<br>--//-- | ३%<br>८% |
| ३. | वृक्ष कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ६. | पथ कर | --//-- | १% | --//-- | २% |
| ७. | जलनि:सारण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ८. | जल लाभ कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ९. | मोकळ्या जागेचा कर सामान्य दराने आकारण्यात येईल. | | | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी उपकर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करणेयोग्य मुल्यांवर आकारण्यात येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे खालील दर्शविलेल्या दराने मालमत्ता कर आकरणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
महानगरपालिकेचे दर

| **अ. क्र.** | **कराचे नांव** | **सन ९९-२००० चे प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | १ ते १००० | २३% |
| | | १००० ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | ३३% |
| | | १००००० ते पुढे | ३५% |
| २. | साफसफाई कर<br>अ) निवासी कर<br>ब) निवासेत्तर कर | --//--<br>--//--<br>--//-- | <br>३%<br>८% |
| ३. | वृक्ष कर | --//-- | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | --//-- | १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | --//-- | १.५% |
| ६. | पथ कर | --//-- | २% |
| ७. | जलनि:सारण | --//-- | १.५% |
| ८. | जललाभ कर | --//-- | १.५% |
| ९. | मोकळया जागेचा कर सामान्य कराचे दराने आकारण्यात येईल. | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी उपकर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर निर्णयाप्रमाणे व दराप्रमाण् कर योग्य मुल्यावर आकारण्यात येतील. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. ४४७/१४ :**

उपआयुक्त (म.) प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेलसच्या मोकळया जागांना कर आकारणी करणेसाठी कराचे दर हे मु. प्रां. म.

अ. १९४९ चे प्रकरण -९ कलम ९९ अन्वये मनपाने दि. २०.०२.९९ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे.

त्या प्रमाणे सन १९९९-२००० या वित्तिय वर्षासाठी हॉटेल्सच्या मोकळया जागांना निवासेत्तर "३" प्रकारचे दर रु. ४,८४ प्रति चौ.मी. प्रतिमहा अपेक्षित दर प्रस्तावित आहेत.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या वित्तीय वर्षासाठी हॉटेल्सच्या मोकळया जागांना निवासत्तेर "३" प्रकारचे दर रु. ४.८४ प्रति चौ.मी. प्रतिमहा अपेक्षित दराने लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सर्वसाधारण सभेसमोर शिफारस करण्यांत येते.

**विषय क्र. ४४८/१५ :**

उप आयुक्त (म.) प्रस्ताव सादर करत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना नविन आकारणी करतांना स्वत: वापरातील "अ" निवासी मालमत्तास रु. ४.८४ प्रति चौ. मी. अपेक्षित दराने कर आकारणी करण्यात येत व निवासेत्तर मालमत्तेस रु. ११.३० प्रति चौ. मी. अपेक्षित दराने कर आकारणी करण्यांत येते. त्याचप्रकारे बांधकाम प्रकाराप्रमाणे "ब", "क" व "ड" साठीचे दर आहेत.

सदरचे दर हे सन १९८७-१९८८ मध्ये मंजुर करण्यात आलेले आहेत व अंमलात आलेले आहेत. त्यानंतर आजपर्यंत सदरचे दर हे सुधारीत करण्यात आलेले नाहीत.

सन १९९९-२००० या वित्तीय वर्षासाठी हे दर दरवर्षी १५% वाढ गृहीत धरुन खालीलप्रमाणे प्रस्तावित आहेत.

| बांधकामाचा वर्ग | निवासी | | निवासेत्तर | |
|---|---|---|---|---|
| | ९८-९९ | ९९-२००० | ९८-९९ | ९९-२००० |
| "अ" | ४.८४ | १९.५८ | ११.३० | ४५.६५ |
| "ब" | ३.७६ | १५.१९ | ९.१४ | ३६.९२ |
| "क" | ३.२२ | १३.०० | ६.४५ | २६.०५ |
| "ड" | १.६१ | ६.५० | ४.८४ | १९.५८ |

वरील प्रस्तावित दर हे १.४.१९९९ पासुन नविन कर आकारणी करतांना अंमलात येतील. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** निवासी बांधकामाच्या अ वर्गमध्ये ४ पट वाढ केलेली आहे. प्रशासन अशा वर्गातील बांधकाम करणाऱ्या लोकांवर अन्याय करत आहे. ८७-८८ पासुनस आतापर्यंत वाढ झालेली नसुन टक्केवारीनुसार किती वाढ झालेली आहे जे १५ टक्के नागरिक नियमित कर भरतात त्यांच्यासाठी दर वाढ केलेली आहे. ज्या ८५% टक्के नागरिक कर भरत नाही. तो वसुल करावा. १००% वसुली केल्यानंतर असे प्रस्ताव मंजुरीसाठी सभागृहात आणावे.

**श्री. विकास जैन :** वसुली कशा पध्तीने करणार.

**मा. सभापती :** गेल्या वर्षीच्या कराप्रमाणे कर आकारणी ठेवुन सर्वसाधारण सभेकडे पाठविणार.

**श्री. संजय जोशी :** मागील कर दर्शविलेल्या पध्दतीने प्रस्ताव प्रशासनाने ठेवावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** नविन कर हे १.४.९९ पासुन नविन इमारतीवर लावणार आहेत.

**श्री. संजय जोशी :** ९८-९९ चे जे दर आहेत त्याप्रमाणे मंजुर करावे.

**मा. सभापती :** कर वाढ रद्द करण्यात येते. ९८-९९ चे दराप्रमाण् मान्य करुन सर्वसाधारण सभेकडे पाठवण्यात यावा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्याप्रमाण् औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना नविन कर आकारणी करतांना स्वत: वापरातील वेगवेगळया बांधकाम प्रकाराप्रमाणे ठरलेल्या दराने कर आकारणी करण्यांत येते. प्रस्तावित दराने कर आकारणीत कोणतीही वाढ न करता सन १९९८-९९ करिता लागु असलेले खालील दर सन १९९९-२००० वर्षाकरिता लागु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

सन १९९९-२००० करिता प्रस्तावित दर खालील प्रमाणे.

| बांधकामाचा वर्ग | निवासी | निवासेत्तर |
|---|---|---|
| "अ" | ४.८४ | ११.३० |
| "ब" | ३.७६ | ९.१४ |
| "क" | ३.२२ | ६.४५ |
| "ड" | १.६१ | ४.८४ |

सर्व साधारण सभेस शिफारस करण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४९/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत विभाग क्र. १, २ व ३ मधील लहान गल्लयामध्ये फेस टु फेस शहाबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी एकुण दहा (१०) कामांचे अंदाजपत्रकास प्रशासकीय व मा. स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर दहाही कामाच्या संचिका मध्ये सदर कामासाठी लागणारी फरशी महानगरपालिका कार्यालयातर्फे पुरवठा करण्यात येणार असल्याबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यानुसार फरशी पुरवठा करण्याच्या कामाकरिता कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र. /मनपा/लेखा/नि/७३/९८ दिनांक १७.१०.९८ अन्वये जाहीर निविदा प्रगट करुन दर मागविले असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार (०४) निविदा विक्री झाल्या व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यत सदरील चारही निविदापत्रके दर करुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १७.११.९८ रोजी उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. नंदकुमार आर. घोडेले | रु. ९५= प्रति चौ. मी. + ११% विक्रीकर<br>एकुण १०५.४५ प्रति चौ. मी. |
| २) | मे. पृथ्वी ग्रेनाईट प्रा. लि. | रु. १०७.००= प्रति चौ. मी. |
| ३) | मे. रेणुका इंडस्ट्रीज | रु. १०७.००= प्रति चौ. मी. |
| ४) | मे. राणा कंन्स्ट्रक्शन | रु. १४०.०० प्रति चौ. मी. |

वरील पैकी प्राप्त निविदापत्रकाचे श्री. नंदकुमार आर. घोडेले यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रक्कम रुपये ९५.००११% विक्रीकर म्हणजेच र. रु. १०५.४५ प्रति चौ. मी. असे आहेत.

श्री. नंदकुमार आर. घोडेले यांचे वरील दर जास्त वाटत असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीस्तव बोलावण्यात आले असता त्यांना सदर काम डी.एस.आर. दराने म्हणजेच रु. ८९.२५ प्रति चोरस मिटर या दराने करण्यास तयार आहात काय याबाबत विचारणा केली असता सदर काम त्यांनी डी. एस. आर. दराने करण्यास तयार नाहीत असे सांगितले व दिलेल्या दरा ऐवजी रक्कम रु. १००.०० प्रति चौ. मी. या दराने करण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मा. आयुक्तांनी सदर ठेकेदारास पुन्हा वाटाघाटीसाठी बोलावण्यात यावे म्हणुन आदेशित केले. त्यानुसार संबंधीत ठेकेदारास पुन्हा वाटाघाटीस्तव बोलाविण्यात आले असता वाटाघाटीअंती डी. एस. आर. दरावर चढणावळ/उतरणावळ/हमाली/वाहतक इ. सर्व खर्चासह गोडाऊन पोहोच करण्याचे दर र. रु. ९५.०० चौ. मी. या दराने करण्यास तयार असल्याचे त्यांनी मान्य केले.

तरी श्री. नंदकुमार आर. घोडेले यांच्याकडुन वरील दर्शविल्याप्रमाणे रक्कम रुपये ९५.०० प्रति चौ. मी दराने गोडाऊन पोहोच फरशी खरेदी करण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मनपा अंतर्गत विभाग क्र. १, २ व ३ मधील लहान गल्ल्या मध्ये फेस टु फेस शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता लागणारी फरशी पुरवठा करण्याकरीता मागविण्यात आलेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्याा वाटाघाटीनुसार सदर फरशी पुरवठयाचे काम श्री. नंदकुमार आर. घोडेले याच्याकडुन प्रति चो. मी. रुपये ९५.०० या दराने गोडाऊन पोहोच फरशी खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ४५०/१७ :**

कार्यकारी अभियंता, स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. नुर कॉलनी स्लम येथे नाल्यावर स्लॅब टाकणे बाबत कामा करिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुची नुसार रु. १३,९५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खुली गटार १० वा वित्त आयोग ाय शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २३.०७.९८ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच सर्वसाधारण सभेत दि. १९.०८.९८ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण १४ निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झ ाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १. | माणिक राठोड | ०.१०% कमी |
| २. | कुलवंतसिंग | १२.७०% जास्त |

तुलनात्म्कदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे असलेले श्री. माणिक राठोड यांची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नुरकॉलनी स्लम येथे नाल्यावर स्लॅब टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं. प. दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. माणिक राठोड यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५१/१८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला चिकलठाणा (गांव) येथे फरशी व खांडकी बसविणेचे कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु. ६,४७,९१४/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दिनांक ४.८.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली तसेच स्थायी समितीच्या विषय क्र. १६२/७/दि. २८.८.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १३.११.९८ पर्यंत एकुण २० कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकरण्याच्या दि. ३०.११.९८ रोजी फक्त ३ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. ३०.११.९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. ए. एम. फारुकी | अं. प. दरापेक्षा | ५% | जास्त |
| २) | श्री. सुखबिरसिंग | --//-- | ८% | जास्त |
| ३) | श्री. शे. समद | --//-- | १०% | जास्त |

प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा श्री. ए. एम. फारुकी यांची आहे. करीता त्यांना मा. आयुक्त साहेबांचे दालनात चर्चेसाठी बोलाविण्यात आले व चर्चेत ठरल्याप्रमाणे ५% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराची मान्यता मा. आयुक्तांनी दिली आहे. करीता मंजरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाण् मो. चिकलठाणा (गांव) येथे फरशी व खांडकी बसविणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्म्कदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. ए. एम. फारुकी यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५२/१९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मसनतपुर येथे शहाबाद फरशी बसविणेचे कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५,१३,३१२/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दि. ९.८.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली तसेच स्थायी समिती विषय क्र. १७९/२४ दि. ९.१०.९८ अन्वये मंजुरी मिळाली नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी

देवुन निविदा मागविल्या आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १३.११.९८ पर्यंत एकुण ११ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या दिवशी फक्त ३ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारसमक्ष दि. ३०.११.९८ रोजी उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ए. एम. फारुकी | अं. प. दरापेक्षा | १.१ % कमी |
| २. | मे. परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | --//-- | २ % जास्त |
| ३. | श्री. शजात हाश्मी | --//-- | ५ % जास्त |

प्राप्त निविदेपैकी तुलनात्मक कमी व अं. प. दरापेक्षा १.१% कमी दराची निविदा श्री. ए.एम. फारुकी यांची निविदा आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सदर काम १० वा वित्त आयोग या शिर्षातुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपुर येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १.१% कमी दराची श्री. ए.एम. फारुकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५३/२० :**

कार्यकारी अभियंता, स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिलिंदनगर (नागसेन नगर) स्लम भागातील सार्वजनिक शौच्यालयाचे आधुनिकीकरण व दुरुस्तीकरण करीता अंदाजपत्रक रक्कम रुपये ५,७५,८००/- सार्वजनिक बांधकाम विभाग यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दिनांक २५.८.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली तसेच स्थायी समितीचय विषय क्र. २३३/९ दिनांक १५.९.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १३.११.९८ पर्यंत एकण ६ कोऱ्या निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दिनांक ३०.११.९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख मसुद | अं. प. दरापेक्षा | ३०.८५ % कमी |
| २. | श्री. आनंद बिल्डर्स | --//-- | २३.०३ % कमी |
| ३. | पी. पी. फूलवरे | --//-- | १५.१० % कमी |
| ४. | जी. आर. घोडेले | --//-- | ०.०१ % कमी |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा३०.८५% कमी दराची निविदा श्री. शेख मसुद यांची निविदा आहे.

करिता श्री. शेख मसुद यांची अं. प. दरापेक्षा ३०.८५% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलींदनगर (नागसेन नगर) स्लम भागातील सार्वजनिक शौच्यालयाचे आधुनिकीकरण व दुरुस्ती करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३०.८५% कमी दराची श्री. शेख मसुद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५४/२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जयविश्वभारती कॉलनी जलकुंभापासुन वितरण व्यवस्थेसाठी विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकावयाच्या आहेत. त्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ५९,४०,३९५/- चे तयार करण्यांत येवुन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २८२/३६ दि. ९.१०.९८ अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ७९/९८ जी की, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण अकरा (११) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेस एकुण सहा (६) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) मे. खर्डीकर | ३% कमी |
| २) ए. सी. कोठारी | १.११% कमी |
| ३) व्ही. आर. महाजन | १.८५% कमी |
| ४) मे. हरीओम कंन्स्ट्रक्शन | १४.९९९% कमी |
| ५) जी. आर. घोडेले | ९.९९९% कमी |
| ६) सलीम पटेल | ७.११% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा. मे. हरीओम कंन्स्ट्रक्शन यांची कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयविश्व भारती कॉलनी जलकुंभापासुन वितरण व्यवस्थेपनेसाठी विविध व्यासाच्या जलवाहीनी टाकावयाचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९९% कमी दराची मे. हरिओम कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुंमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५५/२२ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्राला लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरिता दैनिक वर्तमानपत्रातुन निविदा सुचना प्रसिध्द करुन (दरपत्रक) निविदा मागविली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. बी. एम. ठाकर | रु. १६,४००/- प्रति टन |
| २. | मे. शिरीष केमिकल्स | रु. १४९४०/- प्रति टन |
| ३. | मे. फोनिक्स केमिक्ल्स | रु. १४८२०/- प्रति टन |

वरीलपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. फोनिक्स केमिकल्स यांचा असुन तो रुपये १४८२०/- प्रति मे. टन एवढा आहे. एकुण १५० मे. टन वर्षाला पुरवठा अपेक्षित आहे. तरी मे. फोनिक्स केमिकल्स यांची सर्वात कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्राला लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच प्रति टन १४८२०/- या दराची मे. फोनिक्स केमिकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५६/२३ :**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला ओह की, मो. बारी कॉलनी येथील गल्ली नं. ५ व टाकळकर हौ. सोसायटी जोडण्यासाठी भुखंड क्र. ७ न. भु. क्र. १२०७७/३/९ मधुन ३x१३.७२ मिटर ४१.१६ चौ.मी. जागा रस्त्यासाठी देण्यास जमिन मालक श्री. मिरखान सोहेलखान पठाण व मोहासीना बेगम भ्र. मिरखान पठाण यांनी संमती दिलेली आहे. या रस्त्याची मागणी या भागातील नागरिकांनी केलेली आहे. सदर रस्ता केल्यास बारी कॉलनी ते टाकळकर हौसिंग सोसायटीस जोडणारा सरळ रस्ता तयार होऊन वाहतुकीस खुला होईल.

सदर जागेचा मोबदला चालु वर्षाचे शिघ्र सिध्द गणकाचे आधारे दिल्यास संबंधित जमिन मालक जागा देण्यास तयार आहेत सदर जागेचे मुल्यांकन हया वर्षाचे शिघ्रसिध्द गणकानुसार रक्कम रु. ५६,३८७/- निश्चित करण्यात आले आहे. तसेच खरेदी खताचा खर्च महानगरपालिकेने ५०% व मिळकत धारकाने ५०% करावयाचा आहे. त्याचे निम्मी रक्कम रुपये २८००/- मोबदला रक्कमेतुन वळती करुन उर्वरित रक्कम रुपये ५३,५८७/- जमिन मालकास देण्याच्या मान्यतेस्तव तसेच खरेदी खताच्या खर्चाची रक्कम रु. ५६००/- श्री. डी. डी. कालेले, शा. अ. यांना अग्रिम म्हणुन देण्यात यावी. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. बारी कॉलनी येथील गल्ली नं.५ टाकळकर हौसिंग सोसायटी जोडण्याकरिता भुखंड क्र. ७ न. भु. क्र. १२०७७/३/९ मधुन ४१.१६ चौ.मी. जागा संपादित करुन जमिन मालक, श्री. मिरखान साहेबखान पठाण व मोहसिना बेगम भ्र. मिरखान पठाण यांना जागेचा मोबदला मुल्यांकन शिघ्र सिध्दर गणकानुसार र. रु. ५६३८७/- मधुन एकुण खरेदी खताचा खर्च रु. ५,६००/- पैकी निम्मी र. रु. २८००/- वळती करुन उर्वरीत र. रु. ५३,५८७/- संबंधितास अदा करणेस तसेच खरेदीखतासाठी खर्चाची र. रु. ५,६००/- श्री. डी. डी. कालेले, शाखा अभियंता यांना अग्रिम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५७/२४ :**

मो. उस्मानपुरा स. नं. ६ करिता १९६६ मध्ये रेखांकन मंजुर करण्यांत आले होते. त्या मंजुर रेखांकनातुन जाणाऱ्या २४.०० मी विकास योजना रस्त्याने बाधित होणाऱ्या क्षेत्राकरिता संबंधितास मोबदला देण्यात आलेला नाही.

आता संबंधितास मुळ जमिन मालकाने रस्त्याचे बाधित क्षेत्राचा मावेजा मिळावा म्हणुन केलेली मागणी व यापुर्वी त्या वेळच्या नगरपालिकाच्या नियोजन व विकास समितीने दि. १.२.८२ च्या बैठकीत ठराव क्र. १७ ने संबंधितास विकास योजना रस्त्याने बाधित झालेल्या जागेचा मावेजा वाटाघाटी करुन देण्यास मंजुरी दिलेली आहे. व स्थायी समितीस शिफारस केलेली आहे. हे विचारात घेता महापालिकेने त्यास रस्त्याचे बाधित क्षेत्राचा रोख रक्कमेच्या स्वरुपात मोबदला न देता रेखांकनातील खुल्या जागेतुन संबंधितास किमान २५० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड देण्याचा प्रस्ताव वाटाघाटीने स्विकाण्यात आला आहे.

करिता मंजुर रेखांकनाचे खुल्या जागेच्या विहीत टक्केवारी सवलत देवुन त्यातील २५० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड संबंधित मुळ जमिन मालकास निवासी वापरास्तव देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

खुल्या जागेतुन भुखंड दिल्यानंतर खुल्या जागेचे १०% ऐवजी ८.५% एवढे क्षेत्र उपलब्ध राहते. प्रस्ताव मान्यतेनंतर आवश्यक तो सर्व कागदपत्रांची / करारनाम्याची रस्त्याने बाधित क्षेत्र महानगरपालिकास रितसर हस्तांतरीत करुन घेण्यात येऊन पुर्तता करुन खुल्या जागेतुन संबंधितास जागा देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. उस्मानपुरा सं. न. ६ करीता मंजुर रेखांकनातुन जाणाऱ्या २४.०० मिटर विकास योजना रस्त्यात बाधित होणाऱ्या क्षेत्राचा मावेजा शेख स्वरुपात न देता मंजुर रेखांकनाचे खुल्या जागेच्या विहीत टक्केवारीत सवलत देवुन त्यातील २५० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड संबंधित मुळ जमिन मालकास निवासील वापरास्तव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची / करारनामाची पुर्तता करुन घेऊन बाधित क्षेत्र मनपास रितसर हस्तांतरीत झाल्यानंतर खुल्या जागेतुन संबंधितास जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५८/२५ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक २२.१२.९८ रोजी मा. महापौर दालनात संघटनेच्य पदाधिकाऱ्यांच्या समवेत मा. आयुक्त, मा. उप-आयुक्त (प्र.) यांच्यात चर्चा झाली. त्यानुसार ज्या हंगामी स्त्री मजुरांना सतत १० वर्ष सेवा झाली अशा स्त्रि मजुरांना मकर संक्रांतीला साडया देण्याबाबत निर्णय झाला आहे.

वरील निर्णयानुसार आस्था -२ विभागाकडुन अशा स्त्री मजुरांची यादी या विभागास प्राप्त झाली आहे. या यादीमध्ये ९ वार तथा ६ वार साडी परिधान करणाऱ्या मजुरांचा बोध होत नसल्याने तसेच वेळेची मर्यादा असल्याने खालील प्रमाणे साहित्य मागविणे आहे. दर्शविलेले दर यापूर्वीच स्थायी समिती ठराव क्र. ३७७/३८ दि. ५.१२.९८ अनुसार मान्य आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | साडी रंगीत ८ मिटर मनिषा कं | - २२० नग | - ४३५/- | = ९५,७००/- |
| २) | साडी पांढरी ८ मिटर मनिषा कं. | - ३६ नग | - ४३५/- | = १५६६०/- |
| ३) | शर्ट सलवार कापड (७ मिटर प्रती नग) | ३० नग | - ३५०/- | = १०५००/- |
| ४) | ओढणी कापड (२.५ मी. प्रत्येकी) | - ३० नग | - ७०/- | = २१००/- |
| ५) | ब्लाऊज पिस (८० सेमी प्रत्येकी) | - २५६ | - २०/- | =५१२०/- |

वरील प्रमाणे हंगामी स्त्री कर्मचाऱ्यांना (मजुरांना) प्रत्येकी एक नग साडी ब्लाऊज पिस तसेच शर्ट सलवार, ओढणी कापड खरेदीसाठी एकुण खर्च वरीलप्रमाणे रु. १२९०८०/- येत आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साडी संदर्भात आणखी ५० साडया (नग) मागणी वाढ करण्यात यावी. त्या अनुषंगाने प्रशासनाकडे पत्र दिलेले आहेत.

**मा. सभापती :** प्रस्तावात दर्शविलेले साडीचे नग संख्येमध्ये आणखी ५० जास्तीच्या साडया मागविण्यासह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्या हंगामी स्त्री मजुरांना सतत १० वर्ष सेवा झाली आहे. अशा स्त्री मजुरांना मकर संक्रांतीला साडया देण्याकरिता तसेच यापुर्वी स्थायी समितीने ठराव क्र. ३७७/३८ दि. ५.१२.९८ च्या मंजुर दराने खालील दर्शविल्याप्रमाणे साडी, ब्लाऊज पीस तसेच शर्ट सलवार, ओढणी कापड खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) साडी रंगीत ८ मी (मनिषा कं.) - | २२० नग | रु. ४३५/- | = ९५,७००/- |
| २) साडी पांढरी ८ मी (मनिषा कं.) - | ३६ नग | रु. ४३५/- | = १५,६६०/- |
| ३) शर्ट सलवार कापड (७ मी. प्रत्येकी) | ३० नग | रु. ३५०/- | = १०,५००/- |
| ४) ओढणी कापड (२.५ मी प्रत्येकी) | ३० नग | रु. ७०/- | = २,१००/- |
| ५) ब्लाऊज पीस (८० सेमी. प्रत्येकी) | २५६ नग | रु. २०/- | = ५,१२०/- |
| | | | रु. १,२९,०८०/- |

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ठरल्याप्रमाणे वरील साहित्याचा व्यतिरिक्त उर्वरित स्त्री मजुरांना साडया व ब्लाऊज पीस चे वाटप करता यावे म्हणुन जास्तीचे ५० नग साडया व ब्लाऊज पीस प्रत्येकी खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९/२६ :**

सहाय्यक संचालक नगररचना प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेने सुराणानगर व बसैय्येनगर या मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत आमदार निधीतुन बाधंण्यात आलेल्या व्यायाम शाळा खालील संस्थानी दीर्घ मुदतीकरीता भाडेपट्टयावर मिळाव्यात म्हणुन मागणी केलेली आहे.

१) सुराणानगर : अर्जुन जिम्नॅस्टी असोसिएशन, औरंगाबाद
२) बसैय्यनगर : जिल्हा आर्म रेसलिंग असोसिएशन, औरंगाबाद

महानगरपालिकेतर्फे व्यायाम शाळेसाठी साहित्य, उपकरणे घेणे आवश्यक तो कर्मचारी वर्ग नेमणे, नियमित देखभाल करणे इत्यादी सध्या शक्य नाही. करिता महानगरपालिकेने उभारलेली वास्तु खाजगी संस्थेस देणेची असल्यास त्याचे भाडे निश्चित करुन तसेच जाहिर लिलावाची अट शिथिल करुन वर नमुद संस्थाना निर्देशित व्यायाम शाळा महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी / शर्तीस पात्र राहुन भाडेपट्टयावर देण्यांचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर भाडे समिती नियमानुसार जे काहि भाडे ठरवेल त्या भाडे दराने सदर हॉल / व्यायाम शाळा हया संस्थाना भाडेपट्टयावर देण्याबाबतची कार्यवाही व त्या अनुषंगाने इतर सोपास्कार / करारनामा इ. करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे् औरंगाबाद महानगरपालिकेने सुराणानगर व बसैय्यनगर या मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत आमदार निधीतुनउ बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळांची वास्तु खालील दर्शविलेल्या संस्थांना भाडेपट्टयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१. सुराणा नगर शाळा वास्तु - अर्जुन जिम्नॅस्टीक असोसिएशन, औरंगाबाद
२. बसैय्यनगर व्यायाम शाळा वास्तु - जिल्हा आर्म रेसलिंग असोसिएशन, औरंगाबाद

जाहीर लिलावाची अट शिथील करुन वर नमुद केलेल्या संस्थांना निर्देशित व्यायाम शाळा महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी/शर्तीस पात्र राहुन भाडेपट्टयावर देण्यास तसेच भाडे समिती नियमानुसार जे काही भाडे ठरवेल त्या दराने सदर हॉल /व्यायाम शाळा संस्थांना देण्याबाबतची कार्यवाही व त्या अनुषंगाने करारनामा इ. करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४६०/१ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तवित केले आहे की, सन ९८-९९ साठी साथ प्रतिबंधक उपाय योजने करीता पाणी शुध्दी करणाऱ्या गोळया व औषधी खरेदी करणेसाठी वृत्तपत्रामधुन जाहिरात देऊन खरेदी करणे बाबत दि. ६.१०.९८ जा. क्र. मनपा / आरोग्य / १६५५/९८ नुसार जाहिर निविदा देवुन दरपत्रके मागविण्यांत आली. त्यामध्ये खालील पुरवठा धारकांकडुन दरपत्रके प्राप्ती झाली.

१) मे. प्रिमीअर असोसीएट् नागपुर,
२) जस, बिजनेस सिस्टीमस् ,
३) अग्रवाल एनन्सीज,
४) एस. के. सेल्स,
५) टिव्हीम फर्मासिटीकल्स

यांचे दरपत्रक प्राप्त झाले त्यानुसार मा. आयुक्तांशी वाटाघाटी करुन खालील पुरवठा धारकाचे कमी दर मंजुर करण्यांसाठी व त्यांचे बरोबर करार करणे साठी मंजुरी देणे.

१) मे. प्रीमिअर असोसिएट् नागपुर- क्लोरिन टॅबलेट्स ३० एमजी दर रु. ७२.५० पैसे प्रति हजार
२) टिव्हीएम -
३) टॅब डिलीफ्रेम - दर ९००.०० रु. प्रति हजार
४) टॅब टिव्हगेस - दर १११.०० रु. प्रति शंभर
५) टॅब टिव्हीफल्म फोर्ट - दर १३९.०० रु. प्रति शंभर

वरील प्रमाणे कमी दराचे दरपत्रक संबंधित पुरवठा धारकाकडुन वरील दराप्रमाणे मंजुर करण्यांत यावे व ४ लाख ७५ हजार पर्यन्त च्या खरेदीस मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९८-९९ साठी साथ प्रतिबंधक उपाय योजनेकरीता पाणी शुध्दीकरणाच्या गोळया व औषधी खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकांनुसार मा. आयुक्तांशी झालेल्या वाटाघाटीप्रमाणे खालील दर्शविलेल्या दरास मंजुरी देण्यांत येते.

१) मे. प्रिमिअर असोसिएट्स नागपुर क्लोरिन टॅबलेट्स ३० एम.जी. दर रु. ७२.५० पैसे प्रति हजार
२) टी. व्ही. एम. फर्मास्युटीकल्स गोवा टॅब डिलीप्रोम दर रु. ९००.०० रु. प्रति हजार
३) टॅब व्हिगेस दर रु. १११.०० रु. प्रति शंभर

४) टॅब टिव्हीफेल्स फोर्ट दर रु. १३९.०० रु. प्रति शंभर

वरील प्रमाणे कमी दराचे दरपत्रक धारकाकडुन खरेदी करण्यात यावयाचे औषधीकरीता लागणाऱ्या एकुण र. रु. ४ लाख ७५ हजार च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१/२ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मौलाना अब्दुल कलाम आजाद केंद्र मजनुहील, औरंगाबाद येथे बांधने करीता अंदाजपत्रक रक्कम रु. १ कोटी ७२ लाखाचे तयार करण्यात आले असुन त्याला प्रशासकीय मान्यता व सर्वसाधारण सभेची मंजुरी विषय क्र. १०२/६ दि. ४.१०.९७ अन्वये मिळाली नंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी निविदा सुचना करुन मनपा/लेखा/निविदा/८०/९८ दि. ३.११.९८ अन्वये रक्कम रु. १,११,७८,१६५/- (निविदा इमारतचे बांधकाम कंम्पॉड वॉल चे बांधकाम व त्या परिसरातील लेव्हीलींग व साफ सफाई इत्यादी कामांचा समाविष्ट आहे.) मागविण्यांत आले असता निविदा विक्रीच्या अंतीम दि. १७.११.९८ पर्यंत एकुण १९ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांच्या अंतिम दिनांक १.१२.९८ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारानी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | मेसर्स एलोरा कंन्स्ट्रक्शन | अं. प. | १३.५% | जास्त |
| २) | न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन | --//-- | १४% | जास्त |
| ३) | अब्दुल सलाम कंन्स्ट्रक्शन | --//-- | २२.१% | जास्त |
| ४) | अमोर कंन्स्ट्रक्शन | --//-- | २२.०५% | जास्त |
| ५) | सैफर कंन्स्ट्रक्शन | --//-- | २३.७८६% | जास्त |

वरील प्रमाणे प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.५% जास्त दराची निविदा मेसर्स एलोरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करीता त्यांचेकडुन दरपत्रकरण मागविण्यांत आल्या असता एजन्सीने दिलेले दर असमाधानकारक वाटते. परंतु सदर प्रोजेक्ट मोठ्या असल्यास व त्या कामाची कालावधी (१८) महिने असल्यास घेऊन भाववाढच फरक सहीत हया अटीने अंदाजपत्रकीय दराने मा. आयुक्तांनी मान्यता प्रदान केली आहे. करीता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** सदर प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**मा. सभापती :** अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने निविदा आहेत. मंजुर करण्यास हरकत नसावी.

**कार्य. अभियंता (स्लम) :** दोन्ही कामे वेगवेगळी असुन यात तफावत आहेत.

**मा. सभापती :** मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र, मजलुहिल, औरंगाबाद येथे बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन भाववाढ फरकासहित या अटीने अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६२/३ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, साईनगर (म्हाडा कॉलनी) येथील एन-६ येथील खुल्या जागेत नियोजीत व्यापारी संकुल बांधण्यात येणार आहे. उपअभियंता (ई) यांनी या ठिकाणी ३X४.४ मी. या आकाराची २२ दुकाने निघु (बसु) शकतात व त्याचे भाडे खालीलप्रमाणे निश्चित केले आहे.

अनामत रक्कम रु. ४,०००/- प्रति चौ. मी. प्रमाणे दुकानाचे भाडे ६०/- रुपये प्रती चौ.मी. प्रतिमहा प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.
तसेच ४०००/- प्रति चौ. मी. ही अनामत रक्कमेची किमाल बोली ठेवुन जास्त बोली लावणाऱ्या दुकान धारकांना देण्यांबाबत प्रस्ताव स्थायी समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईनगर (म्हाडा कॉलनी ) येथील एन-६ येथील खुल्या जागेत नियोजीत व्यापारी संकुलातील दुकानाकरीता अनामत रक्कम रु. ४,०००/ प्रति चौ. मी. व दुकानाचे भाडे रु. ६०/- प्रति चौ.मी. प्रतिमहा प्रमाणे निश्चित केल्यानुसार रु. ४०००/- प्रति चौ. मी. ही अनामत रकमेची किमान बोली ठेवुन जास्त बोली बोलणाऱ्या दुकानाधारकांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६३/४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मयुरबन कॉलनी येथे यांचे घराजवळ १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे दरसुची दराने रक्कम रुपये १३,३०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,३३,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विकास जैन :** चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे ऐवजी आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची पाईप फक्त ड्रेनेज साठीच टाकण्यात येतात यापेक्षा जास्त व्यासाची पाईप लाईन करावयाची ठरल्यास आर.सी.सी. पाईपची करण्यात येते.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे मयुरबन कॉलनी येथील १५० मीमी व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,३३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६४/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि. ) यांनी प्रस्ताव सादर केला की, बी.एम.सी. बँकेच्या पाठीमागील नाल्यास मो. बारुदनगरनाला येथील पुलापर्यंत संरक्षित भिंत बांधणेच्या

कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम खात्याचे दरसुची दराने रक्कम रु. ३,२३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ३,२३,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बी.एम.सी. बँकेच्या पाठीमागील नाल्यास मो. बारुदनगरनाला येथील पुलापर्यंत संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६५/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान सर्पालयाच्या घरावर पी.व्ही.सी. शेड टाकावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये २,२२,४२८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ३१.१२.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त कामाचा खर्च हा प्राणी संग्रहालय विकसीत करणे या लेखाशिर्षा अंतर्गत सन ९८-९९ आर्थिक तरतुदीतुन करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र. रु. २,२२,४२८/ चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील सर्पालयाच्या घराजवळ पी.व्ही.सी. शेड टाकावयाचे कामाकरिता अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६६/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता सुधारित प्रस्ताव सादर करीत आहे की, नेहरु बालोद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहाल्यात म्युरल्सचे काम करणेसाठी दि. ९.१२.९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३४९/८ अन्वये मे. मडीलगेकर्स आर्ट यांचेकडुन काम करुन घेणेसाठी मंजुरी मिळालेली आहे.

तसेच दि. २.१२.९८ व ३.१२.९८ रोजी मा. बाबासाहेब पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहाल्यास भेट दिली त्यावेळी मा. प्रदीपकुमार जैस्वाल (माजी खासदार), डॉ. शातीलाल पुरवार, श्री. श्रीप्रसाद पुरवार, मा. आयुक्त व सदरचे काम करणारे ठेकेदार मे. गडीलोकर्स आर्ट स्टुडिओ हे उपस्थित होते. त्याचे मा. बाबासाहेब पुरंदरे यांनी सुचविले की, दोन मोठे म्युरल्स तयार करणेऐवजी एकच मोठे राज्यभिषेकचे म्युरलस तयार केल्यास चांगले प्रसंग दिसतील. त्यासाठी त्यास सर्वानी मान्यता दिली. परंतु हा प्रसंग तयार करण्यासाठी अंदाजपत्रकात वाढ होत असुन त्यानुसार खालील प्रमाणे म्युरल्स तयार करण्याचे ठरले.

| | |
|---|---|
| नविन म्युरल्ससाठी लागणारे आकारमान - | २/२०-३"X१०'-३-१४५.१२ चौ. फुट |
| | ५२'-३"X३'-१५६.७५ --//-- |
| | ११'-९X५'-५८.७५ --//-- |
| | **एकुण : ६३०.६२ चौ. फुट** |
| जुने मंजुरा म्युरल्सचे आकारमान | २०'X१०'-२ नग (-) ४००.०० चौ. फुट |
| | वाढीव काम २३०.६२ चौ. फुट |

वरील प्रमाणे नविन म्युरल्स तयार करण्याचे ठरले असुन वाढीव काम २३०.६२ चौ. फुट x१४००.०० रु. ३,२२,८६८/- इतका वाढीव खर्च नविन म्युरल्ससाठी लागत असुन त्याच बरोबर ६' उंचीचे भालदार व चोपदार फायबरमध्ये तयार करावे लागणार आहेत. त्यासाठी र. रु. ५०,०००/- इतका खर्च लागत आहे. अशा प्रकारे दोन्ही कामासाठी एकुण र. रु. ३,२२,८६८ + ५०,००० = ३,७२,८६८/- सुधारित अंदाजपत्रक होत आहे.

तरी नविन आकारमानाचे म्युरल्स तयार करण्यासाठी र.रु. ३,२२,८६८/- व ६ उंचीचे भालदार व चोपदार फायबरमध्ये तयार करणेकरिता रु. ५०,०००/- असे दोन्ही मिळुन एकुण र. रु. ३,७२,८५८/- चे वाढीव कामासाठी श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय उभारीणीच्या शिर्षासाठी सुधारित अर्थ संकल्पात वाढ करुन देण्याच्या अटीवर सदरचे काम मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडीओ यांचेकडुन घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात राज्यभिषेकाचे म्युरल्स तयार करण्याचे काममध्ये मा. बाबासाहेब पुरंदरे यांनी सुचविल्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. ३४९/८ दि. ९.१२.९७ अन्वये मंजुर झाल्याप्रमाणे मे. मडीलकर्स आर्ट स्टुडिओ यांचेकडुन नविन म्युरल्स तयार करण्याचे वाढीव काम २३०.६२ चौ. फुट चे काम करुन घेण्यास तसेच या कामाकरिता लागणाऱ्या वाढीव र. रु. ३,२२,८६८/- च्या खर्चास त्याच बरोबर सहा फुट उंचीचे भालदार चोपदार फायबर मध्ये तयार करण्याचे कामाकरीता लागणाऱ्या र. रु. ५०,०००/- च्या खर्चास अशा एकुण र.रु. ३,७२,८६८/- च्या खर्चास व सदरचे काम मे. मडीलमेकर्स आर्ट स्टुडिओ यांचेकडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्राहलय उभारणीच्या शिर्षाखाली सुधारित अर्थसंकल्पात वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६७/८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेकरीता फारोळा येथील जलशुध्दीकरण लागणारी तुरटी खरेदी करावयाची आहे. त्यासाठी निविदा सुचना ही दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन "डी" फॉर्मवर दरपत्रके मागविण्यात आली. सिलबंद दरपत्रके स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकुण चार (४) सिलबंद दरपत्रके प्राप्त झाली ती खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. फोनिल्स केमिकल्स | रु. २,१९९.९० प्र. मे. टन |
| २) | एस. बी. सर्व्हिसेस | रु. २,२५९.०० --//-- |
| ३) | एम.एस.एस.आयच.डी.सी. | रु. २,२९५.०० --//-- |
| ४) | राज केमिकल्स | रु. ४,५००.०० --//-- |

वरील प्रमाणेच्या प्राप्त दरामध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. फोनिक्स केमिकल्स यांचा असुन त्यांनी रु. २,१९९.००९० प्र. मे. टन असा दर दिलेला आहे. तरी मे फोनिक्स केमिकल्स यांनी दिलेला दर रु. २,१९९.९० प्र. मे. टन या दराने त्यांच्यातर्फे तुरटी आवश्यकतेनुसार खरेदी करण्यासाठी मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेकरीता फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्राकरीता लागणारी तुरटी खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदा पत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच प्रति मे. टन रु. २१९९.९० या

दराने त्यांच्यातर्फे तुरटी आवश्यकतेनुसार खरेदी करण्यासाठी मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**विषय क्र. ४६८/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्वामी विवेकानंद मजनुहिल येथील विस्तारित उद्यानाचे विद्युतीकरण करणेकरीता दि. ३०.७.९८ च्या सभेमध्ये रु. ३,६८,३४७/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४४/९८ दि. १८/८/९८ अन्वये प्रगट निविदा मागविण्यात आल्या असता एकुण पंधरा निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विश्वनाथ इलेक्ट्रीकल्स | १०.००% जास्त दर |
| २. | मे. लाईटवेल इलेक्ट्रीकल्स | ५.००% जास्त दर |
| ३. | मे. आदीत्य इलेक्ट्रीकल्स | ०.१०% जास्त दर |
| ४. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | १.००% जास्त दर |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.१०% कमी दराने दर्शविलेले मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स यांचे निविदापत्रके स्थायी समितीसमोर मंजुरीबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** प्रस्तावात दर्शविलेल्या विद्युतीकरण करणेच्या अनुषंगाने मे ९८ महिन्यात पत्र दिलले असुन विद्युत व्यवस्थेबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी विद्युत व्यवस्था करणे बाबतच्या सर्व संचिका मंजुरीस्तव पाठवुन तात्काळ कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** सदर प्रस्ताव मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वामी विवेकानंद मजनुहिल येथील विस्तारीत उद्यानाचे विस्तारीत झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमीदराची मे. आदीत्य इलेक्ट्रीकल्स याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**श्री. म. अ. रऊफ :** ज्यांना निलंबीत केलेले आहे त्या सर्वाचे निलंबन आदेश रद्द करावे.

**मा. सभापती :** संबंधित निलंबन झालेल्यांनी स्थायी समिती समोर अपील ठेवावे. सभागृहाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

या बरोबरच "जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा. सभापती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | स्थायी समिती |
| | महानगरपालिका औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३०.०१.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

**शनिवार दिनांक ३०.०१.९९ रोजी मा. सभापती श्री. जयवंत (बंडु) ओक यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त. बैठकीची सुरवात "वंदेमातरम्" या गिताने दुपारी ४.०० वाजता महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी सभागृह येथे संपन्न झाली. बैठकीस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स. सभासद सभेला उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. म. अ. रऊफ म. अ. माबुद | सदस्य |
| २) स. स. श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ३) स. स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ४) स. स. श्री गांगवे बन्सी तुळशिराम | --//-- |
| ५) स. स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| ६) स. स. श्री. विकास रतनलाल जैन | --//-- |
| ७) स. स. श्री. नरसिंग मुरलीधर ढगे | --//-- |
| ८) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर | --//-- |
| ९) स. स. श्री. विश्वारोद्दीन पि. खुदबोद्दीन | --//-- |
| १०) स. स. स. अ. एकबालोद्दीन स. मो. कुतीबुद्दीन | --//-- |

**संवाद :**

**श्री. बन्सी गांगवे :** माजी महापौर श्रीमती सुनंदा कोल्हे यांचे भाऊ श्री. स्व. नितीन पाटील यांचे दुखःद निधन झाले त्यांना ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहुन सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यांत येते.

याच वेळी सभागृहात स्व. श्री. नितीन पाटील यांना सभागृहात दुखःद निधनानिमित्त ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**श्री. म. अ. रऊफ :** मागील बैठकीत चर्चा होऊन एका गुत्तेदाराचे काम केल्याबद्दल देयक संबंधीत अभियंता यांच्याकडुन मिळण्याची कार्यवाही झालेली नाही. एम. बी. हरवलेली आहे. त्याबाबत कार्यकारी अभियंता यांना कार्यवाही करण्यास आदेश दिलेले होते. तशी कार्यवाही केली परंतु संबंधीत अभियंतावर तात्काळ कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उपअभियंता (ड्रे.) :** संबंधित उपअभियंता मा. कार्यकारी यांनी पत्र दिलेले आहे. त्यांनी उत्तरे दिले नाही.

**मा.सभापती :** या संबंधीची संचिका आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पुढे पाठविण्यात आली आहे. एम.बी. न मिळाल्यास संबंधितावर चौकशी करुन निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. म. अ. रऊफ :** कार्यकारी अभियंता यांनी संबंधितांना नोटीस देऊन कार्यवाही केलेली आहे. सदर ठेकेदाराने झोन क्र. ३ अंतर्गत ड्रेनेज लाईमध्ये काम केलेले

होते. त्या कामाबाबतचे हे बील अद्याप अदा केलेले नाही. गेल्या बैठकीत मी चर्चा केलेली होती. काहीही कार्यवाही केलेली नाही.

**श्री. स. अली. मिरा सलामी :** महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "लिपीक" संवर्गात कर्मचारी भरती बाबत वृत्तपत्रात छापुन येत आहे. माझे असे मत आहे. जे कर्मचारी दैनिक वेतनावर /ठराविक वेतनावर अस्थायी म्हणुन कार्यरत आहे त्याचा विचारा करण्यात यावा. अग्निशामक दल विभागामध्ये कर्मचारी भरती बाबत संचिकेत कार्यवाही चालु आहे. महानगरपालिकेमध्ये ज्या ज्या पदाच्या मुलाखती घेऊन भरती होत आहे. ते सर्व शासनाच्या नियमाप्रमाणे आहे काय किंवा मनमानी चालु आहे. फायरमन भरती करतांना सेवायोजन कार्यलय, आदिवासी विकास अधिकारी, समाजकल्याण अधिकारी यांच्याकडुन संबंधित पदाची शैक्षणिक पात्रतेनुसार जे की, त्या उमेदवारांनी सदर पदाची प्रशिक्षण कोर्स पुर्ण केलेला असुन प्रमाणपत्र मिळवलेले आहे. अशांची संपुर्ण माहिती या वरील कार्यालयातुन नावांसहित मागवावी व त्यातुन सदर पदावर कर्मचारी वर्ग भरावा. सदर फायरमन कर्मचारी पदाच्या किमी जागा रिक्त आहे. किती जागावर कर्मचारी भरणार आहे. कर्मचारी भरती करणे जरुरीचे आहे काय ? खुलासा करावा.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

**मा. उपआयुक्त (प्र.) :** अग्निशामन विभागामध्ये दोन वर्षापूर्वी संचालक अग्निशमन मुख्य कार्यालय नागपूर येथून पात्र उमेदवाराची ३०० लोकांची यादी मागविली या बाबतीत अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही. सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे सेवायोजन कार्यालय, समाजकल्याण इ. कडुन नांवे मागविण्यात येतील चिकलठाणा येथे नविन अग्निशमन कार्यालय होणार आहे. नियमाप्रमाणेच कार्यवाही होईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** नागपुर येथील संबंधित कार्यालयामार्फत दरवर्षी तशा पात्र उमेदवाराची यादी पाठवण्यात येते १९९५ पर्यंतची लिस्ट आहे. त्यानंतरची नाही. ९८ मध्ये प्रशिक्षण प्रमाणपत्र धारण कारणाऱ्या उमेदवारांचा या पदासाठी विचार करण्यात यावा. सेवायोजन कार्यालय, समाजकल्याण कार्यालय, आदिवासी कार्यालय, इ. कार्यालयातुन ज्या उमेदवारांनी राज्य शासन प्रमाणित अग्निशमन प्रशिक्षण घेतलेले असुन पदवी मिळालेली आहे. ज्यांनी प्रशिक्षण घेतले नाही. त्यांचाच विचार करावा जाहीरात देवून भरती करावी आतल्या आत भरती करु नये. तिन्ही ठिकाणाहुन यादी मागवावी व वृत्तपत्रात जाहीरात द्यावी.

**मा. सभापती :** चिकलठाणा येथिल नविन अग्निशमन केंद्रासाठी अग्निशमन विभागामध्ये कर्मचारी वर्ग भरती करणे आवश्यक आहे. जे उमेदवार मुंबई, नागपुर येथील फायरमन प्रशिक्षण कोर्स प्रमाणपत्र मिळवलेले आहे. अशाच उमेदवारांचा विचार करण्यात यावा. ज्या उमेदवारांनी प्रशिक्षण घेतलेले नाही. अशांचा विचार करु नये.

**श्री. स. अली मिरा सलामी :** ज्या कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण कोर्स पूर्ण केलेला आहे व त्यातल्या शहरातील नागरीकांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. तशा प्रकारची प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** संबंधित शासन मान्य असलेल्या संस्थेतुन प्रशिक्षण उमेदवाराचा सदर फायरमन या पदासाठी प्रशासनाने विचार करुन नोकर भरती करावी.

शहरातील लोकांना प्राधान्य देण्यात यावे. कार्यकारी अभियंता यांनी स. सदस्य श्री. म. अ. रऊफ यांच्या प्रश्नाबाबत खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** संबंधित अभियंता हे माझ्या विभागामधुन बदलीवर गेलेले आहेत. ज्या ठेकेदारांनी काम केलेले आहे. त्यांच्या बिला बाबत संबंधित अभियंता यांना नोटीस देऊन सदर कामाचे बिल देण्यात यावे असे कळविण्यात आले. परंतु सदर नोटीसचे काहीही उत्तर अद्यापपर्यंत मिळालेले नाही. मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार पत्र पाठवण्यात आले होते. संबंधीत कनिष्ठ अभियंता हे पत्र घेण्यास तयार असुन याबाबात संचिका तयार करुन उपआयुक्त (प्र.) यांचेकडे पाठवण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता (पा.पू.) यांनी संबंधित अभियंता यांना नोटीस देऊन कार्यवाही केलेली आहेत. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधित अभियंता यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही काहीही खुलासा दिलेला नाही. प्रशासनाने याबाबत आवश्यकती कार्यवाही करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** दिनांक २६.०१.९९ रोजी उद्घाटन होणार होते. याबाबत दवाखान्यातील लाईट, ड्रेनेज व इतर सुविधांची पुर्तता संबंधित अधिकारी यांनी २६ जानेवारी पर्यंत पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन दिलेले होते. काहीही कार्यवाही केलेली नाही.

**श्री. लांडगे गौतम :** स. सदस्यांनी मागील बैठकीत केलेल्या वेगवेगळया प्रश्नाबाबत संबंधित अधिकारी यांनी २६ जानेवारी ९९ पर्यंत सर्व कामाबाबत पूर्तता करण्यात येईल असे आश्वासन दिलेले होते. कार्यवाही करण्यात आलेली नाही. खुलासा करावा.

**शहर अभियंता :** स. सदस्य श्री. विश्वारोद्दीन यांच्या वार्डातील दवाखान्यात काही रंग व काचा बसविण्याच्या राहिलेल्या असुन आताच बसविल्या तर फुटण्याची शक्यता आहे. २ दिसांपूर्वीच कांचे लावण्यात येतात.

**मा. सभापती :** मागील बैठकीत या विषयावर चर्चा झालेली होती. कार्यवाही होईल अशी आश्वासने दिलेली असतांना काहीही कार्यवाही केलेली नाही.

**श्री. विश्वारोद्दीन :** शासकीय अनुदानातुन करण्यात येणारी सर्व कामे ताबडतोब होणे जरुरीचे आहे. सदर दवाखान्यात ड्रेनेजची पुर्ण व्यवस्था नाही. विद्युत व्यवस्थेबाबत काहीही कार्यवाही केली नाही. फरशीची बसाई करण्याचे काम झालेले नाही.

**उपअभियंता (वि.) :** सिल्कमिल कॉलनीतील दवाखान्यात एकुण ८७ टयुब लाईट लावण्यात आलेल्या होत्या तेथील काही टयुब काढुन घेण्यात आलेले आहेत.

**श्री. विश्वारोद्दीन :** दवाखान्यात चोरी करणारेना जाण्यासाठी जागा नाहीत. एवढया मोठया वर्दळ असलेल्या वस्तीत चोरी होणे शक्य नाही. अधिकारी दिशाभूल करीत आहेत.

**मा. सभापती :** त्या ठिकाणी चोरी झालेली नसेल संबंधित अधिकारी यांचा गैर समज झालेला असुन दवाखान्यातील विद्युत व्यवस्थेबाबत कधी कार्यवाही होणार याचा खुलासा करावा.

**उपअभियंता (वि.) :** दवाखान्यातील विद्युत व्यवस्थेबाबत येत्या आठवडयामध्ये संपूर्ण काम करण्या बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** सिल्कमिल या भागातील संबंधित अधिकारी कधीही भेट देत नाही. कोण अधिकारी येऊन जातात माहिती होत नाही. यावेळी स. सदस्यांना

विश्वासात न घेता पाहणी करुन जाता कार्यवाही होत नाही. डेक्कन फ्लोअर मिल ते तरुण भारतपर्यंत दिवे बंद ओह कनिष्ठ अभियंता ऐकत नाही.

**मा. सभापती :** संबंधित ठिकाणी जे कनिष्ठ अभियंता काम पाहतात त्यांच्याकडुन योग्य प्रकारे कार्यवाही होत असेल तर प्रशासनाने तशी ताकीद द्यावी.

**श्री. विकास जैन :** विद्युत विभागाअंतर्गत कर्मचारी संख्या कमी असेल तर आणखी कर्मचारी काम करण्यासाठी लागतात काय याचाही विचार करण्यात यावा.

**श्री. विश्वारोद्दीन :** दवाखान्यांच्या संदर्भात तेथील श्री. देशमुख कनिष्ठ अभियंता यांना विचारणा केली असता मला काहीही माहिती देत नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** महापालिकेच्या प्रशासनातील कामकाज सुरळीतपणे चालवण्यासाठी प्रत्येक झोनसाठी एक कनिष्ठ अभियंता असणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करण्यात यावी. आरोग्य विभागात जसे ठराविक वेतनावर डॉ. सेविका घेण्यात आलेल्या आहेत. त्याचा धरतीवर ४-५ कनिष्ठ अभियंता ठराविक वेतनावर घेण्यात यावे.

**मा. सभापती :** प्रशासनास विनंती की, ज्या विभागामध्ये अत्यावश्यक कर्मचारी घेणे जरुरीचे आहे तशा प्रकारे पदे भरण्याची कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** महानगरपालिकेच्या बऱ्याचशा विभागामध्ये कनिष्ठ अभियंता, सुपरवाईजर इतर महत्तवाची पदे रिक्त आहेत स. सदस्यांचा ४ वर्षाचा कालावधी निघुन गेलेला असुन कोणत्याही प्रकारची विकास कामे करण्यासाठी कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार त्या त्या विभागामध्ये दिले गेलेले नाही.

**श्री. गौतम लांडगे :** गेल्या २ वर्षापासुन आकृतीबंद मंजूरीसाठी सभागृहात ठेवण्यात येते. त्यावर चर्चा होऊन कोणताही निर्णय होत नाही. कर्मचारी आकृतीबंध संदर्भात मा. सचिव नगरविकास विभाग यांची भेट घेतलेली असुन सदर प्रस्तावास मंजुरी करुन पाठवण्यात यावा असे सांगितलेले असतांना प्रस्ताव मंजुर करुन शासनास का पाठवण्यात येत नाही. शहरात महानगरपालिकेच्या वतीने उद्याने, संशोधन केंद्रे तसेच मुलांचे वस्तीगृह अशा महत्तवाच्या ठिकाणी लागणाऱ्या कर्मचारी देण्यात आलेला असेत तर त्यामुळे ज्या ज्या पदावर कर्मचारी वर्ग आवश्यक आहे त्या त्या पदावर कर्मचारी वर्ग (पदे) भरण्यात यावी. त्यामुळे प्रशासनास वेळोवेळी विकास कामे करण्यास अडचण येणार नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** आकृतीबंध खऱ्या प्रकारे सभागृहात येत नाही प्रशासनाने कमेटी नेमुन आपल्या परिने आकृतीबंध केला व नंतर सभागृहाने १५ नगरसेवकांची कमेटी नेमण्यात आली काहीही कार्यवाही झालेली नाही. प्रशासनाच्या माध्यमातुन अंतर्गत नोकर भरती होत आहे. तसेच सदीया टॉकीजच्या पाठीमागे शॉपींग सेंटरच्या समोर अग्रवाल याची इमारत झालेली आहे. सदर दुकाने घेण्यासाठी काही नागरीकांनी अगाऊ रक्कम दिलेली होती ते परत घेत आहे. सदर जागेवर महापालिकेतर्फे वाणिज्य व्यापारासाठी उपयोगात येऊ शकेल. दुकाने सुरु करता येत नाही. किती लोकांनी अनामत रक्कम परत घेतली आहे.

**सहा. संचालक नगररचना :** उच्च न्यायालयात प्रकरण आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी जे न्यायालयात गेलेले आहेत. त्यांना वाटाघाटीसाठी बोलावून निर्णय घेण्यात यावा तशी कार्यवाही करावी. तसेच अग्रवाल नावाच्या व्यक्तीला परवानगी कशाचे अधारे देण्यात आली याची चौकशी करुन कार्यवाही करावी.

**श्री. स. अ. मिरा सलामी :** श्री. भुषण अग्रवाल यांनी जागेचा वापरात बदल करण्यात आल्या बद्दल न्यायाल्यात प्रकरण दाखल केले आहे. आता दुकाने केंद्रात कसे जाणार समोर पार्कीग आहे. बाजुने रस्ता करुन घ्यावा. या बाबीं तपासुन निर्णय घ्यावा. तसेच बाजूला परवानगी दिली त्यांचे नांव ही अग्रवाल आहे. ते कसे बांधकाम करणारे बांधकाम परवानगी कशी दिली.

**मा. सभापती :** मा. उच्च न्यायालयात वाद चालु आहे. संबंधित व्यक्तींना चर्चेला बोलावण्यात यावे श्री. भुषण अग्रवाल दावेदार यांना चर्चेला मा. आयूक्तांकडे बोलावण्यात यावे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सदर जागेवर काही नागरीकांनी ६८/२ असा नंबर टाकलेला असुन बोर्ड लावण्यात आलेला आहे. त्याबाबत खुलासा करावा.

**मा. सभापती :** अधिकारी यांनी ६८/२ संदर्भात संबंधित मिळकत धारकांना विचारणा करण्यांत येऊन तपासणी करुन निर्णय घेण्यात यावा.

**श्री. नरसिंग ढगे :** महानगरपालिकेने १९.१.९८ रोजी विद्युत पर्यवेक्षकाची पदे भरण्यात आले तथापी प्रत्येक झोनला एक विद्युत पर्यवेक्षक देण्यात यावा. असे एकुण ८ झ ाोन असुन सदर एक पद भरण्याबाबत प्रशासनाने परिपत्रक काढलेले असुन एक पद न भरता ८ पदे भरण्यात यावी.

**मा. सभापती :** महापालिकेमध्ये अस्थापनेवर संबंधित विभागामध्ये जे सध्या कार्यरत आहेत ते पात्र असतील तर त्यांना सुपरवाईजर या पदावर काम करण्याची संधी द्यावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** कब्रस्तान संदर्भात संचिका तीन वर्षापासुन चालु असुन काहीही कार्यवाही केलेली नाही. चित्तेखाना कब्रस्तान हे आदर्श कब्रस्तान करावयाचे काम का होत नाही.

**शहर अभियंता :** वक्फ बोर्डच्या अधिकारी यांना या संदर्भात पत्र देऊन कळविण्यात आलेले आहे. संबंधित कार्यालयाची एन.ओ.सी. मिळालेली नाही.

**मा. सभापती :** वक्फ बोर्डच्या अधिकारी यांना दिलेल्या पत्राची एक प्रत स. सदस्य श्री. एकबालोद्दीन यांना देण्यात यावी त्यानुसार ते पाठपुरावा करतील पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री. विकास जैन :** शहरातील बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशन व क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या दोन मुख्य रस्त्याचे डांबरीकरणाचे काम चालु असुन रस्त्यांच्या बाजुला असलेल्या फुटपाथ लगत असलेल्या रस्त्यात विद्युत व टेलीफोन पोल तसेच होल्डींगचे बोर्ड मागे घेऊन डांबरीकरणाचे काम करण्यात यावे. जेणे करुन रस्ता रुंदीकरण तसेच डांबरीकरण जास्त होईल.

**मा. सभापती :** सदर रस्त्यात येणारे होल्डींग / बोर्ड तसेच विद्युत व टेलीफोन पोल रस्त्याच्या बाजुला घेता येईल व त्यानुसार संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी तसेच सुधारित अंदाजपत्रका व्ही.आय.पी. रोडवर फुटपाथ करण्याची तरतुद करावी.

**श्री. स.अ. एकबालोद्दीन :** माझ्या वार्डातील काही रस्त्यावर डांबरीकरण करतांना विद्युत पोल मध्ये येतात. त्याबाबतही कार्यवाही करावी.

**अति. शहर अभियंता :** रस्त्यामध्ये अडथळे निर्माण करणाऱ्या सर्व पोल रस्त्याच्या बाजुला घेण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत एम.एस.ई.बी. ला कळविण्यात आलेले आहे.

**मा. सभापती :** विद्युत व टेलिफोन पोल ताबडतोब स्थलांतर करण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** मागील बैठकीत चर्चा होऊन फुट ओव्हर ब्रीजचे काम सुरु करण्या संदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे सांगितले होते. १ तारखेला, ११ तारखेला, १९ तारखेला पालककंत्री व इतर मान्यवरा समवेत बैठक घेऊन निर्णय घेऊ असे ठरवले असतांना गेल्या ११ तारखेला कुठलीही बैठक झालेली नाही व कोणताही निर्णय घेवून सदर काम सुरु करण्याबाबत घेतलेला नाही. खुलासा करावा.

**मा. सभापती :** फुट ओव्हर ब्रीजचे काम सुरु करण्यासंदर्भात नागरीक व इतर कुणाकडुन वाद निर्माण होत असेल तर सदर काम हे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** सदर कामावर आतापर्यंत जवळजवळ ५ लाख रुपये झालेले असुन प्रशासनाने काम बंद करण्याचा निर्णय घेतलेला असुन कुणाच्या दबावाखाली निर्णय घेतलेला आहे काय ? यात प्रशासनाने काम बंद केले याचा अर्थ प्रशासनाची फार मोठी चुक आहे. सदर काम बंद करण्याचे आदेश कुणी दिले याचा खुलासा करावा. पुर्ववत काम सुरु करण्या बाबतचा निर्णय घ्यावा. असे माझे मत आहे. प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांना पत्र देऊन काम बंद करण्यात आलेले आहे.

**अति. शहर अभियंता :** या संदर्भात नागरीकांचे निवेदन आले. त्यानंतर चर्चा होऊन काम बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

**श्री. विश्वारोद्दीन :** महापालिका प्रशासनाने रेल्वे खात्याच्या अधिकाऱ्यांना दि. १.९.९७ रोजी पत्र देऊन कळविलेले आहे. त्यानुसार हैद्राबाद येथील रेल्वे अधिकारी यांनी ३०.९.९७ ला कळविले आहे की, तांत्रिकदृष्टया जागेवर दिलेल्या मार्क आऊट प्रमाणे काम करावे. (स. सदस्य पत्र वाचून दाखवतात) दि. ६.१०.९७ ला फुट ओव्हर ब्रिज चे मार्क आऊट पूर्ण झाले. रेल्वे खात्याला रु. ४९,८६,४५२/- इतकी रक्कम दिली तसेच दिनांक ७.१०.९७ ला पून्हा जागेवरील परिस्थिती तपासण्यात आली ते तांत्रिक दृष्टया योग्य असल्याचे ठरविण्यात आले. रेल्वे, महापालिका अधिकारी यांनी संयुक्त जागा पाहणी केली जागा स्थलांतर केली तर गोडावून पार्सल ऑफिस तोडावे लागेल दि. ३०.८.९८ ला श्री. अतुलकुमार जैन श्री. मलीक अर्जुन विभागीय व्यवस्थापक यांनी अंतिम स्वरुप दिले असुन सर्वानी मान्य केल्यानंतर नकाशाला मंजुरी देण्यात आलेली आहे. काम सुरु करुन ५ लक्ष रुपयाचे काम झालेले आहे. शासकीय कामात अडथळा आणण्यात येत आहे. आम्ही एकादे पत्र दिलेवर ऐकत नाही. फुट ओव्हर ब्रीजचे काम बंद करण्यासंदर्भात न्यायालयाचे कोणते आदेश नसतांना स्थगित ठेवण्यात आले. एका सर्वसाधारण व्यक्तींने पत्र दिल्यानंतर काम बंद करण्यात यावे ही निंदणीय बाब असुन काम चालु करण्या बाबत महापौर यांनी पत्र दिलेले होते का काम सुरु करण्यात आले नाही याबाबत लवकरच निर्णय घेण्यात यावा.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** स. सदस्य श्री. विश्वारोद्दीन यांनी ज्या भावना सभागृहात व्यक्त करीत आहे. त्या संदर्भात सभागृहाने निर्णय घेऊन सदर फुट ओव्हर ब्रीजचे

काम होणे जरुरीचे आहे. त्या कामावर महापालिकेचा पैसा खर्च झालेला आहे. याचाही विचारा व्हावा.

**मा. सभापती :** सदर प्रभागातील बऱ्याच नागरीकांच्या तक्रारनुसार काम बंद करण्यात आलेले आहे. यात कुणाचाही हस्तक्षेप नव्हता.

**श्री. स. अली मिरा सलामी :** १९७८ ला बॉडी होती ३ नोव्हेंबर १९७८ ला नगरपरिषदेने एक पत्र दिलेले आहेत. त्यात हमालवाडी सिल्कमिल कॉलनी व सादतनगर इ. भागातील लोकांनी येण्या जाण्यासाठी रस्ता करण्यात यावा उद्या पालकमंत्री येत आहेत उद्या निर्णय घेवू.

**मा. सभापती :** महापालिकेचा या ठिकाणी पैसा खर्च झालेला असुन त्यासी मीही सहमत आहे. तेथील प्रभागातील काही लोकांनी निवेदन देऊन काम बंद करण्याबाबत कार्यवाही केलेली आहे. त्यानुसार प्रशासनाने काम बंद केलेले आहे. या फुट ओव्हर ब्रीजचे काम होणाऱ्या जागेचा अंतर्गत येणाऱ्या सगळया प्रभागातील लोकांना जाण्या येण्यासाठी सोयीस्कर रस्ता होईल या दृष्टीकोनातुन विचार करुन मा. महापौर, मा. पालकमंत्री, मा. माजी खासदार श्री. प्रदीप जैस्वाल प्रशासन व तेथील प्रतिष्ठीत नागरीक यांच्या समवेत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** प्रशासनाने कुणाच्या तरी दबावाखाली संबंधित काम सुरु असलेले बंद केलेले आहे. असा माझा आरोप आहे.

**मा. सभापती :** असे आरोप करणे चुकीचे असुन सदर प्रश्न हा स्थानिक पातळीवरील असुन उद्या मा. पालकमंत्री यांना जनता याबाबत प्रश्न विचारतील त्यांच्या समवेत बैठक घेऊन याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**विषय क्र. ४६९/१ :**

दिनांक ८.१.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक ८.१.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ४७०/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथे मोठी ट्रेने बसविण्यासाठी दि. २०.११.९८ ला वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात अल्या सहा निविदा सहा विक्री झाल्या व स्विकारणेच्या तारखेपर्यंत एकुण ५ निविदा फॉर्म भरुन प्राप्त झाल्या. दि. ७.१२.९८ ला गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा दिलेला दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. एस.एस.एस.आय.डी.सी. | ६,६०,०००/- | (३४% कमी दराने) |
| २. | मे. जी.बी. जैन सन्स नांदेड | ८,२४,०००/- | (१७.६०% कमी दराने) |
| ३. | मे. रिगल स्पोर्ट हैद्राबाद | ८,३५,०००/- | (१६.५०% कमी दराने) |
| ४. | मे. युनिफ चेमुलमेन्टस, पुणे | ८,९९,१००/- | (१०.०१% कमी दराने) |
| ५. | मे. सोहेल सिंधु | ९,४९,५००/- | (५.०५% कमी दराने) |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४% कमी दराची निविदा मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांची आहे. अ.क्र. १ आणि अ. क्र. २ ते ५ यामध्ये बरीच तफावत दिसुन आल्याने संबंधित पुरवठाधारकांशी चर्चा केली असता त्यांचे पत्र दिनांक

३१.१२.९८ नुसार गुत्तेदाराने जे दर नमुद केले ते लिंबाचे लाकडाचे स्लिपर्स गृहीत धरुन दर दिलेले आहेत. परंतु प्रत्यक्षात शेडयुल बी मध्ये सागवान लाकडाचे स्लीपर नमुद केले आहेत. निविदा भरतांना नजर चुकीने कमी दर भरला गेला आहे असे पुरवठाधारकांचे म्हणणे आहे.

यांनतर मा. आयुक्त साहेब यांचे दालनात गुत्तेदारा समक्ष चर्चा झाली असतांना ३४% कमी दराने काम करणेस गुत्तेदाराला पुन्हा सुचना करण्यात आलेली आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे मोठी ट्रेन बसविण्याकरीता मागविण्यात आलेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांची र.रु. ६,६०,०००/- (३४% कमी) दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७१/३:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कबाडीपुरा येथील हजरत शहा जमाल बाबा दर्गा या समोर मनपा व्यापार संकुल बांधण्याचे कामासाठी रक्कम रुपये ५५,००,०००/- चे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा. आयुक्त महोदय यांचे आदेशान्वये धोरणात्मक निर्णय घेणेस्तव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आले असता मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र . १५ दि. २०.७.९६ अन्वये मान्यता दिलेली आहे. तद्नंतर सविस्तर अं. प. र. रु. ५५,००,०००/- चे तयार करण्यात आले सविस्तर अंदाजपत्रकास व निविदा काढण्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २८.८.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र. /मनपा/लेखा/नि ५७/ दि. २२.९.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १३ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक १३.११.९८ रोजी उपस्थित गुत्तेदार समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. हायवे कंन्स्ट्रक्शन | ४.९९% | जास्त दराने |
| २) | ए. एम. फारुकी | ९% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झाली. करीता संबंधित गुत्तेदारास मा. आयुक्त महोदय यांचे आदेशान्वये दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने मान्यतेस्तव स्थायी समिती समोर करणेस्तव मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक ३०.१२.९८ अन्वये शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांची ४.९९% जास्ती दराऐवजी अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. म. अ. रऊफ :** सदर प्रस्तावा संदर्भात माहिती देण्यात यावी तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**मा. सभापती :** सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४७२/४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. व्यंकटेशनगर रेल्वेस्टेशन रोड येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रकीय र. रु. १,२१,०००/- ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता एकुण बावीस (२२) कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण नऊ (९) निविदा दर भरुन सिलबंद प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आकाश कंन्स्ट्रक्शन | ३५.०७ % | अं. प. दरापेक्षा कमी |
| २. | श्री. शिवदास पांचाळ | ३४.०० % | --//-- |
| ३. | श्री. अब्दुल सईद | ३३.१२ % | --//-- |
| ४. | श्री. मो. साहेल सिद्दीकी | २८.०७ % | --//-- |
| ५. | श्री. मे. सिंधु कंन्स्ट्रक्शन | २८.०० % | --//-- |
| ६. | श्री. एस.एम. शेख | २७.८६ % | --//-- |
| ७. | मे. आंनद बिलर्स | २५.३० % | --//-- |
| ८. | श्री. कुलवंत सिंग | २२.१० % | --//-- |
| ९. | श्री. सचिन संचेती | ११.०० % | --//-- |

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. आकाश कंन्स्ट्रक्शन यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.०७ % कमी दराची आहे.

तरी मे. आकाश कंन्स्ट्रकशन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.०७% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** प्रस्ताव क्र. ४ व ५ मध्ये बिलोने अंदाजपत्रक आलेले आहे.

**श्री. गौतम लांडगे :** मागील बैठकीत स्थगित असलेले प्रस्तावास मंजुरी देण्यांत आलेली आहे. यासही मंजुरी देण्यात यावी.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व्यंकटेशनगर रेल्वेस्टेशन रोड येथे २५० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३५.०७ % कमी दराची मे. आकाश कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७३/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पू. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला शहानुरमिया दर्गा या मागे जांबीदा ले आऊट येथे २५० आणि ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन ९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय र. रु. ५,३७,२००/-ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता एकुण ३० (तीस) कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण दहा (१०) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. श्री. असलम पटेल | ३७.७८६ % | अं. प. दरापेक्षा कमी |
| २. श्री. जी. आर. घोडेले | ३६.३६ % | --//-- |
| ३. श्री. मन्नाखॉन | ३१.०६ % | --//-- |
| ४. री. कुलवंतसिंग | २५.८६ % | --//-- |
| ५. श्री. एस. ए. हक | २७.५० % | --//-- |
| ६. श्री. कावेरी कंन्स्ट्रक्शन | २५.३५ % | --//-- |
| ७. श्री. गायत्री कंन्स्ट्रक्शन | २५.२७ % | --//-- |
| ८. श्री. एन. जी. सिगलमकर | २१.११ % | --//-- |
| ९. श्री. एन. बी. पाटील | १८.५० % | --//-- |
| १०. श्री. एस. एस. असोशिष्टे | ९.१८ % | --//-- |

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. असलम पटेल यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.७८६ % कमी दराची आहे.

तरी श्री. असलम पटेल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.७८६% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शहानुरमियॉ दर्गाच्या मागे जबिंदा ले-आऊट येथे २५० व ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झ ाालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३७.७८६% कमी दराची श्री. असलम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७४/६ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गुलाबवाडी येथे कॅाक्रेटरस्ते तयार करणे बाबत कामाकरीता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुचीनुसार रु. ६,९४,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खांडकी रस्ते या शिर्षकातुन करण्यांत येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १४.८.९८ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच स्थायी समितीत दि. २८.८.९८ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता. अंतिम तारखेपर्यंत एकुण आठ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यां आले.

| | | |
|---|---|---|
| १. संजिवनी कंन्स्ट्रक्शन | ४.९९ % | जास्त दराने |
| २. न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन | ९.९९ % | जास्त दराने |

परंतु हे दर कार्यालयास जास्त वाटलयाने संजिवनी कंन्स्ट्रक्शन यांना मा. आयुक्त यांच्या दालनात दि. २.१.९९ रोजी वाटाघाटी करीता बोलावले असता त्यांनी हे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने करण्यास लेखी संमती दिली तरी संजिवनी कंन्स्ट्रक्शन यांची अंदापजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची असलेली निविदेची प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गुलाबवाडी येथे कॉक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदा धारकांशी झ ाालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम संजिवनी कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अ. प. दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७५/७ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातुन सध्या बीफ मटन, चिकन, मासोळी, पोर्कची दुकाने खालील तकत्याप्रमाणे प्रमाणे व त्यांना पूर्वी परवाने देण्यात आलेले आहेत. शहरात सध्या बरीच दुकाने आहेत. तसेच नवीन परवाना मिळणेस्तव जवळ जवळ १७८ लोकांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

तरी निविदा दुकानाची सर्व बाबींची पाहणी, पडताळणी करुनच व फारच जरुरी असल्यास नवीन परवाना देणे बाबत निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

**अस्तीत्वात असलेल्या दुकानांची माहिती**

| विभाग क्र. | परवाना संचिकाची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बीफ | मनपा | मटन खाजगी | मनपा | चिकन | मासोळी | पोर्क | एकुण |
| १) | ४५ | ११ | ०९ | ०८ | ०२ | - | ०१ | ७६ |
| २) | १० | ०६ | १५ | - | ०६ | २ | - | ३९ |
| ३) | ८८ | ०४ | २७ | - | ०४ | १ | ०८ | १३२ |
| ४) | ३० | - | २५ | - | - | - | - | ५५ |
| ५) | ११ | - | ०६ | - | - | - | - | १७ |
| ६) | ११ | - | ०७ | - | ०१ | २ | ०१ | २२ |
| ७) | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| एकुण १९६ | | २१ | ८९ | ०८ | १३ | ५ | १० | ३४२+११<br>३५२ |

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** प्रस्तावाबाबत माहिती द्यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** हा प्रस्ताव बिफ, मटन, चिकन, मासोळी, पोर्क इ. बाबतची माहिती विचारलेली होती. त्यानुसार माहितीचा तक्ता सादर केलेला आहे.

**मा. सभापती :** दोन वर्षापूर्वीची माहिती दिलेली आहे असे वाटते शहरात ज्या ज्या ठिकाणी नवीन परवाना द्यावयाचे असल्यास जाहिरात देऊन ज्यांनी पोलीस विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र आणलेले आहे. तसेच महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र आहेत. व इतर सर्व कागदपत्राची पुर्तता करणाऱ्यांचाच नविन परवाना देण्याबाबत या प्रस्तावस दुरुस्ती करुन पुढील बैठकीत परवाना देण्यासंदर्भात संबंधित अधिकारी यांनी सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा बाबत पुढील सभेत सविस्तर माहितीस्तव प्रस्ताव ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४७६/८ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला की, टप्प्यात जकात विभाग, लेखा विभाग, पाणी पुरवठा व मालमत्ता विभागीय संगणकीकरण करण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती. मुख्य लेखाधिकारी यांच्या दालनात दि. १४.७.९६ रोजी उघडण्यांत आल्यात

मा. आयुक्तांकडे वाटाघाटीसाठी दि. ५.१०.९८ रोजी सर्व एजन्सींना बोलविण्यात आले होते. वाटाघाटीमध्ये हार्डवेअरसाठी निगो कॉम्प्युटर्स व भक्ती एजन्सीज यांनी दर कमी केलेत. बोलावण्यात आलेल्या इतर हार्डवेअर एजन्सी अनुक्रमे, हिन्दुस्थान कॉम्प्युटर व ऑलम्पस कॉम्प्युटर वाटाघाटी साठी हजर झाल्या नाहीत व त्यांचे दर वरील दोन्ही एजन्सीपेक्षा जास्त आहेत.

हार्डवेअर साठी निविदे (वाटाघाटीअंती) नवीन दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | विवरण | गिगो कॉम्प्युटर्स चे दर | भक्ती एजन्सीजचे दर | ऑलम्पस कॉम्प्युटर्स | हिंदुस्थान कॉम्प्युटर्स |
|---|---|---|---|---|---|
| १. | पेन्टीयम कॉम्प्युटर (वाटाघाटीमध्ये दिलेल्या स्पेसिफ्रिकेशन प्रमाणे) | २५०००/- | २३६२५/- (प्रिलोडेड विन्डो ९५ लायसन्स सीडी सह ) | २७०००/- (टोटो) | २८५००/- |
| २. | प्रिन्टर ८० कॉलम (टि.व्ही.एस.) | ७०००/- | ५९००/- | ७५००/- | ७८००/- |
| ३. | प्रिन्टर (टी.व्ही.एस.ई.) १३२ कॉलम ३०० सी.पी.एस. २४ पीन | १७७५०/- | १५५००/- | १७७५०/- | १५०००/- (गोदरेज) |
| ४. | ब्रेन यु.पी.एस. | २९०००/- | २८८००/- | २७०००/- | १२००००/ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १के.व्ही. ऑन लाईन ३-४ आवर्स बॅक अप | | | (मेनेबल बॅटरी) | - |
| ५. | सुट | १) इन्टरनेट कनेक्शन मोफत<br>२) एक मोडेम मोफत<br>३) इंन्टरनेटसाठी लायसन्स सॉफ्टवेअर मोफत<br>४) माऊस पॅड व मशीसन्सना कव्हर्स मोफत देण्यात येतील. | १) प्रत्येक महिन्याला कॉम्प्युटर वा प्रिंटरच्या देखरेखीसाठी भेट<br>२) एक मॉनिटर व एक की बोर्ड स्टॅन्ड बाय म्हणुन संगणक कक्षात अतिरिक्त म्हणुन ठेवण्यात येईल.<br>३) तीन वषाची गॅरंटी सर्व हार्डवेअर साठी कोणत्याही अपघाती किंवा नैसर्गिक तसेच विद्युत पुरवठा किंवा जास्तीमुळे होणाऱ्या नुकसानीस मशीन दुरुस्त करुन देण्यांत येतील.<br>४) मनपा कर्मचाऱ्यांना ७ दिवसांचा विंडोज ९५ चे मोफत प्रशिक्षण<br>५) बोलावणे आल्यास तात्काळ कॉम्प्युटर दुरुस्तीसाठी हजर राहणार | | |
| ६. | देखभाल व दुरुस्ती व वॉरन्टी | ३ वर्षे | ३ वर्षे | | |
| ७. | संगणक कार्यान्वित करण्याचा कालावधी | १ ते २ आठवडे | १० वर्षे | २ ते ३ महिने | २ आठवडे |
| ८. | कर | जकात कर वेगळा | जकात कर वेगळा | जकात कर वेगळा | जकात कर वेगळा |

वरील दरावर मा. आयुक्तांच्या दालनांत वाटाघाटीत दोन्ही एजन्सीजनी खालील सूट देण्याचे कबूल केले.

तसेच मा. आयुक्तांनी साफ्टवेअरचे प्रात्यक्षिक बघुन योग्य त्या एजन्सींची शिफारस करण्यासाठी तज्ञ समितीची नियुक्ती केली होती. समितीने खालील एजन्सीचे प्रात्यक्षिक बघितले त्यांचे निविदेतील दर खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सॉफ्टवेअरचे निविदेमधील तपशील | डाटा पॉईट दर | भक्ती एजन्सी दर | गिगो कॅाम्प्युटर दर | मॉडयुल्र सिस्टीम दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | Installation of Window ९५ legal operating system | ५०००/- | ३५२५/- | ३५००/- | -- |
| २. | मध्यवर्ती जकात नाका येथे जकात विभागाचे संगणीकरण मराठीत करणे | ३००००/- | १७२३३/- | ३००००/- | ६००००/- |
| ३. | मध्यवर्ती जकात नाका/ मनपा कार्यालय संपर्क | ३००००/- | १७२३३/- | ४००००/- | ६००००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (मराठीत) संगणीकरण | | | | |
| ४. | मालमत्ता कर व पाणीपट्टी व्यवस्थापन संगणीकरण मराठीत करणे. | १५०००/- | १७२३३/- | २५०००/- | ६००००/- |
| ५. | लेखा विभागाचे मराठीत संगणकीकरण करणे, उत्पन्न, खर्चाची वर्गवारी पगारपत्रके वगैरे | ३००००/- | १७२३३/- | ५००००/- | ८००००/- |
| ६. | देखभाल व दुरुस्ती | - | - | - | ५००००/- |
| ७. | सॉफ्टवेअर विकसीत करण्यासाठी कालावधी | २ महिने | १ आठवडा | १ आठवडा | ४ १/२ महिने |
| ८. | कर | - | - | - | १.५% लिज टॅक्स |

सुट :- १) गिगो कॉम्प्युटर : १०० तासाचे इन्टरनेट कनेक्शन व मायक्रोटेकचे मॉडेल मोफत.

२) मॉडयुलर सिस्टीम : प्रत्येक कॉम्प्यूटरसाठी ३५०० रु. किंमतीचे श्रीलिपी वर्जन २.०० मोफत देण्याचे कबुल केले.

वाटाघाटीनंतर वरील हार्डवेअर एजन्सीपैकी भक्ती एजन्सीचे दर सर्वात कमी असल्यामुळे मा. आयुक्तांनी त्यांचे दर मंजुर केले आहेत. तसेच आयुक्तांनी सॉफ्टवेअर इज ब्रेन, सॉफ्टवेअरसाठी कमी /जास्त किमंतीचा विचार करता येणार नाही. बेस्ट व सुटेबल सॉफ्टवेअर घेणे गरजेचे असल्याने समितीच्या शिफारशीनुसार मॉड्युलर सिस्टीम चे सॉफ्टवेअर स्विकरण्यास मंजुरी दिली आहे. सॉफ्टवेअरसाठी २,३२,७००/- व हार्ड वेअरसाठी ४,०१,८२५/- असा एकुण ६,३४,५२५/- खर्च प्रस्तावित आहे. म्हणुन सदर प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. नरसिंग ढगे :** प्रस्तावातील संगणीकरणच्या देखभाल व दुरुस्ती वॉरन्टी इ. साठी अ. क्र. ६ संदर्भाने महापालिकेतील कुणी अनुभवी कर्मचारी असेल तर त्यांच्याकडे सदरचे काम सोपविण्यात यावे.

**श्री. गौतम लांडगे :** जे कर्मचारी कॉम्प्युटर प्रशिक्षण घेतलेले असतील त्यांच्याकडे हे काम सोपविण्यात यावे. सदर प्रस्तावातील दर्शविलेल्या एजन्सीज पुणे व इतर बाहेरील असुन तात्काळ दुरुस्तीसाठी लांबवरुन येणाऱ्या व्यक्तीला वेळ लागेल याचा विचार करता औरंगाबाद येथील अनुभवी प्रशिक्षण व शासन मान्य असलेल्या एजन्सीजला देखभाल व दुरुस्ती व इतर काम करण्याबाबत जबाबदारी घेत असेल त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

**प्रकल्प संचालक :** हार्डवेअरसाठी पुण्याच्या एजन्सीजकडून आवश्यक ती तात्काळ सेवा करून घेण्यात येईल. त्यानंतर काही कालांतराने स्थानिक एजन्सील ही

यांची संधी देण्यात येणार आहे. यात पुणे येथील एजन्सीज इंग्रजीचे मराठीतुन संगणीकरण करुन देण्यास तयार आहे.

**श्री. गौतम लांडगे, श्री विकास जैन :** इंग्रजीचे मराठीत संगणीकरण करुन देण्यासाठी शहरातील कुणाची एजन्सीज असेल त्यांना याबाबत संपूर्ण अनुभव असेल त्यांच्याकडुन प्रथमःत हार्डवर्कचे काम करुन घेण्यास प्राधान्य देण्याव यावे.

**मा. आयुक्त :** मागील वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये संगणकीकरण करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला असुन या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मागेच मंजुर केलेला आहे. महापालिका प्रशासनामध्ये नविन पध्दतीनुसार जकात विभागामध्ये, लेखा विभाग, पाणी पुरवठा विभाग, मालमत्ता विभागातील संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतलेला असुन हळुहळू सर्व विभागात संगणकीकरण करण्यात येईल. कॉम्प्युटराईज करण्यासाठी वृत्तपत्रात जाहिर निविदा देवुन त्यानुसार एकुण ५ एजन्सीज यांनी ऑफर दिलेल्या आहे. त्यापैकी भक्ती एजन्सीज, गिगो एजन्सीज डाटा पॉईन्ट, मार्डन सिस्टीम या चार एजन्सीजने ऑफरनुसार दर भरुन दिलेले आहे. त्यापैकी हार्डवेअरसाठी भक्ती एजन्सीजचे दर प्राप्त झालेले आहेत. हार्डवेअर म्हणजे जे बाहेरील जे आपणांस माहित आहे ते परंतु सॉफ्टवेअर म्हणजे त्यात फ्लॉपी बुध्दीमत्तेचे काम असते त्यानुसार प्रत्येक जण आपआपल्या पध्दतीने करत असतो. या संदर्भात आपण एन.आय.सी. चे जे अधिकारी आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमुन त्या समितीने अशी शिफारस केली आहे. की जे मॉडयूलर सिस्टीम कॉम्प्युटर आहेत ते सॉफ्टवेअरसाठी उत्तम असे आहे. गिगो सिस्टीम तसेच भक्ती एजन्सीज हे स्थानिक आहेत. हार्डवेअरसाठी शिफारस करण्यात येईल. परंतु समितीच्या शिफारशी नुसार मॉड्युलर सिस्टीम सॉफ्टवेअरसाठी उत्तम आहे. मेंदुचे काम आहे. त्यावर चर्चा करावी. व निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांनी खुलासा केल्याप्रमाणे या संदर्भात अंमलबजावणी ताबडतोब होणार काय ?

**प्रकल्प संचालक :** संबंधित एजन्सीज धारक महानगरपालिकेतील इच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांना वर्षभर प्रशिक्षण देणार असुन यात भविष्यात सदर प्रशिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांचा कर्मचारी म्हणुन विचार करण्यात येईल.

**मा. सभापती :** सदर प्रस्ताव मंजुर करण्यांत येत असुन संगणकीकरण या विभागामध्ये सदर पद नियमीत वेतनश्रेणीत असणे आवश्यक आहे. याबाबत आकृतीबंधामध्ये प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. तथापी संगणक साहित्य खरेदी संगणकी -करणाची निवड लक्षात घेता मा. आयुक्त यांच्या अधिकारात महानगरपालिकातील पात्र कर्मचाऱ्यांमधुन कॉम्प्युटर प्रोगामर पद आकृतीबंधामध्ये नमुद केलेल्या वेतन श्रेणीप्रमाणे तात्पुरते भरण्यात यावे. जर महानगरपालिकेतील कुणी कर्मचारी या पदास पात्र ठरत नसेल तर बाहेरील उमेदावाराचा विचार करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका टप्प्याटप्प्याने जकात विभाग, लेखा, पाणी पुरवठा विभाग मालमत्ता विभागातील कामांचे संगणीकरण करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी व तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या

वाटाघाटीनुसार हार्डवेअर एजन्सीपैकी भक्ती एजन्सीचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचेकडुन काम करुन घेण्यास आणि सॉफ्टवेअर हे मेंदुचे काम असल्याने चांगले व योग्य सॉफ्टवेअर घेणे आवश्यक असल्याने तसचे यासाठी नियुक्त केलेल्या समितीने शिफारस केल्यानुसार सॉफ्टवेअरसाठी मॉड्युलर सिस्टिमचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच हार्डवेअर साठी रु. ४,०१,८२५/- व सॉफ्टवेअरसाठी रुपये २,३२,७००/- असे एकुण रु. ६,३४,५२५/- प्रस्तावित खर्चास स्विकृतीसह सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७७/९ :**

मा. आयुक्तांचे तजविजनुसार नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक २८ जानेवारी ते ३१ जानेवारी ९९ या कालावधीमध्ये भारत सरकारच्या शहरी व्यवहार व सेवा योजना मंत्रालय नवि दिल्ली यांचे सौजन्याने "महाबळेश्वर" येथे नविनिर्वाचित महिलांचे प्रशिक्षण आयोजित करण्यांत आले आहे. सदर प्रशिक्षणाकरिता १. सौ. रंजनी जोशी, २.सौ. लता दलाल, ३. सौ. नुरजहाँ बेगम, ४. सौ. राधाबाई तळेकर, ५. सौ. शकुंतला धांडे यांच्या नांवाची मा. महापौर यांनी शिफारस केलेली असुन एकुण पाच महिला नगरसेविकांचे प्रशिक्षणाकरिता अंदाजे र.रु. २०,०००/- (वीस हजार) खर्च अपेक्षित आहे.

तरी र. रु. २०,०००/- च्या खर्चास मंजुरी देणेसाठी आणि फक्त प्रशिक्षण दौऱ्यास कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** सदर प्रशिक्षण दौऱ्याला खाजगी ट्रव्हल वाहनाचे महाबळेश्वरला जाण्यास मंजुरी देण्यांत येते. व ठराव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यापमाणे दि. २८ जानेवारी ते ३१ जानेवारी ९९ या कालावधीमध्ये भारत सरकारच्या शहरी व्यवहार व सेवायोजना मंत्रालय, नवि दिल्ली यांचे सौजन्याने "महाबळेश्वर" येथे नविनिर्वाचित महिलांचे प्रशिक्षणा करिता मा. महापौर यांनी शिफारस केल्यानुसार मनपाचे स्नमाननीय सदस्या १. सौ. रजनी जोशी, २. सौ. लता दलाल, ३. सौ. नुरजहॉ बेगम, ४. सौ. राधाबाई तळेकर व ५. सौ. शकुंतला धांडे यांना प्रशिक्षणाकरिता खाजगी ट्रव्हल वाहनाने पाठविण्यास तसेच सदरील प्रशिक्षणाकरीता येणाऱ्या अंदाजित खर्च र. रु. २०,०००/- (वीस हजार) ला कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र. ४७८/१० :**

श्री. गोविंद कुलकर्णी व लिपीक, जकात विभाग यांचे निलंबन आदेशाविरुध्दचे अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** निलंबन केलेल्या ८ (आठ) कर्मचाऱ्यांचे निलंबन आदेश रद्द करण्याबाबत निर्णय घ्यावा.

**श्री. म. अ. रऊफ :** प्रस्तावातील ८ कर्मचाऱ्यांना प्रशासनाने निलंबीत केलेले आहे. ते योग्य नाही.

**मा. सभापती :** प्रशासनाने कार्यवाही करुनच निलंबन आदेश संबंधितांना दिलेले आहे.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** ज्या अधिकाऱ्यांना निलंबीत केले होते, त्या सर्व अधिकाऱ्यांची प्रशासनाने चौकशी केलेली आहे काय?

**श्री. म. अ. रऊफ :** निलंबीत केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यात यावे.

**मा. सभापती :** संबंधित निलंबन केलेल्यांनी स्थायी समितीकडे अपील केल्यानंतर सभागृहाच्या निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** विषय क्रमांक १० ते १७ मधील निलंबन केलेल्या कर्मचाऱ्यांचे निलंबन आदेश रद्द करण्याबाबतचे विषय आहेत. सदर आठ कर्मचाऱ्यांनी प्रशासनाच्या नियमाचे चुकीचे ठरवुन कार्यवाही केलेली आहे काय ? तसे आल्यास संबंधिताना कामावर घेतांना तशा प्रकारची ताकीद द्यावी की, जेणे करुन अशा प्रकारची चुक यापुढे होता कामा नये.

**श्री. म. अ. एकबोलोद्दीन :** संबंधितांवर निलंबन आदेश काढण्यात आले हे कुणाच्या दबावाखाली का काढण्यात आलेले आहे काय ?

**श्री. म. अ. रऊफ :** संबंधित संघटना ही महानगरपालिकेच्या अंतर्गत रजिस्टर्ड नोंद आहे काय?

**मा. सभापती :** प्रस्तावातील क्रमांक १ ते १७ पर्यंत सदर आठ कर्मचाऱ्यांचे निलंबन आदेश रद्द करण्यात येते. संबंधित निलंबन केलेल्या कर्मचाऱ्यांना ताकीद देऊन त्यांचे निलंबन आदेश रद्द करण्यात येते.

१) महानगरपालिकेतील आठ कर्मचाऱ्यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवाकाळ म्हणुन गृहीत धरण्यात यावा.
२) सर्व कर्मचाऱ्यांना त्याच पदावर पुनःस्थापित करावे.
३) प्रस्तावात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**ठराव :**

१. श्री. गोविंद कुलकर्णी वरीष्ठ लिपीक, जकात विभाग यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवाकाळ म्हणुन गृहीत धरण्यात यावा.
२. श्री. गोविंद कुलकर्णी यांना त्याच पदावर पुनःस्थापित करावे.
३. प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७९/११ :**

श्री. दिलीप सुर्यवंशी रोखपाल, लेखा विभाग यांचे निलंबन आदेश विरुध्दचे अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

१. श्री. दिलीप सुर्यवंशी रोखपाल, लेखा विभाग यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवाकाळ म्हणुन गृहीत धरण्यांत यावा.

२. श्री. दिलीप सुर्यवंशी यांना त्याच पदावर पुनःस्थापित करावे.
३. प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८०/१२ :**

श्री. शे. जिलानी शे. कादर, वसुली लिपीक मालमत्ता विभाग यांचे निलंबन आदेशाविरुध्द अपीलावर विचारा विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

१. श्री. शे. जिलानी शे, कादर, क. लिपीक, मालमत्ता विभाग यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवाकाळ म्हणुन गृहीत धरण्यांत यावा.
२. श्री. जिलानी शे. कादर यांना त्याच पदावर पुनः स्थापीत करावे.
३. प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८१/१३ :**

श्री. उत्तम पंडागळे क. लिपीक, कर आकरणी विभाग यांचे निलंबन आदेशाविरुध्दचे अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

१. श्री. उत्तम पंडागळे, कनिष्ठ लिपीक कर आकारणी विभाग यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवाकाळ म्हणून गृहीत धरण्यात यावा.
२. श्री. उत्तम पंडागळे यांना त्याच पदावर पुनःस्थापित करावे.
३. प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८२/१४ :**

शे. मुनीरुद्दीन शे. हाशम, स. शि. मनपा के. प्रा. शाळा एन-७ सिडको यांचे निलंबन आदेशाविरुध्दचे अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

१) श्री. शे. मुनीरद्दीन शे. हाशम, सहशिक्षक, मनपा के. प्रा. शाळा, एन-७, सिडको यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवाकाळ म्हणुन गृहीत धरण्यांत यावा.
२) श्री. शे. मुनीरुद्दीन शे. हाशम यांना त्याच पदावर पुनःस्थापित करावे.
३) प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८३/१५ :**

श्री. बा. वि. काचोळे, सहशिक्षक, मनपा मॉडेल मिडल स्कुल, जाफरगेट यांचे निलंबन आदेशाविरुध्दचे अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

१) श्री. बा. वि. काचोळे, सहशिक्षक मनपा मॉडेल मिडल स्कुल, जाफरगेट यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवा काळ म्हणुन गृहीत धरण्यात यावा.
२) श्री. बा. वि. काचोळे यांना त्याच पदावर पुन:स्थापित करावे.
३) प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८४/१६ :**

श्री. राजेश लव्हेरा, वॉचमन, कें. प्रा. शाळा, मोतीकांरजा नं. १ यांचे निलंबन आदेशविरुध्दचे अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

१) श्री. राजेश लव्हेरा, वॉचमन, कें. प्रा. शाळा, मोतीकांरजा नं. १ यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवाकाळ म्हणुन गृहीत धरण्यात यावा.
२) श्री. राजेश लव्हेरा यांना त्याच पदावर पुन:स्थापित करावे.
३) प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८५/१७ :**

श्री. आर. एस. आव्हाड, जवान झोन क्र. १ यांचे निलंबन आदेशाविरुध्दचे अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

१) श्री. आर. एस. आव्हाड, जवान झो. क्र. १ यांचे निलंबन आदेश रद्द करुन निलंबनाचा काळ हा नियमित सेवाकाळ म्हणुन गृहीत धरण्यात यावा.
२) श्री. आर. एस. आव्हाड यांना त्याच पदावर पुन:स्थापित करावे.
३) प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४८६/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा परिसरातील गिरजादेवी को-ऑप. सोसायटी येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे साठीच्या कामाचे

अंदाजपत्रक र. रु. २,७०,०००/- चे सा. बां. जिल्हा दरसुची सन ९६-९७ च्या अन्वये तयार करण्यात आले असुन सदर कामाचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदी अंतर्गत प्रस्तावित आहे. सदर कामासाठी मा. आयुक्तांची मान्यता आहे. सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा परिसरातील गिरजादेवी को. ऑप. सोसायटी मधील मनपाच्या खुल्या जागेस संरंक्षित भिंत बांधणेसाठी कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रु. २,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८७/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सेव्हनहिल कॉलनी व व्यंकटेशनगर येथे शेड व सांस्कृतीक व्यासपीठ बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन सदर काम महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त झालेल्या ४.०० कोटी अनुदानातुन व्यकंटेशनगर उद्यान विकसित करणे बाबत रु. १०.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली होती. सदरील काम २७.१८% कमी दराने असल्याने त्या बचतीमधून त्याच ठिकाणी नविन दोन शेड बांधण्याबाबतचा रु. २,०१,२००/- चा प्रस्ताव वरील प्रमाणे स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेव्हनहिल कॉलनी व व्यंकटेशनगर येथे रोड व सांस्कृतीक व्यासपीठ बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. २,०१,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८८/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठणगेटचा कंपाऊंड कमी करणेच्या कामासाठी सन ९७-९८ च्या सा. बां. खातयाच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ३,२९,१००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च हा पुढील वर्षीच्या सन ९९-२००० तरतुदीमधुन करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेटच्या कंपाऊंड कमी करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,२९,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८९/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल अमरप्रित चौक ते चेतनानगर (महर्षी दयानंद मार्ग) या ८० फुट डी.पी. रस्त्यावर मध्ये दुभाजक टाकणे व ग्रील बसविणेच्या कामसाठी सन ९७-९८ च्या सा. बां. खात्याच्या जिल्हा दरसुची दराने अंदाजपत्रक र. रु. ५,२१,७००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील काम शासकीय

अनुदान सन ९७-९८ चय आर्थिक तरतुदीमधुयन प्रस्तावित आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रित चौकम्‍ ते चेतनानगर (महर्षी दयानंद मार्ग) या ८० फुट डी.पी. रस्त्यावर मध्य दुभाजक टाकणे व ग्रील बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ५,२१,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९०/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रंगारगल्ली येथील रस्त्योचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा. बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अं. प. र. रु. ६,१९,५७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "नविन डांबरीकरण" या लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.

**संवाद :**

**श्री. विश्वारोद्दीन :** रस्त्याचे रुंदीकरण पूर्ण झाले नाही.
**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** १२ घरे संपादन करावयाचे शिल्लक आहे.
**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते जितके घरे तोडण्यात आले तितकेच डांबरीकरण.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रंगारगल्ली येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ६,१९,५७५/- च्या अंदाजपपत्रकास स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९१/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गरवारे स्टेडियम आवारा नविन ऑर्मिटरी बिल्डींगचे विद्युतीकरण करणेकरीता रु. १,९६,६३८/- चे अंदाजपत्रका सा. बां. जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन सदरीक काम "क्रिडा संकुले" या लेखा शिर्षकाअंतर्गत सन ९८-९९ च्या तरतुदीनुसार प्रस्तावित आहे. सदरील कामासा मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

तरी गरवारे स्टेडीयम आवारातील नविन ऑर्मिटरी बिल्डींगचे विद्युतीकरण करणे करीता र. रु. १,९६,६३८/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गरवारे स्टेडियम आवारात नविन ऑर्मिटरी बिल्डींगचे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,९६,६३८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९२/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि. ) यांनी प्रस्ताव सादर केला की, अमान कॉलनी, सादत नगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईनचे टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र. रु. ४,३१,२००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ विभाग यांच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अमानकॉलनी, सादतनगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. ४,३१,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३/८ :**

जय संतोषी मातानगर एन-२ येथे १५० मीमी व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी जय संतोषी मातानगर येथील नागरीकांनी २५% लोकवर्गणीपोटी र. रु. ३१,०००/- झोन क्र. ७ मनपा या कार्यालयायत जमा केलेले आहेत. त्यापैकी राहिलेली र. रु. १२,४९८/- भरणा करणार आहेत. भरणा करुन घेतल्याशिवाय कामाला सुरवात करण्यात येणार नाही. राहिलेली रक्कम वसुल केल्या नंतरच काम सुरु करण्यात येईल. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९७-९८ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १,७३,९८४/- तयार करण्यात आले असुन सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

जय संतोषी मातानगर एन-२ येथे १५० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक र. रु. १,७३,९८४/- चे प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जय संतोषी मातानगर, एन-२ येथे १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,७३,९८४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९४/९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९३ मध्ये शहरातील ड्रेनेज लाईन व सेप्टीक टँकच्या सफाईकरीता एक व्हॅक्युम एम्प्टीअर खरेदी करण्यात आले आहे. या मशीनचा व्हॅक्युम पंप खराब झालेला आहे. ड्रेनेजच्या सफाईच्या कामात अडथळा निर्माण होऊ नये यासाठी सध्या दुरुस्त करुन मशीन चालू करण्यात आलेली आहे. सध्या एकच व्हॅक्युम एम्प्टीअर असल्यामुळे पंप नादुरुस्त झाल्यास मशिन बंद ठेवावी लागे. यासाठी नविन व्हॅक्युम पंप खरेदी करणे योग्य होईल. नविन व्हॅक्युम पंपासाठी रु. ३,२५,५०९/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले असुन सदरचा खर्च सन १९९८-९९ पाणी पुरवठा मशिनरी दुरुस्ती लेखाशिर्षातील तरतुदीतुन करण्यात येईल.

करिता अंदाजपत्रक मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नविन व्हॅक्युम पंप खरेदी करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. ३,२५,५०९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९५/१० :**

एन-९ टी.व्ही. सेंटर टपरी मार्केट या ठिकाणी १०० मीमी व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. १,४०,५९९/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या कामावर होणारा खर्च सन १९९८-९९ या वर्षाच्या देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकातील तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी एन-९ टी. व्ही. सेंटर टपरी मार्केट येथे १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता र. रु. १,४०,५९९/- च्या अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-९ टी.व्ही. सेंटर टपरी मार्केट या ठिकाणी १०० मी. मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकण्याच्या कामाकरीता तयार करण्यात र. रु. १,४०,५९९/- अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वेधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९६/११ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भिमनगर भावसिंगपुरा येथे उर्वरीत गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरीता सा. बां. खात्याच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये ३,९३,५५०/- च्या अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक १५.१.९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भीमनगर भावसिंगपुरा येथे उर्वरीत गल्लयांमध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये ३,९३,५५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९७/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर बायजीपुरा येथे सांस्कृतीक हॉल बांधण्याकरीता सा. बां. विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसूचनुसार र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २५.८.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने उपरोक्त अंदाजपत्रकास २५२/६ दि. ९.१०.९८ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९८/९८ दि. ९.१२.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (९) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा दर भरुन प्राप्त

झाल्या. त्या दि. २३.१२.९८ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) नंदकुमार घोडेले | १०% | जास्त |
| २) श्री. कुलवंतसिंग | ५% | जास्त |
| ३) साईबाब कंन्स्ट्रक्शन | ०.०१% | कमी दराने |

त्यानुसार मे. साईबाब कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रपीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** दिनांक ९.७.९८ ला अशाच प्रकारचा प्रस्ताव शाळेसाठी ठेवण्यात आलेला होता. मंजुरी देण्यात आलेली नाही.

**मा. सभापती :** सदर प्रस्ताव सांस्कृतीक हॉल बांधण्याचा असुन मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा येथे सांस्कृतीक हॉल बांधण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.०१% कमी दराची साईबाबा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९८/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, कटकटगेट ते सिडको या रस्त्यावर गटार बाधंणेच्या कामासाठी दि. २८.८.९८ च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र. १७५/२० अन्व्ये अंदाजपत्रक रक्कम रु. ४,२५,२००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना मनपा/लेखा/नि/५७/९८ दिनांक २२.९.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१७) निविदाविक्री झाल्या त्यापैकी स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मे. सोनी कंन्स्ट्रक्शन | ४१% | कमी दराने |
| २. श्री. कुलवंतसिंग | २७.७६% | कमी |
| ३. श्री. नंदकुमार घोडेले | २३.९९% | कमी |
| ४. मे. फाइव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | २५.१% | कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं. प. दरापेक्षा ४१% कमी दराने मे. सोनी कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्तावात ४१% कमी दराने दर्शविलेले आहे खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** संबंधित ठेकेदाराकडुन चांगल्याप्रकारे काम करुन घेण्यात येईल.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकटगेट ते सिडको या रस्त्यावर गटार बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा

४१% कमी दराची मे. सोनी कंन्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९९/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिंधी कॉलनी (पश्चिम भाग) अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी अं. प. र. रु. ३,५५,१०५/- चे तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती सभेत विषय क्र. १५८/३ दि. २८.८.९८ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१६) निविदा विक्री झाल्या असुन त्यापैकी निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | १४.११ % जास्त दराने |
| २. | श्री. ए.सी. कोठारी | १७.०० % जास्त |
| ३. | श्री. के. बी. पाथ्रीकर | २१.५१ % जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं. पत्रकीय दरापेक्षा १४.११ % जास्त दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा आहे. सदर अंदाजपत्रकाची तुलना सन ९७-९८ प्रमाण् केल्यास दर ०.०८% जास्त येतात. परंतु मा.आयुक्त साहेबांनी सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने मंजुरी दिली असुन हे दर ९६.९७ च्या दरसुचीनुसार १४% जास्त येताता. तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिंधी कॉलनी (पश्चिम भाग) अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनातम्कदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा १४.११% जास्त दराचे निविदाधारक श्री. डी. अजितसिंग यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम सा. बां. विभागाचे सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच ९६-९७ च्या दरसुचीनुसार अं. प. दरापेक्षा १४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५००/-१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मोंढा कॉटन मार्केट व्हाया जिन्सी ते चंपा मस्जीदपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. १९.८.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ६३/४ अन्वये अंदाजपत्रक र. रु. १०,४८,०००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/५७/९८ दि. २२.९.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (०८) आठ निविदा विक्री झाल्य पैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण (०७) सात निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. श्री. ए. सी. कोठारी १९.९२ % जास्त

| | | |
|---|---|---|
| २. | मे. मॉस्क्रॉट कंन्स्ट्रक्शन | २१.८५ % जास्त |
| ३. | श्री. चॉदराम आश्न्ना | २१.८५ % जास्त |
| ४. | श्री. के. बी. पाथ्रीकर | २२ % जास्त |
| ५. | मे. रे. कंन्स्ट्रक्शन कं. | २४ % जास्त |
| ६. | मे. व्यकंटेश कंन्स्ट्रक्शन कं. | २५ % जास्त |
| ७. | श्री. एम. ए. सिद्दीकी | २५ % जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.९२% जास्त दराने श्री. ए. सी. कोठारी यांची निविदा आहे.

परंतु सदरील कामाचे ठेकेदाराने दर जास्त दिल्यामुळे त्यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी निविदेत दिलेले दर १९.९२% जास्त या दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यासाठी संमती दिल्यानुसार त्यांचे निविदेस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. ए. सी. कोठारी यांचे निविदेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोंढा कॉटन व्हाया जिन्सी ते चंपा मस्जीद पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. ए. सी. कोठारी यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०१/१६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर येथील जुनी गटार तोडुन नविन ४५० मी.मी. व्यासाची आर.सी.स.ी अर्धगोल गटारीला जोडणेच्या कामाकरिता स्लम विभागाच्या तरतुदीनुसार सदर कामाकरिता परिसर अभियांत्रिाकी विभागाच्या सन ९७-९८च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ६,९९,४२०/- चे तयार करुन स्थायी समितीने विषय क्र. ३०४/९८ दि. १६.१०.९८ ला मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाची निविदा जा. क्र. मनपा/लेखा/नि/७७/९८ दि. २८.१०.९८ अन्वये बी-१ नमुन्यात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण २२ निविदा विक्री झ ाल्या व त्यापैकी सात (७) निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन | ३६.८९ % | अं. प. दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. एस. ए. देशमुख | ३३.३ % | --//-- |
| ३. | श्री. मन्नानखॉन | ३०.८६ % | --//-- |
| ४. | श्री. सुजात हॉश्मी | ३० % | --//-- |
| ५. | श्री. जी. आर. घोडेले | २८ % | --//-- |
| ६. | मे. परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | २१.३३ % | --//-- |
| ७. | मे. विपुल कंन्स्ट्रक्शन | २० % | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८९ कमी दराने श्री. मे. न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदरील निविदेस मा. आयुक्तांनी दिनांक १८.१.९९ ला मंजुरी दिलेले आहे.

तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**
**मा. सभापती :** स्थळपाहणी करण्यात येईल. प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदर कामाच्या संदर्भात स्थळ पाहणी करण्यात येईल. त्यामुळे प्रस्तावास स्थगिती देण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२/१७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. स्टॅंडर्ड कॉलनी पैठण रोड लगत २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,७६,६००/- ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवुन निविदा मागविल्या असता एकुण बावीस (२२) कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण चार (४) निविदा भरुन सिलबंद प्राप्त झाल्या असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

१) श्री. शेख मसुद - अंदाजपत्रकीय दराने
२) श्री. शेख एस. एम. - अं. दरापेक्षा ५.२५% जास्त दराने
३) मे. हयात कंन्स्ट्रक्शन - अं. दरापेक्षा ५% जास्त दराने
४) मे. विपुल कंन्स्ट्रक्शन - अं. दरापेक्षा ५% जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. शेख मसुद यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची आहे.

तरी श्री. शेख मसुद यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीसह सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. स्टॅंडर्ड कॉलनी पैठणरोड लगत २५० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. शेख मसुद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०३/८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की, मो. गौतमनगर स्लम येथील दगडी गटारीची उंची वाढविणे व अंतर्गत भागात अर्धगोलाकार गटार बांधणे बाबत कामाकरिता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९६-९७च्या दरसुचीनुसार रु. ६,९१,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खडी रस्ते" या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २९.८.९८ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच स्थायी समितीत दि. ९.१०.९८ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण २० (वीस) निविदा विकल्या गेल्या व ५ निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले.

१) मन्नानखॉं २७.८६ % कमी
२) जी. के. पवार २५.२५ % कमी

| | | |
|---|---|---|
| ३) आनंद बिल्डर्स | २३.३ % | कमी |
| ४) सय्यद फैजुल हक्कम | २० % | कमी |
| ५) कुलवंतसिंग | १३.८६ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २७.८६% कमी दराची श्री. मन्नानखाँ यांची निविदा मंजूरस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविलेल्याप्रमाणे गौतमनगर स्लम येथील दगडी गटाराची उंची वाढविणे व अंतर्गत भागात अर्धगोलाकर गटार बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २७.८६% कमी दराची श्री. मन्नानखॉन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०४/१९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्सुलगांव येथे शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा. बा. यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुचनीनुसार र. रु. ३,९८,७५७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते" व दहावा वित्त आयोग या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २९.८.९८ ला प्रशासीकय मान्यता दिली आहे. तसेच स्थायी समितीत दि. १५.९.९८ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण १५ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ८ निविदा प्राप्त झाले व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले.

| | |
|---|---|
| १) आनंद बिल्डर्स | ३३.३ % कमी |
| २) सयद रफीकोदीन | ३३.१०% कमी |
| ३) ए.एम. फारुकी | ३२.७८% कमी |
| ४) मन्नान खॉन | २८.५० % कमी |
| ५) विपुल कंन्स्ट्रक्शन | २८ % कमी |
| ६) मझर सिद्दीकी | २५.२५ % कमी |
| ७) फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन | २२.१० % कमी |
| ८) एस.एम. मंडोर | २१.३ % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३% कमी दराची असलेली मे. आनंद बिल्र्डस यांची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. स. अली मिरा सलामी :** फरशी बाबतचा प्रस्ताव असुन नंतर मंजुरी देण्यांत यावी.

**मा. सभापती :** स्थळ पाहणीसाठी ठेवण्यात यावे. प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या कामांची पाहणी करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरल्याने सदर प्रस्ताव सर्वानुमते स्थगित ठेवण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०५/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संसारनगर येथे फरशी व कॉक्रीट रस्ते तयार करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु. ३,७०,६५८/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असता मा. आयुक्तांनी दि. ७.९.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रधान केली असुन स्थायी समितीच्या विषय क्र. २८९/४३ दि. ९.१०.९८ रोजी मंजुरी मिळाल्यानंतर रितसरस वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १९ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या तारखेस फक्त ३ (तीन) मोहरबंन निविदाप्राप्त झाल्या त्या निविदा दि. २७.११.९८ रोजी उपस्थित ठेकेदार समक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. सुरेख पाथ्रुड | अ. प. दरोपक्षा | ४.९९% | जास्त |
| २) एस.एम. मंडोरे | --//-- | ८% | जास्त |
| ३) अजितसिंग शिलेदार | --//-- | ११% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. सुरेख पाथ्रुड यांची ४.९९% जास्त दराची निविदा आहे करिता मंजुरीसाठी सादर करण्यांत आल्या असता सदर ठेकेदारांनी दिलेले दर जास्त वाटल्यामुळे त्याचेकडुन दर पृथ्थकरण मागविण्यांत आल्या असता दिलेले दर अयोग्य वाटल्यामुळे मा. आयुक्तांनी ४.९९% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराची मान्यता केली आहे.

सदर काम अर्थ संकल्प १९९८-९९ झोपडपट्टी सुधार योजना लेखा-शिर्ष (खांडकी/फरशी रस्ते) ठेवण्यांत आलेल्या तरतुदीमधुन ५०% व उर्वरीत ५०% रक्कम दहाव्या वित्त आयोगातुन खर्च करण्यांची प्रस्तावीत आहे. करिता मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संसारनगर येथे शहाबाद फरशी व कॉक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. सुरेख पाथ्रुड यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०६/२१ :**

सहाय्यक संचालक नगररचना प्रस्ताव सादर करीत आहेत की, मौज शहानुरवाडी येथील स. न. १४ पैकी वैद्यकीय कर्मचारी गृहनिर्माण संस्थेच्या रेखाकंनास १६.१.८७ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. मंजुरीच्या वेळी जमिन मालकाने स. न. १२ पैकी काहि भाग या रेखाकंनाच्या खुल्या जागेत सामील करुन रेखाकंन मंजुर करुन घेतले आहे.

स. न. १२ चे मालकाने या रेखाकंनाच्या खुल्या जागेत त्यांची परवानगी न घेता सामील केलेली जमीन परत मागीतली आहे. रेखाकंनात १५% खुली जागा सोडणे आवश्यक होती. रेखाकंना खालील क्षेत्र १३५०० चौ.मी. आहे. म्हणेज २०२५चौ. मी. खुली जागा सोडणे जरुरीचे होते परंतु रेखाकन धारक सोसायटीने २१०३.१२ चौ. मी. म्हणजे १५.५७ खुली जागा सोडलेली आहे. जागेवर प्रत्यक्ष मोजमाप केले असता खुल्या जागेचे क्षेत्र २०४१.३० चौ.मी. इतके येते. लगतच्या मालकाचे क्षेत्र त्यात सामील झाल्याने त्यांना ६१.१२

चौ.मी. जमीन परत करण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. वरील ६१.१२ चौ.मी. क्षेत्र वजा जाता खुल्या जागेचे क्षेत्र १४.६७% टक्के भरते.

**संवाद :**

**श्री. नरसिंग ढगे :** १९८७ च्या रेखाकंना मंजुरीनुसार किती बांधकाम झाले, नियमाने किमी खुली जाग सोडावावयास पाहिजे माहिती द्यावी.

**सहा. संचालक नगररचना :** महानगरपालिका झाल्यापासुन १५% खुली जागा सोडण्यात येते ९२ मधील दुरुस्ती प्रमाणे १०% खुली जागा ठेवावी लागते असे समजते.

**मा. सभापती :** सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवून स्थगित ठेवुन स्थळ पाहणी करुन पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल.

**ठराव :**

सभागृहाच्या झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव संदर्भात स्थळ पाहणी करुन निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०७/२२ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर बी.सी. हॉस्टेल तसेच मागणीनुसार द्यावे लागणारे फर्निचर खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यांत आल्या एकुण सहा निविदा दरपत्रके या विभागास प्राप्त झ ााली. प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत येवुन प्राप्त साहित्यांचे नमुने तसचे ब्राऊचर इ. सह प्रकरण मा. आयुक्त यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यांत आले.

मा. आयुक्तांनी ब्राऊचर तसेच प्राप्त नमुन्याचे अवलोकन तथा निरिक्षण केले असता स्पेसिकफकेशन प्रमाणे जाहिर निविदे अंतर्गत कमी दराच्या निविदा दरास मान्यता देवून साहित्य वाटपापुर्वी साहित्य स्पेसिफिकंशेन प्रमाणे आहे किंवा नाही याची तपासणी तांत्रिकदृष्टया शहर अभियंता यांचे कडुन करुन प्रमाणीत केल्यानंतरच साहित्य वाटप करणे बाबत आदेश दिलेले आहेत. एकुण जवळपास ४० आयटमचे नमुने देणे शकय नसल्याने निविदाधारकांकडुन ब्राऊचर मागविण्यांत आले होते.

तुलनात्मकदृष्टया कमी आलेले दर साहित्यांचे नांव तसेच एजन्सीचे नांव खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एक्झिक्युटिव्ह खुर्ची | रु. ३५५०/- | मे. सलवा इंटरप्रायझेस |
| २. | रिव्हॉलिवंग खुर्ची | रु. १४८०/- | --//-- |
| ३. | रिव्हॉलिवंग कोमची खुर्ची | रु. २९००/- | --//-- |
| ४. | फायबर खुर्ची सेले कं. | रु. ३९०/- | मे. रोशन सेल्फ कॉपोरेशन |
| ५. | लाकडी फोमची खुर्ची | रु. १०००/- | मे. वर्षा मेटल वर्कस |
| ६. | ऑफिस एस टाईप केनिंग खुर्ची | रु. ४२५/- | मे. सत्य ण्ांट व मे. रोषण सेल्स कॉर्पोरेशन विभागुन |
| ७. | औफिस एस टाईप विदाऊट फॉम खुर्ची | रु. ४००/- | मे. सलवा इंन्टप्रायझेस |
| ८. | एस टाईप ऑफीस चेअर विथ स्टिल शिट सिट बॅक | रु. ४५०/- | --//-- |
| ९. | ऑफिस आलमारी लोखंडी मोठी | रु. | मे. सल्वा इंन्टप्रायझेस |

| | | |
|---|---|---|
| १०. ऑफिस आलमारी लोखंडी लहान | रु. १९८०/- | मे. वर्षा मेटल वर्क्स |
| ११. ऑफिस टेबल | रु. १९००/- | मे. रोषण सेल्स कॉर्पो |
| १२. एक्झिक्युटिव्ह टेबल | रु. ३७८०/- | मे. सल्वा इंन्टप्रायझेस |
| १३. लोखंडी बेंच | रु. १३५०/- | मे. रोषण सेल्स कॉर्पो. |
| १४. स्टुल | रु. २७०/- | मे. सल्वा इंन्टरप्रायझेस |
| १५. स्टिल डयुबल डेस्क -३ सिटर | रु. १७८०/- | मे. वर्षा मेटल वर्क्स |
| १६. --/-- -२ सिटर | रु. १५८०/- | --//-- |
| १७. ॲडलेस्टेबल शेलवींग रॅक्स -३ | रु. ५५०/- | मे. सलवा इंन्टप्रायझेस |
| १८. --//-- - ६ | रु. १३५०/- | --//-- |
| १९. --//-- - ७ | रु. १५८०/- | --//-- |
| २०. --//- - ९ | रु. १९००/- | --//-- |
| २१. स्टिल बुक केस | रु. ३२९५/- | मे. वर्षा मेटल वर्क्स |
| २२. स्टिल टेबल | रु. ४५५०/- | --//-- |
| २३. स्टिल अंडस्ट्रियल लॉकर | रु. ४७९८/- | --//-- |
| २४. स्टिल ओपन टाईप रॅक | रु. २४५०/- | मे. सलवा इंन्टप्रायझेस |
| २५. लाकडी टेबल | रु. १९२५/- | मे. वर्षा मेटल वर्क्स |
| २६. स्टिल कोल्डिंग कॉट | रु. ७५०/- | मे. रोषण सेल्स कॉर्पोरेशन |
| २७. कार्ड कॅटलॉग कॅबिनेट | रु. ९६००/- | मे. एम.एस.एस. आयडीसी |
| २८. पिरीयॉडिकल डिसप्ले कम स्टोअरेज रॅक | रु. ८५००/- | --//-- |
| २९. चार्जींग ट्रे | रु. ९००/- | --//-- |
| ३०. सॉटींग ट्रे | रु. ७००/- | --//-- |
| ३१. सतरंजी २० फुटX१५ फुट | रु. २७५०/- | मे. रोषण सेल्स कॉर्पोरेशन |
| ३२. टेबल क्लॉथ | रु. २६०/- | मे. सजावट हॅन्डलुम |
| ३३. सतरंजी ६फुटX२.५ फुट | रु. २२०/- | मे. रोषण सेल्स कॉर्पोरेशन |
| ३४. गाद्या (कॉयरच्या ६X२.५) | रु. २१७५/- | मे. सजावट हॅन्डलुम |
| ३५. उशी १४X१२ | रु. २२५/- | --//-- |
| ३६. लोकरी ब्लॉकेट ५४X९० | रु. ५२५/- | मे. रोषण सेल्स कॉर्पोरेशन |
| ३७. चादर (बेडशिट)५४X९० | रु. ३२५/- | मे. सजावट हॅन्डलुम |
| ३८. उश्याचे कव्हर १५X१८ | रु. ६०/- | मे. सजावट हॅन्डलुम |
| ३९. सोलापुरी चादर६X३ | रु. ३६५/- | मे. रोषण सेल्स कॉर्पोरेशन |
| ४०. आरसा १२X१८ | रु. २४०/- | मे. औरंगाबाद आयर्न इंडस्ट्रिज |
| ४१. प्लास्टिक मग (सेलो कं.) | रु. २५/- | मे. रोषण सेल्स कॉर्पोरेशन |
| ४२. लाकडी ड्रेसिंग टेबल | रु. २२००/- | मे. एस.एस.एस. आयडीसी |
| ४३. खुर्ची लोखंडी हात नसलेली | रु. ४२५/- | मे. सल्वा इंन्टरप्रायझेस |

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मुख्य लेखा परिक्षक :** प्रस्तावात ॲटम दर्शविण्यात आलेले नाहीत माझ्या माहिती प्रमाणे दर जास्त दर्शविलेले आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** यात तीन लाखांची खरेदी आहे. स्टॅन्डर्स नगाची खरेदी केल्यास जास्त कालावधी पर्यंत टिकुन राहते. क्वायच्य घेतलेल्या सर्व वस्तु लवकर बदलाव्या लागतात.

**श्री. म. अ. रऊफ :** मागील वर्षीच्या तुलनेप्रमाणे मागणी केलेली नाही काय ?

**श्री. गौतम लांडगे :** स्टॅन्डर्ड क्वालिटीच्या वस्तु खरेदी केली म्हणजे टिकाऊ असते. एकुण निविदा रु. ३ लक्ष आहे. अंदाजपत्रकापेक्षा जास्त दराने अनेक वेळा मंजुर केली आहे. मंजुरी देण्यांत यावी,

**मुख्य लेखा परिक्षक :** यात गादया किती घेणार आहे.

**मुख्य लेखाअधिकारी :** ५० गादया मागविणार आहोत.

**श्री. स. अली मिरा सलामी :** यातील गादया मागवितांना वेगवेगळाय क्वालिटीचे नमुने जसे कमी मध्यम व उच्च दर्जाची.

**मुख्य लेखा परिक्षक :** अ. क्र. ३० ते ४१ पर्यंत स्थगित ठेवावे. नमुना बघण्यात येईल.

**मुख्य लेखाधिकारी :** एकुण संपुर्ण ॲटमच्या ज्या किमंती दर्शविण्यात आलेल्या आहेत. रु. ३,८५ लाख पर्यंत अदा करावी लागणार असून जास्त नाही.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** गोदरेज कंपनीच्या वस्तु मागविण्यात याव्या.

प्रस्तावातील अ. क्र. ३० ते ४२ संबंधि उदया परवाच माहिती घेऊन नंतर निर्णय घेण्यात येईल व प्रस्तावातील अ. क्र. १ ते २९ पर्यंतच्या जे ॲटम दर्शविलेले आहे. त्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या ॲटम क्रमांक १ ते २९ च्या समोर दर्शविलेल्या दराने त्या समोर दर्शविलेल्या एजन्सीकडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. त्याचप्रमाणे प्रस्तावातील अ. क्र. ३० ते ४२ चे ॲटम बाबत संबंधित विभागाकडुन सविस्तर माहिती घेऊन खरेदी करण्याबाबत पुढील बैठकीत निर्णय घेण्यांत येईल. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०८/२३ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मकाई गेट ते सिध्दार्थ गार्डन खाम नदीच्या पात्रात ७०० मी.मी. व्यासाची मुख्य जलनिःसारण वाहिनी टाकणे आवश्यक आहे. कारण हर्सुल ते मकाई गेट पर्यंत जलनिःसारण वाहिनीचे काम पुर्ण झाले आहे व या वाहिनीस खाम नदीच्या काठावर व इतर परिसर उदा : हर्सुल गांव त्यालगतच्या हाऊसिंग सोसायटी, बेगमपुरा, जयसिंगपुरा, प्रबुध्दनगर, कोहीनुर कॉलनी, आरेफ कॉलनी इत्यादी वसाहती जोडल्या आहेत.

मकाईगेट ते सिध्दार्थ गार्डन पर्यत वाहिनी नसल्याचे सर्व मैलायुक्त पाणी नदीच्या पात्रात वाहुन काठावरील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकातो. शहा कन्सलटं या एजन्सीने खाम नदीच्या पात्रात ७०० मी.मी. व्यासाची प्रस्तावित केली आहे. त्यामुळे ही वाहिनी टाकणे अति आवश्यक आहे. या कामाकरिता मागील ९४-९५ ते ९७-९८ या वर्षात आठ वेळेस जाहिर निविदा काढण्यात आल्या परंतु काहि वेळेस प्रतिसाद मिळाला नाही तर काहि वेळसे निविदा ८९%, ९०% जास्त दराने प्राप्त झाल्या त्यामुळे एवढया

जास्त दराची निविदा स्विकारणे शक्य नव्हते. निविदा तक्ता जास्त दराने येण्याचे मुख्य तांत्रिक कारण खालील प्रमाणे बसु शकते.

१. हे काम संपुर्ण खाम नदीच्या पात्रात करावे लागणार आहे व प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाण्याकरिता योग्य रस्ता नाही.
२. संपुर्ण कठीण खडक (हाड रॉक) खोदून काम करणे आहे व त्यामुळे योग्य ऑपरॉक नसलयाने सद्या असलेल्या आधुनिक यंत्र सामुग्री प्रत्यक्ष स्थळावर नेऊ शकत नाही.
३. या नदीच्या काठावर वसाहती व दोन ऐतिहासिक इमारती उदा: बिबिका मकबरा, पानचक्की असल्याने कठीण दगड ब्लास्टींग करुन खोदकामास परवानगी मिळणार नाही.
४. सर्व लागणारे साहित्य हे मनुष्याद्वारेच ने-आण करावी लागणार आहे.

वरील कारणाने सदरील काम रेगांळत आहे, परंतु हे काम आवश्यक असल्याने अशा प्रकारची कामे ही कुशल व अनुभवी गुत्तेदारास पाचारण करुन खाजगी वाटाघाटी करुन निर्णय घेणे ही एक निविदेचीच पध्दत मानली जाते. त्याप्रमाणे सन ९७-९८ मध्ये मे. राणा कंन्स्ट्रक्शन यांनी जो दर दिला (लोवर आयटम) तो ९०% जास्तीचा दर दिला होता जो मान्य करण्यात आला नाही. सदरील कामाकरिता दोन टप्प्यात काम करण्याचा निर्णय घेण्यात येऊन वेगवेगळया निविदा लोवर रेट व पाईप स्पलाय करीता मागविण्यात आल्या असता त्या खालील प्रमाणे प्राप्त झाल्या.

| | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **प्राप्त दर** |
|---|---|---|
| १. मकाईगेट ते पानचक्की दराने | १३,४९४९७/- | ८९% जास्त |
| २. पानचक्की ते सिध्दार्थ गार्डन दराने | १८,५५९३७/- | ९०% जास्त |
| ३. पाईप खरेदरी दराने | १७,७३,२००/- | १५.०१% कमी |
| **एकुण** | **४९,७८,६३४/-** | |

| निविदा प्राप्ती नंतर येणारी किमंत | | |
|---|---|---|
| | १. | २५,५०,५४९/- |
| | २. | ३५,२५,२८०/- |
| | ३. | १५,०७,०४२/- |
| | **एकुण** | **७५,८३,८७१/-** |

या कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५२,२७,९००/- ची काढण्यात आली होती. निविदा प्राप्तीनंतर येणारी किमंत रुपये ७५,८३,८७१/- एवढी येते. म्हणजे र. रु. २३,५५,९७१/- जास्तीचा खर्च मनपा सोसावा लागणार होता. त्यामुळे या कामाचे अं. प. सन ९७-९८ दरसुची नुसार तयार केले असता याची किंमत र. रु. ६७,७४,३७०/- एवढी होते.

याचाच अर्थ प्राप्त दर योग्य नव्हते. सद्या सन ९८-९९ ची दरसुची प्रचलीत आली असुन या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार केले असता त्याची र. रु. ७५,१८,८००/- एवढी

येते. यावरुन दिसुन येते की दरवर्षी अंदाजपत्रकास वाढ होत आहे व यावर निविदा मागविल्या तर दर जास्त प्राप्त होत आहे. जे मान्य करणे शक्य होत नाही त्यामुळे वर नमुद केल्यानुसार कामाची निकड लक्षात घेता सदरील काम करणे अनिवार्य असल्याने शासकीय अनुदानातुन याचा समावेश केल्याने या निधीचा खर्च मार्च ९९ अखेर करणे नितांत आवश्यक राहील व या करीता वारंवार निविदा काढुन नामंजुर करणे हे प्रशासकीयदृष्टया योग्य होणार नाही कारण वर्षी दरसुचीनुसार अंदाजपत्रक वाढ होत आहे. नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने व मनपाची आर्थिक बाजू लक्षात घेता अनिवार्य काम हे कमीत-कमी खर्चात करुन घेणे योग्य राहील असे वाटते.

वरील सर्व बाबी दृष्टीसमोर ठेवुन असे प्रस्तावित करण्यात येते की, निविदा मागविण्यात ज्या पध्दती आहेत ह्या पुर्णपणे अवलंबविल्यानंतर शेवटची पध्दत आहे जर प्रतिसाद मिळत नसेल किंवा प्राप्त होणारे दर हे तुलना करण्याकरिता योग्य नसतील तर त्यानंतर या कामात कुशल व यापुर्वी अशी कामे केलेल्या एजन्सीला बोलावुन दर निश्चित करुन ज्यामुळे डिपार्टमेन्टला चांगल्या प्रतिचे काम मिळलेल व काम मिळेल व काम त्वरील पुर्ण होईल ही पध्दत अवलंबिने आवश्यक राहते.

मे. राणा कंन्स्ट्रक्शन हे मनपा मध्ये अशा प्रकारचे काम करीत आहेत व ती पुर्णत्वाव आहेत व ते हे काम सन ९७-९८ या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय र. रु. ६४,५१,७८०/- करण्यास तयार असल्याने परत ९८-९९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय र. रु. ७५,१८,२००/- यावर निविदा काढणे संयुक्तीक राहणार नाही. कारण दर नक्कीच जास्त प्राप्त होतील व मनपास जास्त खर्च सोसावा लागेला.

करिता आर्थिक बाजुचा संपुर्ण अहवाल असे प्रस्तावित करण्यात येते की, स्थायी समिती या प्रकरणास मंजुरी देण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमय १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) अ नुसार कारणे नमुद करुन मंजुरी देण्यास सक्षम आहे. सदरचे काम शासकीय अनुदानातुन असल्याने व ३१ मार्च १९९९ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक असल्याने स्थायी समिती समोर मे. राणा कंन्स्ट्रक्शन हे काम सन ९७-९८ या दरसुचीनुसार र. रु. ६४,५१,७८०/- करण्यास तयार आहे.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मे. राणा कंन्स्ट्रक्शन यांच्या नावे संपूर्ण मकाईगेट ते सिध्दार्थ गार्डन पर्यंतचे काम र. रु. ६४,५१,७८०/- या अंदाजपत्रकीय दराने निविदा मान्य करणे योग्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मकाईगेट ते सिध्दार्थ गार्डन पर्यंतचे खाम नदीच्या पात्रात ७०० मी.मी. व्यासाची वाहिनी टाकण्याचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) मधील परिच्छेद दोन अन्वये प्राप्त अधिकारान्वये सदरील सन ९७-९८ चे दरसुचीनुसार र. रु. ६४,५१,७८०/- चे काम मे. राणा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०९/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील विद्युत पोलवर लावण्याकरिता एकुण ५०० नग टयुब फिकचर खरेदी करण्याचे कामासाठी र. रु. ४,३९,०००/- चे तयार करण्यांत आल आहे. सदरील खर्च सन १९९८-९९ वर्षाच्या "विद्युत साहित्य खरेदी" या लेखाशिर्षाखाली करण्यांत येईल.

तरी र. रु. ४,३९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विकास जैन :** माझ्या वार्डातील फ्क्चिर खरेदी बाबतचा प्रस्तावास मंजुरी दिलेली असतांना अदयाप पर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांना तसे आदेशित केलेले आहेत. परंतु काही प्रमाणात वार्डातील विद्युत व्यवस्थेबाबतची कामे बाकी असतील.

**श्री. विकास जैन :** मागील एखाद्या अंदाजपत्रकानुसार मटेरियल वापरुन वार्डातील विद्युत व्यवस्थेबाबत कार्यवाही होत असेल तर तशी कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांना सुचना करतो की, शहरातील प्रत्येक वार्डात मी स्वतः पाहणी करणार असुन विद्युत व्यवस्थेबाबत ज्या भागातील नागरीकांनी तक्रार केल्यास संबंधित अधिकारी यावर प्रशासनामार्फत कडक कार्यवाही करण्यात येईल. संपूर्ण वार्डातील विद्युत व्यवस्थेबाबत कार्यवाही करावी. सदर विद्युत व्यवस्थेची कामे करतांना एम.एस.ई.बी. चा सल्लानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** माझ्या वार्डातील विद्युत व्यवस्थेबाबत कार्यवाही करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** विद्युत व्यवस्थेसाठी साहित्य मागवितांना अंदाज किती रक्कमेपर्यत मागणी होते. नियमावली किती बजेट ठेवण्यांत येते माहिती द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विद्यूत पोलवर लावण्याकरीता एकुण ५०० नग टयुब फ्क्चिर खरेदी करण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,३९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१०/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सिल्लेखाना चौक ते लक्ष्मणवाडी मार्गे बंजारा कॉलनी रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेचे कामासाठी दिनांक ५.१२.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३४४/५ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ६,८६,२३३/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क. मनपा/लेखा/नि/१०१/९८ दिनांक २२.१२.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१९) एकोणीस निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकरणेच्या नियोजित तारखेस एकुण (०३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. अब्दुल सलाम | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | श्री. राजेंद्र वर्दे | - | ०५% जास्त दराने |
| ३) | मे. अरीओम कंन्स्ट्रक्शन | - | ७.१५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाच्या दराने श्री. अब्दुल सलाम याची निविदा आहे. तसेच ठेकेदारास दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता ठेकेदाराने अंदाजपत्रकीय

दराने काम करण्यासाठी संम्मती दिलेले असल्यामुळे श्री. अब्दुल सलाम यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने मंजुर करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना चौक ते लक्ष्मणचावडी मार्गे बंजारा कॉलनी रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५११/२६ :**

अति. शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वरद गणेश मंदिर समर्थनगर ते विरसावरकर चौक सिल्लेखाना चौक रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामासाठी दिनांक ५.१२.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३४३/३ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ६,४६,३८७/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०१/९८ दिनांक २२.१२.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (२५) पंचवीस निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (०३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | मे. आर. कंन्स्ट्रक्शन | - | १२% | जास्त दराने |
| २) | श्री. सैय्यद फैजुल हक्क | - | १५% | जास्त दराने |
| ३) | मे. हायवे कंन्स्ट्रक्शन | - | २२% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२% जास्त दराने मे. ए. आर. कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा आहे.

ठेकेदाराने निविदेमध्ये दर जास्त दिल्यामुळे त्यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी निविदेत दिलेल्या १२% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांसाठी संम्मती दिलेले आहे.

करिता अंदाजपत्रकीय दराने मे. ए.आर. कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडुन सदरील काम करुन घेणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वरद गणेश मंदीर समर्थनगर ते वीर सावरकर चौक सिल्लेखाना चौक रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. ए. आर. कंन्स्ट्रकशन कं. यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१२/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक ते विनायकराव पाटील चौक या रस्ता दुभाजकावर एम.एस. रेलींग (ग्रील) बसविणे बाबतच्या कामासाठी

अंदाजपत्रक रक्कम रु. १५,६९,५३१/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (७) सात निविदापत्रके विक्री झाल्या असुन निविदापत्रके स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस (४) चार निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. शेख शरीफ | - | ३.०९% | जास्त दराने |
| २) श्री. सलीम अहमद | - | ६% | --//-- |
| ३) श्री. नंदकुमार घोडेले | - | ७.८६% | --//-- |
| ४) श्री. राजासिंग | - | १०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३.९९% जास्त दराची श्री. शेख शरीफ यांची निविदा आहे.

सदरील प्राप्त दर जास्त वाटत असल्याने मा. आयुक्त यांचे समक्ष संबंधित ठेकेदारास दराच्य वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदर काम ३.९९% जास्त या दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यांची तयारी संबंधित ठेकेदाराने दर्शविली आहे.

तरी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने श्री. शेख शरीफ यांच्याकडुन करुन घेण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक ते विनायकराव पाटील चौक या रस्ता दुभाजकावर एम.एस. रेलींग (ग्रिल) बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. शेख शरीफ यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी. सदरील ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र. ५१३/२८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरमियॉ दर्गा मागे जांबिदा ले आऊटमध्ये नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५,७०,८००/- ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे

त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवुन मागविल्या असता एकुण एकुणतीस (२९) कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण बारा (१२) निविदा दर भरुन सिलबंद प्रापत झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) मे. मोना कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | ४६.३० | कमी दराने |
| २) श्री. एस.पी. सरवदे | --//-- | ४६.०१ % | --//-- |
| ३) श्री. एम.एम. कासी | --//-- | ४५.१५ % | --//-- |
| ४) श्री. डी. अजितसिंग | --//-- | ४५.०० % | --//-- |
| ५) श्री. बबन हिवाळे | --//-- | ४३.९९ % | --//-- |
| ६) श्री. एस.एम. मंडोरे | --//-- | ४२.५० % | --//-- |
| ७) मे. राणा कंन्स्ट्रक्शन | --//-- | ४०.९९ % | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८) श्री. प्रविण पवार | --//-- | ३९.११ % | --//-- |
| ९) श्री. जी. आर. घोडेले | --//-- | ३६.०० % | --//-- |
| १०) मे. अमर कंन्स्ट्रक्शन | --//-- | ३३.३० % | --//-- |
| ११) श्री. एम.जी. सिगमकर | --//-- | ३०.११ % | --//-- |
| १२) मे. एस. एच. असोसिएट | --//-- | ०९.१८ % | --//-- |

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. मोना कंन्स्ट्रक्शन यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४६.३०% कमी दराची आहे. तरी प्रस्ताव स्विकृतीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**श्री. गौतम लांडगे :** सदर प्रस्तावास मंजुरी दिली तरी जबाबदारीने काम करुन घ्यावयास पाहिजे. याबाबत एक गठित करुन, जेणे करुन ठेकेदारांनी चांगल्या प्रतीचे मटेरियल वापरुन विकास कामे केली पहिजे. प्रस्तावामध्ये ४६.३०% बिलो मध्ये दिलेले आहे.

**श्री. विश्वारोद्दीन :** सदर नाल्यात रिटेनिंग वॉल बांधणेचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येते काय ?

**कार्य. अभियंता :** दराच्या जवळपास १-१, दीड-दीड फुटची परवानगी आहे. या संदर्भात ठेकेदाराला पत्र देऊन कळविण्या आलेले असुन आपण सांगेल त्या प्रतिचे काम करुन देण्यांत तयार आहेत.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी संबंधित ठेकेदारांकडुन चांगल्या प्रतीचे काम होईल याकडे लक्ष ठेवुन काम करुन घ्यावे. प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरमियॉ दर्ग्यामागे जंबिदाले आऊटमध्ये नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदेपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४६.३०% कमी दराची मे. मोना कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१४/२९ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि. ) यांनी प्रस्ताव सादर केला की, बन्सीलालनगर येथे म्हाडा कॉलनी समोरील गटार दुरुस्त करणे व रोड क्रॅासींग स्लॅब टाकणे या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे दरसुची दराने रक्कम रुपये १,५३,४०७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि.१५.१९९ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,५३,४०७/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर येथे म्हाडा कॉलनी समोरील गटार दुरुस्त करणे व रोज क्रॅासिंग स्लॅब टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५३,४०७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१५/-३० :**

हर्सुल येथे पुलाच्या जवळील रोडलगत १००, १५०, २०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्यासाठी परिसर अभियांत्रिकी सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले होते. सदर अंदाजपत्रक र. रु. ६,१७,२८५/- ला स्थायी समिती ठराव क्र. २१२/१० दि. १५.९.९८ अन्वये मंजुरी मिळाली होती. त्यानुसार दैनिक वर्तमान पत्रात बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ११ निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला प्राप्त झाल्या तपशील खालीलप्रमाणे.

१) श्री. मोहम्मद जावे १२.१० % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी
२) श्री. अजितसिंग शिलेदार ८.२५ % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी
३) श्री. मन्नानखॉन ८ % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे सर्वात कमी दराची निविदा श्री. मोहम्मद जावेद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१०% कमी दराने आहे. तरी सर्वात कमी दराने श्री. मोहम्मद जावेत यांची निविदा स्विकृती बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविले्ल्याप्रमाणे हर्सुल येथे पुलाच्या जवळील रोड लगत १००, १५०, २०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १२.१०% कमी दराची श्री. मोहम्मद जावेद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१६/३१ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. जाधवमंडी येथील मंजुर विकास योजने मध्ये आरक्षण क्र. ४८ भाजी मार्केट करिता आरक्षित आहे. मुळ जमिन मालकाने खरेदी सुचना दिल्याने त्याचे मालकी हक्कातील क्षेत्र रितसर भुसंपादनाद्वारे मनपाने संपादीत करण्यासाठी कार्यवाही केली आहे. त्या जागेत पुर्वीपासुन असलेले भाडेकरु श्री. गोपीनाथ शंकरराव सुर्यवंशी ह्यांनी सदर जागा मनपा मार्फत आरक्षणाखालील जमिन पुर्णपणे संपादीत करुन आरक्षणाचा विकास करेपर्यंत सध्या त्यांच्याकडे मुळ मालकाकडुन भाडेपट्टयावर असलेली जागा मनपाने भाडेपट्टयवर द्यावी म्हणुन विनंती केली आहे.

संबंधितानी केलेली विनंती विचारात घेता जो पर्यंत मनपा सदर जागा विकसीत करण्याचे ठरावित नाही. तोपर्यंत इमारत न पाडता तेथील रहिवाशी /भाडेकरु यास निवासी वापर करिता खालील अटी व शर्ती पात्र राहुन परवानगी देण्यास जागा भाडेपट्टयावर देण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

१) मनपाने अदा केलेली मोबदला रक्कम बिनव्याजी अनामत म्हणुन जमा करुन द्यावी.
२) इमारतीवर भाडेकरु हक्क सांगणार नाही असे (अंडरटेकींग) द्यावे.

३) मनपा जागा विकसीत करण्याचे ठरवले तेव्हा २४ तासात जागा खाली करुन घेणे बाबत (अंडरटेकिंग) द्यावे.
४) ॲपरोच रोड व इमारत वापरासाठी मनपाच्या नियमानुसार (ॲकोपेअन्सी चार्ज) (भाडे ) द्यावे लागेल.

प्रस्ताव मान्यतेनंतर वरील अटी व शर्तीास पात्र राहुन पुर्तता करण्यांत येऊन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

करिता वर नमुद अटी व शर्ती जागा भाडेपट्टयाने देण्यांचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** कनिष्ठ अभियंता यांची यामध्ये भागीदारी असते दोन जागेवर आरक्षण कसे घेतल्या गेलेले आहे. खुलासा करावा.

**सह. संचालक नगररचना :** संबंधितांना पर्चेस नोटीस दिलेली असुन सदर जागा ही रिझ ावेशनमध्ये आहे. २०० स्क्वेअर मी. व०र ताबा घेतलेला आहे. संपुर्ण डेव्हलपमेंट झाल्यनंतर उर्वरीत जागा घेण्यात येईल.

**मा. सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जाधवमंडी येथील न. भू. क्र. ७९१४ पैकी जमीन औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. ४८ भाजीमार्केट करीता आरक्षीत करुन संपादीत करण्याची कार्यवाही झाल्याने या जागेत पुर्वीपासुन असलेले भाडेकरु श्री. गोपीनाथ शंकरराव सुर्यवंशी यांनी सदरील जागा महापालिकेतर्फे पुर्णपणे संपादित करुन आरक्षणाचा विकास करेपर्यंत सध्या त्यांच्याकडे मुळ मालकाकडुन भाडेपट्टयावर असलेली जागा भाडेपट्टयावर मागितल्यावरुन त्यांच्या वापरातील जागा इमारतन पाडता तेथील रहिवाशी /भाडेकरु श्री. गोपीनाथ शंकरराव सुर्यवंशी यांना खालील अटी व शर्तीनुसार भाडेपट्टयाने देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

१) मनपाने अदा केलेली मोबदला रक्कम बिनव्याजी अनामत म्हणुन जमा करुन द्यावी.
२) इमारतीवर भाडेकरु हक्क सांगणार नाही असे (अंडर टेकींग) द्यावे.
३) मनपा जागा विकसीत करण्याचे ठरवेल तेव्हा २४ तासात जागा खाली करुन देणे बाबत (अंडरटेकींग) द्यावे.
४) ॲप्रोच रोड व इमारत वापरासाठी मनपाच्या नियमानुसार (ॲकोपेन्सी चार्जेस) भाडे द्यावे लागेल.

वरील नमुद अटी व शर्तीवर जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१७/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल पंचवटी चौक ते कोकणवाडी चौक या रस्ता दुभाजकावर एम.एस. रेलींग (ग्रिल) बसविणे बाबतच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या जिल्हा दरसुचीन दराने अंदाजपत्रक र. रु. ५,४१,९००.०० चे तयार करण्यात आले असुन सदरील काम शासकीय अनुदार सन १९९७-९८ च्या आर्थिक तरतुदी मधुन प्रस्तावित आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. विकास जैन :** माझे असे मत आहे. शासकीय अनुदानातुन जी विकास कामे केली जातात ती मार्च ३१ अखेर करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** जे विकास कामाबाबतचे प्रस्ताव आहेत त्यांना स्विकृतीसह मंजुरी देण्यात येत आहे. जो ठराव मंजुर झालेले आहेत. त्यांना देखील याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल पंचवटी चौक ते कोकणवाडी चौक या रस्ता दुभाजकावर एम.एस. रेलींग (ग्रिल) बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,४१,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन " या राष्टगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

नगरसचिव
महनगरपालिका, औरंगाबाद.

मा. सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ९/०२/९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक ९/२/९९ रोजी मा. सभापती श्री. जयवंत (बंडु) ओक यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरवात दुपारी ४.०० ऐवजी ४.४५ वाजता "वंदेमातरम्" या गिताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. म. अ. रऊफ म. अ. माबुद | स. सभासद |
| २) | स. स. श्री. संजय रामदास जोशी | --//-- |
| ३) | स. स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ४) | स. स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ५) | स. स. श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| ६) | स. स. सौ. यशोदा धनंजय वाडेरक | --//-- |
| ७) | स. स. श्री. विकास रतनलाल जैन | --//-- |
| ८) | स. स. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ९) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर | --//-- |
| १०) | स. स. श्री. राजकुमार बचाटे | --//-- |
| ११) | स. स. श्री. विश्वारोद्दीन पिता खुदबोद्दीन | --//-- |
| १२) | स. स. श्री. स. अ. एकबालोद्दीन स. मो. कुतूबुद्दीन | --//-- |

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** शहरातील शक्तीनगर भुखंड क्र. २०६७१/३३ मध्ये एका बीपीएल मोबाईल फोनच्या डिलरने उभे केलेले टावर्स हे अनाधिकृतरित्या उभे केलेले असुन महापालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्याच प्रमाणे टॉवर्स उभारणीसाठी लागणाऱ्य यंत्र सामुग्रीचा जकात कर भरलेला नसुन सध्या विना परवानगीने बीपीएल मोबाईलस चालु आहेत. जनतेकडुन संबंधित डिलरलने लाखो रुपये कमावलले असुन याकडे महापालिकेने परवानवगी दिलेली आहे का ? या बद्दल खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**सहा. संचालक नगररचना :** बीपीएल फोनच्या डिलर यांनी नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले नसुन या संबंधात कार्यवाही करण्यात आली असुन त्यांनी कागदपत्रे दाखल केले. कागदपत्रे कमी होते. पुर्तता करण्यास कळविलेले आहे. त्यासाठी त्यांना थोडासा अवधी देण्यात आलेला आहे.

**मा. सभापती :** ज्या वेळेस टॉवरर्स उभारणीचे काम चालु होते. त्यावेळेस अधिकारी यांनी कार्यवाही करावयास पाहिजे होती. त्यावेळी संबंधित यांचे लक्ष नव्हते काय?

**श्री. संजय जोशी :** एखाद्या गरीब व्यक्तीने अनाधिकृतरित्या घर बांधल्यानंतर त्याचे तात्काळ अतिक्रमण हटविण्यात येऊन नुकसन केल्या जाते. सदर डिलरने अनाधिकृतरित्या टॉवर्स उभारुन य शहरात येऊन लाखो रुपयांची कमाई

करुन जनतेची फसवणुक केलेली आहे. महापालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाहीत. संबंधितांना आज सहा वाजेपर्यत (६.००) सुचना देऊन ती सिस्टीम महापालिका प्रशासन बंद करू शकते असे निर्णय घेण्याचे अधिकार प्रशासनास आहेत. तशा प्रकारची कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**श्री. गौतम लांडगे :** एटीएनटी ने जशी परवानगी घेतलेली आहे त्याप्रमाणे बीपील मोबाईल फोनच्या डिलरने कामगदपत्राची पुर्तता महापालिकेला केलेली नाही. आवश्यक ती कागदपत्राची पुर्तता न केल्यामुळे त्यांना त्याबाबतीत कळविण्यात आलेले आहे. या संदर्भात पत्रव्यवहार होतात परंतु इतर कार्यवाही होत नाही. अनधिकृत टावर का तोडले नाही शहरातील गरीब नागरीकांच्या टपऱ्या थोड्याफार प्रमाणात रस्त्याच्या कडेला असल्या की महापालिकेचे संबंधित अधिकारी यांच्या आदेशानुसार इतर कार्मचारी टपऱ्या उचलुन घेऊन येतात. सदर डीलर्सचे ३-३ लाखांचे टॉवरर्स अनाधिकृतरित्य उभे होतात याकडे संबंधित अधिकाऱ्याचे लक्ष नाही काय? संबंधित डिलरवर आजच्या आज तात्काळ कार्यवाही करण्यात यावी त्यांना सवलत दयावयाची गरज नाही. संबंधित डिलरने परवानगी घेतलेली नसेल तर व्यवसाय बंद करण्यात यावा.

**श्री. विकास जैन :** या संदर्भात उपआयुक्तांनी बैठक बोलावली होती.

**मा. सभापती :** याबाबत संबंधित डिलरला सवलत दिलेली होती काय ? खुलासा करावा.

**सहा. संचालक नगररचना :** या संदर्भात उपुआयुक्त (म.) यांचेकडे बैठक घेण्यात आली होती. नंतर बैठकीत मी उपस्थित नव्हतो.

**मा. सभापती :** अतिक्रमण केले असेल तर कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** बीपीएल मोबाईल डिलरला प्रशासनाच्या माध्यमातून पत्र देण्यात आल त्याची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. (सभागृहात सदर प्रत दाखवतात) हे जास्तीचे बांधकामा बाबत आहे.

**श्री. गौतम लांडगे :** शहरातील एखाद्या व्यक्तीने अनाधिकृत बांधकाम केलेले असल्यास प्रशासनाच्या माध्यमातुन पाडण्यात येते. संबंधित डिलरवर त्वरीत कार्यवाही करुन परवानगी घेतल्यानंतरच बांधकामाला सुरुवात करावी.

**श्री. संजय जोशी :** प्रशासकीय अधिकारी यांनी सदर ठिकाणी जावे संबंधित डिलरची स्टिीम बंद करावी मॉनीटर उचलुन आणावे त्या डिलरला नियमाने परवानगी घ्यावयास आदेश दयावेत नंतर टॉवर्स उभे करावे. यामुळे शहरातील नागरीकांवर याचा आर्थिक बोजा पडतो. संबंधिताचे कागदपत्र जमा करुन जप्त करण्यात यावी परवानगी घेतल्यानंतरच टॉवरर्स उभे करावे.

**मा. सभापती :** महापालिका प्रशासनाने केलेल्या पत्रव्यवहारानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**सहा. संचालक नगररचना :** या संदर्भात बीपीएल मोबाईल फोनच्या डीलरला सुनावणीसाठी बोलावण्यात आले होते. परंतु काही कागदपत्राची पुर्तता होत नसल्यामुळे त्यांना वेळ दिलेली होती.

**श्री. विकास जैन :** या संदर्भात कालच बैठक झालेली आहे. त्यात काय निर्णय घेण्यात आलेले आहे.

**श्री. संजय जोशी :** दिनांक ४.९.९८ ला म्हणजेच ९ व्या महिन्यात महापालिकेने संबंधित डिलरशी पत्रव्यवहार केलेला आहे. जर संबंधित डिलरकडे कागदपत्राची पुर्तता होत नव्हती तर ४-५ महिन्याचा कालावधी निघुन गेलेला असुन या

कालावधीमध्ये का कागदपत्राची पुर्तता केलेली नाही. त्यांना असे वाटते की, महापालिका आमचे काहीही करु शकत नाही. सदर सिस्टीम बंद करावी व नियमाप्रमाणे प्रशासनाच्या माध्यमातुन तात्काळ कार्यवाही करावी.

**सहा. संचालक नगररचना :** महापालिकेचे संबंधित डिलरने नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. परंतु जे टॉवरचे बांधकाम केलेले आहे. अनाधिकृत या ३ टॉवरसाठी रुपये २५,०००/- भरुन घेतला आहे. नाहरकत प्रमाणपत्र दिलेले नाही.

**श्री. गौतम लांडगे :** संबंधित डिलरेने शहरात एकुण ४ टॉवरर्स् उभारलेले असुन प्रत्येकांचे दंड वसुल केलेला आहे काय?

**मा. सभापती :** संबंधित डिलरला नोटीस दिलेली आहतेच एकादयाने घर बांधले तर तोडतो. मग हे उद्योगपती आहे. कडक कार्यवाही करावी. प्रथम सर्व कागदपत्रे बघुन घ्यावे.

**श्री. संजय जोशी :** संबंधित डिलर यांनी नियमाप्रमाणे बांधकाम केलेले नाही. ९ व्या महिण्यात प्रशासनाने पत्र व्यवहार केलेला असुन प्रशासनाने अद्यप पर्यत काहीही कार्यवाही केलेली नाही. या शहरात स. नगरसेवक हे १० हजार लोकांचे नेतृत्व करतात. अवैध रित्या होत असणाऱ्या गोष्टीचे सभागृह कदापीही सहन करुन घेणार नाही.

**मा. सभापती :** स. सभासदांनी सभागृहात मांडलेली सुचनेशी मी सहमत आहे.

**श्री. संजय जोशी :** याबाबत संबंधित डिलरला टाईम लिमीट दयावे दोन दिवसात त्यांनी कार्यवाही केली नाही तर मॉनीटर व इतर यंत्रसामुग्री जप्त करुन घेऊन यावे. त्यानंतर निर्णय घेण्यात यावा.

**मा. सभापती :** सहाय्यक संचालक नगररचना व विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** बीपीएल मोबाईल फोनचे डिलर यांनी दिलेले कागदपत्र सहाय्य संचालक नगररचना यांचेकडे आहे हे कागदपत्र अनुकूल (फेव्हरेबल) असतील तर २४ तासाच्या आत कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. संजय जोशी :** उपआयुक्त यांनी कागदपत्राची सविस्तर पाहणी करुन संबंधित नियमाने कार्यवाही तात्काळ करणार काय ?

**श्री. गौतम लांडगे :** संबंधित डिलरकडुन कागदपत्राची पूर्ण पुर्तता होत नाही. नियमानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी बीपीएल मोबाईल फोनचे डिलर यांना अनाधिकृतपणे केलेल्या कामाबाबत तात्काळ सुचना देऊन २४ तासाच्या आत कार्यवाही करुन, काय कार्यवाही केली या बाबत सभागृहात माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** उदया ऑडीट बाबत बैठक बोलावलेली असुन उदयाच या बाबत काय कार्यवाही केली सभागृहाला माहिती दयावी.

**श्री. गौतम लांडगे :** महानगरपालिका प्रशासनाने पोलीस विभागाकडुन शहरातील अतिक्रमणे व वसुलीसाठी पोलीस फोर्स मागविलेला असुन पोलीस कर्मचाऱ्यांनी आतापर्यत आवश्यकतेनुसार काम केलेले दिसुन येत नाही. त्यांची सेवा परत पोलीस विभागाकडे देण्यात यावी. महापालिकेने पोलीस कर्मचारी यांना आतापर्यंत ५ लाखाच्यावर रक्कम मोजलेली आहे. पोलीस कर्मचारी महापालिकेत काय काम करतात त्यांच्याकडुन आवश्यक त्या वेळेला काय सेवा करुन घेतली जाते या बाबतची माहिती सभागृहाला दयावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** पोलीसांनी गरीबांच्या टपऱ्या तोडण्यासाठी मदत केली आहे.

**मा. सभापती :** स. सभासदांनी अशा चुकीच्या भावना सभागृहात व्यक्त करु नये गरीबांच्या टपऱ्या तोडलेल्य नाहीत नियमाने जी कार्यवाही करता येत होती ती करुन टपऱ्या काढण्यात आलेल्या आहे. प्रशासकीय अधिकारी यांनी पोलीसांच्या कामाबाबतची माहिती दयावी.

**प्रशासकीय अधिकारी :** महापालिकेच्या ज्या ज्या विभागामध्य पोलीस कर्मचारी चे काम पडते त्या त्या ठिकाणी पोलीस कर्मचांऱ्याच्या सेवेला उपयोग करुन घेतला जात आहे. सध्या अतिक्रमणे व वसुली मोहिमसाठी पोलीस कर्मचाऱ्यांकडुन मदत घेऊन सेवा करुन घेतली जात आहे.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** शहरातील मोठमोठया लोकांनी बांधलेली अनाधिकृत बिल्डींग पाडल्या जात नाही. गरीबांच्याच पाडल्य जातात. अशा वेळी पोलीसाची मदत घेतली जात नाही काय?

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी पोलीसांच्या मदतीने शहरातील अनाधिकृत इमारत बांधकामे ज्या ज्या नागरीकांनी केलेली आहे. अशांवर नियमाने कडक कार्यवाही करण्यात यावी. कुणाचाही दुजाभाव करु नये.

**श्री. संजय जोशी :** प्रशासकीय अधिकारी यांनी आम्ही पोलीसांचा वापर करुन घेतो असे राजकीय पध्दतीने खुलासा केलेला आहे. असे यातुन काय निष्पन्न होते ते पाहावे आतापर्यत पोलीस कर्मचारी यांच्या वेतनाचा विचार केल्यास ५ लाख रुपये खर्च झालेला आहे. अतिक्रमणे हटविली जातात तसेच वसुली मोहिम राबविली जाते हे काम नेहमीच महापालिका प्रशासनाला पडत नाही. त्यातुळे पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने महापालिकेला काहीही फायदा तर नाहीच उलट त्यांच्या पगाराची महापालिकेला पोलीस विभागाकडे मोजावी लागणारी रक्कम ही महापालिकेला भुर्दंड आहे. पोलीस फोर्स असता तर कर्मचाऱ्यांनी मार खाल्ला नसता त्याची सेवा पोलीस विभागाकडे परत करावी यामुळे महापालिकेच्या तिजोरीत भर पडेल.

**श्री. गौतम लांडगे :** महापालिका प्रशासनास शहरातील अनाधिकृत टपऱ्या अतिक्रमाणे काढणे अनाधिकृत बांधकामे इ. साठी पोलीसाची मदत म्हणुन सेवा करुन घेतली जाईल परंतु पोलीस तैनात केल्यापासुन महापालिकेने कितीदा पोलीसाच्या मदतीने अशा मोहिम राबविलेली आहे. माझ्या मते एकदाच अशा प्रकारची मोहिम राबविण्यत आलेली आहे. त्यासाठी पोलीसांची मदत घेतलेली आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** रोजच्या रोज आवश्यकता पडेल त्या दिवशी ज्या त्या विभागाच्या कामासाठी पोलीसांची मदत घेण्यात येते.

**मा. सभापती :** महापालिकेच्या मागणीनुसार पोलीस फोर्स घेतलेला असुन पोलीस कर्मचाऱ्याकडुन कोणकोणत्या कामासाठी मदत घेतली जाते. आज पर्यंत कोणकोणत्या कामासाठी मदत घेतलेली आहे. तसेच त्यांच्या वेतनावर ५ लाख खर्च आलेला आहे. भविष्यात त्याची आवश्यकता आहे काय ? पोलीस कर्मचारी महापालिकेला परवडणारे आहेत काय ? याबाबतचा सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी अहवाल सादर करावा.

**श्री. संजय जोशी :** संबंधित अधिकारी यांनी पुढच्या बैठकीत सविस्तर अहवाल दयावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांना विचारणा करतो की, आतापर्यत किती खर्च पोलीस कर्मचारी यांच्या वेतनावर झालेला आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** आतापर्यंत ८ लाख रुपये खर्च झालेला असुन पोलीस विभागाकडुन पुन्हा पुढील तीन महिन्याच्या वेतन अदा करण्या संदर्भात कळविलेले आहे. महापालिकातील पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन म्हणुन रक्कम पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन म्हणुन रक्कम पोलीस विभागाकडे त्यांच्या फंडात जमा करुन त्या विभागामार्फत अदा केली जाते.

**मा. सभापती :** महापालिकेकडे पोलीस फोर्स नव्हता त्यापैकी ज्या कर्मचाऱ्याच्या मदतीने तशा प्रकारची सेवा करुन घेतली जात असे त्यांना वेतन दिल्या जात होते काय ? त्याची व आताची पध्दतीत काय फायदा तोटा आहे याची माहिति पुढील सभेत देण्यात यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** पोलीस कर्मचाऱ्यांचे उपआयुक्त (म.) यांच्या विभागाअंतर्गत असलेल्या इतर विभागामध्ये मोठया प्रमाणात मदत घेऊन कामे केलेली आहे.

**श्री. विश्वारोद्दीन :** मागील बैठकीत टपरी बाबत सविस्तर अहवाल मागविलेला होता. त्यानंतर तीन बैठकी होऊन गेलेल्या आहेत. टपरी धारकांकडुन भाडेपट्टी वसुली झालेली नाही काय ? शहरातील किती टपरीधारकांकडे भाडे पट्टी थकीत असुन या संदर्भात माहिती अद्याप पर्यत सभागृहात दिलेली नाही. शहरात किती टपऱ्या अधिकृत किती अनाधिकृत याची खुलासा करावा. झ ोन वाईज माहिती दयावी.

**मालमत्ता अधिकारी :** जे टपरीधारक नियमीत भाडे देतात त्या लोकांकडुन वसुली पुर्ण केलेली असुन ज्यांच्याकडे भाडे थकीत आहे. त्यांच्यावर नियमाने कार्यवाही करण्याचे काम चालु आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी अतिक्रमणातील टपऱ्या किती, ज्या त्या प्रमाणात टपऱ्या किती भाडे किती वसुली झालेली आहे किती लोकांकडे थकीत भाडे राहिलेले आहे. याबाबत झोनवाईज माहिती देण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** पुढील बैठकीत या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** यासी मी सहमत आहे. पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** शहरातील किती टपऱ्या अनाधिकृत आहे. किती टपरी धारकांना महापालिकेची परवानगी आहे. किती लोकांनी स्वत: च्या नावावरील टपऱ्या इतरांना विकलेलय ओहत. ज्या ज्या लोकांनी अनेक वर्षापासुन ॲडव्हान्स रक्कम टपरीसाठी दिलेली आहे. त्याना टपरी देणार काय? ज्यांनी दुसऱ्यांना टपऱ्या विकलेल्या आहेत त्याची नावासहित सविस्तर माहिती पुढील बैठकीत दयावी तसेच ज्यांनी पैसे भरणा केले नाही तर काय कार्यवाही करता येईल. तसेच गरीबांच्या टपऱ्या काढतांना विचार करावा. सामान जप्त करु नये. तशा व्यक्तींशी चर्चा करुन पुढील कार्यवाही करता येईल. कुणावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**श्री. संजय जोशी :** गुरु गोविंदपुरा भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाचे उद्घाटन करुन तो पुतळा करण्यासाठी ७ ते ८ लाख रुपये मनपा ने खर्च केलेले असु चौक नसतांना त्या ठिकाणी शुशोभीकरण केले परंतु दुदैव असे की, त्याठिकाणी साधा दोन फुटाचा बोर्ड लावण्यात आलेला नाही.

**श्री. म. अ. रऊफ :** महापालिकेच्या नावाने की, इतर कुणाच्या नावाने बोर्ड लावावयाचा आहे खुलासा करावा.

**श्री. संजय जोशी :** सदरची पुतळा असलेली जागा ही कुणाची संबंधित अधिकारी यांना माहिती नाही काय? लोकांच्या जागेवर पुतळा उभारण्यात आलेला आहे काय ?

**मा. सभापती :** सदरची जागा कुणाच्या दुसऱ्यांच्या मालकीची आहे काय ? माहिती दयावी.

**श्री. गौतम लांडगे :** डॉ. आंबेडकर यांच्या पुतळया जवळील जागा सुशोभित केलेली असुन त्या ठिकाणी महानगरपालिकेलचा नावाने बोर्ड लावण्यास काय हरकत आहे.

**श्री. म. अ. रऊफ :** कुणाच्या दबावाखाली त्या ठिकाणी बोर्ड लावण्यात आलेला नाही काय ?

**मा. सभापती :** मा. प्रशासनाने संबंधित अधिकारी यांना सदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळ एक बोर्ड लावण्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करावी. महापालिकेच्या नावाने बोर्ड लावण्यात यावा.

**श्री. म. अ. रऊफ :** मागील चार -पाच बैठकीतुन सतत सभागृहात चर्चा होत असुन एका ठेकेदाराचे बील अदा करण्यात आलेले नाही. त्या संदर्भात कार्यवाहीचे आदेश देण्यात आलेले होते काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** मागील बैठकीत ठेकेदाराचे बील अदा करण्या संदर्भात चर्चा होऊन कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दिलेले होते. त्यानुसार शाखा अभियंता श्री. एम.ए. खॉन यांना कारणे दाखवा नोटीस दिली असुन त्यानुसार त्यांनी लेखी खुलासा दिलेला आहे. त्याची तपासणी करण्याचे काम चालु आहे. २-३ दिवसांत पूर्ण होईल.

**श्री. संजय जोशी :** स. सदस्य श्री. रऊफ यांनी संबंधित ठेकेदाराचे बिल मिळण्या बाबातच्या संदर्भाने सभागृहात २-३ वेळसे चर्चा केलेली आहे. कार्यवाही चालु आहे कार्यवाही केली जाईल अशी उत्तरे सभागृहात अधिकारी यांच्यकडुन मिळतात शाखा अभियंता यांचे निलंबन करावे. निर्दोष असेल तर पुरावा दयावा.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** सर्व अधिकारी एकमेकांना मिळालेले असतात. सभागृहाची दिशाभुल करुन चुकीची माहिती देतात. पुन्हा ज्या त्या कागदपत्राची पुर्तता केल्याचे दाखवतात.

**श्री. गौतम लांडगे :** संबंधित शाखा अभियंता यांनी केलेल्या खुलासा सभागृहात वाचून दाखवतात.

**कार्यकारी अभियंता (पा.पू) :** येत्या १२ तारखेला मा. आयुक्त यांच्या दालनात बैठक होणार असुन या संदर्भात योग्य ती काय कार्यवाही करावयाची याबाबतचा निर्णय होईल,

**श्री. संजय जोशी :** बैठकीच्या नावाखाली संबंधित अभियंता यांच्यावर काहीही कार्यवाही होणार नाही एका कर्मचाऱ्याला एक वागणुक व दुसऱ्यांना एक वागणुक देणे हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**मा. सभापती :** स. सदस्य सभागृहात ज्या भावना व्यक्त करत आहे. त्यासी मी सहमत असुन कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या नोटीसनुसार शाखा अभियंता यांनी प्रशासनाचे संबंधित अधिकारी यांच्याकडे लेखी सविस्तर खुलासा दिलेला

असुन आणखी कागदपत्राची तपासणी होऊन त्यात कुणीही दोषी आढळुन आल्यास त्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** खुद अधिकारी सांगतात एम.बी. रेकॉर्ड गहाळ झालेले आह. यावर आणखी काय खुलासा संबंधित अधिकारी सभागृहाला देणार आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** मुळ संचिका पाहणी करुन, त्यातील कागदपत्राची तपासणी करुन सभागृहात माहिती दिल्या जाईल.

**श्री. संजय जोशी :** अधिकारी यांना प्रशासन पाठींशी घालातात व सभागृह त्यांना पांघरुन घालते असा याचा अर्थ होतो.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी पुढच्या बैठकीत सविस्तर माहिती दयावी स. सदस्यांनी दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** सिध्दार्थ उद्यानातील श्री. रिजवान नावाचे कर्मचारी यांना चार महिन्यापासुन वेतन देण्यात येत नाही आजपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र. ):** स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे संबंधित कर्मचारी श्री. रिजवान यांनी काम केलेले आहे किंवा काय ? याबाबतचा माहिती संबंधित अधिकारी ंयनी दिलेली असुन त्यात असे नमुद केलेले आहे की, सदर कर्मचारी यांनी या कालावधीमध्ये सेवा केलेली नाही. तशी सभागृहाची इच्छा असेल तर वेतन देण्यात यावे. तसा निणर्य घेण्यात यावा. आलेल्या अहवालाचाी सविस्तर माहिती सभागृहात ठेवणार आहे.

**श्री. म. अ. रऊफ :** संबंधित अधिकारी हे सभागृहाची दिशाभुल करीत आहे. संबंधित कर्मचारी श्री. रिजवान ज्यांच्या अधिपत्तयाखाली काम करतात त्याची अद्याक्षरी झ्रालेली आहे.

**श्री. गौतम लांडगे :** श्री. रिजवान यांनी काम केलेले नाही तर कांऊटर सही ज्या कर्मचाऱ्यांयनी केलेली आहे ती कशी करण्यात आले त्यांच्यावर कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** ४ महिन्याचे संबंधित कर्मचारी यांना वेतन दिले जात नाही . ४-४ महिने पासुन रिपोर्ट येण्यास लागतात. काऊंटर सही ज्यांनी केलेली आहे. ती डुप्लीकेट आहे काय ? असल्यास संबंधित काऊंटर सही करण्याऱ्यावर पोलीस केस दाखल करावी.

**उपआयुक्त (प्र.) :** ज्यांनी काऊंटर सही केलेली आहे. त्या संदर्भात सविस्तर माहिती मागविण्यात येणार आहे.

**श्री. म. अ. रऊफ :** आतापर्यंत ७ बैठका झालेला असुन संबंधित अधिकारी यांनी माहिती दिली नाही. ८ वी ९ वी सभा आहे. आपल्या रुलींगला महत्वच नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** संबंधित कर्मचारी कर्मचारी यांच्या वेतनाबाबतची माहिती २ दिवसांत देण्यात येईल.

**श्री. म. अ. रऊफ :** संबंधित कर्मचारी यांचे दोन दिवसांत वेतन दयावे.

**मा. सभापती :** सिध्दार्थ उद्यानातील कर्मचारी श्री. रिजवान यांना थकीत वेतना संदर्भात संबंधित अधिकारी यांनी प्रशासनास माहिती पुरविलेली आहे परंतु मुद्दामहुन कुणी अडथळा निर्माण करत असेल त्यात कुणीही दोषी असेल त्यांच्यावर नियमाने प्रशासनाने कार्यवाही करुन ज्यांनी काऊंटर सही केलेली आहेत. त्यांच्यावरही कडक कार्यवाही करावी. विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ५१८/१ :**

दिनांक ३०.१.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. संजय जोशी :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ३२ वर विषय क्र. ५०६/२१ स्थगित ठेवलेला होता. सदर प्रस्तावात वैद्यकीय कर्मचारी गृहनिमार्ण संस्थेच्या रेखांकनास १६.१.८७ ला मंजुरी देण्यात आलेली आहे. संबंधित ले-आऊट करतांना सदर जागेचे माहिती नसतांना ले-आऊट केलेले आहे काय ? अधिकारी सभागृहाची दिशाभूल करत आहे. ओपन स्पेसमध्ये ६१.१२ चौ. मी. इतकी जागा ले-आऊट मंजुर करताना दुसऱ्यांची जागा सामावुन घेतली गेली. ८७ साली ले-आऊट मंजुर करतांना कोणाची मालकीची जागा आहे ते न पाहताच मंजुर केला आहे का टेबलावर बसुन करता . आत १३ वर्षानंतर जमिन मालकाला जाग आली काय? ही जागा माझ्या वार्डातील धोबी घाटातील रिर्झवेशन मधील आहे. असा माझा अरोप आहे. मागील बैठकीत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता. त्यानुसार या जागेचा संदर्भात तपासणीसाठी डी.आय.एल.आर. कडे पाठवावे. अधिक तपासणिसाठी पाठवण्यात यावे तुर्त प्रस्तावावर काहिहि निर्ण्य घेऊ नये व यापुढे प्रस्तावा संदर्भात सर्व माहिती असल्यासच मंजुरीसाठी सभागृहाला प्रस्ताव संबंधित अधिकारी यांनी आणावे.

**सहा. संचालक नगररचना :** सदर जागा ही धोबी घाटामधील नसुन या जागेचे कार्यालयाकडुन रेखांकन करुन आलेले आहे.

**श्री. संजय जोशी :** खुल्या जागेमध्ये ६१.१२ चौ.मी. जागा कशाच्या अधारे दाखवलेली आहे. सदर जागा दुसऱ्याला दयावयाच्या हेतुने मंजुरीसाठी त्या संदर्भात प्रस्ताव सभागृहात आणले जातात. दुसऱ्यांच्या जागेवर ज्या अधिकारी यांनी ले-आऊट मंजुर केलेले आहे त्यांच्यावरच योग्य कार्यवाही करावयास पाहिजे. मा. प्रशासनाने संबंधित अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** विषय क्र. ५०६/२१ च्या संदर्भात १६.१.८७ ला रेखाकंनास मंजुरी देण्यात येऊन ले-आऊट करतांना कागदपत्राची पाहणी करुन करण्यात आलेली नाही. काय या संदर्भात नियमाने कार्यवाही केलेली असेल ठीक ओ. नसेल तर संबंधितावर कार्यवाही करण्यात यावी. व जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख खात्याकडे पाठवावा तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** पृष्ठ क्र. ८ वर विषय क्र. ४७१/३ स्थगित करण्यात आलेला होता त्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात यावी.

**मा. सभापती :** पृष्ठ क्र. ८ वरील विषय क्र. ४७१/३ स्थगित ठेवलेल्या प्रस्तावास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**श्री. विकास जैन :** पृष्ठ क्र. ३७ वर विषय क्र. ५०९/२४ मध्ये सभागृहात झालेल्या चर्चेत मागील दराने विद्युत साहित्य मागवावे. आशी दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. संजय जोशी :** भारत माता मंदीर येथे कंपाऊंडचे काम करुन तेथील विद्युत व्यवस्था करणेचया संदर्भात टेंडर काढण्यात यावे असे सांगण्यात आलेले होते. परंतु अदयापर्यत संबंधित एजन्सीजकडुन कोणत्याही प्रकारचे साहित्य मागविण्यात आले नाही.

**अति. शहर अभियंता :** त्या कामासाठी २ लाखाचे बजेट आहे. लवकरच विद्युत साहित्य मागवण्यात येणार आहे.

**शहर अभियंता :** सदर कामासाठी अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत आलेली आहे.

**श्री. संजय जोशी :** त्या कामातील कंपाऊंड वॉल साठी अदयापर्यंत निविदा मागविण्यात आलेल्या नाही. पुर्वीच्या रेट मध्ये काम करुन घेण्याची कार्यवाही व्हावी. तसेच विद्युत व्यवस्थेसाठी निविदा मागविण्यात यावी.

**शहर अभियंता :** या कामासाठी वाढीव ६ लाख रुपये लागणार असुन सदरचा खर्च हा कंपाऊंड वॉल करण्याचा वाढलेला आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी भारतमाता मंदीर येथील विद्युत व्यवस्थेबाबत तसेच कंपाऊंडवॉल साठीचे कामाच्या संदर्भात ताबडतोब कार्यवाही करावी. कुंपण भिंतेचे काम पूर्वीच्या मंजुर दराने करुन घेण्याव यावी.

**श्री. विकास जैन :** २६ जानेवारीला कम्युनिटी हॉलचे उद्‌घाटन होणार होते. आतापर्यंत झाले नाही. मागील बैठकीत विद्युत व्यवस्थेबाबत चर्चा होऊन कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आलेले होते संबंधित अधिकारी यांनी माझ्या वार्डातील वाचनालयात २६ जानेवारी पूर्वी विद्युत व्यवस्था करण्यात येईल असे आश्वासन दिलेले होते. परंतु काहीही कार्यवाही अदयाप झालेली नाही.

**उप अभियंता (वि.) :** एजन्सीला काम दिलेले आहे त्याच कामामध्ये सदरील काम करण्यासाठी वाढीव काम म्हणुन समावेश करु शकतो.

**श्री. विकास जैन :** या कामात बचत होते व बचतीतुन हे काम होते. दुसऱ्या एजन्सीकडुन करुन घ्यावे अंदाजपत्रकीय शिल्लक रक्कमेतुन करावे.

**मा. सभापती :** अंदाजपत्रकामध्ये रक्कम शिल्लक आहे. त्यातुन सदरचे काम करण्याची कार्यवाही संबंधित उपअभियंता यांनी लवकरात लवकर करावी.

**शहर अभियंता :** संबंधित एजन्सीज ते काम करण्यास तयार नाही. त्यामुळे वेळ लागलेला आहे.

**मा. सभापती :** एजन्सी ते काम करण्यास तयार नसेल तर अल्पमुदतीची निविदा सुचना काढुन सदरचे काम तात्काळ करण्यात यावे.

**श्री. संजय जोशी :** भारत माता मंदीर येथील पुतळयाचे कामा बाबतचे टेंडर निघालेले आहे. विद्युत व कुंपण भिंतीचे काम कसे लवकर होईल तशी कार्यवाही करण्यांत यावी. भारत माता मंदीर येथील कुंपन भिंत व विद्युतचे काम नियमाप्रमाणे करून घ्यावे. १०% च्या वर करावयाचा नाही व १०% च्या वर खर्च जात असेल तर आवश्यक ती मंजुरी घ्यावी.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. जैन यांच्या वार्डातील विद्युत व्यवस्थेसंदर्भात ३ दिवसांचे लघु निविदा काढुन संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी. तसेच स. सदस्य श्री. संजय जोशी यांच्या वार्डातील भारतमाता मंदीर येथे ही विद्युत व्यवस्थेचे काम तसेच कंपाऊंड वॉल करण्याच्या कामे तात्काळ नियमाप्रमाणे सुरु करावे. वाढीव काम १०% पेक्षा जास्त होऊ नये.

**श्री. राजकुमार बचाटे :** विष्णुनगर येथे पाण्याच्या पाईपलाईन होण्यासाठी १ लाख २७ हजार चे अंदाजपत्रक ठेवण्यात आलेले होते. आठ महिने झालेले आहेत. अदयापर्यंत सदर कामासाठी निधी उपलब्ध झालेला नाही. याबाबत खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती दयावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.) :** निधी उपलब्ध नाही मार्च मध्ये मंजुरी घेऊन एप्रिलमध्ये करण्यात येईल.

**मा. सभापती :** पाण्याच्या संदर्भात्‌ील प्रश्न असुन काय उपाययोजना करता येईल तशी कार्यवाही करण्यात यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** बजेट ॲब्लोकेनला मंजुरी दिली होती. वाढीव मंजुरी देता येणार नाही. बजेट अलोकेशन मध्ये कोणालाही वाढीव रक्कम दिली नाही.

**श्री. राजकुमार बचाटे :** आठ महिण्यापासुन काहीही कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. बचाटे (मामा) यांनी आठ महिण्यापासुन पत्र दिलेले होते. पाण्याच्या संदर्भात प्रश्न असतांनाही संबंधित अधिकारी यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही. प्रशासनाने या संबंधित आवश्यक ती कार्यवाही करावी

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** स. सदस्यांनी आठ महिन्यापासुन पत्र दिलेले असतांना कार्यवाही होत नाही.  संबंधित अधिकारी यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** प्रशासनाच्या माध्यमातुन कार्यवाही करण्यात यावी. तसेच औरंगपुरा, समर्थनगर, एम.पी.लॉ कॉलेज जवळ तसेच औरंगपुरा बस स्टॉप ज्या ज्या ठिकाणी पावसाळयामध्ये पाणी साचते अशा ठिकाणी पुढच्या बैठकीत संबंधित अधिकारी यांनी तशा प्रकारचे अंदाजपत्रकाचे प्रस्ताव आणावेत.

**श्री. विश्वारोद्दीन :** माझ्या वार्डातील दवाखान्याचे २६ तारखेला उद्‌घाटन होणार होते. ते झाले नाही केव्हा होणार विद्युत इतर कामाबाबतची संपुर्ण कार्यवाही करण्यात येईल असे सांगितलेले होते. झोन क्र. ६ मध्ये विचारपुस केली असता १४ तारखेला उद्‌घाटन होणार आहे. असे समजले. सदर दवाखान्यात बसविलेली फरशी ही चांगल्या प्रतीची नसुन व्यवस्थित बसवलेली नाही. टॉयलेट मध्ये जोड भाडे बसविण्यात आलेले आहे. सदर दवाखान्याचे उद्‌घाटन कधी होणार याबाबत माहिती मिळावयास पाहिजे. प्रत्येक वेळेस स. सदस्यांनी बैठकीत त्याबाबत चर्चा करणे बरोबर वाटत नाही.

**उप अभियंता (बां.):** सिल्कमिल कॉलनी येथील दवाखान्यातील विद्युत व्यवस्थेचे काम पुर्णतः होत आलेले आहे. त्याचप्रमाणे दवाखान्यास (पॉलिश) रंग देण्याचे काम एक ते दोन दिवसांत होऊ शकेल. दवाखान्याच्या अंतर्गत ओपनस्पेसमध्ये फरशी बसविण्याचे काम बाकी आहे. ते लवकरच पुर्ण करण्यात येईल.

**मा. सभापती :** सिल्कमिल कॉलनी येथील दवाखान्यामध्ये विकास सुविधा पुरविण्यासाठी ठरल्याप्रमाणे लागणाऱ्या साहित्याची पुर्तता करुन सदर दवाखान्यातील काम जसे लाईट, फर्निचर, इ. येत्या  ११ तारखेपर्यंत पुर्ण होईल त्याबाबत संबंधित अधिकारी यांनी तशी कार्यवाही करावी. येत्या १४ तारखेपर्यंत संबंधित ठेकेदाराकडुन काम करुन घेण्यात यावे नसत संबंधित ठेकेदाराचे बिल थांबवून ठेवावे. सदर काम पुर्ण न झाल्यास अधिकारी यांनाही जबाबदार धरण्यात येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** दवाखान्यास संरक्षित भिंतीचे काम करण्यात आलेले नाही.

**उप अभियंता :** संरक्षित भिंत बांधण्यासाठी बजेट नाही. या कामाची संचिका तयार करुन मा. आयुक्तांकडे मंजुरीसाठी.

**श्री. विश्वारोद्दीन :** दवाखान्याचे काम लवकरात लवकर व्हावयास पाहिजे. जवळ-जवळ दोन वर्षाचा कालावधी आतापयर्त निघुन गेलेला आहें. तरी काम पुर्ण झालेले नाही.

**मा. सभापती :** त्या ठिकाणी दवाखाना (वास्तु) करण्यासाठी हे काम होते. संरक्षित भिंतीचे ते कामाचे अंदाजपत्रक नव्हते. संरक्षित भिंतीसाठी सभागृहात चर्चा करुन त्याकामाबाबती निर्णय घेण्यात येईल.

**विश्वारोद्दीन :** बऱ्याच वेळा बैठकीत चर्चा होऊनही कार्यवाही पुर्णत: होत नाही.

**मा. सभापती :** येत्या १४ तारखेला सदर दवाखान्याचे उद्‌घाटन समारंभ अयोजित करण्यात येईल. रिवॉयीजड इस्टिमेंटनुसार सदर संरक्षित भिंतीचे काम करण्यात येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** दवाखाना चालु करण्यासंदर्भात उद्‌घाटन प्रसंगी कोण येणार याबाबत मला काहीही कल्पना देण्यात आलेली नाही. महापालिकेच्या माध्यमातुन लेखी पत्र वगैरे काहीही मिळालेले नाही.

**मा. सभापती :** दवाखान्याचे उद्‌घाटन प्रसंगी मा. ना. पालकमंत्री येणार असुन संबंधित अधिकारी यांनी स. सदस्य श्री. विश्वारोद्दीन यांना याबाबत माहिती द्यावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** पैठणरोड लगतचा तरुण भारत प्रेस कडे जाणाऱ्या रस्त्यावर नेहमी लाईट बंद असतात जे आहे ते अव्यवस्थीत आहे. जवळ-जवळ पोलवरील ९५ लाईट बंद आहेत. याबाबत संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती दयावी.

**उपअभियंता (१)(वि.) :** सदरच्या रस्त्यावर बऱ्याचदा लाईट लावण्यात आलेले असुन कुणी तरी तोडफोड करतात. विद्युत व्यवस्थेबाबत त्या रस्त्यावर नेहमी व्यवस्था करण्यात येते.

**श्री. विश्वारोद्दीन :** विद्युत व्यवस्थेबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही संबंधित अधिकारी यांना सुचना देऊनही होत नाही. लाईट लावण्यात आलेलेच नाहीत तोडफोड करण्याचा संबंध येतो कुठे.

**श्री. म. अ. रऊफ :** संबंधित अधिकारी यांनी सभागृहात लाईट दिवेची चोरी होते, तोडफोड होते. असे अरोप करणे योग्य आहे काय ?

**मा. सभापती :** उपअभियंता यांनी सदर रस्त्यावर लाईटची व्यवस्था करावी. स. सदस्यांनी सुचना केल्यानंतर कार्यवाही होत नसेल तर तसे स. सदस्य यांना कळविण्यात यावे. सभागृहाची दिशाभूल करु नये संबंधित अधिकारी यांचा गैर समज झालेला आहे असे कुणीही लाईटची तोडफोड करत नसुन लाईट चोरी होत नाही.

**श्री. राजकुमार बचाटे, श्री. संजय जोशी :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १७ वर संगणकीकरण विभागामध्ये संगणक या पदावर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांमधुन पात्र उमेदवाराचा विचार करण्यांत येईल असा आदेश केलेला आहे. परंतु ठरावात तसा मजकुर समावेश केलेला नाही. सदर पद महानगरपलिकेतच्या अनुभवी कर्मचाऱ्यांमधुन भरण्यात येऊन तस ठरावात उल्लेख करावा.

**मा. सभापती :** संगणकीकरण खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव मागील बैठकीत मंजुर केलेला असुन सदर विभागामध्ये संगणक पदावर तात्पुरत्या स्वरुपात महानगरपालिकेतील अनुभवी व्यक्तींची नेमणुक करण्यास येऊन तशी ठरावात दुरुस्ती करण्यात यावी. प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

तसेच इतिवृत्तातील पान २८ वर विषय क्र. ५०१/१६ स्थगित होता. त्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

१) इतिवृत्तातील पान क्र. ३२ विषय क्र. ५०६/२१ मध्ये रेखाकंनातील खुल्या जागेची भुमि अभिलेख खात्याकडुन मोजणी करुन होवुन हद्दी कायम करुन घेईपयात हा प्रस्ताव स्थगित ठेवण्याची दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२) इतिवृत्तातील पान क्र.३७ विषय क्र. ५०९/२४ अन्वये ५०० नग टयुब फ्किचर खरेदी करण्याच्या रु. ४,३९,०००/-चे अंदाजपत्रक मंजुरी दिलेली असुन हे साहित्य मागील वर्षाच्या दराने मंजुर एजन्सीकडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) इतिवृत्तातील पान क्र. ८ विषय क्र. ४७१/३ हा स्थगित ठेवण्यात आला होता. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कबाडीपुरा येथील हजरत शाह जमालबाबा दर्गाहच्या समोर महानगरपालिकेचे व्यापार संकुल बांधण्याकरिता मागविण्यात आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील कामे मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

४) इतिवृत्त पान क्र. २८ विषय क्र. ५०१/१६ हा स्थगित ठेवण्यात आलेल्या विषयास मंजुरी देण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. संजय नगर येथील जुनी गटार तोडुन ४५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटारीला जोडणेच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची म्हणजेच श्री. मे. न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकापेक्षा ३६.८९% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील व इतर दुरुस्त्यासह दिनांक ३०.१.९९ स्थायी समितीच्या इतिवृत्तास कायम करण्यास सर्वानुमते मंजुर देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१९/२ :**

शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर केला की, मो. शहाबाजार येथील मनपाच्या कत्तलखान्यात फरशी बसविणे व इतर दुरुस्ती करावयाची आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ९०,५५२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ३१.१२.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च अद्यावत कत्तलखाने या लेखाशिर्षा अंतर्गत ९७-९८ या आर्थिक वर्षात करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र. रु. ९०,५५२/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शहाबाजार येथील मनपाच्या कत्तखान्यात फरशी बसविणे व इतर दुरुस्ती करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. ९०,५५२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२०/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरुनगर हत्तेसिंगपुरा येथील २० खाटी रुग्णाल्यातील रहिलेले इमारतीचे उर्वरीत बांधकाम करणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन ९७-९८ चे दर सुचीनुसार र. रु. ३,१९,१००/- चे तयार करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता सदर कामाचा खर्च ९९-२००० या आर्थिक वषातुन करणे बाबत मान्यता प्राप्त आहे.

सदर काम हे इमारती शाळा दवाखाने या लेखाशिर्षातुन प्रस्तावित आहे. सबब वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविर्ल्याप्रमाणे हत्तेसिंगपुरा येथील २० खाटी रुग्णाल्यातील राहिलेले इमारतीचे उर्वरीत बांधकाम करणेकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. ३,१९,१००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२१/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वेदान्त नगर उद्यान विकसीत करणेसाठीचे मुळ अंदाजपत्रक र. रु. ७,६०,०००/- चे मंजुर करण्यांत आले होते व त्यासाठी रितसर निविदा मागवून वि. क्र. २५४/ दि. ३.१०.९७ अन्वये स्थायी समितीचे ठरावान्वये सदर काम हे श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेस मान्यता मिळालेली आहे.

उद्यान परीपुर्ण होणेसाठी र. रु. ३,२२,३६८/-चे वाढीव कामाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करिता वाढीव कामाचे अंदाजपत्रकाचे र. रु. ३,२२,३६८/- चे सह सुधारित अंदाजपत्रक र. रु. १०,८२,३६८/- मंजुरीस्तव तसेच वाढीव कामासाठी गुत्तेदाराकडुन त्यांचे मंजुर निविदेच्या दराने काम करुन घेण्यासाठी सुधारित करारनामा करुन घेण्यास मान्यतेचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर उद्यान विकसीत करण्यासाठीच्या कामासाठी मुळ अंदाजपत्रक रु. व्यतिरिक्त उद्यान परिपुर्ण होण्यासाठी रककम रुपये ३,२२,३६८/- च्या वाढीव अंदाजपत्रकास आणि वाढीव अंदाजपत्रकाचे काम मुळ कामाचे गुत्तेदार मे. बसरा कंन्स्ट्रक्शन मंजुरी निविदेच्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२२/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पुष्पनगरी स्मशानभुमी विकसीत करणे बाबतचे अंदाजपत्रक वि. क्र. ३१४/१ दि. १६.१०.९८ चे स्थायी समितीची मान्यतेन्वे कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र. मनपा/लेखा/नि/९८/१०१ दि. २२.१२.९८ अन्वये प्रसिध्द करुन बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता कोरे निविदा विक्री दि. ३१.१२.९८ पर्यंत २४ विकले गेले व दर भरुन स्विकृतीची अंतिम दि. १२.१.९९ पर्यंत ०४ निविदा प्राप्त झाल्या त्या उपस्थित गुत्तेदारा समक्ष दि. १८.१.९८ रोजी मुलेअ यांचे कार्यालयात उघडण्यांत आले. प्राप्त निविदेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एस. एस. काझी | ९% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| २) | सय्यद अथर अली | १०.०१% | --//-- |
| ३) | सुजात हाशमी | १२% | --//-- |
| ४) | एस. एम. मंडोरे | १५% | --//-- |

या अनुषंगाने प्राप्त निविदेत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. एम. एम. काझी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त दराचे दर प्राप्त असुन दिनांक २.२.९९ रोजी गुत्तेदारा ास मा. आयुक्तांचे दालनात चर्चेसाठी बोलावले असता झालेल्या वाटाघाटीमध्ये अंदाज दराने सदर काम श्री. एम. एम. काझी यांचे मार्फत करुन घेण्यास मा. आयुक्त व गुत्तेदार याचीं मान्यता प्राप्त आहे.

सबब एम. एम. काझी गुत्तेदार यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने सदर काम करुन घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुष्पनगरी स्मशानभुमी विकसीत करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. एम. एम. काझी यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२३/६ :**

कार्यकारी अभियंता पा. पु. व ज. नि. यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर बायजीपुरा सर्वे नं. ३२ मधील गल्ली क्र. १ मध्ये १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार र. रु. २,२९,६००/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा स. नं. ३२ गल्ली नं. १ मध्ये १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. २,२९,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२४/७**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बडा तकीया सिल्लेखाना येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ४,२४,३४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदा दरपत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पंधरा कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर भरुन प्राप्त झाले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जे. जग्गी कंन्स्ट्रक्शन | १९.००% | जास्त दर |
| २) | श्री. ए. सी. कोठारी | २१.००% | --//-- |
| ३) | मे. रे. कंन्स्ट्रक्शन | २५.००% | --//-- |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.००% जास्त आहेत. सदरील कामाचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार बनविण्यांत आले आहे. सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार घेतल्यास ठेकेदाराचे दर ५.४९% जास्त दराचे येतात. परंतु मा. आयुक्त यांनी सदर निविदेस अंदाजपत्रकीय दराने मान्यता दिली आहे.

तरी सन ९७-९८ च्या बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बडा तकीया सिल्लेखाना येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार श्री. डी.एस. जग्गी यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२५/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर करीत आहे की, नेहरुनगर अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ५.१२.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३६८/८ अन्वये अंदाजपत्रक र. रु. ८,८४,३००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयनी निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०१/९८ दि. २२.१२.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१५) पंधरा निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (०४)चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे. आदिनाथ कंन्स्ट्रकशन | ०८.१% | जास्त दराने |
| २) श्री. ए. सी. कोठारी | ०८.५% | --//-- |
| ३) मे. रे. कंन्स्ट्रक्शन | ०९% | --//-- |
| ४) मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन | २५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०८.१% जास्त दराने मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा आहे.

परंतु ठेकेदाराने निविदेत दर जास्त दिल्यामुळे त्यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता सदर ठेकेदाराने त्यांनी निविदेत दिलेल्या ०८.१% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडुन सदरील काम करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२६/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, किरणाचावडी पोलीस स्टेशन ते मोतीकांरजा चौरस्ता पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करुन गटार बांधणेच्या कामासाठी दि. ११.११.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३२६/७ अन्वये अंदाजपत्रक र. रु. ५,५९,६००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०१/९८ दिनांक १२.१२.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१५) पंधरा निविदा विक्री झाल्य त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण (०५) पाच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | ०८.१% | जास्त दराने |
| २) श्री. ए. सी. कोठारी | ०८.५% | --//-- |
| ३) मे. रे. कंन्स्ट्रक्शन | ०९% | --//-- |
| ४) मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन | २५% | --//-- |
| ५) मो. अहमद सिद्दीकी | २८% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०८.१% जास्त दराने मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा आहे. ठेकेदाराने निविदेत दर जास्त दिल्यामुळे त्यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलवले असता संबंधित ठेकेदाराने त्यांनी निविदेत दिलेल्या ०८.१% जास्त दराच्या ऐवजी वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दराने काम करणेसाठी संम्मती दिलेली आहे.

करीता अंदाजपत्रकीय दराने मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडुन सदर काम करुन धेणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराणचावडी पोलीस स्टेशन ते मोतीकारंजा चौरस्ता पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करुन गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वेधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२७/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गारखेडा लक्ष्मीनगर भागातील रस्त्यावर रिमेटलिंग करुन डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ९,७०,८४५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यत एकुण पंधरा (१५) कोरी निविदा विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेर्पत फक्त दोन (०२) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाल आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन | १९.५०% | जास्त दराने |
| २) मे. रे. कंन्स्ट्रक्शन | २०.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.५०% जास्त आहेत. मा. आयुक्त यांनी सदर निविदेस १९.५०% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने मान्यता दिलेली आहे.

तरी मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा लक्ष्मीनगर भागातील रस्त्यावर रिमेटलिंग करुन डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२८/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, शहागंज भाजी मंडई येथील रोडचे पुर्न डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ५.१२.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३८५/७ अन्वये र. रु. ३,४८,५००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०१/९८ दि. २२.१२.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१३) तेरा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मकतक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | अंदाजपत्रकीय दराने |
| २) मे. रे. कंन्स्ट्रक्शन कं. | २०% जास्त दराने |
| ३) मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन कं. | २५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंजदापत्रकीय दराने मे. मॉस्टकॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन प्रस्तावत मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज भाजी मंडी येथील रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२९/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, कैसर कॉलनी भागात पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक ५.१२.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३८४/६ अन्वये अंदाजपत्रक र. रु. ७,८०,४००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०१/९८ दि. २२.१२.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत

तारखेस एकुण (१५) पंधरा निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण (०३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुंन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | १८% जास्त दराने |
| २) | मे. जग्गी कंन्स्ट्रक्शन कं. | २५% जास्त दराने |
| ३) | मे. रे. कंन्स्ट्रक्शन कं. | २७% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १८% जास्त दराने मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शनप कं. यांची निविदा आहे.

तसेच सदरील कामाचाी निविदा सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन प्रस्तुत दर ९७-९८ च्या दराशी तुलना केल्यास अंदाजपत्रकीय दरावर १.७०% दर कमी येतात.

करिता मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा कमी दराची असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसरकॉलनी भागात पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता पाप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त (९७-९८ च्या दरसुचीनुसार १.७०% कमी दराची ) मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. ५३०/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यानी प्रस्ताव दिला की, हॉटेल अमरप्रित समोरील चौकात वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार ४,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाकरिता तरतुद उपलब्ध नसल्यामुळे सदर काम "भांडवली रस्ते" या शिर्षकातुन तरतुद वळती करुन करण्यात येईल.

सदरील काम काम लवकरात लवकर पुर्ण करणे जरुरी असल्याने सदरील काम मे. मेलट्रॉन कंपनीकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येईल. तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले र. रु. ४,४०,०००/- चे अंदाजपत्रक तसेच सदरील काम मे. मेलट्रॉन कंपनी यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रित समोरील चौकात वाहतुक संकेतांक बसविण्यच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाची तातडी लक्षात घेता हे काम मे. एम. एस. एस. आय. डी. सी. यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३१/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, औरंगाबाद शहरात दि. २६.११.९९ ते २८.११.९९ या कालावधीत आखिल भारतीय मुद्रांक परिषद होणार आहे. सदर परिषदेकरीता त्यांच्या अध्यक्षांनी वरील कालावधी करीता गरवारे स्टेडियमची मागणी केली आहे.

आखिल भारतीय मुद्रांक परिषद हा कार्यक्रम लोकापयोगी असल्याने नाममात्र शुल्क र. रु. १/- वसुल करुन तसेच स्टेडियम ची नासधुस किंवा स्टेडियम खराब झाले तर सदर परिषदेच्या अध्यक्षांनी पूर्ववत करून देण्याचे अटीवर मनपाचे गरवारे स्टेडियम सदर परिषदेकरिता वरील कालावधीत देण्याचे मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात होणाऱ्या "आखिल भारतीय मुद्रांक परिषदेकरीता" दि. २६.११.९९ ते २८.११.९९ या कालावधीसाठी लोकापयोगी कार्यक्रम असल्याने नाममात्र शुल्क रु. १/- वसुल करुन स्टेडियमची नासधुस किंवा स्टेडियम खराब झाल्यास सदर परिषदेच्या अध्याक्षांनी पूर्ववत करुन देण्याची अटीवर मनपाचे गरवारे क्रिडा संकुल परिषदेकरिता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३२/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, उस्मानपुरा, येथील गोपाल टी पॉईंट समोरील चौकांचे सुशोभिकरण करुन तेथे गुरुगोविंदसिंग यांचे स्मारक उभारणीस मा. स्थायी समिती ठराव क्र. ४२९/१४ दि. २४.११.९८ अन्वये मान्यता प्रदान झाली आहे.

त्यानुसार येथील चौकाचे सुशोभिकरण करुन त्यामध्ये गुरुगोविंदसिंग यांचे स्मारक उभारणी करीता सा. बां. खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र. रु. २,२६,८१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च स. सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री गजानन बारवाल व श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन यांनी त्यांचे स्वच्छा निधीतुन करण्याची मा. आयुक्त यांच्यासमक्ष संमती दर्शविली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले र. रु. २,२६,८१०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा येथील गोपाल टी पॉइंट समोरील चौकात गुरु गोविंदसिंग यांचे स्मारक उभारणीस्तव चौकाचे सुशोभिकरण करण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,२६,८१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम स. सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. गजानन बारवाल व श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन यांचे संमतीनुसार स्वच्छा निधीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सर्वसाधारण सभेने दि. २०.१२.९५ विषय क्र. १२२/१२ अन्वये मो. कैसरकॉलनी येथे २० खाटी दवाखाना बांधणेबाबत प्रस्ताव सर्वानुमते मान्यता दिलेली आहे. त्यानुसार र. रु. २५.०० लाखाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार

करण्यांत आलेले होते. त्यास मा. सर्वसाधारण सभेने दि. २८.७.९६ विषय क्र. १४ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

दरम्यान नकाशे /डिझाईन इत्यादी पुरवठा करणेस्तव वास्तुज्ञ /अभियंता यांचे पॅनल तयार करण्यात आले. त्यानंतर नकाशे मंजुर करण्यात आले असता उपलब्ध नकाशे नुसार त्या ठिकाणी प्रसूतीगृह व रुग्णालय बांधण्यास सा. बां. विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. २४,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले त्यास मा. साधारण सभेने विषय क्र. ४६/५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/नि/९८ दि. ३.९.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२१) विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (८) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३१.१०.९८ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघउण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शेख समद | ७% | जास्त दराने |
| २) | न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन | १५.०६% | जास्त दराने |
| ३) | नंदकुमार घोडेले | १२% | जास्त दराने |
| ४) | कुलवंतसिंग | ९% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ७% जास्त दराची निविदा श्री. शेख समद यांची प्राप्त झालेली होती. परंतु मा. आयुक्त महोदय यांच्या दालनात झालेल्या दराबाबत वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराऐवजी २% जास्त दराने मान्यतस्तव स्थायी समितीसमोर सादर करणेस्तव मा. महोदय यांनी दि. २९.१.९९ अन्वये शिफारस केलेली आहे.

त्यानुसार श्री. शेख समद यांची अं. प. दरापेक्षा ७% जास्त ऐवजी २% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कैसर कॉलनी येथे २० खाटी दवाखाना बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुासर सदरील काम श्री. शेख समद यांचे कडुन अं. प. दरापेक्षा ७% जास्त दराऐवजी अं. प. दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३४/५ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थनगर येथे ५ फुटाची गल्लीत शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र. रु. ५,००,०००/- सा. बां. विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आले असुन मा. आयुक्तांशी दि. ५.८.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान तसेच स्थायी समिती ठराव क्र १८१/२६ दि. २८.८.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १३.११.९८ पर्यत एकुण ९ कोऱ्या निविदा विकल्य गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस फक्त ४ मोहोरबंद निविदा प्राप्त

झाल्या. त्या निविदा दिनांक ३०.११.९८रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शेख समद | अं. प. ३% जास्त |
| २) | मे. आकाश कंस्ट्रक्शन | --//-- ७% जास्त |
| ३) | श्री. एस. एम. मंडोरे | ९% जास्त |
| ४) | श्री. मन्नान खॉन | १४% |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा जासत दराची निविदा श्री. शेख समद यांची निविदा आहे. म्हणुन त्यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले. ठेकेदारांनी १९९८-९९ चे डी.एस.आर. सा.बां. विभागाची दरसुची महानगरपालिकेत अमंलात लागु झाले नसल्याने विचारात घेता येत नाही. म्हणुन १९९७-९८ च्या डी.एस.आर. प्रमाणे अंदाजपत्रकीय दराने मान्यतेसाठी सादर करण्यात आली असता मा. आयुक्तांनी दि. २९.१.९९ रोजी सदर निविदा अं. प. दराने मान्य केली आहे.

करिता मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. तसेच सदर काम १० व्या वित्त आयोग अनुदान व महानगरपालिका झोपडपट्टी सुधार योजना लेखाशिर्ष (खांडकी/फरशी रस्ते) ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन ५०% व उर्वरीत ५०% रक्कम दहाव्या वित्त आयोगाकडुन खर्च करण्याची प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थनगर येथे ५ फुटाचे गल्लीत शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम सन १९९७-९८ च्या डी. एस. आर. प्रमाणे श्री. शेख समद यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३५/६ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर (मुकूंदवाडी ) येथे शहाबाद फरशी करणे करीता अं. प. रक्कम रु. १५,४९,१८४/- सा. बां. विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दि. ४.९.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असुन सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १६/२दि. १९.९.९८ प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २४ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस फक्त एक मोहरबंद निविदा प्राप्त झाली. ती दि. २३.१२.९८ रोजी उपस्थिती ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आर. बी. चव्हाण | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदा कमी दराची म्हणजे अं. प. दराची निविदा श्री. आर. बी. चव्हाण यांची आहे. एकुण २४ निविदापैकी एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे बाकी ठेकेदाराकडुन निविदा का सादर करण्यात आल्या नाही या बद्दलचा खुलासा मागविण्यात आला असता एकाही ठेकेदारांनी खुलासा सादर केला नाही. म्हणुन सदर ठेकेदाराची निविदा मंजुरीस्तव सादर करण्यात आल्यास मा. आयुक्तांनी फेरनिविदा मागविणे बद्दल आदेशित केल्यानंतर संबंधित ठेकेदारांनी अर्ज देवुन विनंती केली की, सदर काम १% कमी

दराने करण्यास तयार आहे. म्हणुन फेरविचार करण्यात आला व मा. आयुक्तांनी अं. प. दरापेक्षा २% कमी या दराने मान्य केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास योजने अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुद १९९८-९९ मधुन खर्च करण्याच्या प्रस्तावित आहे. करिता मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर (मुकूंदवाडी ) येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. आर. बी. चव्हाण यांचेकडून अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३६/७ :**

मा. कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, नागेश्वरवाडी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक र. रु. २६,३१,२७६/- ला मंजुरी मिळाली होती. तसेच कार्यालयीन आदेश क्र. मनपा/लेखा/काअ/१०२५/९७ दि. १७.११.९७ अन्वये काम सुरु करण्यात आले होते. कामावर आतापर्यंत र. रु. २४,९२,८७६/- इतका खर्च झालेला आहे. परंतु सदरील कामासाठी निविदा ३३% कमी दराची असल्यामुळे निव्वळ खर्च र. रु. १६,७०,२२७/- एवढा झालेला आहे. करीता या कामात रक्कम रु. ८,२२,६४९/- ची बचत होत आहे. माननीय नगरसेविका यांनी सदरील बचतीमधुन याच प्रभागातील नाल्याच्या उर्वरीत संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाची मागणी केली आहे. वाढीव काम करण्यासाठी मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. वाढीव कामामुळे निविदेमधील संपुर्ण बाबींच्या एकुण कामामध्ये वाढ होणार आहे. तरी वाढीव रक्कमेस मंजुरीस्तव सादर करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामामध्ये झालेल्या बचतीमधुन संबंधित प्रभागाच्या सन्माननीय नगरसेविका यांच्या मागणीनुसार वाढीव काम करुन घेण्यास तसेच यासाठीच्या वाढीव र. रु. ८,२२,६४९/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील काम या कामाचे मुळ गुत्तेदार श्री. आर. बी. चव्हाण यांचेकडुन मंजुर निविदा दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३७/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वर्ग-४ संवर्गातील कर्मचाऱ्या पुरेशी पदोन्नती/पगारवाढ इत्यादीच्या संधी नसल्यामुळे

अ) कार्यालयात असलेल्या शिपाई संवर्गात एकुण १२१ पदे असुन सदरील पदाच्या १०% प्रमाणे १२ जागा रुपांतरीत पदास रु. ८२५-१५-९०० द. रो. २०-१२०० ही वेतनश्रेणी देण्यांत यावी व सदर पद हे पदोन्नतीचे पद म्हणुन संबोधण्या ऐवजी (सलेक्शन ग्रेड) म्हणुन समजण्यात यावे.

ब) मा. महापौर कक्ष व मा. आयुक्त कक्ष यांचेसाठी प्रत्येकी एक पद चोपदार म्हणुन रुपांतरीत करण्यात यावे. मंत्रालयीन विभागासाठी ज्या धर्तीवर हया पदास रु. ९५०-२०-११५० द. रो. -२५-१४०० ही वेतनश्रेणी दिली आहे. त्या धर्तीवर वेतनश्रेणी रु. ९५०-१४००

लागु करण्यात यावी. सदरील निवड श्रेणीने नाईक हया पदामधुन सेवा ज्येष्ठता व गुणवत्ता या निकषावर नियुक्ती करावी.

करीता वरील प्रमाणे "अ" नुसार शिपाई पदातील १२१ पदापैकी १०% प्रमाणे १२ जागा नाईक म्हणुन वेतनश्रेणी रु. ८२५-१५-९०० द. रो. २०-१२०० मध्ये व "ब" नुसार २ जागा चोपदार म्हणुन वेतनश्रेणी रु. ९५०-२०-११५० द. रो. २५-१४०० मध्ये नाईक पदामधुन निवड श्रेणीने रुपांतरीत करण्यात यावे. या प्रस्तावामुळे कोणतीही नविन पदनिर्मीती होत नसुन अस्तित्वात असलेली पदे ही उच्च वेतनश्रेणीत रुपांतरीत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे

अ) १२१ शिपाई पदांपैकी १०% प्रमाणे १२ जागा "नाईक " म्हणुन वेतनश्रेणी म्हणुन रु. ८२५-१५-९०० द. रो. २०-१२०० या उच्च वेतनश्रेणीत रुपांतरीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

ब) २ जागा "चोपदार" म्हणुन वेतनश्रेणी रु. ९५०-२०-११५० द. रो. २५-१४०० मध्ये नाईक पदामधुन निवड श्रेणीने रुपांतरीत करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३८/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आमखास मैदान येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी वस्तीगृह बांधणे (दुसरा टप्पा) या कामासाठी सा. बां. विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. २८,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. १९.८.९८ अन्वये सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस्तव मान्यता दिलेली होती. त्यानुसार उपरोक्त अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ९७/३ दि. १९.९.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र. मनपा/लेखा/नि//९५/९८ दि. २.१२.९८ अन्वये निविदा मागविल्य असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२६) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २९.१२.९८ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शेख समद | १२.९९% जास्त |
| २) | मो. सलीम | २०.५०% जास्त |
| ३) | सुजात अली हाश्मी | १२.५०% जास्त |
| ४) | एम. के. कंन्स्ट्रक्शन | ८.७८६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अं. प. दरापेक्षा ८.७८६% जास्त दराची निविदा मे. एम. के. कंन्सट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. परंतु मा. आयुक्त महोदय यांचे दालनात झ ाालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.७८६% जास्त दराऐवजी २% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव मा. स्थायी समितीसमोर सादर करणेस्तव मा. आयुक्त महोदय यांनी दि. ३०.१.९९ अन्वये शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मे. एस. के. कंन्स्ट्रक्शन यांची अं. प. दरापेक्षा ८.७८६% जास्त ऐवजी २% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी वस्तीगृह बांधणे (दुसरा टप्पा) या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. एम. के. कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अं. प. दरापेक्षा ८.७८६% जास्त दराऐवजी अं. प. दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३९/१० :**

श्री. जोंधळे ललीतकुमार मोतीराम, आरोग्य विभाग (मिअक) यांचे दि. २.३.१९९१ ते ८.१२.१९९१ हा निलंबन पूर्व कालावधी सेवा प्रयोजनार्थ समजणे व रोखण्यात आलेली वार्षीक वेतनावाढ पूर्ववत करणे बाबतच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिअम श्री. ललितकुमार जोंधळे यांनी दाखल केलेल्या अपीलानुसार दि. २.३.९१ ते ८.१२.९१ पर्यंतचा निलंबन पूर्व कालावधी देय असलेल्या रजेत रुपांतरित करण्याऐवजी उक्त कालावधी हा निलंबन पूर्व सेवाकाळ कालावधी असे समजण्यास आणि रोखण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ देय दिनांक पासुन पुर्ववत सुरु करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४०/११ :**

श्री. शेख जहीर अहेमद, क. लिपीक झो. क्र. ३ यांचे निलंबन प्रकरणात झालेली शिक्षा माफ करणे बाबतच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव :**

अपिल कर्ता श्री. शेख जहीर अहेमद, कनिष्ट लिपीक विद्युत विभाग यांना आदेश क्रमांक मनपा/अस्था-२/९७/१५४९ दि. १.३.९७ च्या विरुध्द मुदतीत अपिल केले असुन त्यांचे अपिल सर्वानुमते मान्य करण्यांत येत आहे.

१) श्री. जहीर अहेमद क. लिपीक यांचे कायम स्वरुपी बंद करण्यांत आलेले दोन वेतनवाढ रद्द करून त्यांना नियमित वार्षिक वेतनवाढ देण्यांस मंजुरी देण्यांत येते.
२) दिनांक २१.९.९६ पासुन ते रुजु होईपर्यंत या कालावधी "निलंबन कालावधी" ऐवजी सेवाकाळ म्हणुन संबोधण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४१/१२ :**

श्री. मिर्झा मुमताज अली बेग, माजी वरीष्ठ लिपीक महानगरपालिका यांचे मनपा सेवेतुन कमी विरुध्दच्या अपीलावर विचारा विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव :**

मिर्झा मुमताज अली बेग, वरीष्ट लिपीक (माजी) महानगरपालिका औरंगाबाद, यांची औरंगाबाद महानगरपालिका ७ वर्षापेक्षा जास्त सेवा केली असुन त्यांचे आता वय जास्त झाल्याने इतरत्र नोकरी मिळणे दुरापास्त झालेले असुन, त्यांनी महानगरपालिका विरुध्द

न्यायल्यात दाखला केलेल्या प्रकरणात, न्यायल्याने महानगरपालिकेकडे अपिल कर्त्याने सादर केलेले निवेदन विचारात घ्यावे व दोन महिन्यात निर्णय द्यावा. यावर श्री. मुमताज बेग यांचे निवेदन मनपा प्रशासनाने अमान्य केले असल्याने त्याविरुध्द केलेले अपिल सर्वानुमते मान्य करण्यांत येत आहे.

१) श्री. मुमताज अली बेग यांना वरीष्ट लिपीक या पदावर नियुक्ती आदेश देण्यांत यावे.
२) त्यांची सेवामुक्तीच्या तारखेपासुन सेवेत रुजु होईपर्यतचा कालावधी हा सेवाकाळ समजण्यांत येईल.
३) श्री. मुमताज अली बेग यांना अनुसूचित जमातीसाठी मिळणारे फायदे सवलती आता यापुढे मिळणार नाही.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४२/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्कमिल कॉलनी आरोग्य केंद्र येथे विद्युतीकरण करण्याचे कामाकरिता निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४४/९८ दि. १८.८.९८ प्रमाणे मोहरबंद निविदा मागविण्यांत आल्या असता सोळा कोऱ्या निविदा विक्री होऊन त्या स्विकृतीचे अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. लाईट वेल इलेक्ट्रीक्ल | ०.१०% | कमी दर |
| २) | मे. लुना इलेक्ट्रीक्ल | १% | जास्त दर |
| ३) | मे. ज्योती इलेक्ट्रीक्ल | ४.००% | जास्त दर |
| ४) | मे. अे. बी. इलेक्ट्रक्ल | ४.५०% | जास्त दर |

वरील निविदापैकी मे लाईटवेल इलेक्ट्रीक्ल यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी असुन तसेच मा. लेखाधिकारी यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.०० टक्के कमी दराने मान्यता दिली व मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

तरी मे. लाईट वेल इलेक्ट्रीकल यांचे ५.००% कमी दराची निविदा स्विकारण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमिल कॉलनी आरोग्य केंद्र येथे विद्युतीकरण करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. लाईटवेल इलेक्ट्रीकल्स यांचेकडुन अंदाजपत्रीय दरापेक्षा ५.००% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४३/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समतानगर येथे शाळा बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ९,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्त महोदय यांनी दि.

२७.१०.९८ अन्वये स्थायी समितीची शिफारस घेणे बाबत शिफारस केलेली होती. त्यानुसार मान्यतेस्तव स्थायी समिती समोर ठेवले असता मा. स्थायी समितीने विषय क्र. ३२३/४ दि. ११.११.९८ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. / मनपा / लेखा / नि /९०३/९८ दि ३०.१२.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१७) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २२.१.९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मन्नानखॉन | १३% | जास्त दराने |
| २) | श्री. शेख मसुद | १५% | जास्त दराने |
| ३) | श्री. सुजात हाश्मी | २०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% जास्त दराची निविदा श्री. मन्नानखॉन यांची प्राप्त झालेली आहे. परंतु मा. आयुक्त महोदय यांचे दालनात गुत्तेदारास दराचे वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% जास्त ऐवजी २% जास्त दराने मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली असुन स्थायी समिती समोर सादर करणे बाब त शिफारस केलेली आहे.

त्यानुसार श्री. मन्नानखॉन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% जास्त दराऐवजी २% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समतानगर येथे शाळा बांधण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. मन्नानखॉन यांचेकडुन अंदाजपत्रक दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४४/१५ :**

सहाय्य संचालक नगररचना यांच्या मार्फत प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरामधुन वाहणाऱ्या नाल्यच्या नाला जमिनी पैकी टिळकपथ औरंगपुरा येथील श्रीमान या इमारतीचे मागील बाजुस सभु. कॉलनी (पुर्व) लगत असलेली नाला जमिन मनपाने यापुर्वी मराठा समाज सेवा मंडळ औरंगाबाद विकसीत करण्यासाठी दीर्घ मुदतीवर भाडेपट्टयाने दिलेली आहे. नाला जमिनी बाबत आवश्यक तो करारनामा व कार्यवाही करुन संस्थेने त्या जागेचा ताबा घेऊन नंतर महानगरपालिकाची रितसर बांधकाम परवानगी घेऊन नाला जमिन विकसीत केलेली संस्थेकडुन देय बांधकाम क्षेत्रापेक्षा व मंजुर बांधकाम क्षेत्रापेक्षा जास्त बांधक अनवधानाने आलेले असल्याने गेल्या दोन वर्षापासुन संस्थेचा सदरील प्रकल्प पुर्ण झालेले असुनही भो. प्र. अभावी वापरात आलेला नाही. भो. प्र. करीता देय बांधकामापेक्षा जास्तीचे बांधकाम जे लागु मनपा धोरणानुसार नियमित करता येत नाही. ते सदर संस्थेचा प्रमुख सामाजिक उद्देश व सदरील इमारत संस्थेने समाजातील तळागळातील जनतेकरिता उपयोगी पडावी व तेथे नफा न घेता समाजाकरिता, सामाजिक व धार्मिक कार्यासाठी कार्यालय सुरु करता यावे म्हणुन नियमीत करण्यासाठी आवश्यक असलेल्या ७२ चौ.मी. क्षेत्राची संस्थेस दिलेल्य नालाजमिनीचे क्षेत्रात वाढ करुन देण्यांत यावी. संस्थेने मागणी केलेली आहे.

संस्थेने केलेल जास्तीचे बांधकाम वर नमुद कारणामुळे नियमित करता यावे यासाठी प्रत्यक्षात जागा प्रदान न करता फक्त तांत्रिक बाबींची पुर्तत व्हावी म्हणुन संस्थेस देण्याचे प्रस्तावित करण्यांत येत आहे. सदरील जागा प्रत्यक्षात देण्यांत येणार असलयाने मनपा त्या क्षेत्राचा विकास करु शकेल ही बाब विचारात घेता संस्थेची मागणी उद्दीष्टे इ. चा विचार करता फक्त जास्तीचे बांधकाम नियमीत करण्यासाठी भूखंड क्षेत्रात वाढ करण्याचे दृष्टीने नाला जमिनीचे ७२.०० चौ. मी. देण्यात येणार असल्याने हया क्षेत्राकरीता सिद्धारी प्रगणकाआधारे होणाऱ्या एकुण मुल्याचे एक तृतीयांश म्हणजे रक्कम रु. १,९०,६९९/- घेण्यांत यावे व भो. प्र. करिता वाढीव क्षेत्र विचारात घेण्यांत यावे म्हणुन प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

ही बाब इतर प्रकरणात प्रमाण मानण्यात येणार नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरामधुन वाहणाऱ्या प्रमुख नाल्यांच्या नाला जमीनीपैकी टिळकपथ औरंगपुरा येथील श्रीमान -श्रीमती या इमारतीचे मागील बाजुस स. भु. कॅालनी (पूर्व) लगत असलेली नाला जमीनीवर संस्थेकडुन देय बांधकाम क्षेत्रापेक्षा व मंजुर बांधकाम क्षेत्रापेक्षा जास्त बांधकाम अनवधाने झालेले असल्याने व संस्थेचे प्रमुख सामाजिक उद्देश व सदरील इमारत संस्थेने समाजातील तळागाळातील जनतेकरीता उपयोगी पडावी व तेथे नफा न घेता समाजाकरिता सामाजिक व धार्मिक कार्यासाठी कार्यालय सुरु करता यावे म्हणुन ७२.०० चौ. मी. द्यावी. संस्थेचस दिलेल्या नाला जमीनीचे क्षेत्रात वाढ करुन देण्यांस सर्वानुमते मंजुरी र. रु. १,९०,६९९/- घेण्यास तसेच भोगवटा प्रमाणपत्र करिता वाढीव क्षेत्र विचारात घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४५/१६ :**

सहाय्यक संचालक नगररचना यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार रोशनगेट ते सिडको ८० फुट रुंद रस्त्याने स. नं. ३४ व ३६ जसवंतपुरा च्या बांधित जागेचा मोबदला मिळकतधारकांचे मुख्यत्यार आम १) श्रीमती नफीसा बेगम भ्र, शकिल अहेमद व २) श्री. गौस मोहीयोद्दीन ह्यांनी केली आहे व सदर रस्तयाचे बांधकाम थांबविले आहे. तसेच न्यायालयात दावा दाखल केला आहे. त्याचा क्रमांक १०३६/९७ आहे. हया दाव्यात महानगरपालिकेने प्रतिज्ञापत्र दिले आहे की, सदर मिळकतधारकांनी मालकीहक्काचे कागदपत्रे दाखल केल्यावर जागेचा मोबदला चार महिन्यांत देण्यांत येईल. त्यानंतर मिळकत धारकाचे वरील मुख्यात्याआम यांनी कागदपत्रे दाखल केले. त्यावर मा. आयुक्तांचे दालनांत दि. ४.१.१९९९ रोजी मिळकत धारकाचे मुख्यत्यारआम यांचे सोबत बैठक होऊन सदर जागेचे भुसंपादन मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे मार्फत रितसर करण्याचे ठरले परंतु सध्या रस्त्याचे काम थांबु नये म्हणुन मिळकत धारकास अगाऊ रक्कम रु. १०,०००००/- (रुपये दहा लक्ष फक्त) देण्यांचे ठरले. करिता मिळकत धारकांचे वरील मुखत्यार-आम यांना ही रक्कम देणे व रस्त्याचे अंतिम निवाडयानुसार हया जागेच्या मोबदला रक्कमेतुन ही रक्कम रु. (१०,०००००/- फक्त) वळते करण्याचे ठरले. करिता त्यांचेकडुन हया रकमे बाबतचे हमीपत्र घेऊन रक्कम त्यांना देणेचे व जागा ताब्यात (अगाऊ ताबा) घेणेचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनानुसार रोशन गेट ते सिडको ८० फुट रुंद रस्तयाचे सं. न. ३४ व ३६ जसवंतपुरा च्या बाधित जागेचे मिळकत धारकाचे मुख्त्यार आम १) श्रीमती नफीसा बेगम भ्र. शकील अहेमद व २) श्री गौस मोहीयाद्दीन कादरी यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर जागेचे भुसंपादन मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत रितसर होईपर्यंत काम थांबु नये म्हणुन मिळकत धारकास आगाऊ रक्कम रु. १०,०००००/- (रुपये दहा लक्ष फक्त) देण्यास तसेच रस्त्याचे अंतिम निवाडयानुसार हया जागेचा मोबदला रक्कमेतुन उपरोक्त रक्कम वळती करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदरील रक्कम देतांना संबंधिताकडुन हमीपत्र घेऊन जागेचा आगाऊ ताबा घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत /-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

सक्षरीत/-
मा. सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०.२.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मा. सभापती श्री. जयवंत ओक यांच्या अध्यक्षतेखाली १०.२.९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभा (लेखा परिक्षण अहवालाच्या) सभेचे इतिवृत्त.**
**सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या गिताने दुपारी ३.०० वा. झाली. सभेस रजिस्टरप्रमाणे स. स. व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ३. | स. स. श्री. संजय जोशी | --//-- |
| ४. | स. स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ५. | स. स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ६. | स. स. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ७. | स. स. श्री. राजकुमार बचाटे | --//-- |
| ८. | स. स. श्री. विश्वारोद्दीन पिता खुदबोद्दीन | --//-- |
| ९. | स. स. श्री. सय्यद अहमद एकबालोद्दीन | --//-- |

**संवाद :**

**मा. सभापती :** आज विशेष स्थायी समिती सभा (लेखा परिक्षण अहवाल)
१. सन १९८३-८४ ते १९९०-९१
२. सन १९९१-९२ ते १९९३-९४
३. सन १९९६-९७ (सन १९९४-९५ व १९९५-९६ या आर्थिक वर्षाकरीता) अहवाल मुख्य लेखा परिक्षका यांनी या बैठकीत सादर केलेले आहे. या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती द्यावी.

**मुख्य लेखा परिक्षक :** मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये मुख्यलेखा परिक्षक यांनी महानगरपालिकेच्या हिशेब तपासणी बाबतचा अहवाल सादर करावयाचा असतो. त्यानुसार सन १९९३-९४ व सन १९९०-९१ तसेच १९९१-९२ ते १९९३-९४ या बाबतचा अहवाल त्या वेळेसचे प्रशासक याचेकडुन कार्यवाही झालेली आहे. आतासन १९९६ ते १९९७ या बाबतचा लेखा अहवाल मी स्थायी समितीला मुद्देनिहाय सादर करीत आहे. कृपया त्यावर चर्चा करुन निर्णय व्हावा.

**श्री. गौतम लांडगे :** सन १९९३ ते ९४-९५ या कालावधीत महानगरपालिका प्रशासक यांच्या कालावधी होता. त्यावेळेस सदरील अहवालावर कार्यवाही का झाली नाही. हा अहवाल एवढया उशीरा स्थायी समितीवर का आणला गेला याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** स्थायी समितीस जो अहवाल सादर करण्यात आलेला आहे. व मुख्य लेखा परिक्षकांनी जे विभागनिहाय मुद्दे या अहवालात त्रुट्या असलेल्या किंवा कार्यालयातील कारभार विषयक जे निकष काढलेले आहेत. त्या संदर्भात प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**लेखा परिक्षक :** कार्यालयाचे सन १९८२ पासुन ज्यावेळी महानगरपालिका अस्तीत्वात आली त्यावेळेसपासुन सन १९८३-८४ ते १९९०-९१ व सन १९९१-९२ ते १९९३-९४ या कालावधीतील अहवाल माझ्या पुर्वीचाच असल्याने तत्कालीन आयुक्त किंवा प्रशासकीय काळात सदरील अहवाल तयार केलेला आहे. व त्यापुढील सन १९९४-९५ व १९९५-९६, सन १९९६-९७ या आर्थिक वर्षात महानगरपालिका कार्यालयातील कारभार विषयक आणि हिशेब तपासणी करण्यात आलेली असुन मुद्दे निहाय व विभाग निहाय तपासणी करीत असतांना जो वस्तुस्थिती आहे. त्यानुसार अहवाल तयार करण्यात आलेला असुन आवश्यक लागणारी कागदपत्रे व संचिका या त्या त्या विभागाकडुन मागवुन कार्यवाही करण्यात आली आहे. अशा काही संचिका प्राप्त संबंधित विभागाकडुन न झाल्यास त्या - त्या विभागाकडील त्रुट्या या अहवालात नमुद करण्यात आलेल्या आहेत.

**श्री. संजय जोशी :** माझ्या माहितीप्रमाणे जो लेखा परीक्षण अहवाल स्थायी समितीस सादर झालेला आहे. यामधील जवळपास ८० % मुद्यांवर कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे आता याबाबत सभेत चर्चा करणे योग्य वाटत नाही.

**श्री. अशफाक सलामी :** सन १९८८ या वेळेस प्रथमतः महानगरपालिकेमध्ये नव्यानेच लोक प्रतिनिधीत्वाने सदस्य सभागृहात आलेले होते. तेंव्हा सन १९८८ ते १९९३ या कालावधीतील लोकप्रतिनिधी अन्वये झालेल्या महानगरपालि कारभाराची लेखा अहवाल मिळणे आवश्यकत होते. परंतु वरील कालावधीपासुन सन १९९६-९७ या वित्तीय वर्षापर्यंतचे लेखा अहवाल दडवुन ठेवण्यात आलेला होता. वेळेच्या आत तपासणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे लाखो रुपयाचे नुकसान झालेले असुन यात फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे दिसुन येईल. या संदर्भात एका व्यक्तीने कोर्टात केस दाखल केलेली असुन कोर्टाने असा आदेश दिलेल्या आहे की, १५ दिवसांत मनपोन लेखा परिक्षा अहवाल सादर करावा. जेणे करुन मनपाने कोर्टात पुरेशी माहिती दिसल्याने कोर्टाला अस आदेश देणे भाग पडले. नियमाप्रमाणे प्रत्येक वर्षीचा लेखा परिक्षण अहवाल सादर करुन मंजुर करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी असे दिसत नाही.

**मा. सभापती :** सन १९८३-१९९४ या कालाधीतील लेखा परिक्षण अहवालावर जे प्रतिकुल किंवा विविध त्रुट्याअहवालात नमुद केलेल्या आहेत. त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** महानगरपालिका अधिनियमात अशी काही तरतुद आहे काय ? की मुख्य लेखा परिक्षक यांनी दर तीन महिन्यांनी स्थायी समितीला लेखा विषयक अहवाल सादर करावे.

**श्री. अशफाक सलामी :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये मुख्य लेखा परिक्षक यांनी स्थायी समितीला लेखा परिक्षण अहवाल वेळोवेळी का दिला नाही. एकदाच सर्व अहवाल स्थायी समितीस सदर करण्याचे कारण काय ?

**मुख्य लेखा परिक्षक :** महानगरपालिका नियमावली नुसार प्रत्येक वर्षी अहवाल स्थायी समितीसमोर चर्चेस ठेवुन अंतिम मंजुरी घेणे आवश्यक आहे. सन १९९१ ते १९९४ या कालावधीतील लेखा परिक्षण अहवाल हा माझ्या कारकिर्दीतील नसुन तो एकत्रित अहवाल का तयार करण्यात आला. या बाबत मी काहिही

सांगु शकत नाही. परंतु जे काम त्यांनी केलेले आहे. सन १९८३-८४ ते १९९३-९४ हा अहवाल ज्यावेळेस पुर्ण झालेला होता त्यावेळेस तत्कालीन प्रशासक यांनी स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर करावयाचे होते. ते त्यांनी सादर केलेले नाही. नियमाप्रमाणे साप्ताहिक लेखापरिक्षण स्थायी समितीला देणे आवश्यक आहे. दर महिन्याला लेखा परिक्षण करुन संबंधित विभागाने काय कार्यवाही केली या बाबतची माहिती मा. सभापती यांना देणे आवश्यक आहे आणि १९९६-९७ च्या अहावालात सन १९९४-९५, ९५-९६ व १९९६-९७ या वर्षीचा लेखा परीक्षण केल्याचा अहवाल नमुद केलेल्या आहे. व तो ऑक्टो. ९७ ला सादर करण्यात आलेला आहे. आता सन १९९७-९८ या बाबतचा अहवाल तयार करण्याचे काम चालू असुन जर मा. स्थायी समितीने निर्णय दिल्यास साप्ताहिक अहवाल स्थायी समितीस सादर करण्यात येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** स्थायी समितीस सादर करण्यात आलेल्या लेखा परिक्षण अहवाल अधिकृतरित्या आहे काय ? कारण या अहवालास कुणाच्याही स्वाक्षऱ्या दिसुन येत नाही. या बाबतची माहिती द्यावी.

**श्री. अशफाक सलामी :** नियमाप्रमाणे प्रत्येक महीण्याला लेखा परिक्षण केलेला अहवाल स्थायी समितीच्या सदस्यांनी मिळणे आवश्यक आहे. तर साप्ताहिक अहवाल मा. सभापती यांना प्रशासकीय हव्या अवलोकनार्थ देणे आवश्यक आहे. या सर्व बाबींच्या नियमात तरतुद असुनही प्रशासनाने कार्यवाही का केलेली नाही एकदमच सन १९८३ पासुन सन १९९६-९७ चा अहवाल स्थायी समितीला सादर का केला. वास्तविकता दर वर्षाला अहवाल सादर करावयास पाहिजे. तसेच या ठिकाणी केलेले नाही. आणि १९८३ पासुन १९९४-९५ व १९९५-९६, १९९६-९७, १९९७-९८ चा अहवाल व १९९८-९९ चा अहवाल स्थायी समितीला कधी सादर करणार ? याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखा परिक्षक :** सन १९९५-९६ व १९९६-९७ चा अहवाल एकाचवर्षी सादर करण्यात आलेला आहे. सदरील हा मागील वर्षी ऑक्टो. ९७ ला दाखल केलेला आहे. व सदरील अहवाल हा अधिकृत असुन मुळप्रत ही मा. आयुक्त यांची स्वाक्षरीची प्रत आहे.

**श्री. अशफाक सलामी :** ॲक्टप्रमाणे दर वर्षीला लेखा परिक्षण अहवालामंजुरीस्तव स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. तर एवढा विलंब होण्याचे प्रशासनाचे धोरण काय ?

**मुख्य लेखा परिक्षक :** मागील वर्षी १९९७ ऑक्टोबंरला स्थायी समितीला लेखा परिक्षण एकत्रित सादर करण्यात आलेला होता. परंतु त्यापुढे निवडणुकांमुळे संपुर्ण राजयात आचारसंहित असलयाने स्थायी समिती सभा झालेली नाही. त्यामुळे सदरचा अहवाल प्रलंबित आहे. आणि १९९७-९८ चा अहवाल येत्या दिवसांत मा. स्थायी समितीला सादर करण्यात येईल.

**मा. सभापती :** स. स. श्री. अशफाक सलामी यांनी सांगितले की, मनपातील बऱ्याच विभागामध्ये लाखो व करोडो रुपयाचा घोळ आहे झालेला आहे. भ्रष्टाचार झालेला आहे. ज्यामुळे लेखा परिक्षण अहवाल वेळेवर सादर झालेला नाही. हे म्हणजे योग्य नसुन तशा प्रकारच्या सुचना करण्यापेक्षा सिध्द करुन दाखविले त्या कर्मचारी/अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल. याबाबत सर्व स. स. नी चर्चा करावी.

**श्री. विश्वारोद्दीन :** सदरचा लेखा परिक्षण अहवाल दोनच दिवसापूर्वी मिळाला असुन या बाबत सविस्तर वाचन न झाल्याने सभागृह हात चर्चा करु शकत नाही. यासाठी अहवाल नियमाप्रमाणे वेळेवर मिळणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** सध्या या अहवालावर चर्चा करावे. व नंतरच्या सभेत निर्णय घेण्यात येईल.

**श्री. विश्वारोद्दीन :** लेखा परिक्षण अहवालास एवढा उशिर होण्यास कारण काय? शासनाकडील काही अनुदान तरतुदीतुन तफावत दिसुन येते काय ? प्रस्तावातील मंजुरी अभावि काही प्रकरणे प्रलंबित आहेत काय? याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखा परिक्षक :** माझ्या कालावधीत मा. सभापती यांच्याकडे आतापर्यत लेखा परिक्षण केल्याचे जवळपास १०-१२ अहवाल सादर केलेले आहेत. सन १९९६-९७ चा अहवाल हा ऑक्टो.९७ लाच सादर केलेला होता परंतु त्यावर चर्चा झालेली नव्हती. आता या पुढील लेखा अहवाल हा प्रत्येक महिन्याला सादर करण्यात येतील व साप्ताहिक अहवाल मा. सभापती यांचेकडे माहितीस्तव देण्यात येईल.

**श्री. अशफाक सलामी :** लेखा अहवाल स्थायी समितीस सादर करण्यास उशीर का झाला. त्याचप्रमाणे अहवालावर मुख्य लेखा परिक्षकांची स्वाक्षरी दिसुन येत नाही. सन १९९२ मध्ये "शपथपत्र" देऊन हायकोर्टात मंजुरी घेतलेली आहे. त्यामुळे ऑडिट काम करित नाही काय ? ऑडिटसाठी आवश्यक लागणारा कर्मचारी वर्ग या ठिकाणी आहे. मात्र त्यांचेकडुन योग्य रित्या कामे करवुन घेतल्या जात नाही. याच कारणावरुन त्या ठिकाणी नेमणुक केलेल्या कर्मचाऱ्यांची इतरत्र बदली करुन त्या विभागाकडील ऑडिट कामे कशी केली जाते. याची माहिती द्यावी. कारण या विभागात मुंबईवरुन एका कर्मचाऱ्यास घेतलेले असून त्या कर्मचाऱ्याकडुन काम होत नाही काय ? ज्यामुळे अहवाल प्राप्त होण्यास उशीर होतो. या ऑडिट विभागासाठी आवश्यक ती कर्मचारी प्राप्त नसल्यास प्रशासनाकडे वेळोवळी मागणी केलेली नाही काय ? जर या ठिकाणचा कर्मचारी वर्ग काम व्यवस्थित करित नसल्याने लेखा अहवालास उशिर झालेला आहे काय?

**मुख्य लेखा परिक्षक :** माझ्यकडील कर्मचारी वर्ग त्यांना दिलेल कामे व्यवस्थित करीत आहेत. प्रशासकीय दृष्टया दर २-३ वर्षानी कर्मचाऱ्याच्या बदल्या होत असतात. परंतु कार्यरत कर्मचाऱ्यांकडुन या विभागाचे ऑडिट काम सुरळीत चालु आहे.

**श्री. अशफाक सलामी :** सन १९९२ पासून ऑडिट विभागात जे कर्मचारी होते ते सर्व कर्मचारी किती होते. व ते सर्वच कर्मचारी या विभागासाठी कार्यरत होते काय ? माझ्या माहितीप्रमाणे बरेचसे या विभागातील कर्मचारी इतरत्र बदलुन गेलेले आहेत. या शिवाय या विभागासाठी आणखी जादा कर्मचारी देणे बाबतचा जी बी ने प्रस्ताव मंजुर केलेला होता. त्याबाबत काय कार्यवाही केली. या सर्व कारणांमुळे लेखा परिक्षणासस उशीर झालेला आहे काय असे वाटते.

**मुख्य लेखा परिक्षक :** सन १९९६ पासुन माझ्या विभागाकडे लेख जो कर्मचारी वर्ग दिलेला होता तो सर्व कार्यरत आहेच. त्या व्यतिरिक्त सन १९९२ पासुन जे कर्मचारी होते. त्यांचे बाबतीत इतरत्र बदल्या करुन घेतलेले असल्यास मला त्याची कल्पना नाही तरीही आस्था -१ कडुन या बाबत माहिती घेण्यात येईल.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** या लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करणेसाठी योग्य आहे काय ? याबाबत विधी विभागाने अभिप्राय द्यावेत.

**श्री. गौतम लांडगे :** सन १९९६-९७ चा लेखा परिक्षण अहवाल जो सादर केलेला आहे. त्याबाबत मुख्य लेखा परिक्षक यांनी आपले मत मांडावे.

**मुख्य लेखा परिक्षक :** सदरील अहवाल १९९७ ला पूर्ण केलेला आहे. जे मुद्दे आहेत ते परिक्षणत प्रामुख्याने टिपलेले आहेत. त्यावर स्थायी समितीमध्ये चर्चा करुन सर्वसाधारण सभेस शिफारिस करावे. त्यामुळे मंजुरीचा प्रश्नच येत नाही. अशा प्रकारची सभागृहात निर्णय व्हावा.

**श्री. संजय जोशी :** स्थायी समितीमध्ये लेखा परिक्षण अहवालावर सभागृहात चर्चा करित असतांना जो लेखा प्रतिसमोर आहेत त्यामधील टिप्पणी तयार करुन ऑडीट मधील जे प्रतिकुल शेरे आहेत. त्यासह सर्वसाधारण सभेकडे शिफारीस करावे. स्थायी समितीने सन १९८२-८३ पासुन १९९६-९७ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करुन निर्णय घ्यावयाचे गुत्ता घेतलेला आहे काय ? जो या लोकप्रतिनिधीचा कालावधी आहे त्यावरील विधि विभागातील झ ाालेल्या लेखा परिक्षण अहवालावरील संबंधित कर्मचारी /अधिकारी यांचे बाबतीत काही घडलेले असलयास कार्यवाही करण्याचे सर्व साधारण सभेस शिफारसी करण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे :** सादर झालेल्या अहवालावर चर्चा करण्यासाठी सुरुवात करुन काही प्रश्न निर्माण झाल्यास त्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात. विभागनिहाय चर्चेस सुरुवात करावे. पृष्ठ क्र. २ मध्ये जसे नमुद केलेले आहे. सन १९९६-९७ या वर्षात लेखा परिक्षण करतांना आक्षेपित मुद्दे सुरुवातीला अर्धसमास पत्र देऊन संबंधित विभाग प्रमुखास कळविण्यात आले. तर मग त्यानंतरही आक्षेपातील मुद्दे खोडले गेलेले आहेत काय ? असे किती विभागांना "अर्धसमास" पत्र देऊन कळविलेले आहे.

**श्री. संजय जोशी :** नियमाप्रमाणे सादर झालेला लेखा परिक्षण अहवाल पत्रकारांना देता येईल काय ? कारण बैठक सुरु होऊन बराच वेळ झालेला असुनही पत्रकार मंडळींना अहवालाच्या प्रति दिल्या गेलेल्या नाहीत. त्यांची मागणी दिसत आहे. परंतु अहवालावर चर्चा चालुच असुन तो मंजुर झालेला नाही.

**श्री. गौतम लांडगे :** अहवालावर चर्चा चालुच असुन मंजुरी मिळालेली नाही. हा अहवाल पत्रकारांना देता येतो का ? या बाबत विधी विभागाने अभिप्राय द्यावेत.

**मा. सभापती :** या बाबत विधी सल्लागार यांनी आपले मत मांडावे.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १०६ प्रमाणे मुख्य लेखा परिक्षक यांना वेळोवेळी मा. सभापती आदेश जर देतील त्या-त्या वळी सादर करता येते. परंतु नियमाप्रमाणे स्थायी समितीला सदरील अहवाल सादर झालेला असल्याने चर्चा करुन जोपर्यंत अंतिम निर्णय होऊन निर्णयास्तव सर्वसाधारण सभेस शिफारीस होत नाही त्यानंतरच बाहेरील लोकांना नियमाप्रमाणे अर्जावरुन प्रती विकल्या जातील व त्या देण्यात येतील.

**मा. सभापती :** लेखा परिक्षण अहवालात नमुद केल्यानुसार व विभागनिहाय किती कर्मचारी /अधिकारी यांचे बाबतीत चौकशी व निलंबन केलेले आहेत. त्यांचेवर प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे. याबाबत सविस्तर माहिती येत्या आठ दिवसांत मा. आयुक्त व मा. सभापती यांना द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** अर्धसमास पत्रान्वये ज्या-ज्या विभागास पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे संबंधित विभागांनी अद्यापही कार्यवाही केलेली नाही. ज्या-ज्या विभागप्रमुखांनी या पत्रानुसार कार्यवाही केलेली नाही. त्यांचेवर प्रशासनाने कठोर कार्यवाही करावि.

**मुख्य लेखा परिक्षक :** अर्धसमास पत्र देवूनही बऱ्याच विभागांनी कार्यवाही केल्याचे कळविलेले नाही. आणि ज्या विभागांनी कार्यवाही केलेली असल्यास त्या विभागप्रमुखांनी तसे कळवावे. नसता त्यामुळे परिक्षणास उशिर होतो. तरीही अर्धसमास पत्र देऊनही काही नविन मुद्दे उपस्थित होत असतील तर ते चर्चा करुन सोडविण्याचे कामास मदत केली पाहिजे.

**श्री. संजय जोशी :** जकात विभागातील लेखा परिक्षणासंबधी पृष्ट क्र. १२ मधील उपरोक्तचे अनुपालन अद्याप पावेतो अप्राप्त आहे.

**मुख्य लेखा परिक्षक :** या संदर्भात संबंधित विभागाकडुन कागदपत्रे मागविली आहेत ते तपासुन कार्यवाही करण्यात येईल. उदा. मध्यवर्ती गोदाम येथे सी बुक /पा.कृ २३६० दि. २०.७.९१ अन्वये रु. १,६७,५७१.०० च्या "चहा " या मालावर रु. २१७०/- वसुल करण्यात आले. वास्तविक २% दराने रु. ३३५१/- जकात वसुली आवश्यक होती. म्हणजेच रु. ११८१/- कमी वसुल करण्यात आले.

**श्री. संजय जोशी :** म्हणजेच संबंधित विभाग प्रमुख सहकार्य करण्यास तयार नाही. समजायचे काय ?

**मा. सभापती :** सन १९९३ ते १९९१ व १९९१ ते १९९४ या कालावधीतील लेखा परिक्षण अहवाल संदर्भात प्रशासनाने कोणती भूमीका अवलंबिलेली आहे. या बाबतचा कार्यवाही अहवाल सादर करावा. त्याचप्रमाणे सन १९९४-९५ व १९९५-९६, ९६-९७ बाबतचा अहवालावर काही विभागाकडुन अनुपालन अहवाल मागविलेला आहे. त्या अहवालानंतर प्राप्त प्रकरणे पुन्हा तपासणी करुन अंतिम करण्यात यावे. तसेच सन १९९७-९८ चा लेखा परिक्षण अहवालपुढील बैठकीत सादर करावे. आता काही कारणास्तव सभा तहकुब करण्यात येते. बैठकीची वेळ नंतर कळविण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे :** पुढील बैठकीची तारीख आताच निश्चित करावी.

**मा. सभापती :** पुढील बैठकीची तारीख नंतर कळविण्यात येईल. तोपर्यंत सभा तहकुब करण्यात येते. (वेळ अंदाजे ६.१५ वा.) सभेस सुरुवात दि. १५.३.९९ रोजी दु. १२.३० वा. वंदेमातरम् गिताने झाली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/- | स्वाक्षरी/- |
| नगरसचिव<br>महानगरपालिका,<br>औरंगाबाद | सभापती<br>स्थायी समित<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २०.२.९९ रोजी भरलेल्या विशेष स्थायी समिती सभेचा इतिवृतांत.**

**शनिवार दिनांक २०.२.९९ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. सभापती श्री. जयवंत (बंडु) केशवराव ओक यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "मलिकअंबर" स्थायी समिती सभागृहात विशेष अर्थसंकल्पीय विशेष स्थायी समिती सभेस "वंदेमातरम्" गिताने सुरुवात झाली. या सभेस म. आयुक्त व कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. राजकुमार बचाटे | --//-- |
| ३. | स. स. श्री.नरसिंग मुरलीधर ढगे | --//-- |
| ४. | स. स. श्री. स. अ. इकबालोद्दीन स.उ म. खुतूबोधीन | --//-- |
| ५. | स. स. श्री. मो. विश्वारोद्दीन मो. खुतूबोधीन | --//-- |
| ६. | स. स. श्री. विकास रतनलाल जैन | --//-- |
| ७. | स. स. श्री. म. अ. रऊफ म. अ. माबुद | --//-- |
| ८. | स. स. श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ९. | स. स. श्री. संजय जोशी | --//-- |
| १०. | स. स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ११. | स. स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १२. | स. स. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| १३. | स. स. श्री. बन्सी तुळशीराम गांगवे | --//-- |
| १४. | स. स. श्री. किशोर तुळशीबागवाले | --//-- |

**विषय क्र. ५४६**

सन १९९८-९९ चे सुधारित अंदाजपत्रक व सन ९९-२००० चे मुळ अर्थसकंल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे. (सभेच्या सुरुवातीस सर्व स्थायी समिती सदस्याचे स्वागत करुन सन ९९-२००० वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन ९८-९९ चे सुधारित अंदाजपत्रकाचे मा. सभापती स्थायी समिती मनपाचे आयुक्त मा. श्री. डी. एस. वैद्य यांनी सादर केले व अंदाजपत्रकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले.)

**संवाद :**

**मा. आयुक्त :** सन १९९९-२००० या सालचा अर्थ संकल्प स्थायी समिती समोर सादर करित असतांना मला मनस्वी आनंद होत आहे. सदरहु अर्थसंकल्प हा महानगरपालिकेच्या इतिहासातील १७ वा अर्थसंकल्प आहे. ८ डिसेंबर १९८२ रोजी स्थापन झालेल्या महानगरपालिकेचा कारभार लोकप्रतिनिधीच्या अधिपत्याखाली यशस्वतीपणे चालु आहे. १६ वर्षापुर्वी महानगरपालिका स्थापन झाले तेव्हा एकुण रुपये ८.०० कोटीचा अर्थसंकल्प महानगरपालिकेचा होता. तद्नंतर शहराचा झालेला औद्योगिक विकास, शहराची झालेली वाढ, लोकसंख्येमध्ये झालेली वाढ व शहराची झालेली

भरभराट सर्वांच्या नजरेसमोर आहे. १६ वर्षापुर्वी अर्थसंकल्प आणि चालु सालचा अर्थसंकल्प या मध्ये जमिन आसमानचा फरक आपणांस दिसुन येईल.

शंभरी ओलांडलेला हा पहिलाच अर्थ संकल्प सादर करित असतांना मला अभिमान वाटत आहे. हा अर्थसंकल्प रुपये १०६ कोटी ७९ लाख २९ हजाराचा आपल्या समोर आम्ही सादर करीत आहोत.

गतसाली म्हणजे सन १९९८-९९ साली रुपये ९३ कोटी २५ लाख ७१ हजाराचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. मागील नऊ महीन्याचे उत्पन्न व खर्च लक्षात घेता १९९८-९९ सालासाठी सुधारित अर्थसंकल्प ८२ कोटी ८० लाख २६ हजाराचा आपणापुढे आम्ही सादर करीत आहोत. सुधारित अर्थसंकल्पामध्ये सुमारे रुपये १०.०० कोटीची तुट आलेली दिसुन येते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मुळ अंदाजपत्रकांमध्ये जकातीचे उत्पन्न रुपये ४८.०० कोटी ग्राह्य धरण्यात आले होते. ते सुधारित अंदाजपत्रकामध्ये रुपये ४२.०० कोटी ग्राह्य धरण्यात आलेले आहे. जकात हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन असुन या बाबतीत सर्व साधारण सभेमध्ये व स्थायी समितीमंध्ये अनेक वेळा चर्चा होऊन जकातीचे उत्पन्न जास्तीत जासत कसे वाढेल व त्यात काय त्रुटी आहेत याबाबत उहापोह झालेला आहे. परंतु चालु आर्थिक वर्षी जागतीक मंदी व मालाची आवक बंद असलेले उदयोगधंदे याचा एकत्रित परिणाम म्हणुन अपेक्षेपेक्षा जकात कमी आलेली आहे. कमी आलेली जकात हि फक्त महानगरपालिकेस आली आहे. असे नाही तर महाराष्ट्रातील सर्वच महानगरपालिकांमध्ये जकातीच्या उत्पन्नावर फटका बसलेला आपल्याला दिसुन येईल. जकातीच्या उत्पन्नामध्ये रुपये ६.०० कोटीची घट व मालमत्ता करातील रुपये २.०० कोटीची घट तसेच गरिबासाठी बांधावयचाच्या बैठक शौचालयापोटी प्राप्त होणारे रुपये २.०० कोटीचे उत्पन्न अप्राप्त असल्यासमुळे एकुण मुळ अंदाजपत्रकामध्ये व सुधारित अंदाजपत्रकामध्ये रुपये १०.०० कोटीची घट दिसुन येईल.

सुधारित अंदाजपत्रकांमध्ये रुपये १०.०० कोटीची घट असल्यामुळे भांडवलि कामे, महसुली कामे, इमारती, जलनिसारण कामे यांमध्ये सुधारित अंदाजपत्रकामध्ये रुपये १०.०० कोटीची कपात दर्शविण्यात आलेली आहे.

सन १९९९-२००० या अंदाजपत्रकामध्ये जकातीपोटी उत्पन्न रुपये ५२.०० कोटी आम्ही अपेक्षित केले आहे. तसेच मालमत्ता करापोटी रु. १५.०० कोटीचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे शासकीय अनुदान, पाणीपट्टी, महानगरपालिकेच्या मिळकतीपासुनचे उत्पन्न व इतर करापोटी मिळणारे उत्पन्न हे सर्व लक्षात घेऊन रुपये १०६ कोटी ७९ लाख २९ हजाराचा अर्थ संकल्प आम्ही सादर करित आहोत.

महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागु करण्याचे तत्वतः मान्य केले असुन शासनाच्या मंजुरीच्या अधिन राखुन कर्मचाऱ्यांना अग्रीम रक्कम देण्यांत आली आहे. कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागु करावयाचे ठरल्यास महानगरपालिकेच्या तिजोरीवर आस्थापनेचा बोजेत सुमारे रुपये ५.०० कोटीची वाढ होणार असुन आस्थापनेचा एकुण खर्च रक्कम रुपये ३०.०० कोटी पर्यंत जाण्याची शक्यता आहे. जर पाचवा वेतन आयोगाअंतर्गत पैसा द्यावयाचा असेल तर विकासकामासाठी निधी कमी पडु

नये. यासाठी उत्पन्नांमध्ये वाढ होणे क्रम प्राप्त ठरते. महानगरपालिकेचा वाढता खर्च, शहराची वाढती लोकसंख्या, नागरी सुविधा बाबत जनतेच्या वाढलेल्या अपेक्षा या सर्व बाबी लक्षात घेता महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होणे ही काळाची गरज आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेचे मुख्य उत्पन्न असलेले जकातमध्ये काही अशी वाढ करण्याचे प्रशासनाने प्रस्तावित केले आहे. महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर १९८४ साली महानगरपालिकेचे जकात शेड्युल "ओ" मध्ये कोणत्याही प्रकारची आतापर्यंत वाढ केलेली नाही. व जनतेवर बोजा टाकलेला नाही. सबब चालु आर्थिक वर्षामध्ये १४ वर्षा पासुन शेड्युल "ओ" मधील ज्या वस्तुवर जकात वाढ केलेली नाही. त्यावर जकात वाढ करणे प्रशासनाने प्रस्तावित केले आहे. या सर्व बांबीचा आढावा घेऊन शेड्युल "ओ" मधील ४२ वस्तुवर जकात दरामंध्ये वाढ व १५ वस्तुवर वजना ऐवजी मुल्यावर आधिरित जकात कर सुचविण्यात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेने जकात वाढीचा प्रस्ताव मान्य केल्यास एकुण जकातीचे उत्पन्न रुपये ५२.०० कोटी प्रशासनाने अपेक्षित धरले आहे.

पाणि पुरवठा ही अत्यावश्यक बाब असुन महानगरपालिकेच्या हद्दीतील सुमारे साडे आठ लाख लोकसंख्येला जायकवाडी प्रकल्पाच्या माध्यमातुन पाणि पुरवठा केला जातो. जायकवाडी पाणि पुरवठा योजना महानगरपालिकेने यावर्षी ताब्यात घेतली असुन त्यामुळे आस्थापना, रसायने व देखभाल व दुरुस्ती यावरील खर्च महानगरपालिकेचा वाढलेला आह. विद्युत देयका बाबत महानगरपालिका आणि शासन यांमध्ये पत्रव्यवहार सुरु आहे. सद्यस्थितीमध्ये पाणि पुरवठयावर एकुण खर्च सुमारे रुपये २८.०० कोटी असुन उत्पन्न फक्त रुपये ७.५० कोटी आहे. व निव्वळ रुपये २१.०० कोटीचा तोटा महानगरपालिकेला सहन करावा लागत आहे. विद्युत देयक दर महीण्याला सुमारे १ कोटी ९० लाखाचे प्राप्त होत असुन महानगरपालिका आर्थिक अडचणीत असल्यामुळे दर महिण्याला कसेबसे रुपये ७५.०० लाख देत आहे. व त्यामुळे विद्युत देयकावी थकबाकी वाढत चालली आहे. सद्य परिस्थितीमध्ये विद्युत देयकापोटी सुमोर ६७.०० कोटी थकबाकी देणे आहे. तसेच पाणि पुरवठा मंडळास रुपये २८.०० कोटी थकबाकी देणे आहे. पाणिपुरवठा ही स्वनिर्धारित (self sufficient) होणे हे नितांत आवश्यक आहे. परंतु त्यासाठी पाणी पुरवठयाचा आकर प्रती वर्षी रूपये २४००/- प्रति कनेक्शन करणे नितांत आवश्यक आहे. सध्या शहरामध्ये एकुण ७१ हजार घरगुती, खाजगी व व्यावसायिक नळाची संख्या असुन १३१० स्टॅण्डपोस्ट व १३० कुपनलिका आहेत. महानगरपालिकेचे सध्याचे पाणी पुरवठयाचे दर वार्षिक रुपये एक हजार प्रति कनेक्शन घरगुतीसाठी, रुपये चार हजार प्रति कनेक्शन औद्योगिक कारणासाठी आहेत. पाणी पुरवठयाचा दर रुपये एक हजारावरुन एकदम प्रती कनेक्शन २४०००/- करणे म्हणजे १५०% वाढ करणे हे आवश्क असले तरी एकदम अशी वाढ करणे आवश्यक असले तरी एकदम अशी वाढ करणे प्रशासनास योग्य वाटत नाही.

परंतु पाणी पुरवठयांमध्ये होणारा तोटा लक्षात घेता त्यांमध्ये काही अंशी वाढ करणे नितांत गरजेचे झालेले आहे. सबब घरगुती कारणासाठी लावण्यात येणारा प्रचलित दर रुपये एक हजार ऐवजी किमान रुपये एक हजार पाचशे करावा असे प्रशासनाचे मत आहे. तसेच व्यापारी व औद्योगिक कारणासाठी प्रती कनेक्शन वार्षीक रुपये चार हजाराऐवजी रुपये चार हजार पाचशे असे दर असावे असे प्रशासनाचे म्हणणे आहे. सदरहु दरवाढ मान्य केल्यास पाणीपट्टीमधील तुट काही अंशी कमी होण्यास मदत होणार आहे.

प्रशासनाने अंदाजपत्रकामध्ये सादर केलेले प्रस्ताव मान्य झाल्यास जकात पोटी रुपये ५२.०० कोटी, मालमत्ता करापोटी रुपये १५.०० कोटी शाासकीय अनुदान रुपये ५.०० कोटी व इतर करापासुन मिळणारे उत्पन्न लक्षात घेता रुपये १०६ कोटी ७९ लाख २९ हजार महानगरपालिकेच्या जमेच्या बाजुला प्राप्त होतील.

सादर करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकामध्ये या वर्षी मोठे प्रकल्प घेण्याचे प्रशासनाने प्रस्तावित केलेले नाही. यापूर्वी अनेक मोठे प्रकल्प हातामध्ये घेण्यात आले असुन ते सर्व मार्गी कसे लागतील व त्यासाठी निधी कसा उपलब्ध होईल. हे पाहण्याचा प्रशासनाचा दृष्टीकोन आहे. यामध्ये विशेष करुन प्रशासकीय इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र, भारत माता मंदीर, झाल्टा येथील जलनिःसारण योजना, मुख्य जलनिःसारण वाहिण्या, नक्षत्रवाडी ते रेल्वे स्टेशन १४०० व्यासाची एम. एस. पाईप टाकणे, रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरण इत्यादी कामांचा समावेश आहे. तसेच वार्डातील लहान मोठी कामे व जनतेच्या मुलभुत गरजांवर आधारित असलेली कामे पूर्ण करण्याचा प्रशासनाचा निर्धार आहे, ज्यामध्ये रस्ते, गल्लीतील फरश्या, विद्युत दिवे, जलनिःसारण वाहिन्या, प्रशासकीय खर्चामध्ये काटकसर इत्यादी बाबींचा समावेश आहे.

एकुण उत्पन्न रुपये १०६ कोटी ७९ लाख २९ हजार व एकुण खर्च रुपये १०६ कोटी ७६ लाख ३५ हजार लक्षात घेता रुपये २ लाख ९४ हजार खर्चाचे शिलकी अंदाजपत्रक स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करित असतांना मला आनंद होत आहे.

"ऋण निर्देश"

सन १९९८-१९९९ या आर्थिक वर्षामध्ये मा. पालकमंत्री श्री. चंद्रकातजी खैरे यांचे विशेष प्रयत्नामुळे या मनपास ४ कोटीचे विशेष शासकीय अनुदान मिळाले आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात ही या मनपा ५ कोटी चे विशेष शासकीय अनुदान मिळणार आहे. त्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री यांनी घोषणा केलेली आहे. तसेच अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा. श्री. हरिभाऊ बागडे, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष ॲड. श्री. प्रतापराव बांगर आणि जिल्हयाचे माजी खासदार श्री. प्रदिपकुमारजी जैस्वाल यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांचे ऋणनिर्देश करणे माझे कर्तव्य समजतो. स्थायी समितीचे अभ्यासु व सुस्वभावी अध्यक्ष मा. जयवंत ओक तसेच सर्व

सन्माननीय सभासद यांनी मला ९८-९९ च्या कालावधीत वेळोवेळी जे मोलाचे मार्गदर्शन केले व सहकार्य दिले, त्याबद्दल त्या सर्वांचे व्यक्तशः व कर्मचाऱ्यातर्फे सुध्दा मी ऋणी आहे. तसचे आदरणी महापौर सौ. शिलाताई गुंजाळे, उपमहापौर डॉ. भागवत कराड, सभागृह नेता श्री. अविनाश कुमावत, विरोधीपक्ष नेता श्री. अफसरखान व स. नगरसेवक, नगरसेविका यांनी वेळोवेळी दिलेल्या सहयोगाबद्दल व प्रोत्साहनाबद्दल मी व माझे सहकारी त्या सर्वांचे मन:पुर्वक आभार मानतो.

हे अंदाजपत्रक तयार करतांना सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी जे विशेष परिश्रम केले, त्याबद्दल मी त्यांचा गौरवाने उल्लेख करु इच्छितो. या शहरातील सर्व पत्रकार बंधु, सिटी चॅनेल व आकाशवाणी यांनी वेळोवेळी जे सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचेही ऋण व्यक्त करतो. धन्यवाद.

**श्री. संजय जोशी :** आजच्या अर्थ संकल्पात जो १०.०० कोटी रु. ची तुट आलेली आहे. त्यास सर्वस्वी जबाबदार वसुली विभाग आहे. मालमत्ता व पाणीपट्टी बाबत जे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले होते. त्याप्रमाणात वर्ष आखेरपर्यंत वसुलीचे उद्दिष्ट प्राप्त का होत नाही. वसुलीसाठी प्रशासनाची भुमिका कठोर नाही त्यामुळे रु. १०.००कोटीची तुट प्रशासनास पडणार आहे. व शहराच्या विकास कामात मात्र अडथळे या तुटीने होणार आहे. या अर्थसंकल्पात रिव्हाईज्ड मध्ये त्रुटी का येतात व एवढया मोठया प्रमाणात तुट प्रशासनास येण्याचे कारणे काय आहेत ते स्पष्ट करावेत.

**श्री. लांडगे, श्री. विश्वरोधीन :** रु. १० कोटीची तुट कशी आली हे १० कोटी आले असते तर विकासाची कामे झाली असती वसुली विभाग सक्षम नाही का.

**उपआयुक्त (म.) :** मागिल वर्षी प्रशासनाने अंदाजपत्रकात जकातीचे उद्दीष्ट ४६.०० कोटीचे ठरविलेले होते मात्र सर्वसाधारण सभेने ते ४८.०० कोटी केले. जकातीचे उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी ही प्रशासनातर्फे प्रयत्न करण्यात येत असुन अजुन दिड महिण्यात प्रगती होण्याची शक्यता आहे. मात्र काही कारणामुंळे जकातीवर परिणाम झालेला नाही.

१) एक्सकार्ट फिसमुळे जकात आयात -निर्यातीवर परिणाम झालेला आहे.
२) औद्योगिक क्षेत्रासाठी आवय-जावक मालावर जागतीक मंदी असल्याने बाजारपेठेत सुध्दा याचा परिणाम होऊन अंदाजे रु. ३.०० कोटीची घट झालेली आहे.
३) मालमत्ता कर व पाणी पट्टीचत्रे जे उद्दिष्ट ठरवुन दिलेले होते. त्याप्रमाणे प्रशासनाने पुर्णपणे कार्यरत आहे मात्र प्रशासनास काही कर्मचारी वर्ग आवश्यक तो असावयास पाहिजे तो मिळणे आवश्यक आहे. सध्या मालाच्या करापोटी आतापर्यंत रु. ६.०० कोटी वसुली झालेली आहे. व बाकी मार्च आखेरपर्यंत उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी कसोशिने प्रयत्न करण्यात येणार. त्याचाप्रमाणे पाणीपट्टी यासाठीचे उद्दिष्ट ठरविल्याप्रमाणे याबाबत सुध्दा प्रशासन युध्द पातळीवर प्रयत्न करीत आहे.
४) मालमत्ता व पाणीपट्टीची वसुली प्रभावी रित्या होणेसाठी "झा" समितीने शिफारस केल्यानुसार प्रति २५०० मालमत्तांसाठी एक कर निरिक्षक, एक कनिष्ठ लिपीक व एक शिपाई या प्रमाणात कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन

देण्यात यावा. औरंगाबाद शहरात साधारणत: एक लाख मालमत्ता आहेत. "झा" समितीने ठरवुन दिलेल्या निकषाप्रमाणे मालमत्ता कर वसुलीसाठी ४० कर निरिक्षक, ४० कनिष्ठ लिपीक व ४० जवान देण्यात यावे. सध्या ७ विभागीय कार्यालयामधुन कर निरीक्षक, १६ कनिष्ठ लिपीक, कार्यरत आहेत.

**श्री. गौतम लांडगे :** प्रशासनाने मागील वर्षाचे जकातीचे उद्दिष्ठ रु. ४६.०० कोटीचे ठेवलेले होते. व सर्वसाधारण सभेने ते वाढवून रु. ४८.०० कोटीचे ठेवले, परंतु जे प्रशासनाने ठरविलेले उद्दिष्ट तरी पुर्ण केलेले आहे काय ? सध्या पर्यंत किती जकात वसुली झालेली आहे.

**उपआयुक्त (म) :** जकात वसुली सध्या पर्यंत ३६.०० कोटीची झालेली आहे. माहे फेब्रूवारी शेवट पर्यंत रु. दीड कोटी व मार्च महिण्यात उर्वरीत ५.०० कोटी अपेक्षित आहे.

**श्री. गौतम लांडगे :** जर प्रत्येक महिण्यात ५.०० कोटी जकात वसुली धरल्यास बारा महिण्याचे ६०.०० कोटी रु. होतील. सध्या तर ४६.०० कोटीचे उद्दिष्ठ आपण गाठु शकत नाही. जकातीचे माहे जानेवारी व फेब्रूवारी वसुली तक्ता काय आहे ते दाखवावे.

**उपआयुक्त (म) :** मागील वर्षीचे व या वर्षीचे माहे जाने., फेब्रुवारी व मार्च ९८ चे जकात वसुलीचा तक्ता वाचुन दाखविला.

**श्री. अशफाक सलामी :** डिसेंबर ते मार्च पर्यंतचे जकातीचे उत्पन्न का वाढते कारण कारखानदार हे आपल्या कारखान्यातुन मालाची आयात निर्यात याच वेळेस करतो, त्यामुळे बऱ्याचशी मालाची आवक वाढते. त्यामुळे उत्पन्नातही फायदा होतो. यासाठी कारखानदार कच्चा व पक्का मालाची आयात निर्यात करुन उत्पन्न वाढविण्याचे प्रयित्न करतात, ज्यामुळे शहरातील जकात वसुली उत्पन्नातही भर पडते, परंतु कारखानदारांचे वार्षिक हिशेब डिसेंबर ते डिसेंबर असते, तर शासनाचे कॅलेंडर वर्ष माचे ते मार्च असते त्यामुळे डिसेंबर महिन्यातही वसुली जादा होण्यास काहीच हरकत नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** जकातीची वसुली मार्च ९७ ते एप्रिल ९८ व एप्रिल ९८ ते आतापर्यंत किती वसुली झाली याची माहिती द्यावी.

**जकात अधिक्षक :** (माहिती वाचुन दाखविली)

| | | | |
|---|---|---|---|
| सन | १९९७-९८ | एप्रिल | २.१७ कोटी |
| | १९९८-९९ | एप्रिल | ३.१३ कोटी |
| | १९९७-९८ | फेब्रूवारी | ३.०३ कोटी |
| | १९९८-९९ | फेब्रूवारी | १.७१ कोटी १५ तारखेपर्यंत |

**श्री. संजय जोशी :** प्रशासनातर्फे जे सांगितले जाते अर्थ संकल्पातील तरतुदीनुसार उद्दिष्ट गाठण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करावे लागतात, तरीही तुटीचा अर्थसंकल्प सादर का करतात? ज्यामुळे विकास कामांवर परिणाम होतो.

**श्री. गौतम लांडगे :** मागील वर्षी जकाती पोटी रु. ३१.०० कोटी वसुल झालेले होते आणि त्यामुळे प्रशासनाने रु. ४६.०० कोटीचा अर्थसंकल्प सादर केलेला होता मग या वर्षी अर्थसंकल्प तुटीचा पुरणार करणार काय? सदरील अर्थसंकल्प चूकीचा सादर करु नये. सध्या ४० दिवस शिल्लक आहेत त्यामुळे मागिल वर्षीच्या रु. ३१.०० कोटीचा उद्दिष्ठ सुध्दा गाठू शकणार किंवा नाही अशी शंका येते.

**श्री. अशफाक सलामी :** ज्या अर्थी प्रशानाने अर्थसंकल्पात जे उद्दिष्ट जकात संदर्भात ठेवलेले होते ते पुर्ण करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारे तुटीचा अर्थसंकल्प सादर केल्यास ती तुट भरुन काढण्यासाठी कसोशिने प्रयत्न करावे लागते अन्यथा विकास कामावर त्याचा अनिष्ठ परिणाम होते.

**श्री. विकास जैन :** देशातील अर्थसंकल्पात सदर होणार असुन त्यामुळे औद्योगिक कारखानदारवाले डिसपॅच थांबवता मार्च मध्ये डिसपॅच सुरु होते. त्यामुळे जकाती मध्ये वाढ होण्याची शक्यता असते. रु. ४२ कोटी पर्यंत जाऊ शकतो. बराचशा माल हे औद्योगिक क्षेत्रातील कारखानदार साठवुन मार्च हे वर्षाचे शेवटचे (इयर एन्डींग) दिवस असतात उत्पन्न मिळविण्यासाठी जास्त प्रमाणात प्रयत्न करतात. अशा कारखानदारामुळे वर्षाच्या अखेरीस जकातीपोटी उत्पन्नात सारखी वाढ होत असते, त्यामुळे रु. ४०-४१ कोटीचे उत्पन्न वाढु शकेल.

**मा. आयुक्त :** सर्व साधारण सभेने ४८.०० कोटीचे जकातीचे उत्पन्न अपेक्षित केलेले होते आणि प्रशासनाने ते रु. ४६.०० कोटीचे गृहीत धरलेले होते. गेल्या ५ वर्षाच्या जकातीचा तक्ता पाहिल्यास प्रत्येक वर्षी जकातीपोटी वाढच होत गेलेली आपणांस दिसुन येईल.

| | | |
|---|---|---|
| ९४-९५ | २५ कोटीचे उद्दिष्ट | व २४ कोटी वसुल झाले |
| ९५-९६ | ३० कोटीचे उद्दिष्ट | व २९ कोटी वसुल झाले |
| ९६-९७ | ३२ कोटीचे उद्दिष्ट | व ३० कोटी वसुल झाले |
| ९७-९८ | ३९ कोटीचे उद्दिष्ट | व ३८ कोटी वसुल झाले |
| ९८-९९ | ४८ कोटीचे उद्दिष्ट | व ४२ कोटी पर्यंत निश्चित पोहचू |

असा अंदाज आहे. अर्थसंकल्प अंदाज आहे. साधारणतः मार्च महिण्यात मालाची आवक वाढते. बजेट काय वाढ व काय घट याचे अंदाज असतात. १५ फेब्रूवारी पर्यंत ३५.५० कोटी वसुल झाले दररोज सरासरी रु. ११,१२,१३ लक्ष जकात वसली अपेक्षित धरलि तर रु. ५ कोटी वसुली होऊ शकेल. यासाठी विशेष प्रयत्न होत असुन विशेष भरारी पथक, ओपन डिलेव्हरी, खाते तपासणी, ट्रान्सपोर्ट्ची तपासणी इत्यादी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. मार्च मध्ये होणारी आवक विचारात घेता रु. ४२ कोटी पर्यंत जाऊ शकेल.

**श्री. विश्वरोद्दीन :** मागिल प्रत्येक वर्षी साधारणः रु. १ कोटीची घट होते. या वर्षात ६ कोटीची घट का झाली या माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** जकातीच्या उत्पन्नात दर वर्षी वाढ होत असल्याचे दिसुन येत. परंतु त्याचे एकुण टक्केवारी प्रमाणे वसुली वाढ होणे आवश्यक आहे. आता पर्यंत प्रत्येक वर्षी रु. १.०० कोटीची तुट होती परंतु या वर्षी चक्क जकाती पोटी रु. ६.०० कोटीची तुट दिसुन येते. याचे कारण काय ? या वर्षीचे उद्दिष्टानुसार रु. ४०.०० कोटीची वसुली होणार नाही. वसुली विभाग कोठे तरी कमी पडले आहे.

**श्री. अशफाक सलामी :** ३०% आवक जकातीच्या उद्दिष्टांचे रु. ४८.०० कोटी पर्यंत पुर्ण करण्यासाठी सर्वसाधारण सभेने सभागृहात मंजुर केले. तरीही जकातीसाठी आवश्यक लागणारे प्रयत्न प्रशासनातर्फे केले गेलेले नाही. त्यामुळे यासाठी कोणती उपाययोजना करावी व काय करावे लागणार यासाठी कसोशिने प्रयत्न करणे आवश्यक होते. जास्तीत जास्त वसुली रु. ४१.०० कोटी पेक्षा

जास्त होणार नाही व त्यामुळे ४८.०० कोटी अर्थसंकल्पात तरतुद केलेली चूकीची असुन यावर्षी ती वाढ करुन ५२.००कोटीचे केलेले आहे. ती कोणत्या प्रकारे होईल याची माहिती प्रशासनाने द्यावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार ज्या उत्पन्नाशी निगडीत विभागाची वसुली होण्यास व अर्थसंकल्पात घट होण्यास कारणीभुत कारणे काय आहेत या बाबतची कल्पना येते. जकातीसाठी उत्पन्नात वाढ होणेसाठी स्टॅपिंग पॅटर्न नुसार कर्मचारी देणे आवश्यक आहे त्यासाठी प्रशासनाने ते पुरविणे आवश्यक आहे.

**श्री. विकास जैन :** जकात महानगरपालिकेचे ह्दय आहे. सध्या जकात अधिक्षक एकच पद आहे व दिवसेंदिवस वाढता व्याप लक्षात घेताव जकातीवर जास्त लक्ष केंद्रित करणे व नियंत्रण ठेवणेसाठी अति. जकात अधिक्षक असणे आवश्यक आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** या वर्षीच्या जकात उत्पन्नात १५% वाढ असणे आवश्यक आहे. मागील वर्षी ३८.०० कोटीचे ४०.०० कोटी व्हावयास पाहिजे परंतु या प्रशासनात सक्षम व अनुभवी अधिकारी महसुलसाठी नसल्याने जकाती वरील उत्पन्नात परिणाम होत आहे. ज्यामुळे त्यांचेकडे हा विभाग पर्यायाने महापालिकेच्या आर्थिक विभागाशी निगडीत असल्याने तो का दिला जातो ज्यामुळे तुटीचा अर्थसंकल्प सादर केला जातो आणि ते भरुन निघणे सध्या तरी शक्य नाही.

**श्री. स. अ. एकबालोधीन :** अधिकाऱ्यांमध्ये सध्या तरी कोणत्याही प्रकारे वाढ होता काम नये. गोदाम महानगरपालिका हद्यी बाहेर गेले आहेत. रात्री अंधारात व कच्चा रस्त्यायने माल जातो.

**मा. सभापती :** मागिल वर्षी प्रशासनाने रु. ४६.०० कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले असुन सध्याचे जकातीचे वसुली अन्वये ते पुर्ण होणे शक्य नाही. त्यामुळे पदाधिकारी प्रशासनावर वेगळे वेगळे आरोप लावतात, यापेक्षा जकातीच्या उत्पन्नावर जर प्रशासनाचे नियंतत्रण नसल्यास खाजगीकरण का करु नये ? याचा विचार व्हावा. तेंव्हा या वर्षीच्या अर्थसंकल्पात जे रु. ५२.०० कोटीची तरतुद केलेली आहे. त्यावर कशा प्रकारे उद्दिष्ट पूर्ण करणेसाठी उपाय योजले जातील याकडे लक्ष द्यावे.

**उपआयुक्त (म) :** या वर्षी ४२.०० कोटीवर १५ % वाढ म्हणुन रु. ४८.०० कोटी व रु. ४.०० कोटी अपेक्षित दरवाढ गृहीत धरुन रु. ५२.०० कोटीची तरतुद अर्थसंकल्पात केलेली आहे.

**श्री. गौतम लांडगे, श्री. संजय जोशी :** या वर्षीच्या अर्थसंकल्पात जकातीसाठी १५% वाढ कुठे केली याची माहिती द्यावी, मागील वर्षी प्रमाणे यावर्षी आवश्यक ती वाढ झालेली नाही तुट येण्याचे कारण काय ? यासाठी प्रशासन कुठे तरी कमी पडते.

**उपआयुक्त (म) :** दरवर्षी १५% वाढ अपेक्षित धरल्या जाते, त्यापेक्षा ८ ते १० % वाढीने वसुली होते. ऑक्टोंबर महिण्यात जकात दराबाबत सर्वसाधारण सभेने दुरुस्तीसह मंजुर केलेले आहे त्याचा परिणाम जकातीवर होतो.

**श्री. संजय जोशी :** पुढील वर्षी जकात वसुलीचे बाबतीत काही कारणे प्रशासनाने उद्दिष्ट पूर्ण करणेसाठी ठरविलेले आहे काय ? याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** जकात उत्पन्नात घट रु. ७.०० कोटीची दिसून येते, त्या साठीची खाजगीकरणास सर्वानुमते संधी द्यावी, कारण दरवर्षी १५% वाढ धरल्यास आता पर्यतची दरवाढ कुठे गेली .

**उप आयुक्त (म) :** सन १९९६-९७ व ९७-९८ या आर्थिक वर्षात जकात उत्पन्नात सारखी वाढ झालेली आहे, जे ९६-९७ मध्ये दर होते ते ९७-९८ च्या या आर्थिक वर्षात वाढ करुन वसुल झालेली आहे. एप्रिल व मे महिण्यात जे जकातीची वसुली झालेली होती ती जुन्याच दराने झाली होती. तुलनात्मक तक्ता जर पाहिला तर प्रत्यक्षात वाढ किती झाली हे आपल्याला लक्षात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १९९६-९७ | एप्रिल | २.५० | कोटी वाढ |
| ९७-९८ | --//-- | २.१७ | कोटी वाढ |
| | मे | २.८० | कोटी वाढ ३० ते ४० लाखाचा फरक |
| | जुन | ३.०० | --//-- २५ ॲटमवर वाढीने रु. ८०.०० लाख जास्त |

सन १९९४-९५ चे दर आहे. सन १९९७-९८ ला आपण लागु केलेले आहे. ३.४६ कोटी जुलै मध्ये वसुल केले. ऑक्टोंबर महिन्यात जवळपास ४४ लाखाची घट झालेली दिसुन येते याचे कारण आर्थिक व जागतिक मंदी हे संपूर्ण राष्ट्रातील जागतिक पातळी वर आलेली आहे त्यामुळे इतर महापालिकांशी तुलना केली असताही महापालिका जकातीच्या वसुली बाबत क्रमांक २ वर आहे. जागतिक मंदी ही कुणाच्या हातात नाही, हि मंदी जवळपास ४० वर्षानंतर येते. त्यामुळे जकात वसुलीवर परिणाम होत आहे. या पुर्वी ही मंदी १९३७ व १९६६ नंतर आता या वर्षी आलेली आहे. अजुन ही आर्थिक मंदी साधारणतः दोन वर्ष चालु आलेली आहे. अजुन ही आर्थिक मंदी साधारणतः दोन वर्ष चालु राहिल असे अर्थ तज्ञांचे मत आहे. एवढे सर्व असुनही वसुली बाबत (महसुल) अधिकाऱ्यांवर आक्षेप येत असतील तर मी व्यक्तीगतरित्या माझे मत मांडु शकतो. इतर महापालिकेचे तुलना केली असता, रु. १.९५ कोटीने जास्त वसुली केलेली आहे. स. सदस्यांनी विकास कामांबाबतची तळमळ लक्षात घेता येथिल अधिकारी सक्षम नाहीत असे बोलले जाते त्या चांगल्या भावनेशी निगडीत आहेत मागील रु. १.०० कोटीची एक्साईर्टची फीस वसुली अद्यापही शासनाकडुन मंजुरी न आल्याने व रु. ४६.०० कोटीचे जी.बी. ने केलेले रु. ४८.०० कोटीची म्हणजे रु. २.०० कोटीची वाढ असे धरुनरु. ३.०० कोटीची तुट या जकात मध्ये झालेली आहे. ही तुट भरुन काढण्यासाठी प्रशासनातर्फे कसोशिने प्रयत्न केले जात आहे. मागिल वर्षी दंडात्मक कार्यवाहीने रु. ७.०० लाख वसुल केले तर या वर्षी रु. १४.०० लाख वसुल केले. वेळोवेळी जकात अधिक्षक त्यांचे अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवुन जकात वसुली साठी प्रयत्न केले जातात. वेळ प्रसंगी कर्मचाऱ्यांवर दंडात्म कार्यवाही, वेतनवाढ थांबविणे, सक्त ताकिद देणे इ. प्रशासकीय दृष्टया नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते या कामी प्रशासन आपले अधिकार वापरुन कामा बाबत सक्षम आहे.

**मा. सभापती :** ५२.०० कोटीचे तरतुद या वर्षीसाठी जकात बाबत ठेवलेली आहे. यासाठी खाजगीकरणाचा प्रस्ताव ठेवावा त्यामुळे जर ५५.००कोटी मिळकत असतील महापालिकेचा आर्थिक फायदा होईल सर्वानुमते विचार व्हावा.

**श्री. संजय जोशी, श्री. गौतम लांडगे :** खाजगीकरणाचा प्रस्ताव ठेवावयाचा असल्यास प्रशासनामार्फत यावा. मागील वर्षाचे उद्दिष्ट रु. ४६.०० कोटीचे प्रशासनाने ठेवले त्या वरुन सर्वसाधारण सभेने रु. ४८.०० कोटीचे केले तर किमान ४२.०० कोटीची वसुली तरी या वर्षी होईल काय ? याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** मागील वर्षाप्रमाणे जकात बाबत ठेवलेले उद्दिष्ट त्यावर्षी पूर्ण झालेले नाही. तसेच याही वर्षी ४८.०० कोटीची तरतुद ठेवुन ४२ कोटी पुर्ण होत किंवा नाही याची शंका आहे. शिवाय सन २००० मध्ये ५२.०० कोटीचे फुगवून जकातीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे हे कितपत उद्दिष्ट पार पाडल्या जाते सांगता येत नाही.

**श्री. विश्वारोद्दीन :** जकात वाढ दरवर्षी प्रमाणे १५% वरुन २०% केली तर वसुली ५०.०० कोटीची पुर्ण होणार काय?

**श्री. अशफाक सलामी :** खाजगीकरण केल्यास जकात वसुली यशस्वी होईल असे म्हणणे असल्यास प्रशासनामार्फतच वसुली पूर्ण का होणार नाही याचे कारण काय ? याचा अर्थ प्रशासनातील कर्मचाऱ्यांवर दोष आहे काय ?

**मा. सभापती :** पृष्ठ क्र. १ जकात पासुन चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा.
१)

**श्री. संजय जोशी :** "आर" फॉमची सवलत दिल्यास रु. २.६५ कोटीची घट कशी होणार याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त :** साधारणतः समजा लघुउद्योजक कडुन कर रु. १.०० घेतला जातो लघुउद्योजकांच्या मालावर प्रकीया नंतर जो माल जातो त्यावर त्यांना रु. १.०० मधुन ९० पैसे परत दिल्या जातो. म्हणजे महानगरपालिला फक्त १० पैसेच प्राप्त होतात त्यामुळे रु. २.६५ कोटीची घट महापालिकेस होणार.

**श्री. गौतम लांडगे, श्री. प्रभाकर विधाते :** जर महापालिकेस २.६५ कोटीची घट मिळत असल्यास "आर" फॉर्म सवलत रद्द करावी, जेणे करुन महापालिका अनेक प्रकल्प राबविते त्यांना विकास कामे करण्यास पुरेसा पैसा मिळणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** एखाद्या कारखान्यात एका वस्तुंवर प्रकिया पूर्ण करण्यासाठी माल येतो परंतु त्या वस्तु वरील आकारमानात काहीही बदल होत नाही तर मग.

**श्री. विकास जैन :** सेमी फिनिशड गूड्स जे असते कोण्ताही कारखानदार आपले उत्पन्न वाढविणेचे किंवा फायदा होण्याचेच प्रयत्न करणार आहे. कोणत्याही वस्तुवर प्रक्रिया करावयाची झाल्यास त्याचा फायदा होण्यासाठी तो माल पाठवितो व त्यात जरी बदल नसला तरी त्याचा वस्तुवरील पुर्ण प्रकिया केल्या जातो पर्यायाने त्याचा फायदाच होऊन बाजारपेठेत विकल्या जाते यासाठी "आर" फॉम सवलत महापालिकेने बंद करावी व महापालिकेच्या उत्पन्नात घट येऊ देऊ नये.

**श्री. संजय जोशी :** कोणत्याही वस्तुंच्या किमंतीवर जकात ना घेता याबाबत सविस्तर माहिती घ्यावी. रु. २.६५ कोर्टीची तुट येणार नाही.

**उप आयुक्त (म) :** जकातीचे नियम १६ (ई) मध्ये तरतुद आहे एखाद्या कारखान्यातील वस्तुवर कोणत्याही प्रकारची आकारमानात बदल होत नसल्यास ज्या

मालकाकडुन सदरील वस्तु आलेली आहे व परत त्याच मालकाकडे वस्तु जाते त्या मालावर १०० टक्के जकाम आकारुन त्यातील ९० टक्के जकात परत केल्या त्यामुळे १० टक्के जकातीमुळे वर्ष भरात अंदाजे २.६५ कोटीची घट जकाती पोटी होणार आहे. मुंबई महापालिकेच्या धर्तीवर सदरील प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे.

**श्री. गौतम लांडगे :** "आर" फॉमची सवलत रद्द करावी जेणे करुन जकात उत्पन्नात २.६५ कोटीची घट येणार नाही. या ठिकाणी मुंबई मनपाचा प्रस्ताव या मनपाशी लागु नसल्याने प्रस्ताव रद्द करावा व जकात घट कमी करावी.

**मा. आयुक्त :** "आर" फॉम बाबत शहरातील लघु उद्योजक सुशिक्षित बेरोजगांराना उत्तेजित करण्यासाठी महानगरपालिकेने हा निर्णय घेतलेला आहे, ज्यामुळे चिकलठाण्यातील कामगांराचे भवितव्य असलेले कारखाने बंद पडलेले आहेत. "ओमेगा" कंपनीने याबाबतीत कोर्टात केस दाखल केलेली आहे. "आर" फॉम मुळे दोन्हीही बाजुने चर्चा करावी, जेणे करुन चिकलठाणा येथील बंद पडलेले कारखाने पुन्हा चालु होतील.

**श्री. प्रभाकर विधाते :** चिकलठाणा येथील कारखाने बंद होण्यासाठी त्यास कारणे वेगळी आहेत. कारखान्याचे मालक कारखाने उघडतात व सबसिडी खाऊन घेतात व प्रॉडक्शन पुरेसे नाही, जकात त्या प्रमाणात लागेल म्हणुन कारखाना बंद करतात त्यामुळे सदरील "आर" फॉम रद्य करावे.

**श्री. विश्वारोधीन :** "आर" फॉर्म बाबत घट किंवा नफा याबाबत जास्त चर्चा न करता सदरील प्रस्ताव रद्द करावा, असा फेर प्रस्ताव पुन्हा प्रशासनाने सादर करावा.

**उप आयुक्त :** "ओमेगा" कंपनीने कोर्टात केस दाखल केलेली आहे. मालाच्या आयातीवर १००% जकात आकारुन परत त्याच मालाकाकडे परत पाठविल्यास त्यांना ९०% जकात परत द्यावे लागते म्हणजे १०% जकात आकारणी होते. याबाबत सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली असुन कोर्टामध्ये शपथपत्र दाखल केलेले आहे. याबाबत औद्योगिक क्षेत्रातील प्रत्येक कारखान्यांमध्ये प्रत्यक्षात भेट देऊन याची पाहणी केलेली आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी कंपनीने "आर" फार्म बाबत कोर्टात केस दाखल केलेली आहे. व याबाबत सर्वसाधारण सभेने मंजुरीही दिलेली आहे. तेंव्हा याबाब काय निर्णय घ्यावयाचा याची सर्व चर्चा पुन्हा सर्वसाधारण सभेत करावी.

जकात दरसुची "ओ" दर वाढ प्रस्ताव

| अ. क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | प्रस्तावित दर | स्थायी समितीने शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ५ अ. | हायड्रोजिनीटेडतेल, वनस्पती किंवा खाद्य तेलाच्या निर्मितीलासाठी लागणारे तेल | १% | २% | १% |
| ब. | खाद्य तेलाचे इतर सर्व प्रकार शुध्द तेल, लोणी, शुध्द तुप, वनस्पती तेल | १% | २% | १% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ अ. | साखर, खडी साखरख चमचमी आणि बुरा साखर | १% | २% | १% |
| ब. | सर्व प्रकारचा गुळ व राब काकवी, पेंड खजुर, शिरा, ऊस | १%<br>१% | २%<br>१% | १%<br>१% |
| ९. | चहा कॉफि व कॉफि बिया | २% | ४% | २% |
| १०. | केशर व कस्तुरी | २% | ४% | ४% |
| ११ अ. | सुकलेले बोंबिल,<br>डुकराची पातळ चरबी, डबा, बंद मासे फेरी कासेसे अन्न,<br>डबाबंद कोंबडीचे मांस | २%<br>२% | ४%<br>४% | ३%<br>४% |
| ११ क. | ग्लुकोज, मध, बटाटा, वेफर्स व चिप्स, दुधाची पावडर, मलाई, श्रीखंड, आम्रखंड, सर्व प्रकारचे सरबत खवा, साय करिन, चक्का, लस्सी, कोकम करी पावडर, कस्टर्ड पावडर, रस, शितपेय, व सर्व प्रकारचे खाद्यतेल तयार केलेली व साठवलेली मिठाई खनिज पाणि, खाण्या योग्य बेकण आणि टॅम कोरडे लोणी, सुकलेले किंवा ठेवलेली फळे आणि कठिण सालाची फळे, सुपारी, सुकलेले मासे, खवा मिठाई, जॅम आणि जेली आटवलेले दुध आणि ठेवलेले आईस्क्रीम सर्व प्रकारचे पिष्टमय पदार्थ, पिकलेले कोका, कोकाच्या बिया, चॉकलेटस, बिस्कीटस्, डुकराची चरबी , मावा दुधाची मलाई, चक्का आणि दही, फळाचा रस, शरबत आणि पेय, ग्लुबजेड, एवस्ट्रेज किंवा कोणत्याही प्रकारच्या फ्रुट शुगर आणि खाद्य तेला व्यतिरिक्त, तेल साठा , बेंकीग किंवा करी पावडर, सॅकरीन सर्व प्रकारचे अन्नाचे रंग आणि इतर सर्व प्रकारचे जव, पापड, कोणत्याही प्रयोजनासाठी साठवण्यात आलेले मांस, होल दूध किंवा टोन्ड दूध, स्कीम दुध, भुकटी किंवा नीर या व्यक्तीरिक्त विनिदिष्ठपणे तरतुद न करण्यात आलेले इतर सर्व प्रकारचे मालावर | २% | ४% | ३% |
| १२ अ | गॅस भरलेले सर्व प्रकारचे सिलेडर, सॅनिटरी टॉवेल्स, बॅंडेज, जंतुरहित कापुस, या सह जंतुरहित वस्तु | १% | ३% | १% |
| ब | औषधी, आर्युवेदीक औषधी, ॲलोपॅथिक औषधी, होमियोपॅथिक औषधी व युनानी औषधी | १% | २% | १% |
| १४ ब | शोभिवंत झाडे व रोपटे, सर्व प्रकारची फुले व फळांची रोपटे | १% | २% | २% |
| १६ | सर्व प्रकारचे गोड ब्रेड, बेरी इ. | २% | ३% | ३% |
| १८ | पोटॅश, रिठे, तुरटी, सरस, शिकेकाई, सोडा भांडी, कपडे आणि फरशी घासण्यासाठी वा परले जाणारे शुध्द | १% | ३% | ३% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मिठ. | | | |
| १९ अ | पांढरी व लाल सुपारी व इतर सर्व प्रकारची मसाला सुपारी | १% | ३% | ३% |
| ब | कापुर<br>विलायची, जायफळ, ओलाचा सिड्स लवंग सिनानॉम,गरम मसाला, मसाल्याच्या वस्तु | १%<br>१% | ३%<br>३% | १%<br>२% |
| २० | ओवा, अंबीहळद, दगडफुल, उद, कात, कडकी, बीज, खसखस, गुलाब, गोडिंबी, ससरस, डिंक, जिरा, काळेमिह, बुक्का, राळ, शेंदुर, खान्याचा सोडा, सनजिरा, शेंदे मिळ, धणे, खोबरे, साबुदाना, मिरची, हळद, मसाला पावडर, आणि सर्व प्रकारच्या किराणा वस्तु, खान्याचा रंग हिंग सुंठ या व्यतिरिक्त विनिदिष्ट न केलेल्या सर्व प्रकारच्या किराणा वस्तु. | १% | २% | १.५% |
| २६ ब | कोळसा व कोह (दगडी कोळसा) हार्ड कोक, | ३% | ४% | ४% |
| २७ | फटाके, दासकाम व त्याचे घटक भाग आणि स्फोटक, कॅलशियम कार्बाईड | ४% | ५% | ५अ |
| २८ | इलेक्ट्रीकल गॅस, लाईटर, गॅस लाईटर पेटविण्याच्या वस्तु व त्याचे सुटे भाग | २% | ३% | २% |
| २९ ब | बुट पॉलिश व धातु पॉलिश | २% | ३% | ३% |
| ३० | आखात तेल, बिया, लिंबोळी, सारकी, एरंडी, अखाद्यतेल, शुध्दतेल, कॉटन बॉश ऑईल, एरंडतेल, इ. आयात केलेले राईस ब्रॅड ऑईल, आयात केलेले राईस ब्रॅड आईल, आयात केलेले खाद्य व आखात तेलाची निर्मिती | १% | ३% | २% |
| ३१ | औद्योगिक अल्कोहल जसे : आईलीन, टाऊलीन, ॲसीटोन, औषधीत वापरण्यात येणारे क्लोरोफॉर्म बेनझि‍ान सोलॅक्स इथईल ॲमिटेक्स आणि ईथाईल, अल्कोहोल, आयसोप्रोफिल, अल्कोहोल, रोटेस्टॉरिधो, अल्कोटील इत्यादी. | १.४% | ४% | ४% |
| ३२ | ग्रीस व पेट्रोलियम जेली , पॅराफिन जेली, पॅराफिन व्हॅक्स | २% | ३% | ३% |
| ३३ ड | औषधी तयार करण्यासाठी सर्व प्रकारची रसायने (औषधी गुणधर्म ग्रंथात विर्निष्टि केलेले रसायने) | १% | ४% | ३% |
| ३६ | आगपेटी | १% | २% | १% |
| ३७ | जळाऊ लाकुड | ०.३० पै. प्रति क्विंटल | २ | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३८ | उर्वरित मस, बॉल क्ले, चायना क्ले, सिलीका टेल, बॅन्टोनाईट फाऊंडरी सँड, सिलीका सँड, प्लॉस्टर ऑफ पॅरीस, फायबर ब्रीक्स, अॅल्युमिनियम, ब्रिक्स, सिलीका ब्रिक्स, क्रोममॅगना साईड ब्रिक्स, बी. पी. सेटस, लेंडल स्लीव्हज, डेउ बर्नट मॅगनासाईट पावडर, | २% | ४% | ४% |
| ४० अ | ओले डांबर विटयुमिन, फरनीश दगड, मॅग्नीज, कुरुंद दगड फ्लोअर मिलसाठी वापरण्यात येणारा दगड, धार लावण्याचा दगड, दगडी पावडर, एमरी स्टोन, डोलामाईट पावडर, ग्राईडींग व्हील्स, लाईम स्टोन | ३% | ४% | ४% |
| ब | विटा आणि खंगर | २% | ४% | ४% |
| ४१ ब | लाकुड व दगड यांवर कोरीव काम केलेल्या वस्तु आणि सर्व प्रकारच्या मुर्ती (पुतळे) | २% | ४% | ४% |
| ४४ | डिस्टेंबर इमारतीस रंग देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तु, वार्निश उकळलेले सरकीचे तेल, तागाचे तेल, फ्र च पॉलिश, टरपनटाईन, झिंक ऑक्साईड, रेड ऑक्साईड, अॅल्युमिनियम ऑक्साईड, जलरोधक साहित्य रंग टयुनिंग एक्सट्रक्सरस, नीळ आणि नायट्रो सेल्युलोज थिनस आणि क्लीअर लिकर, औद्योगिक वापरात येणारे रंग द्रव्य, जयसॉल ब्ल्यु, ६ बी, रंग रसायने, सिलीकाडाय डॉक्साईड, वस्तु निर्मितीच्या कारखान्यात मुद्रणासाठी उपयोगात आणले जाणारे अॅल्यूमिनीयम पेस्ट, प्रिटींग पेस्ट, आणि पीव्हिसी कंपाऊंड तयार करण्याच्या प्रयोजनासाठी रंग, पांढरे शिसे, लाल शिसे | ३% | ४% | ४% |
| ४५ | सर्व प्रकारचे सॅनिटरी गुडस व फिटींग्स आणि सिमेंट रिंग, कव्हर्स चिनी मातीच्या वस्तु, चायना पाईप, मातीची भांडी, चिनी मातीची भांडी, चिनी मातीच्या वस्तु मेटल व्हालवस, ब्रॉस आणि स्टील कॉकास काचेच्या मुलामा चढविलेल्या वस्तु , इमारतीच्या सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तु | ३% | ४% | ४% |
| ४६ | रुपिंग फेन्ट | २% | ४% | ४% |
| ४८ | प्लायवुड, फोरमाईका, सन माईका, किटप्लाय हार्डबोर्ड, कार्डबोर्ड स्टॉबोर्डस, माऊंट बोर्डस, मिल बोर्डर्स, मसोनाईट, सॉक्ट बोर्डस किंवा कोणत्याही प्रकारच्या लाकडा पासुन कृत्रीम रित्या तयार करण्यात आलेल्या वस्तु | ३% | ४% | ४% |
| ४९ | स्टील फर्निचर, बांबु बेत फर्निचर, लाकडी फर्नीचर, अॅल्युमिनीयम फर्निचर, आणि फर्निचरसाठी वापरलेला कच्चा माल. | ३% | ५% | ५% |
| ५० अ | केश तेल, सुवासिक तेल, सर्व प्रकारच्या सुंगधी वस्तु, अगरबत्त्या, सर्व प्रकारचे सुवासिक साबण, टॉयलेट | २.५०% | ४% | ३% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | साबन, कासवछाप अगरबत्ती, गुडनाईट दंतमजणे, टुथपेस्ट, टुथब्रश, पोमड कंगवे, आरसे, हेअरपिन्स, मार्टर्स स्स्पेन्डर्स लोबान, कोकोराज, केसा करिना कोकोनट, पॅराशुट, तेल सर्व प्रकारची सौंदय प्रसाधने, फिनेल, चंदनी तेल, ॲन्टीसॅप्टीक सौंदर्य क्रिम, बेरियर क्रिम, कुमकुम, काजळ, सिंदुर आल्टा आणि महावर, सिनेस्टीक शेविंग क्रिम, सेविंग स्टीक्स, पोमेड ब्रशेस इमिटेशन पर्स | | | |
| ब | कात्र्या, वस्तरे, सेफ्टीवेअर्स, ब्लेडस, चाकु सर्व प्रकारचे कटलरी वस्तु सर्व प्रकारच्या सुया, कुलूप आणि किल्या आणि कटलरी वस्तु स्टोव्ह, इलॅस्टीक्स कार्डस, कोट डॅगर्स, पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग | २.५% | ४% | ३% |
| क | लेसेस, टेपस, लाकडी व धातुच्या रिंग, भरत कामाच्या वस्तु, स्लीव्हालाईड आर्टीकल्स, बॅक लाईटच्या वस्तु, हस्ती दंताच्या व हाडाच्या बनविलेल्या वस्तु आणि सर्व प्रकारच्या गुंड्या, भरतकाम आणि टॅबर डॅशरी टेलरिंग साहित्य. | २.५% | ४% | ३.५% |
| ड | छत्र्या<br>रेनकोट, हॅट, कॅप्स, आणि पावसाठी प्रावरणे, ताडपत्री | २.५%<br>२.५% | ३%<br>३% | २.५%<br>३% |
| फ | नटबोल्ड, वायसर, टेक्साब्लेट, सब्बल, हातोडा,कुदळी, फावडे, घमेला, साखळी, तराज आणि वजने, खिळे, हत्यारे, हॅन्डड्रॉप्स, ताडी, डोअरचेन, आयपिसेसे, डोअर हॅन्ड, अँगल, स्क्रु, डोअर, क्लोजर्स, ड्रिल्स, कुदळी, एक्सलँड, ड्राईंग पिन्स, इथे् विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकारचे लोखंडी सामान व हुक्स | २.५% | ४% | ३% |
| ५१ अ | सोने व त्यापासुन बनविलेले दागिने | १% | २% | १% |
| ब | चांदी व त्यापासुन बनविलेले दागिने | १% | २% | २% |
| क | हिरे, माणिक मोती व त्यापासुन बनविलेल्या इतर मौल्यवान वस्तु व दागिने | १% | ५% | ५% |
| ड | इमिटेशन दागिने | १% | २% | २% |
| ५२ | ग्लास, काच व काचेच्या बाटल्या शोभिंवत काच (रंगीत काच) काचेच्या वस्तु, बांधकामास इमारतीच्या सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या काचा, (सॅनेटरी वेअर्स वस्तु वगळुन) | ३% | ४% | ४% |
| ५४ क | नागवेलीची पाने (५०० पानाचा पर पेटारा) | १५ पैसे | ०.५० | ०.५०पैसे |
| ५५ | बिडी आणि तपकीर | १% | २% | २% |
| ५६ | बिडी तयार करण्या करीता वापरात येणारी पाने (तेंदु | १% | २% | २% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पत्ता) | | | |
| ६० | कच्चे किंवा पिजंलेले लोकर, हॅम्पतागा, नॅट इतर कच्चे धागे आणि रॉस्पन हातमाग धागा | २% | ३% | ३% |
| ६१ | सुती धागे, फायबर, पॉलिस्टर, सिंथेटिक दोरा आणि सर्व प्रकारचे दारे हॅण्डलुम दोरे, नायलॉन दोर, न्युटरोप कॉपर (तागाचे दोर काथ्या) | १.५% | ३% | २.५% |
| ६२ | कातडे आणि चामडे | १.२५% | २.५% | २.५% |
| ६४ | सर्व प्रकारचे रबर टायर्स व टयुब | २% | ३% | ३% |
| ६५ | रबर आणि रबराच्या वस्तु गुट्टा, परचा आणि त्यापासुन बनविलेल्या वस्तु (पुर्णतः व अशंतः) रबराचे द्रावण, कच्चे रबर लॅटेक्स रबर आणि फोमच्या सर्व प्रकारच्या वस्तु (बाब क्र. ६४ आणि खेळणी वगळुन) | २% | ३% | ३% |
| ७३ क | इ.पी. ह. बी. एक्स. पी. बी. एक्स सेट. फॅक्स मशीन, एस.टी.डी. पल्स मशिन आणि प्रिंटर, टेलिप्रिंटर, टेली पिंटर मशीन, स्कॅनिंग मशिन फोटो, फोटो कॉपींग, झेरॉक्स मशिन, संगणक आणि डि. टी. पी. ईलेक्ट्रानिक्स मशीन, इलेक्ट्रानिक टंकलेखन यंत्र आणि त्याचे सुटे भाग आणि त्याच्या उत्पादनात वापरले जाणारे भाग, दुरध्वनी संच व त्याचे सुटे भाग, गॅसकिट, संगणक विषयक लेखन सामुग्री वायरलेस आणि त्याच्या उत्पादनात वापरात येणारे सुटे भाग | ४% | ६% | ५% |
| ७९ अ | लिहीण्याची शाई, मुद्रणाल्यात वापरली जाणारी शाई व पुस्तक बांधणीसाठी वापरण्यात येणारी प्रिटींग पेस्ट | १% | ३% | २.५% |
| ब | लेखन सामग्री फाऊन्टन पेन, बॉलपेन, निप रिफिलस, जाहिरात साहित्य, कार्बन, अमोनियया प्रिंट पेपर, डेसिंग पेपर, डायरी, रजिस्टर व यात विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकार लेखन सामग्री. | १% | ३% | १.५% |
| क | कोरा कागद, कागद, शालेय वहया, पुस्तके, महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षणाची सर्व पुस्तके ग्रंथालयीन पुस्तके, मासिके, कॅलेंडर्स आणि कायद्याची पुस्तके. | १% | ३% | १% |
| ड | कोणत्याही मिश्रणाचा व जाडीचा सर्व प्रकारचा कागद, लिफाफे, निमंत्रण पत्रिका व रद्दी कागद. | २% | ३% | २.५% |
| ८१ | लाख बुज व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु क्राऊन कॉर्क व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु | २% | ३% | ३% |
| ८५ क | सर्व प्राकरची खेळणी | १% | ३% | २% |
| ड | सर्व प्रकारचे खेळाचे साहित्य | २% | ४% | ३% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ई | पॅकिंग मटेरियल जसे फ्लेक्झीबल कन्टेनर्स, जिलेटीन कॉरग्युटेड पेपर, ॲल्युमिनियम फाईलस, कॉरग्युटेड पेपर, ॲल्युमिनियम फाईल्स, कॉरग्युटेड बॉक्सेस व यात विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकारचे पॅकींग मटेरियल. | २% | ३% | ३% |

**श्री. संजय जोशी :** संपूर्ण दरवाढ सरासरी किती % ने वाढलेले आहे.

**उप आयुक्त :** दुप्पट वाढ केलेली आहे.

**मुख्य लेखाअधिकारी :** पृष्ठ क्र. ३८ यामध्ये दर्शविलेले आहे, त्यामूळे कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागु झालेला आहे. त्यामुळे ६.५ कोटीची झळ प्रशासनास बसणार आहे. मागील १४ वर्षी पासुन जकात दरात काही मालावरती वाढ केलेली नसल्याने आता ही वाढ महानगरपालिकेने केलेली आहे.

**श्री. संजय जोशी :** चैनीचे वस्तुंवर वाढ करणे योग्य नाही. कर्मचाऱ्यांच्या पाचव्या वेतन आयोगाचा बोजा नागरिकांना होऊ नये गेल्या १४ वर्षा पासुन वाढ केलेली नाही. याचा दोष प्रशासनाने आमच्या माथ्यावर करु नये .

**श्री. अशफाक सलामी :** वाढती महागाई लक्षात घेता दर वर्षी जकातीचे दरवाढ होणार काय ?

**मा. सभापती :** जकात दरसुची "ओ" दरवाढ प्रस्तावातील (अ. क्र. ५ अ ते ८५ -ई ) दुरुस्तीसह मंजुर त्याच बरोबर अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करण्यात येते. (अंदाजे वेळ २.५०वाजता) (सभेला सुरुवात अंदाजे ३.०० वाजता).

**मा. सभापती :** त्याच प्रमाणे जकात दर पत्रकातील ज्या मालावर वजनावर जकात कर आकारणी करण्यात येते त्यांचे विवरण प्रपत्र "अ".

| **अ. क्र.** | **जकात दर अनुसुचीतील क्र.** | **वस्तुचे नांव** | **प्रचलीत दर** | **प्रस्तावित दर** | **स्थायी समितीने शिफारस केलेले दर** |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ अ | धान्य, पीठ, डाळी, ज्वारी, भाजलेले धान्य, रवा, मैदा, गव्हाचे पीठ आणि ज्वारी (कण्या) लाह्या, मुरमुरे, फुटाने, पोहे व कडधान्य | ०.५० पैसे प्रति क्वि. | रु. १.०० प्रति क्विं | ०.५० पैसे प्रति क्वि. |
| २. | २ | गवत, गवताची कांडी (पेंढी) उसाचे वाढे, कोंडा, कडबा व भुसा (घोडया करीता वैरण) (पशु खाद्य वगळता) | ०.२० पैसे प्रति क्विं. | ०.५० पैसे प्रति क्विं. | ०.५० पैसे प्रति क्विं. |
| ३. | ८ | बर्फ | ०.२० पैसे प्रति १० किलोस | ०.५० पैसे प्रती १० किलो | ०.५० पैसे प्रति १० किलो |
| ४. | १४ अ | सर्व प्रकारची ताजी फळे | ०५ पैसे प्रती १० किलोस | १% | १% |
| ५. | १५ | नारळ | रु. १.०० प्रति १०० नगासह | २% | रु. ४/- प्रति १०० नगास |
| ६. | १७ अ | ताजे मासे, झिंगे व ताजे मासे | ०.५० पैसे प्रति | १% | १% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पैसे प्रति क्विंटल | | |
| | ब | शो-कुकरींगसाठी वापरण्यात येणारे जिवंत मासे | ०.५० पैसे प्रति १० किलोस | १% | १% |
| | क | अंडी | ०.५० पैसे प्रती १० किलोस | १% | १% |
| ७. | २२ | मेढंया, बकऱ्या, कोकरे | ०.५० पैसे प्रती नग | रु. १.०० प्रती नग | रु. २.०० प्रती नगर |
| ८. | २३ | बैल, म्हशी, गाय, कालवडी, घोडे, गाढव, डुकरे, उंट व हत्ती | रु. १.०० प्रती नगास | रु. ५.०० प्रती नग | रु. ५.०० प्रती नगास |
| ९. | २४ | कोंबडया बदके, आणि सर्व प्रकारचे पक्षी | ०.२० पैसे प्रती नग | ०.५० पैसे प्रती नग | रु. १.०० प्रती नग |
| १०. | २५ | सर्व प्रकारचे वन्य व पाळीव प्राणी | रु. १.०० प्रती नग | रु. १०.०० प्रती नग | रु. १०.०० प्रती नग |
| ११. | ३२ ड | घासलेट | ०.०२ पैसे प्रत १० लिटर | ०.५०% | ०.५०% |
| १३. | ४२ अ | खडी, दगडाचा चुरा | रु. ५.०० प्रती ट्रक | रु. १०.०० प्रति ट्रक | रु. १५.०० प्रती ट्रक |
| | ब | माती, वाळु आणि मेटल डब्बर, मुरुम | रु. ५.०० प्रती ट्रक | रु. १०.०० प्रती ट्रक | १५.०० प्रती ट्रक |
| १५. | ८४ | मळी | रु. १.०० प्रती टनास | ४% प्रती टनास | ४% प्रती टनास |

उपरोक्त फेराफारा नुसार जकातीचे रुपये ५२ कोटीच्या उत्पन्नाऐवजी ५१ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

## मालमत्ता कर

**श्री. संजय जोशी :** मालमत्ता कर आकारणीचे जे वादग्रस्त (Disputed) प्रलंबित प्रकरणे होती ती कशा प्रकारे निकाली काढली या बाबतची सविस्तर

माहिती द्यावी, जी जुनी प्रकरणे होती ती कशा प्रकारे निकाली काढून मालमत्ता कर वसुल करणार याची माहिती द्यावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** प्रलंबित प्रकरणे मालमत्ता करांचे बाबतीत आहेत त्यांचे वसुली करण्यासाठी कशा प्रकारे उपाययोजना केली याची माहिती द्यावी.

**उप आयुक्त (म) :** वादग्रस्त (Disputed) १४५० प्रलंबित प्रकरणे मालमत्ता कराचे होते. त्यापैकी प्रत्यक्षात भेट देऊन संबंधिताचे कागदपत्रांची छाननी करुन त्यांचे घर किंवा मालमत्ता कधी पासुन अस्तित्वात आहे त्यांचे मुळ मालक किंवा भाडयाने असलयास भाडेकरु इ. ची माहिती कर निरीक्षक करवी व करमुल्य निर्धारण अधिकारी व झोन अधिकारी यांच्या अधिपत्याखाली करमुल्यांचे आधारे मालमत्ता कराचे कर ठरविल्या जाते. त्यापुर्वी संबंधित मालकांना नोटीस देऊन आक्षेप असल्यास हिअरिंगला बोलाऊन प्रकरणे पाहणी अंती निकाली काढल्या जातात असे एकंदर ८५०-९०० प्रकरणे निकाली काढण्यात आली असुन त्यानुसार वसुली करण्यात आली आहे. करमुल्य निर्धारण अधिकारी -१ व २ यांना या बाबत मी सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार निकाली काढावयाची प्रकरणे झोन निहाय दाखवावे त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. संजय जोशी, श्री. विश्वारोधीन :** झोन निहाय प्रकरणे निकाली काढल्याची यादी दाखववावी.

**करमुल्य निर्धारण अधिकारी -१ :** वादग्रस्त प्रकरणे एकंदरीत १३६४ पैकी ६८० बाकी असुन ६८४ प्रकरणे निकाली काढण्यात आले.

| झोन क्र. | प्रलंबित प्रकरणे | निकाली काढलेली प्रकरणे |
|---|---|---|
| १. | २३४ | १६७ |
| २. | २३९ | २०७ |
| ३. | ३८४ | १७५ |
| ४. | २९० | ११ |
| ५. | - | - |
| ६. | २१६ | १२० |

**श्री. संजय जोशी :** निकाली प्रकरणा विषयी कशा प्रकारे तडजोड (सेटलमेंट) केली.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** नियम ४०६ (ई) प्रमाणे कर भरणा करावयास पाहिजे त्याप्रमाणे कार्यवाही करावयाची असते ती प्रकरणे वादग्रस्त आहे त्यांचे बाबतीत करमुल्य निर्धारण अधिकारी व त्यांचे अधिपत्या खालील कनिष्ठ अभियंता व झोन अधिकारी हे प्रत्यक्षात स्थळावर जाऊन पाहणी करुन करमुल्यावर आधारीत कर आकारणी करण्याबाबतचा अहवाल देऊन निर्णय घेण्यात येतो.

**श्री. संजय जोशी :** ज्या मालमत्ता धारकांनी आतपर्यंत कधीच कर भरलेला नाही अशा धारकांची वादग्रस्त प्रकरणे म्हणता येणार नाही.

**श्री. प्रभाकर विधाते :** वादग्रस्त प्रकरणे व कोर्टात प्रलंबित असलेली प्रकरणे ही वाटाघाटीद्वारे किती सोडविली याची माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** मागील वर्षी मालमत्ता कराचे प्रलंबित व वादग्रस्त प्रकरणे वाटाघाटी करुन किती निकाली काढलेत याची माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** वादग्रस्त प्रकरणे किती निकाली काढले हा मुद्द महत्वाचा आहे.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** मालमत्ता करा बाबतची प्रकरणे ही वेगवेगळी स्वरुपाची असुन अशी प्रकरणे माझ्या विभागाकडे प्रलंबित आहेत. याबाबतची आकडेवारी मी यापुर्वीच सांगितलेली आहे.

**श्री. अशफाक सलामी :** मालमत्ता कराची प्रकरणे अनेक स्वरुपाची असुन काही घरांना कर जास्त तर काही घरांना कर कमी लावलेली प्रकरणे अशी वादग्रस्त बनलेली आहेत. वस्तुस्थिती पाहता ती वेगळीच आहेत. माझ्या वार्डातील अमिनाबी यांचे बाबतीत दोन तीन वेळेस कर आकारणी विभागात तोंडी व लेखी सुचना देऊनही त्यांचे कर कमी करण्यांत आलेले नाही. उलट ज्यांनी अक्षेप घेतलेले असेल त्यांचे बाबतीत म.न.पा. तील काही कर्मचारी अगोदर भेटून चर्चा करुन कमी जास्त करतात परंतु त्याचा फायदा महापालिकेला होत नाही, बऱ्याचशा घरांना व्यवस्थित कर आकारणी केलेली नसल्याने प्रकरणे वादग्रस्त व कोर्टात केसेस प्रलंबित आहेत याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असुन त्यापुढे मालमत्ता कराची बरीचशी थकलेली आहे. संबंधित मालक व कर भरणा करीत नाही. बरीचशी प्रकरणे आपसातील मालक व भाडेकरु यांच्या वादानेही प्रलंबित आहेत. थकबाकीदारांना वादग्रस्त म्हणता येणार नाही. काही मालकांनी घर भाडयाने न देता ही कर जादा लावलेले आहे. तर ज्यांना स्वत: च्या वापरात घर ठेवलेले आहे ते भाडेकरु ठेवतात मात्र त्यांना कर कमी लावल्या जातो एकाच भागातील दोन समान घरापैंकी एकाला कमी व एकाला जास्त अशा प्रकरणांत सुनावणी देऊन आवश्यक ती दुरुस्ती करावी.

**उपआयुक्त (म) :** जी प्रकरणे वादग्रस्त होती त्या केसेस बाबत झोननिहाय यादी मागवुन संबंधित मालकास चर्चा करण्यास बोलविले असता संबंधित मालकांना कर व्यवस्थित लावलेला नाही. शेजारील लोकांना कर कमी लावले जाते मात्र काही घरांना कर सारखेच असुनही जास्त लावल्या जातो. अशा प्रकारची वेगवेगळी प्रकरणे झालेली आहेत कर आकारणी करण्यासाठी (एन.आर.व्ही.) कर योग्य मुल्यनूसार कार्यवाही केल्या जाते. सन १९८९ ला रिव्हीजन करुन १९९० नंतर मालमत्ता करात वाढ झालेली आहे आणि तेंव्हा पासुनच बरीचशी प्रकरणे प्रलबित व पडुन आहेत अशा सर्व मालमत्ता धारकांनी अक्षेप घेतल्यास त्यांना हिअरींगला बोलावुन त्यांचेशी चर्चा करुन कागद पत्रांची छाननी करुन प्रकरणे निकाली काढली जातात अशा प्रकारची प्रकीय प्रशासनाने केली असता नागरिकांकडुन योग्य असा प्रतिसाद मिळालेला नाही. जी प्रकरणे कोर्टात पडलेली आहत त्यांचे वरील रु. ४.०० कोटी ८५.०० लाख एवढी रक्कम येणे बाकी आहे.

**श्री. संजय जोशी :** आता पर्यंत कोर्टातील किती प्रकरणे निकाली काढलीत ? त्यामुळे वसुली किती झाली.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** न्यायालयात मालमत्ता करांची प्रकरणे सेवानिवृत्त न्यायमुर्तीकडे निकाली काढण्यासाठी लोक अदालत भरलेले होते. परंतु त्या वेळेस ५-६ नागरिंकाच्या व्यतिरिक्त इतर लोकांनी प्रतिसाद दिलेला नाही.

**श्री. संजय जोशी :** लोक न्यायालयात जर निकाल लागला नाही तर या बाबत प्रशासन मालमत्ता करांची थकबाकी वसुली बाबत कार्यवाही का करीत नाही, लोकन्यायालयात संबंधित मालमत्ता धारकास नोटीस देऊन जरी प्रतिसाद देत नसल्यास विशेष वकिलाची नेमणुक करुन प्रकरणे निकाली लावुन

एकतर्फि कार्यवाही करता येऊ शकते व अशी प्रॉपर्टीजचे लिलाव करता येऊ शकते.

**उप आयुक्त :** लोकन्यायालयात २-३ महिन्यायपुर्वी औरंगाबाद येथे भरलेले होते परंतु या लोकन्यायालयास लोकांनी प्रतिसाद दिलेला नाही.

**श्री. अशफाक सलामी :** १०-१२ वर्षा पासुन लोकांनी कर भरणा केलेला नाही. ज्या वेळी लोक न्यायालय भरविण्यात आले त्यावेळी वर्तमान पत्रात जाहिरात देणे आवश्यक होते. झोननिहाय प्रलंबित मालमत्ता धारकांची यादी चांगल्या प्रकारे कर आकारणी करण्यास लावणे आवश्यक होते बऱ्याच भागात कर आकारणी तोंडे पाहुन लावलेली आढळुन येतील माझ्या स्वतःच्या दुकानास १९६८ पासुन ३०/- व आता रु. ६०/- भाडे देतो परंतु भाडे रु. ३००/- लावण्यात आले व त्याप्रमाणे कर लावलेला आहे. आपल्या कडील कर्मचाऱ्यांनी सर्व्हे करुन चुकीचे कर आकारणी केलेली आहे. त्यामुंळे अनेक मालमत्ता धारकांची प्रकरणे प्रलंबित आहेत ज्या मुळे वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकत नाही.

**श्री. संजय जोशी :** १५० लोकांना लोकन्यायालयाकडे नोटीस लावलेल होते.

**उप आयुक्त (प्र.) :** विशेष वकील लावुन न्यायालयाचे निर्णय लवकर लावण्याची कार्यवाही करता येईल.

**उप आयुक्त (म) :** लोक न्यायालयात दोन्हीही बाजुंनी तडजोड करुन प्रकरणे निकाली काढली जातात, परंतु संबंधित व्यक्ती जर आलेली नसल्यास ती व्यक्ती उत्सुक नाही असे समजावे व विशेष वकील लावुन प्रकरणे हाताळता येतील.

**श्री. अशफाक सलामी :** शहरातील जेवढी प्रलंबित व वादग्रस्त प्रकरणे आहेत त्याबाबत स्थळ पाहणी करुनच करावेत. परंतु असे लक्षात येते की, बरेचशे नागरिकांकडुन काही कर्मचारी फिल्ड काम करीत असतांना संबंधितांकडुन पैसे घेऊन कर कमी लावल्या जातो. बऱ्याच भागात भाडेकरुन नसतांनाही भाडेकरु म्हणुन कर आकारणी केलेली आहे. बरेच नागरीक कर कमी करणेसाठी अर्ज देऊनही त्यांच्या अर्जावर विचार होत नाही. यासाठी ज्या मालमत्ता धारकांनी करावर आक्षेप घेतलेले आहेत त्यांच्या बाबतीत फेरविचार करुन स्थळ पाहणी व्हावी. व कर योग्य मुल्य बांधकाम बदला झ ाला नाही. तर ते न बदलता मोजमापा प्रमाणे कर लावणेची कार्यवाही व्हावी.

**उप आयुक्त (म) :** मागील वर्षी प्रत्येक झोनला सुनावणी झालेली आहेत परंतु जास्त प्रमाणात प्रकरणे निकाली निघालेली नाहीत.

**उप आयुक्त (प्र) :** एकाच नावावर अनेक घरे असतात, त्यांनी ३-३ घरांचे मालक असुनही कर भरणा करीत नाही. असे उदा. खुप आहेत जो पर्यंत कर भरणा करीत नाही तो पर्यंत नामांतर होत नाही.

**श्री. अशफाक सलामी :** ३ भावाची वाटणी झाल्यावर ही भावांच्या व आईच्या नांवाने मालमत्ता कर आकारणी होते.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** माजी नगराध्यक्ष, श्री. बाबुलाल पराती यांच्या घराच्या करा बाबत त्यांचे कडुन सुप्रिम कोर्टातुन निकाल लागलेला आहे. परंतु त्यांचे बाबतीत अद्यापही काहीही झालेले नाही. त्यांचे कर योग्य मुल्य सन १९७७

पासुन जशास तशी असुन कोणत्याही प्रकारचा त्यात बदल झालेला नाही मात्र कर वाढविण्यात येत आहे.

**उप आयुक्त (प्र) :** संबंधितांना सध्या नोटीस दिलेली असुन त्यांनी रुपये तीस हजार कार्यालयात कर भरणा केलेला आहे.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** संबंधितांना नोटीस दिलेली असुन, त्यांनी कर भरणा केलेला आहे. फक्त त्यांचा आक्षेप जास्तीच्या टॅक्स बाबत आहे.

**श्री. विखारोधीन :** शहराचा कर भरणा (वसुली) व आकारणीचे काम झोनच्या अखत्यारीत असावयास पाहिजे एकाच ठिकाणचे मालमत्तेचे कर आकारणी व कर भरणा करण्याची कार्यवाही झोनलाच व्हावी. एकाच भागातील एखादी कॉलनी असल्यास घराचा प्रकार सारखा बांधकाम व एरिया सारखाच असल्यास एका घराची करयोग्य प्रमाणे जेव्हा टॅक्स लावावयास पाहिजे तोच टॅक्स तशाच प्रकारच्या करयोग्य मुल्याच्या मालकास लावावे असे असतांनाही वेगवेगळे लावल्या जाते. प्रकार काही कर आकारणी करणारे कर्मचारी पैसे घेऊन न कमी जास्त करण्याचे प्रकार करतात, त्यामुळे मुळ मालक धारकास अडचणी तयार होऊन आक्षेप घेणे भाग पडते. या पेक्षा नियमाप्रमाणे कर आकारणी व्हावी.

**श्री. गौतम लांडगे :** मालमता व पाणीपट्टी बाबत सन १९९८-९९ साठीचे उद्दिष्ट काय होते व थकबाकी किती शिल्लक आहे याची माहिती द्यावी.

**उप आयुक्त (म) :**

| | |
|---|---|
| थकबाकी | २३.६४७ कोटी |
| मागणी | १०.४२ कोटी |
| एकुण :- | ३४.०६७ कोटी |

माहे फेब्रूवारी पर्यंत ५.८० कोटीची वसुली झालली आहे.

**श्री. गौतम लांडगे :** सन १९९८-९९ चे उद्दिष्ट किती होते, पैकी ५०% वसुली झालेली नाही. आता मागील वर्षीचे उद्दिष्टापैकी किती वसुली झाली याची माहिती द्यावी व उद्दिष्टानुसार वसुली न होण्याचे कारण स्पष्ट करावे.

**उप आयुक्त (म) :** मालमत्ता कराची वसुली प्रभावी रित्या होणेसाठी "झा समितीने " शिफारस केल्या नुसार प्रती २५०० मालमत्तासाठी एक कर निरीक्षक, एक कनिष्ठ लिपीक, व एक शिपाई या प्रमाणात कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात यावा अशा प्रकारचा स्टॅपिंग पॅटर्न असणे आवश्यक आहे. सध्या वसुलीसाठी आवश्यक त्या कर्मचाऱ्यासह कार्यवाही चालु असुन उद्दिष्ट पूर्ण करणेची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे, श्री. संजय जोशी :** मालमत्ता कराच्या बाबतीत जे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले होते १३.०० कोटी पैकी फक्त ६.०० कोटी वसुल झालेले आहे आणखी ४० दिवसांत ७ कोटीची वसुली होणे शक्य आहे काय ?

**मा. आयुक्त :** मुख्य न्यायाधिश श्री. एम.बी. शहा यांच्याशी मी बोलणी केलेली आहे. जे मालमत्ता करांचे वादग्रस्त प्रकरणे आहेत त्यांचे बाबतीत लोकन्यायालय भरवावे, त्याप्रमाणे तसे केले परंतु लोकांनी त्या प्रतिसाद दिलेला नाही. यासाठी उपाययोजना करणेत येईल व अशा प्रकरणांसाठी आता विशेष वकिलांची नेमणुक करुन अशी सर्व प्रकरणे निकाली काढुन प्रभावीरित्या वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येईल काही स. सदस्यांची अशी मागणी आहे की, बऱ्याचशा मालमत्ताधारकांना त्यांचे मुळ एन. आर. व्ही.

करयोग्य मुल्य नुसार कर आकारणी केलेली नाही, ज्यांचे एम.आर.व्ही. करयोग्य मुल्यमध्ये बदल होत नसतांनाही कर आकारणी करतांना कमी जास्त लावलेला आहे यामध्ये कर्मचारी दोषी आहेत काय ? या बाबत स.सदस्यांनी तक्रारी कल्यास अशा प्रकरणांची शहानिशा करुन संबंधितांवर कार्यवाही करण्यांत येईल. कर आकरणी जशी वसुली प्रकरणे झोन कडुन केल्या जाते तशी कर आकारणी झोनला देणे शक्य नाही. कर आकारणीचे ज्यांचे कमी व जास्ती लादल्याचे जे प्रकरणे आहेत त्याबाबत प्रकरणे निकाली काढण्यासाठी उपआयुक्त (म), उप आयुक्त (प्र) विधी व करमुल्य निर्धारण १ व २ यांची कमिटी तयार केलेली असुन त्यानुसार ती कमिटी कार्यवाही करेल. सध्या शहरातील वातावरण वसुली बाबत पुर्णपणे तयार झाले असुन वसुली वाढ शक्य आहे व तसे प्रयत्न चालु आहेत. १३.०० कोटीचे उद्दिष्ट झोननिहाय असुन सर्वसाधारण सभेने सिडको कर वसुल करु नये जो पर्यंत हस्तांतर होत नाही तो पर्यंत या भुमिकेमुळे वसुली कमी येते. तरही वसुली मोठया प्रमाणात होणेसाठी कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. विकास जैन :** गेल्या दहा वर्षापासुन अनेक लोकांना मालमत्ता कराच्या नोटीसा मिळालेल्या नाहीत. त्यामुळे वसुली होण्यास सहकार्य मिळत नाही, आणि घरोघरी मालमत्ता कराच्या नोटीसा मिळणे आवश्यक आहे. मालमत्ता कर वसुलीसाठी वर्षाच्या अखेरीस जास्त जोर देण्यापेक्षा सुरुवाती पासुन म्हणजे एप्रिल पासुनच सारखे मागे लागावे लागावे.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांनी जी कमिटी स्थापन केलेली आहे त्या बाबत संबंधित कमिटीने माहे एप्रिल ९९ पासुन प्रत्यक्षात कार्यवाही सुरु करावी आणि अशी जी प्रकरणे असतील ती सहा महिण्यात निकाली काढावीत.

**सौ. राधाबाई तळेकर :** मालमत्ता कराच्या प्रलंबित प्रकरणांबाबत विशेष वकिलाची नेमणुक करीत असतांना संबंधित वकिल चांगला नेमावा नाही तर बरेचशे वकिल स्वार्थी आहेत. वसुलीचा विचार करुन महापालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे नसता संबंधित वकिल याकडे दुर्लक्ष करेल असे व्हायला नको.

**उप आयुक्त (प्र) :** झोन निहाय मागणी व वसुलीचा तक्ता पुढील प्रमाणे.

| **झोन क्र. मागणी** | **वसुली मालमत्ता** | **पाणीपट्टी** |
|---|---|---|
| १. ९०,००,०००/- | ६७,१९,२०५/- | ३७,२२,१३९/- |
| २. १,६६,८७,८०३/- | ९९,३८,४४८/- | ३२,४१,६०६/- |
| ३. १,७३,९८,२८०/- | ९४,७५,२७३/- | ५२,३७,३२७/- |
| ४. २,२५,८०,९६०/- | १,३९,६०,०३१/- | ६५,२१,२३२/- |
| ५. २,७३,३३,४४९/- | ७४,८५,७३०/- | ८,२४,२०२/- |
| ६. १,२५,००,०००/- | ७६,२८,१७९/- | २२,४९,०३९/- |
| ७. १,५६,०२,०००/- | ९,६४,५८२/- | १,०९,५७,४४४/- |
| १२,११,०२,४९२/- | ५,६१,७१,४५८/- | ३,२७,५२,९८९/- |

**मा. सभापती :** सन १९९९-२००० चे उद्दिष्ट रु. १५.०० कोटीचे निश्चित करण्यात आले. सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे शिफारस करण्यात येते.

**<u>म.न.पा. मालमत्ता पासुन उत्पन्न</u>**

**श्री. संजय जोशी :** गुलमंडी येथील भालेश्वर मार्केट व सदिया टॉकिज जवळील मार्केट महापालिकेने तयार करुन लवकर सुरु करावे, ज्यामुळे महापालिकेस उत्पन्न मिळेल.

**श्री. गौतम लांडगे :** महापालिकेच्या मालकीच्या ईमारती, भाडे, टपरी, बाजार, हातगाडी, जाहिरात इत्यादी पासुन ९५.०० लाखाचे उत्पन्न गृहीत धरलेले होते ते आता या वर्षीच्या अंदाजपत्रकात ९७.०० लाख कसे काय गृहीत धरलेले आहे.

**मालमत्ता अधिकारी :** ईमारती फिक्स आहेत, परंतु त्यांची वसुली करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ऑर्केस्ट्रा | प्रस्तावित दरास मंजुरी |
| २. | नाटक/सांस्कृतिक कार्यक्रम | --//-- |
| ३. | नेहरु भवन | --//-- |
| ४. | मनपा शाळा व त्या लगतचे मैदान | रु. १०००/- वरुन रु. ७५०/- |
| | | रु. ६००/- वरुन रु. ५००/- |
| ५. | टपरी जागा भाडे | रु. २२५/- प्रति माहे |
| ६. | कत्तलखाना शुल्कात वाढ करणे | प्रतिजनावर रु. ५/- |
| ७. | शासकीय योजनेअंतर्गत गरिबांसाठी संडास बांधणी योजना | मंजुर |

**मा. सभापती :** प्रस्तावित दराची शिफारस करण्यात येते.

**<u>पाणीपट्टी</u>**

**श्री. संजय जोशी :** शहरातील अनिधकृत नळ कनेक्शन बाबत कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. गौतम लांडगे :** झोपडपट्टी भागात जरी स्टँड पोस्ट असले तरी त्या भागातील नागरीकही स्वंतत्र्य नळ अनधिकृतरित्या घेत आहेत, त्यामुळे पाणीपट्टी वाढ सध्या करु नये.

**सौ. राधाबाई तळेकर :** सध्या पाणिपट्टी वाढ मुळीच करु नये, कारण बऱ्याच भागात सध्याही पाण्याचा पुरवठा नियमित व सुरळीतपणे येत नाही. त्यामुंळे नागरिकांची सारखी ओरड होत असते. माझ्या वार्डात नागरिकांची पाण्याविना हाल होत आहेत. अगोदरच पाणीपट्टी मागील वर्षाची वाढ लोकांनी १००% भरलेले नाहीत पुन्हा आता ही वाढ केल्यास कुणीही भरणार नाही. काहींनी दोन-दोन नळ कनेक्शन घेऊन सुध्दा त्यांना पाणी मिळत नाही. तेंव्हा आहे तीच पाणीपट्टी ठेवावी.

**मा. सभापती :** पाणीपट्टी वाढ मागील वर्षी जी होती तीच रु. १०००/- कायम करण्याची शिफारस सर्वसाधारण सभेकडे करण्यात येते.

**<u>पाणीपट्टी वसुली</u>**

**मा. सभापती :** पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास शिफारस करण्यात येते.

<u>**अनधिकृत विकसीत वसाहती कडुन विकास निधी.**</u>

**उप अभियंता :** गेल्या २०-२५ वर्षातील औरंगाबाद शहर व परिसरातील वाढत्या औद्योगिक कारणांमुळे शहरातील अनधिकृत वस्त्यांमध्ये बरीच वाढ झालेली आहे. शहराचे एकुण लोकसंख्ये पैकी बहुतांश नागरीक अशा वस्त्या मधून राहातात, त्यांना योग्य सुविधा मिळतात या वसाहती मधुन काहीही उत्पन्न महापालिकेस प्राप्त होत नाही. तरीही पॉलिसी डिसाईड करुन या बाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवावयाचा आहे.

**मा. आयुक्त :** अनधिकृत वसाहतीतील नागरिकांच्या मागणीचे विचारा करता व त्या बाबतची लोकप्रतिनिधींची आग्रही भुमिका पाहता अनधिकृत विकसीत वसाहतीतील विकास कामाकरिता निधी उपलब्ध व्हावा म्हणुन प्रचलित विकास खर्च, जमिन विकास शुल्क, शहर या करीता एकत्रित रक्कम जास्तीत जास्त पाच वार्षिक हप्त्या मंध्ये नजराणा शुल्क (प्रिमियम) म्हणुन सर्व विना परवाना बांधकाम धारकांकडुन वसुल करण्याचे प्रस्तावित केलेले आहे व तो मंजुर करुन शासनाकडे पाठवावयाचा आहे.

**श्री. गौतम लांडगे :** ज्या ठिकाणी अनधिकृत वसाहती झालेल्या आहेत. त्यांचे कडुन प्रिमियम म्हणुन वसुल केल्यास महापालिकेचे उत्पन्नात कसे भर पडेल याची सविस्तर माहिती द्यावी. यापेक्षा शासनाकडुन याबाबतची निधी म्हणुन अनुदान मागणी करावी.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी सुचना केल्या प्रमाणे जर निधी घेतल्यास नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी या भागातील लोकांना मिळणार काय ?

**उप अभियंता नगररचना :** या भागासाठी बांधकाम बांधकाम परवानगी देता येणार नाही. त्यांच्याकडुन प्रिमियम म्हणुन निधी वसुल करण्यात येणार आहे.

**श्री. संजय जोशी :** ठिक आहे सदरील प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

**श्री. विखारोधीन:** मा. आयुक्त यांनी केलेल्या खुलाशानुसार सर्वानुमते निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** १) ठिक आहे. प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येते.

३) त्याचप्रमाणे रिटनिंग वॉलची कामे या आर्थिक वर्षात कोणतीही होणार नाहीत.

याच बरोबर आजची सभा तहकुब करण्यात येऊन दि. २१.०२.९९ रोजी सकाळी १०.०० वाजता सुरु करण्यात येईल असे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## दिनांक २१.०२.९९ रोजी भरलेल्या विशेष स्थायी समितीचा इतिवृतांत

**शनिवार दिनांक २०.०२.९९ रोजी तहकुब करण्यात आलेली विशेष स्थायी समितीची सभा रविवार दिनांक २१.२.९९ रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य कार्यालयातील "मलिकअंबर" स्थायी समिती सभागृहात मा. स्थायी समिती सभापती श्री. जयवंत ओक यांचे अध्यक्षतेखाली "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली.**

**या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ३. | स. स. श्री. संजय जोशी | --//-- |
| ४. | स. स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ५. | स. स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६. | स. स. सौ. यशोदा धंनजय वाडकर | --//-- |
| ७. | स. स. श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ८. | स. स. श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ९. | स. स. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| १०. | स. स. श्री. किशोर तुळशीबागवाले | --//-- |
| ११. | स. स. श्री. राजकुमार बचाटे | --//-- |
| १२. | स. स. श्री. विखारोधीन पि. खुदबोधीन | --//-- |
| १३. | स. स. श्री. सय्यद अहमद इकबालेधीन<br>स. म. कुतुबुधीन | --//-- |

**संवाद :**

**मा. आयुक्त :** (माहिती वाचुन दाखविली)

**श्री. प्रभाकर विधाते :** रस्त्याच्या कामासाठी रु. ५.८५ ऐवजी ८.०० कोटी खर्चाची तरतुद या आर्थिक वर्षात करावी.

**मा. सभापती :** शहरातील नागरीकांच्या मुलभूत सेवा मिळणे अत्यंत आवश्यक असुन रोड/लाईट/ड्रेनेज व पाणी पुरवठा या अत्यावशक सेवेवर महापालिका प्रशासनाने खर्चास भर द्यावा. बांधकामावर या आर्थिक वर्षात कामे करु नये. या मध्ये समाज मंदीर/शादिखाना/रुग्णालय/रिटनिंग वॉल कंपाऊंड इ. कामे फारच मोठया प्रमाणांत अनेक वसाहती मध्ये झालेली आहेत व सुरु आहेत. परंतु या कामावर जादा आर्थिक बोजा न देता मुलभूत सुविधा पुरविणेवर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सिडको हस्तांतर झाल्यास तेथील सुविधा बाबत सुध्दा तरतुद करुन ठेवावी लागेल.

**मा. आयुक्त :** वास्तववादी अर्थसंकल्प असावा असे प्रशासनाचे मत आहे. तेंव्हा मुळ अंदाजपत्रक १०० कोटीच्या पुढे असावयास हरकत नाही.

**मा. सभापती :** महापालिकेच्या उत्पन्नात आणखी जादा भर घालणेच्या दृष्टीने शहरातील मोकळया जागेवर व्यापारी संकूले उभारावे जेणे करुन महापालिकेस जे कर्ज आहे त्याची याद्वारे फेड केल्या जाऊ शकते.

**श्री. अशफाक सलामी :** प्रत्येक नगरसेवकांनी आपआपले वार्डातील काही निवडक कामे करवुन घेण्याची आश्वासने वार्डातील जनतेला दिलेली आहेत. त्यामुळे त्यांची कामे प्रशासनातर्फे करवून घेणे आवश्यक राहील. उदाः शाळेच्या इमारती, दवाखाने वगैरे माझ्या वार्डामध्ये शाळेची अवस्था अत्यंत वाईट आहे. रु. १,५७,०००/- शाळेचे भाडे दिलेले आहेत भाडे वाचेल शाळेच्या इमारतीच्या बांधकामाचा विचार व्हावा. इयत्ता ४ थी चा वर्ग भाडयाच्या खोलीत घेतल्या जातो. आजच्या अंदाजपत्रकात सर्वानुमते विचार होऊनच मंजुर व्हावी. रस्त्यासाठी जे रु. ५.८५ कोटीची तरतुद केलेली आहे ती बरोबर आहे त्यामध्ये पुन्हा वाढ करण्याची आवश्यकता नाही. माझ्या माहिती प्रमाणे शहरातील अनेक भागात एक एक रस्ता गेल्या ४ वर्षातुन दोनदा डांबरीकरण झालेला आहे, तर काहीचे रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करुन तसेच बिले उचलण्यात आलेले आहेत, त्यामुंळे या खर्चासाठी जादा तरतुद करण्याची आवश्यकता नाही.

**श्री. संजय जोशी :** माझ्या वार्डातील नागरिकांनी १००% बेटरमेंट चार्जेस भरलेले आहेत. त्यामुळे त्यांना संपुर्ण नागरी सुविधा देणे आवश्यकत आहे व या वार्डातील रस्त्यावर डांबरीकरण अद्यापही झालेले नाही. यापेक्षा इमारती व प्रशासकीय इमारतीसाठी जी ठेवण्यात आलेली जादा तरतुद काढुन घ्यावी किंवा ते प्रस्ताव सध्या स्थगित ठेवून या रस्त्यांच्या कामांसाठी तरतुद वाढवावी. सध्या इमारती झाल्या नंतर इतर कामांसाठी महापालिकेकडे पैसा पुरेसा नाही.

**श्री. गौतम लांडगे :** ज्या भागातील रस्त्यांची अवस्था चांगली नाही. त्यांना अगोदर प्राधान्य द्यावे.

**मा. सभापती :** नागरीकांना योग्य सुविधा मिळणेसाठी शहरातील रोड/लाईट/ड्रेनेज/पाणीपुरवठा या मुलभूत सुविधा पुरविणेस प्रशासनातर्फे प्राधान्य देण्यात येईल.

१) प्रशासकीय खर्च २) पाणी पुरवठा ३) भुमिगत जलनिसारण व्यवस्था ४) झोपडपट्टी विकास कार्यक्रम ५) मेमोरियल संशोधन केंद्र ६) रस्ते, विद्युत आदिंसाठी मंजुरी रस्त्यांच्या कामासाठी तरतुद ठेवलेली रु. ५.८५ अपुरी असुन त्यात वाढ करुन रु. ६.५० कोटी करण्याची जादा तरतुद करण्यात येते.

**श्री. संजय जोशी :** १) अद्ययावत कत्तलखाना या मधुन रु. १५.०० लाख तरतुद करणे व शासकीय अनुदाना मधुन खर्च करणे.

२) प्रशासकीय इमारत मधुन रु. ५०.०० लाख काढावे.

३) वाचनालय/उर्दु वाचनालय या मधुन रु. ५.०० लाख काढावे.

**मा. सभापती :** शहरातील ३ ते ४ स्मशानभुमी आदर्श स्मशानभुमी तयार करावयाच्या आहेत.

**श्री. मुजाहेद एकबालोधीन :** महापालिकेच्या मुख्य कार्यालयास लागुन असलेली कब्रस्तान तिचा विकास करावा, गेल्या कित्येक बैठकीत याबाबत मी चर्चा करीत आहे, तरीही विचार होत नाही. जर माझे ऐकत नसल्यास या बाबत निषेध करतो.

**श्री. अशफाक सलामी :** शहरातील बऱ्याचशा कब्रस्तानाच्या बाबतीत विकास होणे आवश्यक आहे, जेणे करुन मृत्युनंतर अंतिम संस्कारासाठी त्याना त्या ठिकाणी योग्यरित्या संस्कार केल्या जाऊ शकेल. बऱ्याचशा शासनाच्या जागेवर अंत्यसंस्कार केल्या जाते, परंतु त्या ठिकाणी सुविधा मात्र कुठल्याही

नसतात. कब्रस्तानामध्ये सुविधा पुरविणेसाठी वक्फ बोर्डाकडुन एन.ओ.सी. घेऊन महापालिकेने सुविधा पुरविणेची व्यवस्था करावी.

**श्री. गौतम लांडगे :** वक्फ बोर्डाकडुन एन.ओ.सी. प्राप्त झाल्या नंतरच कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** शहरातील काही निवडक स्मशान भुम्या आहेत त्यांना आदर्श म्हणुन महापालिकेने विकसीत करावयाचे आहे.

१) बेगमपूरा २) पुष्पनगरी ३) डॉ. आंबेडकर नगर ४) शहानुरवाडी ५) जाफरगेट कब्रस्तान ६) मुकूंदवाडी, बुढ्ढीलेन, चित्तेखाना कब्रस्तान ७) त्याचप्रमाणे कॉमरेड अशफाक उल्ला हुतात्मा (स्मारक) ८) लोकमान्य टिळक यांचा पुतळा ९) चाफेकर बंधु पुतळा १०) महाराणा प्रताप/अहिल्याबाई होळकर, मलिकअंबर यांनी केलेल्या कामांचा बोर्ड लावणे इ. प्रस्ताव विकसीत करण्याचा मानस आहे. आणि या बाबत प्रायोजकत्व एखादी कंपन्या, बँक किंवा नामांकित ट्रस्टी असल्यास त्यांचेकडुन करवून घ्यावेत, यासाठी महापालिकेतर्फे आर्थिक झळ (खर्च) करण्याची आवश्यकता नाही.

**उप आयुक्त (प्र.) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, अण्णाभाऊ चौक व महात्मा फुले चौक सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करण्यासाठी स्वंतत्र प्रस्ताव तयार करुन शासनाक डे पाठविणेसाठी मंजुरी घेण्यात येईल. यासाठी रहदारीस कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही. याची दखल घेतल्या जाईल.

**मा. सभापती :** ठिक आहे. प्रायोजिकत्व मिळवून सौंदर्यीकरण करुन घेण्यास हरकत नाही.

**श्री. संजय जोशी :** शहरातील सिग्नल बाबत शासनाकडुन अनुदान मिळते ते पोलीस आयुक्तांशी चर्चा करुन पाठपुरावा व अनुदान प्राप्त करावे.

**अति. शहर अभियंता :** याबाबत नविन सिग्नलसाठी शासनाकडुन अनुदान मिळाले नाही.

**श्री. संजय जोशी :** स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीत पुन्हा रु. ५० हजारांची वाढ करावी.

**प्रभाकर विधाते, श्री. नरसिंग ढगे, श्री. गौतम लांडगे :** स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतुन खालील प्रमाणे निधीचा वापर करु नये अशी अट असावी.

१) एखाद्या संस्थेला मदत देण्याची प्रकिया बंद करावी.
२) शाळेला फर्निचर बंद.
३) खेळाडु यांना व इतर परदेशात जाण्यासाठी मदत देणे बंद.
४) ह्दयशस्त्रक्रिया यासाठी शासनाकडुन मदत मिळते, म्हणुन महापालिकेने
देऊ नये.
५) मुरुम टाकणे

**मा. सभापती :** ठिक आहे. १) सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे स. सदस्यांचा स्वेच्छानिधी शाळेला फर्निचर पुरवठा बंद करावा.

२) रुग्णासांठी (फक्त किडणी, ब्लड कँसर इ. ऑपरेशन सोडुन ) इतर रोगांवर मदत बंद.
३) मुरुम टाकणे बंद.
४) खेळाडुंना (कोणत्याही प्रकारचे) आर्थिक सहाय्य करु नये.
५) कोणत्याही संस्थेला आर्थिक मदत करणे नाही.

फक्त वार्डातील विकास कामांसाठी निधीचा वापर करावा अशी अट प्रशासनातर्फे (लेखा विभागाने) प्रस्तावित करावी.

**श्री. नरसिंग ढगे :** माझ्या वार्डात उद्याने नाहीत परंतु महापालिकेच्या मोकळया जागा आहेत गेल्या ४ वर्षापासुन या भागासाठी उद्यान विकसीत करण्यासाठी मी सतत मागणी करीत आहे.

**मा. सभापती :** उद्याने विकसीत करण्याची कार्यवाही उद्यान अधिक्षक यांनी ज्या भागासाठी मागणी आहे. त्या त्या ठिकाणी टप्प्याटप्याने करावी.

**प्रकल्प संचालक :** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत ही दारिद्रय लोकांचे प्रत्येक घोषित झोपडपट्टी भागात जाऊन सर्व्हे करुन सदरची योजना राबवावयाची आहे. यासाठी शासनाकडुन रु. ५५.०० लाखचे अनुदान प्राप्त झाले असुन त्या प्रमाणे कार्यवाही चालु आहे, या बाबत जाहिरात देऊन आक्षेप मागवुन लोकांकडुन अर्ज मागविले असता ९५०० अर्ज प्राप्त झाले आहेत. शासनाचे आदेशानुसार समाजातील एस्सी/एसटी/व्हीजेएनटी/ या वर्गातील ८०% लोक झोपड पट्टयातुन राहतात त्यांना त्या भागात वाचनालय/दवाखाना इ. बाबत सेवा उपलब्ध करुन द्यावी.

**मा. सभापती :** या बाबतचा फायदा शहरातील ५२ घोषित झोपडपट्टीतील लोकांसाठी व्हावा व तशा प्रकारची यादी सादर करावी.

**श्री. विखारोधीन :** शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता या शहरातील विद्युत लाईटसाठी ठेवण्यात आलेली तरतुद कमी असुन ती वाढविण्यात यावी.

**उप अभियंता विद्युत :** लाईट विभागासाठी वेगवेगळया प्रकारचे दुरुस्तीचे कामे असतात, यासाठी दुरुस्तीसाठी रु. ४०.०० लाखाची तरतुद कमी असुन ही निधी आणखी रु. ४०.०० लाख म्हणजे रु. ८०.०० लाखापर्यंत वाढविण्यात यावी.

**श्री. राजकुमार बचाटे :** गजानन मंदीर येथे व आकाशवाणी चौक, क्रांती चौक येथील रहदारीस आळा बसण्यासाठी भुयारी मार्ग करण्याचा प्रस्ताव ठेवावा व यासाठी औद्योगिक क्षेत्रातील नामांकित कंपन्या यांना प्रायोजकत्व देऊन कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा चांगला असुन भुयारी मार्गाचा त्यानुसार विचार करण्यास हरकत नाही.

**श्री. बन्सी गांगवे :** महापालिकेतील वाढते काम लक्षात घेता या ठिकाणी ड्रेनेज व पाणीपुरवठयाचे एकच कार्यकारी अभियंता आहे. या

**सौ. राधाबाई तळेकर :** विभागासाठी दोन भाग पाडुन ड्रेनेज विभागासाठी एका कार्यकारी अभियंता तात्पुरत्या स्वरुपात जेष्टतेनुसार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, जेणे करुन नागरिकांच्या तक्रारी येणार नाहीत.

**श्री. अशफाक सलामी :** सध्या दोन्हीही विभाग (ड्रेनेज व पापु) एकच आहेत त्यामुळे काहीही तक्रारी नसल्याने वेगळा विभाग करण्याचा प्रश्नच येत नाही.

**मा. सभापती :** मुळ अंदाजपत्रक सन १९९९-२००० व सुधारित अंदाजपत्रक सन १९९८-९९ चा अंदाजपत्रकीय सभेतील सर्व स. सदस्यांचे चर्चेनुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले व काही अंदाजपत्रकातील दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यांत आली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये स्थायी समिती सभागृहा समोर सादर करण्यात आलेल्या सन ९८-९९ चे रु. ८२ कोटी ८० लाख २६ हजाराचे सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी

देण्यात येते. तसेच प्रशासनातर्फे सन ९९-२००० वर्षाकरीता सभागृहा समोर सादर करण्यात आलेल्या अर्थ संकल्पात खालील दर्शविल्या प्रमाणे दुरुस्ती व फेरफार करण्यात येते.
जमाबाजु

| अ. क्र. | लेखाशिर्ष /तपशिल | मुळ अंदाजपत्रकातील तरतुद | स्थायी समितीने सुचविलेले तरतुद |
|---|---|---|---|
| १. | जकात | ५२ कोटी | ५१ कोटी |
| २. | मनपा मालमत्ता पासुनचे उत्पन्न नाटयगृह, वसंतभुवन, नेहरु भवन, संत एकनाथ रंगमंदीर, सर सय्यद हॉल इत्यादी इमारत भाडे इ. | १२ कोटी | ११.६२ लाख |
| ३. | पाणीपट्टी | १४ कोटी | १० कोटी |

## तपशिल

**१. जकात**

| अ. क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | प्रस्तावित दर | स्थायी समितीने शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ५ अ. | टायड्रो जिनीटेड तेल, वनस्पती किंवा खाद्य तेलाच्या निर्मीतीसाठी लागणारे तेल | १% | २% | १% |
| ब. | खाद्य तेलाचे इतर सर्व प्रकार, शुध्द तेल, लोणी, शुध्द तुप वनस्पती तेल | १% | २% | १% |
| ६ अ. | साखर, खडी साखर, चमचमी आणि बुरा साखर, | १% | २% | १% |
| ब. | सर्व प्रकारची गुळ व रब काकवी पेंड खजुर शिरा ऊस | १% | २% | १% |
| ९. | चहा कॉफि व कॉफि बिया | २% | ४% | २% |
| १०. | केशर व कस्तुरी | २% | ४% | ४% |
| ११. अ | सुकलेले बोंबिल<br>डुकराची पातळ चरबी डबाबंद<br>मासे फेरीकासेरे अन्न डबाबंद<br>कोबंडीचे मांस | २%<br>२% | ४%<br>४% | ४%<br>३% |
| ११. क | ग्लुकोज, मध, बटाटा, वेफर्स व चिप्स, दुधाची पावडर, मलाई, श्रीखंड, आम्रखंड, सर्व प्रकारचे सरबत, खवा, | २% | ४% | ३% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सायकरीन, चक्का, लस्सी, कोटप करी पावडर, कस्टई पावडर, रस, शितपेय व सर्व प्रकारचे खाद्यपेय तयार केलेली व साठवलेली मिठाई,खनिज पाणी, खाण्या योग्य बेक आणि टॅम कोरडे लोणी, सुकलेले किंवा ठेवलेली फळे आणि कठीण सालीची फळे, सुपारी, सुकलेले मासे, खवा, मिठाई जॅम आणि जेली, आटवलेले दुध आणि ठेवलेले आईसक्रीम सर्व प्रकारचे पिष्टमय पदार्थ, पिकलेस कोका, कोकच्या बिया, चॉकलेटस्, बिस्कीटस, केकरा, डुकराची चरबी, मावा दुधाची, मलाई चक्का आणि दही, फळाचा रस शरबत आणि पेय, ग्लुवजेड एवस्ट्रोज किंवा कोणत्याही प्रकारच्या फ्रुट शुगर आणि खाद्य तेला व्यतिरिक्त तेलसाठा, बेंकींग किंवा करीपावडर, सॅकरीन सर्व प्रकारचे अन्नाचे रंग आणि इतर सव्र प्रकारचे जव, पापड, कोणत्याही प्रयाजनासाठी साठवण्यात आलेले मास, होल दुध किंवा टोन्ड दुध, स्क्रीम दुध भुकटी, किंवा नीर या व्यतिरिक्त विनिर्दिष्टपणे तरतुद न करण्यात आलेले इतर सर्व प्रकारचे मालावर | | | |
| १२. अ. | गॅस भरलेले सर्व प्रकारचे सिलेंडर, सॅानिटर टॉवेल्स, बँडेज, जंतुरहित कापुस, यासह जंतुरहित वस्तु | १% | ३% | १% |
| ब. | औषधी, आयुर्वेदीक औषधी, अॅलोपॅथिक औषधी, होमियोपॅथिक औषधी व युनानी औषधी | १% | २% | १% |
| १४ ब. | शोभिवंत झाडे व रोपटे, सर्व प्रकारची फुले व फळांची रोपटे | १% | २% | २% |
| १६. | सर्व प्रकारचे गोड ब्रेड, बेरी इ. | २% | ३% | ३% |
| १८. | पोटॅश, रिठे, तुरटी, सरस, शिकेकाई, सोडा, भांडी, कपडे, आणि फरशी घासण्यासाठी वापरले शुध्द मीठ | १% | ३% | ३% |
| १९. अ. | पांढरी व लाल सुपारी व इतर सर्व प्रकारची मसाला सुपारी | १% | ३% | ३% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ब. | कापुर<br>विलायची, जायफळ, ओलाचासिडस, लवंग, गरम मसाला, मसाल्याच्या वस्तु | १%<br>१% | ३%<br>३% | १%<br>२% |
| २०. | ओवा, अंबी हळद, दगडफुल, उद, कात, कडकी बीज, खसखस, गुलाब, गोडंबी, सरस, डिंक, जिरा, काळे मिट, बुक्का राळ, शेंदुर, खान्याचा सोडा, सजजिरा, शेंदे मीठ, धणे, खोबरे, साबुदाना, मिरची, हळद/मसाला पावडर आणि सर्व प्रकारच्या किराणा वस्तु, खान्याचा रंग या व्यतिरिक्त विनिर्दिष्ट न केलेल्या सर्व प्रकारच्या किराणा वस्तु. | १% | २% | १.५% |
| २६. ब. | कोळसा व कोक (दगडी कोळसा) हार्ड कोक | ३% | ४% | ४% |
| २७. | फटाके, दासकाम व त्याचे घटक भाग आणि स्फोटक कॅलशियम काबाईड | ४% | ५% | ५% |
| २८. | इलेक्ट्रीक गॅस, लाईटर, गॅस लाईटर, पेटविण्याच्या वस्तु व त्यांचे सुटे भाग | २% | ३% | २% |
| २९. ब | बुट पॉलिश व धातु पॉलिश | २% | ३% | ३% |
| ३०. | अखाद्यतेल बिया, लिंबोळी, सरकी, एरंडी, अखाद्यतेल, शुध्दतेल, कॉटन वॉश ऑईल, एरंड तेल, इ. आयात केलेले राईस ब्रँड आईल, आयात केलेल्या खाद्य व अखाद्य तेलाची निर्मिती | १% | ३% | २% |
| ३१. | औद्योगिक अल्कोहोल जसे : आईलीन, टाऊलीन, ॲसिटोन, औषधीत वापरण्यात येणारे क्लोरोफॉर्म, बेनझिन सोलॅक्स इथाईल ॲमिटेक्स आणि ईथाईल, अल्कोहोल, आयसोप्रोफिल अल्कोहिल, रोटेस्टॉरिधो अल्कोहिल इत्यादी | १.५% | ४% | ४% |
| ३३. | ग्रीस व पेट्रोलियम जेली, पॅरोफिन जेली, पॅरोफिन व्हॉक्स | २% | ३% | ३% |
| ३३. ड. | औषधी तयार करण्यासाठी सर्व प्रकारची रसायने (औषधी गुणधर्म ग्रंथात विनिर्दिष्ट केलेले रसायन) | १% | ४% | ३% |
| ३६. | आगपेटी | १% | २% | १% |
| ३७. | जळावु लाकुड | ०.३० | २% | १% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पैसे प्रति क्विंटल | | |
| ३८. | उर्वरीत मस, बॉल, क्ले, चायना क्ले, सिलिका टेल, बॅन्टो नाईट आणि फाऊंडरी सँड सिलीका, सँड, प्लॅस्टर ऑफ पॅरिस, फायबर ब्रिक्स, ॲल्युमिनियम ब्रिक्स, सिलीकाब्रिक्स, फायबद, क्रोममॅगना, साईड ब्रिक्स, बी.पी. सेटस, लेंडल स्लीव्हज, डेड बर्नट मॅगनसाईट पावडर | ४% | ४% | २% |
| ४०. अ. | ओले डांबर बिटयुमिन, फरनिश दगड, मॅगनिज, कुरुंद दगड फ्लोअर मिलसाठी वापरण्यात येणारा दगड, धार लावण्याचा दगड, दगडी पावडर, एमरी स्टोन, डोलामाईट पावडर, ग्राईंडींग व्हील्स, लाईम स्टोन. | ३% | ४% | ४% |
| ब. | विटा आणि खंगर | २% | ४% | ४% |
| ४१. ब. | लाकुड व दगड यावर कोरीव काम केलेल्या वस्तु आणि सर्व प्रकारच्या मुर्ती (पुतळे) | २% | ४% | ४% |
| ४४. | डिस्टेम्बर इमारतीस रंग देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तु, वार्निश, उकळलेले सरकीचे तेल, तागीचे तेल, फ्रेंच पॉलिश, टरपनटाईन, झिंक ऑक्साईड, रेड ऑक्साईड, ॲल्युमिनियम ऑक्साईड, जलरोधक साहित्य, रंग टयुनिग एक्सट्रक्सटस, नीळ आणि नायट्रो सेल्युलोज थिनर आणि क्लीअर लिकर, औद्योगिक वापरात येणारे रंगद्रव्य, जयसॉल ब्ल्यु, ६ बी, रंग रसायने, सिलीका डायऑकसाईड, वस्तु निर्मितीच्या कारखान्यात मुद्रणासाठी उपयोगात आणले जाणारे ॲल्युमिनियम पेस्ट, प्रिंटींग पेस्ट आणि पिव्हीसी कंपाऊंड तयार करण्याच्या प्रयोजनासाठी रंग, पांढरे शिसे, लाल शिसे. | ३% | ४% | ३% |
| ४५ | सर्व प्रकारचे सॅनिटरी गुडस व फिटींग्स आणिा सिमेंटरिंग, कव्हर्स चिनी मातीच्या वस्तु, चायना पाईप, मातीची भांडी, चिनती मातीची भांडी, चीनी मातीच्या | ३% | ४% | ४% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वसतु मेटल, व्हाल्वस, ब्रारा आणि स्टील कॉकस, काचेचा मुलामा चढविलेल्या वस्तु इमारतीच्या सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तु. | | | |
| ४६. | रुफिंग फेल्ट | २% | ४% | ४% |
| ४८. | प्लायवुड, फोरमाईका, सनमाईका, किटप्लाय हार्डबोर्ड, कार्डबोर्ड, स्टॉबोर्डस, मांऊट बोर्डस, मिलबोर्डस, मसोनाईट, सॉफ्ट बोर्डस किंवा कोणत्याही प्रकारच्या लाकडापासुन कृत्रीमरित्या तयार करण्यात आलेल्या वस्तु | ३% | ४% | ४% |
| ४९. | स्टील फर्नीचर, बांबु बेत फर्निचर, फायबर, व प्लॅस्टिक फर्निचर, लाकडी फर्नीचर, ॲल्युमिनियम फर्नीचर आणि फर्नीचर साठी वापरलेला कच्चा माल. | ३% | ५% | ५% |
| ५०. अ. | केश तेल, सुवासिक तेल, सर्व प्रकारच्या सुगंधी वस्तु, अगरबत्या, गुडनाईट दंतमजने, टुथ पेस्ट टुथब्रश, पोमेड कंगवे, आरसे टेअरीपिन्स, मार्टर्स सस्पेन्डर्स लोबान, कोकोराज, केसाकरिता पॅराशुट तेल सर्व प्रकारची सौंदर्य प्रसाधन, फिनेल, चंदनी तेल, ॲन्टीसॅप्टीक सौंदर्य क्रिम, बेरियर क्रिम कुमकुम, काजळ, सिंदुर, आल्टा आणि महावर सिनेस्टीक शेविंग क्रीम, सेविंग स्टीक्स, पोमेड ब्रशेस इमिटेशन पर्स | २.५०% | ४% | ३% |
| ब. | कात्र्या, वस्तरे, सेफ्टीवेअर्स, ब्लेडर्स, चाकु सर्व प्रकारचे कटलरी वस्तु सर्व प्रकारच्या सुया, कुलूप आणि किल्या आणि कटलरी वस्तु स्टोव्ह, इलॅस्टीक्स कार्डस, कोट डॅगर्स पेट्रोमॅक्स आणि त्याचे भाग | २.५% | ४% | ३% |
| क. | लेसेस, टेपस, लाकडी व धातुच्या रिंग, भरत कामाच्या वस्तु, स्लीव्हालाईड आर्टीकल्स, बॅकलाईट व बॅकलाईटच्या वस्तु, हस्तीदंताच्या व हाडाच्या बनविलेल्या वस्तु आणि सर्व प्रकारचे गुंडया, भरत काम आणि हॅबर डॅशरी टेलरींग साहित्य. | २.५% | ४% | ३.५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ड. | छत्र्या<br>रेनकोट, हॅट, कॅप्स आणि पावसाळी प्रावरणे ताडपत्री | २.५%<br>२.५% | ३%<br>३% | २.५%<br>३% |
| फ. | नटबोल्ट, वायसर, हेक्साब्लेड, सब्बल, हातोळी, कुदळी, फावडे, घमेला, साखळी, तराजु आणि वजने खिळे, हत्यारे हॅन्डड्रॉप्स, ताडी, डोअरचेन, आय पिसेसे, डोअर हॅन्ड, अँगल, स्क्रु, डोअर क्लोजर्स, ड्रिल्स, कुदळी, एक्सलड ड्राईंग पिन्स इथे विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकारचे सामान व हुक्स | २.५% | ४% | ३% |
| ५१. अ. | सोने व त्यापासुन बनविलेले दागिने | १% | २% | २% |
| ब. | चांदी व त्यापासुन बनविलेले दागने | १% | २% | २% |
| क. | हिरे, माणिक, मोती व त्यापासुन बनविलेलेल्या मॉल्यवान वस्तु व दागिने | १% | ५% | ५% |
| ड. | इमिटेशन दागिने | १% | २% | २% |
| ५२. | ग्लास, काच व काचेच्या बाटल्या शोभिवंत काच (रंगित काच) काचेच्या वस्तु, बांधकामात इमारती च्या सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या कान्पा (सॅनेटरी वेअर्स वस्तु वगळुन) | ३% | ४% | ४% |
| ५४. क. | नागवेलीची पाने (५००पानाचा पर पेटारा) | १५ पैसे | ०.५०% | ०.५० पैसे |
| ५५. | बिडी आणि तपकिर | १% | २% | २% |
| ५६. | बिडी तयार करण्याकरिता वापरात येणारी पाने (तेंदु पत्ता) | १% | २% | २% |
| ६०. | कच्चे किंवा पिंजलेले लोकर, हॅम्प तागा, नॅट, इतर कच्चे धागे आणि रॉस्पन, हातमाग धागा | २% | ३% | ३% |
| ६१. | सुती धागे फायबर, पॉलिस्टर, सिंथेटिक दोरा आणि सर्व प्रकारचे दोरे आणि दोर हँडलुम दोरे, नायलॉन दोर, ज्युटरोप कॉथर (तागाचे दोन काथ्या) . | १.५% | ३% | २.५% |
| ६२. | कातडे आणि चामडे | १.२५% | २.५% | २.५% |
| ६४. | सर्व प्रकारचे रबर टायर्स व टयुब | २% | ३% | ३% |
| ६५. | रबर आणि खराच्या वस्तु गुट्टा परचा आणि त्यापासुन बनविलेल्या वस्तु (पुर्णतः | २% | ३% | ३% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अंशतः) रबराचे द्रावण, कच्चे रबर, लॅटेक्स रबर आणि फोमच्या सर्व प्रकारच्या वस्तु (बाब क्र. ६४ आणि खेळणी वगळुन) | | | |
| ७३. क. | इ.पी.ए.बी.एक्स., पी.बी.एक्स सेट फॅक्स मशिन, एस.टी.डी., पल्स मशिन आणि प्रिंटर, टेली प्रिंटर टेली प्रिंटर, टेलीप्रिंटर मशिन, स्कॅनिंग मशिन फोटो कॉपीज, झेरॉक्स, मशिन, संगणक आणि डि.टी.पी. इलेक्ट्रानिक मशीन, इलेक्ट्रानीक टंकलेखन यंत्र आणि त्याचे सुटे भाग आणि त्याच्या उत्पादनात वापरले जाणारे भाग, दुरध्वनी संच व त्याचे सुटे भाग, गॅसकिट, संगणक विषयक लेखन सामुग्री, वायरलेस आणि त्याच्या उत्पादनात वापरात येणारे सुटे भाग. | ४% | ६% | ५% |
| ७९. अ. | लिहिण्याची शाई, मुद्रणालयात वापरली जाणारी प्रिंटीग पेस्ट | १% | ३% | २.५% |
| ब. | लेखन सामुग्री, फाऊन्टन पेन, बॉल पेन, निप, रिफिल्स, जाहिरात साहित्य, कार्बन, अमोनिया प्रिंट पेपर, ट्रेसिंग पेपर, डायरी, रजिस्टर व यात विनिर्दीष्ट न केलेले सर्व प्रकारचे लेखन सामुग्री. | १% | ३% | १.५% |
| क. | कोरा कागद, कागद, शालेय वह्या, पुस्तके, महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षणाची सर्व पुस्तके, ग्रंथालयीन पुस्तके, मासीके, कॅलेंडर्स आणि कायद्याची पुस्तके. | १% | ३% | १% |
| ड. | कोणत्याही मिश्रणाचा व जाडीचा सर्व प्रकारचा कागद लिफाफे, निमंत्रण पत्रिका व रद्दी कागद | २% | ३% | २.५% |
| ८१. | लाख, बुज व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु क्राऊन कॉर्क व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु. | २% | ३% | ३% |
| ८५. क. | सर्व प्रकारची खेळणी | १% | ३% | २% |
| ड | सर्व प्रकारचे खेळाचे साहित्य | २% | ४% | ३% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ई. | पॅकिंग मटेरियल जसे : फ्लेक्झीबल कन्टेनर्स, जिलेटीन कॉरग्युटेड पेपर, ॲल्युमिनीयम फाईल्स, कॉरग्युटेड बॉक्सेस व यात विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकारचे पॅकींग मटेरियल | २% | ३% | ३% |

| **जकात दर अनुसुचीतील क्र.** | **वस्तुंचे नांव** | **प्रचलित दर** | **प्रस्तावित दर** | **स्थायी समितीने शिफारस केलेले दर** |
|---|---|---|---|---|
| १. अ. | धान्य, पीठ, डाळी, ज्वारी, भाजलेले धान्य, रवा, मैदा, गव्हाचे पीठ आणि ज्वारी (कण्या) लाहया फुटाणे पोहे व कडधान्य. | .५० पैसे प्रति क्विंटल | रु. १.०० प्रति क्वि. | ०.५० पैसे प्रती क्विं. |
| २. | गवत, गवताची कांडी (पेंढी) उसाचे वाढे, कोंडा, कडबा व भुसा (घोडया करिता वैरण) (पशुखाद्य वगळता) | ०.२० पैसे प्रति क्विं. | ०.५० पैसे प्रति क्विं. | ०.५० पैसे प्रति क्विं. |
| ८. | बर्फ | ०.२० पैसे प्रती १० किलोस | ०.५० पैसे प्रती १० किलोस | ०.५० पैसे, प्रती १० किलोस |
| १४. अ. | सर्व प्रकारची ताजी फळे | ०५ प्रती १०किलोस | १% | १% |
| १५. | नारळ | रु. १.०० प्रती १०० नगास | २% | रु. ४/- प्रती १०० नगास |
| १७. अ. | ताजे मासे, झिंगे व ताजे मासे | ०.५० पैसे प्रती क्विंटल | १% | १% |
| ब. | शो-कुकरींगसाठी वापरण्यात येणारे जिवंत मासे | ०.५० पैसे प्रती १० किलोस | १% | १% |
| क. | अंडी | ०.५० पैसे प्रती १० किलोस | १% | १% |
| २२. | मेंढया, बकऱ्या, कोकरे | ०.५० पैसे | रु. १.०० | रु. २.०० प्रती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रती नग | प्रती नग | नग |
| २३. | बैल, म्हशी, गाय, कालवडी, घोडे, गाढव, डुकरे उंट व हत्ती | रु. १.०० प्रती नगास | रु. ५.०० प्रती नग | रु. ५.०० प्रती नगास |
| २४. | कोंबडया, बदके आणि सर्व प्रकारचे पक्षी | ०.२० पैसे प्रती नग | ०.५० पैसे प्रती नग | रु. १.०० प्रती नग |
| २५. | सर्व प्रकारचे वन्य व पाळीव प्राणी | रु. १.०० प्रती नग | रु. १०.०० प्रती नग | रु. १०.०० प्रती नग |
| ३२. | घासलेट | ०.०२ पैसे प्रती १० लिटर | ०.५०% | ०.५०% |
| ४२. अ. | खडी, दगडाचा चुरा | रु. ५.०० प्रती ट्रक | रु. १०.०० प्रती ट्रक | रु. १५.०० प्रती ट्रक |
| ब | माती वाळु आणि मेटल, डब्बर मुरुम | रु. ५.०० प्रती ट्रक | रु. १०.०० प्रती ट्रक | रु. १५.०० प्रती ट्रक |
| ८४. | मळी | रु. १.०० प्रती टनास | ४% प्रती टनास | ४% प्रती टनास |

उपरोक्त फेरफारा नुसार जकातीचे रुपये ५२ कोटीच्या उत्पन्ना ऐवजी ५१ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

**२. मनपा मालमत्तापासुन उत्पन्न :**

**१. ऑकेस्ट्रा**

| **अस्तित्वातील दर** | | **प्रस्तावित दर** | **स्थायी समितीने शिफारस केलेले दर** |
|---|---|---|---|
| अ. मुळ भाडे | रु. २०००/- | रु. २५००/- | रु. २५००/- |
| ब. विद्युत शुल्क | रु. १५०/- | रु. २००/- | रु. २००/- |
| क. सेवा शुल्क | रु. ५०/- | रु. १००/- | रु. १००/- |
| | रु. २२००/- | रु. २८००/- | रु. २८००/- |

**०२. नाटय/सांस्कृतीक कार्यक्रम**

| **अस्तित्वातील दर** | | **प्रस्तावित दर** | **स्थायी समितीने शिफारस केलेले दर** |
|---|---|---|---|
| अ. मुळ भाडे | रु. १२००/- | रु. १८००/- | रु. १८००/- |
| ब. विद्युत शुल्क | रु. १५०/- | रु. २००/- | रु. २००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| क. सेवा शुल्क | रु. ५०/- | रु. १००/- | रु. १००/- |
| | रु. १४००/- | रु. २१००/- | रु. २१००/- |

तसेच वरील इमारतीमधील कला दालनात सुध्दा वाढ होणे आवश्यक आहे. ती खालीलप्रमाणे केली आहे.

| **अस्तित्वातील दर** | | **प्रस्तावित दर** | **स्थायी समितीने शिफारस केलेले दर** |
|---|---|---|---|
| अ. मुळ भाडे | रु. ५००/- | रु. १०००/- | रु. १०००/- |
| ब. विद्युत शुल्क | रु. ०५०/- | रु. २००/- | रु. २००/- |
| | रु. ५५०/- | रु. १२००/- | रु. १२००/- |

तसेच या विभागाच्या ताब्यात असलेल्या नेहरु भवनच्या दरात सुध्दा वाढ करणे गरजेचे आहे. कारण नेहरु भवनचे नव्याने नुतणीकरण करण्यात आलेले आहे. तसेच विद्युत दरात वाढ झालेली आहे. त्यामुळे वाढ करणे आवश्यक आहे.

**०३. नेहरुभवन**

| **अस्तित्वातील दर** | | **प्रस्तावित दर** | **स्थायी समितीने शिफारस केलेले दर** |
|---|---|---|---|
| अ. ३ तासासाठी | रु. ७५०/- | रु. १०००/- | रु. १०००/- |
| ब. ६ तासासाठी | रु. १०००/- | रु. १२००/- | रु. १२००/- |
| क. ६ तासापेक्षा जास्त | रु. १२००/- | रु. १५००/- | रु. १५००/- |
| ड. २४ तासासाठी | रु. १५००/- | रु. १८००/- | रु. १८००/- |
| उ. लग्न कार्यासाठी | रु. २०००/- | रु. २५००/- | रु. २५००/- |
| इ. मंडप | रु. ५००/- | रु. ७००/- | रु. ७००/- |

वरील दरामध्ये विद्युत दर पुर्वीच्या दरामध्ये विचारात घेतलेले नाही. त्यामुळे फक्त मुळ भाडेमध्ये वाढीव दर प्रस्तावित केले आहेत. सबब अनुक्रमे खालील प्रमाणे विद्युत शुल्क घेणे योग्य राहिल. अ) रु. ५०/- ब) रु. १००/- क) रु. १५०/- ड) रु. २००/-

**०४. मनपा शाळा व त्या लगतचे मैदाने**

तसेच मनपा शाळा व त्या लगतचे मैदाने लग्न कार्यक्रमासाठी दिली जातात. त्याचे दर अल्प आहेत. त्यामध्ये खालील प्रमाणे वाढ होणे आवश्यक वाटते.

| **अस्तित्वातील दर** | | **प्रस्तावित दर** | **स्थायी समितीने शिफारस केलेले दर** |
|---|---|---|---|
| भाडे | रु. ६००/- | रु. १०००/- | रु. ७५०/- |
| अनामत | रु. ४००/- | रु. ६००/- | रु. ५००/- |

उपरोक्त फेरफार करुन १२ लाखाचे उत्पन्नाच्या उद्दिष्टाऐवजी ११.६२ लाखाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

**३. पाणी पट्टी**

| **अस्तित्वातील दर** | **प्रस्तावित दर** | **स्थायी समितीने शिफारस केलेले दर** |
|---|---|---|
| पाणी पट्टी रु. १०००/- प्रती वर्ष | रु. १५०० प्रती वर्ष | रु. १०००/- प्रती वर्ष |

उपरोक्त फेरफार नुसार वार्षिक उत्पन्न १४ कोटी नुसार १० कोटीचे उद्दिष्ट देण्यात आले.

**खर्चबाजु**

| **अ. क्र.** | **पान क्र.** | **लेखाशिर्ष** | **मुळ अंदाजपत्रकातील तरतुद** | **स्थायी समितीने सुचविलेली तरतुद** |
|---|---|---|---|---|
| १) | १७ | विद्युत साहित्य खरेदी | ४००० | ७००० |
| २) | २८ | दुरध्वनी देयक / नविन दुरध्वनी | १३७५ | १३३७ |
| ३) | ३१ | नविन डांबरी रस्ते | २०००० | २१२०० |
| ४) | ३२ | अद्यायावत कत्तलखाने | २५०० | १००० |
| ५) | ३२ | प्रशासकीय इमारत | १५०००० | १०००० |
| ६) | ३२ | वाचनालय/उर्दु वाचनालय | १००० | ५०० |
| ७) | ३२ | स्मशान भूमी विकास | ४००० | ६००० |
| ८) | ३२ | सिध्दार्थ उद्यान विकास | १५०० | १००० |
| ९) | ३२ | नारेगांव ट्रेचिंग ग्राँऊन्ड | १०० | ५०० |
| १०) | ३२ | पोहण्याचा तलाव | १५०० | ५०० |
| ११) | ३२ | नविन वाहने खरेदी | ५००० | १५०० |
| १२) | ३२ | सभासदांची स्वेच्छा निधी | १६४०० | २०५०० |
| १३) | ३२ | नविन उद्याने | ४००० | ३००० |
| १४) | ३३ | विकास आराखडयाच्या अमंलबजावणीसाठी जमिन आणि इतर स्थावर मालमत्ता संपादन करणे | ४०००० | २०००० |
| १५) | ३३ | शहरामध्ये नविन पोल बसविणे | २५०० | १५०० |
| १६) | ३३ | नविन सोडीयम व्हेपर बसविणे | ८००० | ६००० |
| १७) | ३३ | संगणक | ३००० | १००० |
| १८) | ३३ | श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय | ५००० | ३००० |
| १९) | ३३ | मौलाना अबुल कलाम अझाद | १०००० | ७५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | संशोधन केंद्र | | |
| २०) | ३३ | क्रिडा संकुले | २५०० | १५०० |
| २१) | ३३ | सुलभ शौचालय व मुताऱ्या बांधणे | ४५०० | ३००० |
| २२) | ३३ | वाहतुक नगर विकसीत करणे | १००० | ५०० |
| २३) | ३३ | रोपवे | १०० | ५० |
| २४) | ३३ | तारांगण | १०० | ५० |
| २५) | ३३ | विज्ञानकेंद्र | १०० | ५० |
| २६) | ३४ | दुग्धनगरी स्थापन करणे | १०० | ५० |
| २७) | ३४ | फिरती दवाखाना | ५०० | १००० |
| २८) | ३४ | जिन्सी जिनिंग मिल येथे स्टेडीयम बांधणेसाठी भु संपादन करणे | ५००० | ५०० |
| २९) | ३४ | सुरत पॅटर्न (फेस टु फेस फरशी) | १०००० | ४००० |
| ३०) | ३५ | सरकारी कर्ज परतफेड | ३०००० | २०००० |
| ३१) | ३६ | नाला ट्रेनिंग | १०००० | ५००० |
| ३२) | ३७ | भांडवली कामे पाणी पुरवठा | ३०००० | ४०००० |

सन्माननीय सदस्यांच्या स्वेच्छा निधीमध्ये वाढ सुचित असतांना खालील प्रमाणे उपविधित दुरुस्ती सुचविण्यांत येत आहे.

१) यापुढे कोणत्याही संस्थेस आर्थिक मदत देण्यांत येऊ नये.
२) राज्स्तरीय, राष्ट्रीय स्पर्धेकरिता भाग घेणाऱ्या खेळाडुंना देण्यांत येणारे आर्थिक साह्य देण्यात येऊ नये.
३) फक्त ह्दयरोग, कर्करोग, किडनी या अतिखर्चाच्या रुग्णांना वैद्यकीय प्रमाणपत्रनुसार व मनपा वैद्यकीय अधिकारी यांच्या शिफारशीनुसार प्रत्येक स. सदस्यांनी प्रती रुग्ण एकहजार पर्यंत व एकत्रित रु. २५ हजारापर्यंत आर्थिक मदत देता येऊ शकेल.
४) कुठल्याही खाजगी संस्थेच्या शाळेस लिखाण साहित्य, वहया, पाटया, पुस्तके, गणवेश व फर्निचर देता येऊ नये. फक्त मनपाच्या इयत्ता ५ ते ७ वी पर्यंतच्या शाळेसाठी डयुयल डेक्स करिता रु. २५०००/- पर्यंत आर्थिक मदत देता येऊ शकते.
५) सर्व स. स. त्यांच्या स्वेच्छा निधीतुन आपआपल्या प्रभागात शक्यतो विकासाचेच कामे करण्यांत यावे.

उपरोक्त दुरुस्ती व फेरफारसह सन १९९९-२००० चे मुळ अंदाजपत्रक रु. १०१ कोटी ७८ लक्ष ९१ हजाराच्या मुळ अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मान्यता देण्यांत येऊन सर्व साधारण सभेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

सभापती
स्थायी समिती, महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ६.३.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शनिवार दिनांक ६.३.९९ रोजी मा. सभापती श्री. जयवंत (बंडु) ओक यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे संपन्न झाली. तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात दुपारी ४.०० ऐवजी ४.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. म. अ. रऊफ म. अ. माबुद | स. सदस्य |
| २. | श्री. संजय जोशी | -//-- |
| ३. | श्री. गौतम लांडगे | -//-- |
| ४. | श्री. रविंद्र बाबुराव लांडगे | -//-- |
| ५. | सौ. यशोदा धनंजय वाडेकर | -//-- |
| ६. | श्री. जैन विकास रतनलाल | -//-- |
| ७. | श्री. ढगे नरसिंग मुरलिधर | -//-- |
| ८. | सौ. राधाबाई तळेकर | -//-- |
| ९. | श्री. किशोर तुळशीबागवाले | -//-- |
| १०. | श्री. राजकुमार बचाटे | -//-- |
| ११. | श्री. विखारोधीन पिता खुद्बोधीन | -//-- |
| १२. | श्री. सय्यद अहमद एकबालोद्दीन स. म. कुतूबुधीन | -//-- |

**संवाद :**

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** नेहरुनगर येथील कटकटगेट जवळ एका विद्युत डि. पी. वर पाण्याचा पाईप लाईन मधील पाण्याचे फवारे उडतात तशी बातमी पेपर मध्ये आलेली आहे. त्यामुळे काही विपरीत परिणाम होण्याची शक्यता टाळता येत नाही. त्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** सदर ठिकाणी ३०० मी. व्यासाची पाण्याची पाईपलाईन जाते दर आठ दिवसाला दुरुस्ती केली जाते. तेथे लहानसहान मुले खेळता खेळता स्पॅडल हलवतात. त्यामुळे गॅप निर्माण होतो. गॅपमुळे पाण्याचे फवारे उडतात.

**मा. सभापती :** नेहरुनगर येथे डी.पी. वर पाण्याचे उडत असलेले फवारे तात्काळ बंद होण्यासाठी पाहणी करुन त्या ठिकाणी बॉक्स टाईप चेंबर बांधुन लॉक लावुन कायमची उपाययोजना कशी करता येईल. याबाबत कार्यवाही करावी.

**सौ. वाडेकर यशोदा :** जे लोक मृत होतात त्यासाठी स्मशानभुमीची व कब्रस्तानची व्यवस्था करण्यात येते. परंतु माझ्या प्रभागात कब्रस्तानमधील कबरी तोडुन काही लोकांनी दुकाने थाटली आहेत. त्या संदर्भात संबंधित इमारत निरिक्षक यांना कळविलेले होते. दुकानाची बांधकाम चालु असतांना कळविण्यात आलेले होते. परंतु त्यावेळी कार्यवाही न होता. दुकाने पुर्ण कार्यन्वित झाली नंतर तोडण्यात येऊन संबंधित अनधिकृत बांधकाम करणाऱ्या लोकांचे एकुण १६-

१७ हजार रुपयाचे नुकसान झालेले आहे. या बाबत वेळीच कार्यवाही केली असती तर नुकसान झाले नसते.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उप आयुक्त (म.) :** या संदर्भात एक शिष्टमंडळ आले होते. केलेले अतिक्रमण काढण्यात आले आहे.

**सौ. वाडेकर यशोदा :** ज्यावेळी प्रशासनाला कळविण्यात आलेले होते त्यावेळी संबंधिताचे दुकाने झाली नव्हती काम चालु होते. नुकसान झाले नसते म्हणुन कार्यवाही करण्यास सांगितलेले होते. त्यावेळी कार्यवाही केली नाही. जे काढण्यात येणार आहे. ते सर्व अनधिकृत असतील तेच काढण्यात यावे.

**मा. सभापती :** कब्रस्तानमधील जागेवर कबरी तोडुन बांधकाम करणे योग्य नाही. अतिक्रमण असेल तर आज ज्या प्रमाणे तेथील अतिक्रमण काढण्यात आलेली आहेत तशीच इतर दुकाने काढण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. स. अ. एकबालोधीन :** ज्यावेळी दुकाने संपुर्णतः करण्यात आलेली आहेत त्यावेळी इमारत निरीक्षक काय करतात. त्याच्यावर कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**मा. सभापती :** मुद्दामहुन कुण्या इमारत निरीक्षक यांनी अनधिकृत जागेवर बांधकाम करु दिले असेल तर त्यांच्यावर चौकशी करुन कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. संजय जोशी :** स. सदस्या सौ. वाडेकर यांचा बोलण्याचा उद्देश असा की, ज्यावेळी या संदर्भात तक्रार केली होती त्यावेळी बांधकाम झालेले नव्हते. काम चालू होते. त्याचवेळी ती अतिक्रमणे पाडावयास पाहिजे होती. परंतु वेळ लागल्यामुळे संबंधितांनी त्या ठिकाणी अनधिकृतपणे बांधकाम करुन पैसा खर्च केला नंतर प्रशासनाने अतिक्रमाण पाडण्याची कार्यवाही सुरु केली ती करण्याची गरज पडली नसती व संबंधित दुकानधारकांचे नुकसान झाले नसते. जी अतिक्रमणे तेथिल पाडावयाची राहिलेली आहेत. ती तात्काळ पाडण्यात यावी.

**मा. सभापती :** अतिक्रमण असेल तर ती काढण्याची कार्यवाही करावी.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** भोलेश्वर मार्केट येथील दुकान केंद्राचे बांधकाम पूर्ण होऊन उद्घाटन झालेले नाही.

**मा. सभापती :** अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उप अभियंता (बां.) :** सदर ठिकाणचे पहिल्या टप्प्यामंध्ये १५ दुकाने तयार केलेली असुन मालमत्ता अधिकारी यांना हस्तांतर केली आहे. दुसऱ्या टप्प्यामंध्ये आणखी ११ दुकाने पैकी ७ दुकाने तयार आहे. १५ दुकाने व नविन ७ दुकाने तयार आहेत. त्यात जिना बांधण्यात आलेला आहे. मंदिराचे ट्रस्टी अडथळा करत आहे.

**मा. सभापती :** या संदर्भात संबंधित लोकांकडुन मापालिकेने आगाऊ रक्कम घेतलेली आहे. कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**श्री. म. अ. रऊफ :** सदिया मार्केट येथील ही परिस्थिती याच प्रकारची असुन उद्घाटन होऊन तेथील दुकाने चालु करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** भोलेश्वर मार्केट येथिल म.न.पा. च्या १५ दुकानाचे काम पुर्ण झालेले असुन या बाबत मा. आयुक्तांनी लवकरच उद्घाटन करुन तशी कार्यवाही संबंधित अधिकारी यांनी करावी. जेणे करुन महापालिकेचे उत्पन्नात वाढ होईल. बाकिच्या ४ दुकानाच्या बाबतीतही तात्काळ कार्यवाही करावी वाद असेल

तर मा. आयुक्ताकडे वाटाघाटीसाठी संबंधिताना बोलवण्याची कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** सादीया मार्केट येथील महानगरपालिकेने दुकाने बांधुन २ वर्ष झाले ती चालु करावीत. तेथील आवश्यक ती विद्युत व्यवस्थेची कामे अध्यापर्यंत पूर्ण केलेली नाही.

**अति. शहर अभियंता :** सादीया मार्केट येथील म.न.पा. च्या दुकानांमध्ये विद्युत कनेक्शन दिलेले आहे.

**उप अभियंता (वि.) :** सादिया मार्केट येथील दुकान धारकांना विद्युत पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी डी. पी. बसविण्यात आलेली आहे. कनेक्शन देत आहोत.

**मा. सभापती** : सादीया मार्केट येथील दुकानाचे उद्घाटन मा. आयुक्त यांनी लवकरच करुन घ्यावे. तशी संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी. विद्युत व्यवस्थेबाबत कार्यवाही तात्काळ करावी.

**श्री. स. अ. एकबालोधीन :** नेहरुभवन येथील दुकानासाठी २ वेळा निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्या दुकानांमध्ये काही लोकांनी फेरबदल करण्याचा विचार करुन अधिकाऱ्याच्या कामावर सुचना घालुन प्रशासनाने दुसऱ्यांदा टेंडर काढुन १.५० लक्ष पर्यंत गेले. तसा विचार केल्यास २० हजार रुपये रकमेच्यावर कोणीही त्या दुकाना घेऊ शकत नाही. ज्यानी १.२५ लक्ष पर्यंत लिलाव केला त्यांना ते काम करावयाचे नसुन मुद्दामहुन लिलावात वाढ करुन ठेवलेली आहे. कोणीही एवढे पैसे भरणार नाही.

**मा. सभापती :** संबंधितांनी पैसे भरले होते त्यावेळी डिपॉझिट किती होती. अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उप आयुक्त (म.) :** ३.५० ते ४ लाख १ ल्या लिलावात आलेले होते. दुसऱ्यांदा ११.५० ते १२.५ लाख पर्यंत रक्कम आलेली होती. याबाबत काहीना सवलती दिलेल्या आहेत. परंतु एका व्यक्तीने न्यायालयात प्रकरण नेल्याने तसेच त्या संदर्भात संचिका वकिलाकडे पाठविलेली आहे.

**श्री. स. अ. एकबालोधीन :** ८"x१०" दुकानाची किमंत २० पर्यंत जाते. मुळातच ज्या ठिकाणी दुकाने बनवावयाची नाहीत. ही दुकाने रु. १.५ लक्ष मध्ये कोणीही घेणार नाही. या कामास विलंब लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आजपर्यंत नोटीस दिलेली नाही व कोणीही पैश्याचा भरणा केलेला नाही.

**मा. सभापती :** सदर प्रकरणात तात्काळ लक्ष घालण्यात यावे. व विशेष बाब म्हणुन कोर्टाचे प्रकरण हाताळण्यात यावे.

**श्री. म. अ. रऊफ :** जे लोक कोर्टात गेले त्यांचे काय करणार, ५-१० वर्ष लागतील. किती दिवसांत स्टे व्हॅकेट होईल माहिती दयावी. माझ्या वार्डामध्ये एका कामाच्या बाबतीत ४ वर्षापासुन स्थगित आदेश आहेत. अदयापर्यंत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. अशा न्यायालयीन प्रकरणातबाबत संबंधित म.न.पा. च्या नियुक्त केलेल्या वकिलांना बदलावे नविन वकिलांची नियुक्ती करुन त्यांच्या कडुन लवकर कार्यवाही होईल.

**उप आयुक्त (प्र.) :** कागदपत्राची उपलब्ध झाल्यानंतर लवकर या बाबत स्थगिती आदेश व्हेकेट होऊ शकेल.

**श्री. म. अ. रऊफ :** कोणकोणत्या कागदपत्राची आवश्यकता आहेत. ते कागदपत्र तात्काळ देण्यात येऊन ज्या ज्या प्रकरणांत स्थगिती आदेश झालेले आहेत. त्या संदर्भात नवन वकील लावुन कार्यवाही व्हावी.

**श्री. संजय जोशी :** न्यायालयाचे स्थगिती आदेश व्हॅकिट करण्यास किती वेळ लागेल. याचा नेमका खुलासा अधिकारी करु शकणार नाही. त्यासाठी योग्य त्या कागदपत्राची पुर्तता संबंधित विभागाने करावि.

**मा. सभापती :** स. सदस्यांनी स्थगिती ओदश व्हॅकेट करण्याचा जो मुद्दा उपस्थित केला आहे. यास किती कालावधी लागेल तसे मालमत्ता अधिकारी हे न्यायालयास आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता होते. किंवा काय खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** ज्या ज्या वेळी विधी सल्लागार यांचे विभागाकडून कागदपत्राची मागणी झाली ती सर्व कागदपत्रे सादर केलेली आहेत.

**श्री. म. अ. रऊफ :** माझ्या वार्डातील स्थगिती आदेशाला ४ वर्ष झालेले आहे. उपआयुक्त (प्र.) यांनी या संदर्भात अनेक वेळा कार्यवाही लवकर करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु अदयापर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही नविन वकीलाची नियुक्ती करण्यात यावी.

**मा. सभापती :** महापालिकेचे संबंधित असलेले वकिल यांना बोलावून लवकरात लवकर न्यायालयाचे स्थगित आदेश व्हॅकेट होण्याबाबतची कार्यवाही होईल तशी कार्यवाही करण्यात यावी. य वकिलाकडून कार्यवाही होत नसेल तर नविन ज्येष्ठ वकिलाची नियुक्ती करावि. तसेच मा. आयुक्त यांना विनंती की, काही विभागांमध्ये अतिरिक्त कार्यभार म्हणुन काही अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहे. ते अतिरिक्त कार्यभार त्या अधिकाऱ्यांकडुन काढुन घेऊन अनुभवी तसेच ज्येष्ठतेनुसार ज्याची सेवा जास्तीत जास्त झालेले आहे. अशा कर्मचाऱ्यांमधुन अधिकारी सवर्गातील पदे भरण्यात यावी. जसे मालमत्ता विभागामध्ये जो अतिरिक्त कार्यभार दिला तो दुसऱ्यांना देण्यात यावा. तशी कार्यवाही आयुक्त महोदयांनी करावी.

**उपआयुक्त :** नविन वकिलाचा पॅनेलची एप्रिल मध्ये कार्यवाही होते.

**श्री. म. अ. रऊफ :** किती दिवसांत नविन वकिलाची नेमणुक करणार तसेच स्थगिती आदेश व्हेकेट किती दिवस लागतील खुलासा दयावा.

**उपआयुक्त (प्र.) :** संबंधित वकलांना दोन दिवसांत बोलावुन चर्चा करुन लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. स. अ. एकबालोधीन :** न्यायालयीन केस चालवण्यासाठी वकिलांना किती फिस दिली जाते माहिती द्यावी.

**मा. सभापती :** वकीलांना फिस देण्याबाबत ही प्रशासकीय बाब असल्याने चर्चा करु नये. जास्तीत जास्त व लवकरात लवकर कस मार्गी कशा लागतील याचाच विचार सभागृहाने करावा. आवश्यकता पडल्यास मा. आयुक्त ह स्पेशल वकील लावुन काही केसेस बाबत कार्यवाही करतील.

**उप आयुक्त (प्र.) :** नविन वकीलाची नियुक्ती करावयाची असेल तर तशी कार्यवाही करण्यात येईल. नवीन वकीलांच्या पॅनेल आपण एप्रिल मध्ये नियुक्त करतो. पुढील आठवडयात संबंधित मनपाचे वकिल यांना बोलावुन घेऊन लवकरात लवकर बाकी असलेल्या केसेस बाबत स्थगिती आदेश व्हॅकेट करण्या संदर्भात कार्यवाही करण्याचे सांगण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** महापालिकंमध्ये एका नविन निवृत्त अभियंता याची रु. ५०००/- पगारावर तांत्रिक सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे असे समजते. कशासाठी त्याची नियुक्ती केली नियमाने नियुक्ती करता येते का त्यांना

गाडी देता येते का? जर असे होत असेल तर सर्व सेवानिवृत्तांना नियुक्ती द्यावी व महापालिकेतील अधिकारी यांची सेवा बंद करावी.

**मा. सभापती :** मा. आयुक्त या बाबत खुलासा करतील

**मा. आयुक्त :** सभागृहात उपस्थित करण्यात आलेले मुद्याबाबत माहिती देण्यात येत आहे.

१) कैलास नगर येथील स्मशानभुमी रोकडा हनुमान कॉलनी जवळ कब्रस्तानमध्ये काही लोकांनी अतिक्रमणे केलेले होते त्या बाबत स. स. सौ. वाडेकर यांनी तक्रार केली होती. सदरचे अतिक्रमण काढण्याचे आश्वासन दिलेले होते. त्यानुसार ते अतिक्रमण विभागाने काढलेले आहेत. अजून अतिक्रमाणात कुणाचे बांधकाम येत असेल तर तेही काढण्यात येईल परंतु एक अतिक्रमण काढले व दुसरे काढण्यात आले नाही याबाबत कायदेशीर बाबीनुसार चौकशी करुन निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

२) स. स. श्री. तुळशीबागवाले यांनी भोलेश्वर मार्केटच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. भोलेश्वर मार्केटचे काम हे सुपारी हनुमानच्या बाजुला शिवमंदीर लगत अतिशय अडचणीमध्ये काम करत आहेत. त्यामध्ये एक शिवमंदीर येत असुन तेथील पुजारी यांची समजुत काढून हे काम करावे लागणार असुन ९०% काम झाले आहे. राहिलेल्या ४ दुकानाचे काम येत्या मार्च पर्यंत पुर्ण होईल असा प्रशासनाचा विचार आहे.

३) सादिया मार्केट येथील गाळे न लिलाव करुन देण्यात आलेले आहे. परंतु भूषण अग्रवाल नावाच्या वतीने न्यायालयात या संदर्भात केस दाखल केल्यामुळे न्यायालयाची स्थगिती आदेश आहे. त्यामुळे तेथील दुकाने चालु करण्यास अडचण येत होती. परंतु मागच्या सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन हा प्रश्न सोडवलेला आहे. सादिया मार्केट येथे स्पेशल डी.पी. बसवण्यात आलेली असुन काही लोकांना विद्युत कनेक्शन देण्याचेही काम चालु आहे. साधारणतः गुढी पाडव्याच्या सुमारास तेथील मार्केटचे उद्‌घाटन करणार आहोत.

४) स. स. श्री. एकबालोधीन यांनी नेहरु येथील शॉपींग सेंटरच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. चांगल्या प्रकारे शॉपींग सेंटर व्हावे अशी मागणी बऱ्याच दिवसापासुन होती. त्याप्रमाणे जाहिर लिलावाने कोणी घेण्यास तयार आहे काय म्हणुन जाहिर लिलाव केलेला होता, जाहिर लिलाव केला असता ३०,४०, ३४ हजार अशी बोलणी बोलण्यात आली होती. त्यांनतर जास्त रक्कम येईल अशा प्रकारच्या तक्रारी आल्यांनतर पहिला लिलाव रद्द करुन दुसऱ्यांदा लिलाव केला असता वरील ऐवजी १.२५, १.३० लाख अशी मोठया प्रमाणात लिलाव प्राप्त झालेला आहे. एकुण १० लाखापर्यंत अमानत रक्कम मिळेल. पहिला झालेला लिलाव बोगस होता काय असे सभागृहात मत व्यक्त केले. दुसरा लिलाव केला त्यामंधील जे कुणी असतील त्यांना पुर्ण पैसे भरावयास लावणार आहोत. न भरल्यास पहिल्या लिलावातील पैसे भरलेल्या लोकांना निश्चितपणे विचार करण्यात येईल यात शंका नाही.

५) स. स. श्री. रऊफ यांनी ४ वर्षापासुन न्यायालयाचा स्थगिती आदेशाच्या बाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. यांमध्ये संबंधित विभागामधुन न्यायालयाने मागणी केल्यानुसार कागदपत्राची पुर्तता झालेली नसेल किंवा संबंधित वकील यांच्या कडुन काही केस चालवण्यामध्ये हलगर्जीपणा झालेला असेल त्या बाबत निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल व संबंधित वकीलाल मी स्वतः बोलावून घेऊन लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्यास सांगेन यात शंका नाही.

६) स. स. श्री. जोशी यांचा मुद्दा असा जे अभियंता (श्री. वर्दे) यांची नियुक्ती कशी केली त्या बाबत मी असे सांगु इच्छितो की, शासनाकडुन आलेले १८ कोटी रुपयाचे व त्यामधुन महानगरपालिकेच्या माध्यमातुन शहरातील मोठमोठे प्रकल्प हाती घेतलेले आहे. विकसीत होणारे रस्त्याचे कामे ही घेतलेली असुन जवळ-जवळ एक-एक रस्ता ६०-६० लाखापर्यंत आहेत. त्या रस्त्यांची कामे व्यवस्थित होत नाही म्हणुन काही तक्रारी आलेल्या होत्या त्यासाठी रस्ता व्यवस्थित होतो किंवा कय त्यात योग्य मटेरियल वापरले जाते किंवा काय ? या बाबत बाहेरील एजन्सीकडून सल्ला घेण्यासाठी श्री. वर्दे यंना तांत्रिक सल्लागार म्हणुन नियुक्त केलेले आहे. महानगरपालिकातील अधिकारी अकार्यक्षम आहे हा उद्देश समोर न ठेवता नियुक्ती केलेली आहे. संबंधित त्या - त्या विभागातील अधिकारी यांना योग्य ती मदत, त्यांच्या कडुन चुका होऊ नये. ऑडीट चे काम चांगल्या प्रकारे व्हावे. विकास कामाच्या बाबतीत आपल्या अधिकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन देऊन व्यवस्थितपणे कामे होतील. या अपेक्षेने त्याची मानधनावर ३ महिण्यासाठी नियुक्ती केलेली आहे आणि तसे अधिकारी मा. आयुक्तांना आहेत.

**श्री. संजय जोशी :** शासनाकडुन असे एक वेळेस विकास कामासाठी पैसा घेतो त्यातुन रस्त्याची कामे केली जातात. त्या मार्गदर्शन करणारे अधिकारी यांची आवश्यकता भासली नाही. ज्या-ज्या ठिकाणी अशा रस्त्यांची कामे चालु आहे. तेथे मुख्य लेखा परिक्षक हे सुध्दा पाहणी करुन मार्गदर्शन करु शकतील या अगोदर ४ प्रोजेक्ट चे काम प्रगती पथावर केलेले होते. त्यावेळेस गरज पडली नाही. मा. आयुक्त यांनी असे अधिकार असतील तर त्यांनी प्रत्येक विभागामंध्ये मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ चे देखील अधिकारी घेण्यात यावे.

**श्री. गौतम लांडगे :** महापालिकेमध्ये टेक्नीकल अधिकारी असतांना मानधनावर एका अभियंत्याची, अधिकाऱ्यांना योग्य सल्ला देण्यासाठी मानधनावर नियुक्ती केली हे योग्य वाटत नाही.

**मा. आयुक्त :** सर्व स. नगरसेवक जागरुक आहेत. ही चांगली बाब आहे. काम चांगले व्हावे. अधिकाऱ्यांना वेळीच योग्य सल्ला मिळावा, महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान होऊ नये दृष्टीकोनातुन त्यांची नियुक्ती केलेली आहे.

**श्री. संजय जोशी :** शहरातील रस्त्याच्या डांबरीकरण व इतर कामावर सध्या ३.५० कोटी ते ४ कोटी पर्यंत खर्च होत आहे. आजही काही नागरीकांच्या तक्रारी आहेत रस्ते योग्य होत नाही. म्हणुन यास जबाबदार कोणास धरणार आहे. कामे योग्य न झाल्यास त्यांना जबाबदार धरणार आहे काय?

**श्री. जैन विकास :** मा. आयुक्त यांनी श्री. वर्दे यांची मानधनावर केलेली नियुक्ती योग्य आहे काय ? अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करुनही काही रस्त्याच्या संदर्भात बोगस कामे होतात वगैरे तक्रारी आल्यास संबंधित सल्लागार श्री. वर्दे यांना जबाबदार धरता येईल काय ? महापालिका प्रशासन त्यांचे काय करु शकते. सी.आर. तर खराब करू शकत नाही. त्यासाठी प्रतीनियुक्तीने शासनाच्या अधिकाऱ्यांची मागणी करावी किंवा म.न.पा. कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यामधुन नियूक्ती करण्यात यावी. त्यांचे वर जबाबदारी निश्चीत करता येईल.

**मा. आयुक्त :** रस्त्याच्या कामाच्या संदर्भात योग्य सिमेंट वापर खडी योग्य प्रमाणात वापर, डांबरीकरण व्यवस्थित होते किंवा कसे याबाबतची सर्व माहिती ते

आयुक्तांना देतील काम करुन घेण्याची सर्व जबाबदारी ही महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे राहणार आहे. यात श्री. वर्दे हे ३ महिण्यासाठी नेमण्यात आलेले आहे.

**श्री. गौतम लांडगे :** शहरामध्ये अनेक ठिकाणी डांबरीकरणाची कामे चालु असुन २ वर्षापुर्वीच डांबरीकरणाची कामे केलेले रस्त्यावर डांबर, खडी, निघुन गेल्यावर त्या रस्त्यावर खोल खड्डे पडलेले आहे. तसेच म्हाडा कॉलनी, उस्मानपुरा येथील रस्त्याचे काम व्यवस्थित झालेले नाही. ज्यावेळेस कामे चालु असतात त्यावेळी संबंधित अधिकारी त्या ठिकाणी उपस्थित असतांना कामे व्यवस्थित होत नाही. जर अधिकारी स्वत: त्या ठिकाणी असतांना असे होते. रस्त्याचे काम व्यवस्थित झालेली नाही म्हणुन नागरिकांनी स्वत:हुन कामे बंद केलेली आहे.

**मा. सभापती :** रस्त्याचे कामे चांगल्या प्रतीचे होत नाही म्हणुन आयुक्तांकडे तक्रारी आलेल्या होत्या त्यानुसार त्यांच्या अधिकाराखाली त्यांनी श्री. वर्दे यांनी तात्रिंक सल्लागार म्हणुन नियुक्ती केलेली आहे. जर सल्ला देऊन संबंधित कुणाही अधिकारी यांनी डोळेझाक केली किंवा कामे व्यवस्थित झाली नाही तर मा. आयुक्त संबंधितांवर कार्यवाही करतील.

**मा. आयुक्त :** स. सदस्य श्री. रऊफ यांनी त्यांच्या वार्डातील काम व्यवस्थित होत नाही म्हणुन तक्रार केलेली होती, तसेच क्रांतीचौक ते रेल्वे स्टेशन, महावीर चौक ते रेल्वे स्टेशन येथील रस्त्याची कामे व्यवस्थित होत नाही. त्याबाबतही डॉ. कराड यांनी तक्रार केली होती. अधिकाऱ्यांची चुक होत असेल तर, वेळेवरच थांबवावे. मार्च अखेर कामाची गर्दी होते. त्यावेळी त्यांचा सल्ला उपयोगी पडेल.

**श्री. लांडगे गौतम :** डांबरीकरणाच्या बाबतीत जी सर्वच्या सर्व निविदा कमी दराच्या आहेत. सध्याही डांबरीकरणाची कामे व्यवस्थित होत नाही. याबाबत कुणाला जबाबदार धरणार आहे. वृत्तपत्रात बातम्या छापुन येतात.

**अति. शहर अभियंता :** कॉलीटीमध्ये ३/४" चे सिल कोट करता असतो. सध्या कामे व्यवस्थितपणे चालु आहे.

**श्री. गौतम लांडगे :** अंदाजपत्रक तयार करुन शहरातील ज्या-ज्या रस्त्यावर खाच खळगे पडलेले आहेत त्या ठिकाणी बुजवण्यात यावे. श्री. हळनोर यांच्या वार्डामध्ये डांबरीकरण झालेले आहेत. अंदाजपत्रक तयार करतांना डांबर मिश्रित खडी व सिलकोट दोघाचा समावेश करण्यात यावा.

**मा. सभापती :** एकदा रस्ता केल्यानंतर किती वर्षाने त्याचे काम करावे लागते अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** एखाद्या रस्त्याचे डांबरीकरण व इतर कामे व्यवस्थित केल्यानंतर कमीत कत ३ वर्षानंतर त्या रस्त्याचे पुन्हा काम करणे आवश्यक आहे. परंतु काही वेळेस असे होते ी, जास्त वाहतुकीच्या रस्त्यावर खचखळगे पडल्यानंतर तुर्त खडी वगैरे टाकुन दुरुस्ती करावी लागते.

**मा. सभापती :** म्हाडा कॉलनी येथील काम बोगस झाल्याची तक्रार सभागृहाने व्यक्त केलेली आहे. संबंधित ठेकेदाराची चौकशी करण्यात यावी. मानद तांत्रिक सल्लागार श्री. वर्दे यांचा सल्ला घेण्यात येईल.

श्री. वर्दे यांची नियुक्ती ही ३ महिण्यासाठीच केलेली आहे.

**श्री. म. अ. रऊफ :** ज्या प्रभागात विकास कामे चालु असतात त्याचवेळी संबंधित स. सदस्यांना त्याबाबतची माहिती दयावयास पाहिजे. तशी सदस्यांनी लक्ष ठेवावे. पावसाळा जवळ येतो. नंतर कामे होण्यास सुरुवात होते. त्यामुळे रस्ते ताबडतोब खराब होतात.

**श्री. नरसिंग ढगे :** श्री. वर्दे यांची नेमणुक केली परंतु अधिकाऱ्यांकडे काही कामासाठी भेटण्यास गेल्यानंतर असे सांगण्यात येते की, साहेब वर्दे साहेबांच्या बैठकीला गेलेले आहे. बैठकावर बैठका चालु राहिल्या तर कार्यालयीन कामे बंद पडतील व विकास कामे थांबतील अशी वेळ येऊ नये.

**मा. सभापती :** तीन महिण्यासाठी त्यांची नियुक्ती केलेली श्री. वर्दे यांच्य समवेत नेहमीच बैठका घेण्यात येणार नाही.

**श्री. म. अ. रऊफ :** शहागंज भाजी मंडई जवळ डांबरीकरणाच्या बाबतीत एक पत्र आलेले आहे. विरोधपक्ष नेता यांनी पत्र दिलेले आहे.

**श्री. विखारोद्दीन :** वृत्तपत्रात बातमी छापुन आलेली आहे. रेल्वे उड्डाण पुलाजवळ टोलटॅक्स हे सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन वसुल होणार आहे. मा. ना. गडकरी यांनी टोलटॅक्स आकारणी करण्याबद्दल आदेश दिलेले असल्याचे समजते. या बाबतची माहिती महानगरपालिकेला मिळाली आहे काय ? टोलटॅक्स मुळे शहरावर याचा परिणाम होईल.

**मा. सभापती :** या संदर्भात अदयाप पर्यंत संबंधित खात्याकडुन पत्र व्यवहार झालेला नाही तोपर्यंत काही निर्णय घेता येणार नाही.

**श्री. विखारोद्दीन :** बिफ, मटन शॉप धारकांना लायसेन्स देण्यात यावे. ज्यांचे ज्यांचे रिपोर्ट (माहिती) आलेले आहे त्यांना लवकरात लवकर परवानगी देण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती दयावी.

**वैद्यकीय अधिकारी :** ज्यांनी कागदपत्राची पुर्तता केली असुन या बाबत वृत्तपत्रात जाहीरात देऊन कार्यवाही करण्यात येणार आहे.

**मा.सभापती :** लवकरात लवकर नियमाने लायसेन्स देण्याची कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर समोरील जागा जेथे सध्या नर्सरी आहेत. सदर जागेच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट झालेले असुन जमिन भुसंपादन करण्याचा ठराव आपण घेतलेला आहे. संबंधित जमिन मालकाला बोलावुन घेऊन निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी त्या संबंधितास येत्या मंगळवारी बोलावुन घ्यावे. मा. आयुक्त त्यांच्याशी चर्चा करतील. पुढच्या बैठकीत तसा ठराव ठेवण्यात यावा.

**श्री. गौतम लांडगे :** २ ते ३ महिने झालेले आहे. ३ दिवसांची अल्प मुदतीची निविदा काढुन ढापे टाकण्याच्या कामाबाबतची कार्यवाही कण्यात येईल. असे सभागृहात सांगितलेले होते.

**श्री. संजय जोशी :** अल्प मुदतीची निविदा ही कशासाठी असते तीन दिवसाची अल्पमुदतीची निविदा काढुन कामे करण्याचे आदेश दिले जाते. प्रत्यक्षात तशी कार्यवाही होत नाही. ३-३ महिने कामे तशीच पडुन राहतात. हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**कार्यकारी अभियंता :** या बाबत स्टेट लेवलच्या वृत्तपत्रात निविदा मागविलेल्या होत्या. नियमाप्रमाणे कार्यवाही करता आली नाही.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत या बाबतचा प्रस्ताव मंजुरी घेण्यात यावी.

**श्री. लांडगे गौतम :** अल्पमुदतीची निविदा काढुन त्यानुसार वाटाघाटी करण्यास खुप वेळ जातो. माझ्या वार्डातील २ महिण्यापासुन बालवाडीची निविदा वाटाघाटीसाठी राहिलेली आहे. त्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** येत्या सोमवारी बालवाडी टेंडरच्या बाबतीत वाटाघाटीसाठीची तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** सिध्दार्थ उद्यानातील दोन पांढरे वाघ तसेच एक शेरु नावाच्या वाघाचा मृत्यु झालेला होता. त्याबाबत सभागृहात चर्चा होऊन पोस्ट मॉर्टमचा रिपोर्ट आल्यानंतर माहिती देण्यात येईल. असे सांगितले होते. अदयापपर्यंत रिपोर्ट मिळालेला नाही. माहिती दयावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**पशुधन विकास अधिकारी :** या बाबत रिपोर्ट आलेला आहे. पुर्ण सहा. संचालक पुशसंवर्धन यांनी रक्तामध्ये पेशी तयार झाल्यामुळे मनुष्याला जसा मलेरिया होतो. त्याचप्रमाणे हा रोग आलेला होता. त्यामुळे त्यांचा मृत्यु झाला.

**श्री. म. अ. रऊफ :** डॉ. गिते यांनी खुलासा करावा. वाघाला या प्रकारचा रोग होता तर वेळीच दक्षता का घेण्यात आलेली नव्हती.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त :** सिध्दार्थ उद्यानातील शेरु, बहादुर व दोन पांढऱ्या वाघांच्या मृत संदर्भात सभागृहात मागील बैठकीत वादळी चर्चा झालेली होती. लागोपाठ दोन मृतमुळे चिंता निमार्ण झाली होती. परंतु वाघाचा मृत्यु कशामुळे झालेला आहे. यासाठी पशुसंवर्धन विभागाचे सहा. संचालक यांना या बाबतीत योग्य चौकशी करण्याची विनंती केलेली होती. त्यानुसार त्यांनी चौकशी करुन या वाघाच्या मृत्यु हा रक्तांमध्ये विशिष्ट प्रकारच्या पेशी निर्माण झाल्यामुळे जनावरांचा जो टीटमेन झीनिया रोग आहे त्यामुळे मृत्यु झालेला आहे. असा अहवाल आलेला आहे. हा अहवाल दिलेला असतांना त्यात एकुण १५ सुचना नमुद केल्या असुन त्या सुचनाची अंमलबजावणी ही सिध्दार्थ उद्यानाच्या प्राण्यांच्या योग्य ती काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातुन महत्तवाची वाटते. या बाबत एक विधानसभा तारांकितप्रश्न ही पण झालेला असुन त्या बाबतीत उत्तर देण्यात आलेले आहे. या बाबतचा संपुर्ण अहवाल पुढच्या स्थायी समितीच्या बैठकीत माहितीस्तव सादर करण्यात येईल.

**श्री. गौतम लांडगे :** दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी सुवर्ण जयंती कर्ज वितरण योजना, होण्याच्या संदर्भात प्रत्येक वार्डामध्ये सर्व्हे झालेला आहे. ८ ते ९ हजार अर्ज आले आहे. काही वार्डातील त्या संबंधि आक्षेप आलेले होते. ही योजना बी.पी.एल. साठी आहे. ज्यांचे नांव नाही. त्यांचे कडुन अर्ज घेतले आहे. नांव येण्यासाठी त्या लोकांनी मोर्चे, निर्दशने काढून प्रशासनावर दबाव आणुन नांवे समाविष्ट करावी. अशा प्रकारची त्यांची भुमिका होती शासनाची योजा आहे. जे लोकांचे उत्पन्न कमी आहेत व ते दारिद्रय रेषेखाली येतात अशाच लोकांसाठी ही योजना ही सरकारने राबविण्यासाठी सम्मती आहे. त्यांचीच नांव संबंधित बँकेकडे पाठवावी. इतरांसाठी जे नियमात बसत नाही. त्यांच्या यादी मध्ये नावाचा समावेश असेल तर ती नांवे काढुन टाकावी. अशी किती लोकांची चुकून नांवे टाकण्यात आलेली आहे. माहिती द्यावी.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** ही योजना कुणासाठी आहे माहिती दयावी.

**प्रकल्प संचालक :** दारिद्रय रेषेखालील येणाऱ्या लोकांचा सर्व्हे ऑगस्ट महिन्यापासुन चालु असुन झालेला आहे. हा सर्व्हे झोन वाईज करण्यात आलेला आहे.

**श्री. संजय जोशी :** जे दारिद्रय रेषेखाली येतात त्यांचीच नांवे कर्ज प्रकरणासाठी बँकेकडे पाठवावी.

**मा. सभापती :** जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेल्या यादीनुसार घेता येईल काय ? संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा की, ही योजना कुणासाठी आहे.

**प्रकल्प संचालक :** शहरातील वार्डवाईज सर्व्हे करुन नावाची यादी तयार करण्यात आलेली होती. मा. आयुक्त, मा. उपआयुक्त यांच्याकडे काही लोकांनी नावे समावेश करण्यात आलेली आहे. म्हणुन मार्चा काढुन नावे समाविष्ट करावी अशी त्यांची मागणी होती. ९५०० अक्षेप अर्ज आले. कार्यालयाचे कर्मचारी सर्वे करण्यास गेले असता जे दारिद्रय रेषेखाली येतात. त्यातील काही लोक घरी उपस्थित नसल्यामुळे काहींची नांवे सुटलेली आहे. यांत जे दारिद्रय रेषेखाली येत नाहीत. त्यांनी अक्षेप अर्ज नोंद करुन असे एकुण ९५०० अर्ज प्राप्त झालेले असुन त्याची छाननी केली असता ६०% अक्षेप अर्ज दारिद्रय रेषेखालील लोकांचे आहे असे निष्पन्न झालेले आहे. ज्यांचे अर्ज दाखल झ ालेले आहे. ते बँकाना पाठवा नसता कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निमार्ण होईल. अशी त्यांची मागणी आहे.

**श्री. स. अ. एकबालोद्दीन :** मा. आयुक्तांवर ज्यांनी दबाव आणला त्यावर कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे, श्रीं संजय जोशी :** ज्यांची यादीत नांवे आहेत व ते दारिद्रय रेषेखालील येतात अशांचीच नांवे बँकेकडे कर्ज वितरण करण्याच्या बाबतीत पाठवण्यात यावी. शासनाची योजना आहे.

**श्री. स. अ. एकबालोधीन :** मा. आयुक्ताकडे कोण लोक आलेले होते. माहिती दयावी.

**मा. सभापती :** दबाव आणत असतील तर पोलीस केस करावी.

**प्रकल्प संचालक :** जे लोक गुंड प्रवृत्तीचे होते आमचे ही नावे यादीत समावेश करावी नसता जिवंत मारण्याची धमकी कर्मचाऱ्यांना दिलेली होती आर. पी. आय. चे कार्यकर्ते होते.

**श्री. म. अ. रऊफ :** ज्यांनी कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना मारण्याची धमकी दिलेली आहे. त्यांच्यावर प्रशासनाच्या माध्यामातुन पोलीस गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता.

**श्री. संजय जोशी :** एखादया पक्षाचे लोक, कार्यकर्ते येऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांना धमकी देऊन जिवे मारण्याची भाषा बोलत असेल तर नियमबाह्य व दारिद्रय रेषेखाली नसलेल्याची नावे यादीत कुणाच्या दबावाखाली येऊनव समाविष्ट करणार काय? याचा अर्थ अधिकारी हे कुठेतरी कमी पडतात. प्रशासनाने ताबडतोब र्कावाही करावी.

**मा. सभापती :** नियमबाह्य यादीत नावे समाविष्ट करण्यासाठी कुणी प्रशासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्याव दबाव आणत असतील तर त्यांच्यावर प्रशासनाने पोलीस केस दाखल करावी.

**प्रकल्प संचालक :** एकुण ८२ वार्डापैकी ३५ वार्डातील कसल्याही तक्रारी येणार नाही. याची मला खात्री आहे. काही नावाची यादी बँकेकडे पाठवली तर अडचण येणार बाकीच्यामध्ये ४० टक्के अशी प्रकरण् आहेत की सर्व्हेच्या वेळा न

सापडल्यामुळे यादीत नावे समाविष्ट करण्याचे राहुन गेलेली आहे. बँकेत पाठवावे असे त्यांचे म्हणणे आहे.

**मा. सभापती :** कोणकोणत्या वार्डातील अर्ज प्राप्त झालेले आहे. माहिती दयावी.

**प्रकल्प संचालक :** एकुण ९ हजार ११५ अर्ज प्राप्त झालेले आहे. त्यापैकी ९५० अर्ज अपात्र ठरविण्यात आले. एकुण ८,१६४ अर्ज पात्र आहे. ९५०० अर्ज आहेत. हे अक्षेप अर्ज आहे. आमचे नावे टाकावी. तपासणी चालु आहे.

**मा. सभापती :** सभागृहाने असे मत व्यक्त केले की, जे लोक दारिद्रय रेषेखाली येतात व ज्यांचे उत्पन्न कमी प्रमाणात आहे. अशाच लोकांना या योजनेचा लाभ व्हावा. ज्यांनी बँकेकडुन कर्ज घेतले असतील त्यांनी पुन्हा कर्ज घ्यावे. असे होता. कामा नये. एकुण सर्व्हे मध्ये ९००० पर्यंत नावे आलेल आहे. नऊ हजार आक्षेप अर्ज असे एकुण १८ हजार लोकांची नांवे आहेत. याची पडताळणी कधी करणार माहिती दयावी.

**प्रकल्प संचालक :** बँकेने येत्या १० तारखेपर्यंत प्रकरणे पाठवावी तर निकाली लागेल असे कळविलेले आहे. त्यासाठी ३५ वार्डाचे तयार आहेत. ती प्रकरणे पाठवणे आवश्यक आहे.

**श्री. गौतम लांडगे :** जे पात्र आहे. त्यांची प्रकरणे बँकेकडे पाठविण्यात यावी. किती वार्डात पुर्ण पडताळणी झालेली प्रकरणे आहे.

**प्रकल्प संचालक :** वार्ड क्र. ३,४,८, १५, १७, १८, १९, २२, २९, ३०, ३१, ३२, ४०, ४३, ४४, ४५, ४६, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ६२, ६४, ६५, ६७, ६९, ७०, ७४, ७७ अशी एकुण ३५ वार्डातील १००% पाठविण्यात आले आहे.

**श्री. म. अ. रऊफ :** माझ्या वार्डातील नाव यांत समावेश करण्यात आलेले नाही.

**श्री. विखोरोद्दीन :** कशाच्या आधारे या वार्डातील प्रकरणे निकाली काढलेली आहे.

**मा. सभापती :** जे नागरीक खरोखरच दारिद्रय रेषेखाली येतात. त्यांना या योजनेचा लाभ झ ाला पाहिजे. कुणाच्या दबावाला बळी न पडता नावाची यदी बँकेकडे पाठवण्याची कार्यवाही करावी. ज्या ९०००/- तक्रारी आलेल्या आहेत त्यातील काही प्रकरणी निकाली काढलेली आहे काय ? नसता २० दिवसांत निकाली काढावे, ज्याची तपासणी केली ते सोमवारी पाठवावेत.

**प्रकल्प संचालक :** २६०००/- हजार दारीद्रय रेषेखालील लोक आहेत. त्यापैकी ९११५ अर्ज प्राप्त ९५००/- अर्जाची पडताळणी केली. बी.पी.एल. सर्वेच्या यादीत नांव नाही सर्वच्या सर्व पाठवावे.

**श्री. गौतम लांडगे :** ९११५/- अर्ज प्राप्त झालेले आहे. त्यापैकी जे खरोखरच रेषेखाली येत आहेत त्यांची नावे पाठविण्यात यावी.

**प्रकल्प संचालक :** ज्यांची नांवे यादीत आहे व ज्यांनी आक्षेप केलेले आहे. ज्या सर्वांची नांवे पाठवल्यास बँक कर्ज दयावयाचे की नाही. ठरवतील जे-जे दारिद्रय रेषेखाली येणार नाही. त्यांना कर्ज देऊ शकत नाही. वेळ कमी असल्याने हे सर्वांची नावे पाठवणे जरुरीचे आहे. आक्षेप अर्ज ९ हजार अर्ज प्राप्त झालेले आहे. त्याची छाननी करण्यास वेळ लागेल.

**श्री. गौतम लांडगे :** संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना ज्यांनी मारण्याची धमकी दिलेली आहे. त्यांच्यावर प्रशासनाच्या माध्यमातुन कार्यवाही व्हावी. जे दारिद्रय रेषेखाली येतात. त्यांनाच या योजनेचा लाभ झाला पाहिजे. असे मत सभागृहाने व्यक्त केले आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांसाठीच योजना ओह.

भावनेचा प्रश्न नाही. जे वार्ड सर्व्हे करावाचे राहिलेले आहे. त्याबाबतीत नंतर सर्व्हे न करता याच बरोबर ९५०० जे आक्षेप आलेले आहेत तपासणी करुन सर्वांची एकत्र यादी पाठवावी.

**मा. सभापती :** जे बी.पी.एल. मध्ये आहेत तपासणी करुन जे पात्र ठरले आहे. त्यांचे नावे तात्काळ पाठवण्यात यावे नंतर जो सर्व्हे करावयाचा राहिलेला आहे व जे आक्षेप अर्ज आलेले आहेत. त्याचे तपासणी करुन नंतर यादी पाठविण्यात यावी एकुण ५५ लाख रुपये अगोदरच महानगरपालिकेचे बॅंकेकडे दिलेले आहे.

**श्री. संजय जोशी :** बसस्थानकाजवळ झेब्राक्रॉसींग केलेली असुन रस्ता दुभाजक व त्यावर ४ फुट वरुन उडी मारुन जावे लागते. ज्युबली पार्क जवळ वाहतुक बेटाची उंची जास्त आहे त्यावर जाळी बसवलेली आहे. रस्त्याच्या वळणावर पुढून येणारे वाहन दिसत नाही. त्यामुळे अपघात होतील हे काम कोणांकडुन झाले आहे.

**अति. शहर अभियंता :** महापालिकेने झेब्राक्रॉसिंग केलेले आहे. तेथील क्रॉसिंगजवळ २ ते ३ फुट लोखंडी जाळी कमी करावी लागणार आहे. त्यामुळेही अपघात टळेल. झेब्राक्रॉसींग ही वाहतुक पोलीस निरीक्षक श्री. मुंढे यांच्या सांगयाण्यावरुन टाकण्यात आलेली आहे.

**श्री. संजय जोशी, श्री. गौतम लांडगे :** या ठिकाणी महापालिकेचा पैसा खर्च होतो. कुणाच्या सांगण्यावरुन अधिकारी यांनी कामे करु नये. झेब्राक्रॉसींग अगोदर टाकावयाची नंतर सभागृहात जाळी तोडावयाची आहे अशी उत्तरे देणे बरोबर नाही. अपघात होणार नाही, याची दक्षता अधिकारी यांनी घ्यावयास पाहिजे.

**श्री. संजय जोशी :** जालना रोडवर ही तीच परिस्थिती आहे. एखादया वृध्द माणसाला रस्त्यावरुन जाणे-येणे कठीण झालेले आहे. रस्ते खाली आणि त्यावर टाकलेले दुभाजक वर झालेले आहे. यात एका माणसाला जाता येईल एवढे कट ठेवावा. अपघात होणार नाही याची दक्षता अधिकारी यांनी घ्यावी.

**श्री. नरसिंग ढगे :** घाटी दवाखान्याकडुन येणाऱ्या रस्त्यावर ज्युबली पार्क येथे सिग्नल जवळ आयुक्त कार्यालयाक डे जातांना आयुक्त कार्यालयाकडुन येणारे वाहन मोठी जाळी लावल्याने दिसत नाही ती कमी करण्यात यावी. अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**श्री. संजय जोशी** : बाबुराव काळे चौक (एम.पी.लॉ कॉलेज) जवळही तीच परिस्थिती आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी नागरिकांच्या सुचना लक्षात घेऊन तसेच सभागृहाची भावना लक्षात घेता रस्त्यावर अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी. रस्ता दुभाजकांवरील ग्रील तोडल्यानंतर झेब्रा क्रॉसिंग करावी. ज्या ठिकाणी जाळी मोठया झालेल्या असतील त्या कमी करण्यात याव्यात.

**श्री. इंगळे रविंद्र :** गुलमंडी येथील ४-५ महिण्यापुर्वी एक वृध्द महिला इमारत कोसळुन मृत झालेली होती. त्यांना महापालिकाकडुन ५०००/- हजार रुपयाची आर्थिक मदत मनपा फंडातुन देण्याचे जाहिरे केलेले होते. संबंधित मयत वृध्द महिलांचे दोन नातेवाईक रोज नियमित महापालिकेत येते. परंतु अदयापर्यंत काहिहि कार्यवाही केलेली नाही.

**श्री. गौतम लांडगे :** आतपर्यंत आर्थिक मदत का देण्यात आलेली नाही खुलासा करावा.

**मा. सभापती :** सभागृहात त्यास मंजुरी मिळालेली असुन ५०००/- रुपये तात्काळ देण्याची कार्यवाही येतया सोमवार पर्यंत उपआयुक्त (म.) यांनी करावी. आतापर्यंत आर्थिक मदत दयावयास पाहिजे होती.

**श्री. म. अ. रऊफ :** काल शहरात पाणी पुरवठा सुरळीत झालेला नाही. खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** दि. ५.३.९९ रोजी शुक्रवार असल्यामुळे ढोरकीन जवळ दुपारी ३ ते ८.३० पर्यंत विद्युत पुरवठा बंद होता त्यामुळे ६ तास पाणी पुरवठा सुरळीत होऊ शकला नाही. शहरांमध्ये दुपारच्या नंतर पाणी पुरवठा होऊ शकला नाही. आज सकाळी १ १/२ तास विद्युत पुरवठा फारोळा येथे बंद होता. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत पाणी पुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न करतो.

**श्री. विकास जैन :** पाणी पुरवठा होणाऱ्या पंपीगला एम.एस.ई.बी. ने स्पेशल विद्युत पुरवठा करुन दिलेला आहे किंवा कसे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** प्रकल्प आमलांत आला त्यावेळी संपुर्ण विद्युत पुरवठा एम.एस.ई.बी. वर अवलंबुन आहे. स्वतंत्र्य विद्युत पुरवठा पाहिजे असा प्रस्ताव दिलेला होता. ७ पंप एकाच व्होल्टेजवर नसेल तर ९ व्होल्टेजवरील विद्युत पुरवठा एम.एस.ई.बी. ने बंद होता. ढोरकीन जवळ दोन स्वतंत्र्य विद्युत वाहिन्या आहेत. त्यातुन औद्योगिक वसाहतीसाठी विद्युत पुरवठा होता. त्यातुनच वाद निर्माण झाल्यामुळे संपुर्ण विद्युत पुरवठा बंद करण्यात आलेला होता. या बाबत संबंधित अभियंता यांनी विनंती करुनही त्यांनी मान्य केले नाही.

**श्री. विकास जैन :** स्पेशल विद्युत पुरवठा आपल्याला दिलेला आहे. त्यातुन दोन-तीन ग्राहकांना मध्येच लाईन दिलेली आहे.

**मा. सभापती :** संबंधितांना चर्चेसाठी मा. आयुक्तांकडे बोलवावे चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा. विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**श्री. रविंद्र इंगळे :** सिडको मध्ये काही भागात २-२ नळ कनेक्शन आहे. काही नळ कनेक्शन पाणी पुरवठा व्यवस्थित व सुरळीतपणे येत नाही म्हणुन काढुन टाकलेले आहे. संबंधित नळ धारकांना दोन-दोन नळाचे बिल अदा केले जाते. त्यामुळे नळधारक कोणतेच बिल भरत नाही. अशा एकुण ४५० केसेस आहेत. वर्षापुर्वी मा. आयुक्त यांनी या संदर्भात बैठका घेतली होती. काहीही कार्यवाही करण्यात आली नाही. संबंधित नागरीकांचे म्हणणे असे की, बिल एक नळाचे माफ करावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** एन-११, एन-१२ येथील एकुण ५ ते ६ लाखाचे थकीत बील आहेत. मा. उपआयुक्त (म.) यांची तपासणी मोहिम चालु आहे. ही बिले ८५-९० या दरम्यानची असुन त्यावेळी मी या विभागात नव्हतो. त्यावेळच्या अधिकाऱ्यांना बोलावून निर्णय घेता येईल. ८५-९० या कालावधीमधील बिलाचा वाद आहे. परंतु ९० नंतर चे ही बिले काही नागरीक भरत नाही.

**मा. सभापती :** सन ९० च्या नंतर ज्यांच्याकडे पाणी पट्टी थकित आहेत. त्यांच्याकडुन वसुल करण्या बाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसे स. सदस्य यांनी त्या-त्या प्रभागातील नागरिकांना समजावुन सांगुन सहकार्य करावे.

**विषय क्र. ५४७/१ :**

दिनांक ९.२.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** इतिवृत्तातील विषय क्र. ५२८/११ दिनांक ९.२.९९ च्या स्थायी समितीमध्ये मंजुर करण्यात आला. त्या अगोदरच शहागंज भाजी मंडई येथील पुर्ण डांबरीकरणाचे काम करण्यात आलेले आहे. असे समजते या बाबत खुलासा करावा.

**मा. सभापती :** अति. शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** कामाचाी निविदा काढण्यात आलेली होती. त्यास मंजुरीही मिळाली होती. स्थायी समितीने स्विकृती देखील दिलेली आहे. पुर्नडांबरीकरणाच्या काम मंजुरी घेण्याच्या अगोदर करण्यात आलेले नाही.

**श्री. गौतम लांडगे :** विरोधी पक्षनेता यांना या संदर्भात माहिती संबंधित अधिकारी यांनी दयावी. तसेच इतिवृत्तातील पान क्र. २६ वर ठराव क्र. ५३९/१०, ५४०/११, ५४१/१२ या संदर्भात प्रशासनाचे मत घ्यावे.

**मा. सभापती :** पान क्र. २६ वर ठराव क्र. ५३९/१०, ५४०/११, ५४१/१२ या संदर्भात प्रशासन माहिती देतील तोपर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**श्री. म. अ. रऊफ, श्री. स. अ. एकबालोधीन :** या अगोदर अशाच प्रकारचे अपीलावर चर्चा करुन स्थायी समितीने मंजुर दिलेली आहे. त्यांना कामावरही घेण्यात आलेले आहे. ठराव स्थगित ठेवणे म्हणजे जातीयवादातुन आपण मुद्दामहुन स्थगित ठेवलेले आहे. असा त्याचा अर्थ होतो. मंजुरी देण्यात यावी.

**मा. सभापती :** विधी सल्लागार यांचे मत घेण्यात येईल. त्यानंतर पुढच्याबैठकीत यावर निर्णय घेण्यात येईल. तो पर्यंत वरील ३ ठराव स्थगित ठेवण्यात येतात.

**श्री. गौतम लांडगे :** प्रशासनाने यावर आताच खुलासा करावा, तसेच विधी सल्लागार यांचे मत घ्यावे. व प्रस्ताव मंजुर करण्यात यावे.

**श्री. स.अ. एकबालोधीन :** मागील बैठकीत सदरील प्रस्ताव मंजुरीसाठी आलेले होते तेव्हां याबाबत प्रशासनाला माहिती नव्हती काय ? प्रशासनाने आताच यावर खुलासा दयावा.

**श्री. म. अ. रऊफ , श्री. विखारोधीन :** बैठक होऊन जवळ-जवळ एक महिना झालेला आहे. या कालावधीमध्ये प्रशासनाने व विधी सल्लागार यांनी चौकशी करुन सभागृहात मत का मांडु शकत नाही. सदरचे प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. स्विकृतीसाठी सभागृहात आल्यानंतर वेळीच स्थगित ठेवणे योग्य नाही. यास आमचा विरोध आहे. यांत दोन मुसलमान कर्मचारी आहे. म्हणुन प्रस्ताव स्थगित ठेवु लागले आहे असा आमचा आरोप आहे.

**मा. सभापती :** विधी सल्लागार तसेच प्रशासनाचे मत घेऊन या बाबत पुढील बैठकीत योग्य निर्णय घेण्यात येईल तो पर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**श्री. विकास जैन :** मागील बैठकीत पान क्र. १० वर वाचनालयासाठी करावयाच्या उर्वरीत कामाचे इस्टिमेंट तयार करण्याचे आदेश उपअभियंता यांना दिलेले होते. किती काम बाकी आहे. अदयापर्यंत कार्यवाही केलेली नाही. खुलासा करावा.

**उपअभियंता :** आतापर्यंत वाचनालयासाठी ४ लाख खर्च झालेला आहे. वॉचमन हॉल वाचनालयासाठी गेट तसेच रोलींग शटर्स, काचेचे दरवाजे करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

**मा. सभापती :** पुढच्या बैठकीत या कामाबाबतचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी आणावे. सभागृहाने मंजुरी दिल्यास तात्काळ काम करण्यात यावे.

**श्री. राजकुमार बचाटे :** पान क्र. १० वर विष्णुनगर येथे पाण्याच्या पाईपलाईनसाठी १ लाख २७ हजार चे अंदाजपत्रक ठेवण्यात आलेले होते. या संदर्भात चर्चा झालेली होती तसे आदेश संबंधित अधिकारी यांना देण्यात आलेले होते. परंतु अदयापर्यंत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**मा. सभापती :** विष्णुनगर येथे पाण्याच्या पाईपलाईनसाठी १ लाख २७ हजारचे अंदाजपत्रक ठेवण्यात आलेले होते. त्या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी ३ दिवसाचे अल्पमुदतीची निविदा काढुन काम लवकरात लवकर होईल तशी कार्यवाही करावी.

**श्री. विखारेधीन :** माझ्या वार्डातील दवाखान्याचे उद्घाटन झाले परंतु दवाखान्यामंध्ये अदयाप पंखे बसविलेले नाही. तसेच एक्स-रे मशीन सुध्दा उपलब्ध नाहीत. याबाबतीत कधी कार्यवाही करणार.

**मा. सभापती :** उपअभियंता (वि.) यांनी येत्या ३ दिवसांत सदर दवाखान्यात पंखे व इतर विद्युत व्यवस्थेबाबतच्या ज्या समस्या असतील त्या सोडवाव्यात.

**मा. सभापती :** एक्सरे बाबत वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** एक्सरे मशीन लवकरच मिळणार नाही. उशीर लागेल. ज्यांना आदेश दिले त्यांना पत्र देऊन देखिल यायला तयार नाहीत.

**मा. आयुक्त :** सिमेंन्स कंपनीला एक्सरे मशीन आणण्याचे काम दिलेले आहे. मशीन आलेले असुन त्या बाबतचा जकात थकबाकी असल्याने उशीर लागेल. याबाबत लवकरच निर्णय होऊन कार्यवाही करण्यात येईल.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** जे येणारे मशीन आहे ते कटकटगेट येथील दवाखान्यासाठी लागणार असुन स. स. श्री. विखारोधीन यांच्या वार्डातील दवाखान्यसाठी लागणारे एक्सरे मशीन येण्यास वेळ लागेल.

**मा. सभापती :** कटकटगेटसाठी ज्या सिमेंन्स कंपनीमार्फत मशीन मागविण्यात येत आहे. त्याप्रमाणे रेल्वेस्टेशन येथील दवाखान्यासाठी त्याच कंपनी कडुन एक्सरे मशीन मागविण्यात कार्यवाही वैद्यकीय अधिकारी यांनी करावी.

**मुख्य लेखा अधिकारी :** अर्थ संकल्प या विषयावर चर्चा होऊन निर्णय झाल्यानंतर १६ तारखेच्या नंतर या मशीन मागविण्याबाबतचा निर्णय घेता येईल.

**ठराव :**

स्थायी समिती सभा दिनांक ९.२.९९ चे इतिवृत्तातील

१) ठराव क्रमांक ५३९/१०, ५४०/११ व ५४१/१२ या संदर्भात विधी सल्लागार व प्रशासनाची मत घेऊन पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत स्थगित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील प्रमाणे दर्शविलेल्या दुरुस्तीसह दिनांक ९.२.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४८/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, लेखा परिक्षक सहकारी गृहनिर्माण संस्था, हर्सुल येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ५,६७,२००/- चे तयार करण्यात आले असुन सदचा

खर्च "नविन डांबरीकरण" या लेखा शिर्षाखाली ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लेखा परीक्षक सहकारी गृह निर्माण संस्था, हर्सुल येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,६७,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्वीकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४९/३ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, राणानगर व मोमीननगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ५,५१,५००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च सन १९९८-९९ च्या "नविन डांबरी रस्ते " मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन करण्यांत येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राणानगर व मोमीननगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या डि.एस.आर. दराने तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,५१,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५०/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डन, आमखास (सेंकड फेस) येथे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ४,११,६७१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील खर्च "सिध्दार्थ उद्यान विकास" या शिर्षकातुन खर्च तरतुद करण्यास मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डन, आमखास (सेकंड फेस) येथे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,११,६७१/- च्य अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५१/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, कांचनावाडी स्लम भागात हनुमान मंदीरपासुन देवकाते यांच्या घरापर्यंत २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीनुसार र. रु. १,४६,६३६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी सदर कामासाठीचे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कांचनवाडी स्लम भागात हनुमान मंदिरापासुन देवकाते यांच्य घरापर्यंत २५० मी.मी.उ व्यासाची आर.सी. जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४६,६३६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५२/६ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फारोळा (जुने) पंपगृहातील (५६ एम.एल.डी.) ४७५ अ.श. मोटारची रिवाईडींग करणेच्या कामासाठी म.न.पा. कडुन यापुर्वी मंजुर करण्यात आलेल्या दरानुसार र. रु. २,११,५९०/- एवढया किमंतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा व दुरुस्तीच्या आर्थिक तरतुदी मधुन केला जाईल. करिता अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फारोळा (जुने) पंपगृहातील (५६ एम.एल.डी.) ४७५ अ. श. मोटारची रिवाइंडींग करणेच्या कामसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,११,५९०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५३/७ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा विभागातर्फे टाकण्यात येणाऱ्या जलवाहिन्या देखाभाल व दुरुस्तीच्या कामामंध्ये लागणारे विविध व्यासाचे जेफिजॉइंटस खरेदी करावयाचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९७-९८ च्या मंजुर दरसुचीनुसार र. रु. ४,९६,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागाकरीता जलवाहीनी दुरुस्ती व देखभाल या कामामध्ये लागणारे विविधि व्यासाचे जेफिजॉइंटस खरेदीकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,९६,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५४/८** :

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गौरीशंकर कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र. रु ४,५७,८२०/- चे सा. बां. विभागाचे दरसुची १९९७-९८ प्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील काम नाला ट्रेनिंग या लेखा शिर्षकातुन प्रस्तावित केले आहे.

सदरील कामासा मा. आयुक्तांनी दि. २.२.९९ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. करीता अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गौरीशंकर कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बाधणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रू. ४,५७,८२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५५/९ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी परिसरातील गादीया विहार ते नाल्यापर्यंत रस्त्याच्या बाजुने गटार बांधणेच्य कामासाठी सन १९९७-९८ च्या सा. बां. खात्याच्या दरसुची दराने र. रु. ९,५०,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,५०,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी परिसरातील गादिया विहार ते नाल्यापर्यंत रस्त्याच्या बाजुन गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ९,५०,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५६/१० :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किराडपुरा स्लम येथे फुटपाथ ब्रीज बांधणे बाबतच्या कामाकरिता सा. बां. खात्याच्या सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार र. रु. २,१७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खडी रस्ते" या लेखा शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरील कामाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. किराडपुरा स्लम येथे फुटपाथ ब्रीज बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. २,१७,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५७/११ :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बनेवाडी गांव ते स्मशानभुम रस्त्यालगत दगडी गटार बांधणेकरीता अंदाजपत्रक र. रु. ४,६८,८६०/- सा. बा. विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांनी दि. १६.२.९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर काम गलिच्छ वस्ती सुधार अर्थसंकल्प १९९८-९९ मध्ये ठेवण्यांत आलेल्या तरतुद लेखा शिर्ष "१८ खेडी विकास" यातुन खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी गांव ते स्मशानभुमी रस्त्यालगत दगडी गटार बांधणे करिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,६८,८६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५८/१२ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, १९९८-९९ या वर्षासाठी बालभवन प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला होता. या प्रकल्पाचा फायदा शहरातील शालेय विद्यार्थ्यांना होणार असुन सुट्टयामध्ये शिबीराचेही आयोजन करणे संदर्भनिय बालभवन अद्ययावय होणे गरजेचे आहे. या उपक्रमाद्वारे करमणुक घर, खटपट घर, बालनाटय, संगीत, अभिनय, जादुचे प्रयोग, संस्कार वर्ग, योगासने, पपेट शो, मिनी ऑकेस्ट्रा, संगणक खेळ, सांस्कृतीक उत्सव पुस्तके, वाचन आणि कथन मानसिक तयारीसाठी लागणारी शिबीरे, दुरदर्शन व त्याचा उपयोग, बालचित्रपट, ध्वनीफिती विविध खेळ आदींसाठ साहित्य खरेदी करावयाचे आहे. सदरील प्रकल्पास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली असुन अर्थसंकल्पात रु. ३/- लाख तरतुद करणेत आली आहे. त्या अनुषंगाने सन ९८-९९ वर्षासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर (१) कलर टि.व्ही.,(२) संगणक (पेंटीयम) (वुईथ कलर मॉनीटर ॲन्ड प्रिंटर),(३) व्हिडीओ कॅमेरा, (४) व्ही.सी. आर. , (५) टेपरेकॉर्डर, (६) माईक सेट व ॲम्लीफायर व बॉक्सेस, (७) कॉडिलेस माईक्स-२, (८) ब्लँक कॅसेटस् , (९), ग्लास फ्लॅनेल डिस्पले बोर्डस, (१०) तबला, (११) हार्मोनियमन , (१२) झांज , (१३) ऑकेस्ट्रा किट (ड्रम्स, साईड ड्रम्स, बासरी, ट्रंपेट, बोंगो, कोंगो, हलगी वगैरे) (१४) कुंडया, पॉडस, झुंबर, (१५) ब्रेनगेम साहित्य, (१६) सतरंज्या, (१७) खुर्च्या , (१८) कापडी पडदे इ.

तरी उपरोक्त संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणाऱ्या वरील साहित्याची खरेदी यावर्षी व उर्वरीत पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन करणेबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहररातील सर्व शालेय विद्यार्थ्यांना उपयुक्त असे बालभवन प्रकल्प ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याकरीता प्रस्तावातील अ. क्र. १ ते १८ मध्ये दर्शविलेले साहित्य खरेदी करण्यास तसेच यासाठी लागणाऱ्या र. रु. ३,००,०००/- च्या खर्चास आणि उर्वरीत साहित्य पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकतसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५९/१३ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेमध्ये सन १९८० ते १९८५ या कालावधीत एकुण ७५ सहशिक्षीका /शिक्षक अस्थायी स्वरुपात काम करत होते. त्यांना वेळोवेळी सेवेतुन कमी करुन पुन्हा कामावर घेतले गेले आहे या खंडीत काळास तांत्रिक खंड समजण्यात यावा. हा खंड नियमित करण्यासाठी सदरील शिक्षकांकडुन देय अनुज्ञेनय रजा रुपांतरीत करुन सेवा काळ प्रथम नेमणुकीच्या तारखेपासुन मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेमंध्ये सन १९८० ते १९८५ या कालावधीत एकुण ७५ सहशिक्षीका/सह शिक्षक यांना वेळोवेळी सेवेतुन कमी करुन पुन्हा कामावर घेतले गेले. अशा शिक्षक/शिक्षि यांच्या सेवेतील खंडीत काळास तांत्रिक खंड समजुन त्यांना देय अनुज्ञेंय रजा रुपांतरीत करुन सदरील खंडीत काळ हा प्रथम नेमणुकीच्या तारखेपासुन

सेवाकाळ म्हणुन गृहीत धरणास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६०/१४ :**

विषय क्र. उपआयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महापालिकेच्या अस्थापनेवर एकुण (११८) वाहन चालकांची पदे मंजुर आहेत. त्यापैकी ३०% प्रमाणे एकुण ३५ वाहन चालकांना जेष्ठ वाहन चालक म्हणुन रुपये १४००-२३०० हया निवड श्रेणीत रुपांतरीत करावे लागेल. त्यापैकी महानगरपालिकेने ९ वाहन चालकांना जेष्ठ वाहन चालक पदाची निवड श्रेणी दिलेली आहे. आता पुर्वीची ९ पदे वगळता ३०% प्रमाणे (२६) वाहन चालकांना जेष्ठ वाहन चालक म्हणुन निवड श्रेणीत रुपांतरीत करावे. लागेल.

त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) नुसार वेतनश्रेणी वाढ एकुण वाढुन चालकांच्या ३०% वाहन चालकांना वाढीव वेतनश्रेणी व जेष्ठ वाहन चालक पदनाम देण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीचे विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** ज्या प्रमाणे वाहन चालकांना ३०% प्रमाणे जेष्ठ वाहन चालक म्हणुन पदनाम देऊन वाढीव वेतन श्रेणीचा ठराव ठेवला आहे. त्याच धर्तीवर वर्ग-४ चे १७०० ते १८०० (सफाई जवान) कर्मचाऱ्यांना पण वेतनज्ञेणी देण्याबाबतचा ठराव ठेवावा.

**उपआयुक्त (प्र.) :** वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना वाढीव वेतनश्रेणी देण्याबाबत तपासुन पुढच्या मिटींगमध्ये माहिती देण्यात येईल.

**मा. सभापती :** श्री. गौतम लांडगे यांची सुचना मंजुर आहे. पुढच्या सभेमध्ये माहिती देण्यात यावी. ठराव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील एकुण ११८ वाहन चालकांच्या मंजुर पदापैकी ३०% प्रमाणे एकुण ३५ वाहन चालाकांना (पुर्वी जेष्ठ वाहन चालक पदांची निवड श्रेणी लागु केलेली ९ पदे वगळता (२६) वाहन चालकांना) वाढीव वेतनश्रेणी रु. १४०० -२३०० लागु करण्यास तसेच "ज्येष्ठ वाहन चालक" हे पदनाम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ५६१/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी येथील कब्रस्तान विकसीत करणेबाबतच्या अंदाजपत्रकास वि.क्र. ३५३/१४ दिनांक ५.१२.९८ अन्वये स्थायी समितीची मान्यता घेण्यात येऊन कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०३/९८ दि. ३०.१२.९८ अन्वये प्रसिध्द करुन "बी-१" नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्री दि. ८.१.९९ पर्यंत वीस निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम दि. २०.१.९९ पर्यंत सात निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि. २८.१.९९ रोजी मुख्य लेखाधिकारी यांचे कार्यालयात उघडण्यात आल्या प्राप्त निविदांचे तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बी. आर. आनंद | अं. प. दरापेक्षा ३८.७९% | कमी |
| २. | एस. एम. मंडोरे | २९.१० % | कमी |
| ३. | अशोक जाधव | २७.८६% | कमी |
| ४. | आनंदा बिल्डर्स | २६.३% | कमी |
| ५. | एस. ए. देशमुख | २१% | कमी |
| ६. | सोहेल सिध्दीकी | १७.७७ % | कमी |
| ७. | एस. जी. भालेराव | ३% | कमी |

प्राप्त दरामध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री. बी. आर. आंनद यांचे अं. प. दरापेक्षा ३८.७९% कमी दराची निविदा असुन त्यास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरि निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी कब्रस्तान विकसीत करणेच्या कामासाठी प्राप्त झालेलया निविदापैंकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३८.७९% कमी दराची श्री. बी. आर. आनंद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६२/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एन-६ सिडको येथील खिश्चन स्मशानभुमीत सुविधा पुरविण्या बाबतच्या कामास स्थायी समिती मान्यता विषय क्र.उ ३९३/१५ दि. ५.१२.९८ अन्वये रक्कम रु. ३,९६,८०० चे अंदाजपत्रकास मान्यता घेऊन कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०३/९८ दि. ३०.१२.९८ अन्वये "बी-१" नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्री दि. ८.१.९९ पर्यंत १९ विक्री झाल्या व दर भरुन सिलबंद पाकिटात स्विकृतीचे अंतिम दि. २०.१.९९ पर्यंत १० निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दिनांक २८.१.९९ रोजी मुख्य लेखाधिकारी यांचे कार्यालयात उघडण्यात आल्या असता प्राप्त निविदांचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बी. आर. आनंद | ३९.९९% | कमी |
| २. | डी. एल. चव्हाण | ३९.०७ % | कमी |
| ३. | आनंद बिल्डर्स | ३३.९% | कमी |
| ४. | एस. एम. सज्जाद | ३०.७८% | कमी |
| ५. | एस. ए. नवाब | २८.२८% | कमी |
| ६. | मिलिंद बबनराव देशमुख | २५% | कमी |
| ७. | आकाश कन्स्ट्रक्शन | २४.९९% | कमी |
| ८. | एस. ए. देशमुख | २१.८६% | कमी |
| ९. | राजेंद्र वर्दे | १६.२८% | कमी |
| १०. | सुंदर कंन्स्ट्रक्शन | १५.१२% | कमी |

या अनुषंगाने प्राप्त दरामध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३९.९९% कमी दराची श्री. बी. आर. आनंद यांची निविदा असुन त्यास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करीता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-६ सिडको येथील ख्रिश्चन स्मशानभुमीत सुविधा पुरविण्याबाबतच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३९.९९% कमी दराची श्री. बी. आर. आनंद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६३/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिल्कमिल कॉलनी येथील आरोग्य केंद्राजवळ पथदिव्याकरिता विद्युती करणाचे काम करणेबाबत तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,०४,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चौदा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व अंतिम तारखेपर्यंत एकुण चौदा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. २०.१.९९ रोजी उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स् | १.१ %कमी दराने |
| २. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स् | ३% जास्त दर |
| ३. | मे. परवेज इलेक्ट्रीकल्स् | २% जास्त |
| ४. | मे. लाईटवेल इलेक्ट्रीकल्स् | १% जास्त दर |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १.१% कमी दराची मे. लुना इलेक्ट्रीकल्स् यांची निविदा आहे.करीता स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमील कॉलनी येथील आरोग्य केंद्राजवळ पथदिव्याकरीता विद्युतीकरणाचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १.१% कमी दराची मे. लुना इलेक्ट्रीकल्स् यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६४/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्कमिल कॉलनी, हमीद कॉलनी दरम्यानच्या नाल्यावर आर.सी.सी. पुल बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २०,१९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२७) कोरी निविदापत्रके विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखपर्यंत त्यापैकी फक्त (१०) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. शेख समद | २५% | कमी | |
| २. | श्री. फाईव्हस्टार कन्स्ट्रक्शन नाही) | २५% | कमी | (ई.एम.डी. |
| ३. | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | १४.९२६% | कमी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | शे. रईस | १४.४९% | कमी |
| ५. | अब्दुल सलाम | ६.८६% | कमी |
| ६. | हयात कन्स्ट्रक्शन | ११.२६% | कमी |
| ७. | एस. एच. असोसिएटस् | ५.५०% | कमी |
| ८. | श्री. शेख मसुद | ८.९२% | कमी |
| ९. | एम. एन. कन्स्ट्रक्शन | १४.४०% | कमी |
| १०. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ९.९५% | कमी |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. शेख समद यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २५% कमी आहेत. तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमील कॉलनी, हमीद कॉलनी दरम्यानच्या नाल्यावर आर.सी.सी. पुल बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्कदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २५% कमी दराची श्री. शेख समद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६५/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हमीद कॉलनी व लगतच्या वसाहतीमध्ये खडी रस्ता तयार करणेच्या कामसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ६,९०,४१०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१८) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पैकी फक्त (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत

| | | | |
|---|---|---|---|
| १. | हयात कन्स्ट्रक्शन | ४.९९% | जास्त |
| २. | सुजाता हाशमी | ६.०३% | जास्त |
| ३. | एस. एम. मंडोर | ७.९९% | जास्त |
| ४. | विपुल कंन्स्ट्रक्शन | ११% | जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी मे. हयात कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४.९९% जास्त आहेत. सदरील दर जास्त वाटत असल्याने त्यांना सदर कामाच्या दराबाबत वाटाघाटीसाठी बोलावले असता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे मे. हयात कन्स्ट्रक्शन यांनी सदरील काम ४.९९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याची तयारी दर्शविली आहे. तरी हयात कन्स्ट्रक्शन यांची अं. प. दराची निविदा स्विकारणेस मंजुरीस्तव विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हमीद कॉलनी व लगतच्या वसाहतीमध्ये खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदरील काम मे. हयात कन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६६/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कल्पतरु हौ. सोसायटी गारखेडा येथे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणे करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,५१,९००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १६ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत त्यापैकी फक्त०३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | १९% | जास्त |
| २. | श्री. ए. सी. कोठारी | २१% | जास्त |
| ३. | मे. रे. कन्स्ट्रक्शन | २५% | जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी मे. जग्गी कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १९% जास्त आहेत. सदरील कामाचे अंदाजपत्रक सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार बनविण्यात आलेले आहे. सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार घेतल्यास ठेकेदाराचे दर ४.१५ % जास्त येतात. गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलावले असता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे मे. जग्गी कन्स्ट्रक्शन यांनी सदरील काम सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने करण्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

तरी मे. जग्गी कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कल्पतरु हौसिंग सोसायटी, गारखेडा येथे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविधारकांशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदरील काम मे. जग्गी कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सन १९९७-९८च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६७/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि. ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र. २८ मध्ये १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता र. रु. ५,५१,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. ३९०/१२ अन्वये मंजुरी देण्यांत आली आहे. त्यानुसार कार्यालयाची निविदा सुचना ना. क्र. १०३//९८ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चौदा (१४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण पाच (५) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मन्नान खान | १७.७८६% | कमी |
| २. | श्री. ए. एच. आंग्रे | २३.७९% | कमी |
| ३. | आर. एस. भटिया | २५.९९% | कमी |
| ४. | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | २७% | कमी |
| ५. | मे. सफुरा इंटरपांईजेस | ३१.९५% | कमी |

वरिलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. सफुरा इंटरप्रायजेस यांचा आहे. म्हणजेच अं. प. दरापेक्षा ३१.९५% कमी असा दर दिलेला आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. २८ मध्ये १०० व १५० मीमी व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३१.९५% कमी दराची मे. सफुरा इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६८/८ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्लीगेट जलकुंभावरुन शताब्दीनगर, हिनानगर, रशिदपुरा भागास जाणारी १५० मी.मी. व्यासाची ए.सी.ी जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार र. रु. ६,७८,६००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास प्रशासकीय मान्यता घेऊन फक्त लेबर पेमेन्टवर निविदा मागविण्यात आल्या. कार्यालयाची निविदा क्र. ७७/९८ जी, की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन बी-१ निविदा निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा (६) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकुण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मो. अजहर | ०.१% | कमी |
| २. | मे. सफुरा इंटरप्रायजेस | ५.५०% | जास्त |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. मो. अजहर यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१%कमी असा दर दिलेला आहे. तरी सदर कामाचे अंदाजपत्रक व श्री. मो. अजहर यांच्यातर्फे अं. प. दरापेक्षा ०.१% कमी दरामध्ये काम करुन घेण्याच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे दिल्ली गेट जलकुंभावरुन शताब्दीनगर, हिनानगर, रशिदपुरा भागास जाणारी १५० मीमीव्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीताचे र. रु. ६,७८,६००/- च्या अंदाजपत्रकास आणि फक्त लेबर पेमेंटवर काढण्यात आलेल्या निविदानुसार सर्वात कमी लेबेर पेमेंटवर काढण्यात आलेल्या निविदानुसार सर्वात कमी दराची म्हणजेच अं. प. दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. मो. अजहर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६९/९ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा सुत गिरणीमागे काबरानगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. व १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. १९,१८,४००/- ला विषय क्र. ११८/३

दि. ५.११.९८ अन्वये स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असता एकुण सव्वीस (२६) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी स्विकारणेच्या तारखेस एकुण सहा (६) निविदा सिलबंद प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मन्नस खान | ४१.०७% | कमी |
| २. | श्री. नंदकुमार घोडले | ३५.७८६% | कमी |
| ३. | श्री. व्ही. जी. जाधव | ३४% | कमी |
| ४. | सोहेल सिध्दीकी | ३३% | कमी |
| ५. | अब्दुल सलाम | १९.३०% | कमी |
| ६. | ए. व्ही. पिसोळकर | १.९१४% | कमी |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री मन्नानखान यांचा आहे. म्हणजेच निविदा अंदापत्रकीय दरापेक्षा ४१.०७% कमी दराची आहे. तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. नरसिंग ढगे :** सदरील दर हे ४१.०७% कमी असल्याने काम चांगल्या प्रकारे होईल काय? याची माहिति द्यावी. हे काम चांगले व्हावे आशी आमची मागणी आहे.

**कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) :** संबंधित ठेकेदाराने काम चांगल्या प्रकारे करण्याबाबत लेखी दिलेले आहे.

**मा. सभापती :** गुत्तेदारा काम करण्यास तयार आहे. सबब सदरील ठराव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा सुत गिरणीमागे काबरानगर येथे २५० मी.मी व्यासाची आर.सी.सी. व १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४१.०७% कमी दराची श्री. मन्नानखान यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७०/१० :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. जाफरगेट जवळील मार्केटींग फेडरेशन जवळ १२०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. एनपी-३ पाईप टाकणेच्या कामाकरीता परिसर अभियांत्रिकी खात्याच्या सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार अं. प. र. रु. ५,७०,३००/- चे तयार करण्यात आले होते. त्यास स्थायी समितीने दि. १६.१०.९८ला विषय क्र. ३०२/१० अन्वये मंजुरी दिलेली होती. त्यानुसार सदरील कामाची बी-१ निविदा जा. क्र. मनपा/लेखा/नि/७७/९८ दि. २८.१०.९८ अन्वये जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण (१६) निविदा विक्री झाल्या व त्यापैकी (८) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. जी. आर. घोडेले | ३८.३५% | कमी |
| २. | श्री. सचिन संचेती | ३७% | कमी |
| ३. | मे. आनंद बिल्डर्स | ३६.३% | कमी |
| ४. | मे. श्रीराम कन्स्ट्रकशन | ३६.१% | कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री. संदीपान घारे | ३३.३०% | कमी |
| ६. | श्री. एस. ए. देशमुख | ३०.५५% | कमी |
| ७. | मे. गायत्री कन्स्ट्रक्शन | २७.६२% | कमी |
| ८. | मे. कावेरी कन्स्ट्रक्शन | २१.५३% | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ३८.३५% कमी दराची निविदा श्री. जी. आर. घोडीले यांची आहे. सदरील निविदेस मा. आयुक्तांनी स्थायी समितीच्या मंजुरीस्तव दि. २.२.९९ रोजी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जाफरगेट जवळील मार्केटींग फेडरेशन जवळ १२०० मी.मी. व्यासाची आर. सी. सी. एनपी.-३ पाईप टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३८.३५% कमी दराची श्री. जी. आर. घोडीले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७१/११ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री. कंधारकर हॉस्पीटल पासुन झांबड इस्टेटच्या २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुची प्रमाणे अं. प. र. रु. १,८२,२००/- ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता एकुण अठ्ठावीस (२८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण तेरा (१३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शे. सलीम | ३५.८६% | कमी |
| २. | श्री. स. अथर अली | ३३.६९% | कमी |
| ३. | श्री. जी. के. पवार | ३२.९९% | कमी |
| ४. | मे. आकाश कन्स्ट्रक्शन | २७.९०% | कमी |
| ५. | श्री. राजु कोलते | २७.२१% | कमी |
| ६. | कुलवंतसिंग | २५.७७% | कमी |
| ७. | श्री. एस. ए. हक्क | २३.५०% | कमी |
| ८. | श्री. संदीपान घारे | २३.४०% | कमी |
| ९. | एन. बी. गायकवाड | २३% | कमी |
| १०. | एम. के. तोनगिरे | २२% | कमी |
| ११. | मे. कावेरी कन्सट्रक्शन | २१.३५% | कमी |
| १२. | श्री. अरविंद पवार | २०.०५% | कमी |
| १३. | श्री. जितेंद्र शिंदे | १५.०१% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. शेख सलील यांची म्हणजेच अं. प. दरापेक्षा ३५.८६% कमी दराची आहे. तरी श्री. शेख सलीम यांची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. कंधारकर हॉस्पीटल पासुन झांबड इस्टेटच्या नाल्यापर्यंत २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३५.८६% कमी दराची श्री. शेख सलीम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७२/१२ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, जाननगर, पैठणरोड येथे दगडी गटार बांधणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय र. रु. १३,१३,०००/- ला सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता एकुण तेवीस (२३) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण तीन (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. हयात कन्स्ट्रक्शन | ३% | जास्त |
| २. | श्री. एस. एम. मंडोरे | ७.५% | जास्त |
| ३. | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | ८% | जास्त |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. हयात कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची आहे. संबंधित गुत्तेदारास दर वाटाघाटीसाठी बोलावले असता गुत्तेदाराने सदरील काम अं. प. दरापेक्षा १% जास्त दराने करण्यास तयार आहे. म्हणुन संमती दिलेली आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. १०.२.९९ रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी वाटाघाटीअंतीचा दर म्हणजेच अं. प. दरापेक्षा १% जास्त दराची मे. हयात कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालाननगर, पैठण रोड येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. हयात कन्स्ट्रक्शन यांचेकडुन अं. प. दरापेक्षा १% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७३/१३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) :यांनी प्रस्ताव सादर केला की, शहर व सिडको भागात विविध ठिकाणी २८ विंधन विहिरी खोदुन त्यावर हातपंप बसविण्याच्या कामासाठी र. रु. ७,६१,४६०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. १६४/९ दि. २८.८.९८ अन्वये मान्यता मिळाल्यानंतर निविदा सुचना देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता एकुण चार निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

१. मे. बाणगंगा बोअरवेल्स, नाशिक अं. प. दरापेक्षा + ४.९५ % जास्त
२. मे. अनुराग बोअरवेल्स, औरंगाबाद अं. प. दरापेक्षा + ४.९५% जास्त

३. मे. व्यंकटेश बोअरवेल्स, सर्व्हीसेस, जिंतुर अं. प. दरापेक्षा + १०% जास्त
४. मे. तिरुपती बोअरवेल्स, नाशिक अं. प. दरापेक्षा + १०% जास्त

वरीलप्रमाणे मे. बाणगंगा बोअरवेल्स, नाशिक व मे. अनुराग बोअरवेल्स, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असुन अं. प. दरापेक्षा ४.९५ % जास्त आहेत. दोन्ही एजन्सीचे दर सारखे असलयामुळे वाटाघाटीस बोलावुन बंद पाकिटात किती कमी दर करणार याची विचारणा केली. आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१. मे. बाणगंगा बोअरवेल्स, नाशिक अ. प. दरापेक्षा ३% जास्त
२. मे. अनुराग बोअरवेल्स, औरंगाबाद अं. प. दरापेक्षा ३.५०% जास्त

तुलनात्मकदृष्टया मे. बाणगंगा बोअरवेल्स, नाशिक यांचे दर सर्वात कमी परंतु अं. प. दरापेक्षा ३%जास्त असल्यामुळे त्यांना परत वाटाघाटीस बोलविण्यात आले. मा. आयुक्त यांच्या दालनात झालेल्या वाटाघाटीअंती मे. बाणगंगा बोअरवेल्स, नाशिक यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराप्रमाणे करण्यांस संमती दर्शविलेली आहे.

तरी मे. बाणगंगा बोअरवेल्स, यांच्या अं. प. दराप्रमाणे निविदेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर व सिडको भागात विविध ठिकाणी २८ विंधन विहिरी खोदुन त्यावर हातपंप बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. बाणगंगा बोअरवेल्स, नाशिक यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७४/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका अस्थापनेवर दुरध्वनी चालक संवर्गात रु. ९७५-१६६० ही वेतन श्रेणी देण्यांत येत आहे. सात वर्षानंतर समश्रेणी देतांना या संवर्गास रु. १३२०-२०४० ही वेतन श्रेणी लागु करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथील दुरध्वनी चालकांना बारा वर्षाच्या सेवेनंतर समश्रेणी लागु करतांना रु. १४०० ते २३०० ही वेतनश्रेणी लागु करण्यांत आलेली आहे. त्याच धर्तीवर अस्थापनेवरील दुरध्वनी चालकांनी मागणी केल्याप्रमाणे सात वर्षाच्या सेवेनंतर देण्यात आलेली वेतन श्रेणी रु. १३२०- २०४० ऐवजी रु. १४०० -२३०० ही देणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अस्थापनेवरील "दुरध्वनी चालक" संवर्गास सात वर्षानंतर देण्यात आलेल्या रु. १३२०-२०४० या वेतनश्रेणी ऐवजी जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथील दुरध्वनी चालकांना ज्याप्रमाणे १४००-२३०० ही वेतनश्रेणी लागु करण्यांत आलेली आहे. त्याच धर्तीवर अस्थापने सात वर्षाच्या सेवेनंतर रु. १४००-२३०० ही वेतन श्रेणी देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७५/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यानी प्रस्ताव दिला की, संस्थान गणपती ते हरी मस्जीद नबाबपुरा व गवळीपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. १०,७८,६००/- च्या अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सोळा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्सट्रक्शन कं. | ५.५५% | कमी |
| २. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन कं. | ५.५०% | कमी |
| ३. | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | १.२५% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मॉस्कॉट कन्स्र्टक्शन कं. यांचे निविदाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ५.५५% कमी आहेत. करीता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संस्थान गणपती ते हरी मस्जीद नवाबपुरा व गवळीपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ५.५५% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७६/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र. ४३ मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. १९.१२.९८ च्या सर्वसाधारण सभेमंध्ये विषय क्र. १७९/३ अन्वये अं. प. र. रु. १४,१९,५४९/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१०३/९८ दि. ३०.१२.९८ चे सुचनेनुसार प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१६) निविदा विक्री झाल्या. पैकी स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण (०३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्सट्रक्शन कं. | ५.५५% कमी |
| २. | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | १.२५% कमी |
| ३. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन क. | ०५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं. प. दरापेक्षा ५.५५% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक ४३ मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ५.५५% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७७/१७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सिध्दार्थनगर येथे त्वरीत जुनी १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढुन त्याऐवजी २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता अं. प. र. रु. १,६२,६०२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील काम लेखा शिर्ष "भांडवली कामे ९८-९९" यातुन प्रस्तावित केले आहे.सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. ४.३.९९ ला मान्यता दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. सिध्दार्थ नगर येथे जुनी १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढुन त्याऐवजी २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यंत आलेल्या र. रु. १,६२,६०२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७८/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सहाय्यक संचालक अल्पबचत, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी दि. १२.२.९९ रोजी पत्र देऊन औरंगाबाद शहरातील

१. कै. अण्णाभाऊ साठे चौक (जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील)
२. कार्तिकी हॉटेल समोरील चौक,
३. सिडको बसस्टॅन्ड जवळील चौक

या तीन चौकांचे सुशोभिकरण करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी विनंती केली आहे. सदर चौकाचे सुशोभिकरणाकरीता लागणारा खर्च त्यांनी अल्पबचतीतुन निधी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे.

तरी सहाय्यक संचालक अल्पबचत, जिल्हाधिकारी कार्यालय यांना खालील अटीच्या अधीन राहुन परवानगी देण्याची मान्यतेस्तव सादर.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१. चौकातील सुशोभिकरणाचे आराखडे मनपायांच्या संमतीनेच मंजुर करावेत.
२. चौकातील सुशोभिकरणामुळे रहदारीस अडथळा होऊ नये यासाठी पोलीस आयुक्तांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.
३. झालेल्या सुशोभिकरणाची दरवर्षी करावी लागणारी "सिव्हील वर्क" ची देखभाल व दुरुस्ती मनपा करण्यास तयार राहिल.

तरी वरील अटींच्या अधीन राहुन सहाय्यक संचालक अल्पबचत, जिल्हाधिकारी कार्यालय यांना वरील दर्शविलेल्या तीन चौकांचे सुशोभिरण करण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (१) कै. अण्णाभाऊ साठे चौक, (२) कार्तिकी हॉटेल समोरील चौक व (३) सिडको बसस्टॉण्ड जवळील चौक या तीन चौकांचे सुशोभिकरण

करण्याकरीता सहाय्य संचालक अल्पबचत, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्ती (अ.क्र. १ ते ३) च्या अधीन राहुन परवानगी देण्यांत येते. प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७९/१९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे उर्वरीत रस्त्यांचे डाबरीकरण करणे करीता सा. बां. खातेच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुचीनुसार रु. ७,२४,११३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "पुर्नडांबरीकरण " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक २.३.९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले र. रु. ७,२४,११३/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर बायजीपुरा (स्लम) येथे उर्वरीत रस्त्यांचे डांबरीकरण करणे करीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ७,२४,११३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८०/२० :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. शताब्दी नगर स्लम येथे दहा बैठकीचे सुलभ शौचालय बांधणे बाबत कामाकरीता सा. बां. खातेच्या सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यायंत आले आहे. सदरील काम "सुलभ शौचालय व मुतारी बांधणे + दहावा वित्त आयोग " या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ९.८.९८ ला प्रशासकीय मान्यता मान्यता दिली असुन दि. २८.८.९८ रोजी स्थायी समितीत मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आली असता. अंतिम तारखेपर्यंत एकुण १८ निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | एस. एम. सज्जाद | १०% जास्त |
| २. | एस. एम. शेख | १२% जास्त |
| ३. | साईबाब कन्स्ट्रक्शन | १८ % जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा १०% जास्त दराची निविदा श्री. एस. एम. सज्जाद यांची आहे. परंतु हे दर जास्त असल्यामुळे ठेकेदारास दराच्या वाटाघाटीसाठी मा. आयुक्तांच्या दालनात बोलावले असता मा. आयुक्त साहेबांनी हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यांस मंजुरी दिली. परंतु संबंधित गुत्तेदारास हे दर मान्य नसल्यामुळे पुन्हा मा. आयुक्त यांच्या दालनात दराच्या वाटाघाटी झाल्यानंतर ठेकेदारास हे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करण्यांस समंती दिली आहे. करीता अं. प. दरापेक्षा ३% जास्त दराची श्री. एस.एम. सज्जाद यांची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलेल्या मो. शताब्दी नगर स्लम येथे दहा बैठकीचे सुलभ शौचालय बांधणे च्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. एस. एम. सज्जाद यांचेकडुन अं. प. दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८१/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४८ अजबनगर व छोटा तकीया येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी अं. प. रु. ४,९८,९००/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी समिती सभेत मंजुरी मिळाली आहे.

सदरील कामांसाठी निविदा मागविली असता निविदा विक्रीच्य अंतिम तारखेपर्यंत एकुण १३ निविदा विक्री झाल्या असुन स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत ३ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ए. सी. कोठारी | १८.३१% | जास्त |
| २. | के. बी. पाथ्रीकर | २०% | जास्त |
| ३. | जग्गी कन्स्ट्रक्शन | २०% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे सन १९९६-९७ अंदाजपत्रकापेक्षा १८.३१% जास्त दराची श्री. ए. सी. कोठारी यांची निविदा आहे. सदर अंदाजपत्रकाची तुलना सन ९७-९८ प्रमाणे केल्यास ४.१४९% जास्त येतात. परंतु मा. आयुक्त साहेबांनी सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने मंजुरी दिली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड ४८ अजबनगर व छोटा तकीया येथिल अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात की दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने श्री. ए. सी. कोठारी यांचेकडुन काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८२/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा स्मशानभुमीकरीता डांबरी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार अं. प. र. रु. ३,२५,०००/- चे तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती सभेत मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १३ निविदा पत्रके विक्री झाल्या असुन त्यापैकी स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ए. सी. कोठारी | १८.५०% | जास्त दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | जग्गी कन्स्ट्रक्शन | २०% | जास्त दराने |
| ३. | के. बी. पाथ्रीकर | २०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८.५०% जास्त दराची श्री. ए. सी. कोठारी यांची निविदा आहे. सदर अंदाजपत्रकाची तुलना १९९७-९८ प्रमाणे केल्यास ०.४९% कमी येतात.

मा. आयुक्त साहेबांनी सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार ०.४९% कमी दराने मंजुरी दिली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरी स्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा स्मनाशभुमीकरीता डांबरीरस्ता तयार करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार ०.४९% कमी (१८.५०% जास्त) दराची श्री. ए. सी. कोठारी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८३/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, मराठवाडा सांस्कृतीक मंडळाच्या क्रिकेटच्या ग्राऊंडवर ॲटोमेटीक इरीगेशन पॉपअप स्पीकंलर्स बसविणे करीता र. रु. ४,१६,०३२/- चे अंदाजपत्रक मे. चोरडीया ब्रदर्स यांनी सादर केले असुन मा. पालकमंत्री महोदय यांनी या ठिकाणी स्प्रींकलर्स व्यवस्था करणे करीता कळविले आहे. प्रस्तुत पत्रावर कार्यवाही करणे करीता मा. पालकमंत्री महोदय यांनी अंकीत केले आहे.

आं. प. र. रु. ४,१६,०३२/- मध्ये पूर्ण ग्राऊंडमध्ये पी. व्ही. सी. पाईपद्वारे पाणी पुरवठा करणे व स्प्रीकलर्स लावणे, स्प्रीकलर्सला कंट्रोल करीता वॉल्ब बसविणे, पाण्याची टाकी बांधणे इ. बाबीचा समावेश आहे.

ॲटोमेटी इरीगेशन पॉपअप स्प्रीकलर (टोरो, अमेरीका) ही सिस्टीम क्रिकेट ग्राऊंडवर कार्यन्वित झाल्यास खालील प्रमाणे फायदे होणार असल्याबद्दल देखील नमुद करण्यांत आले आहे.

१. लॉनकरीता लागणाऱ्या एकुण पाण्यापैकी ६० ते ७०% पाण्याची बचत होते.
२. संपुर्ण ग्राऊंडूमध्ये समतुल्य वितरण होते व त्यामुळे सर्व ग्राऊंडव एक सारखा हिरवेपणा राहतो.
३. त्यामुळे लॉनचे (हिरवळीचे ) आयुष्य वाढते.
४. लॉनला द्रवरुप खत/औषधी समप्रमाणात व योग्य प्रकारे वितरण होते.
५. यामुळे मनुष्यबळ कमी लागते. व मनुष्यबळावरील खर्च वाचतो.
६. लॉन कटींगसाठी या व्यवस्थेमुळे अडथळा होत नाही.

मे. चोरडीया ब्रदर्स यांनी हा प्रस्ताव मराठवाडा सांस्कृतीक मंडळाच्या ग्रांऊडवर कार्यान्वित करणे बाबत दिले आहे. परंतु सांस्कृतीक मंडळाचे ग्राऊंड मनपाचे मालकीचे नसल्यामुळे व या कामाचा समावेश शासकीय अनुदानामधील कामाच्या यादीत घेतलेला नस्ल्यामुळे सध्या हे काम घेता येणार नाही. या कामा करीता प्रत्यक्ष शासकी अनुदान प्राप्तीअंती विचार करणे बाबत मुख्य लेखाधिकारी यांनी त्यांचे मत नोंदिवले आहे.

गरवोर स्टेडियमचे ग्राऊंड हे मनपाच्या मालकीचे असल्यामुळे प्रस्तुत अंदाजपत्रक र. रु. ४,१६,०३२/- चे प्रकल्प मे. चोरडीया ब्रदर्स यांच्याकडुन गरवारे स्टेडीयमच्या ग्राऊंडवर करुन घेणेबाबत विचार विनिमय करुन निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गौतम लांडगे :** मराठवाडा सांस्कृतीक मंडळाचे क्रिकेट मैदानावर स्वंयचलित इरिगेशन पॉपअप स्प्रिंकलर्स रु. ४,१६,०३२/- चे बसविणे करीता मे. चोरीडया ब्रदर्स यांच्याकडुन हे काम करुन घेण्यात येणार आहे असे दर्शविलेले आहे. सांस्कृतीक मंडळाची जागा आपल्या ताब्यात नाही. गरवारे स्टेडियम महानगरपालिकेच्या मालकीचे आहे. खुलासा करावा. तसेच चोरडीया ब्रदर्स यांना का द्यावयाचे ? यासाठी निविदा मागविण्यात याव्या जे कमी दर येईल त्यांच्याकडुन काम करुन घ्यावे.

**मा. सभापती :** मराठवाडा सांस्कृतीक मंडळ येथे क्रिकेटच्या मैदानावर स्वंयचलित इरीगेशन पॉपअप स्प्रिकलर्स बसविणे बाबत मा. पालकमंत्री यांनी मे. चोरडीया यांना शासकीय अनुदानातुन हे काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे. इरीगेशन पॉपअप स्प्रींकलर्स बसविले तर लहान लहान मुले या ठिकणी खेळावयास येतील. प्रांगणात हिरवहीचे वातारण दिसुन येईल. त्याचप्रमाणे शासकीय अनुदानातुन महापालिकेने ४ कोटीचे वाचनालय केलेले आहे. एकुण २२ कोटी शासनाकडुन मनपाला अनुदान येते. तर मा. पालकमंत्री यांनी सांगितल्यानुसार मे. चोरडीया यांना हे काम करुन देण्यास काय हरकत आहे.

**श्री. गौतम लांडगे :** शासनाचा जो पैसा येतो तो अशा कामासाठी खर्च करता येत नाही. प्रशासनाचे मत घ्यावे.

**उपअभियंता (बां.) :** सांस्कृतीक मंडळाच्या मैदान या कामाकरीता शासकीय अनुदानातुन काम करण्यास मंजुरी झाली असेल तर हे काम करता येईल.

**श्री. गौतम लांडगे :** शासकीय अनुदान या कामाकरीता मंजुर झालेले नाही.

**मुख्य लेखा परिक्षक :** शासकीय अनुदान मनपा फंडात जमा होते. शासकीय अनुदानातुन हे काम करावयाचे असेल तर धोरणात्मक निर्णय साठी सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी लागेल.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी या कामाबाबतच्या निविदा काढाव्यात. तसेच मराठवाडा सांस्कृतीक मंडळावर सदरचे काम करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात यावा. ३ दिवसांची अल्प मुदतीची निविदा काढून महापालिकेच्या मालकीच्या जागेवर म्हणजेच गरवारे स्टेडीयमंमध्ये सदरचे काम करण्याबाबतची कार्यवाही करावी. तशी प्रस्ताव मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मराठवाडा सांस्कृतीक मंडळाचे मैदान हे मनपाच्या मालकीचे नसल्यामुळे महापालिका मालकीचे असलेल्या "गरवारे स्टेडीयमचे ग्राऊंड" वर ॲटोमेटीक इरीगेशन पॉपअप स्प्रींकलर्स बसविणेच्या कामाकरीता र. रु. ४,१६,०३२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरील काम करणेकरीता ३ (तीन) दिवसांची अल्पमुदतीची निविदा मागवुन काम करण्यांत यावे. त्याचप्रमाणे मराठवाडा

सांस्कृतीक मंडळाच्या स्वचंचलित स्प्रींकलर्स बसविणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे दृष्टीने सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करावा. वैधानीक कार्यवाही करावी.

**विषय क्र. ५८४/२४ :**

मा. कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. इंदिरानगर (स्लम) वार्ड क्र. २४ मध्ये रस्त्याचे डांबरीकरण करणे करीता कामाचे अंदाजपत्रक र. रु. १३,७१,०००/- चे सा. बां. दरसुची सन ९६-९७ नुसार तयार करण्यांत आले होते. सदरील अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानंतर अं. प. दरापेक्षा २२.०१% कमी दराने मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यात आले आहे.

या दरम्यान वार्ड क्र. २३ च्या स. नगरसेविका यांनी तसेच येथील नागरीकांनी इंदिरानगर भागातील उर्वरीत रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत आग्रही विनंती केली. तसेच शहरातील वार्डातील विविध समस्यांचे संदर्भात मा. पालकमंत्री, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली येथे जनता दरबार दिनांक १.३.९९ रोजी संपन्न झाला. मा. पालकमंत्री औरंगाबाद रोजी संपन्न झाला. मा. पालकमंत्री औरंगाबाद यांनी स. नगरसेविका यांची विनंती व नागरीकांची आग्रही मागणी लक्षात घेऊन काम तातडीने सध्या करीत असलेल्या एजन्सीकडुन उर्वरीत काम करवुन घेणेबाबत सुचना दिल्या आहेत.

त्यानुसार सूधारित अंदाजपत्रक तयार केले असता ते र. रु. २२,८८,४६७/- रक्कमेचे होते. यात मुळ काम गल्ली नं. १ (इंदिरानगर) व वार्ड क्र. २३ मधील उर्वरीत गल्लयांमधील डांबरीकरणाच्या कामाचा समावेश आहे. या विषयी संबंधित कंत्राटदाराकडे विचारणा केली असता मुळ कामाच्या १२५% पर्यंत म्हणजेच मुळ कामपेक्षा २५% अधिकचे काम (बाबी व परिमाणे ) मुळ मंजुर निविदा दराने म्हणजेच अं. प. दरापेक्षा २२.०१% कमी दराने कंत्राटदार करावयास तयार आहेत. तसेच सुधारीत अं. प. तील १२५% पेक्षा जास्तीच्या उर्वरीत परिमाणांसाठी वर्ष ९७-९८ च्या सा. बां. दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने करण्यांस तयार असल्याचे कळविले आहे.

सुधारित अंदाजपत्रक व वाढीव खर्चाची र. रु. ९,१७,४६७/- ला मा. आयुक्त यांनी बी-१ निविदेच्या नियम ३८ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान केली असुन , प्रकरण विचारार्थ तथा मंजुरीस्तव स्थायी समितीसमोर ठेवण्यास आदेशित केलेले आहे.

तरी सुधारित अंदाजपत्रक व वाढीव खर्च रु. ९,१७,४६७/- ला मंजुरी मिळणेस्तव सादर. तसेच १२५% पेक्षा जास्त असलेली परिमाणे सा. बां. दरसुची ९७-९८ नुसार करुन घेऊन देयक अदा करण्यास व उर्वरीत वाढीव काम सध्या मुळ काम करीत असलेले कंत्राटदार मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे कडुन प्रस्तावित केल्यानुसार काम करणेस्तव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विखारोधीन :** ज्याप्रमाणे वार्ड क्र. २२ चे काम वार्ड क्र. २४ मध्ये होते. अक्षेप नाही. परंतु माझ्या वार्डामध्ये का होत नाही. आम्ही सांगितले तर होत नाही अशी उत्तरे मिळतात.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**कार्य. अभियंता (स्लम) :** वार्ड क्र. २३ मध्ये ज्या नमुद अंदाजपत्रकाच्या १०% पेक्षा जास्त नुसार काम करता येणार नाही. बसैय्य बंधु काम करुन देत नाही. या कामा संदर्भात ३ वेळेस निविदा काढुन मंजुर झालेल्या आहेत. त्यात एकु ११

गल्ल्यामंध्ये डांबरीकरणाचे काम करावयाचे आहे. ३८(बी) प्रमाणे काम करत आहे. नियमाने काम करण्यांत येईल.

**श्री. विखारोधीन :** नियम ३८(ब) प्रमाणे येथे अनुज्ञेय होते. आम्ही सांगतो त्यावेळी देखील अशी कामे व्हावीत.

**मुख्य लेखा परिक्षक :** मुळ अंदाजपत्रकातील रक्कम १३ लाखांमधे् २५% म्हणजे ३ लाखाचे काम केलेले आहे. उर्वरीत जे काम आहे ते निविदा काढुन करण्यांत यावयास पाहिजे.

**कार्य. अभियंता (स्लम) :** १२५% मुळ कामाच्या अधिक म्हणजेच २५%, ३८ (बी) नुसार खर्चाला मंजुरी द्यावी. १३ लाख ७१ हजाराचे काम ९ लाखामध्ये काम करत आहे. २२.०१% कमी दराने काम करण्यांत येत आहे. मुळ काम वेगळे आहे.

**मुख्य लेखा परिक्षक :** मुळ कामाचा भाग असेल तर त्यास आधार आहे. परंतु काम वेगवेगळे आहे. स्वतंत्र्य अंदाजपत्रकास मंजुरी द्यावी लागेल.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडे संचिका तयार करुन पाठवावी. योग्य तो निर्णय घ्यावा.

**विखारोधीन :** राहुननगर, सिल्कमिल कॉलनी येथेही अशा प्रकारची कामे करता येतील काय?

**मा. सभापती :** ३ दिवसांची अल्प मुदतीची निविदा काढुन संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**ठराव :**

सदरील कामाकरीता स्वतंत्र्यपणे कार्यवाही करुन तीन दिवसांची अल्पमुदतीची निविदा काढण्यांत यावी, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी. मार्च अखेरची कामे असल्याने स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५८५/२५ :**

श्री. सय्यद कय्युम स. हुसैन, स्वच्छता निरीक्षक वि. क्र. १ म.न.पा. औरंगाबाद यांचे कायमस्वरुपी बंद केलेली वेतनावाढ पुर्ववत चालु करुन निलंबन काळ हा सेवाकाळ गृहीत धरणे बाबतच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सय्यद कय्युम स. हुसैन, स्वच्छता निरिक्षक, वि. क्र. १, महानगरपालिका, औरंगाबाद यांची कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली एक वार्षिक वेतन वाढ नियमित करण्यांस त्याचप्रमाणे निलंबन काळ हा सेवाकाळ म्हणुन गृहीत धरण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८६/२६ :**

श्री. टी. डी. राजपुत, तत्कालीन नगर रचनाकार व श्री. एन. ए. वाहुळ, तत्कालीन मालमत्ता अधिकारी, मनपा यांचे ठराव क्र. ५७३/४३ दिनांक २६.३.९८ चे ठरावात दुरुस्ती बाबत अपीलाच्या संदर्भातील पुनःर्विलोकन अर्जावर विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**ठराव :**

श्री. एन. ए. वाहुळ, तत्कालीन मालमत्ता अधिकारी व श्री. टी. डी. राजपुत, तत्कालीन नगर रचनाकार यांना सर्व्हे नं. ७ शहानुरवाडी येथील विना परवानगी बांधकाम

परवानगी प्रकरणी मा. आयुक्तांनी दोषी ठरवुन त्यांची एक वेतनवाढ एक वर्षासाठी रोकण्याबाबत जो निर्णय दिला त्याबाबत पुन:विचार करण्यात येऊन सदरची एक वेतनवाढ रोकण्याचा मा. आयुक्त यांचा निर्णय रद्द करण्यांत येत आहे. या चौकशीत चौकशी अधिकारी यांनी मुळ प्रस्तावित केल्यानुसार श्री. वाहुळ यांनी विना परवानगी बांधकाम प्रकरणे विना विलंब व नियमाप्रमाणे हाताळल्याने त्यांना निदोर्ष ठरविण्यात आले आहे. हा निर्णय कायम करण्यांत येतो. तसेच श्री. टी. डी. राजपुत हे कार्यालयीन व निवडणुकीच्या कामात पुर्णपणे व्यस्त असल्यायने या प्रकरणी पुर्णपणे लक्ष देऊ शकले नाही. असे असले तरी श्री. टी. डी. राजपुत यांचे वरील अंशत : जबाबदारी लक्षात घेऊन त्यांना लेखी समज देण्यांत येऊन यापुढे असा प्रकार होणार नाही. या बाबत ताकीद देण्यांत यावी यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८७/२७ :**

दि. ३०.१.९९ च्या इतिवृत्तातील स्थगित ठेवण्यांत आलेला ठराव क्र. ५०४/१९ वर विचारविनिमय होणे.

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्सुल गांव येथे शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरीता सा. बां. खाते यांच्या वर्ष ९७-९८ च्या दरसुचीनुसार र. रु. ३,९८,७५७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते व दहाव्या वित्त आयोग" या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदर च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २९..८.९८ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच स्थायी समितीत दिनांक १५.९.९८ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण १५ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ८ निविदा प्राप्त झाले व उपस्थित गुत्तेदार समक्ष उघडण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आनंद बिल्डर्स | ३३.०३ % | कमी |
| २. | सय्यद रफिकोद्दीन | ३३.१० % | कमी |
| ३. | ए. एम. फारुकी | ३२.७८ % | कमी |
| ४. | मन्नान खान | २८.५० % | कमी |
| ५. | विपुल कन्स्ट्रक्शन | २८.०० % | कमी |
| ६. | मझर सिद्दीकी | २५.२५ % | कमी |
| ७. | फाईव्ह स्टार कन्स्ट्र. | २२.१० % | कमी |
| ८. | एस. एम. मंडोर | २१.०३ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.०३% कमी दराची असलेली मे. आंनद बिल्डर्स यांची निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** दि. ३०.१.९९ च्या इतिवृत्तातील ठराव क्र. ५०४/१९ स्थळ पाहाणीसाठी स्थगित ठेवण्यांत आलेल्या कामाची स्थळ पाहणी करण्यांत आली असुन सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला हर्सुल गांव येथील शाहबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय

दरापेक्षा ३३.०३% कमी दराची मे. आनंद बिल्डर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव<br>महानगरपालिका, औरंगाबाद | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०.२.९९ रोजी तहकुब झालेली स्थायी समिती सभा दिनांक १५.३.९९ रोजी संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती श्री. जयवंत ओक यांच्या अध्यक्षतेखाली १५.३.९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभा (लेखा परिक्षण अहवालाच्या) सभेचे इतिवृत्त.**

**सभेची सुरुवात वंदेमातरम् या गिताने दुपारी १२.३० वाजता झाली. सभेस रजिस्टरप्रमाणे स. स. व अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. म. अ. रऊफ म. अ. माबुद | --//-- |
| ३. | स. स. श्री. स. अलि मिरा सलामी | --//-- |
| ४. | स. स. श्री. संजय जोशी | --//-- |
| ५. | स. स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६. | स. स. श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | --//-- |
| ७. | स. स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ८. | स. स. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ९. | स. स. श्री. किशोर तुळशीबागवाले | --//-- |
| १०. | स. स. श्री. विखारोध्दीन पि. खुदबोधीन | --//-- |
| ११. | स. स. श्री. सय्यद अहमद एकबालोधीन | --//-- |

**संवाद :**

**मा. सभापती :** कविवर्य "कुसुमाग्रज" यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यांत यावी. ००=०१ मिनिटे स्तब्ध उभे राहुन सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात आली. त्याचप्रमाणे लेखा परिक्षणाच्या अहवालाबाबत आतापर्यंत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**श्री. विखारोद्दीन :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १०६/३ अन्वये सभागृहाला माहिती दिलेली आहे. आता कोणत्या कारणास्तव याची माहिती अवगत होणे आवश्यक आहे.

**मुख्य लेखा परिक्षक :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १०६/३ नुसार महानगरपालितील मुख्य लेखा परिक्षक यांनी स्थायी समितीला अहवाल सादर केलेला आहे. या बाबत स्थायी समितीची चर्चा करुन निर्देश केलेल्यानुसार सर्वसाधारण सभेसमोर शिफारस करावयाची असले. यापुर्वी सन १९९०-९१ ते १९९२-९३ या वेळेसचा लेखा परिक्षण अहवाल त्यावेळेसचे तत्काली प्रशासक असलयाने त्यावेळी स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव ठेवलेले नव्हते. त्यानंतरच्या कालवधीतील सन १९९४-९५, ९५-९६ व १९९६-९७ हा कालावधी प्रशासकाचा नसुन लोकप्रतिनिधी असलेले आयुक्तांचा आहे. त्यामुळे सदरील लेखा परिक्षण केलेल्या अहवालाची मंजुरी स्थायी समिती पुढे ठेऊन मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांच्या शिफारशी नुसार सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव ठेवण्यात येईल. बऱ्याच वेळेस विभागीय अधिकारी यांना पत्र देऊन कळविलेले आहे की, त्यांनी अनुपालन अहवाल

तातडीने सादर करावा. त्यानुसार प्राप्त झालेल्या अहवालानुसार माहितीस्तव अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

**श्री. विखारोद्दीन :** लेखा परिक्षण करित असतांना ज्या चुका झालेल्या आढळुन आल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर संबंधित विभागास पत्र देवून त्याबाबत योग्य ती दखल घेण्याचे कळविलेले असतांनाचे अहवालाचे नमुद केलेले आहे. परंतु त्यामुळे प्रशासनाने काहीही कार्यवाही केल्याचे नमुद केलेले नाही. त्यामुळे लेखा परिक्षण अहवाल बरोबर नाही असे वाटते.

**मुख्य लेखा परिक्षक :** सदरील अहवाल हा मुळ स्वरुपाचा असुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. सन ऑक्टोम्बर -९७ ला स्थायी समितीला सदरील अहवाल चर्चेसाठी दाखल केलेला आहे.

**श्री. विखारोद्दीन :** सन १९९७ ला लेखा परिक्षण अहवालात माझ्या माहितीप्रमाणे ९८ वर्षाचे सुध्दा समावेश केलेले असून सुध्दा काही बाबी स्पष्ट दिसत आहेत. त्या ९७ च्या अहवालात नसावयास पाहिजे.

**मुख्य लेखा परिक्षक :** ठिक आहे. अशा काही चुका असल्यास तशा निदर्शनास आणुन द्याव्यत.

**श्री. अशफाक सलामी :** १९९३-९४, ९४-९५, ९५-९६ व १९९६-९७ पर्यंतचे लेखा अहवाल या ठिकाणी सादर केलेला आहे. तरी फक्त १९९६-९७ च्या अहवालावरच आजच चर्चा करणार आहोत. नियमाप्रमाणे दरवर्षाला लेखा परिक्षण अहवाल स्थायी समितीला करावयाचा असतो. ती झालेला नाही. आता एकदाच एकत्रीत लेखा अहवाल सादर करणे योग्य नसुन सध्या १९९९ वर्ष चालु आहे. व त्यामुळे १९९७-९८ चा अहवाल अद्यापही सादर केलेला नाही. त्यामुळे प्रशासन लेखा अहवाल एवढया उशिरा सादर करण्याचे कारण समजत नाही.

**मुख्य लेखा परिक्षक :** सन १९९७-९८ चा लेखा परिक्षण अहवाल जवळपास पूर्ण होत असून एका आठवडयापर्यंत स्थायी समितीला अहवाल सादर करण्यात येईल.

**श्री. अशफाक सलामी :** सादर करण्यांत आलेल्या लेखा परिक्षण अहवालात असे स्पष्टपणे नमुद केलेले दिसून येत नाही. की, या विभागाच अहवाल त्या वर्षीचा आहे किंवा कसा उदा. द्यावयाचे झाल्यास अनेक झोनच्या अहवालावरुन त्यात नमुद केलेले दिसत नाही. सदरील अहवालात झोन -३ च्या अहवालात ८९ व ९३ तसेच ९६ व कधी ९७ चा अहवाल असल्याचे नमुद केलेले आहे. व लेखा परिक्षणात झालेल्या चुकांची सन १९९६-९७ च्या अहवालात अनुपालन झाल्याचे दिसुन येत नाही.

**मा. सभापती :** मागील बैठकीत जी माहिति मागविलेली होती त्यानुसार काय कार्यवाही केली या बाबतची चर्चा करावी.

**मुख्य लेखा परिक्षक :** सन १९९६-९७ चा अहवाल हा १ एप्रिल ९६ ते ३१ मार्च ९७ पर्यंतचा आहे. लेखा परिक्षण माझ्या कारकिर्दित मी स्वत: केलेल्या असुन जवळपास सन १९९४-९५, ९५-९६ व ९६-९७ हा लेखा परिक्षण अहवाल प्रत्यक्षात स्थायी समितीला मंजुरीस्तव चर्चेसाठी सादर करण्यात आला आहे.

**श्री. अशफाक सलामी :** सदरील अहवाला पूर्ण एका-एका वर्षाचा कालावधीचा आहे की, नेमके काही दिवस यामधुन सुटलेले आहेत. याची माहिती द्यावी. सर्व कार्यालयीन कामकाजाचे दिवसांचे किंवा कसे ?

**मुख्य लेखा परिक्षक :** रिसीट बाजु घेतलेली असुन ते १००% घेण्यात आले आहेत. आणि खर्चाचे बाजु काही प्रमाणांत घेण्यात आलेली आहे. १००% खर्च बाजु (Expenditure) घ्यावयाची गरज नाही.

**श्री. अशफाक सलामी :** अहवालात काही ठिकाणी काही विभागाच्या संदर्भात गंभीर आरोप नमुद केलेले आहे. त्याबाबत काय कार्यवाही केली.

**मुख्य लेखा परिक्षक :** अशा सर्व प्रकरणात स्थायी समितीने निर्णय घ्यावयाचा आहे.

**श्री. अशफाक सलामी :** लेखा परिक्षण अहवाल हा संपुर्णपणे केलेला नसुन बऱ्याच वेळेस गुत्तेदार, अधिकारी व कर्मचारी यांच्या वरिल भ्रष्टाचार या अहवालात नमुद केलेला नाही. उदा. द्यावयाचे झाल्यास सन १९९१-९२ व ९३-९४ या लेखा परिक्षण अहवालात पृष्ठ क्र. ५१ मुद्दा क्र. १६ मध्ये कनव्हर्शन ऑफ ड्राय लॅट्रीन विभाग क्र. ३ मध्ये संचिका क्र. १०५/५५/९०-९१ अंतर्गत घेण्यात आले. या संचिकेमध्ये सहावे देयक ज्या ६८ लोकांना संडास जोडणीचे रु. १,०५,८३०=७०/- चे ठेकेदारास अदा करण्यात आले त्यांची नावे नोंदवहीमंध्ये नाहीत व सदरील ६८ घरे अस्तीत्वात त्या ठिकाणी नसुन ज्या जागेवर काम दाखविले आहे. तेथे मनपाचे उद्यान असुन ठेकेदारास बोगस देयेक अदा केले आहे.

**मुख्य लेखा परिक्षक :** बरोबर आहे. सदरील मुद्याबाबत प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यात येते.

**मा. सभापती :** स. स. नी. चर्चेद्वारे मुद्दे उपस्थित करावे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. प्रभाकर विधाते :** स. स. श्री. अशफाक सलामी यांनी उपस्थित केलेला मुद्दा पृष्ठ क्र. ५१ वरील मुद्दा क्रं. १५ व १६ मध्ये जो भ्रष्टाचार दिसून येतो. त्यात कोणत्या गुत्तेदाराने व संबंधित अधिकारी कोण होते यांचा नावांचा उल्लेख नाही.

**मुख्य लेखा परिक्षक :** सदरील लेखा परिक्षण हा मुळ अहवालात नमुद केलेला असुन हा अहवा या पुर्वीचे मुख्य लेखा परिक्षक यांनी तयार केलेला आहे.

**श्री. संजय जोशी :** ज्यावेळी मुख्य लेखा परिक्षकांनी लेखा परिक्षण अहवाल तयार केला होता. तर एवढा विलंब लावण्याचे कारण काय ? स्थायी समितीसमोर भ्रष्टाचार झाल्याचे अहवालात नमुद का करण्यात आले. प्रशासनानेच कार्यवाही करावयास पाहिजे होते. या ठिकाणी सन १९९६-९७ या आर्थिक वर्षात लोकप्रतिनिधी अस्तीत्वात आहे. परंतु त्या पुर्वीच्या काळातील आम्ही लोकप्रतिनिधी कोणत्या कारणास्तव विचार करुन निर्णय देणार व त्यावर आपण काय कार्यवाही करणार ? सदरील अहवाल आमच्या माथी का आणता म्हणजे काही वाईट झाले तर त्या वेळेसच्या लोकप्रतिधिंनी केले असे दाखवायचे आहे का? हे दुर्दैव आमची बदनामी करण्यासाठी हा अहवाल आमच्यासमोर ठेवलेले आहे काय ? जेणे करुन नागरीक आम्हाला बोलतील की, तुमच्या काळात भ्रष्टाचार झाला तर तुम्ही काय करित होते. हे पाप आमच्या माथी का मारता. मागील अहवाल आता सादर केल्याने त्यावर निर्णय कोण घेणार अहवालास उशिर केल्याने याची जबाबदारी कोण घेणार याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** सन १९८९-९० ते १९९३ पर्यंत लोकप्रतीनिधीत्व असलेले लोकनियुक्त बॉडी असतांना मुख्य लेखा परिक्षक यांनी लेखा परिक्षण अहवाल त्याचवेळेस

स्थायी समितीसमोर सादर का केला नाही. त्यावेळेसचा लेखा परिक्षण अहवाल आजच्या घडिला का सादर होत आहे. यामागील काय पार्श्र्वभुमी आहे हे कळत नाही. वास्तविक पाहता दरवर्षीचा लेखा अहवाल हा त्याच क्षणी सादर होणे आवश्यक असावे. परंतु त्यावेळेसचे मुख्य लेखा परिक्षक यांनी तसे न केल्याने त्यांचे बाबतीत ते स्वत: जबाबदार समजुन शासनाकडे त्यांचे बाबतीत कळवावे.

**मुख्य लेखा परिक्षक :** सन १९९३-९४ लेखा अहवाल बाबत त्यावेळेसचे मुख्य लेखा परिक्षक यांनी अहवाल तयार करुन का सादर केले नाही. याची कल्पना मला नाही. परंतु ते त्यांचे कर्तव्य होते. सदरील वर्षीचा अहवाल त्यावेळेसचे मुख्य लेखा परिक्षकांनी प्रशासकाच्या कालावधीत सादर करावयास पाहिजे होतो व त्यानुसार संबंधित प्रशासक यांनी त्याचवेळेस मंजुरीच्या प्रसंगी अशा वेगवेगळया त्रृटया किंवा चुकांच्या संदर्भात ज्यांचे अनुपालन अहवाल अ प्राप्त होते. त्यांचे वर कार्यवाही करणे आवश्यक होते.

**श्री. संजय जोशी :** सन १९९१-९२ चा लेखा अहवाल झालेला नाही. वास्तिविक पाहता त्याचवेळेस आयुक्त असतांना याबाबत निर्णय घ्यावयास हवे होते ते केलेले नाही व आज मात्र एकत्रित अहवाल सादर होतो आहे. ही बाब प्रशासनाची अतिशय दुदैवी असुन या संदर्भात महाराष्ट्र शासनाकडे अशी प्रकरणे न पाठविता भारताचे राष्ट्रपती हे सर्वोच्च असल्यायने त्यांचेकडे अशा आय. ए. एस. अधिकारी वर्गाचे कामाचे बाबतीत प्रकरणे पडताळणीसाठी पाठवावे.

**श्री. म. रऊफ :** माझ्या माहितीप्रमाणे हा अहवाल सादर करित असतांना व तयार करतेवेळी प्रशासनावर दबाव टाकुन हा अहवाल तयार केलेला आहे असे दिसून येते.

**मा. आयुक्त :** मी सभागृहाला सांगु इच्छितो कि स १९८१-८२ ला ज्यावेळी महानगरपालिका अस्तित्वात आली. त्यावेळेस १९८२ ते १९८८ च्या या कालावधीपर्यंत प्रशासकांयनी कार्यभार पाहिलेला आहे. आणि त्यानंतर १९८८-८९ ते १९९२-९३ या कालावधीत लोकप्रतिनिधीत्व असलेले लोकनियुक्त बॉडी अस्तित्वात आलि. या कालावधीतील लेखा परिक्षण अहवाल हा नियमाप्रमाणे प्रत्येक वर्षी हा त्या-त्या वेळसच संबंधित मुख्य लेखा परिक्षक यांनी स्थायी समितीला सादर करणे आवश्यक होते. त्या कालावधीत सदरील अहवाल केलेला नाही. आणि त्यानंतरही सन ९३-९४ व ९४-९५ व ९५-९६ व ९६-९७ या कालावधीतील काही कालावधी प्रशासकाचा असतांनाही ते मिळुन सन १९९६-९७ पर्यंत या लोकप्रतिनिधीत्व असलेल्या कार्यकिर्दीतील कालावधीत पुर्णपणे करुन झालेल्या खर्चा संदर्भात स्थायी समितीला सादर केलेला आहे. त्यावर सभासदांनी विचारपुर्वक चर्चा करुन निर्णय घ्यावा. व उर्वरीत ९७-९८ चा लेखा परिक्षण अहवालही सध्याचे मुख्य लेखा परिक्षक यांनी तयार केलेल्या असुन तो सुध्दा येत्या आठ दिवसांत स्थायी समितीसमोर सादर करण्यात येईल. यासाठी की, दरवर्षी स्थायी समितीला अशा लेखा परिक्षण अहवाल वेळोवेळी सादर झाल्यास मुख्य लेखा परिक्षकांवर स. स्थायी समितीचे अंकुष राहते. कारण महानगरपालिकेवरील होत असलेल्या विविध कामांच्या खर्चाचे विवरणास त्याची तपशिलवार तपासणी करणेस कारणीभुत हे मुख्य लेखा परिक्षक असताता. व त्यांची ती संपुर्णरित्या जबाबदारी आहे. कारण आयुक्तांना पेक्षाही खर्चावर मर्यादा व नियंत्रणासाठी मुख्य लेखा परिक्षकांवर जास्त प्रमाणात जबाबदारी असते. व

तसे ते सुचना कळवु शकतात. कारण मुख्य लेखा परिक्षकांचे पद हे शासनाने बौध्दीकदृष्टया व तांत्रिकदृष्टया अधिक महत्त्वाचे मानुन त्यांना शासनातर्फे नियुक्ती केल्या जाते. मागील लेखा परिक्षण अहवाल वेळेवेळी का सादर आलेला नाही याची जबाबदारी त्याचवेळेसचे संबंधित अधिकारी यांची असुन आज याबाबत निर्णय घेऊन सर्वसाधारण सभेकडे जर शिफारसी केली तर अशा प्रकरणातबाबत लेखा परिक्षण अहवाल एवढया दाखल केल्याप्रकरणी शासनाकडे पाठविता येईल व तसा निर्णय घेतल्यास करणे शक्य होईल. गेल्या दहा वर्षापासुन महानगरपालिकेमंध्ये लेखा परिक्षण केलेले नाही. या बाबत प्रशासनाने आत्मपरिक्षण करावे की, लेखा परिक्षण अहवाल हा स्थायी समिती समोर नियमाप्रमाणे का सादर केलेला नाही. यासाठी स्थायी समितीने निर्णय घेतल्यास सर्वसाधारण सभेपूढे शिफारीस करुन शासनाकडे अशी प्रकरणे पाठविता येतील. परंतु त्या वेळेस या ठिकाणी जे-जे अधिकारी कार्यरत होते. त्यांच्या कालावधीतील प्रकरणांबाबत ते अधिकारी इतरत्र बदली होऊन गेलेले असल्यास त्याबाबत निर्णय शासन घेईल व कार्यवाही करेल.

**श्री. संजय जोशी :** लेखा परिक्षण अहवालात नमुद केल्याप्रमाणे जे अधिकारी इतरत्र बदलीने गेलेले असतील, त्यांचे बाबतीत शासनाकडे अहवाल पाठवावे व मागील कालावधीतील उशीरा लेखा परिक्षण केल्या प्रकरणी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रकरण महानगरपालिकेतर्फे मा. महापौर यांनी सादर करावे.

**श्री. विखारोद्दीन :** यावेळेसच्या मुख्य लेखा परिक्षकांनी ९६-९७ चा लेखा अहवाल प्रत्येक महिण्याला का सादर केला नाही. ज्यावेळेस पासुन ते या मनपात कार्यरत आहेत. तेव्हां पासुन ते आजपर्यंतचा अहवाल स्थायी समितीला दर महीण्याला का सादर केलेला नाही.

**श्री. अशफाक सलामी :** मागील कालावधीतील लेखा परिक्षण अहवाल हा त्यावेळेसचे प्रशासक/आयुक्त व मुख्य लेखा परिक्षक यांची असुन त्यांनी वेळीच अहवाल नियमाप्रमाणे सादर न करण्याचे कारण काय ? याबाबत शासनाकडे अहवाल पाठविले. तर सन १९९५ ते १९९६ -९७ पर्यंतच्या लेखा परिक्षण अहवालात नमुद केलेल्या काही बाबी ज्या प्रशासनाकडील खर्चाचे बाबतीत मुद्दे नमुद केलेले आहेत. त्यांचे अनुपालन अहवाल मागवावे व त्यानुसार कार्यवाही करावी. अशा प्रकारचे सादर करण्यात आलेले नाही.

**मुख्य लेखा परिक्षक :** या महानगरपालिकेत मी २२.९.९६ ला हजर झालो व गेल्या ३ वर्षापासुन कार्यरत आहे. त्यामुळे महानगरपालिकांमध्ये झालेल्या खर्चानुसार एकंदरीत रिसीट पाहुन पाहुन तपासणी केल्या जाते. व ते १००% झालेले आहे जकात बाबत त्यांनी वेळोवेळी फाडलेल्या पावत्या त्या - त्या मालावरील आयात व त्यांची टक्केवारी बरोबर आहे. किंवा नाही. मुळ किमतीच्या आधारे आहे काय याची तपासणी केल्या जाते. त्याचप्रमाणे लेखा विभागामार्फत वेळोवेळी जो खर्च केला जातो. विविध कामाचे संदर्भात त्या बाबतीत सविस्तर सचिका मागवून तपासणी करुनच कार्यवाही केल्या जाते. त्यामंध्ये इतर सर्व विभागांच्या समावेश असतो. संपूर्ण झालेल्या विवरण याबाबत पडताळणी करुन प्रशासन कार्यवाही करते. सन १९९७-९८ चा लेखा परिक्षण अहवाल मी एका आठवडयात सभागृहाला सादर करणार

आहे व साप्ताहिक अहवालसुध्दा मा. सभापती यांचेकडे वेळोवेळी देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होईल. त्याबाबत मा. सभापती यांनी स्थायी समिती समोर कधी ठेवावे हा निर्णय त्यांचा राहील. गेल्या ३६ महिण्यातील लेखा परिक्षण अहवाल मी पुर्णपणे केलेला आहे. व तो ऑक्टोंम्बर -९७ ला स्थायी समितीला सादर केलेला आहे. आता या बाबत सभागृहाने चर्चा करुन निर्णय घ्यावयाचा आहे. काही विभागांना अनुपालन अहवाल पत्राद्वारे कळविणेस सांगितले असता अनेकांचे अहवाल अप्राप्त आहेत. व वेळेवर दिलेली नाहीत.

**श्री. विखारोद्दीन :** कोणताही अहवाल ठेवतो. प्रशासक/आयुक्त किंवा सभापती ठेवतो याची माहिती द्यावी.

**श्री. अशफाक सलामी :** सन १९९६-९७ चा अहवाल त्याचवर्षी सादर न करता ९७ ला दाखल केले तर ९७-९८ चा अहवाल अद्याप अप्राप्त आहे तर ९८-९९ चा अहवाल कधी सादर करणार.

**मुख्य लेखा परिक्षक :** (मुंबई प्रांतिक /महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६/३ चा नियम संपुर्णपणे सभागृहात वाचुन दाखविला.)
सरकारी वर्ष माहे एप्रिल मध्ये सुरु होते. त्यानंतरच्या कालवधीत कधीही अहवाल संपर्ण सादर करता येऊ शकते.

**श्री. अशफाक सलामी :** मुख्य लेखा परिक्षक यांनी जो नियम वाचुन दाखविला त्याप्रमाणे कार्यवाही करुन निर्णय घ्यावा.

**मुख्य लेखा परिक्षक :** सन १९९७-९८ चा लेखा परिक्षण अहवाल तयार करीत असतांना संबंधित विभागाकडुन काही अपुपालन अहवाल अप्राप्त असतील तर त्यांच्याशी पत्र व्यवहार करुन अशी प्रकरणे निपटरा करण्यासाठी उत्तर आल्यास वगळता येतील व त्यांमुळे संबंधित वर्षाचा अहवाल एका आठवडयात सादर करण्यात येणार आहे. त्यांचेकडुन कार्यवाही करण्याचे मुद्दे होत नाहीत.

**श्री. विखारोद्दीन :** सन १९९७-९८ चा वार्षिक अहवाल का सादर केलला नाही ?

**मा. आयुक्त :** सन १९९७-९८ चा संपूर्ण लेखा अहवाल तयार करण्याचे काम मुख्य लेखा परिक्षकामार्फत चालु असुन तो नियमीतपणे स्थायी समितीला सादर करणार आहोत. या बाबत सध्याचे मुख्य लेखा परिक्षक अतिशय जागृत आहेत.

**श्री. प्रभाकर विधाते :** मालमत्ता विभागातील लेखा परिक्षण अहवाल सदंर्भात पृष्ठ क्र. २३ मध्ये नमुद केल्या प्रमाणे शहागंज येथिल भाजी मंडीतील दुकान क्र. ७४ हे कृषी विकास संस्थेच्या नावावर असुन या दुकानाची भाडे वसुली ऑक्टोंम्बर ७६ पासुन झालेली नाही. ऑक्टोंबर ७६ ते मार्च ९० या कालावधीतील थकित भाडे रुपये २४,०२४.०० इतके होते. या संदर्भात वसुलीची कार्यवाही का झाली नाही. याबाबतची कारणे स्पष्ट का नाहीत. सदरील दुकानाचा मालक सापडत नाही. या बाबत मालमत्ता अधिकारी यांनी तातडीने कार्यवाही का केली नाही.

**मालमत्ता अधिकारी :** सध्या सदरील दुकान बंद असुन संबंधित मालकाने बँकेकडे दुकान तारण ठेवलेले असुन त्यांनी लोन बँकेकडुन घेतल्याने व तो पुढे परत परत करीत नसल्याने बँकेने नोटीस पाठवून दुकानाला सिल ठोकली. याबाबतची संचिका सुरु असुन मा. आयुक्त यांची मंजुरी घेऊन कार्यवाही करण्यात येईल. व बँकेलाही विचारणा करता येईल.

**श्री. संजय जोशी :** केवढी दुर्दैवी बाब आहे महानगरपालिकाची संबंधित मालकाने महानगरपालिकाचे दुकान बँकेकडे तारण ठेवली आणि महानगरपालिका दुकान ताब्यात घेण्यासाठी संचिका मिळत नाही. ही बाब योग्य नाही.

**उपआयुक्त (म) :** कृषी विकास संस्थेस भाडे तत्त्वार दुकान मनपाने दिलेले आहे. या संस्थेकडे बँकेकडील कर्ज असल्याने त्यांनी संबंधित दुकानात ठेवलेला माल जप्त केला व त्यास सील लावले. या संदर्भात गेल्या ४-५ महिण्यापासून कार्यवाही चालु असून मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार संबंधित बँकेला विचारणा करुन त्या दूकानाचे सील काढण्यात येईल व दुकानही ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. म. अ. रऊफ :** संबंधित बँकेने मनपाला पत्र वगैरे दिलेले आहे काय ? मनपाचे दुकान असतांना बँकेने त्या मालकास कर्ज कसे मिळाले म्हणजे मनपाने दुकान मालकाची गॅरंटी घेतली काय ? व मनपाने N.O.C. दिलेली आहे काय ?

**सौ. राधाबाई तळेकर :** १० लाखाचे दोन मजली घर बांधले. घरांचे पूर्ण कागदपत्रे ठेवून बँक कर्ज देत नाही. परंतु मनपाच्या मालकीच्या दुकानांवर बँक कशी काय कर्ज देते व इतर बाबतीत बँक वेगवेगळया विचारणा करते. कर्ज वसुलीसाठी बँक सिल ठोकते. आपण मात्र काहीच करीत नाही.

**श्री. अशफाक सलामी :** गेल्या २४ वर्षापासून आपल्याला दुकान किरायादार मिळत नाही. या संदर्भात कार्यवाही करण्याचे प्रकरण कधी पासुन सुरु आहे.

**उपआयुक्त (म.) :** मा. आयुक्त यांच्या मंजुरीनंतर १५ दिवसापर्यंत बँकेकडे विचारणा करुन संबंधित मालकावरही कार्यवाही करणेत येईल. व नियमाप्रमाणे एप्रिल महिन्यात ही प्रकीया पूर्ण करण्यात येईल.

**मा. सभापती :** २० मिनीटासाठी सभा तहकुब करण्यात येते.
(वेळ २.३० वा. सभेला सुरुवात अंदाजे ३.०० वा.)
अ) वार्षिक लेखा परिक्षण अहवाल सन १९८३-८४ ते १९९०-९७ बाबत जे पृष्ठ क्रं. ३५ यांत्रिकी विभाग याबाबत चर्चा करावी.

**श्री. अशफाक सलामी :** सन १९८६-८७ या वर्षी यांत्रिकी विभागाकडुन रु. १६,६००/- किमंतीचे टायर्स चोरी प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यास जबाबदार धरुन कोणत्या वर्षापासुन कपात करण्यात येत आहे व ते कशा प्रकारे याची माहिती द्यावी.

**अति. शहर अभियंता :** सन १९९३-९४ अगोदर पासूनच संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारातुन कपात करण्यात येत आहे.

**मा. सभापती :** या बाबतचे नियम काय आहेत विधी सल्लागार यांनी माहिती द्यावी.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम ५६ अन्वये कर्मचाऱ्यांच्य पगारातुन पैसा वसुल करता येऊ शकते.

**आयुक्त :** सदरील मुद्दा सन १९८३-८४ मधील असुन टायर्स चोरी प्रकरणी कोण जबाबदार आहेत याची चौकशी करण्यात आली होती. श्री. अत्रे/दामोधरे या दोन कर्मचाऱ्यांना जबाबदार धरुन चौकशीच्या अधीन राहुन श्री. जी. बी. सोनी, अत्रे व दामोधरे यांच्य वरील निर्णयाचे चौकशीचे चौकशी करण्याचे संपूर्ण अधिकार स्थायी समितीला आहेत.

**श्री. स. अ. इकबालोधीन :** आयएसआय प्रमाणे संबंधित गुत्तेदाराने कार्यवाही केलेली आहे काय ? इंदिरानगर बायजीपुरा भागातील कामांचे बाबतीत गुत्तेदाराने केलेले कामाचे पाहणी करुनच नंतरच देयक अदा करावि.

**श्री. संजय जोशी :** अग्निशामन विभागाकडे जो कर्मचारी कामावर होता तो वर्ग-४ मध्ये आहे की वर्ग -३ मध्ये आहे.

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** संबंधित अधिकारी हा वर्ग -४ मध्ये येतो या संबंधात मुख्य लेखाधिकारी व उपआयुक्त यांच्या स्वाक्षरी ने १९९२ ला मंजुरी झालेली आहे.

**मुख्य लेखा परिक्षक :** संबंधिताचा पगार/पत्रक व संबंधित संचिका पाहुन निर्णय घेता येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** पृष्ठ क्र. ७ मध्ये रु. ३५,१८७ वसुल करावे परंतु ते कोणत्या वर्षापासुन आहे. त्याचा तपशिल द्यावा. व संबंधितांकडुन वसुंलीची कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. मा. आयुक्तांनी याबाबत कडक कार्यवाही करावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** पृष्ठ क्र. ३६ बाबत जी काही औषधीची खरेदी केलेली आहे ती बरोबर असुन लेखा परिक्षण विभागास आम्ही कळविलेले आहे. यास आम्ही जबाबदार नाही.

**मुख्य लेखा परिक्षक :** याबाबत विभागास उत्तर न मिळाल्याने काहीही करता आलेले नाही.

**मा. सभापती :** पुन्हा तपशिलावर पाहणी करुन कार्यवाही व्हावी.

**उप अभियंता विद्युत-१ :** आमच्या विभागाने १०० टयुबची खरेदी केलेल्या आहेत. परंतु त्या डायरेक्ट नोंदी घेतलेल्या नाहीत २५-२५ च्या चार वेळेस नोंदी घेतलेल्या आहेत.

**मुख्य लेखा परिक्षक :** तशा नोंदी या विभागास दाखवण्यात.

**मा. सभापती :** आरोग्य विभागाबाबत व विद्युत विभागाबाबत पुन्हा उत्तर मागवुन कार्यवाही व्हावी. तसेच गरवारे संदर्भीत मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी. तर शहागंज येथील शॉपिंग सेंटर च्या संचिका गायब झाल्या प्रकरणी संबंधितावर कडक कार्यवाही मा. आयुक्त यांनी करावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** पृष्ठ क्रं. १४ मध्ये जकात बाबत अ. क्र. ५,६ व ७ मध्ये जकात कारकुनाला नियमावली दिली का?

**उप आयुक्त (म.) :** या बाबत संबंधित विभागाला सर्व नियमावलीचे अध्ययन करण्यात येते. त्यामुळे संबंधिताच्याकडुन सर्व थकीत वसुली तातडीने वसुल करावे. त्याचप्रमाणे लॅब इन्स्ट्रमेंट बाबत स्थळ पाहणी करुन जास्तीची रक्कम वसुली केली किंवा कसे याबाबत पाहणी करुन वसुली करण्यात येणार आहे.

**मा. सभापती :** सन १९८३-८४ ते १९९३-९४/९५ पर्यंतचा अहवाल लेखा परिक्षण करुन सादर करण्यात आला व सन १९९६-९७ चा अहवाल चालु वर्षात सादर झाला. या बाबतीत मा. आयुक्त यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानुसार स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी.

**ठराव :**

लेखा परिक्षण अहवाल (१) सन १९८३ -८४ ते ९०-९१ (२) सन १९९१-९२ ते ९३-९४, (३) सन ९६-९७ या तिन्ही अहवालावर वरीलप्रमाणे परिक्षक यांनी तिन्ही अहवालातील महत्त्वाच्या मुद्यावर कार्यवाही झालेली प्रकरणे व कार्यवाही न झालेली प्रकरणे या बाबत जी स्वतंत्र्य टिपणी सादर केली त्यातील सर्व मुद्यावर मा. आयुक्त व प्रशासन यांनी उचित कार्यवाही करुन त्याबाबतचे संपूर्ण अनुपालन झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल स्थायी

समितीला सादर करावा या व्यतिरिक्त मुळ लेखा परिक्षण अहवालातील शिल्लक मुद्यांचा आढावा घेऊन त्याबाबतीचे अनुपाल करण्यात यावे. वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देवुन सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २६.३.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक २६.३.९९ रोजी मा. सभापती श्री. जयवंत (बंडु) ओक यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात दुपारी ४.०० ऐवजी ४.४५ वाजता "वंदेमातरम्" या गीताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. गौतम लांडगे | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. म. अ. रऊफ म. अ. माबुद | --//-- |
| ३. | स. स. श्री. अलि मिरा सलामी | --//-- |
| ४. | स. स. श्री. संजय जोशी | --//-- |
| ५. | स. स. श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | --//-- |
| ६. | स. स. श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ७. | स. स. श्री. ढगे नरसिंग मुरलिधर | --//-- |
| ८. | स. स. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ९. | स. स. श्री. किशोर तुळशीबागवाले | --//-- |
| १०. | स. स. श्री. विखारोधीन पि. खुदबोधीन | --//-- |
| ११. | स. स. श्री. स. अ. एकबालाधीन स. म. कुतुबोधीन | --//-- |

**संवाद :**

**मुख्य लेखा परिक्षक :** सन १९९७-९८ लेखा परिक्षण अहवाल आज सभेत सादर करीत आहेत. (मुख्य लेखा परिक्षक यांनी मा. सभापती स्थायी समिती यांना अहवाल सादर केला.)

**श्री. संजय जोशी :** माजी महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या मातोश्री मानकोर भ्र. बि. करमसिंग ओबेरॉय यांचे दु:खद निधन झाले. त्याबद्दल सभागृहात त्यांना ०२ मिनिटे श्रध्दांजलि अर्पण करण्यांत यावी.

**मा. सभापती :** ठीक आहे. माजी महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या मातोश्री श्रीमती मानकोर भ्र. बि. करमसिंग ओबेरॉय यांचे दु:खद निधनाबद्दल सर्वानी ०२ मिनिटे स्तब्ध उभु राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.
(याचवेळी सभागृहात ०२ मिनीटे सर्वजण स्तब्ध उभु राहुन स्व. श्रीमती मानकोर भ्र. बि. करमसिंग ओबेरॉय यांना श्रध्दांजलि अर्पण करण्यांत आली.)

**श्री. म. अ. रऊफ :** माझ्या वार्डातील एका जागेच्या प्रकरणांबाबत बाबा फर्जन नामक व्यक्तीला उपआयुक्त यांनी सुनावणीसाठी बोलवण्यात आले होते त्या अनुषंगाने विधी सल्लागार यांनी पत्र दिले. सकाळी ११.०० वाजेची वेळ दिलेली होती. या प्रकरणात मी वेळेवर आलो परंतु संबंधित व्यक्तीला उपआयुक्त न आल्याने सुनावणीसाठी पुढील तारीख परस्पर वाढवुन दिली. मला मात्र वाढीव तारखेची देखील माहिती देण्यांत आली नाही. दिलेल्या वेळेच्या पूर्वीच तारीख वाढवुन देणे योग्य नाही. याचा अर्थ असा होतो की,

अधिकारी पैसे घेऊन तारखा बदलवितात कार्टाचे स्टे वॅकेट होत नाहीत याबाबतचा सविस्तर खुलासा करण्यांत यावा.

**मा. सभापती :** विधी सल्लागार यांनी स. सदस्यांना याबाबत माहिती द्यावयास पाहिजे सुनावणी ठेवुन हजर न राहणे हे योग्य नाही.

**श्री. संजय जोशी :** स. स. श्री. रऊफ यांच्या वार्डातील हे प्रकरण दोन वर्षापासुन कोर्टाचा स्थगिती आदेश झालेला असुन आपल्या महानगरपालिकेच्या विधी सल्लागार व संबंधित वकील यांच्याकडुन साधा स्थगिती आदेश उठवण्यात येत नाही. संबंधित स. सदस्य यांना कमीत कमी या सुनावणी प्रकरणांत उपआयुक्त यांनी उपस्थित राहावयाचे नव्हते तर फोन करवुन कळवावयास पाहिजे होते.

**मा. सभापती :** उपआयुक्त (म.) यांनी या प्रकरणांत काय तात्काळ कार्यवाही करता येईल ती करावी. उपआयुक्त (प्र.) हे परवानगी घेऊन सुट्टीवर गेलेले आहे ते आल्यावर कार्यवाही होईल.

**श्री. म. अ. रऊफ :** या प्रकरणांच्या बाबतीत २-३ वर्षापासुन न्यायालयाचा स्थगिती आदेश आहेत. महापालिकेचे विधी सल्लागार व संबंधित महापालिकेचे वकील यांच्याकडुन साधा स्थगती आदेश वॅकेट होत नाही.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) हे येत्या ३० तारखेला कार्यालयात येतील ते आल्यानंतर उपआयुक्त (म.) यांनी त्यांच्या समवेत चर्चा करुन संबंधित व्यक्तीला चर्चा करण्यासाठी बोलविण्यांत यावे. त्याचप्रमाणे स. स. श्री. रऊफ यांना कळविण्यात येऊन निर्णय घेण्यांत यावा.

**श्री. विखारोधीन :** कोणत्या कामाच्या संदर्भात सुनावणीसाठी बोलवण्यात आलेले होते. या बाबत सविस्तर माहिती सभागृहात सांगावी जेणे करुन सभागृहाला त्या बाबतची माहिती कळेल.

**मा. सभापती :** एका नाला ट्रेडिंग संबंधित वादग्रस्त प्रकरणे आहे. त्या बाबत चर्चा करण्यासाठी बोलविण्यांत आलेले होते.

**श्री. विकास जैन :** उपआयुक्त (प्र.) यांच्या कडुन माहिती घेऊन उपआयुक्त (म.) यांनी या संबंधात कार्यवाही करावी.

**श्री. सय्यद अली मिरा सलामी :** गेल्या दोन वर्षापासुन एका शाळेच्या इमारती तसेच एक बहुउद्देशीय हॉल होण्याबाबतचे प्रपोजल आहे. त्या संदर्भात नकाशे घेतलेले आहे. किंवा ? संबंधित अधिकारी यांना विचारणा करण्यांत यावी की, या बाबतचे काम कुठपर्यंत आलेले आहे.

**शहर अभियंता :** सादिया मार्केट येथील व्यापारी संकुलनाचे संपुर्ण काम पुर्णतः झालेले आहे. त्याच बरोबर शाळा इमारत तसेच बहुउद्देशीय हॉल लवकरच करण्याची कार्यवाही करण्यात येईल. येथील बांधकामाचे नकाशे मागविले असुन दुसऱ्या प्रकरणात मालमत्ता विभागाचा वाद सुरु आहे. त्यामुळे प्रकरण थांबलेले आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** सादीया मार्केट जवळील महापालिकेच्या जागेवर शौचालय बांधकामासाठी जागा असुन त्या ठिकाणी लॉटरीचे दुकान उघडण्यात आलेले आहे. संबंधित लॉटरी धारक म.न.पा. ला मालमत्ता कर भरत आहे काय ? व ते दुकान स्थायीक केलेले आहे. ते नियमाने आहे काय या बाबतची माहिती मालमत्ता अधिकारी यांना विचारण्यांत यावी. तसेच शौचालय बांधकाम बाबत काय निर्णय घेतलेला आहे त्या जागेवर शौचालय

आहे असे संबंधित विभागात रेकॉर्ड आहे. याबाबतही सविस्तर खुलासा करण्यांत यावा.

**शहर अभियंता :** शौच्छालयाचे काम करण्यासाठी कार्यवाही करण्यांत येईल. परंतु अग्रवाल नामक व्यक्तीने न्यायालयात वाद सुरु केलेला आहे. त्यामुळे अडचण निर्माण होत आहे. शाळेच्या इमारती बाबतीत अंदाजपत्रक तयार आहे. सविस्तर माहिती घेऊन लवकरच कार्यवाही करण्यांत येईल.

**उपअभियंता (बां.) :** अंदाज पत्रक तयार केलेले असुन लेखा विभागात मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे.

**मा.सभापती :** लवकरात लवकर कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** कटकटगेट जवळील पाणी पुरवठया संदर्भात व मेन होलवर ढापे टाकण्या बाबतचा प्रस्ताव होता त्या बाबतची सविस्तर माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** संबंधित ठिकाणचे अंदाजपत्रक तयार झालेले असुन आता स्थायी समितीकडे मंजुरीसाठी गेलेले आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** अर्थ संकल्पात शहरातील वार्डातील ज्या ठिकाणी रींग ढापे टाकण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी तरतुद करण्यात आलेली होती. परंतु वर्षभरात कुठल्याही वार्डामध्ये ढापे टाकल्याचे दिसुन येत नाही. या बाबतच्या निविदा कधी काढण्यात आलेल्या आहेत तशी तारीख सांगावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** या बाबत निविदा दिलेल्या आहे. सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** रिंग ढापे टाकण्या बाबतची अल्प मुदतीची निविदा एकुण ३० लाखाची काढलेली आहे. तशी बातमी वृत्तपत्रात आलेली आहे. याबाबतची कार्यवाही गेल्या सहा महिण्यापासुन चालु आहे. टिळकरोड जवळील आजुबाजूच नालीमध्ये घाण टाकलेली आहे. नागरीकांना जाता येतांना वास येतो. सदर जागेवर ढापे टाकण्याची तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** महापालिकातील कर्मचारी पी. आर. खामगांवकर यांना किडणीचा आजार असुन त्यांनी पत्र देऊन कळविले आहे की, डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे औषधोपचारासाठी महापालिकेच्या सेवेत अल्यामुळे त्यांना नियमाने औपरेशनसाठी लागणारा सर्व खर्च शासनाच्या जी. आर. प्रमाणे आर्थिक मदत करता येईल. ती तात्काळ दयावी अशी मागणी केलेली आहे.

**श्री. विकास जैन :** श्री. पी. आर. खामगांवकर यांचे पत्र आले आहे. विभाग क्र. २ ला नोकरीला आहे. किडणीचा आजार आहे. शासनाच्या जी. आर. प्रमाणे वैद्यकीय खर्च देतो. त्यांना औषधोपचारासाठी लागलेला खर्चाचे बिल (पावती) त्यांनी एकुण १,४४,६१८/- रुपयाचे बिल दिलेले आहे. नियमाने किती रक्कम देता येते तशी कार्यवाही प्रशासनाने करावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** श्री. खामगांवकर यांना एकुण ४५ हजार अग्रीम रक्कम म्हणुन देण्यांत आलेली आहे. आतापर्यंत ८०% म्हणजेच ७१ हजार रु. देण्यांत आलेले आहे. नियमाप्रमाणे राहिलेली रक्कम देता येते किंवा कसे याबाबत तपासणी करुन योग्य कार्यवाही करण्यांत येईल.

**मा. सभापती :** श्री. पी. आर. खामगांवकर यांना किडणीचा आजार असुन तशी संबंधित डॉक्टरांनी त्यांना औषधोपचार व ऑपरेशनचा खर्चासाठी लागणारा पैसा महापालिकेचे कर्मचारी असल्याने शासनाच्या जी. आर. प्रमाणे अर्थीक मदत

म्हणुन नियमाप्रमाणे रक्कम देता येईल ती देण्याची कार्यवाही उपआयुक्त (महसुल) यांनी करावी.

**श्री. स. अ. इकबालोधीन :** अशाच प्रकारच्या व इतर रोगांनी पछाडलेल्या महापलिकेतील कर्मचारी यांनी औषधोपचारासाठी कर्मचारी या नात्याने आर्थीक कदम (रक्कम) मागविलेली आहे. महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे अशा प्रकरणांबाबत बऱ्याच कर्मचाऱ्यांच्या संचिका पडलेल्या आहे. त्या बाबतचा खुलासा अगोदर करावा. त्यांना आर्थिक मदत का देण्यांत आलेली नाही.

**मा. सभापती :** ज्यांनी ज्यांनी औषधोपचारासाठी य अगोदर आर्थिक मदत (रक्कम) मिळण्याची विनंती केलेली आहे. त्या सर्व कर्मचाऱ्यांना शासनाच्या जी. आर. प्रमाणे रक्कम देण्याची कार्यवाही संबंधित अधिकारी यांनी करावी. ज्या रोगाच्या उपचारासाठी आर्थीक मदत देण्यांत येत होती त्यानुसार डॉक्टराने दिलेल्या सल्लयानुसार सर्व कागदपत्रे तपासुन कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** जालना रेडवर सेंट फ्रान्सीस हायस्कुल समोरील अपनाबाजार जवळ दोन इमारती मध्ये असलेल्या रिकाम्या महापालिकेच्य जागेवर ६ दुकाने थाटली आहेत सदर दोन इमारतीमधील जागा ही पार्किंगसाठी ठेवण्यात आलेली होत एक दुकान ७ लक्षाची असुन रु. ४२ लक्ष किंमत होते. असे असतांना देखिल त्या जागेवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेले असुन सध्याही काम चालु आहे. हे काम अधिकारी यांच्या संगमताने होत आहे. असा माझा आरोप आहे. याबाबतचा सविस्तर खुलासा करावा.

**श्री. स. अ. मिरा सलामी :** महापलिकेच्या जागेवर संबंधित कुणी बांधकाम केलेले असेल तर तात्काळ पाडण्याची कार्यवाही करावी.

**श्री. गौतम लांडगे :** ज्यावेळी दोन्ही इमारती बांधकाम करण्याची परवानगी महापालिकेने दिलेली आहे. प्लॅन तयार करतांना पार्किसाठी जागा ठेवलेली होती. ज्यांनी अतिक्रमण करुन दुकाने केली आहे त्यांनी महापालिकेला शिफारस केलेली असेल त्या बाबतची कार्यवाही होऊ नये झालेले बांधकाम अतिक्रमणांत येत असेल तर नियमाने पाडण्यांत यावे.

**मा. सभापती :** स. स. श्री. तुळशीबागवाले यांनी अतिक्रमणाच्या बांधकाम बाबत उपस्थित केलेला प्रश्नासंदर्भात संबंधित अधिकारी यांनी बांधकामास परवानगी दिलेली असेल तर ती रद्द करण्यांत यावी. पार्कींगसाठी रस्ता ठेवलेला असतांना परवानगी देणे योग्य होणार नाही. याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी. सहाय्यक संचालक नगररचना व उपआयुक्त (म.) यांनी तसा अहवाल द्यावा.

**श्री. स. अ. इकबालोधीन :** महापलिकेच्या आरोग्य विभागात दवाखान्यामंध्ये एक डॉक्टर आहेत. दवाखान्यामंध्ये औषधोपचारासाठी कुणी नागरीक आल्यास त्यांना हे डॉक्टर खाजगी डॉक्टरांच्या दवाखान्यामध्ये औषधोपचारासाठी पाठवितात. हे योग्य आहे काय?

**श्री. संजय जोशी :** असे होत असेल तर महापालिकेचे सर्वच दवाखाने बंद करावेत. संबंधित अधिकारी यांना या डॉक्टरांवर नियमाने कडक कार्यवाही करावी.

**श्री. म. अ. इकबालोधीन :** संबंधित डॉक्टर श्री. आहेर यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावयास पाहिजे. कार्यवाही होत नाही. त्यामुळें एकाच विषयावर ४ ते ५

बैठकीमंध्ये माहिती विचारावी लागते. हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. दुसऱ्याच दवाखान्यात पत्र देतात त्या डॉक्टरांना तेथुन हटवावे.

**मा. सभापती :** महापालिकेच्या सेवेत असेलेले डॉ. आहेर हे महापालिकेच्या दवाखान्यात येणाऱ्या लोकांना त्यांच्या स्वत: च्या दवाखान्यात उपचारासाठी येण्याचा सल्ला देतात असे स. सदस्य श्री. स. अ. इकबालोधीन यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही बाब खरी असेल तर संबंधित अधिकारी यांची चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी अन्यथा त्यांची बदली इतर महापालिकेच्या दवाखान्यात करण्याची कार्यवाही आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी तात्काळ करण्यात यावी.

**श्री. विखारोधीन :** सिल्कमिल कॉलनी येथील दवाखान्याचे उद्‌घाटन पालकमंत्री यांनी नुकतेच केलेले असुन मागील बैठकीत येत्या २६ तारखेपर्यंत उर्वरीत काम पुर्ण करण्याचे आश्वासन दिलेले होते. तसेच दवाखान्यात एक्सरे मशीन देण्यात आलेली नाही.

**अति. शहर अभियंता :** सदर दवाखान्यात एक्सरे मशीन बाबत मा. आयुक्त साहेब यांनी चर्चा केलेली आहे. लवकरच तात्काळ कार्यवाही करण्यात येईल. तसेच उर्वरीत दवाखान्याचे राहिलेले काम करण्याचीही कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** हमालवाडी येथील कामासाठी पूढच्या बैठकीत १९९९-२००० च्या अर्थ संकल्पानुसार अंदाजपत्रक मंजुरीसाठी आणावे.

**श्री. स. अलि मिरा सलामी :** निराला बाजार समोरील रस्त्याच्या बाजुला फुटपाथचे जास्तीचे बांधकाम केलेले आहे. म्हणुन मागे एका बैठकीत चर्चा होऊन अतिक्रमण म्हणुन काढण्यांत आलेले होते. पुन्हा संबंधित दुकानधारक मुख्य रस्त्या पर्यंत फुटपाथ बांधकाम करत आहे. बांधकाम केल्यानंतर तोडण्यांत येत नाही. संबंधितांनी परवानगी कशाच्या आधारे देण्यांत आली खुलासा करावा. व तेथील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती दयावी. परवानगी दिलेली होती काय ?

**सहा. संचालक नगर रचना :** निराला बाजार येथील दुकान धारक करत असलेल्या बांधकाम करण्याची परवानगी दिलेली नाही. चौकशी करुन कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. गौतम लांडगे :** संबंधित दुकान धारक यांना या अगोदर कळविण्यांत येऊन अतिक्रमण झालेले पाडण्यात आलेले होत. पुन्हा त्यांनी फुटपाथवर जास्तीचे बांधकाम चालु केले चौकशी करुन तात्काळ काढण्याची कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** नियमाने किती फुट फुटपाथचे बांधकाम करता येते तशी संबंधित अधिकारी यांनी पाहणी करुन नियमाने काय कार्यवाही करता येईल ती तात्काळ करावी.

**श्री. स. अलि मिरा सलामी :** चुन्नीलाल आसाराम पेट्रोलपंपाजवळ रस्ता दुभाजक सोडण्यात आले. रस्ता दुभाजकाच्या समोर पेट्रोलपंप वर जाण्यासाठी रस्ता आहे का सोडण्यात आले ? याची माहिती द्यावी.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** शहागंज पेट्रोल पंपाजवळ ४ टपऱ्या संजयगांधी टपरी संघटनाच्या ४x६ आहे. ते १० फुट वाढलेले असुन नागरीकांना जाण्यायेण्यासाठी रस्ता नाही. संबंधितांवर कार्यवाही करावी.

**अति. शहर अभियंता :** चुन्नीलाल आसाराम पेट्रोलपंपाजवळ असलेल्या रस्ता दुभाजक पोलिस आयुक्त यांच्या विभागाच्या लेखी पत्रानुसार तोडण्यात आलेले आहे.

**श्री. स. अली मिरा सलामी :** अपघात होणार नाही त्यासाठी सदर पेट्रोलपंपाजवळ रस्ता दुभाजक तोडणे म्हणजे गैरमार्गाचा अवलंब केलेला आहे. दुभाजक टाकण्यात यावे जेणे करुन अपघात होणार नाही.

**श्री. गौतम लांडगे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर मधील इमारतीत खालच्या मजल्यालयामध्ये मॅट टाकण्या बाबतचे प्रपोजल झालेले आहे. मागील वर्षी ज्या ठेकेदाराने काम केलेले आहे. तेच ठेकेदार जर मागील दराप्रमाणे काम करण्यांस तयार आहे. इस्ट्रीमेट रुपये २,७०,०००/- चे मागील दरा प्रमाणे ते काम करण्यांस तयार आहेत त्यांनाच ते काम दयावे तसे आदेश संबंधित अधिकारी यांना देण्यात यावे वेळ कमी राहिलेला आहे त्यामुळे तातडीने कार्यवाही होईल.

**शहर अभियंता :** या बाबतचा निर्णय स्थायी समितीने घ्यावयास पाहिजे नंतर तशी कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर मधील इमारतीत खालच्या मजल्यामंध्ये मॅट टाकण्याबाबतचे कामासाठी जे पुर्वीचे ठेकेदार आहेत ते मागील दराप्रमाणे काम करत असेल तर तशी कार्यवाही मुख्य लेखा परिक्षक यांनी तपासणी करुन करावी.

**श्री. म. अ. रऊफ :** मौलाना आझाद रिसर्च सेंटर बाबतच्या कामाचे काय झाले माहिती द्यावी.

**मा. सभापती :** त्या कामाबाबतचा मा. महापौर यांनी स्वतः पाहणी केलेली आहे. त्यानंतर निर्णय घेण्यांत येईल.

**कार्यकारी अभियंता (बांध.) :** मौलाना आझाद रिसर्च सेंटरचे काम चालु आहे. लवकरच म्हणजे दिनांक ५.४.९९ रोजी पायाभरणीचा कार्यक्रम ठेवण्यांत येईल.

**मा. सभापती :** पाया उभारणीचा कार्यक्रम ५.४.९९ ला न ठेवता येत्या ३०.३.९९ रोजी ठेवण्यांत यावा सर्व पदाधिकारी यांना तसेच ठेकेदार, मा. महापौर, उपआयुक्त यांना सर्वांना बोलविण्यांत यावे.

**विषय क्र. ५८८/१ :**

दिनांक ६.३.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे

**संवाद :**

**श्री. म. अ. रऊफ :** पृष्ठ क्र. १९ वर ठराव क्रमांक ५३९, ५४०, ५४१, संदर्भात श्री. मिझ ा मुमताज बेग, श्री. जोंधळे, व श्री. शे. जहिर यांच्या अपिलावर चर्चा होऊन प्रस्ताव मंजुर देण्यांत आलेली होती. परंतु सदर अपिलावर प्रशासनाचे मत घेऊन पुढच्या बैठकीत निर्णय देण्यांत येईल असे आश्वासन दिलेले होते. त्या बाबतचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** वरील तिन्ही कर्मचाऱ्यांची घडलेली प्रकरणे व इतर बाबतीतला खुलासा प्रशासनाच्या माध्यमातुन संबंधित अधिकारी यांनी करावा.

**श्री. स. अलि मिरा सलामी :** किती कर्मचाऱ्यांना निलंबनाची कार्यवाही होऊन पुन्हा कामावर घेण्यात आले. किती कर्मचाऱ्यांना घेण्यात आलेले नाही. याचीही सविस्तर माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म.) :** सहाय्यक आयुक्त -१ यांनीवरील तीन कर्मचाऱ्या बाबतची सविस्तर माहिती सभागृहाला वाचुन दाखवावी.

**सहा. आयुक्त :** (वरील तीनही कर्मचाऱ्यांच्या निलंबनाबाबतची माहिती वाचुन दाखवतात.)

**श्री. स. अ. इकबालोधीन :** श्री. जोंधळे यांनी कोणता गुन्हा केला होता म्हणुन प्रशासनाने निलंबनाची कार्यवाही केलेली होती.

**मा. सभापती :** स. सदस्य यांनी इतर बाबीवर चर्चा न करता सदर कर्मचाऱ्यांना कामावर घ्यावयाचे की नाही याबाबतचा निर्णया घ्यावा.

**श्री. गौतम लांडगे :** मागील बैठकीत वरील तीनही कर्मचाऱ्यांनाी अपील स्थायी समिती समोर ठेवल्यानंतर सभागृहाने मंजुरी देण्याबाबतचा निर्णय घेतला होता. परंतु ज्यावेळी सदर अपीलावर घेतलेला निर्णय व त्याबाबतचा ठराव म्हणुन इतिवृत्त कन्फरमेंशन (कायम) साठी येते. त्यावेळी सभागृहाने प्रशासनाचे मत मागविण्याचे ठरले. ऐनवेळी सभागृहात न्यायालयाच्या आदेश वाचण्यात येत आहे. सभागृहाने असा निर्णय घ्याया की, त्यांना कामावर घेणेस हरकत नसावि परंतु त्यात खालील बाबी नमुद करण्यात.

१) ज्या कर्मचाऱ्यांनी महापालिकेच्या उत्पन्नातुन येणारा पैसा वापरला, अपहार केला त्या कर्मचाऱ्याला त्याच विभागामंध्ये न ठेवता दुसऱ्या विभागात त्यांची बदली करावी व त्याला कामावर घेण्यात यावे. त्याची वेतनवाढ रोखण्यात येऊ नये.

२) श्री. मुमताज अली बेग यांची नियुक्ती ६.२.९० ला "वरिष्ठ लिपिक" म्हणुन महापालिका प्रशासनाने केलेली आहे. ते तडवी या अनुसुचित जातीच्या दाखल्यानुसार राखीव वर्ग म्हणुन नोकरीला लागलेले आहेत तडवी जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी शासकीय माध्यमातुन झालेली आहे. त्यांचे "तडवी " जातीचे प्रमाणपत्र रद्दबातल ठरविलेले आहे. म्हणुन महापलिका प्रशासनाने त्यांना कामावरुन कमी केलेले आहे. व सदरील प्रकरण कोर्टात दाखल झालेले आहे. वरील सर्व बाब बाजुला ठेवुन ते ज्या वेळेस शासकीय सेवेत आले त्यावेळेसचा व आताचा विचार करता त्यांची सेवा ही बरीच दिवस झालेली असुन त्यांचे इतर शासकीय नौकरीसाठी वयोमर्यादा राहिलेली नाही. त्या करीता त्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार स्थायी समितीने निर्णय घ्यावा असे उल्लेखित केले आहे. त्यानुसार ते दोन वर्षापासुन त्यांच्या दोन वर्षाचा गेलेला सेवाकाळ धरण्यांत येऊ नये. तसेच त्यांना यापुढे महापालिका सेवेत घेतल्यानंतर प्रशासनाने त्यांनी मिळविलेल्या तडवी जातीच्या प्रमाणपत्रावर त्यांना कोणत्याही प्रकारची सवलत यापुढे देण्यांत येऊ नये.

३) श्री. जोंधळे यांना ही कामावर घेण्यात यावे. यापुढे ज्या-ज्या वेळेस प्रशासनाने एखाद्या कर्मचाऱ्यांव निलंबनाची कार्यवाही केलेली असेल व स्थायी समितीने अपीलाद्वारे त्यांना नौकरीवर घेण्याचे ठरवावयाचे असेल त्यावेळी प्रशासनाचे योग्य मत घेऊनच निर्णय घेण्यात यावे. कुण्याही कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने अन्याय होणार नाही असे मत मांडावे.

**मा. सभापती** : निलंबन कार्यवाही मागे घेण्याबाबत वेगळे अपील करावे लागेल. त्यात मा. आयुक्त यांनी निर्णय घेतल्यानंतर स्थायी समितीने कार्यवाही करावयाचे असते. परंतु कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता स्थायी समितीमध्ये असे निर्णय होत आहे. १) श्री. बेग व श्री जोंधळे, श्री. शेख जहिर अहेमद यांना कामावर घेण्यांत यावे. ज्या कर्मचाऱ्यांनी प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी

मिळालेली आहे त्यांना यापुढे त्यानुसार सवलत प्रशासनाने देऊ नये. व त्यांचा दोन वर्षाचा सेवाकाळ धरण्यांत येऊ नये. असाधारण रजा समजावी.

**श्री. गौतम लांडगे :** इतिवृत्तातील पान क्र. २४ वर ज्याप्रमाणे वाहन चालकांना ३०% प्रमाणे ज्येष्ठ वाहन चालक म्हणुन पदनाम देऊन वाढीव वेतन श्रेणीचा ठराव ठेवला आहे, त्याच धर्तीवर वर्ग ४ चे कर्मचाऱ्यांना पण वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव य बैठकीत ठेवण्याबाबत आश्वासन दिले होते. तसा प्रस्ताव विषयपत्रिकेत आलेला नाही. याबाबतची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** मागील बैठकीत या विषयावर चर्चा होऊन प्रशासनाने या बैठकीत प्रस्ताव आणण्या बाबत आश्वासन दिले होते. संबंधित अधिकारी यांनी येत्या स्थायी समितीच्या बैठकीत वर्ग -४ च्या कर्मचाऱ्यांना वाढीव वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव ठेवावा. तसेच ठराव क्र. ५६०/१४ मध्ये वाहन चालक यांना "दिनांक ९.६.९४ पासुन "जेष्ठ वाहन चालक" हे पदनाम देण्यात व वाढीव वेतनश्रेणी रु. १४००-२३०० लागु करण्यात येते" अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**श्री. रविंद्र इंगळे :** सांस्कृतीक अधिकारी, क्रिडा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी यांच्या संदर्भात ऑक्टोंबर ९७ मध्ये वेतनवाढी बाबतचा प्रस्ताव मंजुर करुन पाठवलेला आहे. अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. दीड वर्ष झालेले आहे. वेतनवाढ प्रस्ताव मंजुरीसाठी आलेला नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी वरील तीन अधिकाऱ्यांच्या संदर्भात तात्काळ कार्यवाही करावी.

**ठराव :**

स्थायी समिती सभा दिनांक ६.३.९९ चे इतिवृत्तातील १) ठराव क्र. ५६०/१४ अन्वये मंजुर झालेल्या ठरावात "दिनांक ९.६.९४ पासुन "जेष्ठ वाहन चालक" हे पदनाम व वाढीव वेतनश्रेणी रु. १४०० ते २३०० लागु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते" अशी दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वरील प्रमाणे दुरुस्तीसह व इतर दुरुस्त्यासह दिनांक ६.३.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८९/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. जयनगर येथे अंतर्गत खेळाकरीता टेबल टेनिस हॉल बांधण्यासाठी सा. बा. विभागाचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ६,३२,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ११.९.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने विषय क्र. २५७/११ दि. ९.१०.९८ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/९४/९८ दि. २.१२.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १५ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एन. जी. सिंगतमकर | २१.२१% | कमी |
| २. | कुलवंतसिंग | १४.४०% | कमी |
| ३. | सय्यद अथर अली | १८.८७% | कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | एम. एम. काझी | १८.१८% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा २१.२१% कमी दराची श्री. एन. जी. सिंगतमकर यांचे प्राप्त झालेले आहेत. त्यास मा. आयुक्त महोदय यांची दि. १२.२.९९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार श्री. एन. जी. सिंगतमकर यांची अं. प. दरापेक्षा २१.२१% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जयनगर येथे अंतर्गत खेळाकरीता टेबल टेनिस हॅाल बांधण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २१.२१% कमी दराची श्री. एन. जी. सिंगतमकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९०/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा येथे रुंदीकरणाकरीता खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सा. बां. खात्याच्या डी. एस. आर. दराने रक्कम रु. ३,२१,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी समिती सभेत मंजुरी दिली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेस (१९) एकोणावीस निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (८) आठ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अशोक जाधव | ४०.८५ % | कमी |
| २. | मे. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | ४०.३५ % | कमी |
| ३. | मे. आकाश कन्स्ट्रक्शन | ३६.३७ % | कमी |
| ४. | मे. अकाल कन्स्ट्रक्शन | ३४.०० % | कमी |
| ५. | मे. मोना कन्स्ट्रक्शन | ३३.९९ % | कमी |
| ६. | मे. सुखबीरसिंग | २८.०० % | कमी |
| ७. | एस. एम. मंडोरे | २७.२७ % | कमी |
| ८. | श्री. स. मौज उल | २२.०० % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४०.८५% कमी दराची श्री. अशोक जाधव यांची निविदा आहे. करीता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा येथे रुंदीकरणाकरीता खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनातम्कदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४०.८५% कमी दराची श्री. अशोक जाधव यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९१/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, श्रेय नगर ते सहकारनगर या रस्त्यावर ह्युम पाईप कल्व्हर्ट बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु.

४,१६,५१९/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण एकवीस कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्तनिविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार घोडेले | ५% | जास्त |
| २. | श्री. एस. एम. मंडोरे | ७% | जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. नंदकुमार घोडेले यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया कमी व अं. प. दरापेक्षा ५% जास्त आहेत. तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रेयनगर ते सहकारनगर या रस्त्यावर ह्युम पाईप कल्व्हर्ट बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं. प. दरापेक्षा ५% जास्त दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९२/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील स. न. २०/१ जमिनिमधुन जाणारा १५.०० विकास योजना रस्त्याचे खडीकरण व साईड ड्रेन बांधणेच्या कामासाठी तया करण्यात आलेल्या र. रु. ७,३५,४९६/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदा विक्री च्या अंतिम तारखेपर्यंत एकुण एकवीस (२१) कोरी निविदात्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पैकी फक्त (३) तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार घोडेले | ५% |
| २. | आकाश कन्स्ट्रक्शन | ७.८६% |
| ३. | मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | १५.५५% |

वरील प्रमाणे निविदापत्रके प्राप्त झाली आहेत. परंतु मा. आयुक्त यांच्य दालनात दि. १६.३.९९ रोजी रोजी झालेल्या वाटाघाटीमध्ये वरील कामास अंदाजपत्रकीय दराने मान्यता दिलेली आहे. तरी श्री. नंदकूमार घोडेले यांच्याकडुन उक्त काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील स. नं. २०/१ जमिनीमधुन जाणारा १५.०० विकास योजना रस्त्याचे खडीकरण व साईड ड्रेन बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. नंदकुमार घोडेले यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानूमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९३/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, देवानगरी ते प्रतापनगर स्मशानभुमीपर्यंत व नाल्यावर पाईप कल्व्हट बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. १३,२८,५६३/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२८) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृती च्या अंतिम तारखेपर्यंत त्यापैकी फक्त (९) नऊ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रविण पवार | ४२.५०% | कमी |
| २. | श्री. एन. बी. धोतीकर | ४०% | कमी |
| ३. | आंनद बिल्डर्स | | |
| ४. | सोहेल सिध्दीकी | | |
| ५. | फाईव्हस्टार कन्स्ट्रक्शन | | |
| ६. | राजासिंगे | | |
| ७. | एस. एम. मंडोरे | २७.२७% | कमी |
| ८. | अब्दुल सलाम | २१.९१% | कमी |
| ९. | श्री. शेख रईस | १७.९०% | कमी |

वरील प्राप्त निविदापैकी श्री प्रविण पवार यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४२.५०% कमी दराचे आहेत. करीता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तात दर्शविल्याप्रमाणे देवानगरी ते प्रतापनगर स्मशानभुमीतपर्यंत व नाल्यावर पाईप कल्व्हर्ट बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ४२.५०% कमी दराची श्री. प्रविण पवार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९४/७ :**

पाणी पुरवठा विभागासाठी जलवाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईन्टस आणि जिफि जॉईन्टस खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ६,४६,५००/- चे तयार करण्यांत आलेले असुन सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. सदरीलक कामावर होणारा खर्च सन १९९८-९९ या वर्षातील लेखाशिर्षक पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती मधुन करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र. रु. ६,४६,५००/- चे मंजुरीबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागासाठी जलवाहिनीच्या देखभाल व दुरुस्ती साठी मेकॅनिकल जॉईन्टस आणि जिफि जॉईन्टस खेरदी करण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. ६,४६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९५/८ :**

टाऊन सेंटर सिडको सेक्टर सी-१ येथे १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. १,१६,२००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन

१९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले असुन या कामावर होणारा खर्च हा सन ९८-९९ च्या लेखाशिर्षकातील तरतुद पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदर कामांस प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

तरी टाऊन सेंटर सी-१ सिडको येथे १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेचे अंदाजपत्रक र. रु. १,१६,२००/- चे मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन सेंटर सिडको सी-१ येथे १०० मी.मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,१६,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९६/९ :**

उपआयुक्त (प्र.) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अंतर्गत प्राणि संग्रहालय सन १९९९-२००० या एका वित्तीय वर्षाकरीता बीफ, (खन्नी ), ल्युसर्नघास, शाळु बाटुक, शाळु कडबा, मासोळी, भाजीपाला, ब्रेड, ऊस, पशुपक्षी खाद्य, फळफळावळ व किराणा पदार्थ यांच्या निविदा मागविण्यांत आल्या आहेत. प्राप्त निविदांपैकी निविदा धारकांचे नांव व त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

**१) बीफ (खन्नी) :-**

बीफ करीता (३) कोऱ्या निविदाची विक्री झाली. पैकी (२) निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या.

| **निविदाधारकांचे नांव** | **बीफ खन्नी दर प्र. किलो (रु. पै)** |
|---|---|
| १) श्री. मुसा अ. करिम | ३२.०० |
| २) श्री. फिरोशखान अ. रहेमान खान | २४.०० |

तुलनात्मकदृष्टीने श्री. फिरोजखान अ. रहेमान खान यांचे बीफ खन्नीचे दर प्रतीकिलो रु. २४.०० निविदेमध्ये दर्शविलेले आहे. मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर श्री. फिरोजखान अ. रहेमान खान यांनी बीफ खन्नीचे दर रु . २०.०० प्र. किलो प्रमाणे पुरवठा करण्यास तयार असल्यामुळे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**२) मासोळी :-**

मासोळी करीता एका कोऱ्या निविदापत्रकाची विक्री झाली असुन निविदा पुरवठा धारकाकडुन प्राप्त झाली. त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. श्री. मुमताज अहमद | (प्रति किलो दर रु. पै.) |
| कतला | ६१.५० |
| राहु | ६१.५० |
| मिरगळ | ६१.५० |

तुलनात्मकदृष्टीने एकच निविदा प्राप्त झाल्याने मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर श्री. मुमताज अहेमद यांचे मासोळीचे दर रु. ५७.५० प्रति किलो प्रमाणे पुरठा करण्यांस तयार असल्यामुळे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**३) ल्युसर्न घास :-**

या करिता (३) कोऱ्या निविदापत्रकाची विक्री झाली असुन तीन निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| निविदाधारकांचे नांव | प्रति किलो दर (रु. पै.) |
|---|---|
| १. श्री. इसाक शे. फकीर | २.०० |
| २. श्री. जनार्दन कोंडाजी शेळके | १.८५ |
| ३. श्री. संतराम बंडुजी नवपुते | १.८० |

तुलनात्मकदृष्टीने श्री. संतराम बंडुजी नवपुते, चिकलठाणा, औरंगाबाद यांचे ल्युसर्न घासाचे दर प्रतिकिलो रु. १.८० कमी दराची निविदा मान्य करण्यास हरकत नाही. मंजुरीस्तव सादर.

**४) शाळु कडबा व बाटुक :-**

या करिता (२) कोऱ्या निविदापत्रकांची विक्री झाली असुन २ निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्य आहेत. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| निविदाधारकांचे नांव | शाळु कडबा | शाळु बाटुक |
|---|---|---|
| १. श्री. शेख रशिद शे. शहाबुद्दीन | ५३५०.०० | ५६००.०० |
| २. श्री. जनार्दन कोंडाजी शेळके | ५१५०.०० | ५४३०.०० |

तुलनात्मकदृष्टीने श्री. जनार्दन कोंडाजी शेळके यांचे शाळु कडबा व शाळु बाटुक यांचे दर अनुक्रमे रु. ५१५०/- व रु. ५४३०/- आहेत. मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर श्री. जनार्दन कोंडाजी शेळके यांची शाळु कडबा प्रति टन रु. ४१५०/- व शाळु बाटुक प्रति टन रु. ५०००/- प्रमाणे पुरवठा करण्यांस तयार असल्यामुळे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**५) ब्रेड :-**

या करीता (२) कोऱ्या निविदापत्रकांची विक्री झाली असुन २ निविदा पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाल्या आहेत. त्यांचे दर पुढील प्रमाणे आहेत.

| **निविदाधारकांचे नांव** | **२०० ग्रॅ. पुडा प्रति पुडा रु. पै.** | **२५० ग्रॅ. पुडा प्रति पुडा रु. पै.** |
|---|---|---|
| १. मे. सवेरा बेकरी, औरंगाबाद | ४.०० | ५.०० |
| २. एलोरा बेकरी, औरंगाबाद | ३.८० | ४.५० |

तुलनात्मकदृष्टीने एलोरा बेकरी, औरंगाबाद यांचे दर ब्रेडसाठी (२०० ग्रॅम रु. ३.८० व २५० ग्रॅम करीता रु. ४.५० ) सर्वात कमी आहेत. मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर एलोरा बेकरी, औरंगाबाद - २०० ग्रॅम ब्रेडसाठी रु. ३.४० आणि २५० ग्रॅमसाठी रु. ४.०० प्रमाणे पुरवठा करण्यांस तयार असल्याने प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**६) ऊस :-**

या करीता (२) कोऱ्या निविदापत्रकांची विक्री झाली असुन एक निविदा पुरवठाधारकांकडुन प्राप्त झाली असुन त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

१. श्री. जनार्दन कोंडाजी शेळके रु. १२७०.०० प्रतिटन

तुलनात्मकदृष्टीने (१) निविदा प्राप्त झाल्याने मा. आयुक्त यांचेशी झालेल्या समक्ष चर्चेनंतर श्री. जनार्दन कोंडाजी शेळके यांचे ऊस प्रतिटन र. १२००/- प्रमाणे पुरवठा करण्यांस तयार असल्यामूळे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**७) भाजीपाला व फळफळावळ :-**

या करीता एका कोऱ्या निविदेची विक्री झाली. व ती पुरवठा धारकांकडुन प्राप्त झाली. त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | निविदाधारकाचे नांव | मालाचा तपशिल | निविदेतील दर प्रति किलो | मा. आयुक्त यांचेशी चर्चे नंतर कमी केलेले दर |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर पवार | केळी | १२.०० | १०.८० |
| | | मोसंबी | २३.०० | २०.७० |
| | | चिकु | २५.०० | २२.५० |
| | | पिकलेले टोमॅटो | १३.०० | ११.७० |
| | | काकडी, खीरे | १७.०० | १५.३० |
| | | गाजर | १०.०० | ९.०० |

तुलनात्मकदृष्टीने एकच निविदा प्राप्त झाल्याने मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर १०% कमी दराने श्री. प्रभाकर पवार यांनी वरील प्रमाणे पुरवठा करण्यांस तयार असल्यामुळे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत प्राणि संग्रहालय करीता सन १९९९-२००० या एका वित्तिय वर्षाकरीता बीफ (खन्नी), ल्युसर्न घास, शाळु बाटुक, शाळु कडबा, मासोळी, भाजीपाला, ब्रेड, ऊस, पशु-पक्षी खाद्य, फळफळावळ निविदापैकी तुलनात्मकदृष्अीने कमी तसेच झालेल्या वाटाघाटीनुसार खालील दर्शविलेल्या दराने खरेदी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) बीफ (खन्नी) :- पुरवठा करण्याकरीता श्री. फिरोजखान अ. रहेमान खान यांचे प्रतिकिलो रु. २०.०० या दरास मंजुरी देण्यांत येते

२) मासोळी :- मासोळी पुरवठयाकरीता श्री. मुमताज अहेमद यांचे प्रतिकिलो रु. ५७.५० या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

३) ल्युसर्न घास पुरवठ्याकरीता श्री. संताराम बंडुजी नवपुते, चिकलठाणा, औरंगाबाद यांच्या प्रतिकिलो रु. १.८० या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

४) शाळु कडबा व शाळु बाटुक पुरवठयाकरीता शाळु कडबा प्रतिटन रु. ४१५०/- व शाळु बाटुक प्रतिटन रु. ५०००/- या श्री. जनार्दन कोंडाजी शेळके यांच्या कमी दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

५) ब्रेड पुरवठा करण्याकरीता २०० ग्रॅम ब्रेडसाठी रु. ३.४० व २५० ग्रॅम ब्रेडसाठी रु. ४.०० या मे. एलोरा बेकरी, औरंगाबाद यांच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत.

६) ऊस पुरवठ्याकरीता प्रतिटन रु. १२००/- या दराच्या श्री. जनार्दन कोंडाजी शेळके यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

७) भाजीपाला व फळफळावळ पुरवठयाकरीता खालील पदार्थासमोर दर्शविलेल्या दराने श्री. प्रभाकर विश्वनाथ पवार यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| **मालाचा तपशिल** | **दर प्रति किलो (रु. पै.)** |
|---|---|
| केळी | १०.८० |
| मोसंबी | २०.७० |
| चिकु | २२.५० |
| पिकलेले टोमॅटो | ११.७० |
| काकडी खिरे | १५.३० |
| गाजर | ०९.०० |

या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९७/१० :**

मुख्य लेखा परिक्षक, म.न.पा. औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीता आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार "मुख्य लेखा परिक्षक " हे पद कलम ४५ अन्वये संवैधानिक पद म्हणुन ठरविण्यांत आलेले आहे. या पदावर नेमणुकीचे अधिकार महानगरपालिकेला आहे. मुख्य लेखा परिक्षक यांचे अधिकार व कर्तव्ये याबाबत अधिनियमांत वेगवेगळया कलमान्वये तरतुद करण्यांत आली आहे. त्यानुसार कलम ४५७ अन्वये कामाकाजासाठी नियम तयार करण्याची तरतुद आहे. कलम ४५७ (३) (क) अन्वये महानगरपालिका मुख्य लेखा परिक्षक आणि त्यांचा कर्मचारी वर्ग यांचे अधिकार व कर्तव्ये या बाबमत नियम करण्याची तरतुद आहे. त्यानुसार कामकाज झाल्यास लेखा परिक्षणाचे काम हे व्यवस्थीत व निर्भयपणे पार पाडणे शक्य होईल. त्यानुसार सध्या काही प्रमाणात अधिकार व कर्तव्ये याबाबत सुस्पष्ट धोरण नसल्याने खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यांत येते.

१) लेखा परिक्षण विभागातील सर्व कर्मचारी हे मुख्य लेखा परिक्षक यांचे प्रशासकीय व पर्यवेक्षीय नियंत्रणाखाली ठेवण्यांत यावेत. त्यांच्या विभागात बदल्या करण्यांत येऊ नयेत. त्यासाठी प्रथमतः लेखा परीक्षण विभागात कायम स्वरुपी काम करण्यांस तयार/इच्छुक कर्मचाऱ्यांचे विकल्प घेण्यांत येऊन त्यांची नेमणुक लेखा परिक्षण विभागात करण्यांत येईल. एकदा लेखा परीक्षण विभागात हजर झाल्यानंतर त्यांना अन्य विभागात बदलीची संधी राहणार नाही.

२) सदर कर्मचाऱ्यांची बढती ही लेखा परीक्षण विभागापुरतीच मर्यादीत राहील. सध्या लेखा परिक्षण विभागात खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांची पदे मंजुर आहेत.

| अ. क्र. | पद | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | मुख्य लेखा परिक्षक | रु. २२००-४००० (प्रतिनियुक्ती वरील पद) | ०१ |
| २. | वरिष्ठ लेखा परिक्षक (कार्यालय अधिक्षक संवर्ग) | १६४०-२९ | ०१ |
| ३. | कनिष्ठ लेखा परिक्षक (वरीष्ठ लिपीक संवर्ग) | १४००-२३०० | ०४ |
| ४. | कनिष्ठ लिपीक | रु. ९५०-१५०० | ०४ |
| ५. | शिपाई | रु. ७५०-९४० | ०२ |

बढतीच्या संधीसाठी सध्या अस्त्विात असलेली पदे पुरेशी आहेत. यथावकाश आवश्यक ती पद निर्मिती बाबत प्रस्तावित करण्यांत येईल. त्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होणार नाही.

३) लेखा परिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे सेवा ठेवणे, बढती/बदली बाबतची कार्यवाही करणे, त्यांचे वेतन व भत्ते अदा करणे त्यांच्या रजा मंजुर करणे, वेतनवाढ देणे, शिक्षा देणे, गोपनीय अहवाल ठेवणे इ. कामे ही अधिनियमातील मुळ तरतुदीनुसार व वेळोवेळी यथस्थिती मा. स्थायी समिती व सर्वसाधारण सभा यांच्या मंजुरीने निश्चित करण्यांत येईल.

उपरोक्त पध्दतीचा अवलंब केल्यामुळे महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही. धोरणात्मक बाब म्हणुन उपरोक्त तिन्ही प्रस्तावित कार्यवाही मान्य झाल्यास वेळोवेळी प्रस्ताव ठेवण्यांत येऊन दैनंदिन कामकाज पार पाडण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्य लेखा परिक्षक हे पद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये संवैधानिक पद असुन या पदावर नेमणुकीचे अधिकार महानगरपालिकेला असुन या अधिनियमाखाली विविध कलमान्वये मुख्य लेखा परिक्षक आणि त्यांचा कर्मचारी वर्ग यांचे अधिकार व कर्तव्याबाबत नियम करण्याची तरतुद असुन त्या नुसार कामकाज झाल्यास लेखा परिक्षणाचे काम त्यावस्थित व निर्भयपणे पार पाडणे शक्य व्हावे म्हणुन प्रस्तावित केल्याप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) लेखा परिक्षण विभागातील सर्व कर्मचारी हे मुख्य लेखा परीक्षक यांचे प्रशासकीय व पर्यवेक्षीय नियंत्रणाखाली ठेवण्यात यावेत. त्यांच्या अन्य विभागात बदल्या करण्यांत येऊ नये. त्यासाठी प्रथमतः लेखा परीक्षण विभागात कायमस्वरुपी काम करण्यांस

तयार इच्छुक कर्मचाऱ्यांचे विकल्प घेण्यांत येऊन त्यांची नेमणुक लेखा परीक्षण हजर झाल्यानंतर त्यांना अन्य विभागात बदलीची संधी राहणार नाही.

२) यथावकाश आवश्यक ती पद निर्मिती बाबत प्रस्तावित करण्यांत यावे.

३) लेखा परिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक ठेवणे, बढती/बदली बाबतची कार्यवाही करणे, त्यांचे वेतन व भत्ते अदा करणे, त्यांच्या रजा मंजुर करणे, वेतनवाढ देणे, शिक्षा देणे, गोपनीय अहवाल ठेवणे इ. कामे ही अधिनियमातील तरतुदीनुसार व वेळोवेळी यथास्थिती मा. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने निश्चित करण्यांत यावी.

वरील प्रमाणे पध्दतीचा अवलंब करण्यांस व त्यानुसार कार्यवाही करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. ५९८/१ :**

शहर अभियंता यांनी मा. आयुक्त सहेब यांच्या मान्यतेनुसार प्रस्ताव सादर केला आहे की, सिमेंट पुरवठा करणेसाठी सन १९९५-९६ या वर्षाकरीता माणिकगढ सिमेंटचा पुरवठा धारक कंपनीतर्फे २५,००० गोणी सिमेंट पुरवठा करणेकरीता प्रस्ताव क्र. १८० दि. १५.३.९५ अन्वये मान्यता प्राप्त झालेली होती.

सदरील एजन्सीला २५,००० गोणी सिमेंट पुरवठा करण्यासाठी दिनांक १५.३.९५ रोजी कार्यादेश देऊन माल पुरवठा करण्याकरीता ९० दिवसांचा कालावधी देण्यांत आल होता. त्याप्रमाणे दर दिवशी २८० गोणी सिमेंट या प्रमाणे निम्मया कालावधीमध्ये एकुण १२,५०० गोणी सिमेंट पुरवठा व्हावयास पाहिजे होता. परंतु तसे होता फक्त ८६७८ गोणी सिमेंट पुरवठा झाला तो एकुण पुरवठा करावयाच्या गोण्यांच्या तुलनेत ५०% पेक्षा कमी झ ाला. वास्तविक असे व्हावयास नको होते. म्हणुन संबंधित पुरवठा धारकास नियमाप्रमाणे प्रतिदिन रु. १०००/- दंड प्रमाणे एकुण रु. ४१,०००/- व सुरक्षा रक्कम जप्त करावी. म्हणुन प्रशासकीय मान्यता मिळालेली होती. त्या प्रमाणे सदर दोन्ही रकमा जप्त करण्यांत आल्या होत्या. संबंधित पुरवठा धारकाने वेळोवेळी विनंती अर्ज देऊन महानगरपालिेने केलेली कार्यवाही परत घेऊन लावलेला दंड व जप्त केलेली सुरक्षा रक्कम परत करावी म्हणुन विनंती केलेली आहे. त्यानुसार दि. २६.२.९९ रोजी मा. आयुक्त साहेब व पुरवठा धारक यांच्या बरोबर चर्चा होऊन खालील प्रमाणे शिफारस करण्यांत येत आहे.

मुदतीच्या आत उपरोक्त सिमेंट पुरवठा न केल्यामुळे दंडनिय कार्यवाही व सुरक्षा रक्कम जप्त करणे अशी दोन शास्ती करणे योग्य नसल्याने पुरवठा धारकास पुरवठा करण्यासाठी जो ११ दिवस विलंब केलेला असल्याने (दिनांक २३.३.९५ ते २.४.९५ ) त्यांना प्रतिदिना रु. १०००/- प्रमाणे रु. ११,०००/- दड लावण्यांत येऊन उर्वरीत दंडाची रक्कम रु. ३०,०००/- व सुरक्षा रक्कम परती करीता वरील बाबींचा विचार होऊन एका कारणाकरीता दोन शास्त लावता येत नाही म्हणुन पुरवठा धारकाने प्रमाणबध्द पुरवठा न केल्यामुळे ११ दिवसाकरीता रुपये ११,०००/- दंड वजा करुन बाकीचा दंड रु. ३०,०००/- व सुरक्षा रक्कम परत करणे बाबत पुर्नविचार होणेस्तव स्थायी समितीच्या सभेमध्ये विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १९९५-९६ या वर्षाकरीता सिमेंट पुरवठाधारक कंपनी "माणिकगढ" यांच्यातर्फे त्यांना देण्यांत आलेल्या कालावधीमध्ये प्रमाणबध्द पुरवठा न

केलयामुळे त्यांना दंडनिय कार्यवाही करण्यांत आलेली होती. तरी सदरील कार्यवाहीमंध्ये दोन शास्ती लावण्यास आल्याने त्यावर विचार करता एका कारणासाठी दोन शास्ती लावता येत नाही म्हणुन ११ दिवसाकरीता प्रतिदिन रु. १०००/- प्रमाणे एकुण र. रु. ११,०००/- दंड वजा करुन बाकीच्या दंडाची र. रु. ३०,०००/- व सुरक्षा अनामत संबंधितास परत करणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९९/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जिन्सी येथे मनपाच्या जागेवर दुकानकेंद्र व वाचनालय बांधण्याच्या कामासाठी सा. बां. विभागाचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ३,१२,७२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ९.६.९७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने विषय क्र. १०१/२७ दि. १८.६.९७ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना जा. क्र. म.पा./लेखा/नि/१६/९८ दिनांक २.४.९८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदरील निविदेंमध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. एम. एम. फारुकी यांची निविदा प्राप्त झाली होती. सदरील निविदेस मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली होती. तसेच मा. स्थायी समितीने विषय क्र. ३३/१२ अन्वये मान्यता दिलेली होती. त्यानुसार संबंधित गुत्तेदारास कार्यादेश देण्यातंत आला परंतु प्रत्यक्ष स्थळावर जागेचा वाद उद्भवल्यामुळे काम सुरु करता आले नाही. त्याच प्रभागात संजयनगरमध्ये अभ्यासिका केंद्रासाठी दुमजली इमारत बांधण्याचा प्रस्तावित कामास आर्थिक तरतुद उपलब्ध नसल्या कारणांने स. नगरसेवक यांनी वादग्रस्त जागा बदलुन संजयनगर येथे अभ्यासिका केंद्र बांधण्यासाठी लेखी मागणी केली. त्यानुसार जागेच्या उपलब्धतेनुसार तळ मजला व पहिला मजला बांधण्यास सा. बां. विभागाचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ३,५६,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. सदरील अंदाजपत्रक व मुळ गुत्तेदार म्हणजेच श्री. एम. एम. फारुकी यांचेकडुन काम करुन घेणेस्तव मान्यतेस्तव मा. आयुक्त महोदय यांचेकडे पाठविले असता मा. आयुक्त महोदय यांनी दि. १६.९.९८ अन्वये नविन काम समजुन प्रोसजर फॉलो करुन काम करावे असे आदेशित केले. त्यानुसार मुळ मंजुर र. रुपये ३,१२,७२५+४३,९७५= ३,५६,७००/- चे वाढीव अंदाजपत्रक प्रस्तावित केले असता मा. आयुक्त महोदय यांनी दि. २२.११.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव जा. क्र. मनपा/लेखा/नि/१०३/९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ८ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २८.१.९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एम. एम. फारुकी | ९.८९% | जास्त |
| २. | परफेक्ट कन्स्ट्रक्शन | १६% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ९.८९% जास्त दराची श्री. एम. एम. फारुकी यांची निविदा प्राप्त झालेली होती. परंतु दि. १२.३.९९ रोजी मा. आयुक्त महोदय यांचे दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंतती मा. आयुक्त महोदय यांनी ९.८९% जास्त दराऐवजी अं. प. दरापेक्षा २% जास्त दराने मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार एकुण वाढीव अंदाजपत्रक र. रु. ३,५६,७००/- चा प्रस्ताव व श्री. एम. एम. फारुकी यांची अदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी येथे दुकान केंद्र व वाचनालय बांधणेच्या कामाच्या जागेवर वाद उद्‌भवल्यामुळे य कामाऐवजी वादग्रस्त जागा बदलुन संजयनगर येथे अभ्यासिका केंद्र बांधण्याकरीता र. रु. ३,५६,७००/- च्या अंदाजपत्रकास व या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. एम. एम. फारुकी यांचेकडुन अं. प. दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६००/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रोड येथे उपआयुक्त -१ यांचे साठी मनपा निवासस्थान बांधणेस्तव सा. बां. विभागाचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ४,८९,८६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक २९.११.९६ अन्वये मान्यता दिलेली होती. तसेच मा. स्थायी समितीने उपरोक्त अंदाजपत्रकास ठराव क्र. ४९२/२३ दि. २९.११.९६ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जा. क्र. मनपा/लेखा/नि/११/९७ दि. ११.१.९७ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ७ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. २०.२.९७ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता सर्वात कमी दराची म्हणजेच अं. प. दरापेक्षा ७% जास्त दराची निविदा श्री. जी. आर. घोडेले यांची प्राप्त झालेली होती. परंतु मा. आयुक्त महोदय यांचे दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंती ७% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यांस मा. आयुक्त महोदय यांनी दि. ९.५.९७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. स्थायी समितीने दि. ६.६.९७ रोजी मान्यता दिलेली आहे.

आता मुळ कामात वाढ झाली असल्या कारणाने मुळ अंदाजपत्रकास वाढ झालेली आहे. त्यानुसार मुळ अंदाजपत्रक र. रु. ४,८९,८६०/-+१,९९,१४० = ६,८९,०००/-म्हणजेच सुधारीत अंदाजपत्रक र. रु. ६,८९,०००/- च्या प्रस्तावास मा. आयुक्त महोदय, यांनी दि. १७.१२.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सुधारित अंदाजपत्रक र. रु. ६,८९,०००/- च्या प्रस्तावास तसेच वाढीव काम मुळ गुत्तेदाराकडुन मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार करुन घेणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड येथे उपआयुक्त -१ यांचे साठी मनपा निवासस्थान बांधणेच्या कामांमध्ये वाढ झाल्यामुळे या कामाचे मुळे अंदाजपत्रक र. रु. ४,८९,८६०/- + वाढीव अंदाजपत्रक र. रु. १,९९,१४०/- अशा एकुण सुधारीत अंदाजपत्रक र. रु. ६,८९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार श्री. जी. आर. घोडेले यांचेकडुन मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०१/४ :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्सुल फुलेनगर येथे संरक्षित भिंत बांधणेबाबतच्या कामाकरीता अंदाजपत्रक र. रु. ५,९४,०००/- सा. बां. विभाग यांचे वर्ष ९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सहाय्यक संचालक नगर रचना व सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १०/६ दिनांक २७.६.९८ च्या अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आली असता अंतिम तारखेपर्यंत २४ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याचय अंतिम तारखेपर्यंत एकुण १० निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शेख अब्दुल मुजीब | ३५.७७ % | कमी |
| २. | मझर सिधीकी | ३२.३२ % | कमी |
| ३. | कुलवंतसिंग | ३०.३३ % | कमी |
| ४. | एल. बी. चव्हाण | ३०.०० % | कमी |
| ५. | अकाल कन्स्ट्रक्शन | २९.०३ % | कमी |
| ६. | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | २६.९६ % | कमी |
| ७. | एस. ए. देशमुख | २३.९० % | कमी |
| ८. | बी. ए. काल्डा | २०.१० % | कमी |
| ९. | महमंद सलाहोधीन | १६.०० % | कमी |
| १०. | एस. एच. असोसिएटस् | १५.०० % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणेजच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.७७% कमी दराची असलेली श्री. शेख अब्दुल मुजीब यांची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर. तसेच सदरील काम "दलित वस्ती सुधार योजना" अंतर्गत खर्च करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार हर्सुल फुलेनगर येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३५.७७% कमी दराची श्री. शेख अब्दुल मुजीब यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०२/५ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र. ६१ राहुलनगर स्लम भागात क्रॅांक्रीट रस्ता तयार करणे करीता अंदाजपत्रक र. रु. ४,९४,५२५/- सा बां. विभाग औरंगाबाद यांचे दरसुची १९९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सहाय्यक संचालक नगर रचना व सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १०/६ दि. २७.६.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १५.३.९९ पर्यंत एकुण २७ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम दि. १९.३.९९ रोजी फक्त ५ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्याा. तया निविदा उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एल. बी. चव्हाण | ३५.०० % | कमी |
| २. | श्री. हुसैन अलि | २९.९९ % | कमी |
| ३. | बसरा कन्स्ट्रक्शन | २८.५० % | कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | बी. ए. काल्डा | २०.१० % | कमी |
| ५. | एस. एच. असोसिएटस् | २०.०० % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३५% कमी दराची निविदा श्री. एल. बी. चव्हाण यांची आहे. करीता निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर तसेच सदर काम दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत खर्च करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ६१ राहुलनगर स्लम भागात कॅाक्रीट रस्ता तयार करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३५% कमी दराची श्री. एल. बी. चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०३/६ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मसनतपुर (शाहनगर) येथे गोलाकार गटार व दगडी गटार बांधणेकरीता अंदाजपत्रक र. रु. १६,८५,६६८/- सा. बां. विभाग, औरंगाबाद यांचे दरसुची १९९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सहाय्यक संचालक नगररचना व सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १०/६ दिनांक २७.६.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यायनंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. १५.३.९९ पर्यंत एकुण २८ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या अंतिम दि. १९.३.९९ रोजी फक्त ८ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि. १९.३.९९ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार घोडेले | ३४.७८६ % | कमी |
| २. | अब्दुल सलाम | ३१.८६ % | कमी |
| ३. | आर. बी. चव्हाण | ३१ % | कमी |
| ४. | स. अथर अलि | २९.२१ % | कमी |
| ५. | मो. सलीम | २८.९९ % | कमी |
| ६. | शे. शरिफ | २८.३० % | कमी |
| ७. | आनंद बिल्डर्स | २७.३ % | कमी |
| ८. | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन | २१ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३४.७८६ % कमी दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर तसेच सदर काम "दलित वस्ती सुधारणा योजना" अंतर्गत खर्च करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपुर (शहनगर) येथे १/२ गोलाकार गटार व दगडी गटार बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३४.७८६% कमी दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०४/७ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्सुल गांव पश्चिमेस असलेल्या नदीस पूर नियंत्रण भिंत बांधणे बाबत कामाकरीता सा. बां. खातेच्या

वर्ष ९७-९८ च्या दरसुची नुसार रु. १९,१४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी सहाय्यक संचालक नगररचना व सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १०/६ दिनांक २७.६.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यांनतर रितसर वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एकुण २३ निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार घोडेले | ३३% | कमी |
| २. | शेख शरीफ | ३२.३२% | कमी |
| ३. | कुलवंतसिंग | २८.३३% | कमी |
| ४. | सोहेल सिध्दीकी | २१.३३% | कमी |
| ५. | एस. एच. असोसिएटस् | १५% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३% कमी दराची असलेली श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर. तसेच सदर काम "दलित वस्ती सुधारणा योजना" अंतर्गत खर्च करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. हर्सुल गांवच्या पश्चिमेस असलेल्या नदीस पुर नियंत्रण भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३३% कमी दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची असुन निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०५/८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. तक्षशीलनगर स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणेबाबतच्या कामाकरीता सा. बां खातेच्या ९७-९८ च्या दरसुचीनुसार र. रु. ४,३५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी सहाय्यक संचालक नगर रचना व सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १०/६ दिनांक २७.६.९८ नुसार मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण ७ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित ठेकेदारासमक्षम उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ए. सी. कोठारी | ३७.१० % | कमी |
| २. | डी. अजितसिंग | ३४.९१ % | कमी |
| ३. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | ३२.०० % | कमी |
| ४. | एम. ए. सिध्दीकी | २७.५२ % | कमी |
| ५. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १३.१३ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.१०% कमी दराची असलेली श्री. ए. सी. कोठारी यांची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. तसेच सदर काम "दलित वस्ती सुधार योजना" अंतर्गत खर्च करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. तक्षशील नगर स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा

३७.१०% कमी दराची श्री. ए. सी. कोठारी यांची असुन निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०६/९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भिमनगर भावसिंगपुरा येथे खडी रस्ते व डांबरी रस्ते तयार करणेबाबतच्या कामाकरीता सा. बां खातेच्या ९७-९८ च्या दरसुचीनुसार र. रु. १०,२९,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सहाय्यक संचालक नगर रचना व सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १०/६ दिनांक २७.६.९८ नुसार मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण ७ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | |
|---|---|---|
| १. ए. सी. कोठारी | ३७.१० % | कमी |
| २. डी. अजितसिंग | ३४.९१ % | कमी |
| ३. ए. एस. कन्स्ट्रक्शन | ३०.०० % | कमी |
| ४. एम. ए. सिध्दीकी | २४.५२ % | कमी |
| ५. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १७.८६ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.१०% कमी दराची असलेली श्री. ए. सी. कोठारी यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. तसेच सदर काम "दलित वस्ती सुधार योजना" अंतर्गत खर्च करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भिमनगर भावसिंगपुरा येथे खडी रस्ते व डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३७.१०% कमी दराची श्री. ए. सी. कोठारी यांची असुन निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०७/१० :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. पंचकुवा (गोधडीपुरा) येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे व शहाबाद फरशी बसविणे करीता अंदाजपत्रक र. रु. ७,०८,४००/- सा. बां विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सहाय्यक संचालक नगर रचना व सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १०/६ दिनांक २७.६.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिनांक १५.३.९९ पर्यंत एकुण १६ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम दि. १९.३.९९ रोजी फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित ठेकेदारासमक्षम उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सय्यद फेज उल हक | ४.९% | जास्त |
| २. | श्री. शेख शरीफ | ९% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९% जास्त दराची असलेली श्री. सय्यद फैजुल हक यांची आहे. म्हणुन मंजुरीसाठी मा. आयुक्तांना सादर करण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर जास्त वाटल्यामुळे संबंधित ठेकेदारास वाटाघाटीसाठीसमक्ष बोलविण्यांत आले व वाटाघाटीत अंदाजपत्रकीय दर मान्य झाला. करीता सदर काम श्री. फैजूल हक संचिकाडुन अं. प. दरापेक्षा ४.९% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मान्यतेस्तव सादर. तसेच सदर काम "दलित वस्ती सुधार योजना" अंतर्गत शासकीय अनुदानातुन खर्च करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. पंचकुवा (गोधडीपुरा) येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे व शहाबाद फरशी बसविण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. फैजुल हक यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६०८/११ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शताब्दीनगर येथे उचं टेकडी करुन लेव्हलिंग करणे तसेच दगडी भिंत बांधणे व खांडकी बसविणे, खडी रस्ते तयार करणेचे कामासाठी अंदाजपत्रक र. रु. २६,०६,०००/- सा. बां विभाग यांचे ९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सहाय्यक संचालक नगर रचना व सर्वसाधारण सभेच्या विषय क्र. १०/६ दिनांक २७.६.९८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २९ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ८ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अब्दुल सलाम | ३१.८७ % | कमी |
| २. | न्यु महाविर कन्स्ट्रक्शन | ३० % | कमी |
| ३. | कुलवंतसिंग | २८.३३ % | कमी |
| ४. | मेराज अलि | २८ % | कमी |
| ५. | मन्नान खान | २७.३ % | कमी |
| ६. | सलीम पटेल | २४.७५ % | कमी |
| ७. | एलोरा कन्स्ट्रक्शन | १८.९% | कमी |
| ८. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १७.८६% | कमी |

तुलनात्मदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.८७% कमी दराची असलेली श्री. अब्दुल सलाम यांची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर. तसेच सदरील काम "दलित सुधार योजना" अंतर्गत खर्च करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शताब्दीनगर येथे उचं टेकडी करुन लेव्हलिंग करणे तसेच दगडी भिंत बांधणे व खांडकी बसविणे, खडी रस्ते तयार करणेचे कामासाठी प्रापत झ

ाालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३१.८७% कमी दराची श्री. अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६०९/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करित आहे की, खडकेश्वर भागांतर्गत रस्ते रुंदीकरण, खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा. बां. खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,४४,६००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात "नविन खडी रस्ते " या लेखा शिर्षकातुन करण्यांत येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खडकेश्वर भागांतर्गत रस्ते रुंदीकरण, खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. २,४४,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१०/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करित आहे की, नारळीबाग येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा. बां. विभागाचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,९७,०५०/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च सन १९९८-९९ या आर्थिक वर्षात "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षकातुन करण्यांत येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारळीबाग येथिल रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरीता सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेल्या र. रु. २,९७,०५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६११/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करित आहे की, सिध्दार्थ उद्यानासमोर रस्ता दुभाजक व ग्रील बसविणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सा. बां. खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,२९,२१३/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "शहर सौंदर्यीकरण" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यांत येईल.

सदरील काम त्वरीत करणे आवश्यय आहे. कारण एस. टी. मध्यवर्ती बसस्थानक परिसरात अवैध वाहतुक करणारी वाहने उभी असतात. त्यामुळे एस. टी. बसस्थानकात जाताना व बसस्थानकातुन बाहेर निघतांना बसेसला सतत अडथळा होतो. त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शकयता नाकारता येत नाही. अपघात झाल्यास जिवीत व वित्त हानी टाळणे करीता उपलब्ध गुत्तेदार श्री. शुजात हाशमी यांचेकडेन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे योग्य वाटते.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अं. प. र. रु. १,२९,२१३/- ला व उपलब्ध ठेकेदार श्री. शुजात हाशमी यांचेकडुन काम करुन घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

तसेच सदरील काम त्वरीत करणेसाठी मा. पोलिस आयुक्त यांचे शहर वाहतुक सुधारणे बाबतच्या मिटिंगमध्ये त्यांनी देखील रस्ता दुभाजक व ग्रील बसविणे बाबत सुचविलेले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानासमोर रस्ता दुभाजका व ग्रील बसविणेच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,२९,२१३/- च्या अंदाजपत्रकास व सदरील कामाची तातडी लक्षात घेता हे काम उपलब्ध गुत्तेदार श्री शुजात हाशमी यांचेकडेन करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१२/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर केला आहे की, गुलाबवाडी घाटी येथे गर्डर पोल लावण्याचे कामाच्या निविदा मागविल्या असता सदरील निविदेत खालील प्रमाणे दर आलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. गजानन ईलेक्ट्रीकल्स | १५.०५% | कमी दर व लेबर रेट सह |
| २. | मे. लुना ईलेक्ट्रीकल्स | १४% | कमी दर |
| ३. | मे. इगल ईलेक्ट्रीकल्स | १३.७% | कमी दर |

वरील प्राप्त दरांमध्ये मे. गजानन ईलेक्ट्रीकल्स यांचे निविदाचे दर कमी आहेत. परंतु त्यानी लेबर रेट दिल्यामुळे सदरील एजन्सीचा विचार केला नाही. यामुळे द्वितीय व तृतीय क्रमांकाच ठेकेदारास प्रथम क्रमांकाच्या दरावर काम करण्यास विचारले असता द्वितीय क्रमांकाच निविदाधारकाने नकार दिला असता तृतीय क्रमांकाच्या ठेकेदाराने प्रथम क्रमांकाच्या दरावर काम करण्यास मंजुरी दर्शविली आहे. म्हणुन सदरील काम मे. ईगल ईलेक्ट्रीकल्स यांचेकडुन १५.०५% कमी दरात काम करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलाबवाडी (घाटी) यथे गर्डर पोल लावण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी दुसऱ्या कमी दराच्या निविदा धारकाने संमती दिल्यानुसार सदरील काम मे. ईगल ईलेक्ट्रीकल्स यांचेकडुन अं. प. दरापेक्षा १५.०५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१३/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, उस्मापुरा ते रेल्वेस्टेशन या रस्त्यावर बाजुला असलेले विद्युत खांब काढुन रस्त्याच्या मध्ये लावण्याचे काम मे. लुना ईलेक्ट्रकल्स तर्फे चालु आहे. सदरील कामाचे आदेश दि. १५.९.९६ चे असुन ते र. रु. ५,७४,६७९/- चे आहेत. व सदरील विद्युत खांब न हटविल्यामुळे प्रलंबित होते. या रस्त्यावरील जुने काम सन १९८५-८६ साली झालेले होते. या रोडवर पाण्यासाठी व टेलिफोन साठी करण्यांत आलेली असल्यामुळे सदरील केबल बऱ्याच ठिकाणी जॉईंट लावुन चालु केली आहे. म्हणुन या रस्त्यावरील कामाची केबल बदलणे व नविन फिटिंग लावणे

तसेच नविन पोल लावणेकरीता या कामात वाढ झालेली आहे. सदरील वाढीव कामाचे अंदाजपत्रक सन १९९५-९६ च्या दरसुची नुसारच तयार केलेले असुन ते र. रु. २,९८,८९०/- असे आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० या वर्षातुन करण्यात येईल. काम चालु असल्यामुळे वाढीव काम त्याच ठेकेदारास मे. लुना इलेक्ट्रीकल्स्, औरंगाबाद यांना त्यांच्या मंजुर दरावर करण्यास्तव प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानुरा ते रेल्वेस्टेशन या रस्त्याच्या बाजुने पोल काढुन रस्त्याच्या मध्ये लावण्याचे कामामध्ये वाढ झाल्याने य रस्त्यावरील केबल बदलणे व नविन फिटींग लावणे तसेच नविन पोल लावणेकरीता वाढीव अंदाजपत्रक र. रु. २,९८,८९०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार मे. लुना ईलेक्ट्रीकल्स यांचेकडुन त्यांच्या मंजुर दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१४/१७ :**

प्रकल्प संचालक यांनी मा. आयुक्त यांच्या दिनांक २४.३.९९ च्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात गौतम बुध्दाची आसनस्थ पितळेची चार फूट उंचीची मुर्ती खरेदी करणे बाबत स्थानिक वृत्तपत्रातुन जाहिर निविदा प्रकाशित करण्यांत आलि होती. त्यास अनुसरुन १) मडिलगेकर आर्ट स्टुडिओ, २) श्री. पी. आर. सासमकर, ३) श्री. रतनलाल बगले या स्थानिक मुर्तीकारांनी निविदा भरली होती. त्यांनी नमुद केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मडिलगेकर आर्ट स्टेडिओ | रु. १,९५,०००/- |
| २. | श्री. पी. आर. सासमकर | रु. ३,००,०००/- |
| ३. | श्री. रतनलाल बगले | रु. २,५५,०००/- |

वरील तिन्ही मुर्तीकारापैकी श्री. मडिलगेकर आर्ट स्टुडिओ यांनी तयार केलेले क्ले मॉडेल निवडण्यात आले आहे. तसेच दि. २४/३/९९ रोजी दराबाबतच्या वाटाघाटीनुसार र. रु. १,७५,०००/- मा. आयुक्तांनी मान्य केले आहे. तरी कमी केलेले दर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात गौतम बुध्दाची आसनस्थ पितळेची चार फुट उंचीची मुर्ती खरेदी करण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची निविदाधारक श्री. मडिलगेकर आर्ट स्टुडिओ यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडुन र. रु. १,७५,०००/- या दरात करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१५/१८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आंबेडकरनगर येथील बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळील परिसर सुशोभित करणे व सिमेंट कॉंक्रिट पेंन्टींग करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. २,८९,६०२/- सा. बां. विभाग औरंगाबाद यांची दरसुची सन १९९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांनी दिनांक २५.२.९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे या कामाकरीता ३ दिवसांची निविदा मागविण्यांत आल्या. निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १० कोऱ्या निविदा विकल्या

गेल्या व स्विकारणेच्या तारखेस फक्त ३ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि. ६.३.९९ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एस. बी. देहाडे | २% | जास्त |
| २. | संतोष देशमुख | ४% | जास्त |
| ३. | व्ही. जी. स्वामी | ५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं. प. दरापेक्षा २% जास्त दराची निविदा श्री. एस. बी. देहाडे यांची निविदा आहे. करीता मंजुरीसाठी मा. आयुक्तांना सादर करण्यांत आली असता त्यांनी २% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने मान्य केली आहे.

करीता अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव तसेच श्री. एस. बी. देहाडे यांची निविदा अंदाजपत्रकीय दरोन मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

तसेच सदर काम " गलिच्छ वस्ती सुधार" अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या रक्कम लेखाशिर्ष स्लम खडी रस्ते १९९८-९८ यात खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. आंबेडकरनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळील परिसर सुशोभित करणे व सिमेंट कॉंक्रिट पेंटीग करणे कामाकरीता तयार केलेल्या र. रु. २,८९,६०२/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री एस. बी. देहाडे यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१६/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हॉटेल अमरप्रित चौक ते चेतनानगर (महर्षी दयानंद मार्ग) या ८० फुट डी.पी. रस्त्यावर मध्ये दुभाजक टाकणे व ग्रिल बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ५,२१,७००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २४ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ९ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.

प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सय्यद फैजुल हक | २६.८५ % | कमी |
| २. | साईनाथ कन्स्ट्रक्शन | २५.१० % | कमी |
| ३. | मन्नान खान | २३.८० % | कमी |
| ४. | अस्लम पटेल | १६.४० % | कमी |
| ५. | आनंद बिल्डर्स | ७.३० % | कमी |
| ६. | हरीओम कन्स्ट्रक्शन | २०.०१ % | कमी |
| ७. | राजसिंग | १५.५१ % | कमी |
| ८. | ए. आर. खान | १६.८९ % | कमी |
| ९. | सुरेश बी. साधवानी | १९.२१% | कमी |

वरील प्राप्त निविदापैकी सय्यद फैजुल हक यांचे निविदापत्रकांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २६.८५% कमी आहेत. तरी स. फैजुल

हक यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.८५ % कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रित चौक ते चेतनानगर (महर्षि दयानंद मार्ग) या ८० फुट डी.पी. रस्त्यावर मध्ये दुभाजक टाकणे व ग्रील बसविणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २६.८५% कमी दराची श्री. सय्यद फैजुल हक यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१७/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, वीर सावरकर चौक ते जवाहर कॉलनी पोलिस स्टेशन या ८० फुट डी.पी. रस्त्याच्या दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. १४,२१,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १५ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त पाच निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली आहे. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ए. आर. कन्स्ट्रक्शन | २२% | कमी |
| २. | सलीम पटेल | २०.१६% | कमी |
| ३. | हरीओम कन्स्ट्रक्शन | १९.९९% | कमी |
| ४. | न्यु महावीर कन्स्ट्रक्शन | १९.००% | कमी |
| ५. | मन्नान खान | १४.००% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी ए. आर. कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी आहेत. तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वीर सावरकर चौक ते जवाहर कॉलनी पोलीस स्टेशन या ८० फुट डी.पी. रस्त्याच्या दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणे च्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २२% कमी दराची श्री. ए. आर. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१८/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पंचवटी चौक ते कोकाणवाडी या रस्त्याच्या दुभाजकावर एम. एस. रेलींग (ग्रील) बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ५,४१,९००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २२ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम

तारखेपर्यंत यापैकी फक्त ३ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. हरीओम कन्स्ट्रक्शन | १९.९९% | कमी |
| २. | ए. आर. कन्स्ट्रक्शन | १६.०१% | कमी |
| ३. | एस. एच असोसिएटस् | १२.००% | कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. हरीओम कन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकोचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९९% कमी आहेत. तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचवटी चौक ते कोकणवाडी चौक या रस्ता दुभाजकावर एम. एस. रेलींग (ग्रील) बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १९.९९% कमी दराची मे. हरीओम कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१९/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, रंगार गल्ली येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ३०.१.९९ च्या स्थायी समितीच्या ठराव क्र. ४९०/५ अन्वये र. रु. ६,१९,५७५/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामासाठी निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/११५/९९ दि. ८.२.९९ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण ९ निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेस नियोजीत तारखेस ५ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. के. बी. पाथ्रीकर | ३१.३१% | कमी |
| २. | श्री. ए. सी. कोठारी | ३०.९९% | कमी |
| ३. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | २३.१०% | कमी |
| ४. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | १५.००% | कमी |
| ५. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १५.८६% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.३१% कमी दराची श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविद असुन प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रंगार गल्ली येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३१.३१% कमी दराची श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२०/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल ते जनज्योती या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी दि. १७.१०.९८ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. १२१/६ अन्वये अंदाजपत्रक र. रु. १०,६२,६००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१२०/९८ दि. १९.२.९९ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण १२ निविदापत्रके विकल्या गेली असुन निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस एकुण १० निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापत्रके दि. ९.३.९९ रोजी उघडण्यांत आली असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ३४.२ % | कमी |
| २. | के. बी. पाथ्रीकर | ३३.८१ % | कमी |
| ३. | ए. सी. कोठारी | ३३.० % | कमी |
| ४. | व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | ३१.५१ % | कमी |
| ५. | चांदराम आशन्ना | ३१.३२ % | कमी |
| ६. | रे कन्स्ट्रक्शन | २८.०० % | कमी |
| ७. | डी. अजित सिंग | २५.७१ % | कमी |
| ८. | जग्गी कन्स्ट्रक्शन | २५.०० % | कमी |
| ९. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | १७.७८ % | कमी |
| १०. | गुरुनानक इंडस्ट्रिज | १५.०० % | कमी |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३४.२% कमी या दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल ते जमनज्योती या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३४.२% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रकशन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२१/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मकबऱ्याच्या पाठीमागील टेकडीचा कंटुर सर्व्हे करण्याच्या कामासाठी र. रु. ३०,३८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन सदर काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध वास्तु विशारद श्री. खाते पाटील असोसिएट यांचे मार्फत घेण्यात आले आहे. सबब वरील प्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती समोर विचाराथ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे मकबऱ्याच्या पाठीमागील टेकडीचा कंटुर सर्व्हे करण्याच्या कामाकरीता तयार केलेल्या र. रु. ३०,३८०/- च्या अंदाजपत्रकास तसेच तातडीचे काम असल्याने उपलब्ध वास्तु विशारद श्री. खोते पाटील असोसिएटस यांचे मार्फत करुन घेण्यात आलेल्या कामास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी स्विकृतीसह देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२२/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, हर्सुल ते वेदविद्या प्रतिष्ठाण पर्यंत उर्वरीत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ४,१६,९००/- चे तयार करण्यांत आले

असुन सदरचा खर्च नविन डांबरीकरण या लेखा शिर्षातुन करण्यांत येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे हर्सुल ते विदविद्या प्रतिष्ठाण पर्यंत उर्वरीत रोडचे डांबरीकाण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. ४,१६,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२३/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, हर्सुल येथील गाडी रस्त्याच्या खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सा. बां. खात्याचे डि. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. १,५३,२००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "नविन खडी रस्ते" या लेखा शिर्षातुन करण्यांत येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील गाडी रस्त्याला खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र. रु. १,५३,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२४/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या उद्‌घाटनासाठी शिवरायांच्या संबंधित सोनेरी अक्षरी लावण्यासाठी मा. बाबासाहेब पुरंदरे यांनी संग्रहाल्यास भेद दिली असता त्यांनी खालील प्रमाणे अक्षरे लावण्याकरीता सुचविले आहे.

शिवरायाचे आठवावे रुप । शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप । भुमंडळी शिवरास आठवावे ।
जिवित तृनवृत मानावे । इहलोकी परलोकी रहावे किर्ती रुप ।

वरील अक्षरे ७" रुंदीचे बनविण्याचा प्रस्ताव असुन मुख्य प्रवेश द्वारावर "श्री छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय" हे अक्षर १२' साईजचे बनविणे करीता रक्कम रु. १००.०० प्रति इंच प्रमाणे एकुण ८४,५००/- होत आहे.

तसेच सदरील काम हे तातडीने करुन घेण्यासाठी विना निविदा दरपत्रके मागविली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाली आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अंबर मेटल वर्क्स | रु. १००.०० | प्रति इंच |
| २. | जुनेद मेटल वर्क्स | रु. १२०.०० | प्रति इंच |
| ३. | स्टार मेटल वर्क्स | रु. ११०.०० | प्रति इंच |

तुलनात्मकदृष्टया कमी अंबर मेटल वर्क्स यांचे रु. १००.०० प्रति इंच असे दर प्राप्त झालेले असुन कामाची निकड लक्षात घेता त्यांचेकडुन काम करुन घेण्यांत आलेले आहे.

तरी र. रु. ८४,५००/- च्या अंदाजपत्रकास व अंबर मेटल वर्क्स यांचे कडुन काम करुन घेण्यात आल्यामुळे कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या उद्‌घाटनासाठी शिवरायांच्या संबंधित सोनेरी अक्षरे लावणेच्या कामाकरीता मागविण्यांत आलेल्या दरपत्रकापैकी सर्वात कमी दराचे म्हणजेच प्रति इंच रु. १००.०० या दराने मे. अंबर मेटल वर्क्स यांचे कडुन घेण्यांत आलेल्या कामास तसेच या करीता र. रु. ८४,५००/- च्या ,खर्चास कार्योत्तर सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२५/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे प्रदर्शनी दालनाच्या प्रत्येक दारावर नेमप्लेट ब्रॉझमध्ये बसविणेकरीता मा. संचालक डॉ. शांतीलाल पुरवार यांनी प्रस्ताव दिला असुन सदरचे काम त्वरीत करुन घेण्यासाठी दि. २४/३/९९ रोजी कार्योत्तर प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी दरपत्रके मागविली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. अंबर मेटल वर्क्स | ५०.०० | प्रति स्क्वे. इंच |
| २. जुनेद मेटल वर्क्स | ६०.०० | प्रति स्क्वे. इंच |
| ३. स्टार मेटल वर्क्स | ५५.०० | प्रति स्क्वे. इंच |

तुलनात्मकदृष्टया कमी अंबर मेटल वर्क्स यांचे दरपत्रक प्राप्त झालेले असुन १ एम. एम. जाडीचे १८४६.०० स्क्वेरअ इंचसाठी रु. ५०.०० स्क्वेअर इंच प्रमाणे एकुण रु. ९२,३००/- इतका खर्च आलेला आहे. तसेच कामाची तातडी लक्षात घेता काम त्वरीत करुन घेण्यांसाठी मा. आयुक्तांनी आदेश दिलेले आहे.

तरी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक र. रु. ९२,३००/- च्या अंदाजपत्रकास व अंबर मेटल वर्क्स यांचे कडुन काम करुन घेण्यात आल्यामुळे कार्योत्तर मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे प्रदर्शनी दालनाच्या प्रत्येक दारावर नेम प्लेट ब्रॉझमध्ये बसविणे करीता प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी सर्वात कमी दराचे म्हणजेच प्रति इंच रु. ५०.०० या दराने मे. अंबर मेटल वर्क्स यांचे कडुन घेण्यांत आलेल्या कामास तसेच या करीता र. रु. ९२,३००/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२६/२९ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव (दुरुस्ती प्रस्ताव) सादर केला आहे की, मो. शहानुर मियॉ दर्गामागे जेबिंदा लेआऊट येथे २५० मीमी व ३०० मीमी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज टाकणे बाबत कामाला विषय क्र. ४७२/५ दि. ३०/१/९९ अन्वये स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे.

नजरचुकीने सदरील प्रस्तावात अ. क्र. १ वर श्री. असलम पटेल यांची निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.७८६% कमी दराने टाकण्यांत आलेला होता. परंतु प्रत्यक्षात तो ३५.७८६% कमी असा आहे. तसेच अ. क्र. २ वर श्री. जी. आर. घोडेले यांचा निविदा दर ३६.३६% कमी असा आहे.

तरी श्री. जी. आर. घोडेले यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.३६% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव दुरुस्ती प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविलयाप्रमाणे मो. शहानुरमियॉ दर्ग्यामागे जंबिदा ले-आऊट येथे २५० मीमी व ३०० मीमी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता मंजुर करण्यांत आलेल्या ठराव क्र. ४७२/५ दिनांक ३०.१.९९ मध्ये नजरचुकीने श्री असलम पटेल यांची निविदा कमी दराची दर्शविली असल्याने सदरील ठराव रद्द करण्यांत येऊन त्याऐवजी सदरील कामाकरीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.३६% कमी दराची श्री. जी. आर. घोडेले यांची निविदा स्विकारण्याबाबतचा दुरुस्ती प्रस्ताव सर्वानुमते स्विकृतीसह मंजुर करण्यांत येतो. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२७/३० :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, गोल व आयताकृती एस. एफ. आर. सी. ढापे खरेदी करणे, ज्या कामाचा अंदाजपत्रकीय खर्च र. रु. ३३,९३,०००/- आहे. सदर कामाला सर्वसाधारण सभेत ठराव क्र. १२९/९ दिनांक ५.११.९८ च्या प्रमाणे मंजुरी मिळालेली आहे. या कामाकरीता निविदा मागविण्यांत आल्या असता तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यांची निविदा रक्कम खालील प्रमाणे.

१. मे. एस. एस. मेनहोल ग्रेटींग कं. रु. ३०,४६,६७४/-
२. मे. के. के. मेनहोल रु. ३०,८३,४००/-
३. एस. एस. एस. आय. डी. सी. रु. ३३,३१,८००/-

वरीलपैकी सर्वात कमी दराची निविदा मे. एस. एस. मेनहोल ग्रेटींग कंपनी यांची असुन ती रु. ३०,४६,६७४/- आहे. तथापि त्यांनी ब्युरो ऑफ इंडियन स्टॅन्डर्डचे प्रमाणपत्र तसेच विक्रीवर विभागाचे प्रमाणपत्र व यापूर्वी पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. निविदा खरेदीच्या वेळी फक्त अमित काँक्रीट वर्क्स, कोपरगांव यांचे डिलर शीपचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. तथापी आय. एस. आय. बाबत डिलरचे पत्रावर स्पष्ट उल्लेख नाही.

के. के मेनहोल ग्रेटींग कंपनी व एम. एस. एस. आय. डी. सी. यांनी निविदेतील अटिप्रमाणे सर्व प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

मे. एस. एस. मेनहोल ग्रेटींग कंपनी व मे. के. के. मेनहोल यांच्या दरात कमी तफावत असल्यामुळे मे. के. के. मेनहोल यांना दराच्या वाटाघाटीकरीता बोलाविण्यांत आले असता, मे. के. के मेनहोल ग्रेटींग कंपनी यांनी मे. एस. एस. मेनहोल ग्रेटींग यांनी दिलेल्या दराने म्हणजेच सर्वात कमी दराने रु. ३०,४६,६७४/- त पुरवठा करण्यांस संमती दिलेली आहे. श्री. के. के. मेनहोल हे खालील दराने पुरवठा करतील.

| | | **दर प्रति रु.** |
|---|---|---|
| १. | एस. एफ. आर. सी. गोल रिंग व ढापे (हेवी) | ६३३.५० |
| २. | चौकोनी कव्हर ७००X५५०X७५ मी. मी. (हेवी) | २६५.८५ |
| ३. | चौकोनी कव्हर ७००X५५०X५५ मी. मी. (मेडीयम) | २३०.९५ |
| ४. | चौकोनी कव्हर १०००X७००X७५ मीमी (हेवी) | ४०९.९९ |

| | | |
|---|---|---|
| ५. | चौकोनी कव्हर १०००X७००X७५ मीमी (मेडीयम) | ३७०.०० |

करीता मे. के. के. मेनहोल ॲन्ड ग्रेटींग कंपनी यांची निविदा स्विकृतीचा प्रस्तवा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गोल व आयताकृती एस. एफ. आर. सी. ढापे खरेदी करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. एस. एस. मेनहोल ग्रेटींग कंपनी यांनी निविदेतील अटींची पुर्तता न केल्यामुळे द्वितीय कमी दराचे निविदाधारक श्री. के.के. मेनहोल ॲन्ड ग्रेटींग कंपनी यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडुन सर्वात कमी दराचे निविदाधारकांनी दिलेल्या दराने म्हणजेच रक्कम रु. ३०,४६,६७४/- मध्ये करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. खालील प्रमाणे मे. के. के. मेनहोल यांचे अ. क्र. १ ते ५ च्या ॲटमसमोरील दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | | दर प्रति रु. |
|---|---|---|
| १. | एस. एफ. आर. सी. गोल रिंग व ढापे (हेवी) | ६३३.५० |
| २. | चौकोनी कव्हर ७००X५५०X७५ मी. मी. (हेवी) | २६५.८५ |
| ३. | चौकोनी कव्हर ७००X५५०X५५ मी. मी. (मेडीयम) | २३०.९५ |
| ४. | चौकोनी कव्हर १०००X७००X७५ मीमी (हेवी) | ४०९.९९ |
| ५. | चौकोनी कव्हर १०००X७००X७५ मीमी (मेडीयम) | ३७०.०० |

वरील ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२८/३१ :**

मा. उपआयुक्त तथा अध्यक्ष, मनपा कर्मचारी जयंती उत्सव समिती, महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सदर करीत आहेत की, महानगरपालिकेतर्फे अधिकारी/कर्मचारी वर्गाकडुन दरवर्षी गणेश उत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व श्री. छत्रपती शिवाजी महाराज जयंती हे सार्वजनिक उत्सव साजरे करण्यांत येतात. हे उत्सव साजरे करण्यांसाठी उत्सव समितीस मागील ७-८ वर्षापासुन प्रत्येकी ५ हजार रुपये महानगरपालिकेकडुन अनुदान म्हणुन देण्यांत येतात.

उत्सवाचे व्यापक स्वरुप लक्षात घेता ही अनुदानाची रक्कम अपुरी आहे. तरी सदरील उत्सवास प्रत्येकी रु. १० हजार अनुदान मंजुर करण्यांत यावे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेकडुन मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत दरवर्षी साजरे करण्यांत येणाऱ्या गणेशोत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयंती व श्री. छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवासाठी प्रत्येकी पाच हजार रुपये अनुदान देण्यांत येते. सदर अनुदानाची रक्कम उत्सवाचे स्वरुप लक्षात घेऊन अपुरी पडत असल्याने सदर उत्सवासाठी रुपये पाच हजार ऐवजी रुपये दहा हजार प्रत्येकी अनुदान देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२९/३२ :**

श्री. नितीप पं. गायकवाड, शाखा अभियंता यांनी मा. आयुक्त, मनपा औरंगाबाद यांचे आदेश क्र. मनपा/मअ/स्वीस/९९/१५६ दि. ११.३.९९ अन्वये रोखण्यात आलेली एक वार्षिक वेतनवाढ पुर्ववत चालु करणेसंबंधि केलेल्या अपीलावर निर्णय घेणे.

**ठराव :**

शहानुरवाडी येथिल १५० मी मी व्यासाची जलनिःसारण वाहिनी ही तीन वर्षानंतर चोकअप झाल्यामुळ त्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यांत आलेल्या कामाकडे अंशतः दुर्लक्ष केले. या संदर्भात त्यांची एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशी बंद करण्यांत आली आहे. सबब या कारणासाठी भविष्यकाळात अशा प्रकारे दुर्लक्ष होणार नाही याची लेखी समज देऊन श्री. नितीन गायकवाड, शाखा अभियंता यांची बंद करण्यांत आलेली एक वार्षिक वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३०/३३ :**

श्री. राम नारायण घोडके, लिपीक जकात विभाग व श्री. शौकत अली, लिपीक जकात विभाग यांचे एक वर्षाकरीता थांबविण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ चालु करण्याबाबतच्या अपीलावर निर्णय घेणे.

**ठराव :**

श्री. राम घोडके, कनिष्ठ लिपीक व श्री. शौकत अली, क. लिपीक जकात विभाग हे जकात नाक्यावर कामावर असतांना त्यांनी काटेकोरपणे सेवा बजवावी अशी लेखाी समज देवुन त्यांची एक वर्षासाठी थांबविण्यात अलेली वार्षिक वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३१/३४ :**

श्री. ललितकुमार जोंधळे, मिश्रक, आरोग्य विभाग यांचा निलंबनपुर्व कालावधी सेवा प्रयोजनार्थ समजणे व रोखण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ पुर्ववत चालु करणे बाबतच्या अपीलावर निर्णय घेणे.

**ठराव :**

स्थायी समिती सभा दि. ९.२.९९ ठराव क्र. ५३९/१० अन्वये श्री. जोंधळे ललीतकुमार मोतीराम, मिश्रक, आरोग्य विभाग म.न.पा. यांचे दि. २.३.९१ ते ८.१२.९१ पर्यंतचा निलंबनपुर्व कालावधी सेवाकाळ समजण्यात आणि रोखण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ देय दिनांकापासुन पुर्ववत सुरु करण्यांस मंजुरी देण्यांत आलेली असुन सदर सभेचे इतिवृत्त कायम करतांना य निर्णयांस ठराव क्र. ५४७/०१ दि. ६.३.९९ अन्वये प्रशासनाचे मत घेऊन पुढील बैठकीत निर्णय घेण्यांत येईल. तोपर्यंत स्थगिती देण्यांत आलेली होती.

सदर प्रकरणी प्रशासनाचे मत विचारात घेऊन व या अपीलावर विचार विनिमय करुन ठराव क्र. ५४७/१ दि. ६.३.९९ अन्वये दिलेली स्थगिती उठवुन दिनांक ९.२.९९ ठराव क्र. ५३९/१० अन्वये घेण्यात आलेला निर्णय कायम करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३२/३५ :**

श्री. शेख जहीर अहमद, कनिष्ठ लिपीक, झो. नं. ३ यांचे निलंबन प्रकरणात झालेली शिक्षा माफ करणे बाबतच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

स्थायी समिती सभा दिनांक ९.२.९९ चे ठराव क्र. ५४०/११ अन्वये अपीलकर्ता श्री. शेख जहिर अहमद, क. लिपीक यांचे अपील मान्य करुन त्यांचे कायमस्वरुपी बंद करण्यांत आलेल्या दोन वेतनवाढी रद्द करुन त्यांना नियमित वार्षिक वेतनवाढ देण्यांस व २१.९.९६ पासुन ते रुजू होईपर्यंत चा कालावधी निलंबन कालावधी ऐवजी सेवाकाळ म्हणुन संबोधण्यास मंजुरी देण्यांत आलेली होती. तथापी स्थायी समिती सभा ठराव क्र. ५४७/०१ दिनांक ६.३.९९ अन्वये प्रशासनाचे मत घेऊन पुढील बैठकीत घेण्यांत येईल, तोपर्यंत स्थगिती देण्यांत आलेली होती.

सदर प्रकरणी प्रशासनाचे मत विचारात घेऊन व या अपीलावर विचार विनिमय करुन ठराव क्र. ५४७/१ दिनांक ६.३.९९ अन्वये दिलेली स्थगिती उठवुन दि. ९.२.९९ ठराव क्र. ५४०/११ अन्वये घेण्यात आलेला निर्णय कायम करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३३/३६ :**

श्री. मिर्झा मुमताज अलि बेग, माजी वरिष्ठ लिपीक यांचे मनपा सेवेतुन कमी केल्या विरुध्दच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

स्थायी समितीचा ठराव क्र. ५४१/१२ दिनांक ९.२.९९ अन्वये श्री. मिर्झा मुमताज बेग, माजी वरिष्ठ लिपीक यांचे अपील मान्य करुन

१) श्री. मिर्झा मुमताज अली बेग यांना वरीष्ठ लिपीक या पदावर नियुक्ती आदेश देण्यांत यावे.
२) त्यांची सेवामुक्तीच्या तारखेपासुन सेवेत रुजु होईपर्यंतचा कालवधी हा सेवाकाळ समजण्यांत येईल. आणि
३) श्री. मिर्झा मुमताज अली बेग यांना अनुसुचित जमातीसाठी मिळणारे फायदे, सवलती आता यापुढे मिळणार नाहीत. अशा प्रकारे मंजुरी देण्यंत आलेली असुन स्थायी समिती सभा दिनांक ६.३.९९ ठराव क्र. ५४७/१ अन्वये प्रशासनाचे मत घेऊन पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल, तोपर्यंत स्थगिती देण्यांत आलेली होती.

सदर प्रकरणी प्रशासनाचे मत विचारात घेऊन व अपीलावर विचार विनिमय करुन ठराव क्र. ५४७/१ दिनांक ६.३.९९ अन्वये दिलेली स्थगिती उठवुन दिनांक ९.२.९९ चे ठराव क्र. ५४१/१२ अन्वये घेण्यात आलेल्या निर्णयात अंशत: बदल करुन खालील प्रमाणे पुनःश्च निर्णय घेण्यात येतो.

१) श्री. मिर्झा मुमताज अली बेग यांना वरीष्ठ लिपीक या पदावर नियुक्ती आदेश देण्यांत यावेत.
२) त्यांच्या सेवामुक्तीच्या तारखेपासुन सेवेत रुजु होईपर्यंतचा कालावधी हा "असाधारण रजा" समजण्यात येईल.

३) श्री मिर्झा मुमताज अली बेग यांना अनुसुचित जमातीसाठी मिळणारे फायदे, सवलती आता यापुढे मिळणार नाहीत.

सदरील ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३४/३७ :**

श्री. पी. जी. पवार, उपअभियंता (तत्कालीन क. म. नि. अधिकारी) व श्री. शेख मुनीर शेख चाँद दुय्यम आवेक्षक कर, आकारणी विभाग यांची तात्पुरती रोखण्यात आलेली एक वार्षिक वेतनवाढ पुर्ववत चालु करणे बाबतच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

श्री. पी. जी. पवार, तत्कालीन निर्धारण अधिकारी व श्री. शेख मुनीर शेख चाँद, दुय्यम आवेक्षक, कर आकारणी विभाग यांनी मोकळया जागेवर स्थळपाहणी न करता कर आकारणी लागु करण्यांत आल्याबद्दल त्यांची एक वेतनवाढ एक वर्षाकरीता तात्पुरती रोखण्यांत आली आहे. त्यांनी स्थायी समितीकडे मुदतीत अपील दाखल केलेले आहे. मोकळया जागेवर कर आकरणी केल्यामुळे महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झ ालेले नाही. मोकळया जागेची कर आकारणी करतांना यापुढे इतर मालकी हक्काचे कागदपत्रासह स्थळपाहणी देखील करण्यांत यावी अशी लेखी समज देवून त्यांची आदेश क्रमांक मनपा/अस्था-१/१६६२/९६ दि. २१.५.९६ अन्वये एक वर्षाकरीता तात्पुरती रोखण्यांत आलेली एक वार्षिक वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३५/३८ :**

दिनांक १ मार्च, १९९९ च्या अर्जाद्वारे सेवा निवृत्त अधिक्षक अभियंता श्री. ए. व्ही. धारुरकर यांनी पाहणी पुरवठा व जलनि :सारणरच्या कामातील दिर्घकाळ असेलला अनुभव विचारात घेऊन महानगरपालिकेमध्ये तांत्रिक सल्लागार किंवा कन्स्ल्टन्ट या पदावर सेवा करण्याची संधी मिळणे बाबत विनंती केली आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

महानगरपालिकातर्फे पाणी पुरवठा व जलनि:सारण बाबत शासकीय अनुदानांतर्गत चालु असलेली शहरातील मोठी कामे त्याच प्रमाणे पुंडलिकनगर पाणी पुरवठा योजना यासारख्या योजना कार्यान्वित करण्यासाठी पाणी पुरवठा व जलनि:सारणाच्या कामात प्रदीर्घ अनुभव असलेले निवृत्त अधिक्षक अभियंता श्री. ए. व्ही. धारुरकर यांचा सल्ला मोलाचा ठरणार असल्याले श्री. ए. व्ही. धारूरकर यांची तात्पुरत्या स्वरुपात तांत्रिक सल्लागार अभियंता म्हणुन महानगरपालिकेत नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
वैधानीक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद .

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती ,
महानगरपालिका, औरंगाबाद.